MAPOL 1.2

# एम. ए. राज्यशास्त्र

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार

## सुधारित अभ्यासक्रम

## सत्र - I

## पेपर - २

# भारतीय राजकीय व्यवस्था

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. रवींद्र कुलकर्णी**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. डॉ. अजय भामरे**
प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. शिवाजी सरगर**
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**कार्यक्रम समन्वयक** : **अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, कला व मानव्यविद्या शाखा प्रमुख,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई),
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहाय्यक प्राध्यापक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई),
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

: **डॉ. क्षिप्रा वासुदेव**
सहाय्यक प्राध्यापक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई),
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**पुर्नसंपादन** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहाय्यक प्राध्यापक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई),
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **डॉ. भगवान लोखंडे**
डी. जी. तटकारे कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
तळा, जि. रायगड.

**लेखक** : **डॉ. भगवान लोखंडे**
डी. जी. तटकारे कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
तळा, जि. रायगड.

**जूलै २०२४, प्रथम मुद्रण, ISBN No.- 978-81-978283-0-0**

**प्रकाशक**
संचालक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई), मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | पाठाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १. | भारतीय राज्य | १ |
| २. | पक्षपद्धती | ३८ |
| ३. | राजकारण ओळख - I | ११२ |
| ४. | राजकारण ओळख - II | १६८ |


*****

## SYLLABUS

## भारतीय राजकीय व्यवस्था

**विभाग/ घटक -1 - भारतीय राज्य**

अ. कल्याणकारी राज्य-

ब. लोकानुनयाचा काळ

क. जागतिकीकरणाखालील राज्य

**विभाग/ घटक 2 पक्ष पद्धती**

अ. पक्षप्रणालीचे स्वरूप

ब. राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष

क. निवडणूक कामगिरी 1991 नंतर

**विभाग / घटक 3- राजकारण ओळख - १**

अ. जात आणि राजकारण

ब. राजकारण आणि लिंग,

क. अदिवासींचे राजकारण

**विभाग / घटक - 4 राजकारण ओळख - 2**

अ. धर्म आणि राजकारण

ब. भाषा आणि प्रादेशिकतेचे राजकारण

क. वांशिक राजकारण

*****

**Subject code: C50211**
**Indian Political System**
**(4 Credits, 60 Hours)**

**Course objectives:**

1. To acquaint students with the nature and evolution of Indian State since independence.
2. To help students to understand the functioning of party system in India
3. Analyze the role of various socio-political dynamics like caste, gender and religion and their impact on politics.

**Module 1: Indian State**

a) Welfare state
b) Populist era
c) State under globalization

**Module 2: Party System**

a) Nature of party system
b) National Parties and Regional Parties
c) Electoral performance: 1991 onwards

**Module 3: Identity and Politics- I**

a) Caste and politics
b) Politics and gender
c) Politics of Adivasis

**Module 4: Identity and Politics- II**

a) Religion and politics
b) Politics of language and regionalism
c) Ethnic politics

**Course Outcomes:**

1. By the end of the course, students will be able to understand the nature of Indian politics and society
2. It will enabled students to perceive the electoral process
3. Students will be able to comprehend the contemporary realities and their impacts

**Reading List:**


1. Brass, Paul R., 1990, (2001 reprint), The politics of India since Independence. Cambridge University Press, Delhi.
2. Chatterjee, P. (ed), 1997, State and Politics in India, Oxford University Press, New Delhi.
3. Corbridge, S. And Harriss, J., 2000,(2ndedn.), Reinventing India: Liberalization, Hindu Nation
4. DeSouza,P.R., Sridharan, E., Sudarshan, R. (eds.), 2006, India's Political Parties, Sage Publication, New Delhi.alism and Popular Democracy. Oxford University Press, New Delhi.
5. Frankel, F.R. 2005, India's Political Economy: 1947- 2004. Oxford University Press, New Delhi
6. Hansen, T.B., 1999, The Saffron Wave: Democracy and Hindu Nationalism in Modern India. Oxford University Press, New Delhi.
7. Hasan, Zoya (ed.), 2002, Parties and Party Politics in India, Oxford University Press, New Delhi.

8. Hasan, Zoya and Sridharan, E. (eds.), 2002, India’s Constitution: Ideas, Practices, Controversies. Permanent Black, Delhi.
9. Jaffrelot, Christophe, 2003, India’s Silent Revolution: The Rise of the Low Castes in
10. North Indian Politics, Permanent Black, Delhi.
11. John, Mary, E., Jha, Praveen Kumar, Jodhka, Surinder S., (eds.), 2006, Contested Transformations: Changing Economies and Identities in Contemporary India. Tulika Books. New Delhi.
12. Kohli, Atul (ed), 2001, (2004 reprint), The Success of India’s Democracy. Cambridge University press, Foundation Books, New Delhi.
13. Kohli, Atul, 2009, Democracy and Development in India: From Socialism to ProBusiness. Oxford University Press, New Delhi.
14. Kothari, Rajni, 1973, Caste in Indian Politics, Orient Longman, New Delhi.
15. Mohanty, M.(ed.), 2004, Class, Caste, Gender. Sage Publication, New Delhi.
16. Shah, Ghanshyam (ed.), 2002, Caste and Democratic politics in India, Permanent Black, Delhi.
17. Vora, R. And Palshikar, S. (eds), 2004, Indian Democracy: Meaning and Practices. Sage Publications, New Delhi.
18. जाधव तुकाराम,' भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतीबंध ',खंड एक ,युनिक अकॅडमी ,पुणे, 2011 .
19. लोखंडे भगवान,' भारतीय संविधान स्वरूप व तत्वज्ञान 'दुर्वा एजन्सी, पुणे, 2021.
20. लोखंडे भगवान, ' भारतीय राजकारण आणि समकालीन प्रश्न ',दूर्वा एजन्सी, पुणे, 2021 .
21. व्होरा राजेंद्र, सुहास पळशीकर, 'राज्यशास्त्र कोश,' दास्ताने प्रकाशन, पुणे, 1987.
22. पाटील बी.बी .,'भारतीय शासन आणि राजकारण' फडके प्रकाशन ,कोल्हापूर, 2012 .
23. के. सागर,' इंडियन पॉलिटी', के. सागर, पब्लिकेशन, पुणे, 2017 .
24. कुलकर्णी बी. वाय .,'भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया', एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, 2013.
25. लोखंडे भगवान , 'भारतीय शासन व राजकारण ' दूर व मुक्त अध्ययन केंद्र मुंबई विद्यापीठ, मुंबई ,२०२२.
26. लोखंडे भगवान, ' समकालीन भारतीय राजकारण प्रश्न ' दूर्वा एजन्सी, पुणे ,२०२१.
27. देशमुख अलका ,'भारतीय शासन आणि राजकारण 'श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर 2003
28. जाधव तुकाराम , 'भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतीबंध' युनिक अकॅडमी पुणे ,2011 .
29. दिवान मोहन, देवधर जयंत ,'भारतातील राज्यांचे राजकारण' विद्या प्रकाशन नागपूर .
30. पळशीकर सुहास,' समकालीन भारतीय राजकारण ' प्रतिमा प्रकाशन ,पुणे 2009 .
31. पळशीकर सुहास आणि व्होरा राजेंद्र , 'भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार 'डायमंड पब्लिकेशन, पुणे 2010

# १

# भारतीय राज्य

**घटक रचना**

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ कल्याणकारी राज्य आणि स्वातंत्र्योत्तर भारत-नेहरु यूग

१.३ लोकानुनयाचा काळ व राष्ट्रीय आणीबाणी

१.४ जागतिकीकरण व उदारीकरणाच्या संदर्भात भारतीय राज्याचे बदलते स्वरुप.

१.५ सारांश

१.६ आपली प्रगती तपासा

१.७ संदर्भ सूची

## १.१ उद्दिष्ट्ये

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. परकीय साम्राज्यवादाच्या गूलामीतून मुक्त होऊन जागतिक नकाशावर एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून भारताचा उदय झाला. जवळ-जवळ एक शतकभर भारतीय स्वातंत्र्यलढा कार्यन्वीत होता. स्वातंत्र्य या एकमेव ध्येयास केंद्र करुन सर्व संकूचित अस्मिता विसरुन भारतीय जनमानस या लढ्यात सहभागी होते. स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेल्या जनसामान्यांना इंग्रजांना या देशातुन हाकलुन लावणे एवढाच स्वातंत्र्याचा अर्थ कदाचित उमगला असेल मात्र स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करणारे सर्वांच समाजधुरीन स्वातंत्र्याचा एवढा संकूचित अर्थ घेत नव्हते. भारतीय समाज जीवनांला एक राष्ट्र म्हणून उभे करणे, एकमय समाज बनवणे, विषमताधिष्ठीत भारतीय समाजाची समताधिष्ठीत पायावर उभारणी करणे, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही, सामाजिक न्याय या मूल्यांप्रती भारतीय जनमानसास पूरक बनविणे हे स्वातंत्र्याच्या तत्वाचा आशय जीवंत करण्यासाठी आवश्यक आहे याची प्रकर्षाने जाणीव स्वातंत्र्य लढ्यातील धूरीणांना होती. त्यामूळे स्वातंत्र्योत्तर काळात भारताची राष्ट्र उभारणी करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज होती. या दृष्टीने भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी यासाठी पायाभरणी करण्यास प्राधान्य दिले ज्यातुन भारतीय राजकीय व्यवस्थेत संसदीय, शासनपद्धतीची अशक्य वाटणारी पद्धती यशस्वी होऊ शकली. नंतर या आणीबाणीच्या काळात भारतीय स्वातंत्र्याचा आशय काहीसा काळवंडला गेला. संसदीय शासपद्धतीचे काही संकेत मोडून काही अपप्रवृत्तीचा भारतीय राजकीय प्रक्रियेत शिरकाव झाला मात्र लवकरच आम्ही 'भारताचे लोक' होऊनच सामान्य जनतेने लोकशाही प्रक्रियेस अधिक सशक्त करण्यासाठी कंबर कसली. १९९० च्या दशकात जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या जागतिकीकरण उदारीकरण व खाजगीकरणाच्या प्रक्रियेस ही भारताने सकारात्मक प्रतिसाद देत भारताच्या आर्थिक विकासास वेग देण्यासाठी उपयोग करुन घेतला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे स्वरुप व प्रभाव हे सर्वकष स्वरुपाचे असल्याने त्यापासून भारतीय राजकीय व्यवस्थेचे स्वरूपही अस्पर्शी राहणे शक्य नव्हते. यादृष्टीने स्वातंत्र्योत्तर काळातील नेहरु युगापासुन समकालिन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपर्यंत भारतीय राज्यव्यवस्थेत

झालेल्या महत्वाच्या घटकांच्या धोरणांचा व बदलांचा आढावा या घटकामध्ये घेण्यात आला. त्यामुळे भारतीय शासन व राजकारणाचे अवलोकन होण्यास आपणास मदत होईल.

## १.२ कल्याणकारी राज्य आणि स्वातंत्र्योत्तर भारत-नेहरु यूग

**कल्याणकारी राज्य:**

बिस्मार्कच्या सामाजिक कायद्यामुळे (१८८३-१८८९) कल्याणकारी राज्य ही संकल्पना प्रामुख्याने युरोपमध्ये १९व्या शतकाच्या शेवटी रूढ झाली. विसाव्या शतकात कल्याणकारी राज्याचे तत्व व्यापक प्रमाणावर पुढे आले प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धा नंतर साम्यवादाचा प्रभाव व प्रसार रोखण्यासाठी अमेरिकेच्या पुढाकाराने कल्याणकारी राज्य संकल्पनेचा जोरदार प्रचार व प्रसार करण्यात आला. सत्तेच्या केंद्रकरणाचा धोका टाळणे व समाजातील गरजू व दुर्बल घटकांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविणे हा प्रधान हेतू कल्याणकारी राज्य संकल्पनेत अभिप्रेत आहे. साधारणतः कल्याणकारी राज्य म्हणजे सर्व नागरिकांच्या जीवनातील मूलभूत व प्राथमिक समस्या सोडवण्याकरिता सरकारची मदत .यामध्ये संधीची समानता सामाजिक सुरक्षा प्राथमिक वैद्यकीय सेवा गुलामगिरीच्या अथवा वेठबिगारीच्या सापळ्यातून संरक्षण इत्यादी बाबींचा समावेश होतो. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतासमोर प्रचंड समस्या होत्या दारिद्र्य बेकारी आरोग्य सुविधांचा अभाव भौतिक सुविधांची वानवा धार्मिक दंगलीने निर्माण केलेले प्रश्न निरक्षरता यासारख्या आव्हानांवर मात करण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय स्वातंत्र्य धोरणांनी कल्याणकारी राज्य संकल्पनेचा स्वीकार केला. कल्याणकारी राज्य संकल्पनेचा स्वीकार व अंमलबजावणीच्या दृष्टीने पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली प्रामुख्याने धोरणांची आखणी केली गेली. पुढील काळातही भारत सरकारचे नेतृत्व करणाऱ्या सर्वच पंतप्रधान व नेत्यांनी कल्याणकारी धोरणांना अधिक बळ दिलेले दिसते.

यातील काही प्रमुख धोरणे व तत्वांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल

१. लोकशाही समाजवादाकरिता संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार भारत सरकारने प्रामुख्याने केलेला दिसतो भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारताच्या राष्ट्र उभारणी करिता साम्यवादी रशियाचे व उदारमतवादी अमेरिकेचे प्रतिमान भारतीय सरकार समोर होते यामध्ये सुवर्ण मध्य साधून भारताने कल्याणकारी राज्य व्यवस्थेला प्रत्यक्षात आणण्यासाठी समिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून लोकशाही समाजवादाच्या तत्त्वांना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

२. कृषीविषयक सुधारणांना प्राधान्य देत जमिनींचे फेरवाटप कमाल जमीन धरणा कायदा जमीनदारी पद्धतीचे उच्चाटन कुळ कायदा सहकार शेतीचे प्रयोग पाणीपुरवठ्याची योजना कृषीविषयक अनेक सुविधा उपलब्ध करून देत कल्याणकारी राज्याचे तत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारत सरकारकडून करण्यात आलेला दिसतो

३. सामाजिक व शैक्षणिक सुधारणांना प्राधान्य देत भारतातील निरक्षरता सामाजिक विषमता भेदाभेद अस्पृश्यता इत्यादीचे उच्चाटन करून सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने अनेक संविधानिक तरतुदी कायदे व धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आलेली दिसते.

४. महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शिक्षण आरोग्य रोजगार समान वेतन आरक्षण इत्यादींच्या माध्यमातून कल्याणकारी राज्याचे तत्व प्रत्यक्षात राबविण्यात आले .

५. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण करून दुर्बल घटक व महिलांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेण्याकरिता ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्ती द्वारा पंचायत राज व्यवस्थेला संविधानिक दर्जा देण्यात आला व सत्तेच्या विकेंद्रीकरणातून कल्याणकारी राज्याचे तत्व प्रस्थापित करण्याचा एक मूलभूत प्रयत्न भारतामध्ये झालेला दिसतो .

६. कल्याणकारी राज्य संकल्पने अंतर्गत भारतात अन्नसुरक्षा कायदा, जन आरोग्य विमा, प्रधानमंत्री आवास योजना, मिड डे मिल, रोजगार हमी योजना, शिष्यवृत्ती योजना ,वरिष्ठ नागरिकांना मानधन, मोफत शिक्षण, महिला सन्माननिधी, अशा विविध योजना राबविल्या जाताना दिसतात.

एकंदरीत स्वातंत्र्योत्तर काळात भारतात राष्ट्र उभारणी करताना कल्याणकारी राज्याचे तत्व स्वीकारण्यात आले पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पासून आज पर्यंत भारतात विविध पक्ष व आघाड्यांची सरकारी आली मात्र कल्याणकारी राज्याच्या तत्त्वाबाबत व योजनांबाबत त्यांच्यात मोठ्या प्रमाणात साधर्म्य असल्याचे निदर्शनास येते.

## स्वातंत्र्योत्तर भारत-नेहरु यूगः

स्वातंत्र्यपूर्व काळातच ब्रिटीश सरकारने भारताचे हंगामी सरकार तयार करुन त्याची प्रधानमंत्री पदाची जबाबदारी पं. जवाहरलाल नेहरु यांच्यावर सोपवली होती. स्वातंत्र्य टप्प्यात आले. त्यावेळी भारतीय राजकारणात तीन नेत्यांचा जनमानसावर मोठा प्रभाव होता. पं. जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल व सुभाषचंद्र बोस हे तीन प्रमुख नेते त्यावेळी भारतीय राजकाणातील प्रभावी व्यक्तित्वे होती. यापैकी सुभाषचंद्र बोस यांनी दुसऱ्या महायूद्धाच्या काळात जर्मनी व जपानच्या सहाय्याने आझाद हिंद सेनेचा प्रयोग करुन ब्रिटीश सत्तेविरोधात सशस्त्र यूद्ध पूकारले होते. मात्र त्यांना युद्धकाळात वीरमरण आले. सरदार वल्लभभाई पटेल हे काँग्रेसमधील जनसामान्यांशी नाळ असणारे व्यक्तिमत्व वृद्धापकाळाकडे झुकलेले होते. अशा परिस्थितीत स्वातंत्र्योत्तर भारताचे नेतृत्व करण्याची संधी पं. जवाहरलाल नेहरुंना मिळाली. असे म्हटले जाते की आपले विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी तत्त्ववेत्यांना संधी फारशी मिळत नाही. परंतु जवाहरलाल नेहरु व चीन मध्ये माओ-त्से-तूंग या दोन नेत्यांना ही संधी प्रत्यक्षात मिळाली. यादृष्टीने नेहरु कालखंडाचा भारतीय घडामोडी, ध्येय व धोरणे यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. नेहरु कालखंडातील महत्वाचे घटकः-

भारतीय राजकारणातील नेहरु युगाचा अभ्यास करताना त्याची तीन भागात विभागणी करता येईल.

१) स्वातंत्र्योत्तर काळात तातडीने करावयाच्या गोष्टींबाबतची अंमलबजावणी.

२) नेहरुंची विचारधारा व त्याचा राष्ट्र उभारणीतील प्रभाव.

३) नेहरु कालखंडातील धोरणे- या पद्धतीने नेहरु कालखंडाची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

### १) स्वातंत्र्योत्तर काळात तातडीने करावयाच्या बाबी:

स्वातंत्र्योत्तर काळात भारताची लोकशाही राष्ट्र म्हणून उभारणी करण्यासंदर्भात काही बाबीनां तातडीने पूर्णत्वास नेणे अत्यावश्यक होते. यास नेहरु सरकारने प्राधान्याने पूर्ण केले. त्यातील प्रमुख तीन घटक पूढील आहेत.

### २) संस्थानिकांचे विलिनीकरण:

भारताचे स्वातंत्र्य जसे दृष्टीपथात आले तसे भारतातील संस्थानिकांच्या प्रश्नाने अधिक जटिल स्वरुप धारण करावयास सुरुवात केलेली दिसते. ब्रिटीशांनी भारत सोडून जाताना भारत सरकारकडे संस्थानिकांचे भवितव्य न सोपवता संस्थानिकांना परस्पर सार्वभौमत्व प्रदान करावे असा संस्थानिकांच्या गटांचा आग्रह होता. यादृष्टीने १२ मे १९४६ रोजी कॅबिनेट मिशनने संस्थानिकांना आवडेल व राष्ट्रीय एकात्मतेस धोका निर्माण होईल आशा पद्धतीची घोषणा केली. या घोषणेप्रमाणे ब्रिटीश सरकारने जाहीर केले की, ब्रिटीश सरकार कोणत्याही परिस्थितीत भारतीय सरकारला संस्थानिकांची सत्ता सोपविणार नाही. भारतास स्वातंत्र्य देताना संस्थानिकांनाही स्वातंत्र्य देण्यात येईल. भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यातही संस्थानिकांना तीन पर्याय देण्यात आले होते. एक म्हणजे ते भारतात सामील होऊ शकतील, दुसरे म्हणजे ते पाकिस्तानमध्ये सामील होउ शकतील व तिसरे म्हणजे ते स्वतःस सार्वभौम घोषित करु शकतील. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतासमोर एकसंघ राष्ट्र निर्माण करण्याचे व संस्थानिकांचा प्रश्न सोडविण्याचे गंभीर आव्हान निर्माण झाले होते.

पं. जवाहरलाल नेहरुंच्या मंत्रिमंडळात उपपंतप्रधान व गृहमंत्री पदाची जबाबदारी सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावर सोपवण्यात आली होती. सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपले कौशल्य व क्षमता पणास लावून संस्थानिकांचा प्रश्न निकाली काढून एकसंघ भारताची निर्मिती करण्याचे महान कार्य पूर्ण कले म्हणूनच त्यांना भारताचे बिस्मार्क असे संबोधन वापरले जाते. भारताचे पोलादी पूरूष म्हणून त्यांना ओळखले जाते, संस्थानिकांचे विलिनीकरण करताना सरदार पटेलांनी तीन मार्गांचा अवलंब केला. यातील पहिला मार्ग म्हणजे संस्थानिकांना जवळच्या राज्यात सामील करुन घेणे. यामार्गाने ओरीसा व छत्तीसगढ भागातील ३५ संस्थाने, दक्षिणेतील १७ संस्थाने व काठियावाडमधील २८५ संस्थानिकांचे विलिनीकरण सरदार पटेलांनी घडवून आणले. संस्थानिकांचा दुसरा मार्ग म्हणजे प्रादेशिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या संबंधित असलेल्या संस्थांनाला एकत्र करण्याचे धोरण. या धोरणानूसार काठीयावडमधील २२२ लहान संस्थानांचे विलिनीकरण करुन फेब्रुवारी १९४८ मध्ये सौराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात आली. माळवा, ग्वाल्हेर व इंदौर ही संस्थाने मिळून मध्यभारत अस्तित्वात आला. पूर्व पंजाब मधील आठ संस्थाने एकत्र करुन पंजाब प्रांताची निर्मिती करण्यात आली. राजपुतान्यातील मेवाड, जयपूर, जोधपूर, जैसलमेर, बिकानेरने व अन्य लहान मोठी संस्थाने एकत्र करुन राजस्थान राज्याची निर्मिती करण्यात आळी. या प्रमाणेच त्रावणकोर-कोचीन यांचा संघ तयार होता. संस्थानांचा विनिनिकरणाकरीता तिसरा मार्ग म्हणून लहान-लहान संस्थानांना एकत्र करुन त्यांना केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला.उदा. पूर्व पंजाबमधील २१ संस्थांनाचे एकत्रीकरण करुन हिमाचल प्रदेश हा केंद्रशासित प्रांत निर्माण करण्यात आला. याशिवाय जुनागढ, हैदराबाद व काश्मिर या राज्यांसाठी सरदार पटेलांनी लष्करी कारवाईचा मार्ग अवलंबला व भारताचे एकीकरण करुन एकसंघ राष्ट्र बनवण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाउल टाकले गेले. एकंदरीत नेहरु कालखंडाली तातडीचा प्रश्न म्हणून संस्थानिकांचा प्रश्न मार्गी लावण्यात आलेला दिसतो.

## ३) भारतीय संविधान निर्मिती :

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताने जगाला दिलेली सर्वात महान देणगी म्हणजे भारतीय संविधान ही होय. स्वातंत्र्यपूर्वकाळातच संविधानसभेची निर्मिती झालेली असली तरी मुस्लिम लीगच्या आडमुठ्या भूमिकेमुळे संविधान निर्मितीची प्रक्रिया मात्र वेग धरु शकत नव्हती. स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला भारताची फाळणी होऊनच पाकिस्तान हे राष्ट्र निर्माण झाले व संविधान सभेस आपल्या इच्छेप्रमाणे संविधानाचे प्रारुप तयार करणे सोपे झाले असे म्हटले तर वावगे ठरु नये. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला त्यानंतर अवघ्या १५ दिवसात भारतीय संविधानाचा तिसरा भाग तयार झाला व मसूदा समिती अस्तित्वात आली. पूढे मसुदा समितने अवघ्या १४६ दिवसात भारतीय संविधानाचा मसुदा तयार करुन संविधान सभेपूढे सादर केला. जनतेच्या विचारार्थ तो सहा महिन्यांकरिता चर्चेसाठी ठेवला व २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान सभेने हे संविधान अंगिकृत केले. २६ जानेवारी १९५० पासुन त्याची संबंध भारतभर अंमलबजावणी झाली व भारत खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक सार्वभौम गणराज्य म्हणून अस्तित्वात आले. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे सर्वात मोठे लिखित संविधान ठरले. २ वर्ष अकरा महिने व सतरा दिवस एवढ्या कालावधित तयार झालेले हे संविधान २२ भागात विभागलेले असुन त्यात ३९५ कलम व आठ परिशिष्टांचा त्यात समावेश करण्यात आला होता. भारतीय संविधानाची निर्मिती ही नेहरू कालखंडातील सर्वात महत्वाची तातडीच्या प्रश्नांची अंमलबजावणी झाली, ज्यावर पुढील काळातील भारत या राष्ट्राची उभारणी होऊ शकली.

## ४) निवडणूकांचे आयोजन :

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानाच्या अंमलबजावणी झाली, परंतु अद्यापही भारतात खऱ्या अर्थाने लोकनिर्धारित सरकार अस्तित्वात आलेले नव्हते. कारण भारतात निवडणुकांचे आयोजन करणारी कोणतीही यंत्रणाच तयार झालेली नव्हती. प. जवाहरलाल नेहरु तातडीने निवडणूका घेण्यासाठी आग्रही होते. त्यासाठी त्यांनी सर्व ताकद व सहकार्य ही यंत्रणा उभारण्यासाठी दिली. भारतीय संविधानाने ही निवडणूक आयोगास स्वायत्तता व संवैधानिक दर्जा देऊन एक प्रकारचे पावित्र्य बहाल केले होते. संवैधानिक तरतूदीप्रमाणे २५ जानेवारी १९५० रोजी निवडणुक आयोगाची स्थापना करण्यात आली. या निवडणुक आयोगाने संबंध देशाचे सामायिक, आर्थिक, राजकीय सर्वेक्षण करुन मतदार संघ रचना, मतदार यादी, मतदान यंत्रणा तयार करण्याचे कार्य १९५० नंतर अहोरात्र केले व १९५२ साली प्रथम सार्वत्रिक निवडणूकांचे देशात आयोजन करण्यात आले. १९ कोटी ६० लाख मतदारांना या पहिल्याच सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाचा अधिकार मिळाला होता. एवढ्या मोठ्या संख्येने पहिल्याच निवडणूकीत आजतागायत कोणत्या देशात मतदानाचा अधिकार बहाल करण्यात आलेला नव्हता. त्यातच भौतिक सुविधांची वानवा, प्रचंड स्वरुपाची निरक्षरता, दारिद्र्य, विषमता अशा प्रतिकुल परिस्थितीत ही निवडणुक आयोगाने हे अशक्यप्राय वाटणारे आव्हान पेलले व जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा हा प्रयोग यशस्वी करुन दाखविला. या मागे निवडणुक आयोगाचे कष्ट जसे होते तसेच नेहरूंचे प्रामाणिक सहकार्य ही दिसते. सार्वत्रिक निवडणूकांचे लोकशाही पद्धतीने होणारे आयोजन हे नेहरु कालखंडात संसदीय पद्धतीची सुरुवात होण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे ठरले.

## २) प. जवाहरलाल नेहरुंची विचारधारा व प्रभावः

प. जवाहरलाल नेहरु हे म. गांधींच्या प्रभावखाली भारतीय स्वातंत्र्यलढ्यात वावरले असले तरी त्यांची स्वयंप्रज्ञा होती. त्यांच्या विचारांची स्वतःची अशी घडन आढळते. ज्याचा प्रभाव त्यांच्या कालखंडातील एकूण शासकीय धोरणांवर व राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेवर पडलेला दिसतो त्यातील महत्वाच्या काही पैलुंची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

### अ) नेहरुंचे इतिहासाचे आकलन :

प. जवाहरलाल नेहरुंच्या कालखंडात जी राष्ट्राची घडण झाली. त्यावर नेहरुंच्या इतिसाह विषयक आकलन दृष्टीचा ही अमिट स्वरुपाचा प्रभाव पडलेला दिसतो. नेहरुंच्या मते, जुन्या परंपरा कधीच पुसुन वा गाडून टाकता येत नाहीत. संघर्षाच्या क्षणांमध्ये त्या माणसांना व राष्ट्रांना प्रयत्नांच्या व स्वार्थत्यागाच्या विचारापर्यंत पोहचवु शकतात. त्यामुळे नव्या परंपरा उभारीत असतानाच जुन्यांचेही जतन केले पाहिजे हा प. नेहुंचा एकुण इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. त्याकरीता भूतकाळाबद्दल ते कधीच अंधश्रद्ध नव्हते. डोळसपणे त्यांनी आपल्या पूर्वसंचितांची तपासणी केली. मातृभूमीचा अधिक बाकारईने व तपशीलवारपणे शोध घेतला आणी आपण किती अफाट, विराट संपन्नतेचे वारस आहोत हे देशवासियांच्या नजरेत आणून दिले. परकीय इतिहासकारांनी या देशाला देशाला हीन ठरविण्याच्या व स्वतःला श्रेष्ठ ठरविण्याच्या धडपडीतुन जे इतिहास लिहिले आहेत. त्यातुन भारताच्या भूतकाळाचे यथार्थ आकलन होणे अशक्य असल्याचे त्यांना जाणवले. प. जवाहरलाल नेहरुंनी इतिहासाचे अवलोकन करण्यासाठी जे कष्ट घेतले त्याचे विश्लेषण करतांना डॉ. भा. ल. भोळे लिहितात ''आपल्या प्राचीन इतिहासाचे अवलोकन करुन घेण्यासाठी त्यांनी स्वतःच कष्ट घ्यावयाचे ठरविले. त्याकरीता त्यांनी सिंधुच्या खोऱ्यातील मोहोंजोदारोचे अवशेष न्याहाळले, वेरुळ अजिंठाची लेण्यांमधील कोरीव कामे पाहिली, दिल्ली-आग्रांच्या दगडा-दगडांच्या तोंडून भारताच्या भूतकाळाच्या कहाण्या ऐकल्या. सारनाथाला प्रत्यक्ष प्रवचन देणाऱ्या बुद्धाचे त्यांना दर्शन झाले. अशोक स्तंभाने सम्राट अशोकाची थोरवी त्यांना सांगितली. फत्तेपूर-शिक्रीला अकबर बादशहाच्या स्मृतींना ते भटले, गिरीशिखरांनी, नद्यांनी, पठारांनी व भारतीय निसर्गाच्या अनुरेणूंनी त्यांना मोहून टाकले. प्राचीन विचारवैभवाने ते दिपले, मनाच्या व भाषांच्या स्वरुपामुळे प्रभावित झाले. त्यांच्या येथवरच्या बौद्धीक ज्ञानाला भावनिक आस्वादाची जोड मिळाली. या देशातील अनेकत्वातील ऐक्याचा व अखंड परिवर्तनातील सांस्कृतिक वारसाचा त्यांना साक्षात्कार झाला.'' डॉ. भा. ल. भोळे यांच्या या शब्दांमधील काव्यात्मक भाग वगळला तरी प. नेहरुंची मोठ्या कष्टाने आपली इतिसाहविषयक दृष्टी विकसित झाली होती व त्यावर आधूनिक भारताची उभारणी करण्याचे महान ध्येय उराशी बाळगून स्वातंत्र्योत्तर भारताची उभारणी करण्याचे सातत्याने प्रयत्न केलेले दिसतात.

### ब) नेहरुंचे राष्ट्रवादाचे आकलनः

प. जवाहरलाल नेहरुंचा राष्ट्रवाद इतिहासाच्या आकलनावर आधारलेला होता. नेहरुंच्या मते आंतरराष्ट्रीत्वाच्या विचारसरणीच्या उदघोष करणाऱ्या राष्ट्रामध्येही पितृभूमी च्या अभिमानांवर पोसला जाणारा राष्ट्रवाद संकटकाळी अधिक प्रबळ ठरत असतो. तरीही प. नेहरुंनी आपल्या राष्ट्रवादाच्या कल्पनेस जीर्णोद्धारवादी राष्ट्रवादाचे स्वरुप मात्र येणार नाही याची काळजी घेतलेली दिसते. नेहरुंच्या मते, भूतकाळाच्या अध्ययनातून जर संकूचित व प्रतिगामी दृष्टीकोन वाढीस लागला, तर त्यास राष्ट्रवाद ही संज्ञा वापरणे चूकीचे ठरेल. राष्ट्रवादाच्या अगदी उलट

त्याचे स्वरुप असते. त्यामुळेच नेहरू आपल्या जीवनभरात कधीही धार्मिक राष्ट्रवादाचा स्वीकार करु शकले नाहीत. भारतीय राष्ट्रवादाच्या उभारणीकरीता राष्ट्रऐक्यावर त्यांनी सर्वाधिक भर दिलेला दिसतो. नेहरुंच्या मते, राष्ट्रैक्य ही केवळ बौधिक संकल्पना नसुन एक भावनिक अनुभव मात्र आहे. वरकरणी पाहता भारतीयांमध्ये चेहरेपट्टी, आकारमान, आहार, पोषाख, भाषा, धर्म, संस्कृति अशा विविध बाबींमध्ये भारतदेश जगाची संक्षिप्त आवृत्ती वाटावी एवढी विविधता आहे. परंतु इतिहासाचे अवलोकन केले तर असे निदर्शनास येते की, अगदी प्रारंभापासुनच समन्वयाच्या व एकीकरणाच्या परंपरा या देशात समृद्ध आहेत. या परंपरा कोणी बाहेरुन लादलेल्या नसुन त्या भारतीय समाज मनात सनातन काळापासूनच आहेत. त्यामुळेच राज्यकर्त्यांनी निर्मिलेल्या राजकीय एकीकरणातुन येथे पारंपारिक सांस्कृतिक एकीकरणाची जाणीव अधिक वृद्धींगत झाली. समान गूलामगीरीने निर्माण केलेल्या ऐक्यातुन समान राष्ट्रवादाचे ऐक्य साकार झाले. भाषाधर्मादी यासारखे वरवरचे भेद दुय्यम ठरले. भारतात त्यामुळे कितीही भाषा असल्या तरी त्यातून भारतीय राष्ट्रवादाच्या एकात्मतेस धोका पोहचणार नाही अशी नेहरुंची भूमिका होती मात्र धार्मिक मूलतत्ववादाच्या बाबतील मात्र नेहरु साशंक होते. प. नेहरुंनी स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात निर्माण झालेली द्विराष्ट्रवादाची संकल्पना स्पष्ट स्वरुपात नाकारताना म्हटले होते, या देशांत फक्त एकच एक राष्ट्रवाद आहे आणि तो म्हणजे भारतीय राष्टवाद. नेहरुंच्या मते या देशातील अल्पसंख्यांक कधीच वांशिक अल्पसंख्यांक नव्हते वा यूरोपातील राष्ट्रकांच्या स्वरुपात ही अस्तित्वात नव्हते, तर ते केवळ धार्मिक अल्पसंख्यांक होते. या दृष्टीने पाहता, जात, धर्म, प्रांत, भाषा यासारख्या घटकांना छेदून जाणारी प्रखर भावनिक एकात्मता हे प. नेहरुंच्या राष्ट्रवादाचे महत्वाचे साध्य होते. भारताची स्वातंत्र्योत्तर कालीन उभारणी ही या संमिश्र संविधानिक राष्ट्रवादावरच करु इच्छित होते.

### क) लोकशाही व समाजवादः

प. जवाहरलाल नेहरुंची लोकशाही व समाजवाद या तत्वांवर अढळ श्रद्धा होती. ही दोन्हीं तत्वे भारतीय राष्ट्र उभारणीकरीता उपयोगी आणण्याच्या हेतुने त्यांनी लोकशाही समाजवादाची तत्व वैचारीक मांडणी केली व ती जीवनभर जोपासलेली दिसते. जनसामान्यांबद्दलचा आदर व व्यक्तिप्रतिष्ठेचे महत्व यातून नेहरुंची लोकशाही समाजवादावर श्रद्धा स्थिरावली होती. या दृष्टीनेच लोकशाहीची सर्व समावेशक व्याख्या करताना त्यांनी म्हटले होते लोकशाही केवळ राजकीय नसते. केवळ आर्थिकही नसते, ती एख मनोवस्था असते... सर्वांना राजकीय व आर्थिक क्षेत्रात शक्यतो समान संधी मिळणे त्यात अभिप्रेत असते. व्यक्तीला विकासाचे स्वातंत्र्य असून आपल्या क्षमतेचा व पात्रतेवर पुरेपुर फायदा घेण्याचे स्वातंत्र्य त्यात असते. दुसऱ्यांबद्दल व आपल्याशी न जुळणाऱ्या त्यांच्या मनाबद्दल सहिष्णूता असते. ती एक प्रवाही गोष्ट आहे. शेवटी आपल्या राजकीय समस्यांकडे पाहण्याचा लोकशाही हा एक मानसिक दृष्टीकोन असतो. सारांश, नेहरुंच्या मते, लोकशाही म्हणजे काही राजकीय संस्थांची केवळ उपस्थिती एवढाच मर्यादित अर्थ नसुन व्यक्तीच्या विकासाकरीता पूरेपुर संधी उपलब्ध करुन देणारा चैतन्यमय समाज असा लोकशाहीचा अर्थ होय. त्याचबरोबर नेहरुंच्या ठायी असणारे समाजवादाचे आकर्षण हे केवळ भावनिक नव्हते. तर प्रत्यक्ष परिस्थितीचे अध्ययन करुन ते त्याआधारे या देशाकरीता उपयुक्त ठरु शकणाऱ्या समाजवादाची उभारणी करु इच्छित होते. नेहरुंचा समाजवाद हा व्यक्तित्वातंत्र्यास मारक नव्हता. त्यांच्या मते, लोकशाही व समाजवाद या दोहोंचाही हेतू विषमता नाहीशी करणे व सामाजिक न्याय सुलभ करणे हा असल्यामूळे त्या दोहोंत आवश्यकता अंतर्विरोध संभवत नाही. नेहरूंच्या मते, स्वातंत्र्य व लोकशाही समतेविना अशक्य असूरन समता प्रस्थापित होण्यासाठी उत्पादनाची मुल्य साधणे खाजगी मालकीतून बाहेर पडणे अनिवार्य असल्यामूळे समाजवाद लोकशाहीत पूरकच ठरतो. त्यामूळे समाजवादांतर्गत व्यक्तीस स्वातंत्र्य

तर मिळतेच शिवाय त्याबरोबरीने अधिक सूरक्षिततेचाही लाभ होतो. नेहरुंचा लोकशाही समाजवाद व्यक्तींचे वेगळेपण व अस्मिता चिरडुन टाकत नाही. खाजगी मालकी ही मोडून काढत नाही, केवळ महत्वाचे उद्योगधंदे राष्ट्रीय मालकीचे होतात, लहान ग्रामोद्योग सहकारी स्वामित्वाखाली येतात. सारांश, नेहरुंच्या लोकशाही समाजवादामूळे समतेच्या दिशेने मालमत्तेचे न्याय्य वितरण शक्य होते त्याकरीता संतूलित व प्रभावी नियोजनाची गरज असते असे आपण म्हणू शकतो.

### ड) नेहरुंचा आंतरराष्ट्रीय वाद :

पं. जवाहरलाल नेहरुंचा आंतरराष्ट्रीयवाद विषयक दृष्टीकोण ही स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकीय व्यवस्थेला मोठ्या प्रमाणात प्रभावित करुन गेलेला दिसतो. नेहरूंच्या मते, राष्ट्रवादाला स्वयमेव साध्य-मूल्य नाही. तर ते केवळ साधन आहे. राष्ट्रवादावर खंबीर पाय रोवून नेहरुंनी आंतरराष्ट्रीय वादाची सेवा करण्याचे धोरण निश्चित केले होते. नेहरुंनी या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते की, या महान देशाला समर्थ राष्ट्र म्हणून आपणांस उभे करायचे आहे. परंतु समर्थ या शब्दाचा प्रबळ असा अर्थ नेहरु येथे अभिप्रेत न करता विचारांनी समर्थ, कृतीने समर्थ संस्कृतीने समर्थ व मानवेची शांतातपूर्वक सेवा करण्याच्या दृष्टीने समर्थ असा त्यांनी अर्थ अपेक्षित होता. त्यांच्या मते आंतरराष्ट्रीय सहजीवनाच्या दृष्टीने भूतकालिन कटु स्मृती, युद्धाच्या व संघर्षाच्या स्मृती घोळवत न बसता परस्पर सहकार्याचे नवे पर्व कष्टपूर्वक सुरु करावयास हवे. त्यासाठी विचार सरणीचा वृथा दुराग्रह न धरता व त्यांना आंतरराष्ट्रीय आदान प्रदानातील अडसर होउ न देता राष्ट्रांनी परस्परांच्या कामकाजात अतिरिक्त हस्तक्षेप टाळावा. याकरीता नेहरुंनी पंचशील धोरणांना प्रस्तूत केले होते. ती पंचशील म्हणजे, परस्परांच्या भौगोलिक ऐक्याबद्दल व सार्वभौमत्वा बद्दल सन्मान, अनाक्रमण, परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे, समानता व अन्योन्योपकारकत्व व शांततामय सहजीवन या पंचशील तत्वांना सुरवातीस ब्रम्हदेश, भुतानकान्हीया यासारख्या राष्ट्रांनी मान्यता दिली हीच तत्वे पुढील काळात अलिप्ततवादी चळवळीचा तत्ववैचारीक पाया ठरली. पंचशील धोरणांचा जगाने जर स्वीकार केला तर जगावरील भीतीची व अविश्वासाची सावटे कुठल्या कुठे निघुन जातील असा नेहरुंचा विश्वास होता.

प. जवाहरलाल नेहरुंना असे वाट होते की, आंतरराष्ट्रीय वादातुन अंतिमतः जगाचे संघराज्य निर्माण होईल. नेहरु या संदर्भात म्हणतात, जागतिक शासन यायलाच हवे व ते येईलच. कारण त्याखेरीज जगाच्या व्याधींवर दुसरा इलाजच नाही. तशी यंत्रणा उभी करणे मूळीच अवघड नाही. संघराज्य तत्वाचेच ते वृद्धीकरण असेल. नेहमी तत्कालीन भयगंडाच्या प्राप्तीकडे पाहून अस्वस्थ होत असत. त्यांच्या मते भवितव्याची, मुल्यांची, शेजारील राष्ट्रांची अशा अनेक भीती मानवमनाच्या डोक्यावर घिरट्या घालत असून त्यातुन सुटण्यावरच मानवतेचे भवितव्य अवलंबुन आहे. नेहरुंच्या मते आंतराष्ट्रीय सहजीवन सौजन्य, सहकार्य, सहिष्णूता, सहानुकंपा व सदिच्छा याच मानवाला या बाबतील मदत करु शकतील. त्याखेरीज दुसरा कोणताच मार्ग नाही. सारांश, प. नेहरुंचा आंतरराष्ट्रीय वाद हा स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय घडामोडींवर प्रकाश टाकणारा महत्वाचा घटक ठरलेला दिसतो.

### नेहरु कालखंडातील महत्वाची ध्येयधोरणे:

प. जवाहरलाल नेहरुंचा कालखंड म्हणजे भारतीय बाल लोकशाहीचा कालखंड मानावा लागेल. भारत स्वतंत्र झालेला होता. परंतु भारतासमोर प्रचंड समस्या होत्या. दारिद्र्य, बेकारी, आरोग्य सुविधांचा अभाव, भौतिक सुविधांची वाणवा, धार्मिक दंगलीने निर्माण केलेले प्रश्न, निरक्षरता.

गांधीजींची हत्या झाल्यानंतर निर्माण झालेले असंतोष, भाषिक आंदोलन, पाकिस्तान चे आक्रमण व चीन ची घुसखोरी या सर्व पातळ्यांवर नेहरु कालखंडात भारतीय राज्य व्यवस्थेला संघर्ष करुन नवभारताची उभारणी करण्याचे आवाहन पेलावे लागले. हे आवाहन पेलण्याकरिता या कालखंडात प्रामुख्याने पुढील ध्येयधोरणांचा पाठपुरावा करण्यात आला. ज्यावर प. नेहरुंचा विचार व नेतृत्वाचा अमिट असा ठसा कायम असलेला आपणास दिसतो.

### १) लोकशाही समाववादाकरीता संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार:

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतासमोर विकासाची प्रामुख्याने दोन प्रतिमाने होती. एक प्रतिमान सोव्हिएत रशियाचे होते. ज्याने संपूर्ण उद्योगधंदे व राष्ट्रीय संसाधनांचे राष्ट्रीयकरण करुन पंचशील योजनांच्या सहाय्याने, अल्पावधित विकासाचा मोठा टप्पा पार करुन जगाला आश्चर्यचकित करुन सोडले होते. सोव्हिएत रशियाने साधलेल्या या विकासाने जगभरातील नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचा साम्यवाद प्रतिमाणाकडे आकर्षित झाले होते. पाश्चात्य उदारमतवादी राष्ट्रे ही रशियाच्या प्रगतीने आवाक झाले होते. विकासाचे दुसरे प्रतिमान जगात प्रचलित होते. ते अमेरिकेचे उदारमतवादी भांडवलशाहीचे. सरकारचा कमीतकमी हस्तक्षेप ठेवुन खाजगी मालकी व उद्योगांना प्रोत्साहन देवुन अमेरिकेने विकासाचे नवे उच्चांक प्रस्थापित केले होते. एवढेच नव्हे तर अमेरिका हा जगातील एक महासत्ताक राष्ट्र म्हणून पुढे आला होता. स्वातंत्र्यवादाचे, उदारमतवादाचे अमेरिका प्रमुख आकर्षण ठरत होता. अशावेळी स्वतंत्र भारताच्या विकासासाठी प. जवाहरलाल नेहरूंनी या दोन्ही प्रतिमानामध्ये सुवर्णमध्य साधण्याचा यशस्वी प्रयत्न केला व संमिश्र अर्थव्यवस्थेचे भारतीय प्रतिमान विकसीत केले.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर एक वर्षाच्या आत या दृष्टीने भारत सरकारने आपले औद्योगिक धोरण निश्चित केले. ६ एप्रिल १९४८ रोजी भारतीय संसदेत भारत सरकारने औद्योगिक ठराव पास करुन घेतला. त्यानुसार राष्ट्रीय नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. पंचवार्षिक योजनेचे तत्व स्विकारण्यात आले. व राष्ट्राच्या दृष्टीने महत्वाचे असणारे व मोठी उद्योगधंदे यांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. उद्योगांचे सार्वजनिक व खाजगी असे दोन स्पष्ट भागात विभाजन करण्यात आले. त्याचबरोबर लघु, कुटीर उद्योगांची दखल सरकारने घेऊन त्यांच्या विकासाचेही आश्वासन दिले. १९५४ साली भारताने अधिकृत पणे समाजवादी समाज रचनेचा स्वीकार केला. १९५६ च्या नवीन औद्योगिक धोरणेनुसार जलद औद्योगिकीकरणावर भर देण्यात आला. लघु व कुटीर उद्योगांची वाढ करण्यात आली. देशाच्या विविध भागात विकासाचा असमतोल दुर करण्यासाठी मागासलेल्या भागामध्ये उद्योगांच्या निर्मितीचे धोरण स्वीकारले गेले. अशापद्धतीने नेहरुंचे लोकशाही समाजवाद कार्यान्वित करण्याचे एक महत्वाचे साधन म्हणून मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रतिमान विकसित झालेले दिसते.

### २) कृषिविषयक सुधारणा:

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा प्राचिन काळापासून कणा राहिलेला आहे. ब्रिटीश राजवटीत भारतीय कृषीक्षेत्राची वाताहात झालेली होती. तरीही १० टक्के पेक्षा अधिक भारतीय समाज शेतीशी निगडीत व्यवसायावर उदरनिर्वाह व रोजगारासाठी विसंबून होता. ब्रिटीश काळात जमीनदारी पद्धती व व्यापारी पिकांमुळे शेतीची अवस्था बिकट झालेली होती. शेतकरी वर्गामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला होता. स्वातंत्र्योत्तर भारतीय राज्याने त्यावर तातडीने उपाय योजना केली नाही तर अंतर्गत विद्रोहाची शक्यताही निर्माण झाली होती. तेलंगणा, प. बंगाल या भागात शेतकऱ्यांचे काही सशस्त्र लढे जमिनदारांविरोधात उभे राहिलेले होते यावर मात करण्यासाठी नेहरु कालखंडात तातडीने कृषीविषयक सुधारणांना प्राधान्य देण्यात आले.

नेहरु कालखंडात कृषिविषयक क्षेत्रात विकास करण्यासाठी जमिनीचे फेरवाटप होण्याकरीता अनेक कायदे निर्माण करण्यात आले. त्यात प्रामुख्याने कमाल जमीनधारणा, कुळ कायदा हे क्रांतीकारी ठरले. या कायद्यांनी भारतातील जमीनदारी पद्धतीचे उच्चाटन करण्यात महत्वाची भूमिका बजावली. कसेल त्याची जमीन हे क्रांतीकारी तत्व या कायद्यांनी प्रस्थापित केले. याशिवाय भूमिहीन लोकांना शेतीचे वाटप, सरकारी शेतीचे प्रयोग, पाणीपूरवठ्याच्या योजना व कृषीविषयक अनेक सुविधा शासन स्तरावरुन देत कृषीक्षेत्रात संरक्षण देण्याचा नेहरु कालखंडात मोठा प्रयत्न झालेला दिसतो. त्यामुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णतेच्या दिशेने एक पाउल टाकण्यात नेहरु कालखंडात यशस्वी झाला असे आपण म्हणू शकतो. नेहरु कालखंडात कृषीक्षेत्राच्या दृष्टीने भूदान चळवळीने ही नेहरु कालखंडात मोठा प्रभाव पाडलेला आपणास दिसतो.

### ३) ग्रामविकासाकरीता समाजविकास कार्यक्रम:

गांधीजींच्या स्वप्नातील भारताचा केंद्रबिंदु ग्राम हा होता. स्वातंत्र्योत्तर काळात सभेचे विकेंद्रिकरण करुन ग्रामीण भागातील सामान्य जनतेपर्यंत विकास योजना घेउन जाणेकरीता नेहरु कालखंडात सुरवातीच्या टप्प्यावर समाजविकास कार्यक्रमाची आखणी झालेली दिसते. २ ऑक्टोबर १९५२ रोजी म. गांधीजीच्यां जयंतीचे औचित्य साधुन भारत सरकारने समाजविकासाचा कार्यक्रम घोषित केला होता. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हा प्रत्येक गावाचा सर्वांगीण, योजनाबद्ध विकास घडवून आणणे हा होता. समाज विकास कार्यक्रमांतर्गत ५५ विभाग पाडण्यात आले होते. एका विभागाच्या अंतर्गत शंभर खेड्यांचा समावेश केला जात असे. त्या विभागाच्या विकास कार्यावर देखरेख ठेवण्याकरीता एक ग्रामसेवक नेमला जात असे. समाज विकास कार्यक्रमाने नेहरु कालखंडात शेतीमालाच्या उत्पादनात वाढ, रस्ते बांधणी, ग्रामीण उद्योगधंद्याना  ओळख, शिक्षण व आरोग्य सेवांचा विस्तार या सारख्या बाबींमध्ये भरीव कार्य झाले. मात्र ही योजना पूरेशी यशस्वी झाली नाही. तेव्हा प. जवाहरलाल नेहरुंनी या योजनेची समिक्षा करण्याकरीता अभ्यासगट नेमले. या अभ्यास गटांची ग्रामीण क्षेत्राचा विकास करणेकरीता व त्यांना एकूण प्रक्रियेत सामावून घेणे करीता पंचायत राज व्यवस्थेची शिफारस केली. म्हणजे नेहरु कालखंडात एका परीने पंचायतराज व्यापाराची पायाभरणी झाली असे म्हणता येऊ शकतो.

### ४) विज्ञान व तंत्रज्ञानास प्राधान्य:

नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी नेहरु कालखंडात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी कृषी, वैद्यक या महत्वाच्या ज्ञानशास्त्रांवर लक्ष केंद्रीत केले गेले. त्याकरीता सरकारकडून १९५८ मध्ये एक स्वतंत्र ठराव पारित करण्यात आला. देशाच्या विविध भागात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विविध संस्थाची स्थापना करण्यात आली. शास्त्रीय पद्धतीने कृषी उत्पादनाला चालना देण्याकरीता शेतकी संशोधन संस्थाही कार्यरत करण्यात आल्या. या काळात १९४८ साली अणूशक्ती समिती ही स्थापन करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी डॉ. होमी भाभा यांची नियुक्ती करण्यात आली. भारत सरकार मंत्रालयात अणूशक्ती हे खाते ही सुरु करण्यात आले. मुंबई जवळ ट्राम्बे येथे अणूभट्टी केंद्र निर्माण करण्यात आले. त्याबरोबरीने जीवशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, धातुशास्त्र, औषधशास्त्र यासारख्या विषयांनाही प्राधान्य देऊन मूलभूत संशोधनास प्रोत्साहन दिले गेले. सारांश, स्वतंत्र भारताच्या विकास साध्य करण्यास ही विज्ञान व तंत्रज्ञानात गूंतवणुक केल्याशिवाय त्यात प्रगती केल्याशिवाय विकास

साध्य करता येणार नाही. भारत आधुनिक जगात इतर राष्टांशी स्पर्धाकरु शकणार नाही याची स्पष्ट जाणीव नेहरु कालखंडात भारतीय राजकीय व्यवस्थेला होती असे स्पष्टपणे दिसते.

## ५) सामाजिक व शैक्षणिक सुधारणांना प्राधान्यः

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतात प्रचंड निरक्षरता व सामाजिक विषमता, भेदाभेद, अस्पृश्यता, महिलांची सर्वंकष नाकेबंदी करणारी व्यवस्था प्रचलित होती. हे सामाजिक भेदाभेद नष्ट केल्याशिवाय महिलांना सर्व प्रकारचे हक्क व अधिकार देऊन कार्यन्वीत केल्याशिवाय व शिक्षणाचा विकास व विस्तार झाल्याशिवाय भारताची आधूनिक राष्ट्र उभारणी होणे शक्य नाही याची स्पष्ट जाणीव भारतीय राजकीय व्यवस्थेत नेहरू काळात होती. त्यादृष्टीने भारतभर शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी सरकारकडून कालबद्ध कार्यक्रम आयोजित केला. १९४७ साली भारतात साक्षरतेचे प्रमाण केवळ १४ टक्के होते. ते वाढविण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सूरु झाले. प्राथमिक शाळांची संख्या मोठया प्रमाणात वाढवण्यात आली. प्राथमिक शिक्षणाचा विषय राज्यसरकारांकडे सोपवून उच्च व तंत्र शिक्षणास केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणावर विस्तारित केले. त्यासाठी शिक्षण आयोगाची स्थापना करून शैक्षनिक धोरणांची ही आखणी केली गेली परिणामी भारतभर शिक्षणविषयक सुविधांचा विस्तार व विकास होण्यात मदत झाली.

भारतात प्रचलित असलेल्या अस्पृश्यता व जातीभेदा सारख्या पद्धती नष्ट व्हाव्यात व अनुसुचित जाती जमातीतील समूहांना घटनात्मक संरक्षण परिणामकारकपणे प्राप्त व्हावे याकरीता १९५५ साली कायदा पास करण्यात आला. जातीभेद पाळणे हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला. अनुसुचित जाती, जमाती या समूहांना शिक्षण व नोकरीतील विकासाची समानसंधी प्राप्त व्हावी याकरीता आवश्यक सकारात्मक तरतूदी करण्यात आल्या महिलांच्या हक्क व अधिकारांना कार्यन्वीत करण्यासाठी हिंदु कोड बिलाची टप्प्याटप्प्याने का होईना परंतु अंमलबजावणी करण्यात आली. एकंदरीत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेने दिलेले सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्यायाचे अभिवचन पाळण्याकरीता नेहरु कालखंडात सकारात्मक पावले उचलण्यात आली असे दिसते.

## ६) गटनिरपेक्षतेच्या तत्वास परराष्ट्र धोरणाचा पाया मानलेः

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी जगात फ्रान्स व ब्रिटन या दोन महासत्तांच विसर्जन होऊन अमेरिका व रशिया दोन महासत्ता निर्माण झाल्या. दुसऱ्या महायूद्धानंतर महासत्ताक राष्ट्रांची केवळ नावेच नव्हे तर प्रवृत्ती ही बदललेली होती. नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी आपल्या छत्रछायेखाली यावे म्हणून महासत्ताक राष्ट्रांमध्ये स्पर्धा सुरु झाली. त्यातुन जगाची विभागणी दोन भागात झाली होती. विश्वरचना ही द्विधृवी स्वरुपात अस्तित्वात आली होती. या पार्श्वभूमीवर स्वतंत्र झालेल्या भारताने आपल्या छत्रछायेखाली यावे यकरीता अमेरिका व सोव्हिएट रशिया या दोन्ही महासत्ता प्रयत्नशील होत्या. परंतु यापैकी कोणत्याही एका गटात सामील होणे भारताच्या दूरगामी राष्ट्रीय हितसंबंधाना मारक ठरणारे आहे याची स्पष्ट जाणीव प. जवाहरलाल नेहरुंना होती. त्यासाठी त्यांनी कोणत्याही एका गटात सामील होण्याऐवजी युगोस्लाव्हीया, इजिप्त च्या मदतीने अलिप्ततावादाच्या चळवळीस सुरुवात केली. भारत हा जागतिक शांततेसाठी प्रयत्नशील राहिल असे अभिवचन देत भारत कोणत्याही गटात सामील होणार नाही हे स्पष्ट केले. भारतीय परराष्ट्र धोरणाची पंचशील तत्वे प. जवाहरलाल नेहरुंनी जाहीर केली हीच तत्वे पूढे अलिप्ततावादी चळवळीचे मूलतत्वे म्हणून मान्यता प्राप्त झाली. अशापद्धतीने भारताने शीतयूद्ध कालीन महासत्तांच्या संघर्षातून जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे जाण्यापासून रोखण्यात महत्वाची भूमिका

बजावली. आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातुन नेहमी कालखंडाचे हे एक महत्त्वाचे योगदान होते. अर्थात यावर प. जवाहरलाल नेहरुंच्या आंतरराष्ट्रवाद दृष्टीकोनाचा मोठा प्रभाव होता.

सारांश, स्वातंत्र्योत्तर भारताची उभारणी करण्यात नेहरु कालखंडाचे फार मोठे योगदान होते. प. जवाहरलाल नेहरुंचे योगदान स्पष्ट करताना डॉ. भा. ल. भोळे म्हणतात, या देशाचे पहिले पंतप्रधान म्हणून व त्या नात्याने या देशातील बाल लोकशाहीचे संगोपक म्हणून नेहरुंचे स्थान या देशाच्या इतिहासात अजरामर आहे. त्याचप्रमाणे आधूनिक भारताच्या या विचारातही त्यांचे स्थान मानाचे आहे. त्यांनी राष्ट्रवादाची धर्मनिरपेक्ष व्याख्या केली, राष्ट्रवादाचा आंतरराष्ट्रवादाशी मेळ घातला, शांततामय सहजीवनाचे सूत्ररुप तत्वज्ञान पंचशीलच्या स्वरुपात दिले, प्रतिगामी व सांप्रदायिक शक्तींवर कठोर प्रहार केले, गांधीवादास व्यवहार्य स्वरुप दिले, लोकशाही व समाजवाद या दोहोंना समन्वयीत केले. उदारमतवादाच्या मार्गांनी क्रांतीकारक परिणाम घडविण्याचे मार्ग सांगितले. रविंद्रनाथ टागोर यांनी प. जवाहरलाल नेहरु यांचे विषयी व्यक्त केलेले विचार ही महत्वाचे आहेत. रविंद्रनाथ म्हणतात, याही बाबतीत गांधीजींपेक्षा नेहरु हेच आधूनिक भारताचे खरे प्रतिनिधी आहेत. आपला ऐतिहासिक भूतकाळ व नव्या जगाच्या जीवनाच्या अपेक्षा यो दोहोंबाबत लागणाऱ्या निकषांमध्ये भारतात संघर्ष होता. भारत अनेक अडचणींनी मिळून गेल्यामूळे त्याला स्वतःबद्दल पुरेसा आत्मविश्रास नसताना सुद्धा आधूनिक विज्ञानाशिवाय भारतास आत्मविश्वास नसतानासुद्धा, आधूनिक विज्ञानाशिवाय भारतास तरणोपाय नाही याची जाणीव गांधींपेक्षा जवाहरलाल नेहरुंना अधिक होती. अर्नोल्ड टॉयनी नेहरुंच्या योगदानाची दखल घेताना म्हणतात ते स्वतः पाश्चात्य संस्कृती व भारतीय संस्कृती मधील एक पूल व एक भाष्यकार म्हणून राहिले... नुसत्या **सुत्वध्यांच्या** कामगिरीपेक्षा हे एक महत्वाचे कार्य आहे. ही कामगिरी राजकारणाच्या क्षेत्राच्या बाहेर राहूनच व्यासंगी विद्यार्थ्यांनी, लेखकांनी, कवींनी आणि विचारवंतांनी विशेष प्रभावी रीतीने पार पाडली आहे. पण नेहरुंनी राजकारणाच्या रंगमंचावर ही भूमिका वठवली.

## १.३ लोकानुनयाचा काळ व राष्ट्रीय आणीबाणी

१९४७ ते १९६४ एवढ्या प्रदीर्घकाळ भारतीय राजकीय व्यवस्थेचे नेतृत्व प. जवाहरलाल नेहरुंनी केले. १९६२ नंतर प. जवाहरलाल नेहरुंच्या तब्येतीच्या तक्रारींनी पंडीत नेहरु नंतर कोण या चर्चेस राष्ट्रीय काँग्रेस मध्ये सुरुवात झाली होती. अशातच ८ जानेवारी १९६४ रोजी प. नेहरुंना पक्षघाताचा सौम्य झटका आला. त्यामूळे देशाचा राज्यकारभार सांभाळण्यासाठी मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य गुलझारीलाल नंदा, कृष्णमाचारी, यशवंतराव चव्हाण, स्वर्णसिंग यांची एक समिती नेमण्यात आली. २२ जानेवारी १९६४ रोजी लालबहादूर शास्त्री यांची मंत्रीमंडळात बिनखात्याचे मंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली. नेहरुंच्या नंतर कोण याची उघड चर्चा सुरु झाली तरी प. नेहरुंनी आपला वारस घोषित करण्याचे प्रकर्षाने टाळले. त्यातच २७ मे १९६४ रोजी प. जवाहरलाल नेहरुंचे निधन झाले. त्यानंतर देशाचे नेतृत्व कोण सांभाळणार? भारतीय लोकशाहीचे काय होणार? भारतीय लोकशाही कोलमडणार का? भारत परत मध्ययुगीन अवस्थेकडे जाणार का? भारतात अराजकमय अवस्था निर्माण होणार का? या सारख्या प्रश्नांना नेहरुंनंतरच्या भारतीय राजकारणाने, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने, विरोधीपक्ष नेतृत्वाने व एकूण भारतीय जनसमुदायाने जो प्रतिसाद दिला त्यातून भारताच्या राजकारणात लोकानुनयाचे पर्व सुरु झाले, राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा झाली. १९७५-१९७७ भारतीय लोकशाही एक प्रकारे बंदीस्त होती. या सर्व घटकांची पार्श्वभूमी कारणे व स्वरुप याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

## लोकानुनय काळाची पार्श्वभूमी:



भारतीय राजकारणात १९६५ नंतरच्या काळात ज्या प्रवृत्तीच्या घटकांनी प्रभाव टाकला त्यातून भारतीय राजकारणाची लोकानुनयाच्या दिशेने वाटचाल झालेली दिसते. या लोकानुनयाच्या काळात कारणीभूत ठरलेल्या घटकांची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

### १) पं. नेहरुंचा मृत्यु व लालमहादूर शास्त्रीचा उदय:

२७ मे १९६४ रोजी पं. जवाहरलाल नेहरु यांचा मृत्यु झाल्यानंतर त्यांचा राजकीय वारस कोण? यादृष्टीने गुलझारीलाल नंदा, इंदिरा गांधी, कामराज, लालबहादूर शास्त्री यांची नावे प्रामुख्याने चर्चेत आली. मोरारजी देसाई यांना बडे उद्योगपती व श्रीमंत घराण्यांचा पाठींबा होता. त्यामुळे त्यांनी आपली उमेदवारी परस्पर घोषित केली. परंतु मोरारजी देसाईंचा स्वभाव अनेकांना मानवणारा नव्हता त्यामुळे काँग्रेस पक्षांतर्गत त्यांना प्रखर विरोध झाला. कामराज यांनी मोरारजी देसाई विरोधी आघाडीचे नेतृत्व केले. त्यांनीच लालबहादूर शास्त्रीच्या नेतृत्वास प्रस्तुत केले व ९ जुन १९६४ रोजी लालबहादुर शास्त्रीचा पंतप्रधान म्हणून शपथविधी पार पडला. लालबहादूर शास्त्री यांनी आपल्या मंत्रीमंडळात स. का. पाटिल, संजीव रेड्डी, मोरारजी देसाई, इंदिरा गांधी, यासारख्या जून्या-नव्या नेत्यांना सामावून घेतले. नेहरुंची जागा आपण घेऊ शकत नाही याची स्पष्ट जाणीव लालबहादूर शास्त्रींच्या ठायी होती. त्यामुळे त्यांनी अतिशय सावधपणे पावले टाकावयास सुरुवात केली. त्याचाच एक भाग म्हणजे नेहरुंच्या काळात दुर्बल असलेले पंतप्रधान कार्यालय लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याकालात अधिक भक्कम झाले. मंत्रिमंडळ पद्धतीत मंत्रिमंडळ सहकाऱ्यांच्या चर्चेतून, बैठकीतून निर्णय घेण्याच्या पद्धतीस फाटा देण्याची व विशेष कौशल्य असणाऱ्या सनदी अधिकाऱ्यांमार्फत निर्णय प्रक्रिया निश्चित करण्याची प्रक्रिया एक प्रकारे लालबहादूर शास्त्री यांच्या कालखंडातच सुरु झाली होती. त्यामूळे लालबहादूर शास्त्री यांच्या काळात या घटकास अप्रत्यक्ष सहकार्य मिळालेले दिसते.

### २) आर्थिक व राजकीय संकटे:

पं. जवाहरलाल नेहरुंच्या नंतर भारतीय राजकीय व्यवस्थेत आर्थिक व राजकीय संकटे पाठोपाठ आलेली दिसतात. हे एक प्रकारचे दुष्टचक्रच होते. अन्नधान्याचा प्रचंड तूटवडा या काळात निर्माण झाला होता अन्नधान्यासाठी देशाच्या अनेक भागात दंगली उसळल्या होत्या. भारत-चीन, भारत-पाक युद्धामूळे संरक्षणावरील खर्चात मोठी वाढ झालेली होती. दोन युद्धामूळे पंचवार्षिक योजनेचाही बोजवारा वाजला होता. त्यातच दक्षिण भारतात भाषिक प्रश्नाने उग्र स्वरुप धारण केले होते. उद्योगधंद्याच्या पातळीवर पायाभूत सूविधांच्या निर्मितीवर व एकूणच आर्थिक विकासावर मोठे आर्थिक मंदीचे सावट पसरलेले होते. जनसामान्यांन मध्ये असंतोष भरलेला होता. अशा असंतूष्ट जनतेला मूळ प्रश्नांपासून भटकवण्याचा राज्यकर्ते नेहमीच प्रयत्न करतात. भारतातही तोच मार्ग तत्कालीन राज्यकर्त्यांनी अनुकरला व त्यातून अनुनयाच्या राजकारणास पोषक परिस्थिती निर्माण झाली असे दिसते.

### ३) इंदिरा गांधीचा उदय:

पं. जवाहरलाल नेहरु यांच्यानंतर इंदिरा गांधीना राजकारणात फारसे स्वारस्य उरले नव्हते. लालबहादूर शात्री यांच्या आग्रहाने त्या मंत्रीमंडळात सामील झाल्या होत्या. मात्र लालबहादूर शात्रीनी आपल्या कारकिर्दीत नेहरु निष्ठावंताना फारसे महत्व येऊ दिले नाही. लालबहादूर शात्रींचे नेतृत्व सर्वसामान्य होत असतानाच दुदैवाने १९६६ मध्ये तारकंद येथे हृदयविकाराच्या

धक्क्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणात परत पोकळी निर्माण झाली. ही पोकळी भरून काढण्यासाठी परत एकदा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरु झाली. गुलाझारीलाल नंदा, यशवंतराव चव्हाण, जगजीवन राम, मोरारजी देसाई या नेत्यांमध्ये प्रामुख्याने प्रधानमंत्री पदासाठी स्पर्धा होता. यातून काँग्रेसमध्ये कार्यरत असलेल्या सिंडीकेट गटास इंदिरा गांधी आपल्या ऐकण्यात राहतील असे वाटले. सार्वजनिक निवडणूका ही तेरा महिन्यावर येऊन ठेपलेल्या होत्या. अशा परिस्थितीत इंदिरा गांधीकडे हंगामी नेतृत्व सोपवण्याचा डाव सिंडीकेट काँग्रेसने खेळला. त्याप्रमाणे यशवंतराव चव्हाण व गूलझारी लाल नंदा यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. मोरारजी देसाई मात्र मागे हटण्यास तयार नव्हते. तेंव्हा १९ जानेवारी १९६६ राजी पार्लमेंटच्या मध्यवर्ती सभागृहात प्रधानमंत्री निवडण्यासाठी मतदान झाले. यावेळी मोरारजी देसाईना १६९ तर इंदिरा गांधीना ३५५ मते पडली व २४ जानेवारी १९६६ रोजी इंदिरा गांधीनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली व भारताच्या राजकारणात खऱ्या अर्थाने त्याचा उदय झाला.

### ४) १९६७ ची सार्वत्रिक निवडणूक :

१९६७ ची सार्वत्रिक निवडणूक ही इंदिरा गांधीच्या नेतृत्वाचा कस लावणारी होती. परंतु प्रामुख्याने या निवडणूकीत काँग्रेस प्रचार यंत्रणेवर सिंडीकेट गटाचाच प्रभाव अधिक होता. पंतप्रधान झाल्यानंतर इंदिरा गांधीच्या पूढे संकटांची मालीकाच स्वागतासाठी उभी होती. सिंडीकेटचा प्रभाव हा तर त्यांच्या समोर सर्वात मोठा अडथळा होता. त्यांच्याशी चर्चा केल्याशिवाय त्या कोणताही निर्णय घेऊ शकत नव्हत्या. तर दुसऱ्या बाजूने देश आर्थिक संकटात होता. देशाचे अंतर्गत स्थैर्य ही धोक्यात होते. दोन वर्षाच्या अंतरात झालेली दोन युद्धे, दीड वर्षाच्या अंतरात झालेले दोन नेतृत्व बदल हे राष्टाच्या एकूण विकासाच्या दृष्टीने अपायकारक ठरले होते. आंतरराष्ट्रीय परिस्थिती ही भारताकरीता फारसी अनुकूल नव्हती. चीनकडून झालेल्या पराभवामूळे भारताची पत काहीशी हादरली होती. भारतास काही आर्थिक मदत अमेरिकेकडून मिळवावी या होतून इंदिरा गांधीनी अमेरीकेचा दौरा केला परंतू रुपयांचे अवमूल्यन केल्याशिवाय अमेरिकेने मदत करण्यास नकार दिला तेंव्हा ५ जून १९६६ रोजी रुपयाचे ३५ टक्क्यांनी अवमूल्यन करण्याचा निर्णय इंदिरा गांधीनी घोषित केला. इंदिरा गांधीनी अमेरिकेशी या काळात केलेल्या करारावर देश भरात मोठी टिका झाली. अशा परिस्थितीत देशात सार्वत्रिक निवडणूकाचे आयोजन झाले होते. या निवडणूकांचा कल काँग्रेस करीता अतिशय धक्कादायक होता. लोकसभेतील ५२० जागांपैकी २८१ जागाच काँग्रेस मिळवू शकली. काँग्रेसचे दिग्गज नेते पराभूत झाले. सिंडीकेट गटापैकी केवळ संजीव रेड्डी हे एकमेव नेते निवडून आले होते. ९ राज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता गेली व लोकसभेतही विरोधकांची संख्या वाढली. एकंदरीत १९६७ च्या निवडणूक निकालांनी इंदिरा गांधीना आपल्या राजकीय धोरणांचा पूनरुच्चार करण्यास भाग पडले व त्यातूनच भारतीय राजकीय व्यवस्थेत लोकानुनयाचे यूग अवतरले असे दिसते.

### ५) इंदिरा गांधी-सिडींकेट संघर्ष :

लोकाननय काळा, इंदिरा गांधी व सिंडीकेट संघर्ष हे परिमाण फार मोठे आहे. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर इंदिरा गांधीना पंतप्रधान करावे लागणार ही अपरिहार्यता सिंडीकेट काँग्रेसच्या दिग्गजांच्या पराभवातून निश्चित झाली होती. तरीही पंतप्रधान इंदिरा गांधी वरील आपले नियंत्रण कायम रहावे याकरीता सिंडीकेट गटाने मोरारजी देसाई यांना हाताशी धरण्याचे सूत्र वापरले  सिंडिकेट नेत्यांच्या दबावामूळेच मोरारजी देसाईंना उपपंतप्रधान व अर्थमंत्री पद

देणे इंदिरा गांधीना भाग पडले. १३ मार्च १९६७ रोजी इंदिरा गांधी दुसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान झाल्या त्या या सिडीकेट काँग्रेसच्या संघर्षाची किनार घेऊनच. इंदिरा गांधी व सिंडीकेट यांच्यातील संघर्ष डॉ. झाकीर हुसेन यांना राष्ट्रपती पदाची उमेदवारी निश्चित करताना, बँकाच्या व विमा राष्ट्रीय करणाच्या प्रश्नावेळी कामराज यांच्या नंतर काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडी वेळीही लागला गेला होता. यावर कळसाध्याय झाला तो भारताचे राष्ट्रपती डॉ. झाकीर हूसेन यांच्या निधनानंतर लागलेल्या राष्ट्रपती निवडणूकीने. डॉ. झाकीर हूसेन यांचे आकस्मिक निधन झाल्यानंतर राष्ट्रपती पदाकरीता उमेदवार निश्चितीवरून इंदिरा गांधी व सिंडीकेट गट हे आमने-सामने आले. यावेळी सिंडीकेटच्या नेत्यांनी आपल्या गटाचा राष्ट्रपती निवडून त्यांच्या मार्फत इंदिरा गांधीना पदभ्रष्ट करण्याची योजना आखली व संजीव रेड्डी यांचे नाव पूढे केले. इंदिरा गांधीनी मात्र जगजीवन राम यांचे नाव पूढे केले. सिंडीकेट गटाने त्यांना विरोध केल्यानंतर तत्कालिन उपराष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांचे नाव त्यांनी प्रस्तूत केले. या नावास ही सिंडीकेट गटाने विरोध केल्यानंतर मात्र इंदिरा गांधीनी उघड बंड करून व्ही. व्ही गिरीना सूचक पाठींबा दिला. राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीत व्ही. व्ही. गिरी यांचा विजय झाला. इंदिरा गांधीनी सिंडीकेट गटास हा दिलेला मोठा शह ठरला.

राष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीनंतर इंदिरा गांधी-सिंडीकेट काँग्रेस हा संघर्ष अधिक विकोपाला गेला. तत्कालिन काँग्रेस अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी व्ही. व्ही. गिरी यांना मतदान करणाऱ्यांवर पक्षभागांची कारवाई करण्याचे ठरविले. इंदिरा गांधी, जगजीवनराम, फक्रदीन अली आहमद यांच्याकडे तशी स्पष्टीकरणेही मागवण्यात आली. २५ ऑगस्ट १९६९ च्या काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत यशवंतराव चव्हाण यांनी दोन गटात समन्वय साधण्याच्या ही प्रयत्न केला. मात्र त्याचा फारसा उपयोग झाला नाही. त्याचवेळी काँग्रेस अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी घराणेशाहीस प्राधान्य असू नये असे कारण देत तामिळनाडूचे काँग्रेस अध्यक्ष सुब्रम्हण्यम यांचा राजीनामा घेतला. त्याचा बदला म्हणून इंदिरा गांधीनी सिंडीकेटबद्दल सहानुबूती बाळगणाऱ्या चार मंत्र्यांना मंत्रिमडळाच्या बाहेरचा रस्ता दाखवला. त्यची प्रतिक्रिया म्हणून ३१ ऑक्टोंबर १९६९ रोजी निजलिंगप्पा यानी इंदिरा समर्थक सदस्यांचा राजीनामा घेतला. फक्रदीन अली अहमद यांना काँग्रेस वर्किंग कमिटीतून काढून टाकले. अशा पद्धतीने इंदिरा गांधी व सिंडीकेट गट एकमेकांवर कूरघोडी करण्याचा प्रयत्न करत होते. इंदिरा गांधीचा गट आमंत्रिक गट तर निजलिंगप्पांचा गट संघटन काँग्रेस म्हणून ओळखला जाऊ लागला. दोन्ही काँग्रेसची अधिवेशने वेगवेगळी भरू लागली. इंदिरा काँग्रेस व संघटन काँग्रेस असे दोन राजकीय पक्ष यातून पूढे निर्माण झाले. इंदिरा गांधीनी सिंडीकेट गटावर विजय मिळविण्यासाठी व आपले नेतृत्व अखिल भारतीय स्तरावर निर्माण करण्यासाठी पूढे ते अबाधित ठेवण्यासाठी अपरिहार्यपणे लोकानुनयाच्या धोरणाचा स्वीकार केलेला दिसतो.

### ६) १९७१ ची सार्वत्रिक निवडणूक :

इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखालील आमंत्रित गट व निजलिंगप्पाचा संघटन काँग्रेस यातील संघर्षाचा परिणाम विरोधी पक्ष मजबूत होण्यामध्ये व काँग्रेस पक्षाची फाटाफूट होण्यात होत होता. काँग्रेसचे ५५ खासदार विरोधी पक्षात सामिल झाले. परिणामी इंदिरा गांधी सरकार अल्पमतात आले. तेव्हा इंदिरा गांधीनी प्रादेशिक राजकीय पक्षांची मदत घेवून आपले सरकार वाचवले. द्रमूक, अकाली दल, भारतीय क्रांती दल यासारख्या पक्षांचे सहकार्य इंदिरा गांधीनी त्यावेळी घेतले. सिंडिकेट गट व प्रादेशिक पक्ष यांच्या लहरीवर राज्यकारभार करणे कठीण आहे याची प्रचिती इंदिरा गांधीना सातत्याने येऊ लागली. तेव्हा त्यांनी आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करून मूदतपूर्व निवडणूका घेण्याचे ठरविले व १७ डिसेंबर १९७० रोजी लोकसभा विसर्जित केली. १९७१ च्या

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत जनसंघ, स्वतंत्र पार्टी व संघटन काँग्रेस यांनी इंदिरा गांधी विरुद्ध स्वतंत्र आघाडी उभारून इंदिरा हटवा चा नारा दिला. इंदिरा गांधीनी या विरुद्ध "गरीबी हटाव" चा नारा दिला. गरीबी हटाव हा नारा लोकानुयवादाच्या राजकारणातील एक मैलाचा दगड ठरला. गरीबी हटाव हा नारा भारतभर प्रभाव टाकून गेला. भारतीय सामान्य जनतेने इंदिरा गांधीच्या या नव्या अवतारास भरभरून प्रतिसाद दिला. लोकसभेतील ५५१ जागांपैकी काँग्रेसला ३५२ जागा मिळाल्या व इंदिरा गांधीचे नेतृत्व प्रस्थापित झाले.

**अनुनयाच्या काळातील महत्वाच्या घडामोडी:**

भारतातील अनुनयाच्या कालखंडातील महत्वाच्या घडामोडी पूढील प्रमाणे मांडता येतील ज्यामुळे अनुनयांच्या राजकारणास प्रोत्साहन मिळाले.

**१) संस्थानिकांचे तनख्ये व विशेष हक्क रद्द :**

इंदिरा गांधीना संस्थानिकांच्या तनख्यांवर, विशेष हक्कांवर केला जाणारा खर्च हा विनाकारणांचा खर्च वाटत होता. प. बंगाल, आंध्रप्रदेश सारख्या राज्यात जमिनदारांवर हिसंक हल्ले होत होते. नक्षलवादी चळवळ आपले मूळ धरू लागली होती. देशात प्रचंड स्वरुपात बेरोजगारी व दारिद्र्यात वाढ झाली होती. या पार्श्वभूमीवर संस्थानिकांचे तनखे रद्द करने इंदिरा गांधीना आवश्यक वाटत होते. या पार्श्वभूमीवर १२ मे १९६९ च्या काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनात मोहन धारिया यांनी संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द करण्यासंदर्भातील ठराव काँग्रेस कमिटी पूढे मांडला. हा ठराव मांडेपर्यंत मोराराजी देसाई वइंदिरा गांधी हे प्रमुख नेते समितीतून निघून गेले होते. तरीही मोहन धारीया यांनी मांडलेला ठराव १७ विरुद्ध ०४ मतांनी समितीत पास झाला. या ठरावावर स. का. पाटील व मोरारजी देसाईंनी प्रक्षुब्ध टीका केली. तनखे बंद करणे म्हणजे संस्थानिकांचा विश्वासघात करणे होय असे त्यांचे म्हणणे होते. संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार संपूष्टात आणण्या संबंधीच्या संस्थानिकांच्या संघटनेशी वाटाघाटी करुन तो निकालात काढावा या हेतूनै इंदिरा गांधीनी संस्थनिकांशी बोलणी करण्याचा प्रयत्न केला परंतू त्यात त्यांना यश आले नाही. यादृष्टीने ३ नोव्हेंबर १९६९ ते ८ जानेवारी १९७० या काळात संस्थानिकांच्या प्रतिनिधिंसोबत भारतीय गृहखात्याने सहा बैठका घेतल्या. परंतु त्यातून काहीही निष्पन्न होऊ शकले नाही. त्यामुळे इंदिरा गांधी पूढे संविधान दुरुस्ती बील पारीत करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. त्यादृष्टीने ०२ नोव्हेंबर १९७० रोजी २४ व्या घटना दुरुस्तीचे बील लोकसभेत मांडले गेले. हे बील ३३२ विरुद्ध १५४ मतांनी पास झाले. त्यानंतर ते राज्यसभेत पाठविण्यात आले तिथे मात्र हे बील एका मताच्या फरकाने फेटाळले गेले. राज्यसभेत हे बील फेटाळले गेल्याने विरोधक आनंदसोहळा साजरा करत होते. मात्र इंदिरा गांधीनी तातडीने मंत्रिमंडळाची बैठक बोलावून राष्ट्रपतींकडून संस्थानिकांचे तनखे व विशेषधिकार रद्द करणारा वटहुकुम जारी करवून घेतला. ६ सप्टेंबर १९७० रोजी राष्ट्रपतींच्या विशेष वटहुकुमाद्वारे संस्थनिकांना सरकारने दिलेली मान्यता रद्द करण्यात आली.

राष्ट्रपतींच्या वटहूकुमास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. सर्वोच्च न्यायालयाने १५ डिसेंबर १९७० रोजी राष्ट्रपतींचा वटहुकुम घटनाबाह्य ठरवून रद्द केला. तेव्हा इंदिरा गांधीनी सर्वोच्च न्यायालयाचा सन्मान करुन या वटहुकुमास काही काळाकरीता स्थगित केले मात्र १९७१ च्या निवडणूकीत प्रचंड बहूमताने निवडून आल्यानंतर त्यानी यासंबंदीचा कायदा पारित करून ३१ डिसेंबर १९७१ रोजी संस्थनिकाचे तनखे व हक्क रद्द केले. यामुळे इंदिरा गांधीची एक कणखर नेतृत्व म्हणून जनमानसात प्रतिमा उभी राहिली. संस्थानिकांच्या तरखे रद्द करण्याच्या या राजकारणातून निर्माण झालेल्या वांदगाने देशातील सामान्य जनतेचे जमिनीचे

असमान वाटप, बेरोजगारी, दारिद्र्य यासारखे मूलभूत प्रश्नांवरील लक्ष विचलित झाले. नक्षलवादाने निर्माने केलेले आव्हान ही त्यातून त्यांना मोडता आले. त्यामुळे संस्थनिकांचे तनखे रद्द करण्याची प्रक्रिया लोकानुनयाच्या राजकारणास हवा देऊन गेली असे म्हटले तर वावगे ठरू नये.

## २) बँकाचे राष्ट्रीयकरण:

भारतातील पूर्वापार चालत आलेली सावकारी व सराफी पेढया याच भारतीय बँकांच्या पूर्वज मानाव्या लागतील. भारतीय सावकारांचे आर्थिक वर्चस्व एवढे होते की ते राजेराजवाडे व संस्थानिकानांही कर्जे देत असत. या सावकारी व्यवसायात मारवाडी, जैन, पठाण, रोहिले या जमातींचे वर्चस्व होते. ईष्ट इंडिया कंपनीत ही भारतीय सावकार पद्धती सोयिस्कर न वाटल्याने त्यांनी स्वतःची दलाली गृहे स्थापन केली परंतु १८२९ ते १८३२ या काळात आर्थिक संकटामुळे बहुतांशी दलालीगृहे बंद पडली. व त्यांची जागा परकीय बँकानी घ्यावयास सुरुवात केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रेरणेने काही बँकाची निर्मिती झाली. त्यात प्रामुख्याने बँक ऑफ बेंगाल (१८०९) बँक ऑफ बॉम्बे (१८४०) व बँक ऑफ मद्रास (१८४३) यांचा समावेश करता येईल. पूढे या तिन्ही बँकाचे एकत्रीकरण करुन इंपिरीयल बँक ऑफ इंडिया बँकेची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात स्वदेशी तत्वाच्या प्रचारातून परकीय बँकाना आव्हान देणे करीता स्वदेशी बँकाची स्थापना करण्याची मोहीम ही वेगवान ठरली. त्यात पंजाब नैशनल बँक, कॅनरा बँक, बँक ऑफ इंडीया, सेट्रंल बँक ऑफ इंडीया यांचा प्रामुख्याने समावेश करता येईल. या स्वदेशी बँकाची स्थापना १८८५ ते १९१९ या दरम्यान झाली. परंतु पूढील काळात बँकप्रणालीतील अनेक दोष पूढे येऊ लागले. तेव्हा बँका बूडण्यास सुरवात झाली. ब्रिटिशांनी हे टाळण्यासाठी १९२० मध्ये इंपिरीयल बँकेची स्थापना केली. तरीही भारतात लहान-लहान बँक बुडण्याची जी लाट आली होती ती काही थांबत नव्हती तेंव्हा बँकीग व्यवस्थेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी १९३५ साली भारताची मध्यवर्ती बँक म्हणून ब्रिटिशांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना केली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही सरकारी मालकीची असावी अशी शिफारस आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने केल्यानंतर १९४९ साली रिझवर्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. ही बँक त्यानंतरच्या काळात कागदीचलन छापणे, सरकारची बँक व बँकांची बँक म्हणून काम करु लागली. भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात समाजवादी समाजरचनेचे तत्व स्वीकारले असल्यामुळे बँकिंग व्यवहार यावर ही सरकारचे प्रभावी नियंत्रन असावे असा विचार प्रारंभी पासून प्रबळ ठरत होता. त्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेस अधिकाधिक अधिकार देऊन खाजगी बँकावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला होता.

स्वातंत्र्योत्तर काळात बँकींग सेवांवर सरकारने नियंत्रण ठेवण्याचे अनेक प्रयत्न केले तरी त्यातील मुलभूत दोष मात्र नाहीसे होताना दिसत नव्हते. बँकिंग व्यवसायातून काही मोजक्या घराण्यांच्या हाती देशाच्या संपत्तीचे केंद्रिकरण झाले होते, बँकेचे संचालक स्वतः करीता व नातेवाईकांकरीता बँकाचा सर्रास वापर करीत होते. बँकेतील उच्च पगाराच्या जागा, अधिकाराच्या जागा निकट वर्तीयांना खैरातपद्धतीने दिल्या जात होत्या. त्यातून परस्परहित संबंधाची साखळी तयार झालेली होती. ही साखळी तोडण्यासाठी इंदिरा गाधींनी बँकांच्या राष्ट्रीयकरणाचा मार्ग निवडला जो त्यांना प्रचंड लोकप्रियता देऊन गेला.

बँकीचे राष्ट्रीयकरण ही भारतातील लोकानुनयाच्या व इंदिरा गांधीच्या राजकारणातील एक महत्वाची घटना मानली जाते. त्यावेळी इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात मोरारजी देसाई यांच्याकडे अर्थ खाते होते. ते प्रथम त्यांनी काढून घेतले. कारण मोरारजी देसाई हे इंदिरा गांधीचे

विरोधक व उद्योग समूहाचे समर्थक होते. ते हा निर्णय घेऊन देणार नाहीत याची स्पष्ट जाणीव त्यांना होती. त्यामुळे इंदिरा गांधीनी त्यांच्याकडून अर्थखात काढून त्यांना बिन खात्याचे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात कायम ठेवले परंतु मोरारजी देसाईंनी या विरोधात राजीनामा दिला व इंदिरा गांधीचे काम अधिक सोपे झाले.

१९ जूलै १९६५ रोजी इंदिरा गांधीनी बँक राष्ट्रीयकरणाच्या दिशेने एक धाडसी पाऊल टाकले. त्यासाठी त्यांनी राष्ट्रपतींचा अध्यादेश काढला. या अध्यादेशाने देशातील प्रमुख १४ बँकाचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. या अध्यादेशाचे शीर्षक "उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण वटहुकुम १९६९" असे होते. ज्या बँकाच्या ठेवी ५० कोटी पेक्षा अधिक आहेत अशा बँकाचे राष्ट्रीयकरण होत असल्याचे इंदिरा गांधीनी जाहीर केले. इंदिरा गांधीच्या या निर्णयावर विरोधीपक्षाने व सिंडीकेट नेत्यांनी प्रचंड टिका केली. या अध्यादेशा विरोधात सर्वोच्च न्यायालयाने हि हा निर्णय बेकायदेशीर ठरवला. त्यावेळी इंदिरा गांधी यांनी यावर मात करण्याकरीता बँकाच्या भागीदारीच्या व्यवस्थेला धक्का न बसू देता बँकाचे संयोजन सरकारकडे घेतले. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करणारा कायदा पारित करून ही राष्ट्रीय करणाची प्रक्रिया पूर्ण करून घेतली.

### राष्ट्रीयकरण करण्यात आलेल्या बँका:

१५ एप्रिल १९८० रोजी इंदिरा गांधीनी आणखी सहा मोठ्या बँकाचे राष्ट्रीयकरण करणारा कायदा पारित केला. या बँकामध्ये दि. आंध्र बँक, दि. कार्पोरेशन बँक, दि. यु बँक ऑफ इंडिया, दि पंजाब ॲन्ड सिंध बँक, दि. विजया बँक आणि ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स यांचा समावेश होता.

इंदीरा गांधीच्या या निर्णयाविरोधात विरोधकांनी टिकेची झोड उठवली असली तरी जनसामान्यांमध्ये मात्र इंदिरा गाँधीची लोकप्रियता प्रचंड वाढली. समाजवादी नेत्या म्हणून यांची खंबीर प्रतिमा देशभर निर्माण झाली व लोकानुनयाच्या राजकारणाचा एक मोठा टप्पा पार केला.

### ३) हरितक्रांती:

भारतीय राजकीय व्यवस्थेतील लोकानुनयाच्या कालखंडातील एक महत्वाची घटना म्हणून हरितक्रांतीचा ही उल्लेख केला जातो. आधुनिक व नवीन यंत्र व तंत्र यांच्याशी मिळत्या जुळत्या नसणाऱ्या शेती करण्याच्या जुन्या व परंपरागत पद्धतीचा त्याग करुन नवीन पद्धतीचा अवलंब करणे व त्याद्वारे शेती उत्पादनाची पातळी वाढविणे म्हणजे हरितक्रांती होय. अन्यथा स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये शेती प्रश्नाकडे प. नेहरु सरकार पासूनच विशेष लक्ष पूरविण्यात आले होते. कुळ कायदा, कमाल जमीनधारणा कायदा, सिलिंग पद्धती या माध्यमातून जमिनीचे फेरवाटप करण्याचा प्रभावी प्रयत्न एका बाजुने करत सरकारने दुसऱ्या बाजूने पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी, भाक्रा,नांगल सारखे मोठे धरणे उभारुन जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्याचा प्रयत्न करुन दिला. तरीही स्वातंत्र्योत्तर काळातील पहिली तीन दशके भारत अन्नधान्याच्या बाबत स्वयंपूर्ण होऊ शकला नव्हता. यावर हरितक्रांतीचे दान करुन भारतास अन्नधान्याच्या बाबतील स्वयंपूर्ण करण्यात महत्वाची भूमिका बजावली.

भारतामध्ये १९६७-६८ मध्ये पहिली हरित क्रांती झाली व १९८३-८४ मध्ये दुसरी हरीतक्रांती झाली. या दोन्ही हरितक्रांत्या इंदिरागांधीच्या कार्यकालात झाल्या. भारत अन्नधान्याची आयात करणारा देश ही ओळख मागे पडून जगाला भारत अन्नधान्य निर्यात करू लागला. यातून देशाची

व इंदिरागांधीच्या नेतृत्वाची प्रतिमा अधिक उजळ होण्यास मदत झाली. हरितक्रातीने अन्नधान्याची उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढवली असली तरी ग्रामीण क्षेत्रात विषमतेची दरी ही तेवढीच रुंदावली. हरितक्रांतीचे फायदे श्रीमंत व बड्या शेतकऱ्यांनीच अधिक उचलले परिणामी श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत होत गेले व गरीब अधिकाअधिक गरीब बनत गेले. परंतु लोकानुन याच्या राजकारणाने या विषमतेच्या वारुळावर प्रचाराच्या सहाय्याने मात केलेली दिसते.

## ४) १९७१ चे भारत-पाक युद्ध व बांग्लादेशची निर्मिती:

भारतातील लोकानुनय याच्या कालखंडातील लोकप्रियतेचा एक अध्याय हा १९७१ च्या भारत-पाक युद्धात इंदिरागांधीनी जे यश संपादन केले त्यातून लिहीला गेला असे दिसते. १९७१ च्या भारत-पाक युद्धास पाकिस्तानच्या अंतर्गत राजकारणांचे घटक प्रामुख्याने कारणीभूत झालेले होते त्यामुळे त्याची मांडणी या प्रश्नाची उकल होण्याच्या दृष्टीने आवश्यक ठरते.

पाकिस्तानची भौगोलिक विकासाची विभागणी पूर्व पाकिस्तान व प. पाकिस्तान अशी झालेली होती. पाकिस्तानच्या राजकारणावर प. पाकिस्तानचा प्रभाव स्थापने पासूनच होता. लोकसंख्या मात्र पूर्व पाकिस्तानमध्ये अधिक होती. पूर्व पाकिस्तान व प. पाकिस्तान यांना समान धाग्याने जोडणारा धर्मा शिवाय दुसरा कोणताही घटक नव्हता. भाषा, संस्कृती, राहणीमान या बाबत दोहोंमध्ये मोठी तफावत होती. प. पाकीस्तान पूर्व पाकिस्तानावर हरेएकप्रकारे अन्याय करत असल्याने १९६० पासूनच निदर्शनास येऊ लागले होते. पूर्व पाकिस्तानची आर्थिक लूट तर मोठ्या प्रमाणात होत होती. मात्र त्या ठिकाणी कोणत्याही आर्थिक सूधारणा मात्र होत नव्हत्या. प. पाकिस्तानच्या दडपशाही व आर्थिक शोषणामूळे पूर्व पाकिस्तानात असंतोष वाढत गेला. या अन्यायास वाचा फोडण्यासाठी व त्याचे निवारण करण्याकरीता शेख मुजबीर रहमान यांच्या नेतृत्वाखाली अवामी लीग हा पक्ष स्थापन झाला. अवामी लीग ने या विरोधात मोठे आंदोलन सुरु केले. या दरम्यान जनरल याह्या खान यांनी पाकिस्तानचे अध्यक्षपद काबीज केले. पूर्व पाकिस्तानमधील असंतोष दाबून टाकण्यासाठी जनरल याह्या खान यांनी सार्वत्रिक निवडणूकांची घोषणा केली. त्याप्रमाणे डिसेंबर १९७० मध्ये राष्ट्रीय सभेच्या ३१३ जागांकरीता पाकिस्तानमध्ये निवडणूका झाल्या. पूर्व बंगालमधील १६९ जागांपैकी १६७ जागांवर अवामी लिगचे उमेदवार विजयी झाले. प. पाकिस्तानमध्ये १४४ पैकी ८१ जागा झुल्फीकार अली भूत्तोंच्या पिपल्स पार्टीने जिंकला. अवामी लिगला स्पष्ट बहूमत मिळाले होते याच अवामी लिगच्या हाती सत्ता देण्यास याह्याखान तयार नव्हते. अवामी लीगने ही असहकार आंदोलन सुरु केले. पूर्व पाक मध्ये लष्कराने भयानक अत्याचारास सुरुवात झाली. या हिसांचारात ३० लाख लोक मारले गेले. याचा प्रत्यक्ष परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर व राजकीय व्यवस्थेवर पडला. पूर्व पाकमधील निर्वासितांचे लोंढे भारतात आले. बंगाल जवळ पूर्व पाकची मूक्तीवाहिनी व पाकचे सैन्य यांच्यात युद्धाच्या फैरी झडू लागल्या. त्यावेळी इंदिरागांधीनी यूनोला हा रक्तपात थांबवण्यासाठी हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले. २४ ऑक्टोंबर रोजी त्यांनी याकरीता परदेश दौरा आयोजित केला. दरम्यान अमेरिका व चीन यांनी पाकिस्तानची बाजू घेऊन पूर्व पाकचे आंदोलन मोडीत काढण्यास लष्करी मदत देण्याचे जाहीर केले. भारताने या अंतर्गत बाबीमध्ये हस्तक्षेप करु नये असे अमेरिकेने भारताला सुनावले.

अशा परिस्थितीत याह्याखानने पूर्व बंगाल प्रश्नाचा वापर भारतविरोधी करण्यास सुरवात केली. २३ नोव्हेंबरला याह्याखान यांनी पाकिस्तानमध्ये आणीबाणी घोषित केली. ३ डिसेंबरला पाकिस्तान लष्कराने या पंजाब व काश्मिरच्या सात मोठ्या शहरांवर हल्ला केला. परिणामी भारताला प्रत्युत्तरात लष्करी कारवाई करणे भाग पडले. भारतीय लष्कर पूर्व पाकमध्ये घूसले व

दोन आठवड्यातच त्यांनी पाकच्या सैन्याचा पराभव केला. १६ डिसेंबर १९७१ रोजी पाक सैन्य ढाक्का येथे शरण आले. ९० हजार पाक सैन्य युद्धकैदी बनले. युद्धाच्या शेवटच्या टप्प्यात अमेरिकन लष्कराने आपले नौदल हिंदमहासागरात उतरवून भारतावर दबाब टाकण्याचा प्रयत्न केला त्यावेळी इंदिरागांधीनी रशियाची मदत घेऊन अमेरिकेची ही व्युहनीती उधळून लावली. इंदिरागांधी यांनी शेख मूजबीर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली पूर्व पाकिस्तानची स्वतंत्र बांग्लादेश म्हणून घोषणा केली. भारताने त्यास अधिकृत राष्ट्राचा दर्जा ही बहाल केला.

इंदिरागांधीनी १९७१ च्या अभूतपूर्व युद्धप्रसंगावेळी जे अभूतपूर्व धाडस, दूरदृष्टी व मुत्सदेगिरि दाखवली त्यामूळे भारतभरच नव्हे तर जगभर इंदिरागांधीची प्रतिमा उंचावली. विरोधी पक्ष नेते असणाऱ्या अटलबिहारी वाजपेयी यांनीही इंदिरागांधीना दुर्गा ही पदवी बहाल केली. भारतरत्न म्हणून ही त्यांना गौरविण्यात आले. सारांश गुंगीगुडी ते दुर्गा हा इंदिरागांधीचा राजकीय प्रवास हा अनुनयाच्या काळातील सर्वात मोठा टप्पा होता असे मानावे लागेल.

**लोकानुरजंन कालखंडाचे मूल्यमापन:**

स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणातील लोकानुनयाचा कालखंड हा एक महत्वाचा कालखंड मानला जातो. भारतीय राजकीय प्रक्रियांना एक वेगळे व निर्णायक वळण देण्यात या कालखंडाने यश संपादन केलेले दिसते. लोकानुनयाच्या प्रक्रियेचे मूल्यमापन ज्येष्ठ अभ्यासक जयंत लेले यांनी करताना लिहीले आहे, काँग्रेसच्या विभाजनानंतर जात धुरीणत्व व त्याची राज्य संसाधनावरची मालकी यांच्या ताकदीचा अंदाज आल्यावर नव्या काँग्रेसने सत्ताधारी पक्ष म्हणून लोकानुरंजनवादी केंद्रित डावपेचांचा अवलंब केला. ग्रामीण अधिजन लोकांना आपल्याकडे वळवू शकतात हे पाहता नवा सामाजिक आधार शोधण्याची गरज भासली. कमी प्रस्थापित तरूण समर्थकांचा पवित्रा या कामासाठी वापरण्यात आला. नेहरुवादी तडजाडीत वरून खाली वाहणाऱ्या फायद्याच्या नावावर खरा फायदा मात्र श्रीमंत, मध्यम शेतकरी, मोठे उद्योजक पांढरापेशा कर्मचाऱ्यांनी संघटित क्षेत्रातील कामगारांनी आणि कनिष्ठ जातीतून सामावून घेतलेल्या लोकांनीच लाटला होता. विरोध आणि आंदोलनाच्या नावावर शहरी भागातील सीमांतीकरण झालेले वर्ग, कृती संघटित होण्यास तयार होते. बेरोजगारीची झळ पोहचलेले विद्यार्थीही अस्वस्थ होते. डाव्यांच्या आयत्या बालेकिल्यावर लोकानुरंजनवादी धोरणाद्वारे नव्या काँग्रेसने आपला मोर्चा वळवला. अंतर्गत विभाजन व साम्यवादी व समाजवाद्यांमधील वादांनी त्यांना निष्प्रभ बनवल होते. त्यामुळे निर्माण झालेली मोकळी जागा जाातीयवादी पक्ष व चळवळींनी व्यापली होती. असे पक्ष चळवळी धर्म, प्रदेश, जमात, भाषा या प्रारंभिक अस्मितांआधारे कृतिसंघटन करत होते. लोकांच्या हालखीच्या परिस्थितीस कारण म्हणून मुस्लिम, दलित यांना बकरे बनवण्यात आले व लोकसभेत तेल ओतले गेले."

लोकानुनयाचे यश स्पष्ट करताना जयंत लेले पुढे लिहितात की, १९७१ च्या निवडणूक निकालांनी लोकानुनयाच्या राजकारणावर शिक्कामोर्तब केले. आक्रमक घोषणा व जहालवादी सुधारणाही प्रस्थापित ग्रामीण अभीजनांना सत्ताधारी पक्षांपासून दूर नेण्यात अपयशी ठरल्या. त्यांच्या जमीनमालकी व स्थानिक राज्य यंत्रणेवरील नियंत्रणावर हल्ला करण्याचा या योजनांचा हेतू होता. राज्यस्तरीय नेत्यांचा बँकाचे राष्ट्रीयकरण, तनखे बंद करणे, एकाधिकार नियंत्रण इत्यादी धोरणांना पाठींबा होता. कारण यामुळे गुंतवणूकीच्या संधी वाढणार होत्या. व उद्योगी ग्रामीण अभिजनांना पतपूरवठा होणार होता. नव्या काँग्रेसने अशाप्रकारे सीमांजक गटांचा पाठिंबा जिंकून १९७१ ची निवडणूक जिंकली. काँग्रेस व समाजवाद्यांच्या उर्वरित अवरोधांनाही तिने

नष्ट केले तिने साम्यवादी, हिंदूत्ववादी शक्ती आणि प्रादेशिक अस्मिता वाद्यांच्या वाढत्या पाठींब्यालाही अटकाव केला.

लोकानुनयाचे व्यक्तीपूजेत कसे रुपांतर झाले हे स्पष्ट करताना जयंत लेले यांनी म्हटले आहे, “१९७१ च्या निवडणूकीनंतर इंदिरागांधीची प्रतिमा बनवणाऱ्यांना हवे होते तसे नव लोकानुरंजनवादाचे रुपांतर व्यक्तीपूजेत झाले. त्या परस्परात दाखवलेल्या सान्निध्याचा पायाच चूकीचा होता. या निवडणूकीच्या निकालाने दाखवून दिले की, नव्या काँग्रेस पक्षाचे यश हे महत्वाच्या भागातील जून्या अभिजनांच्या पाठिंब्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून होते. स्वतःच्या मध्यम लवादाच्या भूमिकेस वारंवार आव्हान उपस्थित करणाऱ्या राज्यस्तरीय नेत्यांवर काबू ठेवण्यासाठी इंदिरागांधीना पर्यायी संरचनेची गरज होती. राज्याचे स्थानिक व प्रादेशिक भाग अजुनही जुन्या आघाडी चौकटीत कार्य करण्याच्या जुन्या ग्रामीण अभिजनांच्या अधिपत्याखाली होते. पक्षाने युवा काँग्रेस विद्यार्थी संघटना यांचा लोकानुरंजनवादी कृती संगटनासाठी वापर केला होता. आता त्यांचा वापर नव्या निष्ठावंतामध्ये आश्रयांच्या वितरणाचा वाहक म्हणून करणे योग्य होते. जुन्या अभिजनांचे बालेकिल्ले भेदण्यासाठी शहरी व ग्रामीण स्तरावर पर्यायी संरचना उभ्या केल्या होत्या.”अशा पद्धतीने लोकानुनयवादी राजकारणाने भारतीय राजकीय प्रक्रियेला प्रभावित केलेले दिसते.

**राष्ट्रीय आणीबाणीः**

भारतीय संविधानाच्या १८ व्या भागात आणीबाणी विषयक तरतूद आहेत. ३५२ ते ३६० ही आणीबाणीविषयक नऊ कलमे संविधानातील इतर कोणत्याही कलमांपेक्षा अधिक टिकास्पद ठरलेली दिसतात. साधारणतः संघराज्यात्मक शासनव्यवस्थेचा सार्वत्रिक स्वरूपात आढळून येणारा दोष म्हणजे संकटकालिन परिस्थितीत संघराज्यात्मक व्यवस्था निर्णयप्रक्रिया वेगाने घेण्याकरीता अडथळा ठरते. यावर तोडगा म्हणून अमेरिकन संविधान न्यायालयीन निर्वचनाद्वारे केंद्रसरकारचे अधिकार वाढतील अशी व्यवस्था केली आहे. भारतीय संविधानाने मात्र ही व्यवस्था न्यायपालिकेवर न सोपवता संकटकालिन प्रसंगात केंद्रसरकारला वाढीव अधिकार मिळतील अशी संविधानात आणीबाणी विषयक कलमांच्या माध्यमातून व्यवस्था करून ठेवली आहे. त्यामुळे सर्वसामान्य परिस्थितीत संघराज्यात्मक असणारी भारतीय राजकीय व्यवस्था आणीबाणीच्या काळात संविधान दुरुस्त न करताही एकात्म शासन व्यवस्थेत रुपांतरीत होते. भारताच्या स्वातंत्र्योत्तर राजकारणात आणीबाणीचा कालखंड हा अतिशय महत्वाचा कालखंड मानला जातो.१९७५ ते १९७७ या काळात श्रीमती इंदिरागांधी यांनी अंतर्गत सशस्त्र बंडाची शक्यता व्यक्त करुन जी आणीबाणी घोषित केली व त्यानंतर जवळ-जवळ दोन वर्ष ज्या पद्धतीने भारतीय राजकीय प्रक्रियेत निर्णय घेतले त्याने तत्कालीन व भविष्यातील ही भारतीय राजकारणास व राजकीय प्रक्रियेस प्रभावित केलेले दिसते यादृष्टीने राष्ट्रीय आणीबाणीच्या या कालखंडातील घटना प्रक्रिया व प्रभावांचा अभ्यास करणे अत्यावश्यक ठरले.

भारतीय राजकीय प्रक्रियेत २५ जून १९७५ रोजी इंदिरागांधीनी जाहीर केलेल्या राष्ट्रीय आणीबाणीचीच अधिक चर्चा होते मात्र त्यापूर्वीही या पैलूंवर विरोधक व समर्थकांकडून चर्चा चालू होती याचा आढावा मात्र घेतला जात नाही. त्यामुळे आणीबाणी विषयक भारतीय संविधानातील तरतूदींचे परिपुर्ण आकलन जनसामान्यांपर्यत पोहचताना दिसत नाही. त्याची मांडणी पूढील मुद्यांच्या आधारे करता येईल.

### १) राष्ट्रीय आणीबाणी व संविधानात्मक तरतूदी:

भारतीय संविधानाच्या ३५२ व्या कलमात मूळ स्वरुपात अशी तरतूद करण्यात आली. होती की, युद्धामुळे वा बाह्य आक्रमणामुळे किंवा अंतर्गत अशांततेमुळे भारताच्या वा भारतातील एखाद्या प्रदेशाच्या संरक्षणाला धोका आणणारी गंभीर आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे अशी राष्ट्रपतींची खात्री झाल्यास तो एक जाहीरनामा काढून आणीबाणीची घोषणा करू शकतो. या मुळ तरतूदीमध्ये पूढे वेळोवेळी दुरुस्त्या करण्यात आलेल्या दिसतात. १९७८ साली ४४ व्या संविधान दुरुस्तीने "अंतर्गत शांतता" हा शब्द काढून त्याजागी "सशस्त्र उठाव" हा शब्द योजला आहे. त्यामुळे हे स्पष्ट होते की, जेव्हा अशांततेचे स्वरुप सशस्त्र उठावाइतके गंभीर नसेल तेंव्हा आणीबाणी पुकारली जाऊ शकत नाही.

आणीबाणीच्या आदेशाची मुदत एक महिने राहिल असे संविधानात नमुद करण्यात आले आहे. ही मुदत संपण्यापुर्वी तो आदेश संसदेच्या मान्यतेसाठी ठेवने बंधनकारक असेल. संसद या आदेशाची मुदत वाढवू शकते वा हा आदेश रद्द करु शकते. आणीबाणीचा आदेश काढण्याच्या वेळी वा नंतरच्या महिन्याभरात लोकसभा विसर्जित झाली असेल तर अशा परिस्थितीत या आदेशाची मुदत वाढू शकते मात्र राज्यसभेची त्याला परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. नव्याने लोकसभेचे गठन झाल्यानंतर तीस दिवसाच्या आत या स्वरुपाच्या आदेशास मान्यता घेणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करण्यायोग्य परिस्थिती देशात आहे वा नाही हे तपासण्याचा अधिकार भारतीय संविधानाने सर्वोच्च न्यायालयाला दिला आहे. ४२ व्या संविधान दुरुस्तीने हा अधिकार काढून घेतला होता मात्र ४४ व्या संविधान दुरुस्तीने तो पुनः स्थापित केलेला आहे. त्याप्रमाणे आणीबाणीच्या आदेशाची संविधानिकता तपासण्याचा व आणीबाणी लावण्यामागे काही असद्‌भावी हेतू तर नाहीत ना हे पहण्याचा न्यायपालिकेचा अधिकार आजही कायम असलेला दिसतो.

आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार संविधानाने राष्ट्रपतींवर दिलेला असला तरी तो वास्तवात मंत्रिमंडळाचा निर्णय असणे अपेक्षित होते. १९७५ ची राष्ट्रीय आणीबाणी घोषित करताना तो निर्णय केवळ इंदिरागांधीचा होता. तो मंत्रिमंडळाचा निर्णय नव्हता तरी राष्ट्रपतींनी आणीबाणी घोषित केली. अशा पद्धतीचा अधिकाराचा दुरुपयोग होऊ नये याकरीता ४४ व्या संविधान दुरुस्तीने अशी तरतूद करण्यात आली आहे की, मंत्रिमंडळाने लेखी स्वरुपात आणीबाणीची शिफारस केल्यानंतरच राष्ट्रपती आणीबाणी घोषित करू शकतील. याशिवाय ४४ व्या संविधान दुरुस्तीने या संदर्भात महत्वाच्या दोन दुरुस्त्या केल्या. एक म्हणजे राष्ट्रपतीच्या आणीबाणीच्या घोषणेस पूर्वी दोन महिन्यात संसदेची मान्यता घेण्याची जी अट होती ती कमी करून एक महिण्यावर आणली. तर दुसरे म्हणजे आणीबाणीच्या घोषणेस संसदेच्या साध्या बहुमताऐवजी दोन्ही सभागृहापैकी प्रत्येकातील एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने व उपस्थित मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमताने दिलेली असावी अशी दुरुस्ती करण्यात आली.

१९७५ साली इंदिरागांधी सरकारने ज्यावेळी आणीबाणी पूकारली. त्यावेळी देशात युद्धजन्य परिस्थितीच्या कारणावरुन राष्ट्रीय आणीबाणी कार्यन्वीत होतीच. राष्ट्रीय आणीबाणी जर कार्यन्वीत असेल तर परत दुसऱ्या कारणांसाठी राष्ट्रीय आणीबाणी कशी काय घोषित केली जाऊ शकते? हा एक घटनात्मक पेच त्यावेळी निर्माण झाला होता. मात्र ३८ व्या व ४२ व्या संविधान दुरुस्त्यांनी यासंबंधीचे अनिर्बंध अधिकार मंत्रिमंडळ व राष्ट्रपतींना बहाल केले गेले होते. ४४ व्या संविधान दुरुस्तीने या अधिकारांवर बऱ्यापैकी नियंत्रण आणलेले दिसते.

## २) राष्ट्रीय आणीबाणी वापराचा पूर्व इतिहासः

राष्ट्रीय आणीबाणीचा युद्धजन्य परिस्थिती संदर्भात स्वतंत्र भारतात सर्वप्रथम १९६२ साली वापर करण्यात आला. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले त्यावेळी या संकटकालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी केंद्रसरकारला कायदेशीर बळ मिळावे याकरीता या आणीबाणीची घोषणा करण्यात आली होती. १९६२ साली जाहीर केलेल्या आणीबाणी बरोबर तत्कालिन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी भारत संरक्षण वटहुकुमही जारी केला होता. या वटहुकुमाचे प्रयोजन स्पष्ट करताना असे नमूद करण्यात आले होते की, राष्ट्र अशा संघर्ष काळातून जात असताना जे संघटित प्रयत्नांना मारक ठरतील प्रत्यक्ष -अप्रत्यक्षपणे राष्ट्रद्रोह करतील. संविधानात्मक मूलभूत अधिकारांचा गैरवापर करतील अशा प्रवृत्ती व्यक्तींना तत्पर अटक करणे शासनास शक्य व्हावे या करीता भारत संरक्षण अधिनियमाची आवश्यकता आहे. या वटहुकुमास १९६२ सालीच संसदेने मान्यता दिली व भारत संरक्षण कायदा १९६२ या नावे तो प्रचलित झाला. चीनच्या आक्रमणाने विस्कळीत झालेली घडी बसते ना बसते तो १९६५ साली भारतावर पाकिस्तानने आक्रमण केले. त्यामुळे १९६२ साली जाहीर झालेली आणीबाणी पुढे ही कायम करण्यात आली. त्यासाठी राष्ट्रपतींना नव्याने घोषणा करावी लागली नाही. वास्तविक पाहता युद्ध लांबल्यानंतर आणीबाणीच्या आदेशास स्थगिती मिळणे वा मिळविणे गरजेचे होते. मात्र तत्कालिन राज्यकर्त्यांनी आणीबाणी पूढे लांबवण्यातच अधिक स्वारस्य दाखवलेले दिसते. विरोधकांच्या मोठ्या टिकेनंतर शेवटी १९६२ साली लागू झालेली राष्ट्रीय आणीबाणी १९६८ साली रीतसर संपुष्टात आणली होती.

१९७१ साली भारत-पाकीस्तान युद्धास परत सुरुवात झाल्यानंतर राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा करण्यात आली. १९७१ ची आणीबाणी युद्ध संपल्यानंतर रद्द करावी अशी सर्व स्तरातून मागणी होत असतानाच इंदिरागांधी सरकारने आणखी एक राष्ट्रीय आणीबाणीचा आदेश जारी केला. २५ जून १९७५ रोजी मध्यरात्री या आणीबाणीची घोषणा करताना अंतर्गत सुरक्षिततेला धोका असल्याची लक्षण राष्ट्रपतींनी स्पष्ट केली होती.

## ३) राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केल्यानंतर इंदिरागांधीनी देशाला केलेले संबोधनः

२५ जून १९७५ च्या मध्यरात्री इंदिरा गांधीच्या शिफारशीने राष्ट्रपतींनी राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा केली. त्यानंतर राष्ट्रीय आणीबाणी लागू करण्यासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट करण्याकरीता इंदिरा गांधींनी राष्ट्राला संबोधून भाषण केले. त्या भाषणाचा सारांश डॉ. ना. भा. पाटिल यांनी मराठी भाषेतून संकलित केला आहे. जो राष्ट्रीय आणीबाणी विषयक इंदिरा गांधीच्या भूमिकेचे अवलोकन करण्यास महत्वाचा ठरतो. या भाषणात त्या म्हणतात, "राष्ट्रपतीनी आणीबाणी जाहीर केली आहे. यात घाबरुन जाण्यासारखे काही नाही. माझी खात्री आहे की भारतातील सामान्य स्त्री पुरुषांच्या हितासाठी काही पुरोगामी योजना अंमलात आणण्यास सुरुवात केली. तेव्हापासून एक मोठा गूढ व सर्वव्यापी कट शिजत आहे याची आपणा सर्वांना जाणीव आहेच. लोकशाहीच्या नावाखाली लोकशाही पद्धतीचे कामकाजच बंद पाडावे असे प्रयत्न करण्यात आले आहेत. रितसर निवडून आलेल्या सरकारांना आपले काम करु देण्यात आलेले नाही आणि काही बाबतील कायदेशीर मार्गाने निवडून आलेल्या विधानसभा बरखास्त व्हाव्या म्हणून सभासदांना राजीनामे देण्यांस भाग पाडण्यासाठी बलाचा वापर ही करण्यात आला आहे. नाना प्रकारच्या चळवळींनी सारे वातावरण तापलेले असून त्याचा परिणाम अत्याचारात झाला आहे. मंत्री मंडळातील माझे सहकारी श्री ललीत नारायण मिश्रा यांच्या अमानुष खूनाने तर साऱ्या

राष्ट्राला धक्का बसला. भारताचे सरन्यायाधीश यांच्यावर जो भ्याड हल्ला करण्यात आला त्याचे ही आम्हाला अत्यंत दुःख वाटते."

या भाषणात पूढे इंदिरा गांधी म्हणतात, "काही लोक तर आमच्या सैन्याला बंड करुन उठण्याची आणि पोलिसांना आदेश न पाळण्याची फूस देण्याच्या थरापर्यंत गेले होते. अर्थात आमचे सैन्य दल आणि पोलिस शिस्तबद्ध व देशप्रेमी असल्यामूळे त्याला बळी पडणार नाहीत हे खरे, पण त्यामुळे या चिथावणीचा गंभीरपणा कमी होत नाही. फाटाफूट करणाऱ्या साऱ्या शक्ती मोकाट असून जातीय भावना चेतविल्या जात आहेत आणि त्यामुळे आमच्या ऐक्यालाच धोका निर्माण झाला आहे. माझ्यावर तर नाना प्रकारचे खोटे नाटे आरोप करण्यात आले आहेत. भारतातील जनता मला लहानपणा पासून ओळखते. माझे सारे आयुष्य मी लोकांच्या सेवेसाठी वाहिलेले आहे, ही काही वैयक्तिक गोष्ट नाही. मी पंतप्रधान म्हणून राहते की नाही ही गोष्ट महत्वाची नाही. पण पंतप्रधानपद हे महत्वाचे आहे आणि त्याची नाचक्की करण्याचे जाणून बुजुन राजकीय प्रयत्न होणे हे राष्ट्र किंवा लोकशाहीच्या हिताचे नाही."

या भाषणातून विरोधकांचा देशाला असणारा धोका स्पष्ट करताना त्या म्हणतात, "या त्यांच्या घडामोडीकडे आम्ही दिर्घकाळ मोठ्या सहनशीलतेने पाहत आहोत, परंतु आता आम्हाला समजले आहे की, सारे कामकाज विस्कळीत करण्याच्या हेतूने साऱ्या देशभर कायदा आणि सुव्यवस्था यांना आव्हान देणारे नवे कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. राष्ट्राचे स्थैर्यच धोक्यात आणणाऱ्या गोष्टी कोणते सरकार निमुटपणे चालु देईल? मुठभर लोकांची कृत्ये बहुसंख्य लोकांचे हक्क धोक्यात आणीत आहेत. अंतर्गत परिस्थितीच्या बाबतीत खंबीरपणे वागल्याची राष्ट्रीय सरकारची शक्ती खर्ची करणारी कोणती ही परिस्थिती ही बाहेरचे धोके वाढवावयास मदत करते. आपले ऐक्य आणि स्थैर्य यांचे रक्षण करणे, हे आमचे सर्वश्रेष्ठ कर्तव्य आहे. राष्ट्राच्या ऐक्यालाही कठोर कृती आवश्यक आहे.

विरोधकांच्या कारवायांमुळे विकासाचे प्रश्न कसे गंभीर बनले आहेत याची मांडणी करताना इंदिरा गांधी या भाषणात पूढे म्हणतात, अंतर्गत स्थैर्याला धोका झाला की, त्याचे परिणाम उत्पादनावर, आणि आर्थिक विकासावर ही होतात. गेल्या काही महिन्यात निर्धारपूर्वक आम्ही जे काही उपाय योजले आहेत, त्यामुळे किंमती वाढीला पायबंद बसला आहे. आमची आर्थिक व्यवस्था अधिक बलशाली व्हावी आणि समाजातील विविध घटकांच्या विशेष जे गरीब आणि उघडे पडलेले आहेत आणि ज्यांचे उत्पादन ठराविक आहे. त्यांच्या अडी-अडचणी कमी करण्याच्या उद्देशाने आणखी काही योजना अंमलात आणण्याचे आम्ही ठरविले आहे. या योजना मी लवकरच जाहीर करणार आहे. मी तुम्हाला असे आश्वासन देते की कायद्यानुसार वागणाऱ्या नागरिकांच्या हक्कावर या नव्या आणीबाणीच्या घोषणेचा काहीही परिणाम होणार नाही. माझी खात्री आहे की, अंतर्गत परिस्थिती झपाट्याने सुधारेल आणि शक्य तेवढ्या लवकर या आणीबाणीच्या घोषणेची मग जरुरीच उरणार नाही."

सारांश, इंदिरा गांधीनी आपल्या निवेदनातून राष्ट्रीय आणीबाणीस तत्कालिन विरोधकांना जबाबदार धरलेले दिसते.

### राष्ट्रीय आणीबाणीस कारणीभूत घटक:

२५ जून १९७५ रोजी इंदिरा गांधीनी राष्ट्रीय आणीबाणी घोषित करण्याची शिफारस राष्ट्रपतींकडे केली असली तरी राष्ट्रीय आणीबाणी लादण्याचा निर्णय हा एका रात्रीचा निर्णय म्हटला जाऊ शकणार नाही. राष्ट्रीय आणीबाणीच्या निर्णयापर्यंत इंदिरा गांधीना आणणारे अनेक

घटक तीन-चार वर्षापासून भारतीय राजकारणात घडत होते. या सर्वांचा परिणाम राष्ट्रीय आणीबाणीच्या स्वरुपात व्यक्त झालेला दिसतो. यातील काही घटकांची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

### १) संसदेचे सार्वभौमत्व व न्यायालयीन पूनर्विलोकन यातील संघर्ष:

भारतीय संविधानाने संसदेचे सार्वभौमत्व व न्यायालयीन पूनर्विलोकन यात समन्वय साधण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे असे अभ्यासकांना वाटत असले तरी स्वातंत्र्योत्तर काळात अनेक वेळा संसद व न्यायपालिका एकमकांविरुद्ध उभ्या राहिलेल्या दिसतात. आणि पहिलीच संविधान दुरूस्ती ही या दोन संस्थांच्या परस्परविरोधी संविधानाच्या अर्थ घेण्याच्या प्रवृत्तीतून झालेली होती. अभ्यासकांच्या मते सुरवातीच्या काळात न्यायपालिकेने प्रतिगामी भूमिका स्वीकारुन शासनाच्या सकारात्मक सुधारणा कायद्यांनाही मूलभूत अधिकारांचा संकोच होतो या कारणावरुन अवैध घोषित केलेले दिसते. नेहरुंच्या काळातही हा वाद होताच परंतु त्यावेळी तो संवैधानिक मार्गांनी सोडवण्यात नेहरुंना यश आले. इंदिरा गांधीचा एकूण दृष्टीकोन हा धडाडीचा होता. त्यामुळे बऱ्याचवेळा धक्कातंत्राचा अवलंब करतांना संवैधानिक बारकावे त्या गृहीत धरत नसत त्यामुळे त्यांचे कायदे न्यायपालिकेच्या कसोट्यांवर उतरण्यास अडचणी येत. बँकांचे राष्ट्रीयकरण, संस्थानिकांचे  तनयो रद्द करणारे बील इथपासूनच संसद व न्यायपालिका हा संघर्ष भूमी झाला होता. वास्तवात हा संघर्ष इंदिरागांधी विरुद्ध न्यायपालिका असा होता. न्यायालय संसदेच्या, सरकारच्या पूरोगामी कार्याच्या आड जाणीवपूर्वक अडथळे निर्माण करते आहे. अशी भावना इंदिरा गांधीची झाली. परिणामी न्यायालयीन स्वातंत्र्याच्या दृष्टीने आवश्यक असणारे जे संकेत निर्माण झालेले होते त्याची पायमल्ली इंदिरा गांधीनी करावयास सुरुवात केली. न्यायपालिकेच्या रचनेतच त्यांनी एक प्रकारे हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. इंदिरा गांधीच्या धोरणांना प्रतिकूल असणारे न्या. श्री शेलट हे सेवाज्येष्टते प्रमाणे नियुक्त होणार होते परंतु इंदिरा गांधीनी न्या. रे यांची सरन्यायाधीश पदी नियुक्ती केली. त्यामुळे न्यपालिका व संसद हा संघर्ष अधिक तीव्र झाला. न्यायपालिकेने इंदिरा गांधीच्या अनेक कायद्यांना अवैध ठरवत रद्द करावयाचा जो सपाटा लावला होता तो ही राष्ट्रीय आणीबाणीच्या पार्श्वभूमीचा एक घटक होता असे म्हणता येऊ शकेल.

### २) आर्थिक संकट:

१९७२ ते १९७५ अशी सलग चार वर्ष पावसाने अवकृपा केल्यामुळे अन्नधान्याचे मोठे संकट निर्माण झालेले होते. त्यातच बांग्लादेशातून आलेल्या एक कोटी लोकसंख्येस अन्नधान्य पूरवण्याची जबाबदारी भारतावर येऊन पडली होती. पाकिस्तानविरुद्ध युद्ध ही आर्थिक टंचाईस कारणीभूत होते. या सर्वांचा परिणाम म्हणून भारत आर्थिक गर्तेमध्ये खोलवर रूतत चालला होता. भारताच्या अनेक भागात अन्नासाठी दंगली उसळत होत्या. बेरोजगारांचे, विद्यार्थ्यांचे कामगारांचे मोर्चे, धरणे व संप देशभर चालु होते. देश अराजकाच्या वाटेवर आहे की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली होती. देशभर मोर्चे, निदर्शने, पोलिस व आंदोलक यांची चकमक या नित्याच्या बाबी बनल्या होत्या. सारांश, आर्थिक संकट व विरोधकांनी त्याचा उचलेला फायदा याच्या कात्रीत इंदिरा गांधी सापडल्या होत्या या कात्रीतुन बाहेर पडण्यासाठी त्यांनी आणीबाणीचे पाऊल उचलले असे म्हटले जाते.

### ३) गुजरात मधील आंदोलनः

या दरम्यानच्या काळात निर्माण झालेल्या आर्थिक संकटाचा फटका काँग्रेस पक्षास गुजरातमध्ये सर्वाधिक बसला. लोकसभेमूळे निर्विवाद बहुमताचे सरकार कोसळल्याची स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिली घटना गूजरात मधील काँग्रेस सरकारच्या कोसळल्याने नोंदली गेली. गुजरात आंदोलनाची व्याप्ती अर्थातच मोठी होती. निरनिराळे सामाजिक, आर्थिक, राजकीय वर्ग, घटक त्यात सामिल होते. त्यांच्या हेतूंविषयी ही विभिन्नता होती, सामाजिक अन्याय, काळाबाजार, साठेबाजी, भ्रष्टाचार इत्यादी स्वरुपामध्ये बहूभूमिका धारण करत हे जनआंदोलन विस्तारत गेले.

गूजरात मधील आर्थिक विपन्नावस्थेने लोकांचे हे जनआंदोलन उभे राहिले होते. निसर्ग निर्मित दुष्काळाच्या संकाटस व्यापारी व साठेबाजांनी अधिकच जटील व असह्य करुन ठेवले होते. राज्यसरकार पूरोगामी घोषणांशिवाय काहीही हालचाल करत नव्हती. बहुतांशी आमदारांनी यातुन मार्ग काढण्याकरीता राष्ट्रपती राजवटीची मागणी केली. वातावरण असे स्फोटक झालेले असताना विद्यार्थ्यांच्या आँदोलनाने त्याचा भडका अधिक वाढवला. खानावळीच्या बिलात एल. डी. इंजिनिअरिंग कॉलेज मध्ये भरमसाठ वाढ केल्याने या विद्यार्थी आंदोलनाची ठिणगी पडली. विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट मागितली. मात्र मुख्यमंत्र्यांनी टाळाटाळ केल्यानंतर या आंदोलनास वेगळे वळण लागले. सात जानेवारी १९७४ पासून बेमुदत बंदची घोषणा विद्यार्थ्यांनी केली. इतर तरुण ही विद्यार्थ्यांशी जोडले गेले. विद्यार्थी व तरुणांनी एकत्र येत नवनिर्माण सेना स्थापन केली. महिन्याभरात या आदोलनाचे समस्त गुजरातचा ताबा घेतला. शेवटी ९ फेब्रुवारी गुजरातचे तत्कालिन मुख्यमंत्री चिमनभाई पटेल यांनी राजीनामा दिला. विधानसभा विसर्जित करण्यात येऊन केंद्रसरकारने राष्ट्रपती राजवट लागु केली. या आंदोलनामुळे इंदिरा गांधींच्या मनातील विरोधी पक्ष कटकारस्थान करत आहेत व भारतीय राजकीय व्यवस्था उध्वस्त करण्याचा त्यांचा डाव आहे हा गृह पक्का झाला असे अभ्यासकांचे मत आहे.

### ४) बिहार आंदोलनः

बिहारमध्ये दारिद्र्यरेषेखालील जीवन व्यतित करणारी लोकसंख्या देशात सर्वाधिक होती. दुष्काळाच्या झळा व अन्न टंचाई यामुळे बिहारचे सर्वसामान्य जनतेचे जीवन विस्कळीत झाले होते. गूजरात प्रमाणेच बिहारमध्येही सरकार विरोधी आंदोलनाचे नेतृत्व विद्यार्थी वर्गानेच आपल्या हाती घेतले. २१ जानेवारी १९७४ च्या बिहार बंदपासून या आंदोलनास तोंड फूटले. छात्र नवजीवन मोर्चा व छात्र संघर्ष समिती या दोन विद्यार्थी संघटनांनी हे आंदोलनाचे रणशिंग फुंकले होते. अर्थात विरोधी पक्षांचा त्यांना सक्रिय पाठींबा होता. १८ मार्च १९७४ रोजी पाटणा शहरात दंगल उसळली. छात्र संघर्ष समितीच्या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात अनेक तरुण मृत्युमुखी पडले. १२ एप्रिय १९७४ ला गया येथे परत सीमा सुरक्षा दल व केंद्रिय राखीव पोलिसांनी गोळीबार करुन या आंदोलनास चिरडण्याचा प्रयत्न केला. गफूर सरकार मात्र अशा परिस्थितीत ही या आंदोलनाकडे दूर्लक्ष करत होते. इंदिरा गांधींनी ही बिहार सरकार वाचवण्याचा प्रश्न प्रतिष्टेचा बनवला होता. त्यातून या आंदोलनाचे नेतृत्व जयप्रकाश नारायण यांच्याकडे गेले व या आंदोलनाने अहिंसक परंतु व्यापक जनआंदोलनाचे स्वरुप लवकरच धारण केले त्यातुन एक प्रकारे इंदिरा गांधीच्या मनात आणीबाणीची खूणगाठ नक्की झाली असे म्हटले तर वावगे ठरु नये.

## ५) जे. पी. चे संपूर्ण क्रांती आंदोलनः

बिहारमधील आंदोलनास जयप्रकाश नारायण यांनी नेतृत्व दिल्यानंतर या आंदोलनाचा विस्तार व व्यपकता दोन्हीमध्ये प्रचंड वाढ झाली. कारण जयप्रकाश नारायण त्यावेळी लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार होते. जे. पी. च्या दृष्टीने केवळ बिहार सरकारच हटवून भागणार नाही तर केंद्रातील इंदिरा गांधी सरकार हटविण्याची सर्वाधिक गरज आहे. त्यासाठी त्यांनी देशभर दौरे करुन संपूर्ण क्रांतीचा नारा दिला. जे. पी. च्या मते देशात संपूर्ण क्रांती ही युवाशक्ती व जनशक्ती यांच्या संघटित प्रयत्नातुन होऊ शकते. क्रांती लादता येत नाही. ती उपजावी लागते. राजकीय पक्षांना क्रांती घडवून आणता येत नाही. राजकिय पक्षांच्या स्वार्थ व महत्वकांक्षेमुळे ते क्रांतीनिष्ठ होऊ शकत नाहीत. जे. पीं च्या मते या आंदोलनाचे स्वरुप सत्ताधारी विरोधी पक्ष असे नसुन हे स्वरुप प्रामुख्याने राज्यशक्ती विरुद्ध जनशक्ती असे आहे. शासनाने जनतेच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास पर्यायी जनता सरकारे स्थापन करण्याची योजना होती. या समग्र क्रांतीत पोलिस, लष्कर व अन्य सशस्त्र दले यांनीही सहभागी होण्याचे आवाहन जे. पीं. नी केले होते. हे आवाहन व पर्यायी जनता सरकारांची घोषणा प्रामुख्याने इंदिरा गांधींच्या जीवाला लागलेली दिसते. ज्यातुन त्या राष्ट्रीय आणीबाणीच्या निर्णयावर पोहोचल्या.

## ६) अनुकुल व प्रतिकुल घटनांची मालिकाः

१९७४ - १९७५ या कालखंडात देशाच्या व इंदिरा गांधींच्या दृष्टीने अनुकुल व प्रतिकुल घटनांची एक प्रकारे मालिकाच सुरु होती. १९७१ च्या युद्धात पाकिस्तान ची बाजु घेणाऱ्या इराण सोबत इंदिरा गांधींनी १९७४ साली महत्वपूर्ण करार घडवून आणला. सुरवातीस सार्वभौमत्वाचा दावा करणाऱ्या व चीन चा डोळा असणाऱ्या सिक्कीम या प्रांतात इंदिरा गांधींनी खंबीर भूमिका घेत भारतीय संघराज्यात जोडुन घेतले. पोखरणच्या वाळवंटात अणूचाचणी यशस्वी करुन जगातील महासत्ताक राष्ट्रांच्या रांगेत भारत गणला जाऊ लागला. या बाबींमूळे भारताची जगात प्रतिमा उंचावली, त्या बरोबरीनेच इंदिरा गांधींचा आत्मविश्वास द्विगुणित ही केला होता. या कालखंडात इंदिरा गांधीचे निकटचे सहकारी ललित नारायण मिश्रा यांची झालेली हत्या, गुजरातमधील कॉंग्रेस सरकारचे करावे लागलेले विसर्जन व निवडणूकीनंतर तेथे कॉंग्रेसचा झालेला दारुण पराभव जे. पीं. ना मिळणारा जनसामान्यांचा मोठा पाठींबा यामुळे इंदिरा गांधीच्यां मार्गातील प्रतिकुल घटक अधिकच सक्रीय होताना दिसत होते. एकंदरीत सकारात्मक व नकारात्मक घटनांच्या हिंदोळ्यावर असणाऱ्या इंदिरा गांधी यातुन सावरण्यासाठी राष्ट्रीय आणीबाणीच्या निर्णयापाशी येऊन ठेपल्या असे दिसते.

## ७) अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय व विरोधकांचे आंदोलनः

१९७१ च्या निवडणूकीतील इंदिरा गांधींचे स्पर्धक विरोधी उमेदवार राजनारायण यांनी निवडणूक काळात इंदिरा गांधींनी शासकीय अधिकार पदाचा गैरवापर केल्याचा आरोप करुन त्यांची उमेदवारी वा निवडणूक रद्द करावी अशी एक याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल केली होती. या खटल्याचा निकाल ही गूजरात निवडणूकांच्या निकाला दिवशीच आला. १२ जून १९७५ रोजी न्या. जगमोहन सिन्हां यांनी इंदिरा गांधींचा विजय अवैध घोषित करुन त्यांना पूढील सहा वर्षांकरिता कोणत्याही पदाकरिता निवडणूक लढविण्यास अपात्र घोषित केले. गूजरात निवडणूकीतही पक्षाचा दारुण पराभव झाला. या दूहेरी धक्क्याने इंदिरा गांधी अस्वस्थ झाल्या. इंदिरा गांधींनी उच्च न्यायायलयाच्या निर्णया विरोधात याचिका दाखल केली. सर्वोच्च

न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयास तात्पुरती स्थगिती दिली. मात्र इंदिरा गांधी अंतिम निर्णय येईपर्यंत खासदार पदाचे कोणतेही लाभ घेऊ शकणार नाहीत असे ही स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण प्रलंबित असल्या कारणाने इंदिरा गांधीना तातडीने पंतप्रधान पदाचा राजीनामा देण्याची आवश्यकता नव्हती. मात्र विरोधकांनी इंदिरा गांधींच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली. त्यालाही राष्ट्रपती भवनासमोर धरणेही सुरु केले. अशा पद्धतीने उच्च न्यायालयाचा निर्णय हे राष्ट्रीय आणीबाणीचे तात्कालिक कारण ठरले असे आपण म्हणू शकतो.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर व जनआंदोलनाच्या रेट्याने इंदिरा गांधी दबावात येऊन राजीनामा देतील हा विरोधकांचा कयास इंदिरा गांधीनी पार उधळून लावला. आलेल्या संकटाला तोंड देण्यासाठी व आपली सत्ता व पद टिकविण्यासाठी त्यांनी आपल्या निकटच्या सहकाऱ्यांशी चर्चा करुन २८ जून १९७५ रोजी मध्यरात्री अंतर्गत बंडाळीमुळे राष्ट्रीय आणीबाणी लावावी लागते आहे असा आदेश राष्ट्रपतींकडून जारी केला. अंतर्गत बंडाच्या कारणाखाली आणीबाणी घोषित होण्याचा स्वतंत्र भारतातील हा पहिला प्रयोग होता. २५ जूनच्या रात्रीच विरोधी पक्षातील सर्व प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली. २६ जून रोजी सकाळी सहा वाजता इंदिरा गांधीनी या राष्ट्रीय आणीबाणीवरील सहमती करीता बैठक बोलावली. या बैठकीत तत्कालिक संरक्षण मंत्री स्वर्णसिंग यांचा अपवाद करता सर्व मंत्र्यांनी पाठींबा व्यक्त केला. स्वर्ण सिंग यांना आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. २६ जून नंतर आठवडाभरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, आनंदमार्ग, मार्क्सवादी, लेनिनवादी पक्ष व तत्वम २६ संघटना व राजकीय पक्षांवर सरकारने बंदी घातली. वृत्तपत्रांवर प्रसिद्धीपूर्व तपासणी लावण्यात आली. विरोधी पक्षातील नेत्यांची मते प्रकाशनास अयोग्य ठरविण्यात आली.

अशा पद्धतीने जे. पी. च्यां लाटेने निर्माण झालेला जन आंदोलनाचा आवाज आठवडाभरात शांत झाला. संप, निदर्शने, धरणे, हिंसाचार बंद होऊन जनजीवन सुरळीत सुरु झाले. इंदिरा गांधी नी महिन्याभराच्या आतच २१ जुलै रोजी संसदेचे अधिवेशन घोषित केले. हे अधिवेशन स्वातंत्र्योत्तर भारताच्या संसदीय लोकशाहीच्या इतिहासातील अभूतपूर्व अधिवेशन मानावे लागेल. कारण सभागृहात विरोधी पक्षातील सदस्यांची संख्या अगदी नगण्य होती. सभागृहातील विरोधी पक्षातील सभासदांची मते अप्रकाशनीय ठरविण्यात आली होती. या अधिवेशनात मोठ्या प्रमाणात घटनादुरुस्ती करुन संविधानाची मोडतोड ही करण्यात आळी. ३८ व्या संविधान दुरुस्तीने आणीबाणी जाहीर करण्यायोग्य परिस्थिती आहे किंवा नाही याबाबतचे राष्ट्रपतींचे मत अंतिम राहिल असे स्पष्ट करण्यात आले. ज्या लोकप्रतिनिधित्व कायद्याचा आधार घेऊन अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधीची निवड अवैध घोषित केली होती ती सर्व कलमे रद्द करण्यात आली. इंदिरा गांधींनी जाहीर केलेल्या २० कलमी कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात कार्यन्वीत करण्याचे व प्रसिद्धी देण्याचे निश्चित झाले.

आणीबाणीच्या काळात सरकारी दडपशाहीचा वरवंटा विरोधकांवर मोठ्या प्रमाणात फिरला. ८० हजारापेक्षा अधिक लोक तुरुंगात डांबण्यात आले होते. सर्व विरोधी पक्षांना तुरुंगात अमानुष वागणूक दिली जात होती असे म्हटले जाते. सरकार विरोधी निर्णय देणाऱ्या १६ न्यायाधिशांच्या बदल्या करण्यात आल्या, प्रसार माध्यमे सरकारी नियंत्रणाखाली आणण्यात आली, मूलभूत अधिकारांचे निलंबन करण्यात आले, ज्या वकिलांनी विरोध केला त्यांचे चेंबर्स बुलडोझर लावून पाडण्यात आली. विरोधी पक्षनेत्यांच्या, भूमिगत नेत्यांच्या नातेवाईकांचा ही मोठ्या प्रमाणात छळ करण्यात आला, या काळात इंदिरा गांधींपेक्षाही संजय गांधींचे निरंकुश नेतृत्व भारतीय जनतेने अनुभवले, कुटुंबनियोजनात नसबंदीच्या प्रयोगास संजय गांधी यांनी अतिरेकी आग्रहाने अंमलात

आणल्याने जनसामान्यांमध्ये अधिकच दहशत निर्माण झाली. संजय गांधींचा आक्रमकपणा हा आणीबाणी काळातील विरोधकांना चिरडण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरला गेला.

## आणीबाणी विरोधी आंदोलनः

२५ जून १९७५ रोजी राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा केल्यानंदर, सर्व विरोधी पक्षनेत्यांना तुरुंगात डांबल्यानंतर, महत्वाच्या पक्ष व संघटनांवर बंदी घातल्यानंतर भारतभर एक शांतता निर्माण झाली होती. जनजीवन सूरळीत सुरु झाल्याचा भास निर्माण झाला. सुरुवातीच्या काळात भारतीय जनतेने आणीबाणीच्या घोषणे विरोधी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. त्यामुळे सरकारला आपला प्रयोग यशस्वी झाल्याचा भास होत होता. मात्र काळ जसा पूढे सरकला तसे आणीबाणी विरोधी जनआंदोलनाने मूळ धरण्यास सुरुवात केली व अल्पावधीतच देशभर आणीबाणी विरोधी आंदोलनाच्या विस्तार झाला. आणीबाणी विरोधी आंदोलनात प्रमुख भूमिका अर्थातच भूमिगत नेत्यांची होती. तमिळनाडू, बिहार, पंजाब, महाराष्ट्र या राज्यांमध्ये आणीबाणी विरोधी लढा अधिक तीव्र होता. वृत्तपत्रांवर आणीबाणी काळात बंदी आणली तरी काही वृत्तपत्रांनी गूप्तपणे प्रचार प्रवाहाचे कार्य चालविलेलच होते. आणीबाणी विरोधी प्रचार करणारे पहिले वृत्तपत्र म्हणून जनता समाचार या वृत्तपत्राचा उल्लेख केला जातो. या वृत्तपत्राने सर्वप्रथम २८ जून १९७५ रोजी आणीबाणी विरोधी प्रचार केला होता. याशिवाय दिल्ली येथील जनवार्ता व मशाल, वारणसीतील दर्पण, हैदराबादचे वज्रयूग, गोहत्तींवरील सत्यवार्ता ही पाक्षिके आणीबाणी विरोधी प्रभावी कार्य करीत होते. आणीबाणी विरोधी लढ्यात विद्यार्थी संघटनांनी प्रामूख्यांने मोठी भूमिका बजावली. एकंदरीत आणीबाणीच्या काळात भारतीय लोकशाही व्यवस्था एक प्रकारे बंदीवासात होती असे म्हणता येईल.

## आणीबाणीची समाप्ती व जनता पक्षांचे सरकारः

राष्ट्रीय आणीबाणी परिस्थिती असताना लोकसभेच्या निवडणूका १ वर्षाने पूढे ढकलण्याचा अधिकार संसदेत असतो. ज्या प्रमाणे १९७६ च्या सावत्रिक निवडणूका इंदिरा गांधींनी एका वर्षाने पूढे ढकलल्या होत्या. आणीबाणीचा फायदा घेऊन इंदिरा गांधी आणखी काही वर्ष निवडणूका पूढे लांबवतील असा विरोधकांचा अंदाज असताना १८ जानेवारी १९७७ रोजी इंदिरा गांधींनी मार्च १९७७ मध्ये निवडणूका आयोजित करण्याचे घोषित केले. हा ही एक धक्कातंत्राच्या राजकारणाचाच भाग होता. विरोधी पक्षांना संघटित होण्याकरीता व सत्ताधाऱ्यांची जमवाजमव करण्याकरीता वाव व वेळ न देता हा निवडणूका आवरुन घेण्याचा इंदिरा गांधीच्या प्रयत्न होता. गूप्तहेर खात्यानेही त्यांना आता निवडणूका घेतल्यातर काँग्रेसला ३५० जागा मिळतील असा अहवाल दिला होता. तत्कालिन आय. बी. आय. चे संचालक श्री लेन यांनी मात्र सहा महिन्यानंतर निवडणूका घेण्याचा सल्ला इंदिराजींना दिला होता. देशात आर्थिक अडचणी वाढत असल्याकारणाने लवकरात लवकर निवडणूका घ्याव्या असा सल्ला पंतप्रधान इंदिरा गांधींचे खाजगी सचिव असणारे श्रीधर यांनी ही दिला होता. इस्टिट्यूट ऑफ पॉलिसी रिसर्च या दिल्लीस्थित राजकीय धोरणांच्या अभ्यास करणाऱ्या संस्थेनेही इंदिरा गांधींना मार्चमध्ये निवडणूका घेण्याचा सल्ला दिला होता. याचा सारासार विचार करुन हा निवडणूकांचा निर्णय घोषित केला होता. आंतरराष्ट्रीय पातळीवरुन ही इंदिरा सरकारवर लोकशाहीची पूनःर्स्थापना करण्यासाठी दबाव वाढत होता. संजय गांधींचे नेतृत्व निवडणूकांच्या माध्यमातून अधिक प्रस्थापित करता येईल असाही एक अंदाज इंदिरा गांधींचा असावा असे अभ्यासकांना वाटते.

मार्च १९७७ मध्ये आयोजित केलेल्या निवडणूकांना सामारे जाण्याकरीता विरोधी पक्षांनी आणीबाणी उठविण्यात यावी, वृत्तपत्रांवरील निर्बंध दूर करावेत. लोकांना नागरी अधिकार द्यावेत,

राजकीय कैद्यांची सूटका करावी. अशी मागणी जयप्रकाश नारायण यांनी लावून धरली विरोधी पक्षांनी एकजूट होऊन निवडणूक लढवावी असा आग्रह जयप्रकाश नारायण यांनी धरला व त्यातून २० जानेवारी १९७७ रोजी सर्व विरोधी पक्षांनी व नेत्यांनी एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना केली. या केवळ दोन महिन्यापूर्वी स्थापन झालेल्या जनता पक्षात भारतीय सर्वसामान्य जनतेने उजलून धरले व लोकसभेत प्रचंड बहूमताने स्थापित केले. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात झालेल्या संवैधानिक मोडतोडी विरोधात, संसदीय लोकशाहीच्या अवमूल्यनास या जनादेशाने एक प्रकारे चपराक लावून भारतात एकाधिकारशाही निर्माण करण्यारा डाव हाणून पाडला म्हणून १९७७ च्या या विजयास दूसरे स्वातंत्र्य असे संबोधले जाते.

सारांश, राष्ट्रीय आणीबाणी हा स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकीय प्रक्रियेतील एक काळाअध्याय मानला जातो. काही काळ भारतीय लोकशाही काळोखात गेल्या सारखी वाटली असली तरी भारतीय जनसामान्यांनी ही लोकशाही जिवंत ठेवण्यात खऱ्या अर्थाने महत्त्वाची भूमिका बजावली.

**जागतिकीकरण व उदारीकरणाच्या संदर्भात भारतीय राज्याचे बदलते स्वरुप:**

जागतिकीकरण व उदारीकरण हे आजच्या यूगाचे परवलीचे शब्द झाले आहेत. २० व्या शतकाच्या शेवटच्या दशकात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला. उदारीकरणाची प्रक्रिया ही भांडवलशाही राष्ट्र राज्यांमध्ये पूर्वीपासूनच कार्यन्वीत होती. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने या प्रक्रियेस खऱ्या अर्थाने जागतिक स्वरुप प्राप्त करुन दिले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे मूळ स्वरुप व प्रेरणा या आर्थिक असल्या तरी त्याचे प्रभाव मात्र सर्वंकष झालेले दिसतात. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व्यवस्था संकलल्पनाच नव्हे तर त्यासंबंधीच्या वर्षानुवर्षाच्या धारणाही या प्रक्रियेने पार बदलुन टाकलेल्या प्रत्ययास येतात. जागतिकिकरण व उदारीकरणाच्या प्रक्रियेने राष्ट्र राज्य व्यवस्थेच्या प्रचलित प्रतिमानास धक्का देत त्यास जागतिकिकरणाच्या प्रक्रियांशी सन्मुख बनविण्यासाठी मुलभूत स्वरुपाचे बदल करावयास भाग पाडलेले दिसते. या दृष्टीने भारतीय राज्याचे जागतिकिकरण उदारीकरणाच्या संदर्भात कसे बदल झाले. भारतीय राज्याने त्यास कसा प्रतिसाद दिला. या घटकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**जागतिकिकरण संकल्पनात्मक अर्थ:**

भारतीय राज्याचे जागतिकिकरण व उदारीकरणाच्या संदर्भात बदलते स्वरुप अवलोकन करण्याच्या दृष्टीने जागतिकीकरण व उदारी करण या संकल्पनांचा अर्थ माहित असणे आवश्यक असते. जागतिकीकरण या संकल्पनेचा सामान्यतः अर्थ पूढील चर्चेतून स्पष्ट करता येईल.

जागतिकिकरण ही संज्ञा केवळ वर्णनात्मक नसुन ती एक विचारधाराही दर्शविते. या विचारधारेनुसार जागतिकीकरण ही एक उपाययोजना ठरते. या दृष्टीने जागतिकिकरण ही विचारधारा वर्तमानकाळातील विचारांवर निर्णयप्रक्रियेवर व राजकीय व्यवहारावर वर्चस्व गाजवते. जागतिकिकरण हे व्यापार, भांडवल, तंत्रज्ञान व माहिती यांच्या एकाच जागतिक बाजारपेठेत होणाऱ्या वाढत्या व्याप्ती व खोलीचे निर्देशन करते.

जागतिकिकरण या संकल्पनेची संकल्पनात्मक मांडणी करताना प्रा. अरुणा पेंडसे व उत्तरा सहस्त्रबुद्धे यांनी विश्लेषण करताना म्हटले आहे की, सध्याचे जागतिकिकरण तंत्रज्ञानातील बदलामुळे घडून आले आहे हे अर्धसत्य आहे. शीतयुद्धाच्या अंतामुळे खऱ्या अर्थाने जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्यास आवश्यक असणारी राजकीय स्थिती निर्माण झाली. साम्यवादी अर्थव्यवस्था कोसळल्यामुळे पूर्व युरोप व रशिया हे देश तसेच तिसऱ्या जगातील देशांच्या

अर्थव्यवस्थांची समान पर्यायी अर्थनिती फसल्यामुळे अमेरिकेच्या नेतृत्वाखाली भांडवल शाहीला त्या अर्थव्यवस्थांना खुल्या बाजारपेठीत अर्थव्यवस्थेतुन ओढुन घेणे व त्यामध्ये घुसणे शक्य झाले. या देशांना सक्तीच्या उदारीकरणाखाली बाजारपेठा खुल्या कराव्या लागल्या. खाजगीकरणाच्या बडग्याखाली देशांतर्गत अर्थव्यवस्थेतील त्या राज्यांची भूमिका मर्यादित करणे हाही आर्थिक सुधारणांच्या नावाखाली भांडवलशाही शक्तींचा विशेषता बहुराष्ट्रीय कंपन्यांचा हेतु होता. राज्याचे महत्व व शक्ती कमी करुन त्याची जागा बाजारपेठा घेणार याचा अर्थ अमेरिकेच्या व इतर पाश्चात्य राष्ट्रांच्या नेतृत्वाखालील भांडवलशाही अर्थव्यवस्थांना या देशामध्ये आपली पकड बसवता येणार हे उघड होते.

जागतिकिकरणाच्या प्रक्रियेची उद्दिष्टये स्पष्ट करता पुढे त्या म्हणतात जेव्हा अर्थव्यवस्थेवरील राज्याची पकड संपून तिथे बाजारपेठीय व्यवस्था येते व हीच व्यवस्था देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय आर्थिक वा राजकीय घडामोडींवर नियंत्रण मिळविते. तेव्हा अशा एकजीव झालेल्यां जागतिक अर्थव्यवस्थेत काहींच्या मते राष्ट्र-राज्य या घटकाचे स्थान संपुष्टात येते व राष्ट्र राज्यांच्या संपल्याबरोबर एक खुली व खऱ्या अर्थाने जागतिक भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण होऊ शकते, जिथे व्यापार, वित्तपूरवठा व बहूराष्ट्रीय कंपन्यांच्या आंतरराष्ट्रीय हालचाली पूर्णपणे अनिर्बंध असतील अशी कल्पना मांडली जाते. जागतिकिकरणाच्या शक्तींची हीच उद्दिष्टये आहेत व जागतिकिकरणाची विचारप्रणाली म्हणजे नव्या युगातील भांडवलशाहीची वसाहतवादाची भूमिकाच आहे. आंतरराष्ट्रीयकरण व जागतिकीकरण यातील फरक स्पष्ट करताना त्यांनी लिहीले आहे, आंतरराष्ट्रीय करणामध्ये राष्ट्रा राष्ट्रांमधील संबंध वाढीस लागतात वा ह्या संबंधाची व्याप्ती वाढते. पण ती राष्ट्रे परस्परांपासून वेगळी अशीच राहतात. त्यांच्या सीमारेषा एकमेकांना स्पष्ट विभागणाऱ्या असतात. आंतरराष्ट्रीय चे क्षेत्र हे सीमारेषांनी अलग केललेल्या राष्ट्र-राज्याच्या गोधडीप्रमाणे असते. तर जागतिकिकरणाचे क्षेत्र हे राष्ट्रांच्या सीमा पुसट झालेल्या एखाद्या जाळ्याप्रमाणे असते.

**उदारीकरण संकल्पनात्मक स्पष्टीकरण:**

उदारीकरण या संकल्पनेचा अर्थ साधारणता पूढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

जागतिकिकरण ज्या प्रक्रियेमुळे शक्य होते ती अर्थव्यवस्था खूली करण्याची प्रक्रिया म्हणजे उदारीकरण होय. उत्पादक तसेच उत्पादन घटकाचे मालक त्यांच्या स्वहितासाठी स्वतः निर्णय घेऊ शकतात याचाच अर्थ आर्थिक स्वातंत्र्य वा आर्थिक निर्णयाचे स्वातंत्र्य होय. परकीय तंत्रज्ञान व गुंतवणूक आकर्षित करणे, देशातील कर्जाचे प्रमाण कमी करणे, सार्वजनिक क्षेत्राची तसेच सरकारची अर्थव्यवस्थेतील भूमिका कमी करणे, औद्योगिक उत्पादनाची अंतर्गत स्पर्धाशक्ती वाढवणे ही उदारीकरणाची महत्वाची उद्दिष्टये मानली जातात.

सारांश, उदारीकरण ही अर्थव्यवस्थेस मुक्त स्वरुप देणारी एक प्रक्रिया आहे असे आपण म्हणू शकतो. जागतिकिकरण व उदारीकरणाचे राष्ट्र-राज्य व्यवस्थेवरील प्रभावः-

जागतिकिकरणच्या व उदारीकरणाच्या एकुण प्रक्रियेने राष्ट्र राज्य व्यवस्थेला मोठ्या प्रमाणात प्रभावित केलेले दिसते. राष्ट्र राज्य व्यवस्थेच्या स्वरुपास या प्रक्रियेने सर्वकषरीत्या प्रभावित केलेले दिसते. आजच्या राष्ट्र-राज्य व्यवस्थेचा उगम हा १६४८ च्या वेस्टफालिया च्या करारात शोधला जातो. १९ व्या व २० व्या शतकामध्ये राष्ट्र-राज्याचे स्वरुप बदलत गेल्यानंतर वेस्टफालियाच्या तहास आंतरराष्ट्रीय व्यवस्था असे संबोधन वापरले जाऊ लागले. या व्यवस्थेचा महत्वाचा घटक म्हणून राष्ट्र-राज्य व्यवस्था पूढे आली. या राष्ट -राज्य व्यवस्थेचा मूलभूत

आधार हा राज्याचे सार्वभौमत्व हा होता. वेस्टलियाच्या करारानंतर जग अनेक भौगोलिक एककांमध्ये विभागले गेले व त्यातून राष्ट्र-राज्य व्यवस्था अस्तित्वात आली. जागतिकिकरणाच्या प्रक्रियेने वेस्टलियाच्या तहाचे एक प्रकारे विसर्जन झाले आहे असे अभ्यासकांना वाटते. वेस्टलियाच्या तहाचे व एकूण राष्ट्र-राज्य व्यवस्थेचे जे मूलभूत तत्व म्हणून बूढे आळे होते ते सार्वभौमत्व हे तत्वच जागतिकिकरणच्या प्रक्रियेने गळून पडले आहे असे अभ्यासकांना वाटते.

राष्ट्र राज्यांच्या सार्वभौमत्वाचा मुख्य आधार भौगोलिक सीमांनी बद्ध असा समाज असतो. राज्याची संपूर्ण एकमेव व अनियंत्रित सत्ता या भौगोलिक सीमांतर्गत असते. जागतिकिकरणच्या प्रक्रियेने मात्र या सीमा भेदून अनेक प्रक्रियांना जागतिक स्वरुप बहाल केलेले दिसते. ज्यांना राष्ट्र-राज्याची अडचण असूनही थोपवता येणे शक्य नसते. जागतिकिकरणच्या प्रक्रियेतुन निर्माण झालेले असे अनेक घटक आहेत की जे एखाद्या विशिष्ट राष्ट्राच्या कार्यकाल पूरते सीमीत राहु ही शकत नाहीत व इतर कोणतेही राष्ट्र-राज्य ते आपल्या हद्दीत येण्यापासून रोखूही शकत नाहीत. त्यामुळे जागतिकिकरणची व उदारीकरणाची प्रक्रिया या राज्याचे स्वरुप मोठ्या प्रमाणात प्रभावित करतांना दिसतात.

**जागतिकीकरण व उदारीकरणाच्या संदर्भात भारतीय राज्याचे बदलते स्वरुपः-**

जागतिकीकरण व उदारीकरण या प्रक्रिया भारतीय राजकीय व्यवस्थेत ही १९९० च्या दशकात प्रविष्ट झाल्या व भारताच्या राजकारणालाच नव्हे तर एकूण राज्यव्यवस्थेला त्याने प्रभावित केलेले दिसते. त्यातील काही प्रमुख घटकांची चर्चा पूढील प्रमाणे करता येईल.

**१) लोकशाही समाजवादी तत्वास सोडचिठ्ठीः**

भारतीय संविधानाने उद्देशितकेत लोकशाही समाजवाद यावर आधारीत भारतीय राजकीय व सामाजिक व्यवस्थेचे स्पष्ट शब्दांमध्ये अभिवचन दिले आहे. ५२ व्या संविधान दुरूस्तीने तर संविधानाच्या उद्देशिकेत समाजवाद हा शब्द अंतभूत करुन या तत्वाविषयीची राज्याची बांधिलकी अधिक अधोरेखित केली होती. जागतिकीकरण व उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर मात्र समाजवादी तत्वांना फारशी संधी वा प्रतिष्ठा मिळताना दिसत नाही. भारतीय संविधानात दुरूस्ती न करता ही जागतिकीकरण व उदारीकरणाच्या माध्यमातून नवीन आर्थिक धोरण स्वीकारत संविधानिक मूल्यांना संविधानात बदल न करता सुद्धा राज्य त्या तत्वांची सर्रास पायमल्ली करताना दिसतात. जागतिकीकरण पूर्व अवस्थेत एखादे धोरण संविधानातील तत्वां विरोधी जात असेल तर संविधानात आवश्यक बदल करुन त्या धोरणाप्रती संविधानास सन्मूख करण्याची औपचारिकता पूर्ण केली जात असे. जागतिकीकरणच्या प्रक्रियेनंतर मात्र भारतीय राजकीय व्यवस्थेत ही औपचारीकता वा संविधानात्मक प्रक्रीया पाळण्याची ही तसदी राज्याकडून घेतली जाताना दिसत नाही. त्यामुळे कव्हर तूम्हारा अंदर का पेज हमारा अशी संविधानाची अवस्था भांडवलशाही व्यवस्थेने जागतिकीकरणच्या प्रक्रियेच्या माध्यमातून केलेली दिसते. त्यामुळे संविधानाच्या उद्देशिकेत व संविधानाच्या मूख्यविचारात मध्यवर्ती असणारे लोकशाही समाजवादाच्या तत्वास जागतिकीकरणच्या पार्श्वभूमी वर भारतीय राज्याने सोडचिठ्ठी दिलेली निदर्शनास येते.

**२) कल्याणकारी राज्य तत्वाचा ऱ्हास :**

भारतीय संविधानाने स्वातंत्र्योत्तर काळात कल्याणकारी राज्याच्या तत्वांना संविधानिक दर्जा बहाल केला होता. भारतीय संविधानाच्या  चौथ्या भागात नमूद करण्यात आलेली राज्याची

मार्गदर्शक तत्वे ही कल्याणकारी राज्याचा आशय अधिक बळकट करणारी होती. राज्याचा कारभार हा कल्याणकारी राज्यतत्वांच्या प्रकाशात चालावा अशी संविधानकारांची अपेक्षा होती. त्याप्रमाणे संविधानातील मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करतांना राज्याने सुरवातीच्या काही दशकांमध्ये मार्गदर्शक तत्वांना मूलभूत अधिकारांपेक्षा श्रेष्ठ स्थान दिले. त्यालाही न्यायपालिकेचा रोष पत्करुन, प्रसंगी संविधान दुरूस्ती करुन मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचा, न्यायपालिकेचा संविधानिक कायदेशीर संरक्षण देण्याचा प्रयत्न राज्यांकडून झाला. पाळण्यापासून स्मशानापर्यंत राज्य सोबतीला असते या कल्याणकारी राज्याच्या तत्वाचा अनुभव १९८० च्या दशकापर्यंत भारतात ही अनुभवास येत होता. त्याकरीता रोजगारा पासुन आरोग्यापर्यंत व शिक्षणापासून निवासापर्यंत कार्य राज्याकडे होते. विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून देशातील  वंचित, अभावग्रस्त समूहांपर्यंत शासनाच्या योजना व लाभ पोहचवले जात होते. ती राज्याची प्रमुख जबाबदारी मानली जात होती. जागतिकीकरणच्या माध्यमातून मात्र नो फ्रि लंच हे तत्व प्रचलित झाले. कल्याणकारी योजनांवरची सरकारी अनुदाने काढून घेण्याची मोहीम धोरणे सरकारने अधिक वेगवान केली. कल्याणकारी योजनांना स्थगिती देणे, त्याचा निधी कमी करणे यासारख्या तत्वांना शासकीय धोरणांमध्ये प्राधान्य मिळू लागले. सारांश, व्यक्तीच्या सर्वागीण विकासाला बांधील असणारे कल्याणकाारी राज्यांचे तत्व जागतिकीकरण व उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर गळून पडण्याच्या स्थितीत आलेले आहे. राज्य परत स्वातंत्र्यपूर्व अवस्थेत कायदा व सुव्यवस्था राखणे एवढ्या पूरते सिमित होण्याच्या भूमिकेपर्यंत पोहचले आहे असे अभ्यासकांना वाटते.

### ३) आर्थिक सार्वभौमत्वावरील मर्यादा:

भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानाचा अंमल भारतभर सुरु झाला. त्या दिवसापासून जागतिक नकाशावर भारत एक सार्वभौम राज्य म्हणून अस्तित्वात आले. म्हणजे भारतभर कोणत्याही परकीय शक्तीचे कोणतेही अधिराज्य वा अंकुश नाही हे यातून स्पष्ट झाले. भारत आपली धोरणे कार्यक्रम योजना या कोणत्याही बाह्य शक्तीच्या प्रभावाशिवाय ठरवु शकेल वा त्याची अंमलबजावणी करु शकेल हे ही त्यातुन निश्चित होते. जागतिकीकरणच्या प्रक्रियेने मात्र जगभरातील राष्ट्र-राज्य व्यवस्थेच्या सार्वभौमत्व या आत्मतत्त्वालाच प्रश्नांकित केलेले दिसते. विशेषतः आर्थिक संदर्भातील राज्यांचे सार्वभौमत्व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने पार लयाला नेलेले दिसते. भारत ही यास उपवाद नाही हे १९९१ नंतरच्या भारतीय राज्याच्या आर्थिक धोरणांचा आढावा घेताना पदोपदी जाणवते. भारतीय राज्यकर्त्यांची इच्छा असो अथवा नसो काही निर्णय हे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने लादले जातात व राज्याची इच्छा नसली तरी ती अंमलात आणावी लागतात हा अनुभव जागतिकीकरण व उदारीकरणाच्या संदर्भात भारतीय राज्यव्यवस्थेत नित्याचा झाला आहे.

### ४) संमिश्र अर्थव्यवस्थेच्या प्रतिमानाचे विसर्जन:

जागतिकीकरण व उदारीकरण या तत्वाचा स्वीकार म्हणजे एका परीने मिश्र अर्थव्यवस्थेच्या प्रतिमानाचे विसर्जनच होते. १९५२ पासून १९९१ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था ही या प्रतिमानाच्या आधारे कार्यन्वीत होती. महत्वाची व मोठी उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीची होती तर कमी महत्वाची उद्योगधंदे खाजगी मालकीकरीता मूक्त होती. संमिश्र अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून ४० वर्षाच्या काळात देशभर पायाभूत सुविधांचे जाळे उभारण्यात आले. देशास अन्नधान्य, तंत्रज्ञान व दळणवळणाच्या साधनांमध्ये स्वयंपूर्ण बनवण्या इतपत सार्वजनिक क्षेत्राने आपले योगदान दिले. सार्वजनिक क्षेत्राने निर्माण केलेल्या या पायाभूत सूविधांवर विकासाची खाजगी

इमारत उभारण्याची संधी एक प्रकारे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने खाजगी व परकीय, बहुराष्ट्रीय कंपन्यांना उपलब्ध करुन दिली. व १९९१ च्या नंतर सार्वजनिक क्षेत्राची पिछेहाट होत संमिश्र अर्थव्यवस्थेची विसर्जन करण्याची प्रक्रिया गतिमान झालेली दिसते.

**५) निर्गुंतवणूक धोरणास चालना:**

जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रक्रियेत संमिश्र अर्थव्यवस्थेचे प्रतिमान विसर्जित झाले त्याचवेळी भारतात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे निर्गुंतवणूकीकरण करण्याची प्रक्रियाही अधिक वेगवान झाली. या प्रक्रियेचा वेग एवढा अधिक आहे की सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी या धोरणांना पूर्वत्वास नेण्यात ते कोणतीही कसर सोडत नाहीत. म्हणजे जागतिकीकरण उदारीकरण या धोरणास काँग्रेस सरकारने भारताच्या अर्थव्यवस्थेची दार खूली केली. त्यांच्यानंतर सत्तेवर आलेल्या भाजपा सरकारने त्यावेळी या धोरणास विरोध केला असला तरी सत्ताधारी झाल्यानंतर मात्र तीच प्रक्रिया अधिक वेगाने पूढे नेलेली दिसते. अटलबिहारी वाजपेयी सरकारमध्ये तर याकरीता एक स्वतंत्र मंत्रालय 'निर्गुंतवणूक मंत्रालय' स्थापन करण्यात आले होते. विद्यमान सरकारमध्ये ही हे मंत्रालय पूर्ण कार्यक्षमतेने कार्य करतांना दिसते आहे. सारांश, जागतिकीकरण पूर्व अवस्थेत सरकार अधिकाधिक सार्वजनिक उद्योगात गुंतवणूक करण्यासाठी कटिबद्ध असलेले, प्रयत्नशिल असलेले पहावयास मिळत होते. जागतिकीकरणानंतरच्या काळात मात्र सरकार निर्गुंतवणूक करण्यात अधिक कार्यक्षमता दाखवताना दिसते आहे.

**६) सामाजिक न्याय योजनांना मूरड:**

भारतीय संविधानाने सामाजिक राजनैतिक व आर्थिक अशा त्रिस्तरीय न्यायाचे अभिवचन दिले आहे. भारतात सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्यायावर आधारित समाज रचना निर्माण करण्यासाठी शासनाने बांधिल असणे अपेक्षित आहे. त्याकरीता भारतीय संविधानाच्या तिसऱ्या व चौथ्या भागात म्हणजे संविधानाच्या, मूलभूत संरचनेत त्या करीता आवश्यक तरतुदी ही करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे भारतीय अर्थसंकल्पामध्ये सामाजिक व आर्थिक न्यायाची प्रस्थापना होण्याकरीता खास निधी राखुन ठेवला जात असे. त्यासाठी विशेष योजनांची, घटनात्मक व कायदेशीर संरक्षणाची व्यवस्थाही प्रभावीपणे कार्यन्वीत केली जात असे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र सामाजिक आर्थिक न्याय यासारख्या तत्व व मूल्यांना कोणतेही स्थान नाही. स्पर्धा हे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेच्या स्वीकाराबरोबर भारतीय राज्यानेही सामाजिक, आर्थिक न्यायाच्या नावास मूरड घातलेली दिसते. अर्थसंकल्पातील सामाजिक न्याय खात्याची रक्कम इतरत्र वळवणे, शिष्यवृत्ती सारख्या योजनांवरचे अनुदान केंद्रसरकारने काढून घेणे यासारख्या गोष्टींमधून, धोरणामधून याचा प्रत्यय येतो.

**७) राज्यकांचे वाढते महत्व:**

जागतिकीकरण पूर्व अवस्थेत राष्ट्र-राज्य व्यवस्था ही जागतिक राजकारणातील महत्वाचा घटक होता. जागतिकीकरणातील प्रक्रियेने राष्ट्र-राज्य व्यवस्थेच्या प्रभावास मोठ्या प्रमाणात कमी करण्याचे काम केले. आज जागतिक राजकारणाचा विचार केला तर जागतिक राजकारणास निर्धारीत करण्याचे, त्यास दिशा देण्याचे वा प्रभावित करण्याचे कार्य कोणतेही राष्ट्र राज्य करताना दिसत नाही. अगदी अमेरिका-रशिया सारख्या महासत्ताक राज्य व्यवस्था ही जागतिक राजकारणास संपूर्वतः वळण देण्याची क्षमता हरवून बसल्या आहेत. कारण जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जगाला प्रभावित करण्याची क्षमता राज्य-राष्ट्र व्यवस्थेकडून राज्यकांकडे हस्तांतरीत झाली आहे. राज्यके म्हणजे राज्य बाह्य संघटना, संस्था वा व्यवस्था होत. आंतरराष्ट्रीय

नाणेनिधी जागतिक व्यापार संघटना जागतिक बँक या तीन राज्यकांचा जरी आपण संदर्भ घेतला तर आजचे जागतिक राजकारणाचे निर्धारिन व संचलन हे याच्या अर्थाने या तीन राज्यकांच्या संघटनाकडे आहे हे स्पष्टपणे दिसते. भारतीय राज्यावर ही या राज्यकांचा मोठा प्रभाव पडलेला आहे हे स्पष्टपणे दिसते. भारतीय राज्याच्या धोरण निर्धरणात राज्यकांचा वाढता प्रभाव-वाढता हस्तक्षेप हे जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवरील भारतीय राज्यव्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्ट्ये मानावे लागेल.

### ८) सामाजिक चळवळींचा ऱ्हास व स्वयंसेवी संस्थाचे वाढते महत्व:

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवरील भारतीय राज्यव्यवस्थेतील हा एक महत्वपूर्ण बदल मानावा लागेल. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील पहिली चार दशके हे भारतीय समाज घडवण्या सामाजिक चळवळींचे योगदान अत्यंत महत्वाचे होते. समाजिक, आर्थिक व राजकीय चळवळींनी भारतीय राजकीय व्यवस्थेचे अवकाश समृद्ध करण्यात असाधारण योगदान दिलेले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर मात्र भारतीय समाज जीवनातून राजकीय जीवनातून, सामाजिक चळवळींची पिछेहाट होत गेली व त्याजागी स्वयंसेवी संस्थाची प्रस्थापना झाली. सामाजिक चळवळी या विचारप्रणाली, मूल्ये यांना बांधिल राहून आपल्या आंदोलनाची वाटचाल करत. मात्र जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने विचारप्रणाली, मूल्या या तत्वांना नाकारुन समस्याप्रधान घटकांना प्राधान्य दिले व एका-एका समस्यांचे निराकरण करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांना नाचॅरीटी स्वरुपात विकसित केले. त्यामुळे त्यांचे सामाजिक चळवळींसारखे संघटन ही उभे राहु शकले नाही व त्या राज्याच्या, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मार्गामध्ये अडथळाही ठरु शकल्या नाहीत. एड्स सारख्या, विस्थापनाचे प्रश्न या सारख्या कार्य करणाऱ्या स्वतंत्र स्वयंसेवी संख्या आहेत. पर्यावरणाच्या प्रश्नावर कार्य करणाऱ्या संस्था, बालकांच्या हक्कांवर कार्य करणाऱ्या संस्था, देहविक्रय करणाऱ्या महिलांच्या प्रश्नावर कार्य करणाच्या स्वयंसेवी संस्था या केवळ चैरीटी करु शकतात. आंदोलन, सामाजिक परिवर्तन यासारख्या बाबी त्यांच्या गावी नसतात. सारांश, सामाजिक चळवळींना पायबंद घालण्यासाठी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्वयंसेवी संस्थांची चॅरीटी स्वप्रयत्नाने जन्माला घातलेली आहे असे आपणास दिसते.

### १०) अलिप्ततावादास सोडचिठ्ठी व अमेरिका धार्जिणी भूमिका:

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी विश्वरचना द्विधृवी स्वरुपात अस्तित्वात आलेली होती. जग अमेरिका व सोव्हिएट रशिया या दोन महासत्तांच्या नेतृत्वाखाली एकमेकांच्या विरोधात दोन गटांमध्ये विभागले होते. १९४५ ते १९९० हा काळ या दोन महासत्ताक राष्ट्रांच्या संघर्षाचा, शीतयूद्धाचा काळ होता. १९४५ ते १९५० या कालखंडात आशिया व आफ्रिका खंडातील बहुतांशी राष्ट्रे पाश्चात्यांच्या साम्राज्यवादातून मुक्त होवून स्वतंत्र झाली होती. स्वतंत्र झालेल्या या राष्ट्रांनी आपल्या छत्र छायेखाली यावे याकरीता या दोन्ही महासत्ताक राष्ट्रांमध्ये रस्सीखेच होत होती. अशा परिस्थितीत भारताचे प्रथम प्रधानमंत्री प. जवाहरलाल नेहरु यांनी अलिप्ततावादी चळवळीला जन्म देवून गटनिरपेक्ष आंतरराष्ट्रीय राजकारणास चालना दिली. हे तत्व भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाचा मूलभूत घटक मानले. परंतु जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारताचा कल आता अमेरिका धार्जिणा झालेला दिसतो. १९७० च्या दशकात विशेषतः इंदिरा गांधीच्या काळात भारत रशियाच्या बाजुने थोडा झूकलेला दिसत असे. १९९१ नंतर मात्र भारत अमेरिकेच्या दिशेने अधिक झूकलेला दिसतो आहे. सारांश, जागतिकीकरणच्या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र धोरण ही प्रभावित झालेली दिसते.

## १.५ सारांश

एकंदरीत भारतीय राजकीय व्यवस्था स्वातंत्र्योत्तर काळात विकसनशील प्रक्रियेतून प्रवास करताना दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात स्वातंत्र्याबरोबर फाळणीने निर्माण केलेल प्रश्न, संस्थानिकांच्या विलीनीकरणाचा प्रश्न, सर्वप्रकारच्या प्रतिकुल परिस्थितीच्या उपस्थित सार्वत्रिक निवडणूकांचा प्रयोग, भारतीय संविधान निर्मितीचे शिवधनुष्य, आर्थिक धार्मिक, जातील दंगली अशा सर्व घटकांना सामोरे जात भारताने पहिल्या दोन दशकात संसदीय शासन पद्धतीचे संकेत प्रस्थापित केले. मधल्या काळात आणीबाणीच्या संकटाने संसदीय लोकशाहीवर काही काळ काळे ढग दाटून आले तरी आम्ही 'भारताचे लोक' ही संविधानाची हाक सर्वसामान्य जनतेत प्रेरणा देऊन गेली व त्यांनी हे दुसरे स्वातंत्र्य ही अधिक सकस पद्धतीने पचविले. जगानेही भारतात संसदीय लोकशाही रुजली आहे असे प्रशस्तीपत्र बहाल केले. १९९१ नंतरच्या काळात भारताने जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगी करणाच्या प्रक्रियांना भारतीय राजकीय व्यवस्थेची दार खूली केली. जगभरात सर्वकष प्रभाव पाडणाऱ्या या प्रक्रियेने भारतीय राज्य व्यवस्थेवर ही सर्वकष प्रभाव पाडला व तो प्रभाव अद्यापही अधिक खोलवर व व्यापक पातळीवर विस्तारतो आहेच. या पार्श्वभूमीवर भारतीय राज्याच्या स्वरूपा मध्ये ही मोठे बदल घडून येताना अनुभवास येत आहेत. यातुन भारतीय राज्यव्यवस्था कोणत्या दिशेने व कोढे जाऊन पोहचेल हे येणारा काळच सांगेल या निष्कर्षप्रत आपण येतो.

## १.६ आपली प्रगती तपासा

प्र.१ नेहरु कालखंडातील भारतीय राज्याच्या स्वरुपाची चर्चा करा.

प्र.२ भारतातील राष्ट्रीय आणीबाणी कालखंडावर निबंध लिहा.

प्र.३ जागतिकीकरण व उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय राज्याच्या बदलत्या स्वरुपांची चर्चा करा.

**टिपा लिहा.**

१) लोकानुनयाचा काळ

२) नेहरु काळ

३) राष्ट्रीय आणीबाणी

## संदर्भ सुची

१) बंग के. आर, भारतीय प्रशान व संविधानात्मक प्रक्रिया, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद २०११

२) भोळे भा. ल. 'भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण', पिंपळापूरे पब्लीकेशन्स, नागपूर २००३

३) कुलकर्णी बी. वाय, 'भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया' एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद २०१३

४) पाटिल पी. बी. 'भारतीय शासन व राजकारण' फडके प्रकाशन, कोल्हापूर २०१२.

५) देशपांडे श्रीकांत, 'भारताचे शासन आणि राजकारण', श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, २००४

६) जैन अशोक, 'भारतीय राजकीय व्यवस्था' , शेठ पब्लीकेशन्स, मुंबई २००३.

७) बकाणे छाया, 'भारतीय राजकीय व्यवस्था आणि राजकीय प्रक्रिया' विद्या प्रकाशन, नागपूर २०१३

८) वराडकर द. ध., 'भारतातील घटनात्मक आणि राजकीय प्रक्रिया' , निराली प्रकाशन, पूणे २०१३.

*****

# २

# पक्षपद्धती

**घटक रचना**

२.१ उद्दिष्ट्ये

२.२ भारतातील राजकीय पक्षपद्धतीचा उगम

२.३ भारतीय राजकीय पक्षपद्धतीचा विकास

२.४ प्रादेशिक राजकीय पक्ष

२.५ भारतातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष

२.६ आघाडीचे राजकारण व आघाडी सरकार

२.७ भारतातील निवडणूक प्रक्रिया व निवडणूक वर्तन

२.८ १९९१ नंतरची निवडणुकीतील कामगिरी

२.९ सारांश

२.१० आपण काम शिकलो ?

२.११ संदर्भ सूची

## २.१ उद्दिष्ट्ये

लोकशाही शासनव्यवस्थेत निवडणूक प्रक्रिया व राजकीय पक्षपद्धती यांनी अतिशय महत्वाचे स्थान दिले जाते. लोकशाही शासनव्यवस्थेतील शांततेच्या मार्गाने सत्तापरिवर्तन घडवून आणण्यात राजकीय पक्ष व निवडणूक प्रक्रियेचा महत्वपूर्व सहभाग असतो. त्यामुळेच राजकीय पक्षांना समुद्रातील लाटांची उपमा दिली जाते. समुद्रातील लाटा ज्याप्रमाणे समुद्रातील पाणी जिवंत ठेवण्याचे कार्य पार पाडतात त्याप्रमाणेच राजकीय पक्ष ही लोकशाहीत लोकमत सजग ठेवण्याचे कार्य पार पाडत असतात. निवडणूक प्रक्रियेच्या माध्यमातून हे सजग लोकमत राज्यकर्त्यांना अंकुश ठेवण्याचे कार्य पार पाडते. त्यामुळे निवडणुकांना जनतेचे सार्वभौमत्व व्यक्त करण्याचे महत्वाचे माध्यम मानले जाते. भारतीय राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्ष व निवडणूक प्रक्रिया या दोहोंना ही संविधानिक प्रक्रियेमध्ये अंतर्भूत कवण्यात आल्यामुळे त्यास एक प्रकारे स्वायत्तता प्राप्त झाली आहे. भारतीय नागरिकांना भारतीय संविधानाने जी मूलभूत स्वातंत्र्य बहाल केली आहेत. त्यात संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य भारतीय नागरिकांना प्रदान करण्यात आले आहे. त्या स्वातंत्र्याचाच आधार राजकीय स्थापनेच्या मागेसुद्धा असतो. निवडणुक आयोगास भारतीय संविधानाने संवैधानिक दर्जा बहाल करुन त्यास प्रतिष्ठा व पवित्र्य दिले आहे. यादृष्टीने भारतीय राजकीय प्रक्रियेतील या दोन्ही घटकांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.

## २.२ भारतीय राजकीय पक्ष पद्धतीचा उगम

भारतीय राजकीय पक्षपद्धतीचा उगम प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर कालखंडात झाला असून त्याची मांडणी पुढील मुद्यांच्या आधारे प्रामुख्याने करता येईल.

## १) स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय पक्षः

राजकीय पक्षांच्या विकासाच्या दृष्टीने स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतात पोषक परिस्थिती अस्तित्वात नव्हती. त्यामुळे पाश्चात्य दृष्टीने त्यास राजकीय पक्ष असे संबोधन वापरले जाते तशी राजकीय पक्षांची निर्मिती वा राजकीयपक्ष पद्धती स्वातंत्र्यपूर्व काळात विकसित होऊ शकली नाही. विशिष्ट राजकीय तत्वांच्या बंधनात राहून मतपेटीच्याद्वारा शासनयंत्रणेवर ताबा मिळवून या तत्वांना प्रत्यक्ष कार्यन्वीत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीच्या समूहाला पाश्चात्य देशांमध्ये राजकीय पक्ष असे संबोधले जाते. या अर्थाने तूलना करता भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ला ही राजकीय पक्षाचा दर्जा प्राप्त होऊ शकत नाही. कारण सत्ता प्राप्ती हे कॉंग्रेस चे उद्दीष्ट नव्हते तर स्वातंत्र्यप्राप्ती हे उद्दिष्ट होते. मुस्लिमलीग, हिंदुमहासभा हे राजकीय पक्ष ही विशिष्ट जात-धर्म समूहांचे हितसंबंध सुरक्षित राखण्याकरीता जन्मास आलेले होते. त्यामुळे तेही राजकीय पक्ष या संज्ञेस पात्र ठरु शकत नव्हते. १९३५ च्या कायद्याने संघराज्यात्मक शासनपद्धतीचा स्वीकार करुन १९३७ साली ज्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या त्यावेळी काही पक्षांची स्थापना झाली होती. जष्टीस पार्टी, बंगाल कृषक प्रजा पार्टी, पंजाब यूनियनिष्ट पार्टी, लोकशाही स्वराज्य पक्ष ही यापैकी काही महत्वाची पक्ष होत. परंतु त्यांच्या मर्यादा ही जाती, धर्म, प्रांत यांनी निश्चित केलेल्या होत्या असे दिसते. एकंदरीत स्वातंत्र्यपूर्वकाळात राजकीय पक्ष निर्मितीच्या दृष्टीने पूरेशी पूरक परिस्थिती नव्हती हे निश्चित.

## २) संविधानात्मक तरतुदीः

भारतीय संविधानात राजकीय पक्ष व संघटनांसंबंधीच्या तरतुदी अपरोक्ष स्वरुपात आढळून येतात. भारतीय संविधानच्या कलम १९ अन्वये संघटना स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्याच आधारे राजकीय पक्ष स्थापन होतात. १९५२ च्या निवडणूकीत ज्या राजकीय पक्षांना निदान तीन टक्के मते मिळविता आली अशा राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाने १९५७ च्या निवडणूकांकरीता राजकीय पक्ष म्हणून मान्यता दिली. चिन्हांचे वाटप केले. संविधानाच्या ३२५ व्या कलमाने निवडणूकांचे संचालन, मार्गदर्शन व नियंत्रण करण्याचे कार्य निवडणूक मंडळाकडे सोपविले आहे. त्याचप्रमाणे भारतीय संसद वेळोवेळी कायदा करुन निवडणूक प्रक्रिया व राजकीय पक्षांविषयीची कायदे पारित करतात व त्यातुन राजकीय पक्षांच्या स्थापनेचे व संचलनाचे नियम कार्यन्वीत होतात.

## ३) पक्षनिर्मितीचा कालखंडः

१९४७ साली भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रीय कॉंग्रेसचे विसर्जन केले जावे असी सूचना म. गांधींनी मांडली होती. परंतु प. नेहरु, सरदार पटेल या नेत्यांनी मात्र स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे राजकीय पक्षामध्ये रुपातर करण्याचा निर्णय घेतला. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये अनेक विचार प्रवाहांचे नेते व कार्यकर्ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्देशाने कार्यरत होते. हा विचार व ध्येयांचा संघर्ष येत्या काळात होऊ शकतो यादृष्टीने विचारविनिमय करण्यासाठी १९४८ साली जयपूर येथे कॉंग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात कॉंग्रेसच्या घटनेत दुरुस्ती करण्यात आली. या अधिवेशनात स्पष्टपणे सुचना मांडण्यात आली की, पक्षांतर्गत असलेल्या ज्या संघटनांची स्वतःची स्वतंत्र यंत्रणा, सभासद व कार्यक्रम असतील त्यांनी मुख्य प्रवाहात विलीन तरी व्हावे वा पक्षाचा त्याग करावा असे दोन पर्याय त्यांच्यापुढे ठेवण्यात आले. त्याप्रमाणे जयप्रकाश नारायण व अशोक मेहता यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी गटाने कॉंग्रेस पक्षामधून बाहेर पडून प्रजासमाजवादी पक्षाची १९४८ मध्ये स्थापना केली. आचार्य कृपलानी यांनी कृष्क

मजदूर प्रजा पक्षाची १९५१ मध्ये स्थापना केली. महाराष्ट्रातील बहूजन समाजाच्या बहुसंख्या नेत्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. प. बंगाल मधील डाव्या गटांनी फॉरवर्ड ब्लॉक पक्षाची स्थापना केली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील हिंदुमहासभा, साम्यवादी पक्ष, शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन, मुस्लिमलीग यासारख्या संघटनांनी १९५२ च्या सार्वत्रिक निवडणूकीत राजकीय पक्ष म्हणून सहभाग घेतला. अशा रीतीने स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय पक्ष निर्मितीच्या दृष्टीने पूरक घडामोडी घडून आल्या.

## २.३ भारतीय राजकीय पक्षपद्धतीच्या विकास

भारतीय राजकीय प्रक्रियेत बहुपक्ष पद्धती प्रारंभापासून प्रचलित झाली असली तरी त्याचा विकास विविध टप्प्यातून झालेला दिसतो. त्याची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

### १) एकपक्ष प्रभूत्व पद्धती (१९५२ ते १९६७):

१९५२ ते १९६७ हा कालखंड भारतीय राजकीय पक्ष पद्धती चा एक पक्ष प्रभुत्व पद्धती म्हणून ओळखला जातो. या कालखंडात अनेक राजकीय पक्षांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वर्चस्वास शह देण्याचा प्रयत्न केला परंतु कॉंग्रेस प्रभूत्वास कोणताही राजकीय पक्ष आव्हान उभे करु शकला नाही. त्यामुळे या कालखंडास एक पक्ष प्रभूत्व पद्धतीचा कालखंड असे म्हटले जाते.

### २) केंद्रिय पातळीवरील एक पक्ष प्रभूत्व पद्धती (१९६७ ते १९७७):

१९६७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत प्रथमच अनेक घटक राज्यांमध्ये कॉंग्रेस पक्षांच्या प्रभूत्वास शह मिळाला. नऊ घटक राज्यांमध्ये कॉंग्रेसतेर पक्षांची सरकारे अस्तित्वात आली. त्यामुळे घटकराज्यपातळीवर कॉंग्रेस प्रभुत्वास या कालखंडात शह बसला मात्र १९७७ पर्यंत केंद्रात मात्र कॉंग्रेसचे एकपक्षीय प्रभुत्व कायम राहिले.

### ३) कॉंग्रेस समोरील आव्हांनाचा कालखंड (१९७७ - १९८०):

१९७५ साली इंदिरा गांधींनी राष्ट्रीय आणीबाणी घोषित करुन देशभर एक प्रकारे हुकुमशाही पद्धतीने राज्यकारभार केला. संजय गांधी व त्यांच्या सहकाऱ्यांनी १९७५ ते १९७७ या कालखंडात ज्या पद्धतीने दडपशाही अवलंबिली. विरोधी पक्ष व नेत्यांची मुस्कटदाबी केली, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे निलंबन केले. प्रसारमाध्यमे यांची मूस्कटदाबी केली त्यामुळे निर्माण झालेल्या असंतोषातून १९७७ साली झालेल्या निवडणूकात इंदिरा गांधी व राष्ट्रीय कॉंग्रेसचा पराभव झाला व जनता पक्ष हा नवा राजकीय पक्ष केंद्रामध्ये सत्तेत आला. त्यामुळे १९७७ ते १९८० हा कालखंड जनता पक्षाच्या उगमाचा व कॉंग्रेससाठी आव्हानांचा कालखंड ठरला.

### ४) एक पक्ष प्रभुत्व पद्धतीची फेरस्थापना (१९८० ते १९८९):

जनता पक्षातील फाटाफूटीच्या राजकारणाने बहुमतात असणारे जनता पक्षाचे सरकार १९८० साली गडगडले. १९८० साली परत मध्यावधी सार्वत्रिक निवडणूका झाल्या. जनता पक्षाच्या भ्रमनिराशातून भारतीय जनतेने परत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसला निवडून दिले. १९८० ते १९८९ केंद्रामध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे एक पक्षप्रभूत्व स्थापित झालेले दिसते.

### ५) बहुपक्षपद्धती व संमिश्र सरकारे (१९८९ ते २०१४):

१९८९ नंतर भारतीय राजकीय पक्षपद्धतीने एक निर्णायक वळण घेतलेले दिसते. केंद्र सरकार मध्ये कोणत्याही राजकीय पक्षास स्वबळावर सत्ता मिळणे कठिण झाले व आघाडी सरकारशिवाय सरकार स्थापक करणे अशक्य होऊन बसले. या कालखंडात राष्ट्रीय व घटकराज्य पातळीवर अनेक आघाड्या निर्माण झालेल्या दिसतात. राष्ट्रीय लोकशाही आघाडी, संयुक्त पूरोगामी आघाडी, तिसरी आघाडी, लेफ्टफ्रंट, इत्यादी याचेच उदाहरण होत.

### ६) एक पक्ष प्रभूत्व पद्धतीची चाहूल (२०१४ ते २०१९):

२०१४ साली भाजपाला सार्वत्रिक निवडणूकांमध्ये स्वबळावर सत्ता स्थापित करता आली. भाजपाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवली होती. मात्र भाजपाने २८२ जागा मिळवून बहुमत प्राप्त केले. १९८४ नंतर भाजपा हा स्वबळावर सत्ता स्थापित करणारा प्रथम पक्ष ठरला. २०१४ ते २०१९ मध्ये झालेल्या अनेक घटकराज्यांमध्ये भाजपाने सत्ता प्राप्त केली. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणूकीत ही ३०३ जागा घेवून या पक्षाने आपले निर्विवाद बहुमत प्राप्त केले. काँग्रेस व इतर विरोधी पक्षाची वाताहात बघता परत एक पक्षपद्धती प्रभूत्व निर्माण झालेले दिसते.

## २.४ प्रादेशिक राजकीय पक्ष

प्रादेशिक राजकीय पक्षांचा प्रभाव हा भारतीय राजकीय प्रक्रियेतील एक अविभाज्य घटक म्हणून पूढे आलेला दिसतो आहे. आज देशातील प्रत्येक घटक राज्यात किमान एक तरी प्रादेशिक पक्ष आपला प्रभाव राखून आहे. घटकराज्यातील सत्ताधारी राजकीय पक्षांची वर्गवारी केली तर प्रादेशिक राजकीय पक्षांकडेच सर्वाधिक राज्यांची सत्ता आहे. काही घटकराज्यांमध्ये तर १९७७ नंतर आजतागायत राष्ट्रीय पक्षांचा शिरकाव करणे ही अशक्य होऊन बनले आहे. तमिळनाडू हे घटकराज्य याचे आदर्श उदाहरण म्हणाले लागेल. भारतात पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीपासून १७ व्या सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत सहभागी राजकीय पक्षांची संख्या काढली तर ती दोनशेच्या आसपास होते. अगदी पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत ती छोटा नागपूर आणि संथाळ परगणा पक्ष अकाली दल, चेलूना कन्नडनाडू, गारो नॅशनल कौन्सिल, शेतकरी कामगार पक्ष, नॅशनल कॉन्फरन्स असे मोजके राजकीय पक्ष कार्यरत होते. १९५२ ते १९८४ पर्यंतच्या काळात प्रादेशिक पक्षांचा राजकीय प्रभाव बऱ्याच प्रमाणात मर्यादित होता. या कालखंडात मोजके परंतु राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणारे राजकीय पक्ष सक्रिय होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, जनसंघ व नंतरच्या काळातील भाजपा, समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष, भारतीय कम्युनिष्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष, स्वतंत्र पक्ष, मुस्लिमलीग, जनता दल, जनता पक्ष असे राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणारे पक्ष १९८५ नंतरच्या काळात एकतर लोप पावले वा एखाद-दुसऱ्या राज्यापूरते मर्यादित झाले. उदा. स्वतंत्र पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष हे लोप पावले तर कम्युनिस्ट पक्ष हे बंगाल, केरळ यासारख्या राज्यापूरतेच मर्यादित झाले. समाजवादी पक्ष उत्तरप्रदेशापूरता सिमित झाला तर जनता दलाचे अनेक तुकडे बिहार, कर्नाटक राज्यांमध्येच स्थिरावले. राष्ट्रीय पक्षांच्या अपयशातून प्रादेशिक पक्षांना विस्तारण्याची एक संधी मिळाली व त्यांनी घटक राज्यपातळी वरील राजकारणात आघाडी घेत अखिल भारतीय राजकारणावर ही प्रभाव पाडण्यास सूरवात केली. त्यातून केंद्रिय पातळीवरील  राजकारणातही प्रादेशिक राजकीय पक्षांच्या संयुक्त आघाड्या कार्यरत झाल्या. यासर्व पार्श्वभूमीवर प्रादेशिक पक्षांच्या उदयाची पार्श्वभूमी, त्यांची विचारसरणी वा वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**प्रादेशिक पक्षांचा अर्थः**

प्रादेशिक राजकीय पक्षाचा अर्थ स्पष्ट करताना ह्यासाठी जे निकष निवडणूक आयोगाने घोषित केले आहेत. त्यातून प्रादेशिक पक्ष कोणत्या राजकीय पक्षास म्हणावे हे स्पष्ट होते. ते निकष पूढील प्रमाणे होत.

१. तो राजकीय पक्ष संबधित घटकराज्यात किमान पाच वर्ष राजकीय कार्य करत असलेला असावा.

२. घटकराज्याच्या विधानसभेत दर ३० सभासदांमागे त्या राजकीय पक्षाचा एक सभासद असावा.

३. त्या घटक राज्यातून लोकसभेवर निवडून दिलेल्या २५ सदस्यांमागे एक सभासद त्या राजकीय पक्षाचा असावा.

४. विधानसभा व लोकसभेच्या निवडणूकीत त्या राजकीय पक्षाच्या उमेदवारास झालेल्या एकूण मतदानापैकी किमान ६ टक्के मते मिळणे आवश्यक आहे.

साधारणतः वरील निकषपूर्ण करणाऱ्या राजकीय पक्षांना निवडणूक आयोग प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देतो. आज प्रत्येक घटक राज्यात दोन पेक्षा अधिक मान्यता प्राप्त प्रादेशिक राजकीय पक्ष कार्यरत असलेले दिसतात. मात्र वरील निकष पूर्व न करणाऱ्या प्रादेशिक पक्षांची संख्या मोठी आहे. तरीही प्रादेशिक राजकारणात त्या बिनामान्यताप्राप्त प्रादेशिक पक्षांची भूमिका ही महत्वाची ठरताना दिसते.

**प्रादेशिक राजकीय पक्षांची वैशिष्ट्येः-**

प्रादेशिक राजकीय पक्षांचा अर्थ व विचारधारा समजून घेण्याकरीता प्रादेशिक पक्षांची काही मूलभूत वैशिष्ट्ये पूढील प्रमाणे मांडता येतील.

**१) मर्यादित हेतूः**

देशातील सर्वच प्रादेशिक पक्ष हे अतिशय संकूचित हेतू घेऊन स्थापन झालेले दिसतात. काही प्रादेशिक पक्ष तर प्रदेशावादाच्या पूढे जाऊन उपप्रादेशिकतेच्या भावनेतून ही जन्माला आले असतात. जे राज्यांतर्गत स्वतंत्र राज्याच्या मागणीचे आंदोलन पूढे रेटत असतात. आंध्रप्रदेशातील तेलंगणा पक्ष, झारखंड मुक्ती मोर्चा हे तत्कालिन बिहार, मधील राजकीय पक्ष याचेच निदर्शक होते. काही वेळा तर प्रादेशिक पक्षातून असंतुष्ट गट बाहेर पडून सत्ता प्राप्तीसाठी एकत्र आलेले असतात. तेलगू देशमचा चंद्राबाबूंचा गट हा त्याचेच एक उदाहरण होय. भाषा, प्रदेश, उपप्रदेशवाद, सत्ताप्राप्ती यासारखे संकूचित गट प्रादेशिक राजकीय पक्षांच्या स्थापनेमागील मर्यादीत हेतू स्पष्ट करतात.

**प्रादेशिक राजकीय पक्षाच्या उदयाची कारणेः**

भारतीय राजकारणात प्रादेशिक राजकीय पक्ष पद्धती उदयास येण्याची कारणे प्रामुख्याने पूढील प्रमाणे मांडता येतील.

**१) भाषिक विविधता:**

स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणात भाषा हा घटक सर्वाधिक प्रभावी घटक म्हणून कार्यरत झालेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळातील दिर्घकाळ व जहाल पद्धतीने चालणारा लढा हा प्रामुख्याने भाषिक अस्मितेतूनच जन्मास आला. भाषिक प्रांतरचनेकरीता तेलगू भाषिकांचे आंदोलन ही त्याची सूरवात होती. शेवट मात्र अद्यापही झालेला दिसत नाही. संविधान सभेने हिंदी भाषेस राष्ट्रीय भाषेचा दर्जा देण्याचा जो प्रयत्न केला तो प्रयत्न ही त्यांना दक्षिण भारतीय भाषिकांच्या दबावामुळे लांबणीवर टाकावा लागला होता. पूढे भारत सरकारने राष्ट्रीय भाषेविषयी संविधानिक तरतुदींना अनुसरुन धोरण ठरविण्याच्या प्रयत्न केला तेव्हा दक्षिण भारतात मोठे आंदोलन उभे राहिले. या आंदोलनातूनच द्रमुक - अण्णाद्रमुक, तेलगु देशम यासारखे प्रादेशिक पक्ष जन्मास आले. महाराष्ट्रात ही मराठी भाषा हा घटक शिवसेना महाराष्ट्र नवनिर्माण सेना यासारख्या राजकीय पक्षाचा उगम बिंदु मानला जातो. प्रत्येक राज्यात भाषिक अस्मिता या क्रियाशील दिसतात ज्या प्रादेशिक पक्षांच्या उदयास पूरक ठरताना त्यांना कार्यन्वीत ही करतात.

**२) प्रादेशिक असमतोल:**

भारत हा एक खंडप्राय देश आहे. भाषिक, धार्मिक व भौगोलिक विविधता प्रचंड प्रमाणात भारतात सामावलेली ही विविधताच प्रादेशिक असमतोलाचे एक कारण ठरली व प्रादेशिक असमतोल प्रादेशिक राजकीय पक्षांच्या निर्मितीस पाठबळ देणारा घटक ठरलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या पर्यंत सहज विकास पोहचेल अशी एक सर्वसामान्य जनतेची अपेक्षा होती. वास्तवात मात्र नैसर्गिक साधनसंपत्ती, राजकीय नेतृत्वाची भूमिका, त्या-त्या घटकराज्यांचा विकास धोरणांना मिळणारा प्रतिसाद, घटक राज्यातील जनतेची क्रियाशीलता, पायाभूत सुविधांची वाणवा यासारख्या घटकांनी विकासाचा असमतोल मोठ्या प्रमाणात निर्माण झाला. विकासाची ही असमानता विविध घटकराज्यांमध्ये असंतोष निर्माण करण्यास सहाय्यक ठरली. देशात विकसित राज्य व अविकसित राज्य ही वर्गवारी स्पष्टपणे प्रत्ययास येऊ लागली. अविकसित राज्यांमध्ये आमच्यावर जाणीवपूर्वक अन्याय केला जातो आहे अशी भावना वाढीस लागली तर विकसित राज्यांमध्ये आम्ही या मागासलेल्या राज्यांचा भार का वहावा अशी प्रबळ भावना पूढे आली त्यामुळे विकसित व अविकसित अशा दोन्ही राज्यांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाच्या भावनेने प्रादेशिक राजकीय पक्षांच्या निर्मितीस गती दिली असे दिसते.

**३) प्रदेशवाद:**

राष्ट्रवादापेक्षा प्रदेशवाद जेव्हा प्रभावी होतो तेव्हा प्रादेशिक राजकीय पक्षांचा उगम होतो स्वाभाविकच आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सुरवातीच्या दोन दशकात सर्वसामान्य जनतेमध्ये राष्ट्रवादाची भावना प्रबळ होती. राष्ट्रवादाच्या भावनेचा प्रभाव जसजसा ओसरता गेला तसा तसा प्रदेशवादाचा प्रबाव जनसामान्यांवर गारुड घालु लागला असे दिसते. आपली भाषा, आपली संस्कृती, आपला इतिहास हा श्रेष्ठ आहे आणि तो टीकला पाहिजे. परप्रांतीय त्यावर आक्रमण करत आहेत. केंद्र सरकार आपल्या भाषेची, आपल्या संस्कृतीची गळचेपी करत आहे ही भावना राज्यपातळीवर उत्तरोत्तर वाढत गेली. त्या प्रमाणात प्रादेशिक पक्षांची संख्या ही वाढत गेली. १९६० च्या दशकात हिंदी भाषेमुळे आपली संस्कृती धोक्यात आहे या भयातून दक्षिण भारतातली राज्यांमध्ये प्रदेशवादाचा उगम झाला व तेथील जनतेचा लढा प्रादेशिक पक्षांनी घेतला. १९७० च्या दशकात ईशान्य व पूर्व भारतात बांग्लादेशी घूसखोर व परप्रांतीय नागरीकांचा वाढता प्रभाव प्रादेशिकतेचे एक प्रमुख कारण ठरले. मध्य भारतात १९८० च्या

दशकात विकासाचे विषम वाटप प्रश्न प्रादेशिकतेचे कारण ठरले तर उत्तर भारतात मागासलेपणा हा प्रादेशिकतेचे कारण ठरत अनेक प्रादेशिक पक्षांना उदयास पोषक ठरलेला दिसतो. त्यातून प्रादेशिक पक्षांची निर्मिती होण्यास पूरक पार्श्वभूमी निर्माण झालेली दिसते.

**४) स्वायत्तेचेची मागणी:**

सध्या अस्तित्वात असलेली मोठी राज्ये ही लोकशाही या आदारभूत व मान्य सिद्धांतानाच नाकारुन केवळ राजकीय प्रभुत्व टिकविल्यासाठी निर्माण झाली आहेत. अशा पद्धतीची भावना सर्वसामान्यांमध्ये शब्दांमध्ये निर्माण झालेली दिसते. त्यामुळे राज्यपातळीवरच उप प्रादेशिकतेच्या भावना प्रबळ होत असलेल्या दिसतात. त्यातून दोन पद्धतीने प्रादेशिक पक्षांचा उदय होताना दिसतो आहे. एका बाजूने राज्यांना स्वायत्त दर्जा व विशेष संरक्षण मिळणे याकरीता मागणी करणारांचा गट प्रादेशिक पक्षाचे स्वरुप अल्पावधितच प्राप्त करतो आहे तर दुसऱ्या बाजूने मोठ्या राज्याचे छोटी-छोटी स्वतंत्र राज्ये निर्माण व्हावीत यासाठी ही उपप्रादेशिक अट आपला प्रभाव वाढवत नेऊन प्रादेशिक पक्षात रुपातरीत होताना दिसत आहेत. त्यात ते यशस्वी होताना दिसतात. आंध्र प्रदेशातील तलंगणा राष्ट्रीय पक्ष व बिहार मधील झारखंड मुक्ति मोर्चाचे यश हे याचेच उत्तम उदाहरण होय.

**५) राष्ट्रीय पक्षांमधील गट व मतभेद:**

राष्ट्रीय पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात गटबाजीला उत आलेला दिसतो. राष्ट्रीय पक्षात कार्यरत असणारे अनेक नेते आपआपल्या प्रदेशामध्ये आपले सत्तास्थान अधिक बळकट करण्याच्या प्रयत्नात असतात. त्यास केंद्रिय नेतृत्वाकडून आव्हान मिळू लागताच ते पक्षातून बाहेर पडतात व स्वतः चा स्वतंत्र गट निर्माण करतात. तो गट अर्थातच प्रादेशिक राजकीय पक्षाचे स्वरुप धारण करतो. पं. बंगाल मधील तृणमूल काँग्रेस, ओरीसातील बिजु जनता दल, सिमाध्रमधील वाय.एस.आर. काँग्रेस ही याची उत्तम उदाहरणे होत.

**६) प्रभुत्वशाली पक्ष पद्धतीस पर्याय:**

स्वातंत्र्योत्तर काळात दिर्घकाळ भारतात काँग्रेस या एकमेव राष्ट्रीय पक्षाचे प्रभूत्व प्रस्तापित झालेले होते. राष्ट्रीय राजकारणात काँग्रेस पक्षास पर्याय ठरेल असा एक ही विरोधी पक्ष अस्तित्वात नव्हता. तेव्हा या राष्ट्रीय पक्षात पर्याय त्या-त्या घटक राज्यातील प्रादेशिक पक्षांनी निर्माण केले व जनतेनेही त्यास मान्यता देत प्रादेशिक पक्षांची शक्ती अधिक वृद्धींगत केलेली दिसते.

सारांश, ज्यावेळी राज्यस्तरावर कोणताच राष्ट्रीय पक्ष पर्याय देऊ शकत नाही त्यावेळी स्थानिक पर्याय निर्माण होण्यास वाव मिळतो. असा स्थानिक पर्याय बहुधा प्रादेशिक रुपाने उभा राहतो हा भारतीय पक्षपद्धतीच्या विकासातील अनुभव सिद्ध करतो. महाराष्ट्रातील शिवसेनेचा उगम, आंध्र प्रदेशातील तेलगु देशम चा उगम, उत्तर प्रदेशातील तर समाजवादी पक्षाचा प्रभाव ही याचीच काही उदाहरणे होत.

**७) काँग्रेसची मुलभूत प्रश्नांकडे दूर्लक्ष करण्याची भूमिका:**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा पक्ष मूलतः राष्ट्रीय सत्तेच्या आंदोलनाचे स्वातंत्र्योत्तर काळातील एक रुप होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात काँग्रेसने दिलेल्या योगदानामुळे भारतीय जनतेने काँग्रेसवर सलग विश्वास राखला परंतु सतत सत्तेत राहिल्याने जे दोष पक्षांमध्ये निर्माण होतात त्या दोषांची

लागण उत्तरोत्तर काँग्रेस पक्षास वाढत गेली. पर्यायाने काँग्रेस राज्यपातळीवर असणाऱ्या मूलभूत प्रश्नांकेडही दूर्लक्ष करु लागली. या मूलभूत प्रश्नांना राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली पांघरुन घालण्याचा ज्यावेळी प्रयत्न होऊ लागला त्यावेळी प्रादेशिक स्तरावरील प्रश्नांनी आंदोलनाचे स्वरुप धारण करण्यास सुरवात केली. काँग्रेसचे अपयश हे प्रादेशिक राजकीय पक्षांच्या उदयाचे एक प्रमुख कारण ठरले. अकाली दल, आसाम गण परिषद, तेलगू देशम, शिवसेना ही प्रादेशिक पक्ष याचेच एक उदाहरण होय.

## ८) जाती धर्म-भाषा समूहांचे हित जोपासण्यातील अपयशः

स्वातंत्र्योत्तर काळात भारताताली बहुभाषी, बहुधर्मिय, बहु जाती समूहांचे हित जोपासण्यात राष्ट्रीय पक्ष अपयशी ठरले. त्याप्रमाणे प्रादेशिक पक्षांचा उगम सुकर झालेला आपणास दिसतो. स्थानिक स्तरावरील विविध जनसमूह, धर्मसमूह, भाषिक समूह राजकीय पक्षाच्या स्वरुपात संघटित होत गेलेले आपणास दिसतात. राष्ट्रीय पक्ष हे धर्म-जात व भाषा समूहांना नेतृत्व देण्यात अपयशी ठरु लागले. त्याप्रमाणात हे राजकीय पक्ष आपले नाहीत व आपण आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणार्थ सिद्ध झाले पाहिजे, स्वतंत्र संघटन उभारले पाहिजे अशी भावना या समूहांमध्ये बळावली गेली, त्या प्रमाणात प्रादेशिक राजकीय पक्षांची संख्या वाढत गेली.

## ९) इतर कारणेः

केंद्र - राज्य संबंध, प्रादेशिक अस्मिता, अन्यायाची भावना यासारखे समूह घटक प्रादेशिक पक्षांच्या निर्मितीस कारण ठरले परंतु त्याबरोबरीनेच इतर ही अनेक तात्कालिक व स्थानिय कारणे प्रादेशिक राजकीय पक्षांच्या उदयास कारणीभूत होत असलेले दिसतात. प्रादेशिक पक्ष हे देशाच्या व त्या त्या राज्याच्या पक्षीय व निवडणूकीच्या राजकारणाच्या संदर्भात निर्माण होत असतात, हे ही लक्षात घ्यावयास हवे. त्यामुळेच राष्ट्रीय पक्षांचे स्थान परस्पर संबंध, त्यांच्या जनाधारांच्या मर्यादा, स्थानिक जनसमूहातील विविध घटकांच्या आकांक्षा व त्या त्या राज्यातील सत्तावाटपाचा आकृतीबंध यासारख्या कारणांबरोबरच हरिक्रांतीच्या परिणामातून ग्रामीण मध्यमवर्ग व इतर मागासवर्गाचा झालेला उदय, ग्रामीण निशहरी भागात व्यापारी व व्यावसायिक वर्गाचा उदय अशा विविध घटकांची पार्श्वभूमी प्रादेशिक पक्षांच्या उदयास कारणीभूत ठरलेली दिसते.

## भारतातील प्रमुख प्रादेशिक पक्षः

भारतातील प्रमुख प्रादेशिक राजकीय पक्षांची निर्मिती, ध्येय व धोरणे यांची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

## १) द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक):

तामिळनाडू राज्यात द्रमुक व अण्णाद्रमुक हे राजकीय पक्ष प्रभावीपणे कार्यरत असलेले दिसतात. या पक्षांचा उगम तमिळनाडूतील ब्राह्मणेतर चळवळींत आढळतो. ब्राह्मण वर्गाचे सर्व क्षेत्रातील वर्चस्व नष्ट करणे, ब्राम्हणेतर समाजाचा विकास करणे, द्रविडी संस्कृती जोपासणे अशा उद्देशाने. त्या वेळच्या मद्रास राज्यात जस्टीस पार्टीची स्थापना करण्यात आली. १९३५ पर्यंत मद्रास राज्यात जस्टीस पार्टीने आपला प्रभाव निर्माण केला. नंतरच्या काळात राष्ट्रीय सत्तेचा प्रभाव मद्रास राज्यात ही वाढत गेला. जस्टीस पार्टीचा सामाजिक लढ्याचा आशय राजकीय स्तरावर चालविण्याकरीता श्री ई. व्ही रामस्वामी नायकर यांनी द्रविड कळघम या पक्षाची स्थापना केली. मात्र पूढे १९४९ साली रामस्वामी नायकर यांच्याशी बी अण्णादुराई यांच्याशी झालेल्या

मतभेदातुन हा पक्ष फूटला व अण्णा दुराई यांनी द्रविड मुन्नेन कळघमची १९४९ साली स्थापना केली.

**द्रविड मुन्नेन कळघम ची ध्येयधोरणे:**

द्रविड मुन्नेन कळघमची थ्येय-दोरणे प्रामुख्याने पूढील प्रमाणे दिसतात.

१. तमिळ भाषिकांचा विकास करणे.

२. हिंदी भाषेस राष्ट्रभाषेचा दर्जा देण्यास प्रखर विरोध करणे.

३. समाजवादी समाज रचना निर्माण करणे.

४. सामाजिक शोषण व अन्याय यापासून समाजाची मुक्तता करणे.

५. राज्याचे अधिकार व सत्ता बळकट करणे.

६. द्रविड नाडू राज्यासाठी प्रयत्न करणे. सुरवातीच्या काळात द्रमुकची ही एक प्रमुख मागणी होती. तमिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक व केरळ या राज्यांचे मिळून स्वतंत्र द्रविडनाडू हे राष्ट्र निर्माण करणे. मात्र या मागणीची घटनाबाह्यता त्यांच्या लवकरच लक्षात आली. हे स्वप्न प्रत्यक्षात येणारे नाही, व्यवहार्य नाही या जाणीवेतून या पक्षाच्या कार्यक्रमातून ही मागणी आता मागे पडलेली दिसते.

**निवडणूकीतील कामगिरी:**

द्रमूक ने १९५७ च्या निवडणूकीत प्रथम सहभाग घेतला त्यावेळी लोकसभेच्या दोन जागी तर विधानसभेत १५ जागी द्रमुकचे उमेदवार विजयी झाले. १९६२ च्या निवडणूकीत हाच आकडा अनुक्रमे ०७ जागा व ५० जागांपर्यंत पोहचला. १९१७ च्या निवडणूकीत या पक्षास मोठे यश मिळालेले दिसते. १९१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत विधानसभेतील २३५ जागांपैकी १३८ जागा मिळवत त्यांनी सत्ता हस्तगत केली. तर लोकसभेच्या ३९ जागांपैकी २५ जागांवर विजय संपादन करत केंद्रिय स्तरावर ही आपला प्रभाव निर्माण केला. दरम्यानच्या काळात १९६९ साली द्रमुकचे नेते अण्णादुराई यांचे निधन झाले. त्यांच्यानंतर द्रमुक मध्ये असणारे दोन प्रमुख नेते एम. करुणानिधी व एम. जी. रामचंद्रन यांच्यात नेतृत्वाचा संघर्ष झाला. एम. जी. रामचंद्रन यांनी अण्णाद्रमुक या नव्या राजकीय पक्षाची स्थापना केली. १९७६ पर्यंत द्रमुक पक्ष सत्तेत होता. १९७७ च्या निवडणूकीत प्रथम अण्णा द्रमुक पक्षास सत्ता प्राप्त झाली. एम. जी. रामचंद्रन यांच्यानंतर अण्णाद्रमुकचे नेतृत्व जयललिता यांच्याकडे गेले. एम. करुणानिधी व जयललिता या दोन नेत्यांमध्ये १९८० च्या दशकापासून जो सत्ता संघर्ष सुरु झाला तो पूढे जवळ-जवळ २५ रर्ष चालला. तामिळनाडूच्या जनतेनेही या दोन नेत्यांकडे म्हणजे द्रमुक व अण्णाद्रमुक यांच्याकडे आलटुन पालटुन सत्ता देण्याचे धोरण जवळ-जवळ २५ वर्ष कायम ठेवले. एम. करुणानिधी यांच्या मृत्युनंतर त्यांचे पूत्र स्टॅलिन द्रमुखचे प्रमुख झाले आहेत. तर जयललितांच्या मृत्युनंतर त्यांच्या अण्णाद्रमुक मध्ये अनेक गट सक्रिय झालेले दिसतात असे असले तरी अद्यापही तामिळनाडूच्या राजकारणात राष्ट्रीय पक्षांना शिरकाव करता आलेला नाही. द्रमुक-अण्णाद्रमुक नी तमिळनाडु मधील इतर छोट्या प्रादेशिक पक्षांची आघाडी उभी करुन सत्ता आपल्याकडे कशी राहिल याकरिता व्यूहरचना आखलेली दिसते.

## २) तेलगू देशमः

१९८२ साली आंध्रप्रदेशात प्रसिद्ध सिने अभिनेते एन. टी. रामाराव यांनी तेलगू देशम हा राजकीय पक्ष स्थापन केला. आंध्रप्रदेश मधील काँग्रेस राजवटीत वाढलेला भ्रष्टाचार, लाचलूचपत व अकार्यक्षता यांचे निर्मूलन करण्यासाठी हा पक्ष स्थापन करत असल्याचे त्यांनी घोषित केले होते. काँग्रेस राजवटीत कंटाळलेल्या आंध्रप्रदेशामधील जनतेने एन. टी. रामाराव यांच्या तेलगु देशम या पक्षास उत्स्फुर्त पाठींबा दिला. ५ जानेवारी १९८२ रोजी पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणूकांमध्ये तेलगु देशम पक्षास २९५ पैकी २०१ जागा मिळाल्या. एन. टी. रामाराव मुख्यमंत्री झाले. त्यांनी निःस्वार्थी नेता, स्वच्छ प्रशासन, श्रेष्ठ तेलगू परंपरा, राष्ट्रीय प्रतिष्ठा व त्याग यांचा पूरस्कार जाहीर केला. तेलगू देशम पक्षास मात्र अंतर्गत फूटीने लगेचच ग्रासलेले दिसते. ओगस्ट १९८४ मध्ये तेलगू देशम पक्षात अंतर्गत मतभेद निर्माण झाले. पक्षातील एक नेते भास्करराव यांनी आपल्या अनुयायांसह पक्ष सोडला व काँग्रेस पक्षास पाठींबा जाहीर केला, त्याकरीता भास्करराव यांनी राज्यपाल रामलाल यांच्या पूढे १६५ आमदारांची परेड घडवून आणली. बहुमत सिद्ध करण्यासाठी अशा पद्धतीचा भारतातील पहिलाच प्रयोग होता. दरम्यान राज्यपाल रामलाल यांनी राजीनामा दिला. नव्याने नियुक्त झालेले राज्यपाल डॉ. शंकर दयाल शर्मा यांनी एन. टी. रामाराव यांना सरकार स्थापन करण्याकरीता पाचारण केले. एन. टी. रामाराव यांनी चार दिवसात बहूमत सिद्ध केले. १९८५ साली त्यांनी आन्ध्र विधानसभा विसर्जित करुन नव्याने जनतेचा कौल घेण्याचे एन. टी. रामाराव यांनी ठरवले. १९८५ च्या निवडणूकीत तेलगू देशमला २९५ पैकी २१५ जागा मिळाल्या. अशा पद्धतीने भारतीय राजकारणात एक प्रभावी व शक्तिशाली प्रादेशिक पक्ष म्हणून तेलगू देशमला स्थान मिळाले. मात्र १९८९ च्या निवडणूकांमध्ये हा पक्ष पार लयास गेला. लोकसभेत केवळ दोन जागा त्यांना जिंगता आल्या. १९९६ च्या निवडणूकांमध्ये या पक्षाची स्थिती थोडी सुधारली. व १६ जागांवर त्यांनी विजय संपादन केला. दरम्यान एन. टी. रामाराव यांचे जावई चंद्राबाबू नायडू यांनी बंड करुन एन. टी. रामाराव यांनाच बाहेरचा रस्ता दाखवला. १९९८ ते २००५ या आघाडीच्या राजकारणात चंद्राबाबू नायडू यांनी संयुक्त लोकशाही आघाडी व संयुक्त पूरोगामी आघाडी अशा दोन्ही काळात प्रभावी भूमिका बजावली. मधल्या काळात तेलंगणा या राज्याची निर्मिती झाल्यानंतर व सिंमाध्रमध्ये वाय एस आर काँग्रेसने सत्ता प्राप्त केल्यानंतर या पक्षाच्या प्रभावावर मोठ्या मर्यादा पडलेल्या दिसतात. असे असले तरी तेलगू देशम हा एक महत्वाचा प्रादेशिक पक्ष म्हणून ओळखला जातो.

### तेलगू देशमची ध्येय-धोरणेः

तेलगू-देशमची ध्येयधोरणे व कार्यक्रम पूढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. देशाचे संघराज्यात्मक स्वरुप अधिक दृढ करण्यासाठी केंद्र सरकारशी चांगल्या प्रकारचे संबंध प्रस्थापित करणे.

२. राज्यपालांकडून संसदीय शासनपद्धतीच्या नियमांचे पालन होणे करीता संविधानदुरस्ती करण्यात यावी याकरीता पाठपूरावा करणे.

३. नभोवाणी, दूरदर्शन व वृत्तपत्रे यांचे स्वातंत्र्य टिकविणे.

४. केंद्र व राज्य यातील आर्थिक व्यवस्थेसंदर्भात बदल घडवून आणणे. राज्यांना केंद्राकडून योग्य व पूरेशी मदत होण्याबाबत प्रयत्न करणे.

५. नियोजन मंडळाच्या राज्यासंबंधीचा निश्चित कार्यभाग कोणता ते ठरवून घेणे.

६. न्यायाधीशांच्या नेमणूकीच्या पद्धतीत बदल करणे.

७. निर्वाचन व्यवस्थेतील सुधारणांसंबंधी प्रयत्न करणे.

८. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळवून देणे.

९. ग्रामीण विकासाकरीता कल्याणकारी योजना राबविणे.

१०. शासकीय खर्चावर नियंत्रण ठेवणे.

११. परराष्ट्राशी भारताचे संबंध बंधूभावाचे, मैत्रीचे रहावेत याकरीता प्रयत्न करणे. इत्यादी.

### ३) शेतकरी कामगार पक्ष:

१९४८ मध्ये श्री भाऊसाहेब राऊत यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. २ व ३ ऑगस्ट १९४७ रोजी जेधे-मोरे-राऊत यांच्या नेतृत्वाखाली आळंदी येथे एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीतच काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्याचे निश्चित झाले. १९४८ मध्ये काँग्रेस पक्षातच स्वतंत्र संघटना स्थापन करण्याची परवानगी नाकारण्यात आली. या प्रकरणामुळे शंकरराव देव व केशवराव जेधे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा ही प्रयत्न झाला. तेव्हा केशवराव जेथे, शंकरराव देव यांनी २६ एप्रिल १९४८ रोजी भाऊसाहेब राऊत यांच्या निवासस्थानी मुंबई येथे एका बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत काँग्रेस मधून बाहेर पडण्याचा व नवीन राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय या नेत्यांनी घेतला. व त्याप्रमाणे शेतकरी कामगार पक्ष हा प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आला. त्याच्या नंतरच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणाला मोठ्या प्रमाणात काही काळ का होईना या पक्षाने प्रभावित केलेले दिसते.

#### पक्षाची ध्येय-धोरणे:

शेतकरी कामगार पक्षाचे दुसरे अधिवेशन मे १९५० मध्ये दाभाडी येथे भरले होते. या अधिवेशनात पक्षाचे ध्येय-धोरणे पारीत करण्यात आली. त्यास दाभाडी प्रंबध असे ही म्हणतात. या दाभाडी प्रबंधाच्या माध्यमातून पक्षाने मार्क्सवादाचा स्वीकार करुन समाजसत्यवादी समाजाचे उद्दिष्ट मान्य करुन लोकशाही पद्धतीने क्रांती घडवून आणण्याकरीता पूढील ध्येय-धोरणांचा स्वीकार करण्याचे जाहीर केले.

१. शहरी मालमत्ता व मिळकत यावर मर्यादा घालणे.

२. शेतकऱ्यांचे व कामगारांचे प्रश्न सोडविण्याकरीता प्रामुख्याने पूढाकार घेणे.

३. शेतमजूरांचे प्रश्न सोडविण्याकरीता त्यांच्या स्वातंत्र्य संघटना स्थापन करणे.

४. रोजगार हमी योजना चालू करणे.

५. प्रत्येकास काम मिळविण्याचा अधिकार देणे.

६. लोकशाहीचे प्राबल्य नष्ट करणे, नोकरवर्गाची नियुक्ती करण्यास व त्यांना परत बोलविण्याचा अधिकार जनतेस प्रदान करणे.

७. खासगी उद्योगधंद्याच्या नफ्यावर नियंत्रण ठेवणे.

८. दलित समूहांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे.

९. शेतमजूरासाठी किमान वेतन निर्धारित करणे.

१०. प्रमुख उद्योगांचे राष्ट्रीयकरण करणे.

११. सहकारी शेतीचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने प्रयत्न करणे.

**निवडणूकीतील कामगिरी:**

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणूकीत शेकापने निवडणूकीच्या राजकारणात प्रवेश केला. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीच्या वेळी शेतकरी कामगार पक्षाच्या अपेक्षा बऱ्याच उंचावल्या होत्या. मतदार महाराष्ट्र काँग्रेसच्या राज्यकारभारास कंटाळलेले असुन ते काँग्रेसला झिडकारुन शेकापचा पर्याय स्वीकारतील असा शेकाप नेत्यांना विश्वास वाटत होता. मात्र प्रत्यक्षात राष्ट्रीय काँग्रेसला मोठा विजय मिळाला. या निवडणूकीत शेकापला लोकसभेत केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले. तर मुंबई राज्यात १४ हैदराबाद राज्यात १४ व मध्यप्रदेश राज्यात एका जागी विजय संपादन करता आला. जेधे व मोरे या प्रमुख नेत्यांपैकी निवडणूकीत केशवराव जेधेंचा पराभव झाला तर शंकरराव मोरे विजयी झाले. त्यामूळे पक्षांतर्गत वाद पेटला. त्यातूनच १९५७ ची सार्वत्रिक निवडणूक येई पर्यंत संस्थापक सदस्यांपैकी भाऊसाहेब राऊत वगळता इतर सर्व सदस्य राष्ट्रीय काँग्रेसमध्ये परतले होते. शेकापची पहिली पिढी जरी काँग्रेसमध्ये गेली तरी शेकापची दूसरी फळी मात्र याकाळात सक्रिय झाली. त्यात प्रामुख्याने दाजीबा देसाई, उद्धवराव पाटिल, कृष्णराव धूळप, अण्णासाहेब गव्हाणे, एन. डी. पाटील, विठ्ठलराव हांडे, भगवानराव सुर्यवंशी यांचा प्रामुख्याने समावेश होता. या दुसऱ्या फळीतील नेतृत्वाने पक्ष वाढी बरोबरच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ही सक्रिय सहभाग घेतला. त्याचा फायदा १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणूकीत शेकापला मिळाला, या निवडणूकीत लोकसभेत ४ तर मुंबई विधानसभेत ३० उमेदवार शेकापचे निवडून आले. पूढे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनास यश आले व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणामूळे विरोधी पक्षांतील प्रमुख नेते काँग्रेसमध्ये सामील झाले. बेरजेच्या राजकारणाचा सर्वाधिक फटका शेकाप व रिपब्लिकन पक्षास बसला. त्यामुळे उत्तरोत्तर शेकापची निवडणूकीतील कामगिरी खालावत गेली. १९६२ च्या निवडणूकीत शेकापला महाराष्ट्र विधिमंडळात १५ जागा जिंकल्या. लोकसभेत मात्र जागा मिळाली नाही. १९६७ च्या निवडणूकीत लोकसभेत ०२ तर विधानसभेत १९ प्रतिनिधी निवडून आले. १९७७ च्या निवडणूकीत शेकापने जनता पक्षाशी यूती करुन निवडणूक लढवली त्यावेळी शेकापला लोकसभेच्या सहा जागा मिळाल्या तर १९७८ च्या विधानसभा निवडणूकांमध्ये १३ जागा मिळाल्या. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पूरोगामी लोकशाही दलात शेकापचा ही सहभाग होता. १९८५ साली ही संख्या १३, १९९० साली ०८, १९९५ साली ०६, १९९९ साली ०५, २००४ साली ०४, २००९ साली ०२, व २०१४ साली केवळ ०१ जागेवर शेकापला समाधान मानावे लागले आहे. १९९८ नंतर शेकापला लोकसभेत प्रतिनिधित्व मिळू शकलेले नाही. एकेकाळी महाराष्ट्रात प्रमुख विरोधी पक्ष असलेला शेकाप हा केवळ उत्तर रायगड पूरता मर्यादित झालेला दिसतो. रायगड जिल्ह्यात तर विचारसरणीशीही स्थानिक पातळीवर त्यांनी तडजोड स्वीकारलेली दिसते. शिवसेनेस कधीकाळी धर्मांध शक्ती म्हणून कट्टर विरोध

करणारा शेकाप रायगड जिल्हा परिषदेकरीता मधल्या काळात यूतीचा भाग बनले होते ही शोकांतिका मानली जाते.

**मूल्यमापनः**

सारांश, १९५२ पासून आजतागायत निवडणूक निकालांचा विचार केला तर स्पष्टपणे निदर्शनास येते की शेकापचा ऱ्हास होत आहे. महाराष्ट्र विधानसभेतील सर्वात मोठा विरोधी पक्ष व काँग्रेस पक्षास पर्याय म्हणून ज्यां पक्षाकडे पाहिले जात होते त्या पक्षाची ताकद आज अगदीच नगण्य झाली आहे. असे असले तरी शेकापने तत्व वैचारिक जी मांडणी केली व सांभाळली तरी महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणात ही महत्वपूर्ण ठरली आहे. शेकापने देशातील क्रांतीची अवस्था लोकशाही क्रांतीची आहे असे अचूक निदान दाभाडी प्रबंधात केले होते. इतर डाव्या राजकीय पक्षांनी त्याकडे समाजवादी क्रांती म्हणून पाहिले होते. शेकापने निदान अचूक केले तरी शेतकरी घरातील मूलांना रुचेल, पचेल असा मार्क्सवाद शेकापला ही सांगता आली नाही, मार्क्सवादी, लेनिनवादी ही संकल्पित पक्षबांधणीही तो करु शकला नाही. असे अभ्यासकांना वाटते. आजही सांप्रदायिक नवसाम्राज्यवादी नवभांडवलशाही शक्तींशी हा राजकीय पक्ष संघर्ष करतो आहे, तो या दृष्टीने या विचारधारेवर विश्वास ठेवण्या करीता एक अपेक्षा आहे असे आपण म्हणू शकतो.

**४) शिवसेनाः**

स्वातंत्र्योत्तर काळातील एख दिर्घ लढा म्हणून संयूक्त महाराष्ट्राच्या लढ्याकडे पाहिले जाते. संयूक्त महाराष्ट्राच्या या आंदोलनात मराठी अस्मिता, मराठ्यांचा इतिहास व शिवाजी महाराजांची प्रतिमा यांचा जनजागृतीसाठी प्रभावी वापर करण्यात आला होता. १ मे १९६० रोजी संयूक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातूनच संयूक्त महाराष्ट्राची निर्मितीही झाली. परंतु हा लढा ज्या संयूक्त महाराष्ट्र समितीच्या नेतृत्वाखाली लढला गेला ती समिती मात्र संयूक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर विसर्जित झाली. संयूक्त महाराष्ट्र समितीने उभ्या केलेल्या मराठी अस्मितेचा व शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा पूढील काळात शिवसेना या राजकीय पक्षाने परिणामकारकपणे वापर करुन घेतला. १९ जून १९६६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाच्या अस्मितेवर फूंकर घालून शिवसेना या संघटनेची स्थापना केली. १९६० पासून बाळासाहेब ठाकरे यांच्या संपादनाखाली सुरु झालेल्या मार्मिक साप्ताहिकाने मुंबईत मोठ्या प्रमाणात नोकरी निमित्त आलेल्या व दक्षिण भारतीयांच्या त्यांच्या विरोधात जो प्रचार सुरु केला होता. त्याला मराठी माणसांकडून वाढत्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत गेला. त्यातूनच शिवसेनेला संघटनात्मक आकार प्राप्त झाला.

**शिवसेना विस्ताराचा इतिहासः**

शिवसेना ही एक मराठी प्रश्नांना वाचा फोडणारी व मराठी माणसांचे हितसंबंध संरक्षण करणारी यंत्रणा ते एक प्रादेशिक राजकीय पक्ष हा प्रवास तसा रोचक आहे. त्यातील काही प्रमुख टप्यांची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

**१) साम्यवाद विरोधः**

शिवसेना या संघटनेचा विस्तार होण्यातील पहिला टप्पा हा साम्यवादाने सुरु झालेला दिसतो. या टप्प्याचे विश्लेषण करताना डॉ. भा. ल. भोळे म्हणतात, मराठी माणसाचे हितसंरक्षण अशा मोघम

कार्यक्रमावर सुरु झालेल्या शिवसेनेला ठोस राजकीय कार्यक्रम अभावानेच होता. पण भांडवलशाही विकासापोटी वाढलेल्या बेकारीने त्रस्त झालेल्या मराठी युवकांना शिवसेनेच्या आक्रमक पावित्र्याचे आकर्षण वाटले. निम्नवर्ग व मध्यमवर्ग त्या संघटनेचा पक्षपाती झाला. हाच वर्ग साम्यवादी प्रभावाखालील कामगार चळवळीत मोठया संख्येने होता. त्यामूळे स्वाभाविकच साम्यवादविरोधी पवित्रा घेऊन शिवसेना कामगार क्षेत्राकडे वळली. १९६८ साली तिने भारतीय कामगार सेना स्थापन केली. १९६८ ते १९७४ या काळात मुंबईतील कामगार चळवळ फोडण्याचे कार्य शिवसेनेने पार पाडले. अशा पद्धतीने शिवसेनेच्या विकासात मराठी हितसंबंधाचे संरक्षणाच्या पूढे साम्यवादाच्या विरोधावर शिवसेनेचा  प्रवेश कामगार वर्गात झालेला दिसतो.

**हिंदुत्ववादी पक्षः**

१९८० च्या दशकात आपली प्रादेशिक पक्ष ही प्रतिमा मागे टाकून मराठी हितसंबंधाचा संरक्षक ही भूमिका बाजूला सारुन शिवसेनेत हिंदुत्ववादी स्वरुप धारण केले. देशभर निर्माण झालेल्या जमातवादी राजकारणास शिवसेनेने दिलेला तो एक प्रतिसाद होता. हिंदूत्वाच्या  परिवेशात शिवसेनेने प्रामुख्याने मूस्लिम व दलित या दोन समाजसमूहांना टिकेचे लक्ष्य केले. मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यास विरोध करणारा एकमेव राजकीय पक्ष शिवसेना हाच होता. त्यामुळे मराठा व ओबीसी प्रवर्गात शिवसेनेचा शिरकाव होण्यास मदत झाली. नवबौद्ध समूहातील स्वाभिमानी अस्मितेविरोधी गाव गाड्यात निर्माण झालेल्या असंतोषाला एक प्रकारे वाट मोकळी करुन दिली. त्याचबरोबर हिंदुत्ववादाच्या माध्यमातून मुस्लिम समुदायास लक्ष्य केल्यामुळे मध्यमवर्ग ही शिवसेनेकडे आकर्षित झाला. राम मंदिर प्रश्न व बाबरी मशिद प्रकरणात शिवसेनेच्या हिंदुत्वाला अधिक धार आली. बाळासाहेब ठाकरेंनी बाबरी मशिद पाडण्याचे जाहीर समर्थन केले त्यामुळे हिंदुह्रदयसम्राट ही पदवी त्यांना अविभाज्यपणे चिकटली.

**भाजपा-शिवसेना यूतीचे राजकारणः**

मराठी हितसंबंधाचे संरक्षण करणारी संघटना ते हिंदुत्ववादी राजकीय पक्ष हा शिवसेनेचा विस्तार होत असताना शिवसेनेने राजकीय आघाडीवर निवडणूकीच्या राजकारणात ही प्रवेश केला, मात्र विरोधकांच्या मतविभाजनामूळे काँग्रेसच्या पूढे त्यांचा निभाव लागत नव्हता. अशावेळी प्रमोद महाजन व बाळासाहेब ठाकरे यांनी एकत्र येऊन यूती करण्याचे निश्चित केले. हिंदुत्व हा विचारांचा घटक या दोन्ही पक्षांना एकत्र आणण्यात महत्वाचा ठरला. त्यामुळे या यूतीस नैसर्गिक यूती असे सनंबोधले गेले. १९८९ च्या निवडणूकीत झालेली ही यूती २०१५ पर्यंत अभेद्य होती. २०१५ नंतर त्यात खिंडार पडण्यास खऱ्या अर्थाने सुरवात झाली. १९८५ पर्यंत शिवसेनेची आमदार संख्या एक पेक्षा अधिक नव्हती. १९९० मध्ये ती संख्या यूती केल्यानंतर ५२ पर्यंत पोहचली. १९९५ मध्ये तर ही यूती सत्तेमध्ये आली व शिवसेनेचे मनोहर जोशी व पूढे नारायण राणे मुख्यमंत्री बनले. तर भाजपाचे गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री होते.

**महाविकास आघाडीः**

२०१५ च्या विधानसभा निवडणूका सत्ताधारी असणाऱ्या भाजपा-शिवसेना यूतीने एकत्र लढवल्या. जागावाटपापासूनच भाजपा-शिवसेनेमध्ये नाराजीनाट्य सुरु झाले होते. २०१५ साली भाजपा शिवसेना यूती तुटुन दोन्ही राजकीय पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूका लढवल्या होत्या. त्यात भाजपाने मोठी मुसंडी मारुन शिवसेनेला मागे टाकले व १२० जागा मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून पूढे आला. निवडणूकीनंतर भाजपा-शिवसेना पून्हा एकत्र आले. मात्र सत्तेच्या पाच वर्षातही शिवसेना विरोधीपक्षांच्या मुडमध्ये तर भाजपा शिवसेनेचे खच्चीकरण करण्यामागे

लागलेला आहे असेच चित्र अनुभवास येत होते. २०१९ च्या विधानसभा निवडणूका या दोन्ही पक्षांनी एकत्र लढवल्या. भाजपाला स्वबळावर सत्तास्थापन इतपत जागा मिळतील असा विश्वास वाटत होता. मात्र निवडणूकांचे निकाल मात्र अनपेक्षित होते. त्यातच शरद पवार व संजय राऊत भाजपाला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी पूढे सरसावले व त्यातून महाविकास आघाडीचा जन्म झाला. शिवसेना अध्यक्ष उद्धव ठाकरे या सरकारचे नेतृत्व करत आहे. हा शिवसेनेच्या विकासातील एक मोठा टप्पा मानावा लागेल.

**संघटनात्मक बांधणी:**

शिवसेना हा राजकीय पक्ष १९६६ साली स्थापन झाला असला तरी त्याची घटना रीतसर बनवण्यात आली नव्हती. सदस्यत्वाचे ही विशिष्ट असे नियम नव्हते. निवडणूक आयोगाने घटना व नियम अनिवार्य केल्यानंतर त्याची औपचारिकता पूर्ण करण्यात आलेली दिसते. तरीही साधारणतः शिवसेना हा नियमांपेक्षा भावनिक विश्वासावर चालणारा वा त्यास प्राधान्य देणारा राजकीय पक्ष आहे असे म्हणता येईल. शिवसेनेच्या मुंबईतील वार्डा वार्डात शाखा सुरवातीच्या काळात शाखा स्थापन करण्यात आल्या. तरीही १९७० पर्यंत त्यांची संख्या अतिशय मर्यादित होती. १९८० नंतर शाखा स्थापण्याचा वेग शिवसेनेने मोठ्या प्रमाणात वाढवलेला दिसतो. उद्धव ठाकरे कार्याध्यक्ष झाल्यानंतर संघटनात्मक बांधणीला त्यांनी अधिक प्राधान्य दिलेले दिसते.

**अकाली दल:**

अकाली दल या राजकीय पक्षाची स्थापना १४ डिसेंबर १९२० रोजी सिखिझम च्या भूमिकेतून झाली. अकाली दलाची स्थापना शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीची मुख्य कार्यशाखा म्हणून करण्यात आली होती. अकाली दल स्वतःस शिखांचे मुख्य प्रतिनिधी मानताना या पक्षाचे पहिले अध्यक्ष सरदार सरमुखसिंग पुब्बल उर्फ मास्टर तारांशिंग होते. पंजाबी भाषिकांचे स्वतंत्र राज्य निर्माण करणे ही या पक्षाची प्रमुख मागणी होती. १९५६ साली राज्य पुनर्रचना समितीच्या शिफारशीनुसार पंजाब व हरियाणा यांचे मिळून द्विभाषिक राज्य निर्माण करण्यात आले. तेव्हा पंजाब भाषिकांकरीता स्वतंत्र राज्याची मागणी व गुरुमुखी लिपीतील पंजाबी भाषा ही औपचारीक राजभाषा व्हावी अशी मागणी या पक्षाने केली. त्यासाठी मास्टर तारासिंग यांनी १९६० साली आमरण उपोषण सुरु केले. परंतु स्वतंत्र पंजाब राज्याची मागणी मान्य न करता केंद्र सरकारने शिख धर्मियांच्या प्रश्नांविषयी केवळ चौकशी आयोग नेमण्याचे ठरविले. मास्टर तारासिंग यांनी उपोषण मागे घेतल्यामुळे अकाली दलास ही मागणी मान्य करवुन घेण्यात अपयश आले. केंद्र सरकारने स्थापन केलेल्या समितीस ही अकाली दलाने सहकार्य नाकारले. त्यामुळे यासंदर्भात आयोगाचीही स्थापना होऊ शकली नाही अकाली दलातील दुसऱ्या गटाचे नेतृत्व करणारे संत फत्तेसिंग यांनी स्वतंत्र पंजाब राज्याकरीता आमरण उपोषण सुरु करुन आत्मदहनाची धमकी दिली. फत्तेसिंगाचे हे आंदोलन १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धा अगोदर नुकतेच सुरु झाले होते. भारत-पाक युद्धामुळे संत फत्तेसिंगाना आपले आंदोलन मागे घ्यावे लागले. पूढे १९६६ मध्ये पंजाब व हरियाणा अशी दोन स्वतंत्र राज्य स्थापन झाली.

**पक्षाची ध्येय-धोरणे:**

अकाली दल या प्रादेशिक राजकीय पक्षाची ध्येय धोरणे पूढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

१. आर्थिक न्याय व समता या तत्वांवर समाजरचना

२. राज्यांना स्वायत्तता व अधिक अधिकार

३. शहरी संपत्तीवर मर्यादा

४. दलित समुदायाचा उद्धार.

५. व्यापारावर सरकारी नियंत्रणे

६. साक्षरता प्रसार

७. ग्रामोद्योग व लघुउद्योगांना चालना

**राजकीय सहभाग:**

अकाली दलाने १९६९ च्या निवडणूकीपासून निवडणूकीय राजकारणात सक्रिय सहभाग घेतला. पंजाबमधील एक महत्वाचा राजकीय पक्ष म्हणून अकाली दल आपला प्रभाव राखुन आहे. त्याचबरोबर आघाडीच्या राजकारणात १९९२ पासून भाजपा व काँग्रेस अशा दोन्ही काळात त्याने आपली प्रभाव क्षमता सिद्ध केलेली दिसते. अकाली दलाची निवडणूकीतील कामगिरी पूढील तक्त्याच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**अकाली दल पंजाब विधानसभा निवडणूकीतील कामगिरी**

| वर्ष | निवडणुक लढलेल्या जागा | विजयी जागा | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९६९ | ६५ | ४३ | २९.३६ |
| १९७२ | ७२ | २४ | २७.६४ |
| १९७७ | ७० | ५८ | ३१.४१ |
| १९८० | ७३ | ३७ | २६.९२ |
| १९८५ | १०० | ६० | ३८.०१ |
| १९९२ | ५८ | ०३ | ५.२० |
| १९९७ | ९२ | ७५ | ३७.६४ |
| २००२ | ९२ | ४१ | ३१.०८ |
| २००७ | ९३ | ४८ | ३७.०८ |
| २०१२ | ९४ | ५६ | ३४.७३ |
| २०१७ | ९४ | १५ | २५.२ |

**अकाली दल मुख्यमंत्री (पंजाब):**

| अ.क्र. | मुख्यमंत्र्यांचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| ०१ | गुरुनाम सिंग | १७ फेब्रुवारी १९६९ ते २७ मार्च १९७० |
| ०२ | प्रकाशसिंग बादल | २७ मार्च १९७० ते १४ जून १९९१ |
| ०३ | प्रकाशसिंग बादल | २० जून १९७७ ते १७ फेब्रुवारी १९८० |

| | | |
|---|---|---|
| ०४ | सुरजसिंग बर्नाल | २९ सप्टेंबर १९८५ ते ११ जून १९८७ |
| ०५ | प्रकाशसिंग बादल | १२ फेब्रुवारी १९९७ ते २६ फेब्रुवारी २००२ |
| ०६ | प्रकाशसिंग बादल | १ मार्च २००७ ते १६ मार्च २०१७ |

**तृणमूल काँग्रेसः**

समकालिन भारतीय राजकारणातील सर्वात प्रभावी प्रादेशिक पक्ष म्हणून तृणमूल काँग्रेसचा उल्लेख करता येईल. १ जानेवारी १९९८ रोजी काँग्रेस पक्षातून बाहेर पडून श्रीमती ममता बॅनर्जी यांनी या पक्षाची स्थापना केली. प. बंगाल मधील मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या अभेद्य किल्ल्यास उध्वस्त करण्याचे काम कोणत्याही राष्ट्रीय पक्षास शक्य झाले नव्हते ते काम ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली तृणमुल काँग्रेस या प्रादेशिक पक्षाने पार पाडलेले दिसते. एवढेच नव्हे तर मागील दोन दशकात राष्ट्रीय राजकारणात ही या पक्षाने आपला प्रभाव वरचेवर वृद्धींगत केलेला दिसतो. २००९ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत देशपातळीवर तृणमुल काँग्रेस हा सहाव्या क्रमांकाचा पक्ष होता तर २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत त्यांची जागा चौथ्या क्रमांकावर आहे. विद्यामान परिस्थित नरेंद्र मोदींच्या आक्रमक नेतृत्वास रोखण्यासाठी विरोधकांनी ममता बॅनर्जीच्या नेतृत्वाचा पर्याय चोखाळण्यास सुरवात केली आहे. त्यावरुन या पक्षाच्या प्रभाव क्षमता आपल्या लक्षात येऊ शकते. तृणमुल काँग्रेसने पं. बंगाल बाहेरील राज्यांमध्ये २०१० च्या नंतर आपली ताकद वाढवण्यास सुरवात केली. परिणाम स्वरुप सर्व भारतीय तृणमुल काँग्रेस ला (AITC). राष्ट्रीय पक्षाचा दर्जा निवडणूक आयोगाने २ सप्टेंबर २०१६ रोजी बहाल केला आहे. तरीही तृणमुल काँग्रेसचा पं. बंगाल मधील प्रभाव पाहता एक प्रादेशिक पक्ष म्हणून अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

तृणमुल काँग्रेसला प. बंगालच्या राजकारणात पाय रोवण्याकरीता नंदीग्राम आंदोलनाचा सर्वाधिक फायदा झालेला दिसतो. टाटा कंपनीचे सर्वेसर्वा असणारे श्री रतन टाटा यांचे स्वप्न असणाऱ्या नॅनो कार चा प्रस्तावित कारखाना सिंगुर-नंदीग्राम येथे होता. त्याकरीता पं. बंगाल सरकारने स्थानिक जनतेच्या हितसंबंधाना बाजूला करुन बळजबरीने जमिन अधिग्रहण करावयास सुरुवात केली. ७० हजार लोकांना आपल्या गाव व जमिनीपासून वेगळे करण्यात आले त्यावेळी झालेल्या आंदोलनावर पं. बंगाल पोलिसांनी गोळीबार केला. त्यात १४ आंदोलकांचा मृत्यु झाला. त्यामुळे या आंदोलनाने पं. बंगालचे राजकारण ढवळुन निघाले. ममता बॅनर्जी व त्यांच्या काँग्रेस पक्षात पक्षविस्ताराची संधी समजून यात आघाडी घेतली व लवकरच त्याचे राजकीय फायदे ही या पक्षास प्राप्त झाले. २००७ साली हे नंदीग्राम-शिंगुरचे आंदोलन झाले. २००९ च्या लोकसभा निवडणूकीत तृणमुल काँग्रेसला १९ जागा मिळाल्या हे त्यांचे मोठे यश होते. २०१० च्या कोलकात्ता महानगरपालिकेत १४१ पैकी ९७ जागा जिंकुन तृणमुल काँग्रेसने सत्ता ताब्यात घेतली व २०११ च्या पं. बंगाल विधानसभा निवडणूकांमध्ये तृणमुल काँग्रेस व सहकारी पक्षांनी २९४ जागांपैकी २२७ जागांवर विजय संपादन करीत सत्ता हस्तगत केली. डाव्या आघाडीचा हा फार मोठा पराभव होता व पं. बंगाल च्या राजकारणाला या निवडणूकांनंतर निर्णायक वळण मिळालेले दिसते. तृणमुल काँग्रेसने त्यानंतर मणिपूर, ओरीसा, तमिळनाडू, केरळ, सिक्कीम, हरियाणा, अरुणाचल प्रदेश, मणिपूर या राज्यांमध्ये ही आपले कार्य जोमाने चालु केलेले दिसते. २०१४ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांमध्ये विविध राज्यांत मिळून या पक्षास ६ टक्के पेक्षा अधिक मतदान मिळालेले दिसते. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून या प्रादेशिक पक्षास राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

ममता बॅनर्जी या तृणमुल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आहेत. संघटनात्मक पातळीवर विद्यार्थी आघाडी, युवा आघाडी, महिला आघाडी, कामगार आघाडी, शेतकरी आघाडी अशा विंग ही कार्यरत आहेत. ज्या या प्रादेशिक पक्षाच्या कार्यक्रमांचे विचारधारेचे संचलन करण्यात डाव्या पक्षांच्या तोडीस तोड कार्य करतांना दिसतात. तृणमुल काँग्रेसचा कार्यक्रम व धोरणे ममता बॅनर्जी यांनी दिलेल्या एका घोषणेतून व्यक्त होतात. मा मती मनुष मा मती मनुष असे बंकाली भाषेतील घोषवाक्य हे तृणमुल काँग्रेसचे अधिकृत घोषवाक्य असून त्याची रचना खुद्द ममता बॅनर्जी यांनीच केली आहे. ज्याचा अर्थ माता, मातृभूमि व लोक असा होतो. २०११ च्या विधानसभेत हा नारा- घोषवाक्य पं. बंगाल मध्ये मोठ्या प्रमाणात प्रचलित व लोकप्रिय झालेले दिसते. पूढे ममता बॅनर्जी यांनी यावर एक पूस्तक ही प्रकाशित केले.

### तृणमुल काँग्रेस निवडणूक कामगिरी (लोकसभा)

| वर्ष | निवडणूका लढवलेल्या जागा | निवडून आलेल्या जागा | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९९८ | २९ | ०७ | २.४२ |
| १९९९ | २९ | ०८ | २.५७ |
| २००४ | ३३ | ०२ | २.१७ |
| २००९ | २६ | १९ | ३.२० |
| २०१४ | ४५ | ३४ | ३.८४ |
| २०१९ | ६२ | २२ | ४.११ |

### तृणमुल काँग्रेस निवडणूक कामगिरी (विधानसभा):

| वर्ष | निवडणूका लढवलेल्या जागा | निवडून आलेल्या जागा | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००१ | २२६ | ६० | ३०.६६ |
| २००६ | २५७ | ३० | २६.६४ |
| २०११ | २२६ | १८४ | ३८.९३ |
| २०१६ | २९३ | २११ | ४४.९१ |

### भारतातील प्रमुख प्रादेशिक पक्ष:

| अ.क्र. | प्रादेशिक पक्षाचे नाव | अध्यक्ष |
|---|---|---|
| ०१ | द्रविड मन्नेत कळघम | स्टॅलिन |
| ०२ | ए. आय. डी. एम. के. | शशिकला |
| ०३ | ए आय एन आ. बी. | एन. रंगास्वामी |
| ०४ | ए. आय टी वी (तृणमुल काँग्रेस) | ममता बॅनर्जी |
| ०५ | ए यु डी एफ | बदरुद्दीन अजमल |
| ०६ | ए जी पी | प्रफुल्लकुमार महंत |

| | | |
|---|---|---|
| ०७ | बिजु जनता दल | नवीन पटनाईक |
| ०८ | डी एम डी के | विजय कांत |
| ०९ | आय एन एल डी | ओमप्रकाश चौटाल |
| १० | आय यु एम एल | जी. एम. बनातवाला |
| ११ | जे के एन. बी. | ओमर अब्दुल्ला |
| १२ | जे के एन पी पी | भीमसिंग |
| १३ | पी.डी.पी | महेबुबा मुफ्ती सय्यद |
| १४ | संयुक्त जनता दल | शरद यादव |
| १५ | जे एम. एम. | शिबु सोरेन |
| १६ | जनता दल (पूरोगामी) | एच. डी देवेगौडा |
| १७ | के इ बी (एम) | सी. एफ. थॉमस |
| १८ | एल. जे. एस. | पी चिराग पासवान |
| १९ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | राज ठाकरे |
| २० | एम ए. जी | शशिकला काकोटकर |
| २१ | एम एन एफ | पी. यु लालधमींग कंगा |
| २२ | पी. एफ के. | जी के मणी |
| २३ | आर जे डी | लालुप्रसाद यादव |
| २४ | आर एल डी | अजितसिंग चौधरी |
| २५ | शिरोमणी अकाली दल | प्रकाशसिंग बादल |
| २६ | शिवसेना | उद्धव ठाकरे |
| २७ | एच. डी. एम | पवनकुमार चामलिंग |
| २८ | तेलगु देसम पार्टी | के. चंद्राबाबू नायडु |
| २९ | तेलंगना राष्ट्र पक्ष | (चि. आर. एल) |
| ३० | मू. डी. एफ | डॉन कपर रॉय |
| ३१ | झेड एन पी | लालडू होमा |

## २.५ भारतातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष

भारतात राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाने काही निकष निश्चित केलेले आहेत. या निकषांच्या आधारे भारतात राष्ट्रीय कॉंग्रेस, भारतीय जनता पक्ष या प्रमुख दोन राष्ट्रीय पक्षां खेरीज अन्य ही पाच राजकीय पक्षांना राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळालेली दिसते. त्यातील काही प्रमुख राष्ट्रीय पक्षांचा आढावा पूढील प्रमाणे घेता येईल.

### १) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसः

स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणातील सर्वात दिर्घकाळ सत्तेवर राहिलेला राजकीय पक्ष म्हणून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा उल्लेख केला जातो. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा भारतातील सर्वात

जूना राजकीय पक्ष आहे. १८८५ साली सर ॲलन ह्युम यांच्या मार्गदर्शनाखाली या पक्षाची स्थापना झाली. हिंदी जनतेच्या मागण्या इंग्रज सरकारकडे सनदशीर मार्गाने पोहचवणे हे राष्ट्रीय सभेचे प्राथमिक उद्दिष्ट होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा जस जसा विस्तार होत गेला त्या प्रमाणात भारतीय राष्ट्रीय सभेस अधिक व्यापक उद्दिष्ट प्राप्त होत गेले व त्याचे राजकीय संघठन बनण्याची प्रक्रिया ही गतिमान झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात ही प्रांतिक व केंद्रिय विधिमंडळासाठी झालेल्या प्रत्येक निवडणूकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचेच प्रभुत्व राहिले. संविधान सभेतही भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचाच बोलबाला होता. स्वातंत्र्योत्तर काळात काही मोजके अपवाद सोडले तर २०१४ पर्यंत काँग्रेस पक्षाचे व केंद्रिय व घटक राज्यपातळीवरील राजकारणात प्रभुत्व प्रस्थापित झालेले दिसते. त्यामुळेच भारतीय राजकीय व्यवस्थेचे औपचारिक स्वरुप हे बहुपक्षीय स्वरुपाचे असले तरी एकंदरीत काँग्रेस पक्षाचेच प्रभुत्व भारतीय राजकारणात निर्माण झालेले आढळते. या दृष्टीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची ध्येय-धोरणे, संघटनात्मक बांधणी, निवडणूकीतील कामगिरी व यशापयशाचे मूल्यमापन करणे आवश्यक ठरते.

**काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी:**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी पूढीलप्रमाणे असल्याचे दिसतेः-

१. ऑल इंडिया काँग्रेस कमिटी

२. कार्यकारी समिती

३. प्रदेश काँग्रेस समिती

४. जिल्हा काँग्रेस समिती

५. तालूका काँग्रेस समिती

६. शहर काँग्रेस समिती

७. ग्राम समिती / वॉर्ड समिती

अशा पद्धतीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस समितीचे संघटनात्मक जाळे तयार झालेले दिसते. त्याचे कार्य पूढील प्रमाणे अधिक स्पष्ट करता येईल.

### १) अखिल भारतीय काँग्रेस समिती:

अखिल भारतीय काँग्रेस समितीमध्ये प्रदेश काँग्रेस समितीचे प्रतिनिधी असतात. या समितीत निर्वाचित, पद्सिद्ध व स्वीकृत असे सदस्य अंतर्भूत केले जातात. अखिल भारतीय स्तरावर या समितीचे नियंत्रण असते. पक्षाची ध्येयधोरणे, आदेश व कार्यक्रम प्रादेशिक समित्यांपर्यंत पोहचवणे, त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे. देखरेख ठेवणे अशी कार्य साधारणतः अखिल भारतीय काँग्रेस समितीकडून पार पाडली जातात.

### २) कार्यकारी समिती:

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पक्षसत्तेत कार्यकारी समितीस अनन्य साधारण महत्व आहे. पक्षाचे ध्येयधोरणे प्रत्यक्षात राबवण्याचे कार्य कार्यकारी समितीवर असते. या कार्यकारी समितीत काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष, कोषाध्यक्ष, सचिव व इतर १८ सदस्य असतात. यातील २/३ सदस्यांची निवड

अखिल भारतीय काँग्रेस समितीकडून केली जाते. या समितीच्या प्रमुख कार्यांमध्ये अखिल भारतीय काँग्रेसचे वर्षातून एकदा अधिवेशन बोलावणे, काँग्रेसच्या सर्व प्रदेश व इतर समित्यांवर नियंत्रण ठेवणे, शिस्तभंगाची कारवाई करणे यासारखी कार्य समाविष्ट होतात.

### ३) प्रदेश काँग्रेस समिती:

प्रत्येक घटकराज्याकरीता एक प्रदेश काँग्रेस समिती गठीत केली जाते. अपवादात्मक परिस्थितीत वा मोठ्या घटकराज्यांकरीता एकापेक्षा अधिक ही प्रादेशिक समित्या गठीत केल्या जातात. प्रादेशिक समितीमधील सदस्यांची निवड जिल्हा समिती व मंडळ समित्यांकडून होते. प्रादेशिक समिती ही त्या घटकराज्यातील श्रेष्ठ समिती मानली जाते. त्यामुळे त्या घटकराज्याच्या राजकारणात तिचे स्थान प्रभावी राहते. राज्यातील सर्व काँग्रेस समित्यांवर नियंत्रण व देखरेख करुन-पक्षआदेशांची व पक्षाच्या ध्येय धोरणांची अंमलबजावणी करवून घेणे हे कार्य प्रामुख्याने प्रादेशिक समितीस करावे लागते.

### ४) जिल्हा-तालुका व ग्राम समित्या:

स्थानिक पातळीवर कार्य करण्यासाठी जिल्हा, तालुका व ग्राम वा वॉर्ड स्तरावर ही काँग्रेस पक्ष समिती कार्यन्वीत करतो. यांचा अधिकारस्तर ही पदसोपान परंपरे प्रमाणे कार्यरत असतो. स्थानिक प्रश्न, जनतेच्या मागण्या प्रदेश व समितीकडे पोहचविण्यांचे व अखिल भारतीय काँग्रेस समितीने दिलेल्या ध्येय-धोरणे व कार्यक्रमांचे अंमलबजावणीचे कार्य या समित्यांना पार पाडावे लागते. ग्रामिण स्तरापर्यंत संघटनात्मक जाळे असणारा एकमेव पक्ष म्हणून काँग्रेस याच पक्षाचा उल्लेख केला जातो.

### काँग्रेस पक्षाचे सभासदत्व:

काँग्रेस पक्षाचे सभासदत्व होण्याची प्रक्रिया ही पक्षाच्या घटनेत नमूद करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे काँग्रेस पक्षात तीन प्रकारचे सभासदत्व घेता येते.

१. प्राथमिक सभासद

२. क्रियाशील सभासद

३. समावेशक सभासद

ज्या व्यक्तीने वयाची १८ वर्ष पूर्ण केलेली आहेत. अशा कोणत्याही व्यक्तीस काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सभासदत्वा करीता अर्ज करता येतो. २१ वर्ष पूर्ण झालेल्या व्यक्तीस प्राथमिक सभासदत्वाची दोन वर्ष पूर्ण झाल्यानंतर क्रियाशील सभासदत्व दिले जाते. काँग्रेस पक्षातुन बाहेर पडलेले सभासद त्यावेळी परत काँग्रेसमध्ये समाविष्ट होतात, वा इतर पक्षाचे कार्यकर्ते काँग्रेसमध्ये येतात त्यावेळी त्यांना समावेशक सभासदत्व बहाल केले जाते. या तिन्ही प्रकारच्या सभासदत्वाकरीता निश्चित स्वरुपाची वर्गणी भरावी लागते.

### भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची ध्येय व धोरणे:

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उद्दिष्ट भारतीय जनतेच्या मागण्या सनदशीर मार्गाने इंग्रजदरबारी पोहचवणे. इथपासून भारताचे संपूर्ण स्वातंत्र्य इथपर्यंत विकसित झाले. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात मिश्र अर्थव्यवस्थेपासून उदारीकरणाच्या स्वीकारापर्यंत ते

विस्तारलेले दिसते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मागील १० वर्षातील ध्येय-धोरणे व कार्यक्रम पूढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

१. प्रदेश काँग्रेस समिती

२. जिल्हा काँग्रेस समिती

३. तालुका काँग्रेस समिती

४. शहर काँग्रेस समिती

५. ग्राम समिती / वॉर्ड समिती

अशा पद्धतीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस समिती संघटनात्मक जाळे तयार झालेले दिसते. त्याचे कार्य पुढील प्रमाणे अधिक स्पष्ट करता येईल.

## १) अखिल भारतीय काँग्रेस समिती:

अखिल भारतीय काँग्रेस समितीमध्ये प्रदेश काँग्रेस व स्वीकृत असे सदस्य अंतर्भुंत केले जातात. अखिल भारतीय स्तरावर या समितीचे नियंत्रण असते. पक्षाची ध्येय धोरणे, आदेश व कार्यक्रम प्रादेशिक समित्या पर्यंत पोहचवणे. त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, देखरेख करणे अशी कार्य साधारणतः अखिल भारतीय काँग्रेस समितीकडून पार पाडली जातात.

## २) कार्यकारी समिती :

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पक्षसभेत कार्यकारी समितीस अनन्य साधारण महत्व आहे. पक्षाचे ध्येय धोरणे प्रत्यक्षात राबवण्याचे कार्य कार्यकारी समितीवर असते. या कार्यकारी समितीत काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष, कोषाध्यक्ष, सचिव व इतर १८ सदस्य असतात. यातील २/३ सदस्यांची निवड अखिल भारतीय काँग्रेस समितीकडून केली जाते. या समितीच्या प्रमुख कार्यांमध्ये अखिल भारतीय काँग्रेसचे वर्षातून एकदा अधिवेशन बोलावणे, काँग्रेसच्या सर्व प्रदेश व इतर समित्यांवर नियंत्रण ठेवणे, शिस्तभंगाची कारवाई करणे यासारखी कार्य समाविष्ट होतात.

## प्रदेश काँग्रेस समिती:

प्रत्येक घटकराज्याकरीता एक प्रदेश काँग्रेस समिती गठीत केली जाते. अपवादात्मक परिस्थितीत वा मोठ्या घटकराज्यांकरीता एका पेक्षा अधिक ही प्रादेशिक समित्या गठीत केल्या जातात. प्रादेशिक समितीमधील सदस्यांची निवड जिल्हा समिती व मंडळ समित्यांकडून होते. प्रादेशिक समिती ही त्या घटकराज्याच्या राजकारणात तिचे स्थान प्रभावी राहते.

## शेती विकासास प्रोत्साहन:

शेती व शेतकरी यांचा विकास व्हावा याकरीता ही काँग्रेस पक्षाने आपला निश्चित दृष्टिकोन सातत्याने कायम ठेवलेला दिसतो. प. जवाहरलाल नेहरूंचा औद्योगिकिकरणाकडे ओढा अधिक असल्यामुळे त्यांनी शेतीत उद्योगधंद्याना कच्चा माल पुरवणारे क्षेत्र म्हणून सुरवातीच्या काळात पाहिले. मात्र लवकरच त्यांच्या लक्षात आले की भारतात स्वयंपूर्ण व्हावयाचे असेल तर शेतीच्या विकासाशिवाय व शेतीच्या आधूनिकी करणाशिवाय पर्याय नाही. यादृष्टिने काँग्रेस पक्षाने शेती संबंधीची आपली भूमिका स्पष्ट करताना शेती सुधारणा करणे, शेती उत्पादन करीता भांडवल,

कर्ज उपलब्ध करून देणे, पाणी पुरवठा, खते, बी-बियाणे, औषध पुरविणे यासारख्या योजनांना प्राधान्य दिलेले दिसते. शेतीशी संबंधित हरित क्रांती, श्वेत क्रांती यासारख्या विविध क्रांत्या काँग्रेस पक्षाच्या पुढाकाराने घडून येण्यास मदत झालेली दिसते.

**जागतिक शांततेकरीता अलिप्ततावादाचा स्वीकार :**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने केवळ देशातंर्गतच नव्हे तर जागतिक संदर्भात ही आपला कार्यक्रम अगदी सुरूवातीपासून स्पष्ट केलेला दिसतो. पं. जवाहरलाल नेहरूंची जागतिक राजकारणाकडे पाहण्याची दृष्टी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या परराष्ट्र संबंध विषयक धोरणावर प्रभाव पाडतांना दिसते. प. जवाहरलाल नेहरूनी आंतरराष्ट्रीय राजकारणात परराष्ट्र धोरणा संदर्भात जे पंचशील धोरण व अलिप्ततावादाचे तत्व स्वीकारले होते त्याचा मोठा प्रभाव भारतीय परराष्ट्र धोरणावर ही कायमस्वरूपी पडलेला दिसतो. त्यादृष्टिने काँग्रेसने आपल्या ध्येय धोरणांमध्ये परराष्ट्रांशी मैत्रीचे सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणे, आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कार करणे, शस्त्रास्त्र स्पर्धेला प्रतिबंध करणे, पंचशील तत्वांचा पुरस्कार करणे, जागतिक शांततेकरीत राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न करणे, वर्णद्वेष, गटबाजीचे राजकारण, शस्त्रास्त्र स्पर्धा, साम्राज्यवादापासून अलिप्त रहाणे इत्यादी तत्वांचा कायम पुरस्कार केलेला दिसतो.

**७) रोजगार व शिक्षणास प्राधान्यः**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात सुरुवातीच्या काळापासून शिक्षणाच्या सुविधा व रोजगारांच्या संधी निर्माण करून देण्यास प्राधान्य देण्यात येईल असे वेळोवेळी स्पष्ट केलेले दिसते. देशातील दारिद्र्य, बेकारी निर्मूलन करण्याच्या दृष्टीने लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा या हेतूने रस्ते बांधणी, पाटबंधारे, सार्वजनिक बांधकामे, रोजगाराची नवीन क्षेत्रे विकसित करणे, स्वयंरोजगारास प्राधान्य देणे अशा ध्येयांना आपल्या आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात कायम स्थान दिलेले दिसते. त्याच बरोबर देशातील सर्व लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, प्राथमिक, दुय्यम, उच्च व्यवसायिक व तांत्रिक शिक्षणाच्या संधी व सोयी उपलब्ध करून देणे यासारख्या धोरणांना शिक्षणाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने प्राधान्य दिलेले दिसते. राष्ट्रीय रोजगार हमी योजना, शिक्षणाचा मूलभूत अधिकार हा या दृष्टीने काँग्रेसने प्रत्यक्षात राबवलेला कार्यक्रम ही महत्त्वाचा मानावा लागेल.

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची निवडणुकीतील कामगिरी**

| वर्ष | निवडणूक लढवलेल्या जागा | निवडून आलेल्या जागा | मिळालेल्या मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९३४ | १४७ | ४२ | -- |
| १९४५ | १०२ | ५४ | -- |
| १९५२ | ४८९ | ३६४ | ४४.९९ |
| १९५७ | ४३४ | ३७१ | ४७.७८ |
| १९६२ | ४९४ | ३६१ | ४४.७२ |
| १९६७ | ५२० | २८३ | ४०.७८ |
| १९७१ | ५१८ | ३५२ | ४३.६८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९७७ | ५४२ | १५३ | ३४.५२ |
| १९८० | ५४२ | ३५१ | ४२.६९ |
| १९८४ | ५३३ | ४१५ | ४९.०१ |
| १९८९ | ५४५ | १९७ | ३९.५३ |
| १९९१ | ५४५ | २४४ | ३५.६६ |
| १९९६ | ५४५ | १४० | २८.८० |
| १९९८ | ५४५ | १४१ | २५.८२ |
| १९९९ | ५४५ | ११४ | २८.३० |
| २००४ | ५४३ | १४५ | २६.७ |
| २००९ | ५४३ | २०६ | २८.५५ |
| २०१४ | ५४३ | ४४ | १९.३ |
| २०१९ | ५४३ | ५२ | १९.५ |

सारांश, काँग्रेस हा भारतीय राजकारणातील राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असणारा महत्त्वाचा राजकीय पक्ष आहे. १९५२ ते १९६७ पर्यंत काँग्रेस या पक्षाचे प्रभुत्व अखिल भारतीय स्तरावर सर्वकष स्वरूपात प्रस्थापित झालेले होते १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काही घटक राज्यांमध्ये काँग्रेस प्रभुत्व शह देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. परंतु १९७१ नंतर इंदिरा गांधींच्या प्रभावामुळे परत काँग्रेस पक्षाचे प्रभुत्व निर्माण झाले. १९७७ च्या निवडणुकांचा अपवाद करता १९८९ पर्यंत काँग्रेसने आपला प्रभाव कायम ठेवला. १९८९ नंतर मात्र भारतीय राजकारणाचे स्वरूप पार बदलून गेले. प्रादेशिक पक्षांचा वाढता सत्ता शिरकाव, राष्ट्रीय राजकारणात निर्माण झालेली त्रिशंकू अवस्था, जमातवादाच्या वाढत्या प्रभावातून भाजपा सारख्या राजकीय पक्षांना मिळणारा वाढता प्रतिसाद, काँग्रेस नेतृत्वातील गटबाजी यासारख्या कारणांमुळे १९९५ ते २००४ हा काळ एक प्रकारे काँग्रेस लयास गेली आहे की काय असे वाटणारा कालखंड होता. मात्र २००४ साली काँग्रेसने परत सत्तेत येऊन आपले अस्तित्व दाखवले. २००९ साली या पक्षाने परत मोठी उभारी घेतली. परंतु २०१४च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाची सर्वात वाईट कामगिरी झाली. मोदी लाटेमध्ये काँग्रेस पक्षाची पार धूळधाण झाली. २०१४ ते २०१९ या कालखंडात अनेक घटक राज्यातील सत्ता ही काँग्रेसच्या हातून गेली. २०१९ च्या निवडणुकीतही काँग्रेसची परिस्थिती वाताहत झालेल्या राजकीय पक्षा सारखीच झाली. राहुल गांधीनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला, सोनिया गांधींना हंगामी अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले आहे, पक्षातील गटबाजी सक्रिय झाली आहे. सध्याचा काळ हा काँग्रेससाठी अतिशय कठीण काळ आहे. परंतु मागील इतिहासाचा अनुभव मात्र काँग्रेस परत उभारी घेण्याची क्षमता बाळगून आहे असेच आपणास सांगतो.

## २) भारतीय जनता पक्ष:

समकालीन भारतीय राजकारणातील सर्वात प्रबळ राष्ट्रीय राजकीय पक्ष म्हणून भाजपाने आपले स्थान भक्कम केलेले दिसते. आघाडीच्या राजकारणाने निर्माण झालेली राष्ट्रीय राजकारणाची कोंडी फोडण्याचे काम २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपाने एक हाती बहुमत प्राप्त करून केले. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपाने आपला प्रभुत्वाचा पाया अधिक भक्कम केलेला दिसतो. भाजपाला आज मिळत असलेले यश हे सहजासहजी मिळालेले नाही हे

भाजपाच्या एकूण वाटचालीचा आढावा घेताना स्पष्टपणे जाणवते. या दृष्टीने भारतीय राजकीय प्रक्रियेला सर्वांगीण दृष्ट्या प्रभावित करणाऱ्या भारतीय जनता पक्षाचा पूर्व इतिहास, त्याची पक्ष बांधणी, ध्येय व धोरणे, आणि निवडणुकीतील एकूण कामगिरीचा आढावा घेणे भारतीय राजकीय प्रक्रियेचे अवलोकन करताना आवश्यक ठरते.

**भाजपाचा पूर्व इतिहास जनसंघः**

भारतीय जनता पक्ष हा १९८० साली स्थापन झालेला असला तरी त्याची मुळे जनसंघा मध्ये आहेत. त्यामुळे भाजपाच्या वाटचालीत जनसंघाचा ही अपरिहार्यपणे अभ्यास करणे आवश्यक ठरते. २१ ऑक्टोबर १९५१ रोजी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केली. स्वातंत्र्यपूर्व काळातील हिंदू महासभेपेक्षा या पक्षाचे स्वरूप वेगळे होते. तत्कालीन जनसंघाचे आव्हान हे सांस्कृतिक राष्ट्रवादाला असलेले दिसते. एक संस्कृती, एक जनता, व एक राष्ट्र या अखंड भारताच्या विचाराने जनसंघ स्थापन झाला होता. जनसंघाच्या स्थापनेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडीत नेत्यांचा हातभार होता. हा पक्ष हिंदुत्वाचा पुरस्कार करणारा आहे अशी प्रतिमा निर्माण झाल्यामुळे इतर राजकीय पक्षांचे सहकार्य जनसंघास मिळाले नाही. उत्तर भारतापुरता या पक्षाचा प्रभाव मर्यादित राहिला. १९६७ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जनसंघास३५ जागा मिळाल्या. १९७१च्या लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकां मध्ये जनसंघास २२ जागा प्राप्त झाल्या. १९७५ साली इंदिरा गांधींनी आणीबाणी लावल्यानंतर आणीबाणी विरोधी गटामध्ये जनसंघ सामील झाला व १९७७ साली इंदिरा गांधींच्या नेतृत्वास विरोध करण्यासाठी जनता पक्षाच्या माध्यमातून एकत्र आलेल्या सर्व विरोधी पक्षांसह जनसंघ ही जनता पक्षात विसर्जित झाला. याच काळात अटल बिहारी वाजपेयी, लाल कृष्ण आडवाणी यासारखे नेते जनसंघातून पुढे आले.

भाजपाचा कार्यक्रम व ध्येयधोरणे समजून घेण्याकरता तत्कालीन जनसंघाच्या व धोरणांचाही आढावा घेणे आवश्यक ठरते. त्यातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे मांडता येतील.

देश एक, राष्ट्र एक, संस्कृती एक यावर विश्वास ठेवून भारताचे अखंडत्व व ऐक्य टिकविणे.

- आर्थिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करणे
- राष्ट्रीयकरण, सहकारी शेती यांना विरोध करणे
- खासगी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणे
- प्रशिक्षित नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देणे
- कसेल त्याची जमीन या तत्त्वाची कार्यवाही करणे
- गोहत्या प्रतिबंधक कार्यास पाठिंबा - प्रोत्साहन देणे
- राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेत मान्यता देणे
- मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण व प्रादेशिक भाषेतून उच्च शिक्षण देणे
- देशाच्या परराष्ट्र धोरणात अमुलाग्र बदल करणे, इत्यादी.

- अशा पद्धतीने जनसंघाच्या कुशीत भारतीय जनता पक्षाची मुस तयार झालेली दिसते.

**भारतीय जनता पक्षाची स्थापना:**

१९७७ साली जनसंघ जनता पक्षात विलीन झाला. १९७७ साली जनता पक्षास भारतीय जनतेने प्रचंड बहुमत देऊन सत्तास्थानी ही बसवले. परंतु अल्पावधीतच जनता पक्षात असणारे घटक पक्ष आपल्या जुन्या निष्ठा विसरण्यास तयार नाहीत हे लक्षात आले. विशेषता समाजवादी व हिंदुत्ववादी या निष्ठांचा संघर्ष सातत्याने जनता पक्षात घडू लागला. या दुहेरी निष्ठेच्या संघर्षातूनच पूर्वाश्रमीचे जनसंघाचे नेते १९८० साली जनता पक्षातून बाहेर पडले व त्यांनी मे १९८० साली अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष या नावाने नव्या राजकीय पक्षाची स्थापना केली. यावेळी पक्ष स्थापना करताना पक्षनेत्यांनी अशी घोषणा केली होती की, राष्ट्रवाद, राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, भावात्मक धर्मनिरपेक्षता व गांधीवादी समाजवाद आणि मूल्याधिष्ठित राजकारण या तत्त्वांशी नव्या पक्षाची वैचारिक बांधीलकी राहील. यावेळी या पक्षाच्या नेतृत्वाने घोषित केले की भाजपा केवळ सत्तासंघर्ष न करता काही ठोस तत्वे व राष्ट्रीय ध्येये समोर ठेवून एक मतैक्य निर्माण करण्याची प्रतिज्ञा करत आहे. त्याच बरोबर या पक्षाने स्थापनेच्या वेळी हे ही जाहीर केले की, भिन्न – भिन्न विचारसरणी व श्रद्धा बाळगणारे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहू शकतात, परंतु त्यांच्या निष्ठा देशाबाहेर स्थिरावल्या आहेत वा जे समाज विघातक ठरतात त्यांना या मतैक्यात सामावून घेतले जाऊ शकत नाही.

**भाजपाची संघटनात्मक रचना:**

भारतीय जनता पक्षाची संघटनात्मक रचनाही कॉंग्रेसच्या संघटनात्मक रचनेची जुळणारी आहे. त्यातील प्रमुख घटक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील

**राष्ट्रीय कार्यकारणी :**

भाजपाच्या पक्षसंघटनेत राष्ट्रीय कार्यकारिणीस सर्वोच्च स्थान दिसते. राष्ट्रीय कार्यकारिणी पक्षाचे ध्येय-धोरण व कार्यक्रम निश्चित करत असते. राष्ट्रीय कार्यकारिणीच्या नियमित बैठका होतात. पक्षाचा प्रभाव सर्वत्र वाढावा याकरिता या बैठका देशाच्या विविध भागात घेतल्या जातात. राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य व पक्षाचे अध्यक्ष यांची निवड पक्षाच्या वार्षिक अधिवेशनात केली जाते. भारतीय जनता पक्षाची स्थायी समिती असे या कार्यकारिणीचे स्वरूप दिसते. संसदेतील भाजपाच्या सदस्यांची बैठक बोलावणे, निवडणुकीसाठी पक्षाचा जाहीरनामा तयार करणे, विधानसभा व लोकसभा निवडणुकीत करिता पक्षाचे उमेदवार निश्चित करणे यासारख्या महत्त्वपूर्ण कार्याची जबाबदारी या राष्ट्रीय कार्यकारिणीवर असलेली दिसते.

**प्रदेश कार्यकारिणी:**

भाजपाच्या संघटनात्मक बांधणी मध्ये राष्ट्रीय कार्यकारिणीशी लागोलाग प्रदेश कार्यकारणी ची रचना करण्यात आलेली दिसते. घटक राज्यातील पक्ष संघटनेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सदस्य यांचा समावेश प्रदेश कार्यकारणी मध्ये होतो. घटक राज्य स्तरावरील अधिवेशनात प्रदेश कार्यकारिणीचे सदस्य निवडले जातात. घटक राज्यात पक्ष कार्याचा विस्तार करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी या पक्ष कार्यकारिणीवर असते. त्यादृष्टीने प्रदेश कार्यकारणी घटक राज्यातील जनतेच्या मागण्या अपेक्षा संघटित करणे, समस्यांची सोडवणूक करण्याकरिता जन

आंदोलन उभे करणे, विधानसभा निवडणुकीकरिता पक्षाच्या उमेदवारांच्या नावांची शिफारस करणे यासारखी महत्त्वाची कार्य प्रदेश कार्यकारिणीवर सोपवली जातात.

**स्थानीय समित्याः**

स्थानिक पातळीवर संघटनात्मक जाळे प्रभावी रीतीने कार्यान्वित राहावे याकरिता ही भाजपा लक्ष घालताना दिसत आहे त्याकरिता प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हा समिती, तालुकास्तरावर तालुका समिती, मोठ्या शहरांमध्ये नगर समिती व ग्रामीण क्षेत्रात मंडल समिती कार्य करताना दिसते. मंडल समिती हा भाजपाच्या पक्ष संघटनेतील पायाभूत घटक मानला जातो.

**भारतीय जनता पक्षाची ध्येय-धोरणे व विचारसरणी:**

भारतीय जनता पक्षाची ध्येयधोरणे विचारसरणीत स्थापनेपासून आजतागायत विचारप्रणालीच्या स्तरावर मोठ्याप्रमाणात धरसोड वृत्ती आढळते. परंतु ही धरसोड वृत्ती केवळ निवडणुकांच्या राजकारणाचा एक भाग मानावी लागेल. त्यांची मूळ प्रवृत्ती ही जनसंघाच्या तत्त्वज्ञान शी नाते सांगणारी कायम राहिली आहे असे दिसते. त्यातील काही महत्त्वाच्या पैलूंची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

**१) भावात्मक धर्मनिरपेक्षताः**

काँग्रेसच्या धर्मनिरपेक्षतेवर कठोर टीका करत भाजपाने सुरुवातीच्या काळात धर्मनिरपेक्षतेचे नवे प्रतिमान प्रतिपादन केले होते. त्यास त्यांनी 'भावात्मक धर्मनिरपेक्षता' असे संबोधलेले दिसते. ही धर्मनिरपेक्षता स्पष्ट करताना त्यांचे प्रतिपादन असे होते की, निरनिराळ्या धर्माच्या शिकवणी मधून किंवा ऐतिहासिक सांस्कृतिक अनुभव व दृष्टिकोणांमधून उदभूत झालेली जी मुल्ये भारतीय राष्ट्रवादाची सतत अविभाज्य अंग ठरली आहेत ती रुजवणे या धर्मनिरपेक्षतेत अभिप्रेत आहे.

**२) गांधीवादी समाजवाद :**

भाजपाने सुरुवातीच्या कालखंडात भावार्थ धर्मनिरपेक्षते बरोबरीने गांधीवादी समाजवाद या तत्त्वाचा अंगीकार करत असल्याचे जाहीर केले होते. गांधीवादी समाजवाद यातून भांडवलशाही व राज्यवाद यांना पर्याय म्हणून सर्व आर्थिक क्षेत्रात सहकार व विश्वस्त भावना निर्माण करणे या पक्षास अभिप्रेत आहे. या दृष्टिकोनातून सामाजिक व राजकीय जीवनात मूल्यनिष्ठा आणण्याच्या दृष्टीने काही आदर्श व मुल्ये यांच्या पाठीशी सामाजिक मान्यतांचे बळ उभे करणे हा भाजपचा प्रयत्न होता असे दिसते.

**३) एकात्म मानवतावादः**

गांधीवादी समाजवादास अंगीकार करत भाजपाने १९८४ च्या निवडणूका लढवल्या. मात्र या निवडणुकीत भाजपाचा दारुण पराभव झाला. त्यावेळी ऑक्टोबर १९८४ मध्ये पुणे येथे झालेल्या पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत गांधीवादी समाजवादास सोडचिठ्ठी देण्याचे निश्चित केले. व त्या जागी दीनदयाल उपाध्याय प्रणित एकात्म मानवतावादाची " प्रस्थापना करण्याचे ठरले. यावेळी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत भाष्य करताना लालकृष्ण अडवाणी यांनी स्पष्ट केले की, "गांधीवाद व समाजवाद मूलतः अंतर्विरोधी आहेत कारण एकाच भर विकेंद्रीकरणावर तर दुसऱ्याचा भर केंद्रीकरणावर आहे. म्हणून 'गांधीवादी समाजवाद' स्वीकारण्यात पक्षाची झालेली

चूक तेवढी आपण दुरुस्त करीत आहोत. अर्थात हा उदारमतवादी अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वावर लालकृष्ण अडवाणी यांनी टाकलेला दबाव होता असे टीकाकारांना वाटते. हा बदल करून डिसेंबर १९८४ च्या लोकसभेच्या निवडणुकांना भाजपा सामोरा गेला. मात्र तिथेही भाजपाचा दारुण पराभव झाला.

### ४) उदारमतवादी स्वदेशीचा पुरस्कार:

गांधीवादी समाजवादास सोडचिट्टी देऊन दीन दयाल उपाध्याय यांचा एकात्म मानवतावाद स्वीकारूनही फारसा उपयोग होत नाही असे अनुभवास येताच भाजपाने उदारमतवादी स्वदेशीचा नारा पकडला. उदारमतवादी स्वदेशीच्या कार्यक्रमा आधारे भारतभर आपल्या पक्षाचा विस्तार करता येईल व त्यास राष्ट्रवादाची किनार असल्याने जनभावनेचा आवाहन करणे सहज साध्य होईल असा कयास यामागे दिसतो. मात्र या तत्त्वावर ही भाजपा फार काळ कायम राहिलेली आपणास दिसत नाही.

### ५) जमात वादाचा आधार:

१९८९ साली भाजपाच्या वैचारिक पायाभरणीस निर्णायक वळण मिळालेले दिसते. शहाबानू प्रकरणातून निर्माण झालेली जमातवादी राजकारणाची हवा बाबरी राम मंदिर वादाने अधिक उग्र केली. त्याचा सर्वाधिक फायदा भाजपला मिळाला व भाजपाचे वैचारिक हिंदोळ्यावर झुलणे कमी होऊन ते हिंदुत्वाच्या मुद्द्यावर स्थिर झाले. व भारताच्या राजकारणात जमात वादाच्या राजकारणाचे एक दीर्घ पर्व सुरू झाले असे अभ्यासकांना वाटते. राम मंदिर व बाबरी मस्जिद या वादातून निर्माण झालेल्या वातावरणाचा फायदा भाजपला मिळाला. भाजपा १९८९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून राष्ट्रीय राजकारणात उदयास आला. १९८४ साली भाजपाला मिळालेली मतांची टक्केवारी ही केवळ ७.४ होती ती १९८९ साली ११.४ टक्के पर्यंत वाढली. भाजपच्या पाठिंब्यावर जनता दलाचे सरकार सत्तेत आले. व्ही. पी. सिंगानी भाजपाच्या हिंदुत्वाच्या राजकारणास काऊंटर करण्यासाठी मंडल आयोगाच्या अंमलबजावणीचे कार्ड फेकले व देशात मंडल विरुद्ध कमंडल अशी राजकारणाची फाळणी झाली. व्ही पी सिंग ओबीसी मसीह म्हणून पुढे येण्याची भीती भाजपाला होती. त्यामुळे लालकृष्ण अडवाणी यांनी रथयात्रेचे आयोजन करून व्ही पी सिंग यांचा वारू रोखण्याचे धोरण स्वीकारले. बिहारमध्ये रथयात्रा लालूप्रसाद यादव यांनी अडवताच भाजपाने जनता दलाचा पाठिंबा काढून घेतला. त्यानंतरच्या जवळ जवळ सर्व निवडणुका या भाजपाने या आधारावरच लढवलेल्या दिसतात. इंडिया शायनिंग, फील गूड, सबका साथ सबका विकास, हे निवडणूक परत्वे असणारी घोषवाक्य भाजपाच्या निवडणूक जाहीरनाम्याचा भाग असली तरी भाजपाचा मूळ अजेंडा मात्र राम मंदिर जन्मभूमी, ३७० कलम रद्द करणे, तीन तलाक पद्धती व समान नागरी कायद्याची अंमलबजावणी हाच होता. यातील पहिल्या तीन बाबी २०१९ च्या निवडणुकीनंतर भाजपाने प्रत्यक्षात कार्यान्वित केलेल्या दिसतात. तरीही भाजप परिस्थितीप्रमाणे तडजोड करण्यास मागे पुढे पाहत नाही हे १९९६ ते २००४ या कालखंडात प्रत्ययास आले. त्यामुळेच राजकीय अस्पृश्यता विसर्जित करणे भाजपाला शक्य झाले असे म्हणता येईल. जनसंघापासून आजतागायत भाजपाच्या वैचारिक वाटचालीत व ध्येय धोरणांमध्ये जी समान सूत्रे राहिली आहेत त्यात प्रामुख्याने राष्ट्रवाद व राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही प्रणालीशी बांधिलकी, सकारात्मक धर्मनिरपेक्षता, मानवतावाद व मूल्याधिष्ठित राजकारण यावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करणे हा भाजपाच्या ध्येय धोरणांचा एक महत्वाचा भाग असल्याचे अभ्यासकांना वाटते.

**भाजपाची निवडणुकीतील कामगिरी**

| वर्ष | निवडणूक लढविलेल्या जागा | निवडून आलेल्या जागा | मतांची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९८४ | ५३३ | ०२ | ७.७४ |
| १९८९ | ५४५ | ८५ | ११.३६ |
| १९९१ | ५४५ | १२० | २०.११ |
| १९९६ | ५४५ | १६१ | २०.२९ |
| १९९८ | ५४५ | १८२ | २५.५९ |
| १९९९ | ५४५ | १८२ | २३.७५ |
| २००४ | ५४५ | १३८ | २२.१६ |
| २००९ | ५४३ | ११६ | १८.८८ |
| २०१४ | ५४३ | २८२ | ३१.३४ |
| २०१९ | ५४३ | ३०३ | ३७.४६ |

**सारांश:**

भाजपाचे निवडणुकीतील यश निर्विवादपणे नजरेत भरणारे आहे. परंतु या यशामध्ये ही ज्या प्रमाणात भाजपाच्या जागांमध्ये वाढ झाली त्या प्रमाणात मतदानाच्या टक्केवारीत मात्र वाढ झालेली नाही ही बाह्य विचार करावयास प्रवृत्त करणारी आहे असे अभ्यासकांना वाटते. अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांनी जी साधन- सुचिता प्राधान्याने पाळली त्याचा समकालीन भाजपाच्या नेतृत्वाकडे अभाव आहे हे स्पष्टपणे जाणवते. टीकाकारांच्या मते 'स्वच्छ व चरित्रवान पक्ष' ही स्वनिर्मित प्रतिमा हा पक्ष सत्तेपासून दूर होता तोवर उजळ होती. ती आज प्रत्यक्षात तशी राहिलेली दिसत नाही. डॉ. भा. ल. भोळे या संदर्भात भाष्य करताना असे म्हणतात की," भाजपा हा आक्रमक हिंदुत्ववाद यांच्या कचाट्यातून मुक्त झालेला नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची राजकीय आघाडी म्हणूनच तो काम करतो. तो जो पर्यंत स्वतंत्र व स्वायत्त भूमिका घेऊन शकणार नाही आणि तात्पुरत्या व भावनिक प्रश्नांवर उन्माद पसरवू पाहण्र्या शक्तींच्या मागे फरफटत राहील तोपर्यंत त्याला आपला सामाजिक पाया बळकट करता येणार नाही. त्याचा पाया अध्याप ही संकूचित असून हिंदूंमधील ही बरेच लोक त्यांच्यापासून दूर आहेत. असंतुष्ट मतदारांना त्यांच्या हिंदुत्वाच्या आवाहनाची मोहिनी पडल्याने त्यांच्या राजकीय यशाची कमान उंचावली हे खरे असले तरी व्यापक तत्त्वविचार व कार्यक्रम यावर आधारित समंजस राजकीय पक्ष अशी जर आपली प्रतिमा तो तयार करू शकला नाही तर त्याला मागच्या निवडणुकीत मिळाला तो पाठिंबा टिकवून ठेवता येणार नाही, वाढवणे तर दूरच राहिले.

### ३) भारतीय कम्युनिस्ट पक्ष :

स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतीय राजकारणात राष्ट्रीय स्तरावर साम्यवादी पक्ष कार्यरत असलेला दिसतो. १९१७ साली रशियामध्ये जी बोल्शेव्हिक क्रांती झाली, त्या क्रांतीने जगातील अनेक मुक्तीवादी तरुणांना, समूहांना आकर्षित केले. भारतातील तरुणाई ही मोठ्या प्रमाणात रशियन क्रांतीने मोहरुन गेली होती. त्यातून भारतात साम्यवादी पक्षाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

स्वातंत्र्योत्तर काळात साम्यवादी पक्षाचे दोन प्रमुख गट संसदीय राजकारणात सक्रिय झाले. दोन्ही गटांना राष्ट्रीय राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली. त्यातील एक गट म्हणजे भारतीय साम्यवादी पक्ष हा होय. भारतीय राजकारणातील डाव्या विचारांचा प्रभाव व मर्यादा अभ्यासताना भारतीय साम्यवादी पक्षाचा अभ्यास करणे ही अपरिहार्य ठरते. भारतीय साम्यवादी पक्ष व भारतीय साम्यवादी पक्ष (मार्क्सवादी) या दोनही राजकीय पक्षांचा अभ्यास करण्याअगोदर भारतातील मूळ साम्यवादी पक्षाची वाटचाल ही अभ्यासणे गरजेचे ठरते.

**भारतातील साम्यवादी पक्षाची स्थापना व विकास:**

साम्यवादी विचारांना मानणारे गट भारतात १९२१ साला पासूनच कार्यरत झालेले दिसतात. मात्र १९२५ साली कानपूर ठिकाणी भरलेल्या पहिल्या साम्यवादी संमेलनात "सेंट्रल कमिटी" ची स्थापना होऊन भारतात हा राष्ट्रीय पातळीवरील राजकीय पक्ष अस्तित्वात आला. १९३० साली हा पक्ष जागतिक स्तरावर साम्यवादाचा प्रसार करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या 'कॉमिन्टर्न' शी संलग्न झाला. १९३३ पासून भारतात साम्यवादी पक्षाने अधिकृत रित्या कामकाजास सुरुवात केली. १९३३ पूर्वी साम्यवादी पक्षातील अनेक नेते काँग्रेसमध्ये मोठ्या पदावर कार्यरत असलेले दिसतात.

साम्यवादी पक्षाच्या दृष्टीने तत्त्व वैचारिक पेच प्रसंग स्वातंत्र्यपूर्व काळातच दुसऱ्या महायुद्धादरम्यान उद्भवलेला दिसतो. दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा साम्यवादी पक्षाने या युद्धात साम्राज्यवादी युद्ध म्हणून विरोध केला. या युद्धाचा तीव्र शब्दात निषेध केला. मात्र जर्मनीने सोव्हिएट रशियावर आक्रमण केल्यानंतर व सोव्हिएट रशिया इंग्लंडच्या बाजूने युद्धात उतरल्यानंतर मात्र साम्यवादी पक्षाची भूमिका बदली व हे साम्राज्यवादी युद्ध साम्यवादी पक्षाने लोक युद्ध म्हणून घोषित केले. ब्रिटिश राज्यकर्त्याशी काँग्रेसचे असहकाराचे धोरण नाकारून सहकार्य करण्याचे आवाहन करावयास सुरुवात केली. दुस्रया महायुद्धाच्या समाप्तीनंतर पं. जवाहरलाल नेहरू यांनी साम्यवादी नेत्यांच्या या भूमिकेचा समाचार घेताना २४ ऑक्टोबर १९४५ रोजी म्हटले होते, ''भाकपा च्या हातून साम्यवादाची अपरिमित हानी झाली आहे. आपल्या कारवायांनी भाकपणे शंभर टक्के राष्ट्रवाद्यांचे शत्रुत्व ओढवून घेतले आहे. जेव्हा हजारो भारतीय देशासाठी प्राणपणाने लढत होते तेव्हा साम्यवादी हे विरोधी गटात होते हे विसरता येणार नाही. "

स्वातंत्र्योत्तर काळातही साम्यवादी पक्षाने भारतात सशस्त्र बंड करण्याचे अपयशी प्रयत्न केले असे म्हटले जाते. प्रामुख्याने प. बंगाल, केरळ, आंध्र प्रदेशात झालेल्या हिंसक आंदोलनात साम्यवादी पक्षाचा हात होता असे म्हटले जाते. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीरनाम्यात साम्यवादी पक्षाने नेहरू सरकारवर लोकशाहीविरोधी व साम्राज्यवादाचे हस्तक अशा शब्दात टीका केली होती. त्याविरोधात श्रमिक, छोटे शेतकरी, कष्टकरी, बुद्धिजीवी व राष्ट्रीय बुझ्र्वा या वर्गानी संघटित व्हावे असे आवाहनही साम्यवादी पक्षाकडून करण्यात आले होते. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत साम्यवादी पक्षास ५.४ टक्के मते व २७ जागा मिळाल्या. त्याच बरोबर मद्रास, कोचीन, प. बंगाल, हैदराबाद या राज्यांमध्ये साम्यवादी पक्षास चांगला जनाधार प्राप्त झाला. तीन टक्क्यांपेक्षा अधिक मते निवडणुकीत मिळाल्याने राष्ट्रीय पक्ष म्हणून साम्यवादी पक्षास अधिकृत मान्यता मिळाली.

१९५७ च्या निवडणुकीत साम्यवादी पक्षाची मतांची टक्केवारी दुपटीने वाढली. २७ जागा जिंकत साम्यवादी पक्षाने आपले स्थान भक्कम केले होते. केरळमध्ये साम्यवादी पक्षाने इतर पाच पक्षांच्या मदतीने देशातील पहिले आघाडी सरकार ही स्थापन केले होते. परंतु अंतर्गत बंडाचे

कारण देत १९५९ साली नेहरू सरकारने ते सरकार बरखास्त केले. याच सुमारास भारत-चीन युद्धाचे सावट निर्माण झाले. साम्यवादी पक्षात त्यावरून गटांचे राजकारण सक्रिय झाले. परिणामी केरळमधील फेर निवडणुकीत साम्यवादी पक्षाचा पराभव झाला.

**पक्षांतर्गत फूट :**

साम्यवादी पक्षात सुरुवातीपासूनच पक्षीय निर्णय प्रक्रियेत रशियाच्या प्रभावावरून मतभेद होते. एक गट जो रशियाचा प्रभाव निर्णय प्रक्रियेवर मान्य करत होता तो पी. सी. जोशी, अजय घोष, कॉ. डांगे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत होता तर दुसरा गट रशियाचे अंधानुकरण करण्यास तयार नव्हता तो अधिक जहाल व आक्रमक धोरणांची आग्रही मांडणी करत होता. तो गट नंबुद्रीपाद, ज्योती बसू व सुंदरय्या यांच्या नेतृत्वाखाली संघटित होता. या पार्श्वभूमीवर १९५६ साली झालेल्या साम्यवादी पक्षाच्या चौथ्या अधिवेशनात पी.सी. जोशींच्या म्हणजे पहिल्या गटाच्या भूमिकेवर पक्षाने शिक्कामोर्तब केल्याने दुसरा गट अधिकच दुरावला. दुसरा गट हा चीनच्या अधिक प्रभावाखाली गेला. या दरम्यान मॉस्को मध्ये जगातील ८१ राष्ट्रांची आठवी परिषद भरविण्यात आली होती. या परिषदेत रशिया व चीन यांच्यातील मतभेद अधिक तीव्र स्वरूपात पुढे आले. त्याचा परिणाम भारतीय गट बाजाची ही धार अधिक तीव्र झाली. पहिल्या गटाने रशियाची र दुसर्या गटाने चीनची बाजू उचलून धरली. एप्रिल १९६१ मध्ये कॉ. डांगे व अजय घोष यांनी साम्यवादी पक्षाच्या वार्षिक अधिवेशनात काँग्रेसमधील डाव्या शक्तींच्या सहकार्याने 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी' स्थापन करून समाजवादाच्या दिशेने वाटचाल करावी असा प्रस्ताव मांडला होता. परंतु चीन वादी गटाने काँग्रेस पक्षाविरोधात साम्यवादी पक्षाची ऐक्य साधून 'लोकांची लोकशाही' स्थापन करण्याच्या उद्दिष्टांवर भर दिला. अधिवेशनाने परत पहिल्या गटाच्या भूमिकेस पाठिंबा दिला. निवडणूक जाहीरनाम्यात ही पहिल्या गटाची सरशी झाली त्यामुळेही दुरी अधिकाधिक रूंदावत गेली.

साम्यवादी पक्षात निर्माण झालेल्या या गटांना एकत्र करण्याचा वा एकत्र ठेवण्याचा प्रयत्न पक्षातील काही सदस्यांनी परोपरीने केला. मात्र चीनने भारतावर आक्रमण केल्यानंतर मात्र हे मतभेद टोकाला गेले. ऑक्टोबर १९६२ ला चीनने भारतावर आक्रमण केले. चीनच्या आक्रमणाचा व घुसखोरीचा भारतातील सर्व राजकीय पक्षांनी निषेध केला. परंतु साम्यवादी पक्षातील दुसरा गट चीन चा निषेध करण्यास तयार नव्हते. समाजवादी देश कधीच आक्रमण करू शकत नाहीत असा त्यांचा यामागे युक्तिवाद होता. सरकारने या जहाल डाव्या ३५० कार्यकर्त्यांना त्यावेळी अटक केली. ज्योती बसू, सुंदरय्या यांनी साम्यवादी पक्षाचे राजीनामे दिले व ते पक्षातून बाहेर पडले दुसऱ्या गटाच्या चीन धार्जिण्या भूमिकेमुळे साम्यवादी पक्षाची प्रतिमा मलीन झाली आहे अशी पहिल्या गटाची भावना झाली. ही प्रतिमा पुसून काढण्यासाठी कॉ. डांगे यांनी चीन विरोधी भाषणे द्यावयास सुरुवात केली. तेव्हा प. बंगालमधील साम्यवादी पक्षाच्या प्रांतिक कार्यकारिणीने १९२४ साली कॉ. डांगे यांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांना लिहिलेले माफीनामे प्रसिद्ध केले. ही पत्रे बनावट असल्याचा युक्तिवाद पहिल्या गटाने केला. ११ एप्रिल १९६४ रोजी या पत्रांवर चर्चा करण्याकरिता राष्ट्रीय परिषदेची बैठक भरली. कॉ. डांगे यांनी अध्यक्षपदी राहू नये ही दुस्रया गटाची मागणी मान्य न झाल्यामुळे नंबुद्रीपाद, ए. के. गोपालन सह ३२ सदस्यांनी सभात्याग केला. उर्वरित सभासदांनी पत्र बनावट असल्याचा ठराव करून ३८ सभासदांवर पक्ष शिस्तीची कारवाई करून निलंबित केले. व अशा पद्धतीने साम्यवादी पक्षातून दोन राजकीय पक्ष पुढे विकसित झाले.

## भारतीय साम्यवादी पक्षाचे ध्येय - धोरण :

भारतीय साम्यवादी पक्षाचे ध्येय व धोरणे अभ्यासताना त्यांच्या भूमिकांचे दोन पर्वां मध्ये विभाजन करणे आवश्यक वाटते. एक पर्व हे काँग्रेस समर्थनाचे पर्व आहे तर दुसरे पर्व हे काँग्रेस विरोधाचे पर्व आहे. त्याची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

### १) काँग्रेस समर्थनाचे पर्व:

साम्यवादी पक्षात फूट पडल्यानंतर भारतीय साम्यवादी पक्षाने काँग्रेससोबत जाण्याची धोरण स्वीकारलेले दिसते. आपल्या भूमिकेचे समर्थन करताना त्यांनी असा युक्तिवाद पुढे केला की, ''भारतासारख्या देशात शांततामय मार्गाने समाजवादाचे ध्येय साध्य करून पाहण्यात मार्क्सवाद लेनिन वादाशी विसंगत असे काही नाही. भारतात सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची तरतूद आहे. लोक लढ्यास अनुकूल वातावरण आहे, क्रांतीसाठी येथे सशस्त्र उठावाची व रक्तरंजित मार्गाचा अवलंब करण्याची आवश्यकता नाही. जागतिक परिस्थिती साम्राज्यशाही प्रक्रिया देशात आयात करण्यास अनुकूल नाही, राष्ट्रीय लोकशाही क्रांतीच्या लढ्यात एकत्र आलेल्या वर्गाच्या तुलनेत क्रांती विरोधी शक्तींचा सामाजिक पाया फारच संकुचित आहे. त्यामुळे त्यांना एकाकी पाडणे फारसे कठीण नाही. भारतीयांनी स्वातंत्र्यलढ्यातून जे हक्क पदरात पाडून घेतले आहेत त्यांच्या कक्षा लोकशाहीच्या मार्गाने विस्तारनेच अधिक श्रेयस्कर होणार आहे. वेळ पडली तर हिंसेच्या मार्गाचा अवलंब करण्यास पक्षाचा विरोध नव्हता परंतु त्यांच्या मते भारतात तशी वेळ आलेली नव्हती.''

भारतीय साम्यवादी पक्षाच्या या भूमिकेचे विश्लेषण मांडताना डॉ. भा. ल. भोळे लिहितात, ''भारतीय साम्यवादी पक्षाने भारतीय परिस्थितीचे केलेले विश्लेषण असे होते की भारतात क्रांतीची अवस्था साम्राज्यशाही विरोधी, सरंजामशाही विरोधी लोकशाही क्रांती ची आहे. त्यामुळे भारतीय कम्युनिस्टांचे लगेच चे उद्दिष्ट समाजवादाची संस्थापना हे नसून राष्ट्रीय लोकशाही संक्रमणावस्थेला चालना देण्याचेच असले पाहिजे. त्यामुळेच नेहरू सरकारला पक्षाने पाठिंबा दिला होता. सिंडिकेट च्या प्रतिगामी शक्तींच्या विरोधात श्रीमती गांधींचे समर्थन केले होते. काँग्रेसमधील फुटींचे स्वागत केले होते आणि आणीबाणीचा पुरस्कारही केला होता.''

### २) काँग्रेस विरोधी पर्व :

१९७७ च्या निवडणुकीत काँग्रेस सोबतिचा फटका भारतीय साम्यवादी पक्षास ही बसल्यानंतर भारतीय साम्यवादी पक्षात काँग्रेस सोबतीच्या फेर विचारांची सुरुवात झाली. १९७८ च्या भटिंडा परिषदेनेच याचा प्रथम उच्चार झाला. या परिषदेतच पक्षाने अशी भूमिका घेतली की, ''साम्राज्यवादी शक्तींच्या नव वसाहत वादाशी एका बाजूने तर दुसऱ्या बाजूने बूझर्वा सरकारच्या आर्थिक धोरणाशी अशी दुहेरी लढत द्यावी लागणार आहे. १९८२ पासून या भूमिकेचा आधार अधिकाधिक प्रबळ बनत गेला. काँग्रेस विरोधाच्या धोरणात इतर लोकशाही गट व वर्ग यांची एकजूट किसान कामगारांच्या लढ याद्वारे उभी करून केंद्रातील बूझर्वा सरकारच्या जागी लोकशाही जुटीचे सरकार सत्तेवर आणायचे असे ठराव या पक्षाने केले. १९८६ ते १९९६ पर्यंतच्या सर्व निवडणुकांमध्ये भारतीय साम्यवादी पक्षाचा रोग हा काँग्रेसच्या अति केंद्रित, जुलमी व जनविरोधी भांडवलशाही व भ्रष्ट कारभारावर तसेच जमातवादी शक्तींवर होता असे दिसते.''

## भारतीय साम्यवादी पक्ष- निवडणुकीतील कामगिरी

| वर्ष | निवडणूक लढविलेल्या जागा | निवडून आलेल्या जागा | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९५२ | ४९ | १६ | ३.२९ |
| १९५७ | १०९ | २७ | ८.९२ |
| १९६२ | १३७ | २९ | ९.९४ |
| १९६७ | १०९ | २३ | ५.११ |
| १९७१ | ८७ | २३ | ४.७३ |
| १९७७ | ९१ | ०७ | २.८२ |
| १९८० | ४७ | १० | २.४९ |
| १९८४ | ६६ | ०६ | २.७० |
| १९८९ | ५० | १२ | २.५७ |
| १९९१ | ४३ | १४ | २.४८ |
| १९९६ | ४३ | १२ | १.९७ |
| १९९८ | ५८ | ०९ | १.७५ |
| १९९९ | ५४ | ०४ | १.४८ |
| २००४ | ३४ | १० | १.४७ |
| २००९ | ५६ | ०४ | १.४३ |
| २०१४ | ६७ | ०१ | ०.७८ |
| २०१९ | ४९ | ०२ | ०.५८ |

सारांश, भारतातील डाव्या आघाडीतील एक महत्त्वाचा घटक पक्ष म्हणून भारतीय साम्यवादी पक्षाची स्थान महत्त्वपूर्ण आहे. कॉम्रेड डांगे, अरविंद घोष, संदरमय्या यांसारखे नेते भारतीय साम्यवादी पक्षास लाभले. मार्क्सवादाची अनु न्यायाची भूमिका न स्वीकारता भारतीय संदर्भात संसदीय लोकशाही प्रणाली चा हिरिरीने स्वीकार करणारा हा डावा पक्ष सर्वात उजवा म्हणावा लागेल. मार्क्सवाद खास भारतीय संदर्भ देऊन समाजवादी क्रांतीचा कार्यक्रम तयार करण्याचे प्रामाणिक प्रयत्न या पक्षाच्या धुरीणांकडून कडून झाले. मात्र त्यात त्यांना फारसे यश प्राप्त झाले नाही. काँग्रेससोबत साथ-संगत करण्याचे त्यांचे धोरण हे त्यांच्या स्व विस्तारात मोठा अडथळा

ठरला. त्यानंतरच्या काळात मार्क्सवादी पक्षाचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत गेला व त्या सावलीतच भारतीय साम्यवादी पक्ष आजही कार्यरत असल्याचे दिसते.



## २) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षः

भारतीय राष्ट्रीय राजकारणातील सर्वात महत्त्वाचा डाव्या आघाडीतील पक्ष म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा उल्लेख करावा लागेल. साम्यवादी पक्षात फूट पडून जो जहालांचा गट बाहेर पडला त्या गटाने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. भारतीय साम्यवादी पक्षाची भूमिका ही संसदेतील जास्तीत जास्त जागा जिंकून संसदेलाच जन इच्छेचे व सामाजिक आर्थिक परिवर्तनाचे साधन करावे असा होता. भाकपचे दृष्टिकोन या जहाल गटास मान्य नव्हता. त्यांच्या मते, “राज्यकर्ते स्वेच्छेने सत्तेवर ची आपली पकड सोडावयास तयार होणे शक्य होणार नाही. सत्ते करिता ते जन इच्छेला ही ठोकरतील. त्यासाठी वेळप्रसंगी बळाचा ही वापर करतील. त्यामुळे आपण क्रांतिकारक शक्तींनी सदैव सावध चित्त राहून येईल त्या प्रसंगात तोंड देण्याची तयारी ठेवली पाहिजे.” या भूमिकेतून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची पायाभरणी झाली. पुढील काळात प. बंगाल, केरळ, त्रिपुरा यासारख्या राज्यांमध्ये माकप ला मोठा जनाधार मिळाला. भारतीय राष्ट्रीय राजकारणात ही २००४ साली भाजपाची घोडदौड रोखण्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने महत्त्वाची भूमिका बजावली. नंतरच्या काळात मात्र मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या प्रभावास उतरती कळा लागलेली दिसते. त्याची कारणमीमांसा करणे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ध्येय धोरण अभ्यासणे, भारतीय राजकीय प्रक्रियेतील त्यांची भूमिका अवलोकन करणे हे भारतीय पक्ष पद्धती च्या एकूण अभ्यासात अपरिहार्य ठरते.

### मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष स्थापनाः

आध्र प्रदेशातील तेनाली या गावात १ ते १२ जुलै या काळात साम्यवादी पक्षाच्या अधिवेशनात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. या अधिवेशनात भारतीय राज्य सत्तेच्या विरुद्ध अनिवार्य संघर्ष, काँग्रेस पक्षाची कोणत्याही परिस्थितीत सहकार्य वर्ज्य, सर्व राष्ट्रभक्त शक्तीच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीची प्रतिष्ठापना, नव साम्राज्यवादी व आक्रमक अमेरिकी कारवायांना वाव देणाऱ्या नेहरू प्रणित धोरणांना विरोध अशा काही तत्त्वांचा व कार्यक्रमाचा या अधिवेशनात पुनरुच्चार करण्यात आला. आठ सप्टेंबर रोजी संसदेतील अकरा साम्यवादी सदस्यांनी ए के गोपालन यांच्या नेतृत्वाखालील आपला वेगळा गट केला. १४ तारखेचा राष्ट्रीय परिषदेने तेनाली परिषदेस उपस्थित असलेल्या सर्वांना साम्यवादी पक्षातून बडतर्फ केल्याचे घोषित केले. २५ सप्टेंबर १९६४ रोजी निवडणूक मंडळाने केरळातील येत्या निवडणुकांकरिता स्वतंत्र पक्ष म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षास मान्यताही दिली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या १/३ पेक्षा अधिक सदस्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. आंध्र प्रदेश, केरळ व प. बंगाल या राज्यात माकपास मोठा पाठिंबा मिळाला. राज्य विधानसभा मधील साम्यवादी पक्षाचे १७० पैकी ४९ सदस्य माकप मध्ये प्रविष्ट झाले व अशा पद्धतीने एका नव्या जहाल डाव्या राजकीय पक्षाचा भारतीय राजकारणात प्रवेश झाला.

### माकपा ची ध्येय धोरणे :

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने १९६४ सालीच आपली ध्येय व धोरणे स्पष्ट करणारा कार्यक्रम लगेच जाहीर केला. “लोकांचे लोकशाही व समाजवादी परिवर्तन घडवून आणण्याकरता हा पक्ष शांततापूर्ण मार्गांनी प्रयत्न करेल” असे जाहीर केले. त्यादृष्टीने १९६७ च्या नंतरच्या काळात अस्तित्वात आलेल्या काँग्रेस विरोधी असणाऱ्या विरोधी पक्षांच्या आघाड्यांमध्ये माकप सक्रिय

झाला. मूलभूत महत्त्वाच्या मुद्यांना किमान कार्यक्रमा आधारे सर्व डाव्या पक्षांनी एकत्र येण्यावर माकप ने अधिक भर दिला. त्या माध्यमातून प बंगाल व केरळ मध्ये आघाडी करून सरकार ही स्थापन करण्यात आली. साम्राज्यशाही विरोध, सामंतशाही विरोध व हुकुमशाही विरोध ही माकप ची त्रिसूत्री होती. १९६९ च्या निवडणुकीत माकप ने जाहीर केलेल्या जाहीरनाम्यात बँकेचे, मक्तेदारीचे व इतर औद्योगिक उत्पन्न यांचे राष्ट्रीय करण, राज्यांना अधिक स्वायत्तता, संपूर्ण घटना बदलून टाकने, सामर्थ्यशाली जन चळवळ उभारणे, सर्व खाजगी व परकीय शक्तींचे राष्ट्रीय करण करणे, कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करून घेणे, चीन व पाकिस्तानशी मैत्री, राष्ट्रकुलाचा त्याग, साम्राज्यशाहीशी अखंड लढा या सारख्या तत्वांना प्राधान्य दिले होते.

## जनता पक्ष व आणीबाणी काळातील भूमिका :

१९७४ साली जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली भारतात केंद्र सरकार विरोधी मोठे आंदोलन उभे राहिले. १९७५ साली राष्ट्रीय आणीबाणी ची घोषणा झाली. १९७७ साली आणीबाणी च्या नंतर अस्तित्वात आलेल्या जनता पक्षाशी समावेत असणारे माकपा चे संबंध. या तीनही घटकांशी माकपा ने आपले वैशिष्टपूर्ण भूमिका घेतलेली दिसते. १९७४ साली जयप्रकाश नारायण यांनी सुरू केलेल्या चळवळीस माकपा ने पाठिंबा जाहीर केला, मात्र त्या चळवळीत प्रत्यक्ष सहभाग घेण्याचे टाळले. आणीबाणीस त्यांनी स्पष्ट विरोध केला. व त्यासाठी माकपा च्या नेत्यांनी तुरुंगवासही भोगला. मात्र या मुद्द्यावरून त्यांनी भाकपशी कोणताही संवाद साधण्यास नकार दिला. १९७७ च्या निवडणुकीत माकप जनता पक्षाचा एक मित्र पक्ष म्हणून निवडणुकीत सहभागी झाला. मात्र या पक्षात विलीन होणे वा त्यांचा कार्यक्रमच आपला कार्यक्रम म्हणून स्वीकारला नाही. आपला बारा कलमी कार्यक्रम या निवडणुकीत माकप ने घोषित केला. त्यात प्रामुख्याने आणीबाणी रद्द करणे, सर्व राजकीय स्थानबद्धांची मुक्तता करणे, लोकशाही अधिकाऱ्यांची, त्याचबरोबर कामगार संघटनांच्या अधिकारांची पुन्हा प्रतिष्ठापना करणे, सामूहिक वाटाघाटींच्या अधिकारांचा आग्रह धरणे, मूलभूत अधिकारांच्या यादीत रोजगाराचा हक्क समाविष्ट करणे यासारख्या आणीबाणी शी निगडीत असणाऱ्या बाबींचा त्यांनी आपल्या जाहीरनाम्यात समावेश केला होता.

## अधिसत्ताक विरोधी व्यापक आघाडीची भूमिका:

१९८२ साली माकपा ने आपल्या तत्वे वैचारिक स्वरूपामध्ये मोठे बदल स्वीकारलेले दिसतात. त्यादृष्टीने १९८२ च्या विजयवाडा अधिवेशनात माकपा ने "अधसित्ताक विरोधी " व्यापक आघाडी बांधण्याचा निर्णय घोषित केला. ही आघाडी ची त्यांची कल्पना इतकी व्यापक होती की हिंदू जमातवादी पक्ष म्हणून टीकेचे लक्ष केलेल्या भाजपसारख्या पक्षांनाही ते या आघाडीत सामील करून घेण्यास तयार होते. त्याचबरोबर "डाव्या लोकशाही आघाडीचा " ही प्रयत्न माकपा च्या बाजूने चालूच होता. कोलकत्ता येथे भरलेल्या १९८०च्या बाराव्या अधिवेशनात माकपा ने या दुहेरी धोरणाचा पुनरुच्चार केला. परंतु पुढे १९९२ साली मद्रास येथे भरलेल्या पक्षाच्या १४ व्या अधिवेशनात यात मोठे धोरणात्मक बदल करणे माकपा ला भाग पडले. कारण १९९१ च्या रशियाच्या पतनानंतर जगभरातील साम्यवादी पक्षांना एक प्रकारे हादरा बसला होता. सोव्हिएट रशियाचे पतन, पूर्व युरोप मधील साम्यवादी राजवटींचा अस्त, चीनच्या आर्थिक धोरणांमध्ये झालेला बदल यामुळे माकपा ने ही काही धोरणात्मक व कार्यक्रमात्मक दुरुस्त्या केल्या. या नव्या धोरणामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने नव्या आर्थिक धोरणाविरुद्ध चा जनसंघ तसेच केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांचा मुकाबला करण्या इतकाच पक्षाचा भर जमात वादाच्या प्रामुख्याने संघ परिवार व भाजप यांच्या हिंदू जमातवादास प्रतिकार करण्यावर

होता. भारताच्या धर्मनिरपेक्ष व लोकशाही संविधानावर चे हे सर्वात मोठे गंडांतर आहे अशी पक्षाची यामागे भूमिका आहे. याकरिता माकपा ने राष्ट्रासमोरील कार्याची यादी प्रसिद्ध करून त्यात राष्ट्रैक्याचे फुटीर, जमातवादी व विघटनवादी शक्तींपासून रक्षण, पंजाब, काश्मीर व आसामच्या प्रश्नांची राजकीय सोडवणूक, लोकांच्या रास्त मागण्यांची पूर्तता, बाबरी मशीद राम जन्मभूमी वादाची सोडवणूक व अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण हा माकपा ने आपला प्राधान्यक्रम निश्चित केला होता.

**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची निवडणुकीतील कामगिरी:**

| वर्ष | निवडून आलेल्या जागा | एकूण मतांची टक्केवारी |
|---|---|---|
| १९६७ | १९ | ४.२९ |
| १९७१ | २५ | ५.१२ |
| १९७७ | १७ | ४.२९ |
| १९८० | ३७ | ५.१७ |
| १९८४ | २२ | ५.८७ |
| १९८९ | ३३ | ६.५५ |
| १९९१ | ३५ | ६.१४ |
| १९९६ | ५२ | ९.१० |
| १९९८ | ३२ | ५.४ |
| १९९९ | ३३ | ५.४० |
| २००४ | ४३ | ५.६६ |
| २००९ | १६ | ५.३३ |
| २०१४ | ११ | ३.२५ |
| २०१९ | ०३ | १.७५ |

सारांश, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा भारतीय राष्ट्रीय राजकारणातील एक महत्त्वाचा पक्ष आहे. साम्यवादी पक्षातून आपल्यात जहाल धोरणांच्या आग्रहातून या पक्षाची निर्मिती झाली असली तरी नंतरच्या काळात माकपा ने ही संसदीय लोकशाहीच्या प्रतिमानासच परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन मानले आहे. नव साम्राज्यवाद व जमातवाद या दोन्ही आघाड्यांवर लढा दिल्याशिवाय भारताचे राष्ट्रैक्य अबाधित राहणार नाही हे या पक्षाचे निदान अधिक योग्य वाटते. तरीही जाहीरनाम्यातील या पक्षाची तत्व वैचारिक भूमिका व प बंगाल मधील २५ वर्षापेक्षा अधिक काळ अस्तित्वात असलेल्या माकपच्या राजवटीने प्रत्यक्ष अवलंबलेली धोरणे यातील अंतर्विरोध

स्पष्टपणे प्रत्ययास येतात. ज्या ध्येये धोरणांनी साम्यवादी पक्षातून हा गट बाहेर पडला त्या ध्येयधोरणांना माकपा ने लवकरच सोडचिठ्ठी दिलेली दिसते. परिणामी माकप मधील अति जहाल गट मार्क्सवादी लेनिन वादी गटाच्या स्वरूपात बाहेर पडून त्याने नक्षलवादाचे स्वरूप धारण केलेले दिसते. हा एक प्रकारे माकपा च्या धोरणांचा परिपाक होय अशी टीका अभ्यासकांकडून केली जाते.

**बहुजन समाज पार्टी (BSP) :**

१४ एप्रिल १९८४ रोजी दलित नेते कांशीराम यांनी बहुजन समाज पार्टीची स्थापना केली. दलित, मागासवर्गीय, बहुजन समाजाचे होणारे आर्थिक व सामाजिक शोषण थांबविण्याकरिता, त्यांच्या सामाजिक व राजकीय जाणीव जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने बहुजन समाज पार्टी ची स्थापना करण्यात आल्याचे त्यांनी घोषित केले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजास राज्यकर्ती जमात बनण्याचे जे आवाहन केले होते त्यास मूर्त स्वरूपात कार्यान्वित करण्याचे ध्येय घेऊन कांशीराम यांनी बहुजन समाज पार्टी ची उभारणी केली. अल्पावधीतच बहुजन समाज पार्टीस अखिल भारतीय स्तरावर ही जनमान्यता मिळाली व उत्तर प्रदेशच्या राजकारणापासून सुरुवात केलेल्या या पक्षाने पंजाब, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, दिल्ली, बिहार यासारख्या राज्यांमध्ये निवडणुकीच्या राजकारणात मोठा प्रभाव निर्माण केला. भारतीय राजकारणात दलित- ओबीसी- अल्पसंख्यांक या समूहांचे प्रतिनिधीत्व करत कांशिराम यांच्या नंतर पक्षाची सूत्रे हाती घेतलेल्या मायावती यांनी "सोशल इंजिनिअरिंगचा " प्रयोग प्रभावीपणे राबवला. ज्यामुळे संबंध भारतीय राजकारणास एक वेगळे वळण लागले. त्यादृष्टीने बहुजन समाज पार्टी चा विकास, ध्येयधोरणे, व निवडणुकीय राजकारणातील कामगिरी यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**बहुजन समाज पार्टीची पार्श्वभूमी:**

कांशीराम यांनी हिंदी भाषिक प्रदेशात सुरू केलेल्या फुले- शाहू- आंबेडकरवादी चळवळीतील तिसरा टप्पा म्हणजे बहुजन समाज पार्टीची स्थापना होय असे मानले जाते. कांशीराम हे पंजाब मधील रामदासिया परिवारात जन्मास आले. पंजाब मधील चांभारजाती समूहाने शीख धर्म स्वीकारला. या समुदायास तेथे रामदासिया असे संबोधन वापरले जाते. कांशीराम नोकरीनिमित्त १९६०च्या दशकात महाराष्ट्रात पुणे येथे आले. त्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षाची त्यांच्या पश्चात अनुयायांकडूनच वाताहात सुरू होती. गटामध्ये रिपब्लिकन पक्ष विखुरला जात होता. आंबेडकरी पक्षाची हि झालेली वाताहात आंबेडकरी चळवळीतील मध्यम वर्गीय विशेषतः नोकरदार वर्गास सलणारी बाब ठरली. कांशीराम यांना ही जाणीव प्रकर्षाने झाली. या जाणिवेतूनच त्यांनी नोकरीचा राजीनामा देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रसारार्थ वाहून घेण्याची प्रतिज्ञा केली.

कांशीराम यांच्या पुढाकाराने बामसेफ या संघटनेची स्थापना झाली. हा बहुजन समाज पार्टीच्या स्थापनेतील पहिला टप्पा मानला जातो. अनुसूचित जाती, जमाती, मागास व अल्पसंख्यांक प्रवर्गातील कर्मचाऱ्यांचे हे संघटन त्यांनी महाराष्ट्रातूनच बांधावयास सुरुवात केली. आरक्षणाचे व महापुरुषांच्या आंदोलनाचे लाभ मिळवून संपन्न झालेल्या कर्मचाऱ्यांनी वेळ, बुद्धी व पैसा देऊन समाजाचे ऋण फेडावे अशा पद्धतीची Payback to society संकल्पना काशीराम यांनी मांडली. कांशीराम यांनी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांमध्ये जाऊन चळवळीसाठी निधी उभा केला. त्याचा चोख हिशोब ही ठेवला. बामसेफच्या कार्याकरिता पूर्ण वेळ देणारे कार्यकर्ते घडविण्यास त्यांनी सुरुवात केली. बामसेफ च्या माध्यमातून आंबेडकरी विचारांचे वैचारिक साहित्य तयार करण्याची, असणारे पूरक साहित्य लोकांपर्यंत पोहोचविण्याची मोहीम राबवली गेली. ज्यातून

वैचारिक स्पष्टता व बांधिलकी निर्माण होण्यास मदत झाली. सुरुवातीच्या काळात बामसेफ हे संघटन एका बाजूने कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जीवनातील काही गरजा पूर्ण करण्यास हातभार लावत होती, तर दुसऱ्या बाजूने आंबेडकरी चळवळीशी निष्ठा रुजविण्याचे कार्यही करीत होती. बामसेफ लाही पैसा, वेळ व बुद्धी देऊन समाज ऋण फेडण्याचे समाधान बामसेफ मधील कर्मचाऱ्यांना मिळू लागले. मात्र बामसेफी कर्मच्रयांची संघटना असल्यामुळे त्यावर काही मर्यादा ही होत्या. या मर्यादांच्या जाणिवेतूनच कांशीराम यांनी आपल्या आंदोलनास दुसऱ्या टप्प्यावर नेण्याचे निश्चित केले.

बामसेफ ही कर्मचाऱ्यांची संघटना असल्याकारणाने रस्त्यावरील आंदोलनाचे कार्यक्रम या संघटनेच्या माध्यमातून पार पाडले जाऊ शकत नाहीत ही जाणीव कांशीराम यांच्याकडे होती. बामसेफ मे आपली मूळ घट्ट रोवल्यानंतर कांशीराम यांनी आपल्या आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यावर दलित शोषित समाज संघर्ष समिती ( डी. एस. फोर) स्थापना केली. ब्राह्मण, बनिया, ठाकूर, चोर बाकी सब है डी एस फोर अशी कांशीराम यांची घोषणा होती.

निवडणुकीच्या राजकारणात उतरण्यासाठी अधिकृत राजकीय पक्षाची स्थापना करून बहुजन समाजाच्या राजकीय जाणिवांना जागृत करणे त्यांना आवश्यक वाटले. राजकीय सत्ता प्राप्ती शिवाय बहुजन समाजाचे प्रश्न सुटणार नाहीत याची प्रखर जाणीव बहुजन समाज पार्टी स्थापण्याच्या मागे होती असे दिसते.

**बहुजन समाज पार्टीची संघटनात्मक रचना :**

बहुजन समाज पार्टीची स्थापना १९८४ रोजी झाली व १९९६ सली या पक्षास राष्ट्रीय पक्षाचा दर्जाही निवडणूक आयोगाकडून प्राप्त झाला. पक्ष स्थापनेनंतर अल्पावधीतच बहुजन समाज पार्टीने पंजाब, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व जम्मू काश्मीर राज्यांमध्ये मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळविला होता. पक्षाच्या या विस्तारा मागे कांशीराम व मायावती यांचे कल्पक नेतृत्व जसे होते तसेच या पक्षाची त्यांनी केलेली संघटनात्मक बांधणीही महत्त्वाची ठरली. संघटनात्मक बांधणीच्या दृष्टीने बसपा कडून दर तीन वर्षांनी पक्ष सदस्यांची नोंदणी करण्याचा कार्यक्रम हाती घेतला जातो. या उपक्रमात सर्व सदस्यांना सहभागी होण्याची संधी असते. किमान शंभर सदस्यांची नोंदणी करणारा कार्यकर्ता पक्षाच्या जिल्हा स्तरावरील समितीचा सदस्य होण्यास पात्र ठरतो. या पद्धतीने पक्षाची जिल्हा स्तरावरील समिती गठित होते. जिल्हा समितीचे सर्व सदस्य पक्ष संघटनेतील जिल्हाध्यक्षांची निवड करतात. तो जिल्हा समितीच्या सदस्या मधून कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांची निवड व नियुक्ती करतो. अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली कार्य करण्र्या कार्यकारिणीचे जिल्हा स्तरावरील पक्ष संघटनेच्या कार्यावर नियंत्रण असते. सर्व जिल्ह्यातील अध्यक्षांच्या बैठकीत प्रदेशाचा अध्यक्ष निवडला जातो. याच बैठकीत तो प्रदेश कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांची निवड व नियुक्ती करतो. एक हजार सदस्यांची नोंदणी करणे या पदासाठी आवश्यक पात्रता मानली जाते. राष्ट्रीय स्तरावर सर्व प्रदेश अध्यक्षांची बैठक आमंत्रित केली जाते. या बैठकीत पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवड होते. याच बैठकीत नवनिर्वाचित अध्यक्ष राष्ट्रीय स्तरावरील कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांची निवड व नियुक्ती करतो. राष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही पदासाठी दहा हजार सदस्यांची नोंदणी ही पात्रता विषयक अट प्रमुख मानली जाते. अशा पद्धतीने राष्ट्रीय स्तरावर बहुजन समाज पार्टीचे अध्यक्ष व कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली संपन्न होताना दिसते.

फुले, शाहू, आंबेडकर व पेरियार यांनी मांडलेले विचार ही बहुजन समाज पार्टीची विचारधारा आहे हे असे पक्षाकडून अधिकृत रित्या घोषित करण्यात आले आहे. महाराष्ट्राबाहेर कर्नाटक,

आंध्रप्रदेश व तामिळनाडू व दिल्लीच्या आजूबाजूचा परिसर एवढ्यापुरताच या महापुरुषांचा विचार प्रसारित झालेला दिसतो. या विचारांचा प्रसाद संपूर्ण भारतभर करणे हे बसपाचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर मनुवादी व ब्राह्मण्यवादी जातीव्यवस्थेचे निर्मुलन करणे ही बसपाची आग्रही भूमिका आहे. त्यामुळेच मायावती, काशीराम यांनी आपल्या नावापुढे आडनाव कधीही लावलेले दिसत नाही. तरीही पक्षीय पातळीवर बसपा अशी धारणा बाळगतो की, जात हे वास्तव आहे. शासकच जातीव्यवस्था समाप्त करण्यास सक्षम असतो. शासक होणे करिता मागासवर्गीय जाती मध्ये आत्मसन्मानाची व स्वाभिमानाची भावना या चळवळीच्या माध्यमातून निर्माण करणे हे बसपाचे महत्त्वाचे ध्येय आहे.

राज्य सत्ता प्राप्त करणे ही सर्व समस्यांचे निवारण करण्याची गुरुकिल्ली आहे यावर या पक्षाचा ठाम विश्वास आहे. त्यामुळे बहुजनांची सत्ता निर्माण करणे म्हणजे बहुजनांना देशाचे शासक बनवणे हे बसपाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. बसपाच्या मते, देशाच्या एकूण लोकसंख्येत मागास वर्गीय जातींचे संख्याधिक्य आहे तरीही स्वातंत्र्योत्तर काळात बहुजन समाजास शासन व प्रशासनात लोकसंख्येच्या प्रमाणात भागीदारी मिळाली नाही. अनुसूचित जाती व जमातींच्या प्र वर्गापर्यंत घटनात्मक तरतुदींचा लाभ काही प्रमाणात पोहोचला. मात्र इतर मागास प्रवर्गा पर्यंत हा ही लाभ अद्याप पोहोचलेला नाही ही. हे लाभ प्राप्त करण्याकरिता ओबीसी जाती समूहांना कार्यान्वित करणे हे बसपाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. सामाजिक परिवर्तना संदर्भात बसपा आग्रही असला तरी आर्थिक संदर्भात मात्र बसपा मध्यममार्गी विचारसरणीचा आग्रह धरताना दिसते. मुक्त अर्थव्यवस्था व डाव्या पक्षांची विचारधारा यामधली भूमिका बसपा आर्थिक दृष्ट्या मांडताना दिसतो.

### सोशल इंजिनीअरिंगचा प्रयोगः

बहुजन समाज पार्टीने दलितांचा समाजवाद धर्मनिरपेक्षता यांच्या बरोबरीने सामाजिक विणकाम( सोशल इंजीनियरिंग) यांना प्राधान्य दिलेले दिसते. बसपाने राबवलेला सोशल इंजिनीअरिंगचा प्रयोग हा भारतीय राजकारणातील एक अभिनव प्रयोग ठरला. व त्याचा भारतीय राजकारणावर दूरगामी प्रभाव पडलेला दिसतो. बसपाला २००७ साली या प्रयोगाचे फलित म्हणून एक हाती सत्ता प्राप्त झाली. या दृष्टीने या प्रयोगाची माहिती अधिक प्रमाणात जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

मायावतीं यांनी सोशल इंजिनिअरिंग च्या माध्यमातून ब्राह्मण, मुस्लिम व दलित या जाती समूहांना एकत्र आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले होते. याकरिता उत्तर प्रदेशात या प्रयोगाची अंमलबजावणी करण्यात आली. त्याकरिता उत्तर प्रदेशातील ७० जिल्ह्यात २१ हजार किलोमीटरचा प्रवास करून ब्राह्मण- मुस्लिम- दलितांचे ९८ मेळावे घेतले गेले. त्याकरिता "ब्राह्मण- दलित- मुस्लिम भाईचारा बनाव समित्या" स्थापन करण्यात आल्या. या समित्यांमध्ये महत्त्वाच्या पदांवर तिन्ही समाजातील लोकांची निवड केली जाते. मायावतींचा सोशल इंजिनिअरिंगचा विचार समाजात बिंबवणे हे या समितीचे प्रमुख काम होते. आपापल्या भागात जातीय तणाव निर्माण होणार नाहीत याविषयी काळजी घेण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच सोपवण्यात आली होती. ती म्हणजेच एकाच वेळी राजकीय जागृती व जातीय सलोखा निर्माण करण्याचे कार्य त्यांच्यावर सोपवण्यात आले होते. उत्तर प्रदेशातील २००७ च्या विधानसभा निवडणुकीत या प्रयोगास मोठे यश मिळाले व हा प्रयोग देशभर राबवण्याचे उद्दिष्ट त्यांनी निश्चित केले. उत्तर प्रदेशच्या संदर्भात त्यांच्या या यशाचे वर्णन करताना असे असे म्हटले जाते की, "सोशल इंजिनीअरिंगचा प्रयोगाने उत्तर प्रदेशात मनुवादी समाजव्यवस्था जाऊन माया वादी समाजव्यवस्था प्रस्थापित झाली आहे." हा प्रयोग राबवण्यात मायावतींची कल्पकता व सतीश मिश्रा यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

| वर्ष | निवडणूक लढविलेल्या जागा | निवडून आलेल्या जागा | एकूण मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९८९ | २४५ | ०४ | ४.५३ |
| १९९१ | २३१ | ०३ | ३.६४ |
| १९९६ | २१० | ११ | ११.२१ |
| १९९८ | २५१ | १५ | ९.८४ |
| १९९९ | २२५ | १४ | ९.९७ |
| २००४ | ४३५ | १९ | ६.६६ |
| २००९ | ५०० | २० | ६.५६ |
| २०१४ | ५०३ | ०० | ४.१९ |
| २०१९ | २८३ | १० | ३.६७ |

सारांश, बहुजन समाज पार्टी हा एक राष्ट्रीय राजकारणातील प्रमुख राजकीय पक्ष म्हणून स्थापित झाला आहे. फुले, शाहू, आंबेडकर व पेरियार ही त्यांची वैचारिक बैठक आहे. मात्र निवडणुकीच्या काळात बसपा तत्वे, तत्त्वनिष्ठा व जाहीरनाम्यातील कार्यक्रम यापेक्षा व्यवहार वादावर व तडजोडीवर भर देणारा पक्ष आहे आहे असे निदर्शनास येते. त्यामुळेच बसपाने सुरुवात जरी मनुवाद्यांवर प्रखर हल्ल्याने केली असली तरी हिंदुत्व विचाराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भाजपा पक्षासोबत युती करण्यास त्यांनी संकोच केला नाही. ब्राह्मण, बनिया चोर है असे म्हणणारा पक्ष नंतरच्या काळात हत्ती तो गण का प्रतीक है इथपर्यंत सोशल इंजिनिअरिंग ची कक्षा घेऊन गेलेला दिसतो. जनाधार वाढविण्याकरता ब्राह्मण व दलित जातींची मोट बांधण्याचा प्रयत्न त्यांनी सोशल इंजिनिअरिंग च्या माध्यमातून केला असला तरी त्यातून जनाधार वाढतोच असे मात्र निश्चितपणे म्हणता येत नाही. हे २००९ च्या नंतर झालेल्या निवडणुकांमध्ये बसपाची झालेली घसरण स्पष्ट करते. तरीही बसपाच्या स्थापनेपासून प्रादेशिक पक्ष ते राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळणे व मतांच्या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावर आठव्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर येणे ही मोठी वाढ मानावी लागेल. एकंदरीत बसपा हा एक उदयोन्मुख पक्ष आहे या निष्कर्षाप्रत आपण येतो.

## २.६ आघाडीचे राजकारण व आघाडी सरकार

भारतीय राजकीय व्यवस्थेतील प्रादेशिकतेच्या घटकांमध्ये आघाडीचे राजकारण व आघाडी सरकार हा ही एक प्रभावी घटक म्हणून १९९०च्या नंतर काळात प्रचलित झाला आहे. अखिल भारतीय स्वरूपात आघाडीचे राजकारण व आघाडी सरकारचा प्रयोग हा अपरिहार्य घटक म्हणून भारतीय राजकारणात प्रस्थापित झालेला दिसतो. २०१४- १९ च्या निवडणुकांमध्ये भाजपाला स्वबळावर बहुमत मिळालेले असले तरी स्वबळावर निवडणूक लढवण्याची ची परिस्थिती मात्र त्यांची अनेक राज्यात नाही हे स्पष्टपणे प्रत्ययास येते. आघाडी राजकारण व आघाडी सरकार

या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. यादृष्टीने या दोन्ही संकल्पनांचा आढावा प्रादेशिकतेच्या घटकाच्या दृष्टीने घेणे आवश्यक ठरते.

**आघाडीचे राजकारण:**

आघाडीचे राजकारण हे निवडणूक पूर्व, निवडणुकीदरम्यान व निवडणुकीनंतर सुद्धा अस्तित्वात येऊ शकते. साधारणता असे म्हणता येईल की एका व अनेक राजकीय पक्षांनी आपले अस्तित्व कायम ठेवून एखाद्या उद्दिष्टासाठी करारबद्ध युती करणे म्हणजे आघाडीचे राजकारण होय. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात निवडणुकीच्या राजकारणाने बंड करून अनेक वळणे घेतलेली आपणास जाणवतात. त्यातूनच आघाडीच्या राजकारणाची मूस आकारास आलेली दिसते. गणराज्याच्या स्थापनेपासूनच भारतीय राजकीय प्रक्रियेत बहुपक्ष पद्धती प्रचलित असली तरी १९६७ पर्यंतच्या काळात एक पक्ष प्रभुत्व पद्धती प्रचलित राहिली. घटक राज्य व केंद्रीय पातळीवर काँग्रेस या एकाच राजकीय पक्षाचे प्रभुत्व प्रस्थापित झाले होते. १९६७ नंतर मात्र अनेक घटक राज्यांमध्ये काँग्रेसच्या प्रभुत्वास उतरती कळा लागली व प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढावयास सुरुवात झाली. १९८९ नंतर केंद्र पातळीवर ही काँग्रेस पक्षाचा प्रभाव ओसरला. व त्यानंतर २०१४ पर्यंत कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्वबळावर बहुमत मिळू शकले नाही. २०१४ साली व २०१९ आली नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने निवडणूक लढवून बहुमताचा आकडा स्वबळावर मिळवला असला तरी निवडणूक मात्र राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविल्या होत्या. आज घटक राज्य पातळीवर राज्यनिहाय अनेक राजकीय पक्षांच्या आघाड्या निर्माण झालेल्या दिसतात तर राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय लोकशाही आघाडी ( रा लो आ NDA) व संयुक्त पुरोगामी लोकशाही आघाडी (UPA) स्थापित झालेल्या दिसतात.

**आघाडीचे राजकारण प्रभाव व विकास:**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने संसदीय शासन पद्धतीचा अंगीकार केला. जगातील संसदीय लोकशाही प्रचलित असणाऱ्या देशांमध्ये द्विपक्ष पद्धती साधारणतः कार्यान्वित होती. ब्रिटन व अमेरिकेत लोकशाहीचा प्रयोग यशस्वी होण्यामागील एक महत्त्वाचे घटक कारण म्हणून तिथे स्थापित झालेल्या द्विपक्ष पद्धतीस मानले जात होते. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात भारतातही संसदीय लोकशाहीचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी द्विपक्ष पद्धती ती विकसित व्हावी अशी सविधानकारांची अपेक्षा होती. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात भारतात बहुपक्ष पद्धती कार्यान्वित झाली. तिचे वरवरचे स्वरूप बहुपक्षीय वाटत असले तरी ते खरे एक पक्ष प्रभुत्व पद्धती असेच होते. त्यानंतर या बहुपक्ष पद्धती प्रादेशिक पक्ष प्रभुत्व पद्धतीचे हस्तांतरण झाले व त्यामुळे अनेक राष्ट्रीय पक्षांनाही प्रादेशिक राजकीय पक्षांचे स्वरूप प्राप्त झालेले दिसते. दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, बहुजन समाज पक्ष या राष्ट्रीय म्हणवणाऱ्या राजकीय पक्षांचे प्रभुत्व विशिष्ट घटक राज्यापुरते मर्यादित झालेले दिसते.

**आघाडी सरकार अर्थ व विकास:**

आघाडी सरकारचा अनुभव भारतीय राजकीय व्यवस्थेच्या दृष्टीने नवीन वाटत असला तरी जगात अनेक देशांमध्ये दीर्घकाळापासून आघाडी सरकारचा प्रयोग राबवला जात असलेला आपणास दिसतो. जर्मनीत फेडरल गणराज्यात क्रिस्ति नियन डेमोक्रॅटिक पार्टी व सोशल डेमोक्रॅटस या जर्मनीतील दोन मोठ्या राजकीय पक्षांनी एकत्र येऊन फ्री डेमो फ्रुट्स या पक्षाबरोबर मोठी आघाडी निर्माण केली होती. युरोपातील हॉलँड, डेन्मार्क व बेल्जियम यासारख्या

देशांमध्ये तर आघाडी सरकार हाच एकमेव पर्याय सत्तास्थापनेसाठी प्रचलित झालेला दिसतो. इटलीसारख्या देशातही आघाडी सरकार मधले क्रिश्चियन डेमोक्रेटस, सोशल डेमो फ्रंट्स, लिबरल्स आणि आणि रिपब्लिकन्स या चार पक्षांनी सहभाग घेतलेला दिसतो. ऑस्ट्रेलियात ही आघाडी शासनामध्ये लेबर पक्ष व लिबरल कंट्री पक्ष यांचे आघाडी कायम राहत आलेली दिसते. प्रो. रिचर्ड रोज ब्रिटनच्या संदर्भात या दृष्टीने विश्लेषण करताना म्हणतात, "ब्रिटनमध्ये नेहमीच आघाडी शासनाने ऐवजी एकच पक्षांतर्गत विविध विचार प्रणालींचा संगम दिसून येतो." यादृष्टीने एक बाब लक्षात येते की युतीतील पक्ष व अन्य पक्ष जे आघाडीच्या राजकारणात असोत व नसोत जेव्हा सरकारमध्ये सामील होतात तेव्हा आघाडी सरकार अस्तित्वात येते.

भारतीय राजकीय प्रक्रियेतील आघाडी सरकारचा इतिहास पाहता त्याची सुरुवात केरळमधील पी. एम. एस. नंबुद्रीपाद यांच्या या नेतृत्वामध्ये १९५६ मध्ये केरळ मध्ये स्थापन झालेल्या सरकारचा संदर्भ घ्यावा लागेल १९५६ मध्ये नंबुद्रीपाद यांनी केरळमध्ये स्थापन केलेले सरकार हे देशातील पहिले आघाडी सरकार मानावे लागेल. नंबुद्रीपाद यांना "आघाडी सरकारच्या कल्पनेचे द्रष्टे विचारवंत असे संबोधले जाते. पं. नेहरू सरकारने १९५९ साली ते ३५६ व्या कलमाचा दुरुपयोग करून बरखास्त केले पुढे १९६० मध्ये केरळ मध्ये प्रजा समाजवादी नेते पट्टमथानू पिल्लई यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या पुढाकाराने आघाडी सरकारची स्थापना झाली. तिथ पासून आज पर्यंत केरळ मध्ये दोन आघाड्यांचे सरकार सत्तेत येताना दिसते. १९६७ नंतर नऊ राज्यात काँग्रेसेतर पक्षांची सरकारे अस्तित्वात आली. तीही आघाडी सरकारचा एक मोठा प्रयोग ठरली. उत्तर प्रदेशात संयुक्त विधायक दलाचा राबवलेल्या प्रयोग ही आघाडी सरकारच्या विकासातील एक महत्त्वाचा घटक मानावा लागेल. प बंगालमध्ये जवळ जवळ तीस वर्षे आघाडीचे सरकार मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरकार यशस्वीपणे कार्यरत होते. तृणमूल काँग्रेसने या आघाडी सरकारचा पराभव करून ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण बहुमताने प्रादेशिक पक्षाचे सरकार स्थापित केले. परंतु त्यांनीही आपल्या राजकीय सोयीने कधी भाजपा बरोबर तर कधी काँग्रेस बरोबर सहकार्याची वा विरोधाची भूमिका घेतलेली दिसते. महाराष्ट्रातील १९८० साली शरद पवार यांनी राबवलेला पुरोगामी लोकशाही दलाचा प्रयोग हाही आघाडी सरकारचा महत्त्वाचा आदर्श मानला जातो. १९९५ साली शिवसेना-भाजपा ने स्थापन केलेली आघाडी सरकार ही आदर्श पद्धतीने आपला कार्यकाळ पूर्ण करून गेले. त्यानंतरच्या काळात १९९९ ते २०१४ काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसचे आघाडीचे सरकार तब्बल पंधरा वर्ष सत्तेत राहिले. परत २०१४ ते २०१९ या कालखंडात भाजपा शिवसेनेचे महायुतीचे सरकार यात अन्यही आठ-दहा प्रादेशिक स्थानीय पक्ष सहभागी होते स्थापित झाले. २०१९ च्या निवडणुका भाजपा-शिवसेना युतीने एकत्रित लढल्या, त्यांना जनादेश ही प्राप्त झाला मात्र शिवसेना भाजपा सत्ता संघर्षाने महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी देणारा एक नवीन आघाडी सरकारचा प्रयोग महा विकास आघाडीच्या माध्यमातून अनुभवास येत आहे.

अखिल भारतीय स्तरावर १९८९ नंतर आघाडी सरकारचा प्रयोग मोठ्या प्रमाणात प्रचलित झाला असला तरी १९७७ साली सत्तेत आलेला जनता पक्ष हा नावाला एक पक्ष असला तरी वास्तवात तो अनेक राजकीय पक्षांचे संघटन होते. तोही आघाडी सरकारचा अप्रत्यक्ष नमुना मानावा लागेल. १९८९ साली जनता दलाची आघाडी सरकार भाजपाच्या पाठिंब्याने सत्तेत आले. राम मंदिर, रथयात्रा, मंडल आयोग यासंदर्भातील वादातून हे सरकार कोसळले. त्यानंतर पी व्ही नरसिंहराव सरकार हे अल्पमतातले सरकार हे काही प्रादेशिक पक्ष व अपक्षांच्या बळावर काही प्रमाणात ते यशस्वीपणे राबवले. त्यानंतर झालेल्या प्रत्येक निवडणुकीत केंद्र सरकार हे आघाडीचे सरकारच स्थापित झालेले दिसते.

आघाडी सरकारचा १९९६ ते २००४ हा कालखंड भारतीय राजकीय प्रक्रिया समोर अनेक आव्हाने निर्माण करणारा ही झाला. आठ वर्षाच्या कालावधीत चार सार्वत्रिक निवडणुकांचा प्रचंड खर्च देशाला उचलावा लागला. कालांतराने आघाडी सरकारचे दोषही प्रामुख्याने पुढे आले. त्यात प्रामुख्याने राजकीय अस्थिरता, प्रादेशिक राजकीय हितसंबंधांचा दुराग्रह, सौदेबाजी चे राजकारण यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या कालावधीत तेलगू देसम सारख्या छोट्याशा प्रादेशिक पक्षाने किंग मेकर ची भूमिका बजावून केंद्र सरकारकडून अनेक फायद्याच्या गोष्टी स्वतःकरीता करवून घेतल्या. अकाली दल, बहुजन समाज पक्ष, जय ललिता, ममता बॅनर्जी, समता पक्ष या घटक नेत्यांनी व पक्षांनी या कालावधीत अतिरेकी भूमिका घेऊन अनेकदा केंद्र सरकारला हात टेकावयास लावले. समता, ममता व जयललिता यांनी अटल बिहारी वाजपेयी सरकारला हैराण करून सोडले होते. १९९६ ते १९९९ या तीन वर्षात तर देशभर अस्थिरतेची टांगती तलवार निर्माण झालेली होती. त्यातून धन मन तन असा उलटा प्रवाह राजकारणात निर्माण झाला ज्यातून मूल्यहीन राजकीय आघाड्या राजकीय सौदेबाजी च्या स्वरूपात पुढे आल्या. काहीवेळा तर आघाडी सरकारला राष्ट्रीय हितसंबंधांशी ही तडजोड करण्याची वेळ येते. देशांतर्गतच नव्हे तर परराष्ट्रीय व्यवहारावर ही आघाडी सरकारमधील घटक पक्ष प्रभाव टाकताना दिसतात. उदा. श्रीलंका येथील परिषदेला ही तामिळ प्रश्नावरून भारतीय पंतप्रधानांनी उपस्थित राहू नये अशी भूमिका महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या द्रमुक पक्षाने घेतल्यामुळे प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांना श्रीलंकेतील ते संमेलन टाळणे भाग पडले होते. अमेरिकेसोबत अणु उर्जा करारा संदर्भातील डाव्या पक्षांनी घेतलेल्या भूमिकेमुळे मनमोहन सिंहांना सरकार पणाला लावावे लागले होते. हा आघाडी सरकारचा अनुभव टीकाकारांच्या दृष्टीने टीकेस पात्र ठरतो. त्यामुळे अस्थिरतेचा धोका सबंध देशात निर्माण होतो असे दिसते.

आघाडी सरकारचे समर्थक या दृष्टीने आपला तर्क देताना असे म्हणतात की, "एका विशिष्ट पक्षाच्या भ्रष्ट व कार्यक्षम शासनालाच संधी देण्यापेक्षा अनेक राजकीय पक्षांच्या आघाडी सरकारचा पर्यायच अधिक योग्य आहे. कारण ते अधिक जबाबदार व पारदर्शी असेल. वरकरणी जरी हे सरकार दुर्बळ वाटत असले तरी ते निश्चितच अधिक लोकशाही स्वरूपाचे व संघीय स्वरूपाला अनुरुप ठरेल". डॉ. पी सी अलेक्झांडर या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते, "ब्रिटिश संसदीय पद्धती ला आपण आदर्श मानतो परंतु ब्रिटिश आणि भारतीय मानसिकतेत ला फरक आपण समजून घेणे गरजेचे आहे. आघाडी करून बहुमत मिळवण्यापेक्षा ब्रिटिशांना अल्पमतातील सरकार चालते. भारतीय राजकीय प्रक्रियेत मात्र बहुमत मिळवणे महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळेच सरकार एका मताने सुद्धा पराजित होताना आपण अटल बिहारी सरकार च्या रूपाने पाहिली आहेत."

त्यामुळे हा दोन देशांमधील मानसिकते मधील फरक लक्षात घेऊन व या पुढील काळात संपूर्ण भारत देशाचे त्यातील वैविध्यासह प्रतिनिधित्व करण्याची क्षमता कोणत्याही राजकीय पक्षाकडे येण्याची शक्यता दिसत नाही. अशा अवस्थेत आपण आघाडी राजकारण व आघाडी सरकारांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. हे तर मधु दंडवते यांनी आघाडी सरकारांसंदर्भातील आपला दृष्टीकोन स्पष्ट करताना जर्मनी सारखी समाज प्रतीनिधित्वा ची पद्धती स्विकारण्याची सूचना केली होती. आघाडीचे राजकारण व आघाडी सरकार हे समकालीन भारतीय राजकारणाचे वास्तव आहे. हे त्यास नाकारता येणार नाही. उलट त्याचा स्वीकार करून त्यास कसे भारतीय राजकीय व्यवस्थेस पूरक बनवता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे.

## आघाडी सरकार स्वरूपः

आघाडीच्या राजकारणातून भारतीय राजकीय व्यवस्थेत आघाडी सरकारची प्रस्थापना झालेली दिसते. प्रजासत्ताका नंतरच्या दशकाच्या दुसऱ्या दशकातच आघाडी सरकारची रुजवात होण्यास सुरुवात झाली. भारतीय समाज व्यवस्थेतील विविधता व विस्ताराने या घटकास अधिकाधिक पूरक परिस्थिती निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. परिणामी आज घडीला आघाडीचे राजकारण एक अपरिहार्य वास्तव बनलेले आहे. आघाडी सरकारचे स्वरूप प्रामुख्याने पुढील दोन पद्धतीने निर्माण झालेले दिसते.

## बहुमतधारी आघाडी सरकार :

ज्यावेळी आघाडी सरकारमधील घटक पक्षांकडे बहुमता पेक्षा अधिक सदस्यसंख्या असते त्या वेळी त्यास बहुमतधारी आघाडी सरकार असे म्हटले जाते. पेप्सू, केरळ, पंजाब, उत्तर प्रदेश, ओरिसा, महाराष्ट्र इत्यादी राज्यांमध्ये अशा पद्धतीची आघाडी सरकारे सुरुवातीच्या काळात अस्तित्वात आली होती. केंद्र सरकार मध्येही २००९ साला नंतर अस्तित्वात आलेली आघाडी सरकारे ही बहुमत धारी आघाडी सरकारे आहेत.

## अल्पमतधारी आघाडी सरकारः

जेव्हा सरकार मधील घटक पक्षांची सदस्य संख्या ही बहुमतासाठी आवश्यक असणारी सदस्यसंख्या गाठू शकत नाही तेव्हा त्या आघाडी सरकारास अल्पमतधारी आघाडी सरकार असे म्हणतात. या आघाडी सरकारची आणखी दोन उपप्रकार पडतात. द्विपक्ष / बहुपक्ष अल्पमतधारी दृश्य आघाडी सरकार - यामध्ये ज्यावेळी अनेक पक्ष एकत्रित येऊन सरकार स्थापन करतात परंतु त्यांचे मताधिक्य कमी असते. मात्र इतर काही राजकीय पक्षांच्या पाठिंब्यावर त्यांचे बहुमत अवलंबून असते तेव्हा त्यास द्वि किंवा बहुपक्ष अल्पमतधारी दृश्य आघाडी सरकार असे म्हटले जाते.

## द्विपक्ष / बहुपक्ष अल्पमतधारी अदृश्य आघाडी सरकारः

ज्यावेळी दोनच पक्ष एकत्रित येऊन सरकार निर्माण करतात तेव्हा त्याला द्विपक्ष अल्प मतधारी दृश्य आघाडी सरकार असे म्हणतात. महाराष्ट्रातील १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेस व राष्ट्रीय काँग्रेस यांचे आघाडी सरकार याचे उदा. मानता येईल. जेव्हा दोन पेक्षा अधिक राजकीय पक्ष आघाडी सरकार अल्पमतातील सरकार स्थापन करतात तेव्हा त्यास बहुपक्ष अल्पमतधारी आघाडी सरकार म्हणता येईल. १९५४ मध्ये कोचीन, १९६९ साली केरळ, बिहार व १९९५ मध्ये गुजरात येथे स्थापन झालेले आघाडी सरकार याचे उदा. होय. तर केंद्र सरकार मध्ये एच डी देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल यांचे आघाडी सरकारही याचे उदा. होय.

## आघाडी सरकारचा भारतीय राजकारणावरील परिणामः

आघाडी सरकारने भारतीय राजकीय व्यवस्थेला मोठ्या प्रमाणात प्रभावित केलेले दिसते. त्यातील काही मुद्द्यांचा खालीलप्रमाणे आढावा घेता येईल.

**सिद्धांतविहिन आघाडीः**

भारतीय राजकारणात सुरुवातीच्या दोन-तीन दशकांत तत्वनिष्ठ राजकारणास प्रतिष्ठा होती. विचार प्रणाली, पक्षाचा जाहीरनामा, कार्यपद्धती यांच्याशी जीवन निष्ठा पाळल्या जात होत्या. मात्र आघाडी सरकारच्या आगमनानंतर मात्र या सर्व निष्ठा गळून पडताना दिसत आहेत. आघाडी सरकारचे युग् अवतरण्यापूर्वी प्रत्येक राजकीय पक्षा च्या शक्यतो मित्र, शत्रु याविषयी निश्चित स्वरूपाचे भाकित करता येणे शक्य होते. आघाडी सरकारच्या प्रवृत्तीने आता राजकीय विश्लेषकांच्या भाकीतांना कोणतीही ही संधी ठेवलेली दिसत नाही. त्यामुळेच परस्पर विरोधी प्रवृत्तीची, विचारधारेची राजकीय पक्ष सत्ते करिता आघाडी स्थापन करताना दिसत आहेत. राजकारणात कोणीही कायमचा शत्रू व मित्र असत नाही या तत्त्वाची पदोपदी जाणीव आघाडी सरकारच्या प्रयोगाच्या या माध्यमातून होताना दिसते आहे. शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय काँग्रेस यांची महा विकास आघाडी ही काही अशक्य कोटीतील वाटणारी गोष्ट प्रत्यक्षात आज कार्यान्वित झालेली दिसते. लालूप्रसाद यादव नितीशकुमार यांची मधल्या काळातील युतीअसो वा रामविलास पासवान, रामदास आठवले यांचे भाजपासोबत जाणे असो हे आघाडीच्या राजकारणाने निर्माण केलेले सिद्धांतहीन राजकारणाची स्मारक मानली जातील. एकंदरीत सिद्धांतहीन आघाडीचे राजकारण हे आघाडी सरकारचा एक महत्त्वाचा परिणाम व महत्त्वाचे वैशिष्ट्य ही ठरते.

**२) राजकीय अस्थिरताः**

भारतीय राजकीय व्यवस्थेत एक पक्ष प्रभुत्व पद्धतीच्या माध्यमातून कमालीची स्थिरता स्थापित झालेली होती. त्यामुळे योजना व उपक्रमाने आवश्यक असणारे सातत्य, उसंत व बांधिलकी या तत्त्वांची जोड मिळत होती. आघाडी सरकार मात्र स्थिरतेच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील मानले जाते. आघाडी सरकारचे भविष्य कोणीही वर्तवू शकत नाही हे अनेक अनुभवातून मागील दोन-तीन दशकांत आपण पाहिले आहे. कारण सत्ता प्राप्ती हे या एकत्र आलेल्या पक्ष्यांचा एकमेव कार्यक्रम असतो. त्यांना एकत्र जोडणारा व बांधणारा इतर कुठलाही घटक कार्यरत नसतो. उलट अंतर्विरोध व परस्पर विरोधानी हे आघाडी सरकारचे घटक पक्ष ग्रासलेले असतात. त्यामुळे हितसंबंधाच्या संघर्षातून कोणता पक्ष केव्हा सत्तेच्या खुर्चीचा पाय काढून घेईल याची शाश्वती नसते. त्यातच या आघाडी सरकारचे बहुमत म्हणजे अगदी काठावरचे असते. कावळा उडावा अन फांदी तुटावी इतपत बहुमत तकलादू असते. या सर्वाचा परिपाक म्हणजे आघाडी सरकार राजकीय अस्थैर्यास जन्म देताना दिसतात.

**३) पक्षांतरातून मुख्यमंत्रीपदाची लॉटरी :**

एखाद्या राजकीय पक्षातून दुसऱ्या राजकीय पक्षात प्रवेश करण्याच्या प्रक्रियेस साधारणतः पक्षांतर असे म्हटले जाते. पक्षांतराची प्रक्रिया पार पडत असताना मोठी आश्वासने पदरात पाडून पक्षांतर करणारे पक्ष सोडत असतात. पक्षांतर जर गटाने झाले तर पक्षांतर करणाऱ्या त्या गटाच्या प्रमुखास घटक राज्य स्तरावर मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली जाते. केंद्रीय स्तरावर ही महत्त्वाच्या मंत्रिपदाची ऑफर कायम असते. कधीकधी फुटलेल्या गटास सरकार स्थापण्यासाठी मोठा पक्ष बाहेरून पाठिंबा देऊन सत्तास्थानी बसवतो व त्या फुटीरतावादी नेत्यास पंतप्रधानपदाची ही लॉटरी लागते. चंद्रशेखर, चरण सिंग हे पंतप्रधान याचे उत्तम उदा. आहे. मध्यप्रदेशातील जी एन सिंग, बंगालमधील पी. सी. घोष, हरियाणातील राव वीरेंद्र सिंह यांचे उदाहरण होय.

### ४) मंत्रिमंडळाच्या संख्येत अवाढव्य वाढ:

पूर्वीच्या काळी मंत्रिमंडळाची रचना छोटी व सुटसुटीत असे. आघाडी सरकारच्या स्थापनेनंतर मात्र मंत्रिमंडळाचा विस्तार फार मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसतो. एका एका विभागाचे विभाग उपविभाग पाडून मंत्री महोदय यांची संख्या वाढवण्यावर आघाडी सरकारचा भर असतो. कारण सर्व मतभेद व कार्यक्रम बाजूला ठेवून आघाडी सरकारमधील घटक पक्ष केवळ सत्ता प्राप्तीसाठी एकत्र आलेले असतात. अशावेळी अधिकाधिक सत्तेचा वाटा मिळवण्याकडे या घटक पक्षांचा कल असतो. परिणामी मंत्री मंडळाची संख्या अवास्तव पद्धतीने वाढलेली दिसते. या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी आता मंत्रिपरिषदेच्या मंत्र्यांच्या संख्येवर काही मर्यादा टाकण्यात आल्या आहेत. तरीही आघाडी सरकारच्या माध्यमातून तयार झालेल्या मंत्र्यांची संख्या ही अवाढव्य स्वरूपाचीच जाणवते. उदा. १९६९ मध्ये हरियाणा स्थापन झालेल्या आघाडी सरकारमधील ४० आमदारांपैकी २८ आमदार हे मंत्री होते. केंद्रातही १९९६ ते २००४ पर्यंत ची आघाडी सरकारे ही अशीच जम्बो मंत्रिमंडळाची उदाहरणे ठरतात.

### ५) बाहेरून पाठिंबा देणाऱ्या पक्षांना महत्त्व:

जो पक्ष सत्ताधारी आहे त्या राजकीय पक्षास एक प्रकारचा अलिखीत सन्मान प्राप्त होत असे. मात्र आघाडीच्या राजकारणातून स्थापित झालेल्या आघाडी सरकारांपेक्षा या सरकारांना बाहेरून पाठिंबा देणारे राजकीय पक्ष अधिक प्रतिष्ठा व नियंत्रण स्थापित करतात. एवढेच नव्हे तर या पक्षांचा निर्णय प्रक्रियेवर ही सत्ताधारी राजकीय पक्षापेक्षा भलेही तो संख्येने कमी असला तरी अधिक प्रभाव जाणवतो. १९९६ नंतरच्या काळात चंद्रबाबू नायडू यांनी बाहेरून पाठिंबा देऊनच जनता दल या सत्ताधारी पक्षापेक्षा अधिक प्रतिष्ठा व महत्त्व प्राप्त केले. यूपीए च्या काळात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची भूमिका व कार्य ही याचे उत्तम निदर्शक मानावे लागेल.

### ६) संयुक्त जबाबदारीच्या तत्वाचे बदलते स्वरूप:

संसदीय शासन पद्धती तील हे एक महत्वाचे तत्व व संकेत मानला जातो. सर्व मंत्री हे मुख्यमंत्र्यांस जबाबदार असतात. व एखाद्या मंत्र्याची चूक ही सर्व मंत्रिमंडळाची चूक मानली जाते. आघाडी सरकारने मात्र या सामूहिक जबाबदारीच्या तत्वात मोठे बदल घडवून आणलेले दिसतात. आघाडी सरकारमधील मंत्री प्रत्यक्षात मुख्यमंत्र्यांना उत्तरदायी नसून ते आपल्या पक्षनेतृत्वा प्रति अधिक उत्तरदायित्वाची भावना ठेवतात. शासकीय निष्ठेपेक्षा शासकीय आदेशापेक्षा ते पक्षनिष्ठा व पक्षीय आदेशास अधिक प्राधान्य देताना दिसतात. राजीनामा देतानाही मुख्यमंत्र्यांकडे देण्याअगोदर तो पक्षश्रेष्ठींकडे सोपवला जातो. मंत्र्यांची बडतर्फी ही पंतप्रधान वा मुख्यमंत्र्याच्या अधिकारात न राहता ती पक्षश्रेष्ठींच्या आशीर्वादाची की कृपा मानली जाते. यूपीए-२ च्या काळात द्रमुकच्या मंत्र्यांना केंद्रीय मंत्रिमंडळातून बडतर्फ करण्यात पंतप्रधान मनमोहन सिंग असमर्थ ठरले हे या सामूहिक जबाबदारीच्या नव्या अवतारा मुळेच हे आपण पाहिले आहे.

### ७) मंत्रीच विरोधी पक्षाची भूमिका पार पडतात:

अनेक पक्षांचे सरकार स्थापन झाले असेल तर त्या सरकारला विरोधी पक्षाची ही गरज उरत नाही. कारण सत्ताधारी आघाडी सरकारमधील घटक पक्षच विरोधकांच्या भूमिकेत मधून मधून अवतरताना दिसतो. महाराष्ट्रात मागील भाजपा-शिवसेना आघाडी सरकारच्या काळात काँग्रेस-

राष्ट्रवादी काँग्रेस पेक्षा शिवसेना हा सत्ताधारी घटक पक्षच अधिक आक्रमक विरोधी पक्ष होता. आजच्या महा विकास आघाडीच्या सरकारमध्येही भूमिका काँग्रेसच्या वाट्याला आलेली दिसते.

### ८) राज्यपालांशी तणावपूर्ण संबंधः

घटक राज्यातील आघाडी सरकारे बहुतांश वेळा केंद्र सरकार विरोधी घटक पक्षांनी एकत्र येऊन स्थापित केलेली असतात. त्यामुळे राज्यपालांच्या स्थापनेपासूनच केंद्र राज्य संघर्षास सुरुवात झालेली दिसते. त्यातच केंद्राच्या इशाऱ्यावर राज्यपाल त्या आघाडी सरकारला आडवण्याची भूमिका सातत्याने घेतो. त्यामुळे अशा राज्यपालांना परत बोलवा म्हणून आघाडी सरकारे हटून बसलेली ही दिसतात. प. बंगाल मधील तत्कालीन राज्यपाल धर्मवीर यांना राष्ट्रपतीने परत बोलवावे यासाठी तेथील आघाडी सरकार हट्ट धरून बसले होते. महाराष्ट्रातील विद्यमान राज्यपालांची भूमिका ही विद्यमान महा विकास आघाडीच्या सरकार समवेत आडवा आडवीचीच असलेली प्रत्ययास येत आहे. त्यामुळे महा विकास आघाडी व राज्यपाल हा संघर्ष नित्याने अनुभवास येत आहे.

### ९) भ्रष्टाचाराचा वाढता आलेखः

आघाडी सरकारे भ्रष्टाचाराचा वाढता आलेख उंचावताना दिसतात. देशासाठी तन-मन-धन ही उक्ती उलट्या दिशेने वाहताना दिसते आहे. देशाला तन-मन-धन देण्याऐवजी देशा कडूनच धन घेण्याची प्रवृत्ती वाढीस लागलेली आहे. आघाडी सरकारमध्ये सहभागी असलेल्या घटक पक्षांमध्ये मलाईदार खाती मिळविण्यासाठी रस्सीखेच सातत्याने चालू असते. राजकीय हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी मोठा भ्रष्टाचार केला जातो. एकंदरीत आघाडी सरकार हे भ्रष्टाचाराची वेग व व्याप्ती वाढविण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडताना दिसतो आहे.

### १०) विधिमंडळाचे वाढते महत्त्वः

एक पक्ष प्रभुत्व पद्धतीच्या काळात वा द्विपक्ष प्रभुत्व पद्धतीमध्ये कार्यपालिका ही कायदे मंडळावर नियंत्रण प्रस्थापित करते वा किमान प्रभाव पाडते हे निदर्शनास येते. आघाडी सरकार मुळे मात्र कार्य पालिकेवर विधिमंडळाचा अंकुश मोठ्या प्रमाणावर प्रस्थापित झालेला दिसतो. आघाडी सरकार हे मूलतः काठावरच्या बहुमतावर तरलेले असते. त्यामुळे विधिमंडळाला अंतिमतः जबाबदार असणारे आघाडी सरकार कायदे निर्मितीची प्रक्रिया असो वा निर्णयांची अंमलबजावणी असो, सामूहिक जबाबदारी चे तत्व असो वा अविश्वासाचा ठराव असो प्रत्येक वेळी विधिमंडळाच्या प्रभावाखाली वावरताना दिसते.

**तक्ता क्र. २.२**

**२०१९ - १६ वी लोकसभा**

| Sr. No. | आघाडी / पक्ष NDA | विजय | २०१९ लिड | + २०१४ |
|---|---|---|---|---|
| ०१ | BJP | ३०३ | - | +२१ |
| ०२ | SS | १८ | - | - |
| ०३ | JDU | १६ | - | +१४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४ | LJP | ०६ | - | - |
| ०५ | SAD | ०२ | - | -२ |
| ०६ | AD(S) | ०२ | - | +२ |
| ०७ | AJSU | ०१ | - | +१ |
| ०८ | MNC | ०१ | - | +१ |
| ०९ | AIDMK | ०१ | - | -३६ |
| १० | NDPP | ०१ | - | +१ |
| ११ | NPP | ०१ | - | - |
| १२ | TMC(M) | - | - | - |
| १३ | AGP | - | - | - |
| १४ | AD | - | - | -२ |
| १५ | DMDK | - | - | - |
| १६ | AINRC | - | - | -२ |
| १७ | PMK | - | - | -१ |
| १८ | NPF | - | - | -१ |
| १९ | BDIS | - | - | - |
| २० | KC | - | - | - |
| २१ | BPF | - | - | - |
| २२ | UDI | - | - | - |

| **Sr. No.** | **आघाडी / पक्ष UPA** | **विजय** | **२०१९ लिड** | **+२०१४** |
|---|---|---|---|---|
| ०१ | INC | ५२ | - | +०८ |
| ०२ | DMK | २३ | - | +२३ |
| ०३ | NCP | ०५ | - | -१ |
| ०४ | IUML | ०३ | - | +१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५ | JKNL | ०३ | - | +३ |
| ०६ | KCM | ०१ | - | - |
| ०७ | RSP | ०१ | - | - |
| ०८ | IND | ०१ | - | - |
| ०९ | JMM | ०१ | - | -२ |
| १० | VCK | ०१ | - | +१ |
| ११ | SWP | - | - | -१ |
| १२ | RJD | - | - | -४ |
| १३ | TDP | - | - | -१६ |
| १४ | CPI(ML)L | - | - | - |
| १५ | HAM(S) | - | - | - |
| १६ | RLSF | - | - | -३ |
| १७ | VIF | - | - | - |

| **Sr. No.** | **आघाडी / पक्ष UPA** | **विजय** | **२०१९ लिड** | **+२०१४** |
|---|---|---|---|---|
| ०१ | TMC | २२ | - | -१२ |
| ०२ | YSRCP | २२ | - | +१३ |
| ०३ | BJD | १२ | - | -८ |
| ०४ | BSP | १० | - | +१० |
| ०५ | TRS | ०९ | - | -२ |
| ०६ | SP | ०५ | - | - |
| ०७ | IND | ०३ | - | - |
| ०८ | TDP | ०३ | - | -१३ |
| ०९ | CPM | ०३ | - | -६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | AIMIM | ०२ | - | +१ |
| ११ | CPI | ०२ | - | +१ |
| १२ | NPF | ०१ | - | - |
| १३ | AAP | ०१ | - | -३ |
| १४ | SKM | ०१ | - | +१ |
| १५ | AMB | - | - | - |
| १६ | AIDMK | - | - | -३७ |

## २.७ भारतातील निवडणूक प्रक्रिया व निवडणूक वर्तन

लोकशाही शासन प्रक्रियेत निवडणूक या घटकास अनन्यसाधारण महत्त्व आहे. शांततामय पद्धतीने सत्ता परिवर्तन घडून येणे हा लोकशाही शासन व्यवस्थेचा मूलभूत गुणधर्म आहे. जनतेचे सार्वभौमत्व हे लोकशाही व्यवस्थेचे मूलभूत तत्व असते. या लोकशाहीच्या दोन्ही ही मूलभूत घटकांना प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याचे माध्यम म्हणून निवडणूक या तंत्राकडे पाहिले जाते. त्यामुळे निवडणुकांचे आयोजन, कार्यान्वयन व संविधानात्मक स्थान या घटकांना महत्त्वाचे स्थान प्रत्येक देशाचे संविधान कार देण्याचा प्रयत्न करतात. निवडणुकांची पारदर्शक व निर्भय वातावरणात आयोजन होणे अतिशय महत्त्वाचे ठरते. भारतीय संविधानाने ही संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. संसदीय लोकशाहीचा फारसा अनुभव नसणाऱ्या भारतीय समाज जीवनात लोकशाही मूल्य लोकशाही तत्वे व तंत्रे रुजवण्याकरता येणाऱ्या काळात निवडणूक यंत्रणा महत्त्वाची भूमिका पार पाडू शकेल यावर संविधानकारांना विश्वास होता. त्या विश्वासातूनच भारतीय संविधानात निवडणूक विषयक प्रक्रियांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. मागील सत्तर वर्षाच्या काळात भारतात आजतागायत सतरा सार्वत्रिक निवडणुकांचे निवडणूक आयोगाने यशस्वीरित्या आयोजन करून सविधानकारांचा विश्वास सार्थ केला आहे. स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय पातळी पर्यंतच्या सर्व निवडणुका या निवडणूक यंत्रणेच्या पर्यवेक्षणाखाली यशस्वीरित्या पार पडत आहेत. त्यातून विशिष्ट अशी खास भारतीय वैशिष्ट्ये ही आकारास आली आहेत. ज्यांचा प्रभाव एकूण निवडणूक प्रक्रियेवर मतदार वर्तनावरही पडलेला दिसतो. भारता बरोबरीने स्वतंत्र झालेल्या व लोकशाही शासन व्यवस्थेचा अंगीकार केलेल्या आशिया व आफ्रिका खंडातील इतर देशांच्या तुलनेत भारतीय लोकशाहीचे यश नजरेत भरणारे आहे. भारतीय राजकीय व्यवस्थेतील निवडणुकांचा कार्यभाग नाममात्र नसून तो मध्यवर्ती व अर्थपूर्ण आहे. या दृष्टीने या प्रक्रियांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

### निवडणूक विषयक घटनात्मक व वैधानिक तरतुदी:

भारतीय संविधान सभेत निवडणूक विषयक यंत्रणेच्या संदर्भात सखोल चर्चा झालेली दिसते. निवडणूक आयोगाच्या निर्मिती संदर्भात निवडणूक आयोगाची रचना कायमस्वरूपी करावी की राष्ट्रपतींकडून निवडणूक मंडळ वेळोवेळी नियुक्त करावे असे पर्याय संविधान सभेत चर्चेस आले होते परंतु भारतीय संविधानकारांनी निवडणूकयंत्रणेला केवळ कायमस्वरूपीय स्थान दिले नाही

तर त्यास संवैधानिक दर्जाही बहाल केला आहे. त्यानुसार भारतीय संविधानाच्या पंधराव्या भागात कलम ३२४ व ३२९ दरम्यान निवडणुकीसंबंधीच्या तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. याशिवाय संसदेने वेळोवेळी कायदे करून या तरतुदींमध्ये अधिक व्यापकता व स्पष्टता आणलेली दिसते. त्यामध्ये प्रामुख्याने संसदेने पारित केलेला १९५० व १९६१ च्या लोकप्रतिनिधीत्व कायदा, राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निवडणुकीसंबंधी चे कायदे, मतदार संघ निर्धारण कायदे, विविध घटना दुरुस्त्या, राष्ट्रपतींनी वेळोवेळी प्रस्तुत केलेले निवडणूक विषयक अध्यादेश, निवडणूक आयोगाने वेळोवेळी तयार केलेले निवडणुकीसंबंधी चे नियम व आचार संहिता इत्यादी मधून ही निवडणूक पद्धती, यंत्रणा वा निवडणूक विषयक वाद या विषयीच्या तरतुदी आढळतात. भारतीय संविधानातील संवैधानिक तरतुदी व नंतरच्या काळात विविध कायदे व नियमांच्या आधारे भारतीय संविधानात पंधराव्या भागात समाविष्ट करण्यात आलेल्या निवडणूक विषयक बाबींचे पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्टीकरण करता येईल.

**सार्वत्रिक प्रौढ मताधिकार :**

भारतीय संविधानकारांनी सर्वसामान्य भारतीयांवर सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या माध्यमातून फार मोठा विश्वास व्यक्त केला आहे. जगात यापूर्वी एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात कोणत्याच देशात मताधिकार देण्यात आला नव्हता. सरसकट सार्वत्रिक प्रौढ मताधिकार देण्याबाबत संविधान विधानसभेतही काही सदस्यांनी शंका उपस्थित केली होती. भारताची तेव्हाची परिस्थिती पाहता हा सविधानकारांचा सर्वाधिक धाडशी निर्णय मानावा लागेल. विशेषतः देशातील ८० टक्के पेक्षा अधिक मतदार अशिक्षित असताना, सामाजिक विभाजनानी दुभंगलेली ताठर समाजरचना असताना, जातीय, प्रादेशिक, भाषिक इत्यादी संकुचित निष्ठा त्रिवार असताना संविधानकारांनी हा निर्णय घेऊन मोठे धाडस केले होते. संविधानकारांची यामागील भूमिका मात्र अतिशय स्वच्छ होती. भारतात लोकशाही प्रक्रिया गतीमान करण्याकरिता सर्वसामान्य भारतीय माणसाचा राजकीय सहभाग अनिवार्य आहे. प्रौढ मताधिकार दिल्याशिवाय राजकीय समता प्रस्थापित होऊच शकणार नाही. जाती, धर्म,गट, प्रादेशिक, भाषिक संकुचित घटकांचा भारतीय समाज जीवनातील प्रभाव नाहीसा करण्यासाठीही सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराशिवाय पर्याय नाही याची स्पष्ट जाणीव संविधानकारांकडे होती. याबाबत संविधानकारांनी आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते की, "सामान्य माणसाची जागृती ही मताधिकार वापरूनच होऊ शकेल. अन्य सर्व मार्ग निष्फळ ठरतील. अन्य मार्गाने फार तर साक्षरता साध्य होईल. लोकशाही शिक्षण हे लोकशाहीतील सहभागानेच प्राप्त होत असते व प्रौढ मताधिकार देऊनच हा सहभाग शक्य होतो. शिक्षणाच्या वगैरे पात्रता ठेवून आज जर मताधिकार मर्यादित ठेवला तर एक तर बहुसंख्य नागरिक मत अधिकारापासून वंचित होतील. त्यामुळे शासन पुरेसे प्रतिनिधी होणार नाही, व दुसरा यापेक्षा मोठा धोका म्हणजे आज वंचित ठरविण्यात आलेले हे नागरिक पुन्हा कधीच पात्र ठरू शकणार नाहीत. यासंदर्भातील संविधान सभेची भूमिका स्पष्ट करताना संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणाले होते, "हा सार्वत्रिक प्रौढ मताधिकार शहाणपणाचा आहे की नाही याविषयी काही लोकांना शंका आहे, पण मला त्याबद्दल काही खेद वाटत नाही. हा एक प्रयोग आहे आणि त्याचे परिणाम आज कोणीच सांगू शकणार नाही. मला खेड्यातील लोक चांगले माहीत आहेत आणि तेच उद्याच्या मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर असणार आहेत. या खेडुतांना चांगले व्यवहारज्ञान व बुद्धिमत्ता असते. त्यांची एक बलिष्ठ संस्कृतीही आहे. शहरी पंडितांना ती जरी मान्य नसली तरी त्यांच्यात पुष्कळ गुण आहेत.. जर खेडुतांना साऱ्या गोष्टी समजावून दिल्या तर निवडणुकीचे तंत्र ते आत्मसात करतील, एवढेच नव्हे तर ते आपली मते शहाणपणाने देतील.. आपल्या खंबीर व्यवहार चातुर्याने खेडूत काय योग्य, काय बरोबर ओळखतील. यामुळे आपण अशी साधारण अशा बाळगू शकतो

की, आपल्या विधिमंडळातील प्रतिनिधींना जनतेचा खरा पाठिंबा असेल व देशाची वस्तुस्थिती माहित असेल. "

एकंदरीत, १७ कोटी ६० लाख लोकसंख्येस मतदानाचा अधिकार देण्याचा हा प्रयोग अभूतपूर्व होता. संविधानकारांनी हा मोठा विश्वास सर्वसामान्य भारतीय जनतेवर व्यक्त केला होता. म्हणूनच निवडणूक आयोगाने आपल्या अहवालात १९५५ साली लिहिले होते, "सामान्य भारतीय माणसांवर, त्यांच्या सर्व सामान्य ज्ञानावर व विवेक दृष्टीवर फार मोठी श्रद्धा व विश्वास संविधानकारांनी व्यक्त केला आहे. हा विश्वास अनाठायी नव्हता हे मागील सत्तर वर्षाच्या अनुभवातून स्पष्ट स्वरूपात दिसते."

**२) एकच सर्वसाधारण मतदार यादी:**

भारतीय संविधानाच्या कलम ३२५ अन्वये स्पष्ट करण्यात आले आहे की, "निवडणुकीसाठी प्रत्येक प्रादेशिक मतदारसंघाची एकच सर्वसाधारण यादी असेल." ब्रिटिश काळामध्ये जातीय व धार्मिक प्रभावातून विशिष्ट समूहां करिता स्वतंत्र मतदार संघाची पद्धती अवलंबली जात होती. त्या मतदारसंघांमध्ये मान्यता दिलेल्या संबंधित जमातीच्या समूहांची वा मतदारांची वेगळी यादी तयार केली जात असे. परंतु भारतीय संविधानाने ही पद्धती स्पष्ट स्वरूपात नाकारत जात-जमात अशा कोणत्याही आधारावर वेगळ्या मतदार यादीस आळा घातला व सर्व मतदारांचा समावेश प्रादेशिक मतदार संघाच्या सर्वसाधारण यादीमध्ये निश्चित करण्यात आला. राजकीय समानतेची भावना निर्माण होण्यात हा घटक महत्त्वाचा ठरताना दिसतो.

**३) निवडणूक विषयक कायदे करण्याचा संसद व राज्य विधिमंडळास अधिकार :**

भारतीय संविधानाच्या कलम ३२७ मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, "भारतीय संविधानातील तरतुदी ना बाधा पोहोचणार नाही ही अशा पद्धतीने निवडणूक विषयक कायदे करण्याचा अधिकार केंद्रीय व राज्य विधिमंडळाना असेल." त्याप्रमाणे १९५१ ते आजतागायत संसदेने निवडणूक विषयक अनेक कायदे पारित केलेले आहेत. परिसीमन आयोग अधिनियम १९५२,परिसीमन आयोग अधिनियम( दुरुस्ती) १९५२, परिसीमन आयोग अधिनियम १९६२, परिसीमन आयोग अधिनियम १९७२, ८४ वी घटना दुरुस्ती अधिनियम २००१, परिसीमन अधिनियम २००२, ८७ वी घटनादुरुस्ती अधिनियम २००३, परिसीमन( दुरुस्ती) अध्यादेश २००८ याची काही प्रमुख उदाहरणे होत. अशा पद्धतीच्या कायद्यांच्या माध्यमातून विधिमंडळे निवडणूक विषयक बाबींच्या विस्तृत तरतुदी करत असतात उदा. १९५० व १९५१च्या लोकप्रतिनिधीत्वाच्या कायद्यांनी, मतदारांच्या याद्या तयार करणे, मतदारांची पात्रता, निवडणूक यंत्रणा व प्रत्यक्ष निवडणुकीय संचलन इत्यादी बाबत तरतुदी करण्यात आल्या तर १९६२ व १९७२च्या मतदारसंघ निर्धरण कायद्याने "मतदार संघ निर्धारण" मंडळा ची निर्मिती करण्यात आली. या कायद्याने मतदार संघाची रचना व पुनर्रचना करण्याची जबाबदारी या मंडळाकडे सोपवण्यात आली आहे.

निवडणूक विषयक कायदे करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने संसद व घटक राज्य विधिमंडळे यांना दिलेला असला तरी संसदेच्या तुलनेत राज्य विधिमंडळाना दिलेला अधिकार हा दुय्यम स्वरूपाचा आहे. राज्य विधीमंडळाचा या संदर्भातील कायदा संसदेच्या कायद्याशी सुसंगत असणे आवश्यक मानले जाते. राज्य विधिमंडळाने केलेला कायदा व संसदेचा कायदा यात विरोध निर्माण झाला तर अशावेळी राज्य विधिमंडळाचा कायदा रद्द होतो व संसदेचा कायदाच अंतिम समजला जातो.

### ४) न्यायालयीन हस्तक्षेपास काही प्रमाणात प्रतिबंध:

भारतीय न्यायपालिका ही स्वतंत्र व स्वायत्त संविधान एक व्यवस्था असून तिचे स्वरूप एकात्म पद्धतीचे असल्याकारणाने संपूर्ण भारतभर सर्वोच्च न्यायालयाचा अंमल चालतो. संविधानाचा अर्थ लावण्याची व संविधानाचे संरक्षण करण्याची ही मोठी जबाबदारी न्यायपालिकेवर भारतीय संविधानाने टाकलेली आहे. मात्र निवडणूक विषयक बाबींमध्ये निवडणूक आयोगाची स्वायत्तता राखण्याकरिता सविधानकारांनी काही बाबतीत न्यायपालिकेस प्रतिबंध केलेला दिसतो. भारतीय संविधानाच्या ३२९ अन्वये असे स्पष्ट करण्यात आले आहे की निवडणूक विषयक कायद्याचा वाद कोणत्याही न्यायालयात उपस्थित करता येणार नाही. तसेच संसद वा राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहावर झालेल्या एखाद्या निवडणुकीविषयीचा वाद संबंधित कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धतीने योग्य सत्य समोर, निवडणूक याचिकेद्वारेच उपस्थित करता येईल, अन्य मार्गाने नव्हे अशी तरतूद १९६६ च्या लोकप्रतिनिधीत्व कायद्यात दुरुस्तीद्वारे करण्यात आली आहे.

### ५) निवडणूक आयोगाची निर्मिती:

भारतीय संविधानाच्या कलम ३२४ अन्वये निवडणूक आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. निवडणूक आयोगास संविधानाने संवैधानिक दर्जा बहाल केला आहे. भयमुक्त, नि:पक्षपाती व न्याय वातावरणात निवडणुकांचे संचलन होणे ही लोकशाहीची पूर्वअट मानली जाते. म्हणूनच पोलॉक नावाचे तत्त्ववेत्ते या संदर्भात म्हणतात, "सार्वजनिक निवडणूका काटेकोरपणे व कार्यक्षमतेने पार पाडल्या नाहीत तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाहीत तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते." भारतीय लोकशाही संकटात सापडू नये याची काळजी भारतीय संविधानकारांनी घेत स्वायत्त निवडणूक आयोगाची रचना संविधानात अंतर्भूत करून त्यास एक प्रकारची प्रतिष्ठा व पावित्र्य बहाल केले आहे. संविधानिक तरतुदीना अनुसरून २५ जानेवारी १९५० रोजी भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. या निवडणूक आयोगाने मागील सत्तर वर्षात भारतीय लोकशाहीला कार्यान्वित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यामुळेच २५ जानेवारी हा दिवस "राष्ट्रीय मतदार दिवस" म्हणून साजरा केला जातो.

### ६) एकसदस्यीय मतदार संघ:

भारतीय संविधानाच्या कलम ८० अन्वये अशी तरतूद करण्यात आली आहे की, लोकसभेच्या सदस्यांची निवड एक सदस्य मतदारसंघातून केली जाईल. लोकप्रतिनिधींची निवड साध्या बहुमताने होईल असेही या कलमान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. निवडणुकीमध्ये झालेल्या एकूण मतदानापैकी ज्या उमेदवारास सर्वाधिक मते मिळतात तो उमेदवार विजयी म्हणून घोषित केला जातो. याच पद्धतीचा वापर घटक राज्य पातळीवरील विधानसभांच्या निवडणुका मध्ये ही केला जातो.

### ७) प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीचा मर्यादित वापर:

भारतीय संविधानाने लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये प्रामुख्याने साध्या बहुमत पद्धती तंत्राचा वापर करावा असे नमूद केले आहे, मात्र राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व राज्यसभेच्या निवडणुकांमध्ये प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीचा अवलंब करावा असे नमूद केले आहे. या पद्धतीने राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यसभा सदस्य, काही विधान परिषद सदस्य

या पद्धतीने निवडले जातात. त्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्व च्या एक मतदान पद्धतीचा वापर संविधानिक तरतुदीस अनुसरून केला जातो.

## ८) राखीव जागांची तरतूद :

भारतीय संविधानाने स्वतंत्र मतदार संघ पद्धती नाकारली असली तरी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गा करिता लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागांची संवैधानिक तरतूद केलेली आहे. भारतीय संविधानाच्या कलम ३३४ अन्वये लोकसभा व घटक राज्यातील विधानसभांमध्ये अनुसूचित जाती व जमातीच्या प्रवर्गा करिता लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा राहतील असे स्पष्ट केले आहे. सुरुवातीस या राखीव जागांची कालमर्यादा दहा वर्षे म्हणजे १९६० पर्यंत कालबद्ध करण्यात आली होती. मात्र संसद कायदा करून ही कालमर्यादा वाढवू शकेल असेही स्पष्ट केले होते. त्याप्रमाणे संसदेने वेळोवेळी कायदा करून ही कालमर्यादा दहा दहा वर्षांनी वाढवलेली दिसते. सध्या ही मुदत २६ जानेवारी २०२० पर्यंत आहे. अर्थात संसद ही मुदत आणखी दहा वर्षांनी वाढवेल अशीच शक्यता अधिक आहे. कारण राजकीय आरक्षण हे भारतीय राजकीय व्यवस्थेत नव्याने जागृत होत असलेल्या समूहांना सामावून घेण्याचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून पुढे आले आहे. या ठिकाणी ही बाब ही स्पष्ट करणे आवश्यक होते की, भारतीय संविधानाने केवळ राजकीय आरक्षणास काल मर्यादा दिलेली आहे. मात्र आरक्षण जे शिक्षण व नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जाती व जमातीच्या प्रवर्गा करिता देण्यात आलेले आहे त्यास कालमर्यादा नाही म्हणजे ते कायमस्वरूपी आहे.

## ९) मतदार संघ परिसीमन आयोगः

विधिमंडळ असणाऱ्या राज्यांमध्ये वा एखाद्या देशांमध्ये भौगोलिक मतदार संघाची सीमा निर्धारित करणे किंवा निश्चित करण्याची प्रक्रिया म्हणजे मतदारसंघ पुनर्रचना होय, असे म्हणता येईल. अशा पद्धतीने मतदार संघाची पुनर्रचना करण्याकरिता ज्या आयोगाची निर्मिती करण्यात येते त्यास "मतदार संघ परिसीमन आयोग" असे म्हटले जाते. भारतात आज पर्यंत चार वेळा अशा पद्धतीच्या आयोगांचे गठण करून मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली आहे.

परिसीमन आयोगाचे स्थान ही निवडणूक प्रक्रियेत अतिशय महत्त्वाचे मानले जाते. राष्ट्रपतींनी नमूद केलेल्या तारखेपासून या आयोगाचे आदेश अमलात येतात. मतदार संघ परिसीमन आयोगांचे कायदेशीर स्थान बाब ही फार महत्त्वाची मानली जाते. मतदार संघ परिसीमन आयोगाच्या आदेशांना एक प्रकारे कायद्याचे परिमाण असते. या आयोगाच्या आदेशांवर कोणत्याही न्यायालयात प्रश्न उपस्थित करता येत नाही. आयोगाचे अहवाल व आदेश लोकसभा व घटक राज्यांच्या विधानसभा पुढे विचारार्थ ठेवला जातो.

भारतीय संविधानात मतदारसंघ पुनर्रचने संदर्भात विस्तृत तरतुदी आहेत. त्यातील काही प्रमुख तरतुदींचा उल्लेख करणे गरजेचे ठरते. जसे संविधानाच्या कलम ८१ अन्वये लोकसभेची रचना निश्चित केली गेली आहे, कलम ८२ प्रत्येक जनगणने नंतर पुनर्समायोजन ची तरतूद आहे, कलम १७० राज्य विधानसभांची रचना निश्चित केली आहे, कलम ३३० नुसार लोकसभेमध्ये तर कलम ३३२ नुसार राज्य विधानसभा मध्ये अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. संविधानातील या तरतुदींना अधीन राहून आजतागायत विविध परिसीमन अधिनियम पारित करण्यात आले आहेत. त्यात परिसीमन अधिनियम १९५२, परिसीमन आयोग( दुरुस्ती) अधिनियम १९५२, परिसीमन अधिनियम १९६२, परिसीमन अधिनियम १९७२, ८४ वी घटना दुरुस्ती अधिनियम २००१, परिसीमन

अधिनियम २००२, ८७ वी घटना दुरुस्ती अधिनियम २००३, परिसीमन( दुरुस्ती) अध्यादेश २००८ यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

**चौथा मतदारसंघ परिसीमन आयोग:**

भारतीय संविधानाच्या कलम ८३ अन्वये, "प्रत्येक जनगणने नंतर कायदे मंडळातील सदस्य संख्या लोकसंख्येचे सदस्य प्रमाण लक्षात घेऊन निर्धारित करणे आवश्यक मानले आहे" त्याप्रमाणे सुरुवातीच्या काळात लोकसभा सदस्य संख्येत बदलही करण्यात आले. मात्र अलीकडच्या काळात लोकसंख्या नियंत्रण व लोकसंख्येने लहान राज्यातील असंतोष लक्षात घेता लोकसंख्या तत्त्वावर लोकसभेची सदस्य संख्या वाढवणे म्हणजे लोकसंख्या वाढीचे प्रोत्साहन देण्यासारखे ठरेल. लोकसंख्या नियंत्रणा करिता प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या राज्यांच्यावर त्याचा नकारात्मक प्रभाव पडेल ही बाब लक्षात घेऊन संसदेने ८४ व्या घटनादुरुस्तीने लोकसभा व राज्यातील विधानसभेतील सदस्य संख्या २०२० पर्यंत सोडविण्याचा निर्णय घेतला. तर ८७ व्या घटना दुरुस्ती ने २००१ सालच्या जनगणनेच्या आधारावर मतदारसंघाची पुनर्रचना करण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे २००२ साली सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश कुलदीप सिंग यांच्या अध्यक्षतेखाली चौथा परिसीमन आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगाने केलेल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर २००४च्या लोकसभा निवडणुका पार पडल्या. २००९, २०१४व २०१९ च्या लोकसभा निवडणुका व त्या दरम्यानच्या विधानसभा निवडणुका ही या मतदारसंघ पुनर्रचनेत प्रमाणेच पार पडत आहेत. या मतदारसंघ पुनर्रचनेत राखीव जागा मध्येही वाढ झालेली दिसते. पूर्वी लोकसभेत अनुसूचित जाती करता ७९ जागा राखीव होत्या त्या वाढवून ८४ झाल्या तर अनुसूचित जमाती करता पूर्वी ४१ मतदारसंघ राखीव होते ते वाढून ४७ इतके झाले आहेत.

**निवडणूक आयोग:**

भारतीय निर्वाचन प्रक्रियेत निवडणूक आयोगाचे स्थान महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानाच्या कलम ३२४ अन्वये निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी करण्यात आली. तेव्हापासून निवडणूक आयोग कार्यक्षमपणे कार्यरत आहे. निवडणूक आयोगाची रचना, कार्य व अधिकार यांचा अभ्यास एकूण निवडणूक विषयक प्रक्रिया अवलोकन करून घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ठरते.

**निवडणूक आयोगाची रचना:**

निवडणूक आयोगाची रचना पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**नियुक्ती व सदस्य संख्या:**

भारतीय संविधानाच्या कलम ३२४ मध्ये या दृष्टीने स्पष्टीकरण देण्यात आलेले दिसते. संविधानाच्या कलम ३२४ अन्वये असे नमूद करण्यात आले आहे की, मुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्त त्यांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाईल. याच कलमांमध्ये प्रामुख्याने पुढील तरतुदी नमूद करण्यात आल्या आहेत.

निवडणूक आयोगा मध्ये एक मुख्य निवडणूक आयुक्त व राष्ट्रपती वेळोवेळी ठरवतील इतके निवडणूक आयुक्त असतील.

- ज्यावेळी इतर निवडणूक आयुक्त नियुक्त केले जातील त्या वेळी मुख्य निवडणूक आयुक्त निवडणूक आयोगाचा अध्यक्ष असेल.

- निवडणूक आयोगाच्या सहाय्या करिता आवश्यक वाटल्यास निवडणूक आयोगाची विचारविनिमय करुन राष्ट्रपती विभागीय आयुक्त नियुक्त करू शकेल.

- निवडणूक आयुक्त व विभागीय आयुक्त त्यांचा कार्यकाल व सेवाशर्ती राष्ट्रपती ठरवतील.

- निवडणूक आयोगाची स्थापना १९५० आली झाली असली तरी १५ ऑक्टोबर १९८९ पर्यंत निवडणूक आयोग ही मुख्य निवडणूक आयुक्त असलेली एक सदस्य संस्था होती. ६१ व्या संविधान दुरुस्तीने मतदारांचे वय २१ वरून १८ पर्यंत खाली आणल्याने वाढलेले काम हाताळण्या करता म्हणून सर्वप्रथम १६ ऑक्टोबर १९८९ रोजी मुख्य निवडणूक आयुक्तांना सहाय्य करण्यासाठी दोन निवडणूक आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. परंतु लगेच जानेवारी १९९० मध्ये ही इतर निवडणूक आयुक्त यांची दोन पदे रद्द करण्यात आली. १९९३ पर्यंत निवडणूक आयोग परत एक खांबी पद्धतीने काम करत होता. १९९३ च्या ऑक्टोबर मध्ये राष्ट्रपती ने दोन निवडणूक आयुक्त नियुक्त केले. तेव्हापासून आजतागायत एक मुख्य निवडणूक आयुक्त व दोन आयुक्त असे तीन सदस्य निवडणूक आयोगाचे स्वरूप कायम आहे.

## २) कार्यकाळ:

ुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्त हे राष्ट्रपतींची मर्जी असे पर्यंत आपल्या पदावर कार्यरत राहतील असे संविधानात नमूद करण्यात आलेले असले तरी त्यांचा कार्यकाळ हा निश्चित करण्यात आलेला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त हे जास्तीत जास्त सहा वर्ष व वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत आपल्या पदावर कार्यरत राहतील तर निवडणूक आयुक्त हे सहा वर्ष व वयाच्या ६२ वर्षापर्यंत आपल्या पदावर कार्यरत राहतील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

## ३) बडतर्फी:

निवडणूक आयोगाचे आयुक्त व इतर आयुक्त यांच्या सेवाशर्ती निश्चित करण्याचा अधिकार संविधानाने राष्ट्रपतींना दिला आहे. मात्र हा अधिकार राष्ट्रपतींना देतानाच राष्ट्रपतींवर असे बंधनही टाकण्यात आले आहे की, राष्ट्रपतीने या सेवाशर्ती संस्थेच्या कायद्याला अनुसरून लागू कराव्यात. निवडणूक आयुक्तांच्या सेवाशर्तीत त्यांचे नुकसान होईल असे बदल करता येणार नाहीत असे संविधानात स्पष्ट करण्यात आले आहे. संविधानाच्या कलम ३२४(५) अन्वय निवडणूक आयुक्तांना बडतर्फ करण्याची पद्धती स्पष्ट केली आहे. त्याप्रमाणे मुख्य निवडणूक आयुक्त सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना ज्या पद्धतीनुसार व ज्या कारणाकरिता पदच्युत करता येईल त्याच पद्धती व कारणानुसार पदच्युत करण्यात यावे अशी तरतूद आहे. इतर आयुक्तांना मुख्य आयुक्तांच्या सल्ल्यानुसार बडतर्फ करण्याचा अधिकार भारताच्या राष्ट्रपतींना आहे.

**४) वेतन व भत्ते :**

मुख्य निवडणूक आयुक्त व इतर आयुक्त यांचे वेतन व भत्ते समान ठेवण्यात आले असून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचे जे वेतन व भत्ते आहेत तेच वेतन व भत्ते निवडणूक आयुक्तानाही लागू होतील असे संविधानात स्पष्ट करण्यात आले आहे.

**निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्यः**

निवडणूक आयोगास निःपक्षपातीपणे व कार्यक्षमरित्या कार्य करता यावे याची काळजी सविधानकारांनी घेतलेली दिसते. त्याकरिता निवडणूक आयोगाची स्वायत्तता जपणाऱ्या तरतुदी संविधानात करण्यात आल्या आहेत. त्यातील काही प्रमुख तरतुदींचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

१. मुख्य निवडणूक आयुक्तांना संविधानाने कार्यकालाची याची हमी दिलेली आहे. संविधानात स्पष्ट करण्यात आले आहे की, ज्या पद्धतीने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास पदच्युत केले जाते, फक्त त्याच पद्धतीने व त्याच कारणाकरिता मुख्य निवडणूक आयुक्तांना पदच्यूत करता येते. त्यामुळे मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती जरी राष्ट्रपतीच्या मार्फत होत असली तरी त्यांचा कार्यकाळ मात्र राष्ट्रपती च्या मर्जीवर अवलंबून नसतो.

२. मुख्य निवडणूक आयुक्तांची पदावर नियुक्ती झाल्यानंतर त्यास बंधनकारक ठरतील असे कोणतेही बदल त्यांच्या सेवाशर्ती मध्ये करता येणार नाहीत असेही ही संविधानात नमूद करण्यात आले आहे.

३. निवडणूक आयोगातील इतर निवडणूक आयुक्त व विभागीय निवडणूक आयुक्त यांना मुख्य निवडणूक आयुक्तांच्या शिफारशी व्यतिरिक्त पदावरून कमी करता येत नाही.

भारतीय संविधानाने मुख्य निवडणूक आयुक्तांचे पद व एकूण निवडणूक आयोगाची स्वायत्तता राखली जावी याकरता संविधानात प्रामुख्याने वरील तरतुदींचा समावेश केला असला, तरी टीकाकारांना या तरतुदी पुरेशा वाटत नाहीत. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या संदर्भात काही उणिवा प्रकर्षाने तरतुदींच्या स्वरूपात जाणवतात. टीकाकारांच्या मते पुढील काही बाबींसंदर्भात संविधानात स्पष्टता नसल्याकारणाने संभ्रम निर्माण होतात.

१. भारतीय संविधानात इतर संवैधानिक पदांकरिता जसे कायदेशीर, शैक्षणिक, प्रशासकीय व न्यायिक नियम सांगितलेले आहेत तसे नियम मुख्य निवडणूक आयुक्तांसंदर्भात सांगितलेले नाहीत.

२. संविधानात निवडणूक आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाल ही निश्चित स्वरूपात मांडलेला नाही.

३. सेवानिवृत्त होणाऱ्या निवडणूक आयुक्तांची शासनाने अन्य पदावर नियुक्ती करण्यावर संविधानाने बंदी घातलेली नाही.

**निवडणूक आयोगाची उद्दिष्ट व तत्त्वेः**

निवडणूक आयोगाने आपले कार्य पूर्णत्वास नेण्या करिता काही मार्गदर्शक तत्वे व उद्दिष्ट निश्चित केलेली आहेत त्यांची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

## निवडणूक आयोगाचे ध्येय वाक्य:

भारतात व जगात लोकशाही रूजवण्या करिता अधिक कृतिशील व्यवहार व सहभाग घेऊन निवडणूक आयोग हे सर्वोत्तमतेचे केंद्र बनण्याकरता प्रयत्नशील राहील.

## निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट:

निवडणूक आयोगाच्या वतीने २०१० ते २०२५ या कालावधी करता धोरणात्मक योजना जाहीर केली आहे. त्यात निवडणूक आयोगाने आपले उद्दिष्ट जाहीर करताना म्हटले आहे," भारताचा निवडणूक आयोग स्वातंत्र्य, सचोटी व स्वायत्तता अबाधित राखेल. सर्वांकरिता उपलब्ध समावेशकता आणि हितसंबंधी यांचा नीति आधारित सहभाग याची शाश्वती देईल व निवडणुकी आधारित लोकशाही व राज्यव्यवहार समर्थ करण्यासाठी मुक्त, न्याय्य व पारदर्शक निवडणुका घेऊन व्यावसायिकतेची उच्चतम गुणवत्ता अंगीकारेल."

## मार्गदर्शक तत्त्वे:-

निवडणूक आयोगाने कार्यक्षम व पारदर्शक पद्धतीने कार्य करण्याकरिता स्वतः काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. ती पुढील प्रमाणे नमूद करता येतील.

१. निवडणुकीच्या एकूण कामकाजात समता, न्याय्य व्यवहार, निःपक्षपातीपणा, स्वातंत्र्य व कायद्याचे राज्य ही संविधानिक मूल्य अबाधित राखणे.

२. विश्वासार्हता, मुक्तपणा, न्याय्य व्यवहार, पारदर्शकता, सचोटी, उत्तरदायित्व, स्वायत्तता व व्यावसायिकता यांची गुणवत्ता उच्चतम राखून निवडणुका घेणे.

३. मतदार केंद्रित व मतदारांसाठी मैत्रीपूर्ण समावेशक वातावरण निवडणूक प्रक्रियेमध्ये सर्व पात्र नागरिकांचा सहभाग घेता येईल याची शाश्वती देणे,

४. निवडणूक प्रक्रियेच्या हिताकरिता राजकीय पक्ष व सर्व हितसंबंधीतांच्या बरोबर कार्यरत राहणे.

५. मतदार, राजकीय पक्ष, निवडणूक अधिकारी, उमेदवार व सर्वसामान्य जनता अशा प्रकारच्या हितसंबंधीयांमध्ये निवडणूक प्रक्रिया व निवडणुकीसंबंधी कामकाज या विषयी माहिती होण्यास चालना देणे व या देशातील निवडणूक प्रणाली बाबत विश्वास बळकट करणे.

६. निवडणूक सेवा प्रभावी व व्यावसायिक पद्धतीने देता यावा याकरिता मानव संसाधन विकसित करणे.

७. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी याकरिता उच्च दर्जाची पायाभूत व्यवस्था निर्माण करणे,

८. निवडणूक प्रक्रियेच्या सर्व अंगांमध्ये सुधारणा होणे करिता तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

९. ध्येय व उद्दिष्ट पूर्ती करण्यासाठी व त्यात सर्वोत्कृष्टता साध्य करण्यासाठी नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करण्याचा प्रयत्न करणे.

१०. देशातील निवडणूक प्रक्रिया वरील लोकांचा विश्वास कायम राखून तो वृद्धिंगत करून लोकशाही मूल्य वृद्धिंगत करण्यास सहाय्य करणे.

**निवडणूक आयोगाचे अधिकार व कार्य:**

भारतीय संविधानाच्या ३२४ व्या कलमात निवडणूक आयोगाचे अधिकार व कार्य नमूद करण्यात आली आहेत. याशिवाय १९५० व १९५१ चे लोकप्रतिनिधीत्वाचे कायदे १९५२ चा राष्ट्रपती व उपराष्ट्रपती च्या निवडणुकीचा कायदा, १९६३ चा संघ प्रदेशाच्या शासनाचा कायदा, १९६६ चा दिल्ली प्रशासनाचा कायदा इत्यादी विधी नियमांमुळे निवडणूक आयोगाच्या कार्यात अधिक भर पडलेली दिसते. त्याची मांडणी पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**मतदारांच्या याद्या तयार करणे:**

भारतीय संविधानातील कलम ३२५ व्या व ३२६ व्या कलमात मतदार यादी संदर्भातील कार्य सोपविण्यात आली आहे आहेत. भारतीय संविधानाच्या ३२६ व्या कलमान्वये जी व्यक्ती भारताचा नागरिक आहे व ज्या व्यक्तीचे वय १८ वर्षे पूर्ण आहे व कायदे मंडळाने केलेल्या कायद्यानुसार जी व्यक्ती गुन्हेगार, भ्रष्टाचारी, अनिवासी अशी नाही, तिला प्रौढ मतदानाचा अधिकार दिला जाऊन तिची नोंद मतदार यादीत केली जाते. संसदेच्या लोकसभा व घटक राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकीत मतदान करण्यास पात्र असणाऱ्या नागरिकांचा समावेश प्रादेशिक मतदार यादीत केला जातो. तर ३२५ व्या कलमाने असे स्पष्ट करण्यात आले आहे की, व्यक्ती धर्म, वंश, जात वा लिंग या कारणावरून मतदार यादीत समाविष्ट करण्यात अपात्र ठरविण्यात येणार नाही. प्रादेशिक मतदार संघातील मतदारांच्या याद्या करताना ज्या व्यक्ती मतदारांच्या पात्रतेच्या अटी पूर्ण करतील त्यांना मतदार म्हणून नोंदविण्यात येईल. योग्य व अचूक मतदार याद्या तयार करणे हे जरी निर्वाचन आयोगाचे काम असले तरी प्रत्यक्षात राज्यातील अधिकारी मतदार याद्या तयार करताना पक्षपातीपणा करतात व अपात्र व्यक्तींना मतदार म्हणून मतदानाचा अधिकार देतात. अशा परिस्थितीत अपात्र, अनिवासी, गुन्हेगार, कोर्टाने नादार ठरविलेल्या व्यक्ती, अपूर्ण वय इत्यादी स्वरुपाच्या व्यक्तींची मतदार यादीत नोंद होते. अशावेळी अचूक, योग्य अशा पात्र मतदारांची नोंदणी करणे व अद्ययावत मतदार याद्या तयार करणे ही जबाबदारी निर्वाचन आयोगास पार पाडावी लागते. मतदार नाव नोंदणीच्या कार्यात न्यायालयास हस्तक्षेप करता येणार नाही हेही भारतीय संविधानाच्या कलम ३२९ अन्वये स्पष्ट करण्यात आले आहे. मतदारांच्या नावांची नोंदणी करण्याबाबतचे निवेदन, निर्वाचन आयोग वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन या माध्यमांद्वारे प्रसारित करीत असते.

**२) निवडणुकांचे संचालन करणे:**

सार्वत्रिक निवडणुका घेणे, त्यासंबंधी तयारी करणे, प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी नियंत्रण करणे अशा पद्धतीची संचालयनाचे महत्त्वपूर्ण कार्य निर्वाचन आयोगास पार पाडावे लागते. सत्ताधारी पक्ष, इतर प्रभावी दबावगट, व्यक्ती यांच्याकडून निवडणूक काळात वाममार्गाचा वापर मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता असते. अशा वेळी निवडणूक आयोग दक्ष राहून निवडणुकीत कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. निवडणुका खुल्या व स्वच्छ वातावरणात पार पाडल्या जाव्यात याकरिता निवडणूक आयोग आदर्श आचार सहिता तयार करण्याचे कार्य करते. त्याची अंमलबजावणी होते आहे की नाही याचीही कटाक्षाने ते पाहणे

करते. त्यामुळेच निवडणूक काळात राजकीय पक्ष, राजकीय नेते व मतदार यांचे वर्तन सुयोग्य राहण्यास मदत होते.

निवडणूक संचलन विषयक कार्यात निवडणूक आयोगास याशिवाय दुर्बल घटकां करिता स्वतंत्र मतदान केंद्राची उभारणी करण्याचे कार्यही पार पाडावे लागते. दुर्गम, डोंगरी, आदिवासी भागांमधील मतदार अधिकारापासून वंचित राहू नये म्हणून निवडणूक प्रक्रिया त्यांच्यापर्यंत घेऊन जाण्याचे कार्य निवडणूक आयोग करते. याशिवाय बोगस मतदान रोखणे, गुप्त मतदान योग्य पद्धतीने होईल याची काळजी घेणे, मतदान यंत्राची सुरक्षितता राखणे, पारदर्शक पद्धतीने निवडणूक निकाल लावणे इत्यादी कार्य ही निवडणूक आयोग सक्षम अधिकाऱ्यांकडून करवून घेतात.

### ३) निवडणूक रद्द करणे:

निवडणूक आयोग निवडणुकांचे संचलन करण्याचे कार्य जसे पार पाडतो तसेच निवडणुका रद्द करण्याचे कार्यही निवडणूक आयोगच पार पाडत असतो. साधारणतः निवडणुकीमध्ये गैरप्रकार झाला आहे असे निदर्शनास आले तर निवडणूक आयोग झालेली निवडणूक प्रक्रिया रद्द करून नव्याने मतदान घेऊ शकतात. निवडणूक गैरप्रकारात प्रामुख्याने मतदानाच्या वेळी मतदारांवर दडपण आणणे, बोगस मतदान करणे, मतदान केंद्रावर हल्ले करणे, मतदान केंद्रे ताब्यात घेणे, मतदारास मतदान करण्यास प्रतिबंध करणे असे प्रकार निवडणूक गैरव्यवहारात प्रामुख्याने येतात. शिवाय त्या मतदार संघातील उमेदवार निवडणूक काळात मृत्यू पावला असेल तर त्या विशिष्ट मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया स्थगित केली जाते. पूर्वी ती सरसकट कोणत्याही उमेदवाराच्या मृत्युने स्थगित होत असे. मात्र नंतर त्यात दुरुस्ती करून तो उमेदवार मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा उमेदवार असेल तरच निवडणूक रद्द होईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

### ४) पोटनिवडणुका घेणे :

लोकसभा व विधानसभा यांच्या रद्द झालेल्या निवडणूका पुन्हा त्या मतदारसंघात घ्याव्या लागतात. निवडणुकीच्या वेळी गैरप्रकार झाला हे सिद्ध झाले तर ती निवडणूक रद्द होते. निवडणुकीनंतर विजयी उमेदवाराचा मृत्यू झाला व राजीनामा दिला तर त्या जागी पोट निवडणुकांचे आयोजन करावे लागते. रिक्त झालेल्या जागेवर सहा महिन्याच्या आत निवडणूक घेण्याचे बंधन संविधानाने टाकले आहे. अशावेळी पोटनिवडणूकींचे आयोजन करण्याची जबाबदारी निवडणूक आयोग पार पाडतो.

### ५) राजकीय पक्षांना मान्यता देणे व त्यांची पक्ष चिन्हे ठरवून देणे:

भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना संघटना स्थापन करण्याचे मूलभूत स्वातंत्र्य बहाल केलेले आहे. भारतीय नागरिकत्वामुळे राजकीय पक्षांची स्थापना करू शकतात. अशावेळी राजकीय पक्षांना राष्ट्रीय पक्ष, प्रादेशिक पक्ष वा मान्यताप्राप्त पक्ष म्हणून मान्यता देण्याचा अधिकार निवडणूक आयोगास आहे. सार्वत्रिक निवडणुकीत ज्या राजकीय पक्षास किमान चार राज्यात चार टक्के मिळतात त्या राजकीय पक्षास राष्ट्रीय पक्षाचा दर्जा देण्याचे कार्य निवडणूक आयोग करतो. तसेच ज्या राजकीय पक्षास घटक राज्य विधानसभेच्या निवडणुकीत चार टक्के पेक्षा अधिक मते मिळतात त्यांना प्रादेशिक पक्ष म्हणून निवडणूक आयोग मान्यता देतो. त्या पक्षांना चिन्हांचे वाटप करणे हे ही निवडणूक आयोगाचे कार्य आहे.

राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत फूट पडून ज्यावेळी वेगवेगळे गट पडतात व दोन्ही गट राजकीय पक्षाकडे मूळ चिन्हांची मागणी करतात अशावेळी उभय पक्षांची भूमिका अवलोकन करून निवडणूक आयोग त्या चिन्हांचा निर्णयही देतात. या दोन गटांमध्ये निर्माण होणारा वाद मिटविणे हे ही निवडणूक आयोगाचे महत्त्वाचे कार्य आहे. साधारणतः चिन्ह वाटपाच्या वादात मूळ राजकीय पक्षास ते चिन्ह दिले जाते परंतु एस एल शकधर यांनी निवडणूक आयुक्त असताना यासंदर्भात असा निर्णय दिला की," ज्या गटाकडे आमदार व खासदार अधिक असतील त्या गटासमोर निवडणूक चिन्ह दिले जाईल. परंतु यासंदर्भात अशी ही तरतूद आहे की, जर एखाद्या राजकीय पक्षाचे विघटन होऊन दुसऱ्या एखाद्या राजकीय पक्षात विलीन झाले तर अशावेळी त्या फुटून बाहेर पडलेल्या राजकीय पक्षाची मान्यता काढून घेतली जाते. परंतु निवडणूक आयोग यासंदर्भात दुर्लक्षही करू शकते वा परिस्थितीजन्य परिस्थितीस अनुसरून निर्णय घेऊ शकते. उदा. १९७५ साली मेघालयात अशी परिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळी निवडणूक आयोगाने कोणत्याही गटाची मान्यता रद्द केली नाही. तर १९८५ साली निवडणूक मंडळाने सिक्कीम संग्राम परिषद या पक्षास प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देऊन हत्ती हे पक्ष चिन्ह देण्यात आले. कारण या पक्षाने प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी लागणप्रया अटी पूर्ण केल्या होत्या. परंतु सिक्कीम मधील इतर चोवीस संघटनांना राजकीय पक्ष म्हणून मान्यता देण्यात आली, नाही कारण त्यांनी प्रादेशिक पक्षास लागणाऱ्या अटी पूर्ण केलेल्या नव्हत्या.

### ६) उमेदवारांना अपात्र ठरविणे:

१९५१ च्या लोकप्रतिनिधीत्वाच्या कायद्यान्वये निवडणूक आयोगास या संदर्भातील अधिकार प्राप्त झाले आहेत. १९५१ लोकप्रतिनिधीत्व कायद्यानुसार ज्या उमेदवाराने ठराविक मुदतीत निवडणूक फाईल भरून दिली नाही तर त्यास अपात्र ठरविण्याचा अधिकार निवडणूक आयोगास देण्यात आलेला आहे. प्रत्येक निवडणुकीनंतर निवडणुकीसंबंधी च्या नोंदी ची फाईल तयार ठेवण्याचे बंधन उमेदवारांवर असते. १९८५ साली निवडणुकीसंबंधी ची नोंदणी न केलेल्या कारणाने ८७१ उमेदवारांना अपात्र ठरविण्यात आले होते.

### ७) संसद सदस्य व विधानसभा सदस्य यांना अपात्र ठरवणे :

संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा व विधानसभेच्या एखादा सदस्य अपात्र आहे की नाही ठरविताना राष्ट्रपती निवडणूक आयोगाचा सल्ला विचारात घेतात. भारतीय संविधानाच्या कलम १०२ अन्वये सदस्य अपात्र ठरवण्या संदर्भात निवडणूक आयोग राष्ट्रपतींना सल्ला देऊ शकतात. १९५१ च्या लोकप्रतिनिधीत्व कायद्यानुसार संसद पुढील कारणांमुळे अपात्र ठरविले जाते.

१. निवडणुकीतील भ्रष्टाचाराबाबत न्यायालयाने वा निर्वाचन आयोगाने दोषी ठरविल्यास

२. न्यायालयाने दोषी ठरवून दोन वर्षांपेक्षा अधिक तुरुंगवासाची शिक्षा दिल्यास

३. निवडणुकीतील झालेल्या खर्चाचे हिशोब योग्य वेळेत व योग्य पद्धतीने दिले नसल्यास

४. भ्रष्टाचार, लाचलुचपत यासारख्या कारणाकरता सरकारी सेवेतून कमी करण्यात आले असेल तर

५. ती व्यक्ती दिवाळखोर व वेडी घोषित केलेली असेल तर

६. शासकीय करार व आर्थिक व्यवहार असणाऱ्या संस्थेत हितसंबंध गुंतलेले असल्यास, इत्यादी

वरील बाबींसंदर्भात निवडणूक आयोग राष्ट्रपतींना सल्ला देतो. निवडणूक आयोग त्यासंबंधी चौकशी करून तो अपात्र असल्यास तशी शिफारस राष्ट्रपतींकडे करतो. राष्ट्रपतीने निर्णय घेतल्यानंतर त्या व्यक्तीचे कायदेमंडळातील सदस्यत्व रद्द होते. उदा. निवडणूक आयोगाने १९८४ साली हरचंद सिंग यांचे पंजाब विधानसभेचे सदस्यत्व रद्द करून त्यांना सहा वर्षाकरिता अपात्र ठरवले होते. याशिवाय निवडणुकी अगोदरच प्रत्येक उमेदवार आपले नामांकन पत्र भरून देतो. त्यावेळी वरील सर्व अटी पूर्ण करणारी व्यक्तीच आपला अर्ज उमेदवार म्हणून भरीत असते. तरीही एखादी व्यक्ती अपात्र ठरत असेल तर निवडणूक मंडळाकडून तिची चौकशी करण्यात येते.

### ८) अंशतः न्यायालयीन कार्यः

प्रारंभीच्या काळात निवडणूक न्यायालय निर्माण करण्याचा अधिकार निवडणूक आयोगास देण्यात आला होता. त्याप्रमाणे संसदेच्या व विधानसभेच्या निवडणुकीसंदर्भात काही वाद, शंका, संघर्ष उद्भवल्यास त्यासंबंधी निर्णय घेण्याचे कार्य निवडणूक न्यायालय पार पाडीत असत. परंतु १९६६ साली १४ व्या संविधान दुरुस्तीने निवडणूक आयोगाचा हा अधिकार रद्द करण्यात आला. त्यामुळे आता निवडणुकीच्या वादाच्या संदर्भात व्यक्तीस उच्च न्यायालयाकडे धाव घ्यावी लागते. ३९ व्या सविधान दुरुस्तीने राष्ट्रपती, पंतप्रधान, सभापती यांच्या निवडणुकीबाबत न्यायालयात जाता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली. ४२ व्या संविधान विशोधनाने पुन्हा निवडणूक न्यायालयाची तरतूद केली आहे. ४४ व्या घटनादुरुस्तीने त्यात पुन्हा फेरबदल करून राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान यांच्या निवडणुकीसंबंधी चे वाद, विवाद सर्वोच्च न्यायालयात व उच्च न्यायालयात दाखल करण्या संबंधीची तरतूद करण्यात आलेली आहे. सारांश, निवडणुकीच्या संदर्भातील खटल्यांचा निर्णय देण्याचा अधिकार उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांना देण्यात आलेला असला तरीही निवडणूक न्यायालय या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात.

### ९) निवडणूक विषयक प्रबोधन कार्यः

निवडणूक आयोग निवडणूक संचालना बरोबरीनेच निवडणुकांची वैशिष्ट्ये, पद्धती इत्यादीविषयी जनतेस योग्य ते प्रशिक्षण देणे, दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे इत्यादी प्रसारमाध्यमांद्वारे निवडणुकीच्या तंत्राविषयी योग्य ती माहिती पुरवून त्यांना राजकीय शिक्षण द्यावे लागते.

## निवडणुकीची यंत्रणाः

निवडणूक यंत्रणा पुढील प्रमाणे कार्यान्वित असलेली दिसते

### १) केंद्र पातळीवरः

भारतीय संविधानातील तरतुदी प्रमाणे सबंध देशातील निवडणुकीवर देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रण करण्याचे कार्य निवडणूक आयोगामार्फत केले जाते. निवडणूक आयोगात एक मुख्य निवडणूक आयुक्त व अन्य दोन आयुक्त आहेत. निवडणूक आयोगाचे कार्यालय नवी दिल्ली येथे तालकटोरा रोडवर आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यात मदत करण्याकरिता प्रादेशिक आयुक्तांची नियुक्ती करण्याचे राष्ट्रपतींना अधिकार आहेत.

### २) राज्य पातळीवरील यंत्रणाः

निवडणुकीसंदर्भातील काम पाहणाऱ्या राज्य पातळीवरील अधिकाऱ्यास मुख्य निवडणुक अधिकारी असे संबोधले जाते. "प्रत्येक राज्यात एक मुख्य निवडणूक अधिकारी राहील. निवडणूक मंडळ सरकारशी सल्लामसलत करून त्याची नेमणूक करील." असे निर्वाचन कायद्यान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. संसदेने वेळोवेळी कायदे करून निवडणूक विषयक काही कार्य सोपविले जातात. या पदावर साधारणता राज्य सरकारच्या नोकरीतील अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. तो पूर्णवेळ काम करणारा अधिकारी असावा अशी निवडणूक आयोगाची अपेक्षा असते. अंश वेळ काम करण्यासाठी एखादा अधिकारी या जागेवर नेमला गेल्यास पूर्णवेळ काम करू शकणारा दुसरा एखादा अधिकारी त्यास सहाय्यक म्हणून दिला जातो.

### ३) जिल्हा पातळीवरील यंत्रणाः

"प्रत्येक जिल्ह्याकरिता निवडणूक मंडळ राज्य सरकारशी सल्लामसलत करून सरकारी अधिकाऱ्यांची जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून नेमणूक करील" अशी कायद्यात तरतूद आहे. जिल्हा पातळीवरील यंत्रणा निरनिराळ्या राज्यात जिल्ह्यासाठी स्वतंत्र निवडणूक अधिकारी असून त्याचे कार्यालय व कर्मचारी वर्ग सुद्धा पुरविण्यात आलेला आढळून येतो. निवडणूक काळात ही कर्मचारी संख्या वाढविण्यात येते. तर काही राज्यांमध्ये मात्र प्रशासनातील जिल्हाधिकाऱ्यां सारख्या अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी सोपवली जाते.

### ४) मतदारसंघ पातळीवरील यंत्रणाः

लोकसभा वा विधानसभेच्या प्रत्येक मतदार संघा करिता निवडणूक आयोगाकडून निर्वाचन अधिकारी नेमला जातो. या पदावर नेमली जाणारी व्यक्ती सरकारी नोकरच असावी असे बंधन टाकण्यात आले आहे. निर्वाचन अधिकाऱ्याच्या जोडीस उप-निर्वाचन अधिकारीही नेमला जाऊ शकतो. या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या राज्य सरकारशी सल्लामसलत करून निवडणूक आयोग करतो.

### ५) प्रत्यक्ष मतदान केंद्रावरील यंत्रणाः

प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पाडून घेण्याकरिता मोठ्या कर्मचारी वर्गाची आवश्यकता असते. याकरिता प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, उप-मतदान केंद्राध्यक्ष, व इतर किमान तीन ते चार मतदान अधिकारी, एक पोलीस कर्मचारी व इतर सहाय्यक सेवक ही नेमले जातात. या सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व नियुक्त्या जिल्हा निर्वाचन अधिकाऱ्याकडून केल्या जातात. या कर्मचाऱ्यांमध्ये प्रामुख्याने राज्य कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा समावेश होतो.

### मतदानाचे स्वरूप व मतदान वर्तनावर प्रभाव पाडणारे घटकः

भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून सतराव्या सार्वत्रिक निवडणुकी पर्यंतचा मतदार वर्तनाचा कौल व विकास अभ्यासताना मतदारांवर प्रभाव पाडणाऱ्या घटकांची माहिती मिळते. भारतीय मतदारांचा सुज्ञपणा व भारतीय मतदारांची सामूहिक भावना ही त्यातून प्रत्ययास येते. मतदान वर्तनावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचा अभ्यास करताना काही प्रमुख निवडणुकांमध्ये मतदार यांनी घेतलेली भूमिका ही अभ्यासणे गरजेचे ठरते. त्यासाठी त्याची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

### १) मताधिकाराची औपचारिकताः

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने भारतीय समाज जीवनात असलेली विषमता, अज्ञान, दारिद्र्य, संकुचित घटकांचे असणारे प्राबल्य या सर्व गृहीत घटकांना गृहीत धरूनही सार्वत्रिक प्रौढ मताधिकार भारतीय नागरिकांना बहाल केला. १९५२ ला भारतातील पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. या निवडणुकीत तब्बल १७ कोटी ६० लाख लोकांना मताधिकार देण्यात आला होता. जगातील हा एक महान प्रयोग होता. भारतीय लोकशाहीची ती नुकतीच सुरुवात होती. १९५२ पासून १९६७ पर्यंत भारतात ज्या तीन सार्वत्रिक निवडणुका झाल्या या निवडणुकांमधील मतदार वर्तन व निवडणुकांवर पडलेले प्रभाव हे शून्यवत असल्यासारखे होते. या निवडणुकांमध्ये "मतदान होत होते " असे फार तर म्हणता येईल एवढी निवडणूक वर्तनाची भूमिका शून्यवत होती. फार तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाचा व काँग्रेसच्या मध्यममार्गी विचारधारेचा प्रभाव जनमानसावर होता असे म्हणता येईल. मात्र एकंदरीत निवडणूक वर्तन म्हणून भारतीय मतदारांची पाटी कोरीच होती असे मानता येईल.

### २) प्रादेशिक घटकांचा वाढता प्रभावः

भारतीय निवडणुकीच्या राजकारणात १९६९ च्या निवडणुका या निवडणूक वर्तनाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरलेल्या दिसतात १९६७ पर्यंत राष्ट्रीय भावनेच्या प्रभावाखाली दबलेल्या स्थानीय, प्रादेशिक व भाषिक घटकांनी प्रामुख्याने १९६७ च्या निवडणूक वर्तनास प्रभावित केले व सत्ताधारी राष्ट्रीय काँग्रेसला प्रादेशिक स्तरावर दुसरा पर्याय उभा केला. विशेषतः पूर्व व दक्षिण भारतात काँग्रेसेतर पक्षांची सरकारे अस्तित्वात आली. त्यांनी प्रादेशिक प्रश्नांची तळी उचलावयास सुरू केल्याने ते मतदारांना अधिकाधिक भावत गेले व बिगर काँग्रेस सरकार हा एक संकल्प म्हणून निवडणूक वर्तनावर प्रभाव टाकून गेला.

### ३) राष्ट्रीयकरण व लोकप्रिय घोषणांचा प्रभावः

१९७१ हे वर्ष भारतीय राजकारणातील निवडणूक वर्तनाचा अभ्यास करण्याकरिता एक महत्त्वाचे एकक म्हणून वापरता येऊ शकते. १९७१च्या निवडणुकांनी राष्ट्रीय राजकारणात इंदिरा गांधींचे राष्ट्रीय राजकारणातील स्थान भक्कम केले. १९६७ च्या निवडणुकीत प्रादेशिक घटकांनी जे डोके वर काढले होते त्यास इंदिरा गांधींनी राबवलेल्या राष्ट्रीय करण्याच्या धोरणानी व "गरीबी हटाव" सारख्या घोषणांनी आपल्या कवेत घेत १९७१ ची निवडणूक परत राष्ट्रीय मुद्द्यांकडे मतदारांना घेऊन गेलेली दिसते. मात्र १९७१च्या निवडणुकांमध्ये निवडणूक वर्तनात इंदिरा गांधींचे दिव्य वलयी नेतृत्व, लोकप्रिय घोषणा, भारत-पाक युद्धातील विजय, राष्ट्रीय करण हे प्रमुख घटक होते.

### ४) "दुसरे स्वातंत्र्य " मतदारांचा सुज्ञपणाः

१९७१ च्या निवडणुकीत भारतीय मतदारांनी इंदिरा गांधींचे नेतृत्व एक प्रकारे दिव्य वलयी स्वरूपाची मान्यता देऊन अधिमान्यता प्रदान केली होती. त्याची दुष्प्रवृत्ती १९७५ ते १९७७ च्या राष्ट्रीय आणीबाणी च्या स्वरूपात भारतीय नागरिकांना अनुभवास आली. १९७५ ते १९७७ राष्ट्रीय आणीबाणी च्या काळात प्रत्यक्ष नागरिकांवर अत्याचार झाले नव्हते, तरीही वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी, मूलभूत अधिकारांचे निलंबन, विरोधी पक्ष व नेत्यांची अटक या या सर्व घटकांमुळे भारतीय जनमत प्रभावित झाले. या पार्श्वभूमीवर १९७७ च्या निवडणुकीत प्रभावी

विरोधी पक्ष नसतानादेखील भारतीय मतदारांनी जो सुज्ञपणा दाखवत इंदिरा गांधी विरोधी जनादेश दिला त्यास भारताचे "दुसरे स्वातंत्र्य" असे म्हटले जाते. भारतीय मतदारांनी या निवडणुकीत भाकरी पेक्षाही अधिक स्वातंत्र्यास महत्त्व दिले. म्हणून पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यानीही भारतात लोकशाही रुजली आहे असे अभिप्राय दिले. १९७७ च्या निवडणुकीत निवडणूक वर्तनावर खऱ्या अर्थाने भारतीय संविधानाची, लोकशाहीची सुरक्षितता, मुलभूत अधिकारांचे जतन यासारखे लोकशाही विचार प्रक्रियेशी निगडीत घटक प्रभाव टाकून गेलेली दिसतात.

### ५) भ्रमनिरास विरोधी जनादेशः

१९८० ची सार्वत्रिक निवडणूक ही जनता पक्षाच्या अपयशाचे फलित होते. १९७७ च्या निवडणुकीत भारतीय जनतेने मोठ्या अपेक्षेने जनता पक्षास भरघोस मताधिक्क्याने केंद्राची सत्ता दिली होती. मात्र जनता पक्षाचे सरकार ही त्यास माळेचे मणी आहेत याची प्रचिती भारतीय जनतेस लगेच आली. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनामुळे जनता पक्षाचे सरकार अस्तित्वात आले होते त्याच जयप्रकाश नारायण यांच्या विचार व कार्यक्रमास जनता पक्षाचे सरकार नाकारत होते. जनता पक्ष म्हणजे मूलतः इंदिरा गांधी विरोधी नेत्यांचा एक कंपू असे स्वरूप त्यास प्राप्त झालेले होते. त्यातच आणीबाणीच्या काळात काँग्रेसेतर पक्ष "इंदिरा हटाव" या भूमिकेतून एकत्र आली होती. मात्र त्यांची विचारप्रणाली, हितसंबंध ही मूलतः परस्परविरोधी होती याचा प्रत्यय भारतीय जनतेला तीन वर्षाच्या कालखंडातच आला होता. जनता पक्षाच्या भ्रम निराशेने जनतेने परत एकदा आपला सुज्ञपणा मतदार वर्तनाच्या माध्यमातून व्यक्त करत इंदिरा गांधी यांच्या बाजूने १९८० च्या निवडणुकीत कौल दिला. हा कौल ही १९७७ च्या निवडणुकी इतकाच सुज्ञपणा चा मानावा लागेल जो भारतीय लोकशाही अधिक स्थिर करणारा ठरला.

### ६) भावनिक व तात्कालिक घटकांचा प्रभावः

१९८४ ते २००४ या कालखंडात ज्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यांचा आढावा घेताना हे स्पष्टपणे जाणवते की या निवडणुकांमध्ये निवडणूक वर्तनावर भावनिक, प्रादेशिक व स्थानीय प्रश्नांचा एका बाजूने प्रभाव होता तर दुसऱ्या बाजूने राजकीय पक्षांनी भ्रष्टाचार, धर्म, जमातवादी घटक यांचा प्रचार तंत्राच्या सहाय्याने उभा केलेला "बागुल बुवा" प्रभाव टाकून गेला. उदा. १९८४ च्या निवडणुकीत "राजीव गांधी एक पोरका पोरगा" ही भावनिकता मत देऊन गेली. तर १९८९ च्या निवडणुकीत "बोफोर्स" चे भूत त्यांच्या मानगुटीवर प्रचार तंत्राने बसवले गेले. १९९१ च्या निवडणुकीत राजीव गांधी यांची झालेली हत्या प्रभाव टाकून गेली, तर १९९६ ते १९९९ या काळात बाबरी मशिद- राम जन्मभूमी चा वाद व प्रादेशिक पक्षांचा राष्ट्रीय राजकारणातील शिरकाव प्रभावी राहिला. एकूण १९८४ ते १९९९ च्या निवडणुका या भावनिक व अस्मितेच्या प्रभावाने प्रभावित राहिलेल्या दिसतात.

### ७) २००४ परत सुज्ञपणा ची अनुभूतीः

भारतीय लोकशाहीच्या निवडणूक इतिहासात जे महत्त्व १९७७ १९८० च्या निवडणुकांना आहे तेच महत्त्व अभ्यासक २००४च्या निवडणुकांनाही देतात. १९९८ ते २००४ या कालखंडात भाजपास राष्ट्रीय राजकारणात पर्याय नाही, काँग्रेसचे विसर्जन होत चालले आहे या अविर्भावात भाजपाने राजकारण करावयास सुरुवात केली. प्रसार माध्यमांचा प्रभावी वापर करून "फील गूड" व "शायनिंग इंडिया" यासारख्या संकल्पना, घोषवाक्य जनमनावर बिंबवण्याचा प्रभावी प्रयत्न सत्ताधारी भाजपकडून करण्यात आला. आपले यश नक्की आहे या अविर्भावात भारतीय

जनतेस एक प्रकारे गृहीत धरून भाजपाने मुदतपूर्व निवडणुका घोषित केल्या. मात्र प्रत्यक्षात भारतीय जनतेने २००४ च्या निवडणुकांमध्ये भाजपाला नाकारून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीस कौल दिला. भारतीय जनतेने २००४ साली हा दिलेला कौल पाहून भारतीय मतदारांची लोकशाही विषयक जाणिवा प्रगल्भ झाल्याची एक प्रकारे पावती होती असे अभ्यासकांना वाटते. या निवडणुकीत प्रसारमाध्यमांच्या झगमगाटापेक्षा व हायटेक प्रचारा पेक्षा भारतीय जनतेने सोनिया गांधींच्या "रोड शो " ला अधिक स्वीकारले.

### ८) २०१४ प्रसार माध्यमांचा कौल:

२०१४ हे सार्वत्रिक निवडणुकांचे वर्ष ही भारतीय निवडणूक वर्तनाच्या अभ्यासात हे महत्त्वाचे वर्ष मानावे लागेल. या निवडणुकीत उपलब्ध माहिती- तंत्रज्ञानाचा प्रचंड व प्रभावी वापर करून विरोधीपक्ष असणाऱ्या भाजपाने सत्ताधारी काँग्रेसची कोंडी केली. लोकप्रिय घोषणा व उज्ज्वल भविष्याची स्वप्ने यांची सांगड घालून प्रचलित नेतृत्वास कुचकामी ठरवत नरेंद्र मोदींच्या स्वरूपात कणखर नेतृत्वाची उभारणी प्रसार माध्यमांच्या सहाय्याने २०१२ पासूनच उभारण्याचे कार्य सुरू होते. २०१४ साली त्यावर कळसाध्याय लिहिला गेला तो "आपकी बार मोदी सरकार" व "अच्छे दिन आयेंगे " या घोषवाक्यानी. २०१४ ची निवडणूक म्हणजे प्रसारमाध्यमांनी जनमताचा घेतलेला ताबा निवडणूक वर्तनावर उमटवणारी ठरली असे म्हटले जाते. २०१९ च्या निवडणुकीत यात भर घालत त्यात प्रखर राष्ट्रवादाची भावना जोडली गेलेली दिसते व त्या माध्यमातून "एक बार फिर मोदी सरकार " ही घोषणा यशस्वी केली गेली.

### निवडणूक वर्तनावर प्रभाव टाकणारे घटक:

भारतीय निवडणुकांचा आढावा घेताना भारतीय निवडणूक वर्तनावर प्रभाव टाकणारे अनेक घटक प्रत्ययास येतात. यातील काही प्रमुख घटकांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### १) वलयांकित नेतृत्व:

१९५२ पासून १९१९ च्या सार्वत्रिक निवडणुकांचा आढावा घेताना अखिल भारतीय व घटक राज्य अशा दोन्ही स्तरावर व्यक्ती महात्म्य हा भारतीय राजकारणाचा स्थायीभाव झालेला दिसतो. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, अटल बिहारी वाजपेयी, व सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वलयांकित नेतृत्वाने मतदार वर्तनात मोठ्या प्रमाणात प्रभावित केलेले दिसते. घटक राज्य पातळीवर तर त्याचा प्रभाव अधिक जाणवतो. विशेषतः दक्षिण भारतातील राज्यांमध्ये नेतृत्वास ईश्वरीय स्वरूप दिले जाते. त्यामुळे त्या नेत्यांच्या निधनानंतर त्यांना मानणाऱ्या कार्यकर्त्यांच्या आत्महत्या ही नित्याची बाब बनलेली दिसते. रामचंद्रन, एन टी रामराव, करुणानिधी, जय ललिता, वाय एस आर रेड्डी, शरद पवार, यशवंत राव चव्हाण, बिजू पटनाईक, ममता बॅनर्जी ही याची काही ठळक उदाहरणे आपणास या घटकाचे निवडणूक वर्तनातील महात्म्य अधिक स्पष्टपणे दाखवतात. व. म. शिरलीकर यांनी १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पुण्यातील मतदार वर्तनाचा अभ्यास करून Political behaviour in India हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात त्यांनी असा निष्कर्ष मांडला आहे की, "मतदारांनी पंडित जवाहरलाल नेहरू व यशवंतराव चव्हाण यांची भाषणे ऐकून आपल्या मतदान निर्णयात बदल केला. त्यामुळेच सर्वच राजकीय पक्षातील उमेदवार प्रभावी नेत्याची सभा आयोजित करण्यासंदर्भात प्रयत्नशील असतात" शिरलीकर यांनी आपल्या ग्रंथात असाही निष्कर्ष काढला आहे की, काही मतदार हे एखाद्या नेतृत्वावर एवढी श्रद्धा व विश्वास बाळगतात की तो नेता ज्या

पक्षात जाईल त्या पक्षाच्या उमेदवारास ते मतदान करतात. एकंदरीत वलयांकित नेतृत्वाचा प्रभाव निवडणूक वर्तनातील एक प्रमुख घटक मानावा लागेल.

**२) जातः**

भारतीय निवडणूक वर्तनात सर्व अधिक प्रभावित करणारा सामाजिक घटक म्हणून जात या घटकाचा उल्लेख करावा लागेल. विशेषतः घटक राज्य पातळीवरील निवडणुकांमध्ये जातीय घटकांनी निवडणूक वर्तनास मोठ्या प्रमाणात प्रभावित केलेले दिसते. त्यामुळेच प्रदेश निहाय "प्रभुत्वशाली जात" हे वास्तव राजकारणात अवतरले आहे. घटक राज्य पातळीवर कार्यरत असणारे काही पक्ष तर केवळ जातीय पक्ष आहेत अशी वस्तुस्थिती निदर्शनास येते. मायावती, मुलायम सिंग यांनी उत्तर प्रदेशात तर बिहारमध्ये लालूप्रसाद यादव यांनी जातीय राजकारणाचा प्रभावी वापर करून यश संपादन केलेले दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणातही स्थापनेपासूनच मराठा या जातीचे प्रभुत्व एकूण राजकारणावर असलेले दिसते. हे प्रभुत्व कायम राहावे याची जाणीवही मराठा जाती समूहाच्या नेतृत्वाकडे असल्याकारणाने त्यास धुरीणत्वाची जोड मिळाली आहे असे एम एन श्रीनिवास या अभ्यासकास वाटते. कर्नाटकात अशा पद्धतीचे प्रभुत्व लिंगायत जातीने प्रस्थापित केलेले दिसते, आंध्र प्रदेशात ते प्रभुत्व रेड्डी जातीकडे तर गुजरातमध्ये पाटीदार समाजाकडे हे प्रभुत्व असल्याचे प्रत्ययास येते. हरियाणामध्ये तर "जाट की बेटी जाट को, जाट का वोंट जाट को" ही घोषणा लोकप्रिय आहे. सारांश, निवडणुकांमध्ये जातीय अस्मिता ना आवाहन केले जाते. राजकीय पक्षही त्या मतदार संघातील जाती संख्या बघूनच निवडणुकीची उमेदवारी घोषित करतात हे स्पष्टपणे दिसते.

**३) धर्मः**

धर्म हा जाती पेक्षा अधिक व्यापक घटक मतदारांना आकर्षित करण्याकरिता राजकीय पक्ष व उमेदवारांकडून वापरला जातो. राष्ट्रीय पातळीवर राजकारण करणारे राजकीय पक्ष जात या घटकापेक्षा धार्मिक भावनांना अधिक आवाहन करतात. तर दुसऱ्या बाजूने काही राजकीय पक्ष प्रादेशिक स्तरावर एक प्रकारे स्वतःस त्या धर्माचे प्रवक्ते मानतात. भारतीय राष्ट्रीय राजकारणात हिंदुत्वाच्या आधारे भारतीय जनता पक्षाने आपली मूळ भारतीय राजकारणात घट्ट केली व सामाजिक विस्तार केला. त्यासाठी राम मंदिर प्रश्न, कलम ३७०, तलाक पद्धती यासारख्या मुद्द्यांना धार्मिक रंग देऊन राजकीय पक्ष निवडणूक वर्तनावर प्रभाव टाकताना दिसतात. पंजाब सारख्या राज्यात अकाली दल शीख धर्मियांना धार्मिक आवाहन करूनच प्रामुख्याने आकर्षित करतो. महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षास बौद्ध धर्मियांची मते अधिक प्रमाणात मिळताना दिसतात. एम आय एम, मुस्लिम लीग या राजकीय पक्षांचा आधारच मुळी धर्म दिसतो. काही राजकीय पक्ष स्वतःला धर्मनिरपेक्ष घोषित करत असले तरी तेही मूलतः धर्म या घटकापासून फार दुर राहू शकत नाहीत असे दिसते. राहुल गांधींचा सॉफ्ट हिंदुत्वाचा प्रयत्न हाही या घटकाचा निवडणूक वर्तना वरील प्रभावच एक प्रकारे दाखवतो. निवडणूक काळात धार्मिक गुरु, महंत, प्रार्थना स्थळे या ठिकाणी धार्मिक आवाहन करून आपल्या धर्माच्या उमेदवारास जिंकून द्यावे यासाठी प्रयत्न केले जातात. मतदारही धार्मिक आवाहनांना अधिक प्रतिसाद देतो आहे हे निवडणूक निकालातून दिसू लागताच राजकीय पक्ष इतर विधायक मार्गाचा अवलंब आपल्या पक्ष विस्तारासाठी करण्याऐवजी अशा घटकांच्या मार्गाने जाणेच अधिक पसंत करताना दिसतात.

## ४) भाषा:



भारतीय निवडणूक वर्तनातील एक प्रभावी घटक म्हणून "भाषा" या घटकाचा अनिवार्यपणे उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्योत्तर काळात "भाषा" या घटकाच्या आधारेच भारतीय राजकारण दीर्घकाळ व सर्व प्रथम प्रभावित केलेले दिसतात. दक्षिण भारतातील राज्याच्या राजकारणाचा मूळ आधार हा हिंदी भाषा विरोध हाच कायम राहात असलेला दिसतो. महाराष्ट्र, प. बंगाल, हरियाणा, पंजाब या सारखी विकसित राज्यही भाषिक राजकारणाच्या प्रभावापासून अलिप्त राहिलेले दिसत नाहीत. महाराष्ट्रातील शिवसेना हा राजकीय पक्ष मुळात मराठी भाषिक अस्मितेतूनच निर्माण झालेला होता. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मूळ प्रेरणा ही भाषिक अस्मिता हीच आहे. हे मतदार ही भाषिक प्रश्नास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देतात.

## ५) प्रादेशिकता:

प्रादेशिकता हा समकालीन भारतीय राजकीय व्यवस्थेचा एक स्थायीभाव बनलेला दिसतो. १९६७ नंतरच्या कालखंडात प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीत प्रादेशिकता हा घटक निवडणूक वर्तनावर प्रकाश पाडणारा एक निर्णय घटक म्हणून कायम राहिलेला दिसतो. प्रादेशिकतेच्या घटकाचा निवडणूक वर्तनातील प्रभाव एवढा जबरदस्त आहे की काही राष्ट्रीय पक्षांनीही प्रादेशिक स्वरूप धारण केलेले दिसते. राष्ट्र व प्रदेश हा प्राधान्यक्रम लावताना मतदारही सामान्यतः प्रदेशास पहिला क्रमांक देताना दिसतात. त्यामुळे राजकीय पक्ष ही मतदारांच्या प्रादेशिक अस्मितांना अधिक फुंकर घालून आपला कार्यभाग साध्य करताना दिसतात. एवढेच नव्हे तर अनेक घटक राज्यात उपप्रादेशिकतेचे घटक ही मोठ्या प्रमाणात क्रियाशील होऊन निवडणूक वर्तनावर प्रभाव टाकताना आढळतात.

## ६) मनी, मसल्स व माफिया:

भारतीय निवडणुकांमधील ही एक काळी किनार आहे. मनी, मसल्स व माफिया या तीन एम ने निवडणूक वर्तनावर मोठा प्रभाव निर्माण केलेला दिसतो. अलीकडच्या काळात उमेदवाराची पात्रता, चारित्र्य, सेवा यासारख्या घटकांपेक्षा निवडून येण्याची क्षमता हा घटक सर्वाधिक महत्त्वाचा ठरतो आहे. अशा परिस्थितीत पैसा, गुंडगिरी व सत्ता यासारख्या घटकांचा मतदार वर्तनास प्रभावित करण्याकरिता सर्रास वापर होतो. १९९० नंतर निर्माण झालेल्या सर्व लोकसभांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या या सदस्यांची संख्या उत्तरोत्तर वाढताना दिसते आहे. हा एक प्रकारे या घटकांचा मतदार वर्तना वरील प्रभावाचा पुरावा मानावा लागेल. मनी, मसाज व माफिया मुळे मतदार वर्तन मोठ्या प्रमाणात प्रभावित होताना दिसते आहे. आहे

## ७) भावनात्मकता:

मतदारांच्या भावनांना हात घालून उमेदवार राजकीय पक्ष मोठ्या प्रमाणावर निवडणूक वर्तनास प्रभावित करताना दिसतात. भारतीय समाज मन हे भावनाशील अधिक आहे. सारासार विवेक बुद्धीने निर्णय घेण्यापेक्षा ते भावनाशीलतेचे सहज बळी पडू शकतात हे राजकीय पक्षांनी ताडल्यामुळे भारतीय समाज मनाच्या या संवेदनशीलतेचा मोठ्या प्रमाणात राजकीय पक्ष उपयोग करून घेताना दिसतात. १९७१ च्या निवडणुकीत इंदिरा गांधींनी बांगलादेश निर्मितीचा, १९९४च्या निवडणुकीत अटल बिहारी वाजपेयी यांनी कारगिल युद्धाचा २०१९ च्या निवडणुकीत नरेंद्र मोदी यांनी पुलवामा हल्ल्याचा परिणामकारकपणे मतदार वर्तनावर प्रभाव पाडून आपला हेतू साध्य केलेला दिसतो असे अभ्यासकांना वाटते. ही भावनात्मकता बऱ्याच वेळा त्या पक्षाच्या

नेतृत्वाच्या मृत्युने, हत्येने सुद्धा निर्माण झालेली दिसते. १९८४ ची निवडणूक राजीव गांधीनी इंदिरा गांधींच्या हत्येने निर्माण झालेल्या भावनात्मक लाटेमुळेच सहज जिंकली होती. १९९१ ची निवडणूक ही राजीव गांधींच्या हत्येने निर्माण झालेल्या भावनात्मक लाटेनेच काँग्रेसने अधिक बाजी मारली होती. भावनात्मक लाट ही मतदारांवर प्रभाव पाडते हा सर्वश्रुत अनुभव आहे.

### ८) नागरी समाजाची भूमिकाः

अलीकडच्या काळात सार्वजनिक जीवनात कार्यरत असणाऱ्या सामाजिक चळवळी, स्वयंसेवी संस्था, क्रियाशील विचारवंत, कार्यकर्ते, समाजधुरीण यांची भूमिका ही निवडणूक वर्तनास निर्णायक वळण देऊ शकते. २०११ साली अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली जनलोकपाल आंदोलनाच्या प्रभावाने सबंध देशभर काँग्रेस पक्षाविषयी एक प्रकारचा असंतोष निर्माण झाला. त्याचा फायदा अप्रत्यक्षपणे भाजपाला मिळाला. म्हणजे २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारा एक महत्त्वाचा घटक म्हणून नागरी समाजाकडे ही पाहिले जाते. नागरी समाज हा राज्य व कुटुंब यातील पोकळीत कार्यरत असतो. नागरी समाजाच्या भूमिकेचे अनुकरण करणारा मोठा वर्ग समाजामध्ये असतो. विशेषतः मध्यमवर्गाच्या निवडणूक वर्तनावर नागरी समाजाचा मोठा प्रभाव पडताना दिसतो.

### ९) सामाजिक राजकीय आंदोलने :

सामाजिक राजकीय आंदोलने ही प्रामुख्याने समाज परिवर्तनाच्या ध्येयाने कार्यरत असतात. परंतु सामाजिक राजकीय आंदोलनाच्या या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनमत घडण्याची प्रक्रिया सुद्धा घडत असते. केडर बेस कार्यकर्ते घडवण्याचे कार्य हे या आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या मातृ संघटना करत असतात. त्याचा अप्रत्यक्ष प्रभाव हा मतदार वर्तनावर होतो. उदा. आर. एस. एस. या संघटनेच्या प्रभावात कार्य करणारा कार्यकर्ता हा प्रामुख्याने भाजपा मतदान करताना आढळतो तर राष्ट्र सेवा दलात कार्य करणारा कार्यकर्ता हा काँग्रेस पक्षास मतदान करतानाच अधिक आढळतो. हा एक प्रकारे या संघटनांच्या प्रशिक्षण व कार्यक्रमांचा प्रभाव म्हणूनच आपणास पाहता येईल. विद्यार्थी संघटना, कामगार संघटना, कर्मचारी संघटना, शेतकरी संघटना यांच्या प्रभाव क्षमता सुद्धा अशा पक्षनिहायविभागलेल्या दिसतात. एकंदरीत सामाजिक व राजकीय आंदोलने हे भारतात निवडणूक वर्तनावर मोठा प्रभाव टाकतात असे दिसते.

### १०) भांडवलशाहांचा प्रभाव :

निवडणुकीच्या राजकारणाने पैसा हा घटक 'भांडवल' या संज्ञे पर्यंत येऊन पोहोचला आहे. निवडणूक लढण्याकरिता व निवडणुका जिंकण्या करिता प्रचंड आर्थिक उलाढाल करावी लागते. त्यासाठी सर्वच राजकीय पक्ष हे भांडवलदारांकडे हात पसरतात. भांडवलदार ज्या राजकीय पक्षास आश्रय देतात तो राजकीय पक्ष निवडणुकांच्या राजकारणात आघाडी घेताना दिसतो आहे. मागील वीस वर्षात भांडवलदारांचा निवडणूक प्रक्रियेतील व एकूण निवडणूक वर्तना वरील प्रभाव वाढला आहे. पूर्वी सामान्यतः उद्योजकांच्या प्रभावा करिता टाटा बिर्ला अशी संज्ञा वापरली जात असेल. आता ती अंबानी अदानी अशी वापरली जाते. हा केवळ नावातीलच फरक नाही तर हा एकूण प्रभाव क्षमतेतील ही प्रभाव आहे असे स्पष्टपणे जाणवते आहे.

### ११) प्रसार माध्यमांची भूमिकाः

प्रारंभीच्या काळात निवडणूक वर्तनावर प्रसारमाध्यमांचा थेट प्रभाव पडत नव्हता. प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून मतदार वर्तन काही प्रमाणात पूर्वीही प्रभावित होत होते. मात्र संपूर्ण निवडणुकीस वळण लावण्याची प्रभाव क्षमता त्यावेळी प्रसारमाध्यमांकडे नव्हती. ही प्रभाव क्षमता २०१४ ते २०१९ निवडणुकांमध्ये भारतीय समाज मनाने अनुभवलेली दिसते. प्रसार माध्यमे सुपारी घेतल्याप्रमाणे विशिष्ट राजकीय पक्षाचा प्रसार करून मतदारांच्या पुढे "आभासी विश्व " निर्माण करण्यात, " आभासी शत्रू" निर्माण करण्यात, "आभासी विकास" निर्माण करण्यात व "आभासी राष्ट्रपुरुष" निर्माण करण्यात कमालीचे यशस्वी झालेले दिसतात. एकंदरीत समकालीन काळात प्रसार माध्यमाची सर्वच रूपे विशेषतः इलेक्ट्रॉनिक मीडिया व सोशल मीडिया हा निवडणूक वर्तनावर सर्वाधिक प्रभाव पाडतो आहे हे निःसंशय.

सारांश, भारतीय निवडणूक प्रक्रिया ही भारतीय लोकशाही चा एक मूलाधार आहे. हा मूलाधार निःपक्षपातीपणे कार्यरत राहावा व भारतात लोकशाही प्रक्रियेची रुजवात करण्यात मदतगार ठरावा याकरिता संविधानकारांनी निवडणूक आयोगास स्वायत्तता देत संविधानिक दर्जा व पावित्र्य बहाल केले. मागील सत्तर वर्षाच्या काळात निवडणूक आयोगाने आपले कार्य अनेक प्रतिकूल परिस्थितीच्या घटकांचा सामना करत यशस्वीपणे पार पाडलेली दिसते. त्याबरोबरीनेच भारतीय मतदारांच्या निवडणूक वर्तनावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांनीही भारतीय लोकशाहीचे एक विशेष रूप व स्वरूप जगाला दाखवले आहे. हे स्वरूप अर्थातच अधिकाधिक लोकशाही पूरक करण्याची गरज आहे.

## २.८ १९९१ नंतरची निवडणुकीतील कामगिरी

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात निवडणुकीच्या राजकारणाने अनेक वळणे घेतलेली आपणास जाणवतात त्यातूनच आघाडीच्या राजकारणाची मूस आकारास आलेली दिसते. गणराज्याच्या स्थापनेपासून भारतीय राजकीय प्रक्रियेत बहुपक्ष पद्धती प्रचलित असली तरी १९६७ पर्यंतच्या काळात एक पक्ष प्रभुत्व पद्धती प्रचलित राहिली. घटक राज्य व केंद्रीय पातळीवर काँग्रेस या एकाच राजकीय पक्षाचे प्रभुत्व प्रस्थापित झालेले होत. १९६७ नंतर मात्र अनेक घटक राज्यांमध्ये काँग्रेसच्या प्रभुत्वाला उतरती कळा लागली व प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढावयास सुरुवात झाली १९८९ नंतर केंद्र पातळीवर काँग्रेस पक्षाचा प्रभाव ओसरला व त्यानंतर २०१४ पर्यंत कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्वबळावर बहुमत मिळू शकले नाही २०१४ व २०१९ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने निवडणूक लढवून बहुमताचा आकडा स्वबळावर गाठला मात्र २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीने मात्र परत आघाडीची अपरिहार्यता सिद्ध करून विरोधी पक्षांचे स्थान अधिक बळकट केलेले दिसते. या दृष्टीने १९९१ नंतरच्या राजकारणात प्रमुख राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांच्या निवडणुकीतील कामगिरीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

१९९१ च्या दहाव्या लोकसभेच्या निवडणुकीत ४३ पैकी राष्ट्रीय काँग्रेसला २३२ भारतीय जनता पक्षाला, ११९ जनता दलाला, ६० मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला, ३५भारतीय कम्युनिस्ट पक्षाला, १३ तेलगू देशमल, अन्य राजकीय पक्षांना २९ आणि अपक्षांना ४२ जागा मिळाल्या काँग्रेस पक्षाला काठावरचे बहुमत मिळाल्यामुळे मित्र पक्षांचे सहकार्य घेऊन पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली संमिश्र सरकार सत्तेवर आले. हे आघाडी सरकार १९९६ पर्यंत टिकून राहिले १९९३ साली पंतप्रधान नरसिंहराव यांनी विरोधी पक्षांनी मांडलेला अविश्वासाचा ठराव फेटाळून दहाव्या लोकसभेत विश्वास संपादन केला होता.

१९९६ च्या अकराव्या लोकसभेच्या निवडणुकीत ५४३ जागांपैकी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला १४०, भारतीय जनता पक्षाला १६१, जनता दलाला ४६, तमिळ काँग्रेसला २०, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला ३२, भारतीय कम्युनिस्ट पक्षाला बारा, समाजवादी पक्षाला १७, शिवसेनेला १५, तेलगू देशमला १६, बहुजन समाज पक्षाला ११ जागा मिळाल्या. इतर पक्ष व अपक्ष यांना ५८ जागा मिळाल्या अकराव्या लोकसभेत कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. सर्वात जास्त जागा मिळविणाऱ्या भाजपने सत्तेवर येण्याचा प्रयत्न केला परंतु पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे १६ मे १९९६ रोजी सत्तेवर आलेले सरकार लोकसभेचा विश्वास संपादन न केल्यामुळे केवळ तेरा दिवसात सत्तेवरून गेले. त्यानंतर एक जून १९९६ रोजी जनता पक्षाचे नेते एच.डी. देवेगौडा यांचे संयुक्त आघाडीचे सरकार सत्तेवर आले. त्यानंतर २२ जुलै १९९७ रोजी पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांचे संयुक्त आघाडीचे मंत्रिमंडळ सत्तेवर आले. शिवसेना १५ प्रमुख १७ समाजवादी पक्ष १७ तेलगू देशम १६ या पक्षांनी अकराव्या लोकसभेत दहाव्या लोकसभेपेक्षा जास्त जागा मिळविलेल्या दिसतात.

१९९८ च्या बाराव्या लोकसभेच्या निवडणुकीत ५४३ जागांपैकी राष्ट्रीय काँग्रेसला १४१, भारतीय जनता पक्षाला १८०, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला ३२, भाकपला ०९, समाजवादी पक्षाला २०, अण्णाद्रमुकला १८, समता पक्षाला १२, तेलगू देशमला १२, राष्ट्रीय जनता दलाला १७, शिरोमणी अकाली दलाला १०, बिजू जनता दलाला ०८, केरळ काँग्रेसला ०८, तृणमूल काँग्रेसला ०७, तर इतर लहान पक्षांना व अपक्षांना ६५ जागा मिळाल्या होत्या. बाराव्या लोकसभेत कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळाले नाही. भारतीय जनता पक्षाला सर्वात जास्त जागा मिळाल्यामुळे अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकार स्थापन झाले हे आघाडी सरकार १३ महिने टिकले.

१९९९ च्या तेराव्या लोकसभेच्या निवडणुकीत ५४३ जागांपैकी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला ११२, भारतीय जनता पक्षाला १८२, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला ३३, समाजवादी पक्षाला २६, तेलगू देशमला २९, जनता दल संयुक्त पक्षाला २१, शिवसेनेला १५, बहुजन समाज पक्षाला १४, प्रमुख ला १२, बिजू जनता दलाला १०, अन्ना द्रमुकला १०, इतर लहान पक्षांना ७९ जागा मिळाल्या बाराव्या लोकसभेप्रमाणेच तेरावे लोकसभेतही कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली विविध २४ राजकीय पक्षांचे लोकशाही आघाडी सरकार सत्तेवर आले. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने विरोधी पक्षाची भूमिका बजाविली. तेराव्या लोकसभेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तेलगू देशम समाजवादी पक्ष बहुजन समाज पक्ष शिवसेना हे पक्ष काही प्रमाणात प्रभावी बनले गेले. दरम्यान ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेस आणि शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष स्थापन केल्यामुळे राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रतिनिधित्वात घट झालेली दिसते.

२००४ च्या चौदाव्या लोकसभेच्या निवडणुकीत ५४३ जागांपैकी राष्ट्रीय काँग्रेसला १४५, भारतीय जनता पक्षाला १३८ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला ४३, समाजवादी पक्षाला ३६, राष्ट्रीय जनता दलाला २१, बहुजन समाज पक्षाला १८, प्रमुख ला १५, शिवसेनेला १२, भिजू जनता दलाला ११, भारतीय कम्युनिस्ट पक्षाला १०, जागा मिळाल्या लहान राजकीय पक्षांना ९० जागा मिळाल्या होत्या. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली १४ राजकीय पक्षांचे संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार सत्तेवर आले १४ व्या लोकसभेत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या सदस्य संख्येत काही प्रमाणात वाढ झाली तर भाजपाच्या सदस्य संख्येत ४४ सदस्यांनी घट झालेली दिसते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष समाजवादी पक्ष राष्ट्रीय जनता दल यांच्या प्रतिनिधित्वात वाढ झाली २००४ च्या लोकसभेत आणि आंध्र प्रदेशाच्या विधिमंडळात तेलुगु

देशम पक्षाची वाताहात झालेली दिसते. २००९ च्या १५ व्या लोकसभेच्या निवडणुकीत ५४५ सदस्यांपैकी राष्ट्रीय काँग्रेसला २०६, भारतीय जनता पक्षाला ११६, समाजवादी पक्षाला २२, जनता दल संयुक्त पक्षाला २१, बहुजन समाज पक्षाला २१, तृणमूल काँग्रेसला १९, प्रमुख ला १८, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला १६, बिजू जनता दलाला १४, आणि शिवसेनेला ११ जागा मिळाल्या. लहान राजकीय पक्षांना ७२, आणि अपक्षांना ०९, जागा मिळाल्या राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि मित्र पक्ष मिळून १६ राजकीय पक्षांचे संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार मनमोहन सिंग सिंग यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आले. पंधराव्या लोकसभेत काँग्रेस पक्षाच्या प्रतिनिधित्वात १४ व्या लोकसभेच्या तुलनेत ६१ सदस्यांची वाढ झाली त्यामुळे या पक्षाला भारतीय राजकारणात स्थिरता येऊ लागल्याचे चित्र निर्माण झाले. त्या मानाने भारतीय जनता पक्षाची सदस्य संख्या रोडावत गेली. त्यामुळे नवीन नेतृत्वाचा विचार पुढे आला. या निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची सदस्य संख्या २७ ने घटलेली दिसते. तृणमूल काँग्रेस पक्षाला १९ जागा मिळाल्यामुळे या पक्षाने पश्चिम बंगालमध्ये चांगलेच मूळ धरले आहे. समाजवादी पक्ष राष्ट्रीय जनता दल यांची सदस्य संख्या काही प्रमाणात घटलेली आहे पंधराव्या लोकसभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपली सदस्य संख्या ०९ टिकवून धरलेली दिसते.

सध्या भारतात ४७ राजकीय पक्ष आहेत सात राष्ट्रीय पक्ष २७ प्रादेशिक पक्ष अन्य १३ लहान पक्ष यांची अधिकृत नोंद भारतीय निर्वाचन आयोगाकडे आहे. १९८९ पासून भारतीय राजकारणाला वेगळी कलाटणी मिळाली १९९१ ते २०२४ पर्यंतच्या लोकसभांच्या निवडणुकातील पक्षीय राजकारणाचा आढावा घेतला असता असा निष्कर्ष काढता येईल की भारतात बहुपक्ष पद्धती वास्तववादी व अनिवार्य ठरलेली आहे आहे गेल्या वीस वर्षाचा पक्षीय राजकारणाचा प्रभाव विचारात घेतला असता राष्ट्रीय पक्षांबरोबरच प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व आणि प्राबल्य मान्यच करावे लागेल भारत हे राष्ट्र विविध भाषा धर्म पंथ जाती प्रदेश संस्कृती यातून निर्माण झालेले आहे त्यामुळे देशात भाषावाद धार्मिकता प्रादेशिकता जातीयता असे वाद संघर्ष निर्माण झालेले आहेत आर्थिक मागासले पण दारिर्द्य बेकारी अज्ञान उपासमारी अशा समस्या निर्माण झालेल्या आहेत तेव्हा राज्यातील राष्ट्रातील या समस्या प्रश्न सोडविण्यासाठी विविध राजकीय पक्ष प्रादेशिक आणि राष्ट्रीय पातळीवरून प्रयत्न करीत असतात अशा विकास प्रक्रियेतूनच प्रादेशिक व राष्ट्रीय पक्ष निर्माण झालेले आहेत प्रादेशिक पक्षांचे हितसंबंध असते अशावेळी त्या प्रदेशात घटक राज्यात त्या पक्षाचे प्राबल्य वाढते जेव्हा राजकीय पक्ष राष्ट्रहितासाठी राष्ट्रसंरक्षण आणि राष्ट्रसंवर्धनासाठी ध्येयधोरणे ठरवून त्या दिशेने कार्य करतात तेव्हा ते पक्ष राष्ट्रीय पक्ष म्हणून ओळखले जातात. एकंदरीत राष्ट्रबांधणीच्या प्रक्रियेत प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षांची भूमिका आणि कार्य आवश्यक आणि अनिवार्य असते भारतातील राष्ट्रीय पक्षाप्रमाणेच पक्षाप्रमाणेच प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व आणि भूमिका महत्त्वपूर्ण ठरू लागलेली आहे तेव्हा भारतात निर्माण झालेली ही बहुपक्ष पद्धती आपल्या लोकशाहीला कशी परिपोषक होईल याविषयी विचार करणे अधिक संयुक्तिक ठरेल.

## २.९ सारांश

एकंदरीत भारतीय राजकीय पक्ष पद्धतीचा विकास व निवडणुकांचे राजकारण या प्रक्रियेतून स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकीय प्रक्रिया यांचे स्वरूप निश्चित होत गेलेले दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रिये बरोबरच भारतीय राजकीय पक्ष पद्धतीचा निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात अस्तित्वात असणाऱ्या संघटना व आंदोलने यांना संघटित राजकीय पक्षाचे स्वरूप प्राप्त होण्याची प्रक्रिया स्वातंत्र्योत्तर पहिल्या

दशकात घडून आली. राजकीय सहभागाची प्रक्रिया जसजशी विस्तारत गेली त्या प्रमाणात राजकीय समज ही भारतीय जनमानसात उतरत गेली. स्वातंत्र्योत्तर पहिली दोन दशके काँग्रेस या एकमेव पक्षाचे केंद्रीय व घटक राज्य पातळीवर निर्विवाद वर्चस्व होते. विरोधी पक्षाचे अस्तित्वही दूरवर दिसत नव्हते. काँग्रेस प्रभुत्वाला १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये पहिला हादरा बसला. त्यानंतर भारतीय राजकारणात विविध प्रवाह अवतरले. प्रादेशिक राजकीय पक्षांचा उगम व प्रभाव हा भारतीय राजकारणातील एक अखंड स्त्रोत तिथपासूनच सुरु झाला. त्यातून आघाडी राजकारण व आघाडी सरकार हे भारतीय राजकीय पक्ष पद्धतीचे व एकूण राजकीय प्रक्रियांचे अभिन्न अंग बनले. निवडणूक प्रक्रिया ना स्वायत्त, पारदर्शक, प्रभावी बनवण्याकरिता संविधानकारानी दूरदृष्टीने भारतीय संविधानात तरतुदी अंतर्भूत केलेल्या दिसतात. त्यामुळे मागील सत्तर वर्षाच्या कालखंडात निवडणूक आयोग व निवडणूक यंत्रणा यांनी भारतीय लोकशाहीच्या उभारणीत आपले महत्त्वाचे योगदान अधोरेखित केले आहे. निवडणूक वर्तनात लोकशाही घटकांपेक्षा भारतीय समाज परिवेशातील घटकांनी अधिक प्रभावित केले आहे हे एकूण अभ्यासातून दृष्टिपथात येते. त्यामुळे निवडणूक वर्तनावर अनेक संकुचित घटकांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. असे असले तरी भारतीय राजकीय पक्ष पद्धती, निवडणूक व्यवस्था, व मतदार वर्तन यांनी भारतीय राजकीय व्यवस्थेला कार्यान्वित ठेवण्यात व विकसित करण्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे या निष्कर्षाप्रत आपण येतो.

## २.१० आपण काय शिकलो?

प्र. १ भारतातील राजकीय पक्ष पद्धतीच्या विकासावर निबंध लिहा.

प्र. २ भारतातील प्रादेशिक राजकीय पक्ष पद्धतीच्या उदयाची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

प्र. ३ भारतातील काँग्रेस पक्षाच्या प्रभुत्वाची कारणमीमांसा करा.

प्र. ४ भारतातील जनता पक्षाच्या राजकीय विकासाचा आढावा घ्या.

प्र. ५ भारतातील निवडणूक प्रक्रियेची चर्चा करा.

प्र. ६ भारतातील निवडणूक वर्तनास प्रभावित करणाऱ्या घटकांची चर्चा करा.

प्र. ७ भारतातील आघाडीचे राजकारण व आघाडी सरकार यांचे मूल्यमापन करा.

**टिपा लिहा.**

१. शेतकरी कामगार पक्ष

२. अकाली दल

३. तृणमूल काँग्रेस

४. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

५. बहुजन समाज पार्टी

६. शिवसेना

## २.११ संदर्भसूची

१) कुलकर्णी बी. वाय.,'भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया', एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद,२०१३.

२) बंग के. आर.,'भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद,२०११.

३) भोळे भा. ल., 'भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण', पिंपळापुरे पब्लिकेशन्स, नागपूर,२०१३.

४) पाटील पी. वी.,'भारतीय शासन व राजकारण', फडके प्रकाशन, कोल्हापूर,२०१२.

५) बकाने छाया,'भारतीय राजकीय व्यवस्था आणि राजकीय प्रक्रिया', विद्या प्रकाशन, नागपूर,२०१३.

६) जैन अशोक,'भारतीय राजकीय व्यवस्था', शेठ पब्लिकेशन्स, मुंबई,२००५.

*****

# ३

# राजकारण ओळख - I

**घटक रचना**

३.१ उद्दिष्ट्ये
३.२ जात व राजकारण
३.३ भारतातील वर्गरचना व राजकारण
३.४ भारतातील महिलांचा राजकीय सहभाग
३.५ भारतातील आदिवासी जमातींचे राजकारण
३.६ सारांश
३.७ आपण काय शिकलो ?
३.८ संदर्भसूची

## ३.१ उद्दिष्ट

भारतातील वर्ग, जाती, जमात व लिंगभावाचे राजकारण यांनी भारतीय राजकीय प्रक्रियेत एक स्वतंत्र व महत्वाचे अवकाश निर्माण केले आहे. भारतीय संविधानाने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार ब्रिटिश संसदीय शासन पद्धतीच्या प्रभावातून केला असला तरी भारतीय संसदीय शासनपद्धतीत निवडणूकांच्या राजकारणाने संसदीय पद्धतीच्या घटक वा संस्थाचे विकसन होण्याऐवजी भारतीय समाजव्यवस्थेत रुजलेल्या व आतुन बसलेल्या संस्था व व्यवस्थांना अधिक बळ प्राप्त झालेले दिसते. संसदीय शासन पद्धतीच्या विकास व विकासाबरोबर वर्गीय, जाती, जमातीय व लिंगभावासारख्या संकूचित भाव-भावना, घटक व व्यवस्था यांचे विसर्जन होईल अशी अभ्यासकांना अपेक्षा होती. वास्तवात मात्र या समाज घटकांनी भारतीय राजकारणात आपले बस्तान अधिक घट्ट केले. या दृष्टीने भारतीय राजकीय प्रक्रियेत जातीय घटकांची भूमिका दलित, मागास व प्रभुत्वशाली जातींच्या दृष्टीकोनातून अभ्यासण्याचा आदीवासी जमातींच्या व महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाच्या मांडणीचा व वर्गीय रचनांचा भारतीय राजकारणावरील प्रभाव मांडण्याचा प्रयत्न या घटकात करण्यात आला. ज्यामधून भारतीय राजकीय प्रक्रियेतील जात, वर्ग व जमाती व लिंगभावाच्या राजकारणाचे आकलन होण्यास आपणास मदत होईल.

## ३.२ जात व राजकारण

जात हे भारतीय राजकारणातील एक अनन्यसाधारण वास्तव आहे. सामाजिक शक्ती म्हणून भारतीय समाजकारणात जात या घटकास पूर्वापार महत्व राहिले आहेच परंतु प्रतिनिधिक लोकशाहीच्या प्रयोगाने जात या घटकाच्या विविध पैलुंचा अविष्कार भारतीय राजकारणात अनुभवास येत आहे. मानवी समाजाच्या निकालाचा अभ्यास करतांना काळाच्या ओघात अनेक संस्था व घटक विकसित होतात तसेच काळाच्या ओघात नामशेष होतात असे दिसते. जात हा घटक मात्र काळानुरुप स्वत:शी बदलुन आपले मूळ स्वरुप अबाधित राखत आला आहे हे एक

आश्चर्यच मानावे लागेल. काळानुरुप जातीव्यवस्थेच्या रचनेत व कार्यपद्धतीत परिवर्तन होत गेले परंतु जातीव्यवस्थेची चौकट मात्र कायम राहिलेली दिसते. भारतीय संविधानाने धर्म व जातीनिरपेक्ष राजकीय व्यवस्थेचे तत्व स्वीकारले असले तरी वास्तवात मात्र भारतीय समाजकारण व राजकारण जातीय प्रभावाने भरलेले आहे हे वास्तव नाकारता येणे शक्य नाही. भारतीय व्यक्ती व समूहांच्या जीवनात जन्म, मृत्यु, विवाह, सणोत्सव, धार्मिक व सामाजिक विधी, उपजिविका व सामाजिक नियंत्रण अशा सर्वंकष क्षेत्रात जातीला मध्यवर्ती स्थान असल्यामुळे भारतीय राजकारणात जातीघटकांचा प्रभाव पडणे स्वाभाविक होते. म्हणूनच जातीव्यवस्थेचे मार्मिक वर्णन करताना डॉ. राममनोहर लोहिया म्हणतात, ज्याच्यासाठी कोणालाच औपचारिक व नियमित हप्ता भरण्याची गरज नसते असा जगातला सर्वात मोठा विमा जेव्हा एकजुटीचे इतर सर्व आधार कोलमडतात त्या परिस्थितीत ही जातीय कायम राहते, भारतीय व्यक्ती व समूह मनाला अशापद्धतीचे सर्वकषरीत्या प्रभावित करणाऱ्या व नियंत्रणात ठेवणाऱ्या जाती संस्था या घटकाचा राजकारणात प्रभाव पडणे स्वाभाविक होतेच परंतु राजकारणाचा ही भारतीय जातीसंस्थांवर मोठा प्रभाव पडला आहे. ज्यातुन भारतीय राजकारणात जात व राजकारण याचे वैविध्यपूर्व सह-संबंध प्रस्थापित होताना दिसतात. त्यादृष्टीने या प्रकरणात जातीसंस्था व राजकारण यांच्या परस्पर प्रभावाचा स्वातंत्र्य पूर्व काळापासून समकालीन काळापर्यंत आढावा घेण्यात आला आहे. ज्यामध्ये समकालीन भारतीय राजकारणातील एका महत्वाच्या पैलुचा सर्वांगीण परीचय होण्यास मदत होईल.

## ३.२ जात संकल्पनेचा अर्थ

जात हा शब्द भारतीय भाषेत प्रचलित असला तरी हा शब्द मुलतः भारतीय नाही. ऑक्सफर्ड इंग्रजी शब्दकोषात याची उत्पत्ती पोर्तूगीज भाषेतून झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. Caste हा इंग्रजी शब्द पोर्तुगीज भाषेतील कास्टा या शब्दापासून आलेला आहे. ज्याचा मुळ अर्थ वंश, वंशपरंपरा, वीण, शुद्ध आणि कशाचेही मिश्रण नसलेली वीण किंवा वंश म्हणजेच Caste या शब्दाचे तंतोतंत भाषांतर केला जाऊ शकत नसले तरी ही वर्ग किंवा ज्ञानी हे त्याच्या जवळ जाणारे संस्कृत शब्द आहेत. मराठी विश्वकोषात जात संस्थेचे दोन प्रमुख अर्थ सांगण्यात आले आहेत. एक म्हणजे अर्थव्यवस्थेत वर्ग म्हणून चिरंतन स्थान प्राप्त झालेली कूलसम या अर्थाने जाती या शब्दाचा मूळ अर्थ जन्म असा होतो. दूसरा अर्थ म्हणजे समान अधिकार असलेल्या अशा एकेका जातीत अनेक उपजाती किंवा पोटजाती असतात. त्यांना उपजाती किंवा पोटजाती न म्हणता जाती हीच संज्ञा प्राप्त होते. एकंदरीत हिंदु समाजाची गेली. तीन हजार वर्ष स्थिरावलेली रचना म्हणून जातीव्यवस्थेचा उल करता येईल. खालच्या व वरच्या अशा विविध श्रेणींची म्हणजे उच्च व नीच उच्चतर व नीचतर आणि उत्तम व नीचतम अशा श्रेणींनी बनलेली ही समाज रचना आहे.

जातीय राजकारण ही संज्ञा जात या घटकाचा राजकारणासाठी जो वापर केला जातो त्यासाठी सर्वसाधारणपणे वापरली जाते. यामध्ये व्यक्ती स्वहितसंबंधासाठी, राजकीय हेतु साध्य करण्यासाठी जाती या घटकांचा वापर करतो तर दुसऱ्या बाजुने जात आपले हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी जातच राजकारणाचा साधन म्हणून वापर करते.

## ३.३ जाती व्यवस्था राजकीय स्वरुपाचे दृष्टीकोन

भारतीय राजकीय व्यवस्थेतील जात व राजकारण यातील आंतरप्रक्रियांचे स्पष्टीकरण करणारे तीन दृष्टीकोन प्रा. रजनी कोठारी यांनी मांडले आहेत ते पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

**१) ऐहिक दृष्टीकोन (Secular Aspect) :**

जाती व्यवस्था सर्वसाधारणपणे जातीअंतर्गत विवाह, रीती, प्रथा, परंपरा या आधारे आपले वेगळेपण कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील असते. परंतु राजकीय सत्ता प्राप्तीकरीता याकडे काही प्रमाणात दुर्लक्ष करुन पदाची व व्यक्तिची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी प्रयत्न केला जातो. जातीव्यवस्थेचा आधार हा राजकीय सत्तास्पर्धेतून निश्चित होतो. पूर्वीच्या काळी हा संबंध राजाशी निगडीत होता समकालिन संदर्भात तो राष्ट्रीय व राज्य सरकारशी संबंधित दिसतो. जातीव्यवस्था या दृष्टीकोनाच्या मते आपले राजकीय प्रभाव पाडण्यासाठी व राखण्यासाठी वास्तविक घटकांशी स्पर्धा व समझौता करत असतात.

**२) ऐक्यकारी दृष्टीकोन (The Integrution or Aspect):**

हा दृष्टीकोन जातींच्या एकतेच्या व एकात्मतेच्या तत्वाला प्राधान्य देतो. जन्माद्वारे जात प्राप्त होत असल्याकारणाने व्यक्तीची जातीविषयीची आलोचना परस्पर संबंधांना मजबूत करत असते. लोकशाहीत या जातीच श्रेष्ठत्वाच्या प्रभावाकडे दूर्लक्ष करुन चालत नाही कारण वास्तविकरीत्या त्यातूनच विभिन्न समूहात शक्तिप्रदर्शनाची स्पर्धा वाढून गट निर्मितीला प्रेरणा मिळते. त्यामुळेच भारतीय राजकारणात जातींच्या श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या संदर्भात विविधतेत एकता लाभल्यावर कर देण्याची प्रवृत्तीच संसदीय लोकशाहीच्या प्रयोगात प्रभावी करतांना दिसते आहे.

**३) चेतना दृष्टीकोण (The Consciousness despect):**

जात व्यवस्थेत आढळणारी एक प्रमुख बाब म्हणजे चेतना होय. यास जातिविषयक जातीचा असे राजकीय परिभाषेत म्हणता येईल. साधारणतः भारतीय राजकारणात प्रत्ययास येते की जातव्यवस्थेच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक बदलांच्या संदर्भात-दर्जामध्ये बदल घडून येतात. या बदलांच्या आधारेच विविध राज्यात विशिष्ट जातसमुहांनी राजकीय वर्चस्व प्राप्त केलेले दिसून येते. वरीष्ठ जाती समूहाचे राजकारण, ओबीसी जातीसमूहाचे राजकारण, दलित जाती समूहाचे राजकारण, आदिवासींचे राजकारण हे या जाणिवेच आविष्कार मानावे लागतील. या प्रक्रियेत ब्राम्हण व ब्राम्हणेतर यांच्यातील सांस्कृतिकीकरणाच्या पातळीवरील समन्वय व संघर्ष तर दुसऱ्या बाजुने पाश्चिमात्यकरण व हटवाद या बाबींची रूजवात भारतीय समाजात होत आहे.

**जात व राजकारणाचा विकासः**

जात व राजकारण हे वास्तव समकालिन संदर्भात अधिक दिसत असले तरी त्याची रुजवात स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली होती. त्यादृष्टीने जातीय राजकारणाचा विकास आपणास पूढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

## १) ब्रिटीशपूर्वकालीन अवस्थाः

ब्रिटीशपूर्व काळात भारतीय समाजातील राजकारणाचे स्वरुप ते महाजनसत्ताक स्वरुपाचे होते. परंपरा हा त्याचा आधार होता व खेडे हा त्याचा केंद्रबिंदु होता. सत्तेस एक प्रकारची अधिमान्यता असल्याकारणाने वरीष्ठ जातींसमूहांच्या वर्चस्वास तसे आव्हान नव्हते. या काळात राजकीय संघर्षाची तशी वानवाच असे. राजकीय संघर्ष झाले तरी ते जातीय परिभाषेत ही मांडली जात. या काळातील पारंपारिक नेतृत्वास जनमान्यतेची किंवा सर्वसामान्य जनतेच्या अधिमान्यतेची गरज नव्हती त्यामुळे या पारंपारिक समाज रचनेतील नेतृत्व केवळ धार्मिक व आर्थिक कार्यक्रमांपूरतेच मर्यादित होते. राजकीय कार्यांचे प्रयोजन फारसे त्यांच्याकडे नसे. पारंपारिक राजकीय व्यवस्था ही प्रामुख्याने लंबात्मक बंधावर आधारलेली होती. त्यामुळे आडव्या जुळवणूकीची गरज व शक्यता या दोन्ही गोष्टींचा व्यवस्थेत अभाव होता.

## २) ब्रिटीशकालिन स्वरुपः

ब्रिटिश ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाने भारतीय जातीव्यवस्थेला याच अर्थाने प्रभावित केले. त्यामुळे भारतीय जातव्यवस्थेवर आमुलाग्र स्वरुपाचा प्रभाव ब्रिटीशकालीन व्यवस्थेत पडलेला दिसतो. रेल्वे, पोस्ट, छापखाने, यासारख्या गोष्टींमुळे जातीवरील भूभागीय मर्यादा नाहीशा झाल्या, स्पर्शास्पर्श, निर्बंधात शिथिलपणा अनुभवास येऊ लागला, त्यामुळे जातीच्या व्यापक व आडव्या संघटनांच्या प्रक्रियांना यातून मोठी चालना मिळाली. ब्रिटिश राजवटीने प्रत्यक्षात आणलेल्या शक्ती प्रवाहांनी आर्थिक चलनवलन वाढीस लागले. त्यातुन सामाजिक अभिकरणाची प्रक्रिया वेगवान झाली. शासकीय नोकऱ्या, व्यवसाय, व्यापार ही क्षेत्रे भारतीयांसाठी खुली झाली त्याचा फायदा उच्च जातीसमूहांनी अर्थातच प्रथम उचलला. इंग्रजी ज्ञान व विज्ञानाचा लाभ ही या उच्च जातीसमूहांनीच घेतला. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा विचार ही याच उच्चजातीसमूहातून प्रथम पूढे आला. परिणामी ब्रिटिश राज्यकर्त्यंचा रोष त्यांच्यावर निर्माण झाला. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी उच्च जाती समूहांना आव्हान देशीवर्गातुनच निर्माण करण्यासाठी निम्नजातींना शिक्षण, संरक्षण व सवलती देण्याचे धोरण पूढे आणले त्यातुन या पारंपारिक जातीव्यवस्थेत नवे ताण व तणाव निर्माण झाले. ऐहिक विकासाच्या संधी, सत्ताप्राप्ती व सामाजिक दर्जा मिळवण्यासाठी सर्व जाती कार्यरत झाल्या त्यादृष्टीने जातव्यवस्था विविध संस्था व संघटना स्थापन करण्यास प्राधान्य देऊ लागल्या. ब्रिटिशकालिन व्यवस्थेत जातव्यवस्थेत आलेले हे स्पर्धेचे स्वरुप सांस्कृतिक किंवा सामाजिकपेक्षा राजकीयच अधिक होते. आपल्या जाती समूहांची शक्ती वाढविण्यासाठी जातीय पातळीवर विविध कार्यक्रम व उपक्रम राबवले जाऊ लागले, व्युहरचना आखुन प्रत्यक्षात आणल्या जाऊ लागल्या. त्यात प्रामुख्याने स्वजातींना शिक्षणासाठी प्रवृत्त करणे, पोटजातींच्या भिंती पाडून जातीय ऐक्य घडवून आणणे, व कल्याणकारी कार्यक्रमाच्या माध्यमातून जातीचे जीवनमान सुधारण्याच्या प्रयत्न करणे याला प्राधान्य दिले जाऊ लागले. प्रथमच भारतीय समाजव्यवस्थेत धार्मिक व सांस्कृतिक बाबींना दुय्यम स्थान प्राप्त होऊन सामाजिक जीवनाच्या भौतिक अंगास त्यामुळे प्राधान्य प्राप्त होऊ लागल्याचे चित्र आकारास आले. आधूनिक होऊ पाहत असलेल्या भारतीय समाज व्यवस्थेत जातीसंस्थेने एक प्रभावी हितसंबंधी गट म्हणून कार्य करण्याची महत्वाची भूमिका जातीव्यवस्थेने ब्रिटिशकालिन व्यवस्थेत स्वीकारलेली दिसते. समानवंश, समान दर्जा व समान पारंपरिक कार्य या घटकांमुळे पाश्चात्य दबावगटांपेक्षा जातींनी आपली भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडलेली दिसते.

### ३) सत्तांतराच्या प्रक्रियेतुन पूढे आलेले बदलः

भारतीय जनतेत जसजसा असंतोष वाढीस लागला तसतसे ब्रिटीश राज्यकर्त्यांनी भारतास टप्याटप्याने स्वातंत्र्य देण्याच्या धोरणाचा स्वीकार केला. सत्तांतराच्या या प्रक्रियेने ही भारतीय राजकीय व्यवस्थेतील जात घटकात नव्या बदलांना जन्म दिला. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सत्तांतर घडवून आणण्यासाठी ज्या पद्धतीचा अवलंब केला ती पद्धत ही जातीय घटकास राजकीय कार्ये करण्यास प्रवृत्त झाले. त्यामुळे राज्यकर्त्यांकडून सत्तेचे हस्तांतर सामान्य जनतेकडे ज्या प्रमाणात होत गेले त्या प्रमाणात जातीची राजकीय कार्य व शक्तीही वाढत गेल्याचे दिसते. लॉर्ड रिपन यांनी १८८४ साली लागू केलेल्या राजकीय सुधारणांपासून खऱ्या अर्थाने खुल्या राजकारणाची सुरवात झाली. परंपरेने चालत आलेल्या सांस्कृतिक प्रवर्गाचे रुपांतर आत्मभानयुक्त समुदायात करुन सामाजिक, राजकीय व आर्थिक लाभ पदरात पाडून घेण्याचे मोठे प्रयत्न यापूढील काळात झाले. शासकीय कृपेने नव्हे तर आपणास इतर जातींशी स्पर्धा करुनच सत्ता मिळवावी लागणार आहे याची जाणीव समाजपातळीवर मोठ्या प्रमाणात विस्तारली. त्यामुळे ब्रिटीश राज्यकर्त्यांना विरोध करण्याचे धोरण मागे पडून वरीष्ठ जातींच्या वर्चस्वास शह देण्याचे धोरण पूढे आले. ब्राह्मणजाती वर्चस्वास शह देण्याची गरज इतर न्यूनजातींना तीव्रतेने जाणवु लागली. इंग्रज येथून निघुन गेल्यास परत येथे पेशवाई येईल या भीतीने महाराष्ट्रातील बहुजन जातीनां ग्रासले होते. दक्षिणेतील राज्यांमध्ये ही ब्राम्हणजाती विरोध प्रभावी होता. पाश्चात्य उदारमतवादी विचारांच्या चौकटित जातीचे जे आव्हान उभे राहिले होते त्यास ब्राम्हणेतर जातींकडून प्राप्त झालेल्या हा मोठा प्रतिसाद होता. त्याचे पहिले व्यक्त स्वरुप सांस्कृतिकीकरणाच्या माध्यमातुन पूढे आले. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही गूणवत्तेच्या बाबत ब्राम्हणजातीपेक्षा कुठेही कमी नाहीत हे सिद्ध करण्याची प्रवृत्ती पूढे आली. इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यासाठी आम्हास संधी व अधिक वाव घ्यावा अशा स्वरुपाच्या मागण्या पुढे येऊ लागल्या. तर दुसऱ्या बाजुने ब्राम्हण व तत्सम वरीष्ठ जातींचे उच्चपणाचे जे गूण नावाजले होते ते अंगिकारण्याकरीता ही जातपातळीवर पुढाकार घेतला जाऊ लागला. मांसाहार सोडून देणे, उच्चजातीयांशी विवाह संबंध जुळवुन, क्षत्रियत्वाचा दर्जा सिद्ध करुन जातीव्यवस्थे अंतर्गत आपणास प्रतिष्ठेचे स्थान मिळावे यासाठी जाती प्रयत्न करुन लागल्या. महाराष्ट्रातील मराठा जात समूह व हरियाणातील जाट समुहाचे राजकारण याचा आदर्श नमुना आहे. याचे स्पष्टीकरण करताना भा. ल. भोळे म्हणतात, जाती हा गट अंतर्विवाही असल्यामुळे अन्य जातीत तो मिसळु शकत नाही पण एका वर्षात मात्र अनेक जाती एकत्र येऊ शकतात. कारण तेथे आँतरजातीय विवाह व आत्मीकरण यातला कोणताच धोका नसतो. मराठ्यांनी व जाट यांनी त्रित्रयत्वावर दावा सांगितला तो आत्मीकरणासाठी नसुन जातिव्यवस्थेअंतर्गत वरचा दर्जा व स्थान मिळवण्यासाठी होता. शिवाजी महाराजांचे क्षत्रियत्व उदयपुरच्या शिसोदिया घराण्याशी जोडून सिद्ध केल्यानंतर मराठा जातीत क्षत्रियत्वाचा संचार झाला होता तर जाट जातीसमूहाने यदुकुळातील यादव वंशाशी जोडून क्षत्रिय घोषित केले ही सांस्कृतिकीकरणाचीच एक प्रक्रिया होय. जी त्याकाळात सार्वत्रिक स्वरुपात अनुभवास येत होती.

### ४) स्वातंत्र्यलढ्यातील जातीय आधारः

भारतीय स्वातंत्र्य लढ्यास व्यापक आधार क्वचितच मिळालेला दिसतो. भारताचा स्वातंत्र्यलढा दिर्घकाळ जातीय आधारांवरच लढला गेला व जातीय आधारांवरच विकसित व विस्तारत गेला असे दिसते. स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व उच्चजातीय पुढाऱ्यांच्याच हाती दिर्घकाळ राहिल्यामुळे निम्न जातीयांच्या हितसंबंधाबद्दल आकस व अनास्थेची भावना राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यात दिर्घकाळ टिकुन राहिली. त्यामुळेच राष्ट्रीय आंदोलनात नंतरच्या काळात सुधारक, प्रागतिक, समाजवादी,

राष्ट्रवादी असे विविध प्रवाह सामील झाले तरी सुद्धा त्यांना जात व जातीसंस्था यास समाजात असणारी अधिमान्यता स्पष्टपणे नाकारताही आली नाही व नष्ट ही करताही आली नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यातील धुरीणांनी निम्नजातीयांनाही जातीय परिभाषेत विचार करण्यास भाग पाडले ही वस्तुस्थिती आहे. १९३५ नंतरच्या काळात मतदारसंघाच्या संयुक्त आघाड्यांचेच प्रतिनिधित्व करत होते. या परिस्थितीत प्रबळ जातींचे क्षत्रियत्वाचे दावे मान्यताप्राप्त झाले होते त्यामुळे पारंपरिक नेतृत्वास समांतर नव्या नेतृत्वाचा उदय समाजव्यवस्थेत झाला. या दोन्हींही नेतृत्वांना बदल सत्ता प्राप्त होणार नाही याती जाणीव होती, त्यासाठी अपरिहार्यपणे स्पर्धा करावी लागणार होती. परंतु ही स्पर्धा वरील जातींसाठी गैरसोयींच्या असणाऱ्या नियमांच्या चौकटित होणार होती. मताधिकार जसा विस्तृत झाला तसे सत्तेचे राजकारण वेगाने पूढे आले. त्यातुन आपली ताकद किती तोकडी व परावलंबी आहे याची प्रचिती प्रबळ जातींनाही येऊ लागली. आपला सामाजिक पाया अधिक विस्तृत करण्याची निकड या जातीसमूहांना जाणवु लागली. रक्तसंबंध, अनुग्रह अशा माध्यमातून या जातींना आपले सामाजिक पायाचे क्षेत्र अधिक विस्तृत करावे लागले. त्याकाळात मराठा जातीसमूहाने घेतलेली भूमिका याचेच निदर्शक आहे. याला मराठा, कुणबी-कुळवाडी व कडू अपकरमाशे हे सर्व मराठाच आहेत, त्यांनी एकत्र यावे अशी आवाहने मोठ्या प्रमाणात करण्यात येऊ लागली. राजर्षी शाहू महाराज व क्षत्रियगट गुरुंनीही यात पूढाकार घेतला होता हे विशेष. या सर्वामागे हे नव्या निष्टावंताचेच राजकारण होते. त्यामुळेच सहजच पारंपरिक उतरंड संबंध शिथिल होऊन व्यक्तिगत सरशीच्या राजकारणाचे पारडे जड होण्यास सहाय्य झाले. एकात्म समाजगट म्हणून अभिजन जातीचे प्राबल्य कमी होऊन यांना जातीय फुटीच्या आधारे जातीसंस्थेस आपला वरचढपणा टिकवणे आवश्यक वाटु लागले.

### ५) संविधानाचे क्रांतीकारी ध्येय व नागरिकत्वाचे वास्तवः

स्वातंत्र्याचा कायदा पारित होत असतानाच भारतीय संविधान सभेचे गठन झाले होते. भारतीयांनी भारतीयांसाठी नवा सर्वोच्च मूलभूत कायदा करण्याची प्रक्रिया संविधान सभेने स्वीकारली होती, स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधान अस्तित्वात आले. ते केवळ नियमांची पोकळ चौकट म्हणून नव्हे तर एक क्रांतीकारी दस्ताऐवज म्हणून. कारण संस्थाबद्ध विषमता हे जातीसमाजाचे वास्तव भारतीय समाजजीवनात हजारो वर्षापासून उत्क्रांत होत आले होते त्याच्या अगदी उलट समताधिष्ठीत समाजरचनेचे स्वप्न भारतीय समाजाने वास्तवात आणण्याचे वचन दिले. लोकशाही संस्था व प्रक्रियांच्या माध्यमातून समताधिष्ठीत समाजरचनेचा संकल्प प्रत्यक्षात आवतरेल असा विश्वास ही व्यक्त करण्यात आला. व्यक्तीचा जाती आधारावर करणारा जन्मसिद्ध दर्जा नाकारत नागरीक या घटकाच्या आधारे सर्वभारतीयांना समान प्रतिष्ठा व समान दर्जा देणारा घटक प्रतिष्ठापित करण्यात आला ही एक क्रांतीकारी घटना होती.

परंतु भारतीय संविधानाने जात नष्ट केलेली नाही. जातीभेद, उच्चनिच्च भेदभाव हे विषमतेचे घटक तेवढे नाकारले आहेत. त्यामुळे जात या घटकाचा प्रभाव आजही कायम आहे. जात आणि नागरिकत्व यांचा प्रसंगपरत्वे वापर करण्याची मोकळीक भारतीय कायद्यानेच नागरीकांना प्राप्त झाली आहे. विशेषतः राजकीय क्षेत्र हे यादृष्टीने एक उपयुक्त व प्रभावी क्षेत्र म्हणून पुढे आलेले दिसते. त्यामुळेच राजकीय लोकशाहीच्या सर्व प्रक्रियांमध्ये जात हा मध्यवर्ती व निर्णायक घटक म्हणून पुढे येत आहे. यासंदर्भात असेही म्हटले जात आहे की, लोकशाही राजकारण कोट्यावधी मतदारांसाठी अर्थपूर्ण करण्याचे महत्वाचे कार्य जातिसंस्था पर पाडीत आहे. लोकशाही प्रक्रियांशी सामान्य भारतीय मतदारांना जोडण्याचे जात हे महत्वाचे माध्यम ठरले आहे. परंपरेने वजाबाकी करत आलेली जात आजच्या घडीला मात्र बेरजेच्या राजकारणाचे एक महत्वाचे माध्यम बनले आहे. याचे विश्लेषण करताना भ. ल. भोळे म्हणतात, ''व्यक्तिगत व सामूहिक

पातळीवरील नवे प्रगमन, नव्या राजकीय प्रवक्त्यांची निर्मिती, जुन्या व नव्या प्रतिकांद्वारे अस्मितेची नव्याने केली जाणारी व्याख्या इत्यादींच्याद्वारे पुरातन जातिंस्थेचे नव्या राष्ट्रीयत्वाशी अभिसंस्करन झालेले आपल्याला सर्वत्र दिसून येते. जातीजातीं आंतरसंबंधांचे बदलते आकृतीबंध नवनव्या क्षमता घेऊन स्वातंत्र्योत्तर भारतात पुढे आले आहेत. सत्ता, संपदा, प्रतिष्ठा, विकास, संधी इत्यादी दुर्मिळ गोष्टींचा आपल्या सदस्यांसाठी मोठ्यात मोठा वाटा मिळविण्यासाठी जसा जातीचा वापर केला गेला तद्वतच नव्या सामाजिक राजकीय पर्यावरणात लाभलेल्या क्षमतांच्या अनुषंगाने एका जातीच्या सदस्यांनी अन्य जातीशी काळानुरुप जोडले जाण्यासाठीही जाती उपयुक्त झाल्या आहेत. बदलत्या परिस्थितीशी जुळवुन घेण्यातुन टिकून राहिलेली एक पुरातन संस्था असे जातीचे वर्तन भारतीय राजकारणाच्या संदर्भात करण्यात आले आहे.'' नेतृत्वाचा आप्रवेश, राजकीय क्रियाशीलांचा पुरवठा आणि समूहजाणिवेचा परिपोष अशा विविध संदर्भात जातीला अधिमान्यता मिळालेली त्यामुळेच आपल्याला दिसते.

### ५) स्वातंत्र्योत्तर कालीन जातीय वास्तवावरील प्रतिक्रिया:

भारताला स्वातंत्र्य मिळत असतानाच या स्वातंत्र्याचे काय होणार? अशी चिंता स्वातंत्र्यलढ्याच्या धुरीणांबरोबरच जगभरातील जाणकारांना वाटत होती. स्वातंत्र्योत्तर काळात भारत ज्या लोकशाही शासनचा प्रयोग राबवणार होती. त्या शासनाचा ना अनुभव ना इतिहास भारतीयांच्या गाठीशी होता. त्यातच जातीआधारित विषमताधिष्ठीत समाजरचना ही लोकशाहीला अपेक्षित पार्श्वभूमिच्या अगदी टोकाच्या विरोधी होती. भारतीय लोकशाहीचे काय होणार यावर भारतीय समाजधूरीणांच्या ज्या प्रतिक्रिया आल्या त्यात पं. जवाहरलाल नेहरु, राम मनोहर लोहीया व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिक्रिया प्रातिनिधिक स्वरुपात तत्कालिक भारतीय समाजव्यवस्थेचे विचारांचे प्रतिबिंब करणाऱ्या आहेत त्यादृष्टीने संक्षिप्त स्वरुपात त्यांची मांडणी करणे गरजेचे ठरते.

### १) पं. जवाहरलाल नेहरु:

जातिप्रधान भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाही प्रक्रियांच भवितव्य कसे सुरक्षित राहिल यादृष्टीने स्वातंत्र्य लढ्यातील धूरीणामध्ये पं. जवाहरलाल नेहरु हे सर्वाधिक चिंतातुर होते. जातिसंस्था ही पारंपारिकतेवर आधारित महाजनसत्ताक संस्था असुन आधुनिक परिस्थिती व लोकशाही आदर्शाशी ही व्यवस्था पूर्णतः विसंगत आहे. अशा प्रकारची भूमिका नेहरुंनी आपल्या सार्वजनिक जीवनात सातत्याने घेतली होती. नेहरु हे पाश्चात्य संस्था, इतिहास, अनुभव व विकासप्रक्रियेने प्रभावित झालेले व्यक्तिमत्व होते. पाश्चात्य लोकशाहीचा विकास त्यांनी अभ्यासला व अनुभवला होता. लोकशाही ही राजकीय प्रणाली म्हणून स्वीकारत असताना काही सामाजिक पूर्वअटी त्या समाजव्यवस्थेत अपरिहार्य असत. त्यामुळे नेहरुंची अशी धारणा होती की राज्यव्यवस्था ही व्यापक समाजिक व्यवस्थेची एक उपव्यवस्था असते व समाजात प्रचलित रचना, आदर्श व प्रक्रिया राजकीय संरचना आणि प्रक्रियांना प्रभावित करत असतात. भारतीय सामाजिक संरचना अधिसत्तावादी आहे. जोपर्यंत ही अधिसत्तावादी संरचना निकालात काढली जात नाही तोपर्यंत या देशात लोकशाही संकटातच वावरणार हे निश्चित. ही सामाजिक संरचना आमुलाग्र बदलल्याशिवाय पर्याय नाही अशी नेहरुंची पक्की धारणा प्रतिक्रिया स्वरुपात होती असे दिसते.

## २) राम मनोहर लोहिया:

विषम जातिव्यवस्थेने येथील नऊदशांश जनतेला राष्ट्रीय शोकांतिकांचे पूर्णत्वे उदासीन, दिशाहीन व केवळ निष्क्रीय निरीक्षक करुन सोडले आहे, हे इतिहास वारंवार या देशाच्या झालेल्या पराभवांचे सर्वात मोठे कारण असल्याचे निदान राम मनोहर लोहिया यांनी केलेले दिसते. लोहियांच्या मते जातीच्या गरजा व राष्ट्राच्या गरजा यात अगदी स्पष्टपणे भेद व संघर्ष आहे. त्यामुळे राष्ट्रीय धूरीणांनी प्रसंगी अप्रियतेचा धोका पत्करुनही जातीव्यवस्थेला जाहीर विरोध करणे अत्यावश्यक आहे. लोहियांच्या मते म. गांधींनी हा धोका पत्करला मात्र गांधींचे राजकीय मानसपुत्र म्हणवून घेणारे जवाहरलाल नेहरु मात्र आपली लोकप्रियता गमावल्याच्या भीतीने हा धोका पत्करण्यास तयार दिसत नाहीत. राम मनोहर लोहियांचे नेहरुं संदर्भातील निरीक्षण परिस्थितीच्या सम्यक आकलनावरुनच आले होते. राम मनोहर लोहीया यासंदर्भात म्हणतात, जातिव्यवस्था हा सातत्यसमर्थक असा भयंकर मोठा शक्तिप्रवाह आहे. कोणत्याही क्षेत्रातील परिवर्तनाला तो प्रतिबंध करत असतो. विद्यमान भय हलकटपणा, अप्रतिष्ठा व असत्य यांना तो टिकवून ठेवत असतो. लोहियांच्या या मताचे विश्लेषण करताना भा. ल. भोळे म्हणतात, ''ज्यांना आपले कोट्यावधी निम्नजातींयावरचे वर्चस्व शस्त्राधारे कायम ठेवणे शक्य नसते असे मुठभर उच्चजातीय लोक बहुमतात न्युनगंड पेरतात, स्वतःची भाषा, शिष्टाचार व जीवनशैली वेगवेगळी व श्रेष्ठ असल्याचे बहुजनांच्या मनावर ठसवतात. श्रेष्ठींचे वर्चस्व राखीव न्याय्य आहे अशी मनभावना यातून पक्की होते.'' इतर देशातही राज्यकर्ता वर्ग असतो, पण भारताचा राज्यकर्ता वर्ग विषम जातिव्यवस्थेमुळे चाळीस शतकांच्या जन्मसिद्ध वरचढपणामुळे जेवढा पक्के ठाण मांडून बसला आहे तेवढा जगातला दुसरा कोणताही राज्यकर्ता वर्ग नाही. अशा परिस्थितीत समाजिक परिवर्तनावाचुन कोणतीही क्रांतिकारी लढ्याची भाषाच येथे लोहियांच्या मते निरर्थक ठरते. लोहीयांनी जातीव्यवस्था व भारतीय लोकशाहीचे असे मार्मिक विश्लेषण करुन भारतात भविष्यात जो राजकीय पक्ष स्त्रीशुद्रादिकांना सत्ता मिळवून देण्याच्या सामाजिक क्रांतीचे नेतृत्व करेल यालाच भारतीय राजकारणात खऱ्या अर्थाने भवितव्य असेल असे अर्थपूर्ण भाकित केले होते.

## ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजरचनेतील धर्म व जात या घटकांचा जेवढा मुलगामी अभ्यास केला तेवढा त्यांच्या समकालिन इतर कोणी केल्याचे क्वचितच आढळते. बाबासाहेबांनी भारतीय समाजव्यवस्थेचे खरे दुखणे या देशातील जातीव्यवस्थाच आहे आपल्या प्रसिद्ध भारतातील जाती, उत्पत्ती व विकास या शोधनिबंधात १९०९ सालीच परखडपणे मांडले होते. बाबासाहेबांच्या दृष्टीने जात ही केवळ समस्या नसुन ती अनेक समस्यांना जन्म देणारी समस्या आहे. भारतीय समाजव्यवस्थेत तुम्ही कुठल्याही दिशेला जा जातीचा राक्षस तुम्हाला आडवा येतोच. भारतीय समाजाची रचना ही जातीच्या खडकावर आधारलेली आहे आणि हा खडक साधासुधा नसुन तो ग्रेनाईट स्वरुपाततला भक्कम खडक आहे. त्यामुळे त्याला उध्वस्त केल्या शिवाय भारतीय समाजाला व लोकशाही प्रक्रियेला भवितव्य नाही. जातिव्यवस्थेचा हा खडक उध्वस्त करण्यासाठी बाबासाहेब या जातिव्यवस्थेला ज्या घटकांच्या आधारे पावित्र्य बहाल झाले आहे ते धर्म व धर्मग्रंथ उध्वस्त करण्याचा आग्रह धरतात. ते उध्वस्त करण्यासाठी सामाजिक लोकशाहीचा आग्रह धरतात. बाबासाहेबांच्या मते एक व्यक्ती एक मत हे तत्व भारतीय संविधानाने स्वीकारलेले आहे. एक व्यक्ती एक मत या तत्वाच्या आधारे यूरोपियन, पाश्चात्य राष्ट्रांमध्ये लोकशाहीचा प्रयोग यशस्वी व विकसित झाला आहे हेही वास्तव आहे. परंतु भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाहीचा प्रयोग राबवण्यासाठी व तो यशस्वी व विकसित करण्यासाठी एक

व्यक्ती एक मत हे तत्व अपुरे असुन त्याऐवजी एक व्यक्ती एक मूल्य या तत्वास प्रत्यक्ष व्यवहारात प्राधान्य द्यावे लागेल. तरच भारतात लोकशाहीचा आशय खऱ्या अर्थाने सजीव होऊ शकेल अन्यथा ती बहुसंख्यांक अभिजन वर्गाची एकाधिकारशाहीच मात्र बनुन राहिली.

### ६) भाषिक प्रांतरचना व जातीय राजकारण:

पारंपारिक भारतीय समाजरचनेत जात हा घटक सामाजिक जीवनाचे सारसर्वस्व होता. त्यामुळे जातीय घटकांचा वेगळा विचार करण्याची तसदी घ्यावी लागत नव्हती, तुम्ही ब्राह्मण, ठाकुर अशा उच्चजातीतील असाल तर राज्य कराल व निम्न जातीय असाल तर गूमान आज्ञापालन कराल हा संकेत ठरलेला होता. या संकेतास एक प्रकारची स्वाभाविकता प्राप्त झालेली होती. स्वातंत्र्योत्तर काळात जाती एका बाजूने राजकीयकरणात नि:संदर्भ होत असतांना दुसऱ्या बाजुने जातीय घटकांचा विचार समाजाच्या सर्वच श्रेत्रात अपरिहार्यपणे पूढे येऊ लागला त्यातुन भारतीय राजकारणात अनेक विरोधीभासी प्रसंग व मागण्या पूढे येऊ लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळातील एक मोठे आँदोलन भाषिक प्रांतरचनेच्या मागणीने निर्माण झाले. वास्तवात या भाषिक अस्मितेच्या आड जातीय प्रभुत्वाचेच राजकारण दडलेले होते. कारण भारतात भाषिक वितरणाबरोबरच जातीय वितरण ही समान पातळी वर झालेले दिसते. विशिष्ट भागात जसे विशिष्ट भाषा बोलणारे समूह एकवटले आहेत. तसेच विशिष्ट प्रदेशात विशिष्ट जातीसमूहांचे प्राबल्य निर्माण झालेले आहे. महाराष्ट्रात जसा मराठी भाषेचा समूह आढळतो, त्याबरोबरीनेच मराठा कुणबी जातीसमुहाचे प्रभुत्व ही आढळते. कर्नाटकात जशी कन्नडी भाषिकांची संख्या एकवटलेली दिसते तशीच तिथे लिंगायत व ओक्कालिंगाचे वर्चस्व ही सातत्याने आहे, आंध्रप्रदेशात जसे तेलगु भाषिकांचे प्राबल्य होते तसेच तेथे रेड्डी व कम्भा जातींचे प्रभुत्व ही आहे. त्यामुळे या जातींचे राजकारण अभ्यासल्याशिवाय त्या राज्यांच्या राजकारणाचा आढावा घेता येणे शक्य होत नाही. त्यामुळे भाषिक प्रांतरचनेच्या मागे जाती प्रभूत्वाच्या घटकानेच महत्वाची भूमिका बजावली होते असे दिसते.

### ७) इंदिरा गांधींचे धोरण:

भारतीय राजकारणाला प्रभावित करण्यात इंदिरागांधींचे नेतृत्व हे सर्वार्थाने समर्थ ठरलेले दिसते. इंदिरा गांधींनी भारतीय राजकारणातील वरीष्ठ प्रबळ जातीसमुहांचे खच्चीकरण करण्यासाठी आपल्या नेतृत्वास आव्हान निर्माण होणार याकरीता ज्या धोरणांचा अवलंब केला त्यातुन भारतीय राजकारणातील जातीय घटक मोठ्या प्रमाणात कारणीभूत झालेले दिसतात. इंदिरा गांधीच्या नेतृत्वात देश पातळीवर महाराष्ट्रातील मराठा नेतृत्वाने सर्वप्रथम आव्हान निर्माण झालेले धूरीणत्व यास जबाबदार आहे व इंदिरा गांधींच्या चाणाक्ष बुद्धीने लगेच जाणले. त्यामुळे या मराठा नेतृत्वास व प्रभुत्वास खच्चिकरण्यासाठी इंदिरा गांधींनी देशभर प्रबळ जातींविरोधी इतर निम्न व ओबीसी जातींचे नेतृत्व पूढे आणावयास सुरवात केली. महाराष्ट्रात तर स्थानिक पातळीवर सशक्त व प्रस्थापित झालेले, जनाधार असलेले नेतृत्व उखडून त्याजागी अंतुले-तिरपुडे, लाके, घोटे, नाईक अशा नेत्यांना त्यांनी सत्तास्थाने बहाल करावयास सुरवात केली. त्यामुळे प्रबळ जातीचे धूरीणत्व संपण्यास व मराठा कुणबी एकजुट विस्कटण्यास सुरवात झाली. मराठा नेतृत्व हे वर्गभिमानी असून हिंदुत्वांचे त्यास लुप्त आकर्षण आहे हे उघड होऊ लागले. सर्वांना सोबत घेऊन चालण्याची प्रगल्भता मराठा धूरीणांकडे नाही हे उत्तरोत्तर स्पष्ट होऊ लागले. नामांतर प्रश्न, रिडल्ट प्रकरण, मंडल विरोधी भूमिका यामधुन मराठा नेतृत्वाचा समातवादी, दलित व ओबीसी विरोधी खरा चेहरा उघड झाला असे अभ्यासकांना वाटते. मंडल आयोगाने निर्माण केलेल्या वादळाने राजकीय कक्षा खऱ्या अर्थाने रुंदावल्या व निम्नजातींनी राजकारणात

सशक्तरीत्या प्रवेश केला. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांना या बदलत्या राजकीय प्रक्रियेला प्रतिसाद देणे क्रमप्राप्त झाले. बिहार, उत्तरप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र अशा प्रमुख राज्यांचे राजकारण तर या शक्ती प्रवाहांनी मोठ्या प्रमाणात प्रभावित केले व भारतीय राजकारणात आता पूर्वीच्या तूलनेत नेमके उलटे चित्र निर्माण झाले. श्रेष्ठात्वापेक्षा मागासलेपणाच्या जातीय अस्मिता राजकारणात अधिक उपयुक्त ठरु लागल्या त्याचे पडसाद महाराष्ट्रातही उमटले. कुणबी जातीने स्वतःला मराठा म्हणवून राजकारण करण्याचा काळ मागे पडून आता मराठ्यांचा स्वःला कुणबी म्हणवून राजकारणात वावरण्याचा आग्रह प्रबळ होऊ लागला. ब्रह्मणी संस्कृती व ब्राम्हण यांच्या अनुकरणाच्या जागी कोणत्याही जातीच्या प्रगत, शहरी व प्रतिष्ठीत वर्गाच्या अनुकरणाचा आशय सांस्कृतिकरणाच्या प्रक्रियेस प्राप्त झाला.

## ९) १९६७ नंतरचे बदलते संदर्भः

स्वातंत्र्योत्तर कालीन भारतीय राजकारणात १९६७ च्या सार्वत्रिक निवडणूकांचे महत्वाचे स्थान आहे. या निवडणूकांनी भारतीय राजकारणात अनेक नवीन प्रवाहांना जन्म व मान्यता दिली. ज्यातुन भविष्यकालिन भारतीय राजकारणाच्या दिशा निश्चित झाल्या. दरम्यानच्या काळात भुसुधार कायद्यांनी कुळांना जमिनी मिळाल्या होत्या परंतु वास्तवात कमाल जमिन धारणा कायदे अमलात आलेच नाहीत. त्यामुळेच जमिनीचे फेरवितरण खऱ्या अर्थाने झाले नाही. मात्र राज्यस्तरावरील शेतीसुधारणा प्रकल्पाचे व हरित क्रांतीचे लाभ यातुन एक नवा आर्थिक सुस्थितीतील मध्यम जातींचा गट राजकीय दृष्ट्या शक्तिशाली बनला. स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी बँका, स्थानिक संसाधनावर वर्चस्व यातुन या वर्गाची सत्ता वाढीस लागली. उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, केरळ इत्यादी राज्यांच्या विधानसभा व लोकसभेच्या सभासदात्वातून या बदलत्या जातीय संतुलनाचे प्रतिबिंब उमटावयास सुरवात झाली. १९६७ नंतरच्या काळात मध्यम जातीचा प्रवाह अधिक ठळकपणे पूढे आला. १९७१ नंतर लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणूका एकत्र घेण्याची पद्धती मागे पडली हे ही राज्यपातळीवरील राजकीय पक्षांसाठी जातीय आकांक्षा साकारण्याच्या दृष्टीने पूरक ठरले. राज्यांची सत्ता या मध्यमजातींनी ताब्यात तर घेतलीच परंतु त्याबरोबर लोकसभेतील आपले स्थान ही अधिक प्रभावी करण्यास सुरवात केली. राज्यभर विखुरलेल्या साधनसंपन्न असलेल्या वरचढ जातींचे राजकीय वर्चस्व या प्रक्रियेतुन संकटात आले.

## १०) मंडल विरुद्ध कमंडलः

इतर मागास वर्ग हा राजकीय शक्ती म्हणून पुढे येण्यात मंडल आयोगाच्या अंमलबजावणीचा घटक सर्वाधिक महत्वाचा ठरला. व्ही. पी. सिंग सरकारने मंडल आयोगाची अंमलबजावणी करुन स्वतःस ओबीसींचा मसिहा म्हणून प्रतिमा निर्माण केली. मंडल आयोगाने निर्माण केलेल्या ओबीसी अस्मितेस आपल्या छत्रछायेखाली आणण्यासाठी व त्यास वेगळे अस्मितादर्शन वळण लावण्यासाठी भारतीय जनता पक्षाने रामंदीर व हिंदुत्वाच्या मुद्याला हवा दिली. मंडल विरुद्ध कमंडल या वादाने संपूर्ण भारतीय राजकारण ढवळून निघाले. नव्याने जागृत होत असलेल्या ओबीसी जातीसमूहांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी जातीय समिकरणे जुळवण्यास व आपली प्रतिमाने तयार करण्यास सुरुवात केली. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने त्यासाठी बहुजनवादाचे प्रतिमान वापरले तर भाजपाने त्यासाठी हिंदुत्वाचा सापळा रचला. डाव्या व पुरोगामी पक्षांनी त्यासाठी शोषणमुक्त समाजाचे परिवर्तनवादी प्रतिमान पुढे केले यासर्वात भाजपाचे हिंदुत्वादी प्रतिमान अधिक यशस्वी झालेले दिसते. परिणामी भाजपाची भारतीय राजकारणातील प्रभावशक्ती कित्येक पटींनी वाढलेली दिसते.

## ११) जातीय राजकारण व राजकीय पश्र:

स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रारंभीच्या काळातच उच्च जातीय समूहाचे राजकीय वर्चस्व निकाली निघणार अशी स्पष्ट शक्यता दिसु लागली. प्रातिनिधिक लोकशाहीत संख्याबळास असणारे महत्व या देशातील धुरीणांना जाणवल्यास खरे तर १९३५ नंतरच्या काळातच सुरवात झाली होती. त्यामुळे या ब्राम्हणेतर जातीमधील पूढाऱ्यांनी वरील उच्च जातीय धूरीणांची सत्ता मोडीत काढण्यास तेव्हाच सुरवात केली होती. ही बाब फार क्रांतीकारक नसली तरी काळाच्या दृष्टीने पूरोगामी मात्र नक्की होती. स्वातंत्र्योत्तर काळात प्रौढमताधिकाराचा स्वीकार करण्यात येऊन १९५२ साली पहिल्या सार्वत्रिक निवडणूकांचे यशस्वी आयोजन केल्या नंतर तर ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली. या बदलत्या काळाची पावले काँग्रेस पक्षाने सर्व प्रथम ओळखून त्यानुरुप स्वसंघटनेत बदलांना प्राधान्य दिले. नेतृत्व, रचना व धोरणांमध्ये त्यास अनुरुप असे बदल अंगिकारले. त्यामुळेच काँग्रेस पक्षाने एका बाजुने तळागाळातील भुहीन, पूर्वास्पृश्य अशा तळातील जातीसमूहाची व दुसऱ्या बाजुने प्रांतामधील प्रबळ जातींची मर्जी संपादन करत देशाची सत्ता दिर्घकाळ उपभोगली. यादृष्टीने काँग्रेसने आखलेल्या व अवलंबलेल्या व्युवहनीतीचे विश्लेषण करताना भा. ल. भोळे म्हणतात ''प्रांतवार काँग्रेसने आवाहने केली आणि ब्राम्हणेतर चळवळीला व शेतकरी कामगार पक्षाला गारद केले. श्रीमंत व मध्यम शेतकरी घटकांमधील धुरीणांची आघाडी बांधून त्यांना ग्रामीण भागात नव्याने उपलब्ध झालेली सत्तास्थाने व संसाधने अग्रहक्काने उपलब्ध करुन दिली. उत्तर भारतात जेथे जमिनदारी होती तेथे एका बाजुने जमिनदारांना राजकारणात स्थान आणि दुसऱ्या बाजुने गरीबांना जगणे सुसह्य करणारे काही किरकोळ आर्थिक लाभ वाढून मधल्या स्तरातीत शेतकऱ्यांचे हितसंबंध काँग्रेसने दुर्लक्षित केले. जातीय परिभाषेत बोलायचे तर वरचढ जाती व वंचित जाती आणि अल्पसंख्याक यांचा पाठिंबा मिळवून काँग्रेसने मधल्या जातींच्या गरजा व मागण्यांकडे कानाडोळा केला, गुजरातमध्ये काँग्रेसने तिसरीच व्युहनीती वापरली. मागासवर्ग, अनुसुचित जाती, जनजाती व अल्पसंख्यांक या दुर्बल घटकांना घेऊन राज्यकर्ता आघाडी काँग्रेसने तयार केली. मध्यप्रदेश, राजस्थान यासारख्या राज्यात आजी संस्थानिकांच्या मदतीचे जात वर्ग छेदणारे पण सरंजामीय स्वरुपाचे राजकारण काँग्रेसने केले. अशा पद्धतीने काँग्रेस पक्षाने जातीय राजकारणात जाती-जातीमधील समन्वय राखून आपले वर्चस्व अबाधित राखलेले दिसते.

जातीय समीकरणांची यशस्वी हाताळणी काँग्रेसने करुन जे राजकीय यश संपादन केले होते व राखले होते ते विरोधी पक्षांच्या नजरेतुन सुटण्यासारखे नव्हते. ते सुद्धा जातीय राजकारणातरच आपले बस्तान बसवण्याच्या वा राखण्याच्या प्रयत्नात होते. अगदी डावे पक्षही त्यास अपवाद ठरले नाहीत. मार्क्सवादी व भारतीय कम्युनिस्ट पक्षाने जे कष्टकऱ्यांचे लढे उभारले. त्यातुन शेतजमिनींच्या मालकी हक्कांना मोठा आघात होणार नाही याची काळजी वाहिली गेली. त्यांच्या लढ्यांचे स्वरुपही सुधारणावादी अंगाने जाणारेच होते. श्रमिक व शोषित वर्गाची जीवनस्थिती सुधारणे, भूमिहीन शेतमजूरांची मजुरी वाढवणे, कुळांचे तसेच हिस्सेदारीने पीक काढणाऱ्यांचे हक्क सुरक्षित करुन घेणे अशा प्रश्नांभोवतीच प्रामुख्याने डाव्या पक्षांची आंदोलने केंद्रित होती. परिणामस्वरुप मार्क्सला अभिप्रेत असणारा सधन जमीनदार विरुद्ध भूहीन शेतमजूर असा वर्ग, लढा तीव्र होण्याऐवजी विविध जमीन मालक जातींमधील सत्तास्पर्धा असेच डाऱ्यांनी उभ्या केलेल्या संघर्षाचे स्वरुप कायम राहिले. गरीब व भूहीन यांच्या वर्गीय हितसंबंधाच्या आधारे पक्का राजकीय पाया न रचला गेल्यामुळे खालुन उसळलेल्या जनक्रांतीतुन मुलभूत राजकीय बदल घडून येण्याची शक्यता कधी निर्माण झाली नाही. डाव्यांच्या आंदोलनामधुन मध्यम जातींच्या राजकीय आकांक्षा तेवढ्या जोजावल्या गेल्या असे दिसते.

भारतीय राजकारणात दिर्घकाळ टिकुन राहिलेल्या लोकदल या पक्षाचे उदाहरण ही यादृष्टीने महत्वाचे आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील प्रभावी जातीय आंदोलन मालिकेशी संलग्न अशी ती एक महत्वाची कडी आहे असे मानावे लागेल. लोकदल या पक्षाचे आवाहन मध्यम व गरीब शेतकरी-पशुपालक जातींपूरतेच प्रामुख्याने मर्यादित दिसते. काँग्रेसच्या जातीय संरचनेची प्रतिक्रिया म्हणून मध्यम जातींचे संघटन ही विरोधी पक्षांनी आपल्याकडे घेतलेली जबाबदारी आहे असे दिसते. त्यात भारतीय जनता पक्षही नंतरच्या काळात मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला. त्याबरोबरीनेच त्या-त्या प्रांतातील प्रादेशिक राजकीय पक्षांनी ही आपले राजकीय स्थान पक्के केले असे दिसते. एकंदरीत भारतीय राजकीय व्यवस्थेतील सर्वच राजकीय पक्षांनी या जातीय राजकारणास चुचकारुन आपला सामाजिक पाया अधिक विस्तारण्याचा व भक्कम करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

## ३.५ जातिव्यवस्थेची राजकीय कार्य

जातिव्यवस्थेची प्रमुख राजकीय कार्य पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

### १) राजकीय जाणीव-जागृती निर्माण करणे:

भारतीय समाजव्यवस्थेत जाणीव-जागृतीचे कार्य राजकीय दृष्ट्या जातीव्यवस्थेनेच पार पाडलेले दिसते. खरे तर समाजाचे राजकीय सामाजीकरण घडवून आणण्याचे महत्वाचे कार्य राजकीय पक्षांचे असते. म्हणूनच राजकीय पक्षांना समुद्रातील लाटांची उपमा दिली जाते. समुद्रातील लाटा ज्याप्रमाणे समुद्रातील पाणी जिवंत ठेवण्याचे कार्य पार पाडतात त्याप्रमाणेच लोकशाही शासनप्रकारात राजकीय पक्ष लोकमत जिवंत ठेवण्याच कार्य पार पाडतात. भारतीय राजकीय व्यवहारात मात्र राजकीय सामाजीकरणाची जबाबदारी जातीव्यवस्थेने आपल्या अंगावर घेतलेली दिसते. म्हणूनच रुडाल्फ आणि रुडाल्फ या संदर्भात असे म्हणतात की भारतासारख्या विकसनशील देशात की ज्यात लोकशाहीव्यवस्थेच्या अलीकडच्या काळात स्वीकार केला आहे आणि ज्यात बहुसंख्येत निरक्षर आहेत ज्यांच्यात राजकीय जाणीव-जागृती निर्माण करणे, त्यांची अभिव्यक्त करणे आणि राजकीयदृष्ट्या कृतीशील करण्याची कामगिरी जाती समूह पार पाडतात.

### २) सत्ताकेंद्रातील सहभाग:

राजकीय सत्ता प्राप्ती हे लोकशाही शासन प्रकारात राजकीय पक्षांचे महत्वाचे उद्दिष्ट असते. म्हणून आपल्या राजकीय आशा-आकांक्षा पूर्णत्वाला नेण्यासाठी व्यक्ती राजकीय पक्षांच्या आश्रयाला जातात व त्यामाध्यमातून आपले राजकीय सत्ता प्राप्तीचे उद्दिष्टचे गाठतात. भारतीय राजकीय व्यवस्थेत मात्र जातीव्यवस्थेच्या घटकाने यास वेगळे परिमाण प्राप्त करुन दिलेले दिसतात. व्यक्ती आपल्या राजकीय आकांक्षा पूर्तीसाठी जातीचा आश्रय घेतात व जातव्यवस्था आपल्या जातीतील सदस्यांना राजकीय सत्ताकेंद्रात सहभागी करण्यात महत्वाची भूमिका बजावताना दिसतात. आपल्या संख्याबळाच्या आधारे जातिसंख्या आपल्या जात बांधवानां संघटित करुन त्यांच्या राजकीय आकांक्षाची पूर्तता करण्याचे महत्वाचे कार्य पार पाडतात. पंचायतराज, सहकारी संख्या, प्रांतिक विधीमंडळे, मंत्रिमंडळ रचना तसेच देशपातळीवरील निवडणूकांमध्येही जातीय राजकीय दावे महत्वाची भूमिका पार पाडताना दिसतात. मंत्रिमंडळ रचनेत जातीय प्रतिनिधित्व, उमेदवारी निश्चितीतील जातीय प्रतिनिधित्व, सत्ताकेंद्रामधील एकूण जातीय प्रतिनिधित्व यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न सातत्याने राजकीय पक्षांना करावा लागतो.

एकंदरीत जात बांधवांना सत्ता केंद्रात सहभागी करण्याचे मोठे कार्य जातीव्यवस्थेकडून पार पाडले जाते असे निदर्शनास येते.

### ३) निवडणूकीचे राजकारण:

निवडणूकीचे राजकारण हा अलिकडच्या काळातील भारतीय राजकारणात प्रचलित झालेला शब्द जातीय राजकारणाचा वाढता प्रभाव विशद करतांना दिसतो. निवडणूकीच्या राजकारणात मुल्य, धोरणे व कार्यक्रम या सर्वापेक्षा उमेदवाराच्या निवडून येण्याच्या क्षमतेला अधिक प्राधान्य दिले जाते. उमेदवाराच्या निवडून येण्याच्या क्षमतेमध्ये जातीय आधाराचे तत्व सर्वाधिक मध्यवर्ती ठरते. त्यामुळे निवडणूकीच्या राजकारणात जातीव्यवस्थेचा कार्यभाग अधिक महत्वाचा झाला आहे. म्हणूनच डोनाल्ड स्मिथ या राज्यशास्त्रज्ञाने भारतातील जातिसमुहांच्या निवडणूकीच्या राजकारणातील कार्यभाग विशद करतांना असे म्हटले आहे की, प्रातिनिधिक लोकशाहीच्या भारतातील प्रारंभामुळे जातिसमुहास मुदतवाढ मिळाली आहे, सार्वजनिक मताधिकारामुळे जातिसमुहाचे महत्व कमी होण्याऐवजी वाढले आहे. निवडणूकांद्वारे जातींची अभिव्यक्ती केली जाते. शिवाय सत्ता संपादन करणे व टिकवणे यासाठी संयुक्त आघाड्या स्थापन केल्या आहेत. एकंदरीत राजकीय पक्ष आपल्या सत्तेच्या राजकारणाकरीता जातिसमूहांचा वापर करतात, तर सत्ताकेंद्रात शिरकाव करण्यासाठी जातीगटाचे नेतृत्व राजकीय पक्षाचा वापर करतात. या निवडणूकीच्या राजकारणात जातीय घटकांचा प्रभाव सर्वच पाडळ्यांवर आढळतो. निवडणूक प्रचारात जातीय निष्ठेला प्रामुख्याने आवाहन करुन राजकीय पक्षाचे धूरीण जातीसमूहांच्या दलालांमार्फत जातीय पाठींबा मिळवणेच अधिक श्रेयस्कर समजतात. मतदारांच्या निवडणूक वर्तनाच्या अभ्यासावरुनही यास पुष्टी मिळताना दिसते.

### ४) मतदारवर्तनास प्रभावित करणारा घटक:

भारतीय राजकीय व्यवस्थेचे अध्ययन करताना मतदारवर्तनास प्रभावित करणारे नवनवे घटक समोर येताना दिसतात. जे पाश्चात्य लोकशाही व्यवस्थेच्या अनुभवांच्या अगदी विपरीत असलेले आढळतात. जात हा घटक मतदारवर्तनास सर्वाधिक प्रभावित करणारा घटक आहे. त्यामुळे इतर लोकशाही देशात अस्तित्वात नसलेला एकगठ्ठा मतदान हा प्रकार मात्र भारतीय राजकीय प्रक्रियेत सर्रास प्रचलित झालेला आपणास आढळतो. जात या घटकाच्या तुलनेत उमेदवाराची पात्रता, गुणवत्ता, पक्षनिष्ठा यासारखे घटक दुय्यम ठरलेले दिसतात. डोनाल्ड स्मिथ यांनी यासंदर्भात आपले निरीक्षण नोंदवताना असे म्हटले आहे की, जातीय भावनेमुळे मतदान विषयक सामूहिक निर्णय घेण्याची प्रवृत्ती भारतात आढळते. अशी प्रवृत्ती शहरी भागातही झोपडपट्टी व अल्पसंख्य जमातीचे मोहल्ले व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमातीत पहावयास मिळते. आवृत्तीचेच रुपांतर एकगठ्ठा मतात होणे व ही एकगठ्ठा मते प्राप्त करण्यासाठीच्या जातीच्या दलालांमार्फत राजकीय पक्ष आपले संधान बांधतात असे सार्वत्रिकरीत्या अनुभवास येते.

### ५) सार्वजनिक धोरणास प्रभावित करणारा घटक:

लोकशाही शासनव्यवस्थेत सार्वजनिक धोरणांवर प्रबाव टाकण्याचे महत्वाचे कार्य दबावगट व हितसंबंधी गटांचे आहे असे मानले जाते. पाश्चात्य देशांमध्ये लोकशाही प्रक्रिया यशस्वी करण्यात राजकीय पक्षां एवढेच महत्व दबावगटांना सुद्धा दिले जाते. लोकमत संघटिक करुन व जनसंपर्काची विविध साधने वापरुन दबावगट लोकमनाचे दडपण राज्यकर्त्यांवर आणून सार्वजनिक धोरणांवर आपला प्रबाव पाडताना दिसतात. भारतात मात्र दबावगटांची भूमिका जातीव्यवस्था अधिक प्रभावीपणे करताना दिसतात. आपल्या जातीहितसंबंधाचा अविष्कार

सार्वजनिक धोरणांच्या माध्यमातून सरकारी पातळीवर व्हावा यासाठी जाती व्यवस्था जनमताचा रेटा उभा करतात व शासनास त्यापद्धतीची ध्येय धोरणे राबवण्यास भाग पाडतात. विविध जातींनी आरक्षणाच्या धोरणावर जो दबाव निर्माण केला त्यातुनच केंद्रसरकारला संविधानात दुरुस्त करुन देशपातळीवर सवर्ण आरक्षण बिल प्रत्यक्षात आणावे लागले. महाराष्ट्रात मराठा जातीसमूहाने क्रांतीमोर्चे काढून १६ टक्के आरक्षण देण्यास भाग पाडले हे त्याचेच एक निदर्शक आहे. एकंदरीत राज्यकर्त्यांना सार्वजनिक धोरण आखत असताना विविध जातीजमातींच्या हितसंबंधाची दखल घ्यावीच लागते. त्याबरोबरीनेच जाती-जमातींच्या हितसंबंधामध्ये समन्वय साधण्याची कसरत ही करावी लागते. त्यासाठी प्रसंगी कायद्यांना, संकेताना व संविधानिक तरतुदींनाही मुरड घालावी लागते. म्हणूनच सवर्ण आरक्षण देताना प्रचलित आरक्षणास कुठेही धक्का लागणार नाही याची काळजी केंद्र सरकारला घ्यावी लागली व ५०% आरक्षणाची मर्यादा ओलांडावी लागली. तर महाराष्ट्रात मराठा जातीस आरक्षण देताना ते ओबीसी जातीसमूहास दुखवणार नाही याची काळजी ही राज्यकर्त्यांना घ्यावी लागली. एकंदरीत अप्रत्यक्षरीत्या शासनाच्या निर्णयप्रक्रियेवर जातिसमूहांचे नियंत्रण प्रस्थापित झालेले आपल्या निदर्शनास येते.

**६) जनमत संघटन:**

जनमत तयार करणे व ते संघटित करणे ही जातीय अस्मितेची पहिली पायरी असते. स्वातंत्र्यपूर्वकाळातच ब्राम्हणजातीचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी ब्राम्हणेतर जातींनी जनमत तयार करण्यासाठी जाती अस्मितांचा प्रभावीपणे वापर केला होता असे दिसते. स्वातंत्र्योत्तर काळातही समाजकारण व राजकारण या दोन पातळ्यांवरच नव्हे तर अर्थकारणाच्या पातळीवरही जातीयव्यवस्था मोठ्या प्रमाणात कार्यरत असलेल्या आपणास दिसतात. चर्चासत्रे, परिसंवाद, जातीय मेळावे, अधिवेशन, वृत्तपत्रे, पूस्तिका इत्यादी संपर्क साधनांचा वापर करुन जात व्यवस्था जनमत संघटित करण्याचा प्रयत्न करतात. या जनमनास रचनात्मक कार्यात सहभागी करुन त्यास विधायक वळण देण्याचा प्रयत्नही जातव्यवस्था करतांना दिसते. जातीय बँकाची निर्मिती ही मोठ्या प्रमाणात करुन जातींना आर्थिकदृषट्या सबळ करण्याचा प्रयत्न जातव्यवस्था करताना दिसते. सारस्वत बँक हे याचेच एक प्रातिनिधिक उदा. होय. या बदलांबरोबरच भारतीय समाजव्यवस्थेत सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेनेही वेग घेतलेला दिसतो. या सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेचे अध्ययन एम. एन. श्रीनिवास यांनी प्रभावीपणे मांडले आहे. एम. एन. श्रीनिवास यांच्या मते, कनिष्ठ जातीचे लोक वरिष्ठ जातींच्या वर्तनाचे अनुकरणीय असते. परंतु त्याचवेळी या संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत आपणास आंतरविरोध ही स्पष्टपणे दिसतो. कारण कनिष्ठ जाती वरिष्ठ जातींच्या अनेक चालीरीती व पद्धतींचे अनुकरण करतात तर त्याचवेळी या कनिष्ठ जाती या वरीष्ठ जातींच्या प्रभुत्वासंदर्भात द्वेषभावना ही बाळगतात. त्यामुळे वरिष्ठ जाती व कनिष्ठ जाती यांच्यातील संबंध एकाचवेळी आकर्षण व विकर्षण स्वरुपाचे झालेले आहेत हा आंतर विरोध यात स्पष्टपणे प्रत्ययास येतो.

## ३.६ जातीय राजकीय सहभागाचे टप्पे

आज जातीसंस्थांना राजकीयदृष्ट्या महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. परंतु हा राजकीय सहभाग जातीय पातळीवर एकाचवेळी कार्यप्रवण झाला नाही. प्रा. रजनी कोठारी यांनी त्याची तीन टप्प्यात विभागणी केली आहे.

### १) पहिला टप्पा:

भारतीय राजकीय व्यवस्थेत जातींचा राजकीय सहभाग हा पहिल्या टप्प्यात सामाजिक उतरंडीतील उच्च जातींपूरता मर्यादित होता. इंग्रजीज्ञान विज्ञानाच्या लाभाने राजकीय जाणीवेची जागृती ही उच्चजातींमध्ये प्रथमतः विकसित झाली त्यामुळे भारतीय राजकीय व्यवस्थेतील मोजक्या व मानाच्या जागा पटकावण्यासाठी उच्चजाती समूह प्रामुख्याने पुढे सरसावला व त्यात त्यांना मोठे यशही प्राप्त झाले. उच्च जातीसमूहास राजकीय लाभ मिळताना पाहुन प्रबळ जातीसमूह जागृत होऊ लागला व त्यातुन सत्ताप्राप्तीच्या पहिल्या जातीय संघर्षाची पार्श्वभूमी या पहिल्या टप्प्यात आकारास आली असे म्हणता येईल.

### २) दुसरा टप्पा:

दुसऱ्या टप्प्यात राजकारणात प्रस्थापित झालेल्या जातीसमूहांमध्ये हितसंबंधाचा संघर्ष अंतर्गत पातळीवर मोठ्या प्रमाणात पूढे आला त्यातून प्रस्थापित जातीसमूहातील गट आपले राजकीय बस्तान प्रस्थापित करण्याकरीता इतर जातीसमूहांचा आधार घेण्याची प्रक्रिया सुरु झाली. दरम्यानच्या काळात नव्याने जागृत झालेल्या जातीसमुहांनी ही राजकीय सत्ता स्पर्धेत उडी घेतली. त्यामुळे राजकीय संदर्भात जातीय संरचना व भूमिका अधिकाधिक जटील स्वरुप धारण करु लागली. सत्ताप्राप्ती साठी परस्पर विसंगतच नव्हे तर परस्पर विरोधी भूमिका असणाऱ्या जातीतील अंतर्गत गटभेद व इथर जातीशी सहकार्य व करार ही दुसऱ्या टप्प्याची वैशिष्ट्ये ठरली.

### ३) तिसरा टप्पा:

भारतीय राजकीय व्यवस्थेतील जात व राजकारण सहसंबंध शिक्षण प्रसार, तांत्रिक-प्रगती व नागरीकरणाच्या विस्ताराने प्रभावित झालेला दिसतो. स्थानविषयक प्रतीकात आलेल्या बदलातून या टप्प्यात-जातीय राजकारणाच्य दृष्टीने असणाऱ्या जातीय समुहांच्या जुन्या जाणिवा व निष्ठा कमकुवत बनल्या. दळणवळणाच्या संपर्क साधनात झालेली प्रचंड क्रांती समाजिक व्यवहारात व्यक्तीच्या सामाजिक संपर्कास जशी प्रभावित करुन गेली तशीच ती जाती जातील संपर्काच्या दृष्टीनेही क्रांतीकारक ठरली, त्यामुळे केवळ वरिष्ठ जाती, प्रबळ जाती या पुरते राजकीय क्षेत्राचा विचार मर्यादित राहता संपूर्ण जातव्यवस्थाच राजकारणात ओढली गेली ज्यातून भारतीय राजकारणाला वेगळे आयाम प्राप्त झाले व राजकीय सामाजीकरणाच्या कक्षाही प्रचंड प्रमाणात विस्तारल्या त्याबरोबरीनेच अपप्रवृत्तींचा ही भारतीय संसदीय व स्थानीय राजकारणात मोठ्या प्रमाणात शिरकाव झाला. सारांश, राजकीय व्यवस्था व सामाजिक व्यवस्था यांचे ऐहिकीकरण होण्यास जात व राजकारण याचे सहसंबंध या टप्प्यात उपयूक्त ठरले.

### जात व राजकारण सहसंबंध:

जात व राजकारण एकमेकांना कसे प्रभावित करतात हे प्रामुख्याने पूढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

### १) जातीव्यवस्थेचे राजकीय प्रभूत्व:

एम. एन. श्रीनिवास व अन्य समाजशास्त्रज्ञांनी जातीसंस्थांचे भारतीय राजकारणातील प्रभुत्व अधिकाधिक कसे प्रस्थापित होत आहे याचे विश्लेषण प्रामुख्याने केलेले दिसते. जातिसंस्था या पारंपरिक घटकात आधूनिक अर्थाने स्वीकारलेल्या भारतीय राजकीय व्यवस्थेच्या प्रातिनिधिक

लोकशाहीच्या प्रतिमानाने काहीह फरक पडला नाही. उलट जातीसंस्था अधिक प्रबळ झाल्या व जातीबाह्य राजकारणाचा विचार करणे अशक्य होऊन बसले आहे. असे प्रतिपादन श्रीनिवास यांचे प्रामुख्याने आढळते. यामागे भारतीय राजकारणात राजकीय पक्षांनी घेतलेली भूमिका प्रामुख्याने कारणीभूत असलेली दिसते. पं. जवाहरलाल नेहरुंचे जातविषयक विचार कितीही क्रांतीकारी वा पूरोगामी स्वरुपाचे असले तरी वास्तवात काँग्रेस पक्षाने भारतीय राजकारणात आपले धूरीतत्व प्रस्थापित करण्यासाठी व पूढील काळात ते टिकवून ठेवण्यासाठी भारतीय समाज बदलण्याचा मार्ग न अवलंबता परंपरेने चालत आलेल्या चौकटीवरच आपल्या संघटनात्मक संरचनेचे अध्यारोपण केले. भा. ल. भोळे यासंदर्भात म्हणतात की, ''हस्तक्षेपी व परिवर्तनग्रही व्युहरचनांऐवजी जूळवुन व सामावून घेण्याच्या पद्धती वापरुन जनपाठींब्याचा आपला पाया व्यापक करणे काँग्रेसने श्रेयस्कर मानले. जातीपंथ, धर्मादी परंपरेने अधिमान्यता दिलेल्या सामाजिक व्यवस्थांमध्ये पाळेमुळे असलेल्या प्रादेशिक व स्थानिक राजकीय श्रेष्ठींच्या उदयविकासाची प्रक्रिया काँग्रेसने गतिमान केली. जातिव्यवस्थेचा वर्गीय पाया कायम ठेवून त्या व्यवस्थेत जे शिखरस्थानी होते त्यांना नव्या संविधानिक संरचनामध्ये नवे पाठींबे मिळवून शिरकाव करणे त्यामुळे सोपे झाले. विचारप्रणाली व पक्षबांधणी यातून पक्षात जूट व शिथिलता आणण्याऐवजी जातधर्मादी आधारांवर उपलब्ध समुदाय भावनांचा आधार घेऊन राज्यसत्ता हाती ठेवणे काँग्रेस पक्षाने पर्याप्त मानले. काँग्रेसला धोरण व तत्व प्रणालींच्या पातळीवर आव्हान देऊ शकेल असा राजकीय पक्ष भारतीय राजकारणात दिर्घकाळ उभा राहू शकला नाही त्यामुळे हे जातीय राजकारणाचे वास्तव अधिकाधिक गडद झाले.'' राजकीय पक्षांची या जातीय राजकारणातील द्विधावस्था व्यक्त करतांना भा. ल. भोळे म्हणतात, ''लोकांची सार्वभौमत्व व्यक्त करण्याचे माध्यम असे स्वरुप निवडणूकांना प्रौढमतातून येण्याऐवजी फक्त राजकीय पक्षांचे सत्तास्पर्धेचे रणक्षेत्र होणे एवढेच निवडणूकांचे कार्य शिल्लक उरले. सामान्य मतदारांच्या भावनांना आवाहन करुन वरिष्ठ वर्गीयांचे हितसंबंध जपण्याचेच राजकारण सत्तास्पर्धेत आघाडी घेण्यासाठी राजकीय पक्षांनी सुरु ठेवले. जातीचा धिक्कार सर्वांनी एकमुखाने केला, पण निवडणूक राजकारणात पावलोपावली जातीचा आधारही त्यांच्यापैकी प्रत्येकाने बिनादिक्कत घेतला. सार्वत्रिक पौढमतामुळे एकाबाजूने सत्तायतन झालेल्या उच्चजाती राजकीय पक्षांचे नेतृत्व बळकावून पुन्हा सत्ताधारक झाल्या. राजकीय पक्ष एकमेकांवर कितीही आगपाखड करत राहिले तरी त्यांचे सुत्रधार एकाच उच्च समाजस्तरातील असल्यामुळे जनसामान्याविषयी त्यांचा दुरावा व पूर्वग्रह सारखाच असल्यामुळे त्यांचा अंतस्थ भ्रातृभाव कायमच राहिला.'' जातीअंताची भाषा बोलणाऱ्या वंचित समूहांमधून निर्माण झालेल्या परिवर्तनवादी राजकारणास सूद्धा जातीय बंध तोडता आले नाहीत हे स्पष्ट करताना भा. ल. भोळे पूढे म्हणतात, ''जाती-विशिष्ट कोणत्याच राजकीय पक्षाला जातनिरपेक्ष राजकारण करणे शक्य झाले नाही. यापैकी काही पक्ष खास दलित, शोषित, वंचितांचे असले तरीही तेही निवडणूक केंद्री राजकारणातच व्यस्त राहिल्यामुळे आर्थिक लढ्यांच्या द्वारे एका पक्षात एकत्र येणे त्यांना साध्य झाले नाही. जातिविभक्ततेतून त्यांनाही सुटता न आल्यामुळे तळागाळातल्यांची क्रांतिकारक क्षमता त्यांना संघटित करता आली नाही. सामाजिक विषमतेचे अधिष्ठान असलेली जात नष्ट झाली पाहिजे असे सर्वच तुलने म्हणत राहिले, पण ते कसे होणार याचे उत्तर त्यांच्यापाशी नाही. निवडूणक राजकारणाच्या बेरीजवजाबाकीसाठी जात वापरावीच लागते आणि ती नष्ट व्हावी असेही वाटते असा द्विधावस्थेत काही राजकीय पक्ष त्यामुळेच वापरलेले दिसतात.

### २) राजकीय व आर्थिक शक्तीप्रवाहातून जातीसंस्थेत झालेले परिवर्तनः

आंद्रे बेनी, योगेंद्रसिंग यांनी प्रामुख्याने जात व राजकारण या घटकाचा या दृष्टीने अभ्यास मांडला आहे. समकालिन विषय हे मूलतः परीवर्तनशील व प्रगतीस सहाय्यभूत ठरणाऱ्या

घटकांना पूरक आहे. या पूरकतेमूळेच पारंपारिक भारतीय समाजात प्रातिनिधिक लोकशाही, अर्थिक नियोजन, भूमिसुधार कायदे, शिक्षणाचा व तंत्रज्ञानाचा प्रसार या आधूनिक शक्तीप्रवाहांनी आमुलाग्र स्वरुपाचे बदल घडवून आणले आहेत. जातीय संबंधात अनेक क्षेत्रात लवचिकता निर्माण झाली आहे. प्रामुख्याने रोटी व बेटी व्यवहारातील लवचिकता आणि व्यावसायिक क्षेत्रातील खूलेपणा यादृष्टीने क्रांतीकारक ठरला आहे. आधूनिकीकरणाच्या वेगाने ग्रामीण भाग ही व्यापला आहे. शेती व्यवसायात प्राबल्य असणारा व सामायिक उतरंडीत मध्यम स्थानी असणारा जातीसमूह राजकीय प्राबल्याच्या दृष्टीने एक प्रभावशाली जातीसमूह म्हणून उदयास आला आहे. महाराष्ट्रातील मराठा, कर्नाटकातील लिंगायत, आंध्रप्रदेशातील रेड्डी व हरियाणातील जाट ही त्याची प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. त्यामुळे प्रचलित भारतीय समाजव्यवस्थेत वर्णव्यवस्थेवर आधारित सामाजिक प्रतिष्ठा व प्रभुत्वाच्या जागी आर्थिक व राजकीयदृष्ट्या सक्षम जातींनी आपले प्रभूत्व प्रस्थापित केले आहे. या विचारवंतांच्या मते भारतात जातीने वर्गीय स्वरुप धारण केले असून समाजात उच्चभ्रु वर्गाची नवीन जात अस्तित्वात आली आहे. एकंदरीत हा प्रवाह जात व राजकारण या यूतीचे विश्लेषण करतांना सांस्कृतिक घटकांऐवजी आर्थिक व आधूनिकतेच्या घटकांना अधिक प्राधान्य दिसतो व आधूनिकीकरणाच्या प्रक्रियेने पारंपरिक संरचना कमकूवत झाल्याची मांडणी करतो.

### ३) राजकारणाचे संस्थीकरण व जातीचे राजकीयीकरण:

प्रो. रजनी कोठारी यांनी भारतीय राजकीय व्यवस्थेत स्वातंत्र्योत्तर काळात जातीसंस्था या घटकाने विविध सामाजिक समूहांना त्यांच्या राजकीय आकांक्षांची पूर्तता करण्याची संधी प्राप्त करुन दिली आहे अशी मांडणी केली. जेथे जात हाच सामाजिक जीवनाचा प्रमुख संयोगबंध असतो तेथे राजकारण त्यातून प्रवाहीत होते. जातीचे राजकीयीकरण होणे, जात आणि राजकारण परस्परांच्या निकट येणे व त्याप्रक्रियेत दोहोतही बदल होते स्वाभाविक ठरते. समाजात निश्चित हेतू ठेवून सत्ता प्राप्तीची स्पर्धा असे राजकारणाचे ढोबळ स्वरुप असेल तर समाजात प्रचलित निष्ठावंत ते वापरुन पाठिंबा मिळवण्याचे व आपले स्थान अधिक भक्कम करण्याचे प्रयत्न संबंधित शक्तीसमूह करणे स्वाभाविक ठरते. भारतात जात आणि राजकारण यात द्विगुणीकरण कधीच नव्हते उलट येथील जातिव्यवस्था नेहमीच बदलत्या राजकारणाशी जुळवून घेण्याइतपत लवचिक होती असे दिसते. त्यामुळे रजनी कोठारी यांच्या मते आपण हा प्रश्न प्रामुख्याने जात आणि राजकारण यांना वेगळ करण्याचा नसुन त्यांच्यातील परस्पराश्रयी व द्वंदात्मक संबंध समजावून घेण्याचा आहे. या संदर्भात रजनी कोठारी म्हणतात, ''जातिव्यवस्थेच्या ज्या इहलौकिक एकात्मिक व तत्ववैचारिक बाजू आहेत त्यांनी एक प्रकृष्ट व भिन्नीभूत सांस्कृतिक पार्श्वभूमी तयार केली असून आधूनिक प्रभावांना स्वीकार करण्याच्या व मोठा विक्षेप व वितुष्ट येऊ न देता त्यांना प्रतिवाद देण्याच्या दृष्टीने ती सदैव उपयूक्त ठरली आहे, या शब्दात रजनी कोठारी जातीसंस्थेचे महत्व विशद करतात.

समकालिन संघटनांचे संरचनात्मक व तत्ववैचारिक आधार नेतृत्वाला ज्ञातिव्यवस्था उपलब्ध करते. संघटनेची प्राथमिक चौकट व अस्मितेची चौकट जनपाठींबा मिळवून देते. उलटपक्षी नेतृत्वाकडून जाती संस्थांना आर्थिक व राजकीय हेतूंसाठी संघटित करण्याचे कार्य घडून येते. स्थानिक जनमत व सत्ता वाटपाविषयीच्या प्रचलित धारणा यांचा आदर करुन पारंपरिक परिभाषेत राजकीय स्पर्धेचे अविष्करण करते त्यांना त्यादृष्टीने भाग पाडते. या दृष्टीकोनाचे समर्थक पूढे हे ही स्पष्ट करतांना दिसतात की, जातीसंस्था व राजकारण यांच्या आंतरक्रियेतून जाती नष्ट होणे किंवा त्यांची जागा नव्या कोणत्या तरी संस्थानी घेणे असे होत नाही उलट जातींचा संस्थात्मक पाया रुंदावतो. भा. ल. भोळे यादृष्टीने विश्लेषण करतांना म्हणतात, जाती

आपला जन्मसिद्ध व धार्मिक पाया संकोचून नव्या अविष्कारामधून सामाजिक व्यवस्थेचे नितिशास्त्रच बदलून टाकतात. दुसऱ्या बाजूने राजकीय संघटन व हितसंबंध अविष्करण यांचे अगदी नवनवे प्रकार राज्यव्यवस्थेत शिरुन जुन्या निष्ठांना छेद जातात. जात हा राजकारणाचा व्यावर्तक पाया ठरतच नाही, तर नव्या राजकीय अविष्कारणांचे माध्यम म्हणून जाती स्वतःला उपलब्ध करुन देतात. सामाजिक सारीकरणाची ताठ चौकट हे जातिव्यवस्थेचे स्वरुप पालटून स्पर्धा व एकात्मीकरणाचा चलनशील आधार असे नवे स्वरुप तिला लाभते. प्रारंभी प्रस्थापित जाती सत्तेच्या स्पर्धेत आघाडीवर असतात. नंतर उर्ध्वगामी जाती आपल्या दुय्यमपटावर मात करुन स्पर्धेत असतात. प्रस्थापित जातीमधील पृथगात्मता गटबाजीचे राजकारण सुरु करते. पक्षांतर्गत गट हे पारंपरिक व आधुनिक घटकांना एकत्र आणणारे व अखेर एकरुप करणारे माध्यम असते. त्यातून आर्थिक पदसोपान परंपरा, आश्रयदाते-कुळ संबंध, जातिसंघटना किंवा संघ असे नवे आधार जोडण्याची गरज निर्माण होते. जातीखेरीज अन्य घटकांचा राजकारणात प्रवेश होतो. जुन्या अस्मिता क्षीण होऊन राजकीय मूल्ये, आधुनिकीकरणातून, समाजात झालेले बदल, नवे संबंधापट व साकल्यनिकष, जुन्या निष्ठांना छेदणारा राजकीय सहभाग इत्यादीद्वारे राजकारणाचे स्वरुप बदलते.

जातिप्रभावित राजकारणाचे टप्पे प्रो. रजनी कोठारी यांनी स्पष्ट केले होते ते भा. ल. भोळे यांनी प्रभावीपणे वरील परिच्छेदातून व्यक्त केले आहेत. प्रो. रजनी कोठारी यांनी यासंदर्भात हेही स्पष्ट केले आहे की, केवळ जातीसंस्था व जमाती या राजकारणास पर्याप्त राहू शकत नाहीत. जातीसमूह जर मोठा असेल तर तो पृथगात्म असतो व लहान असेल तर त्याचे संख्याबळ अपूरे ठरते. एखाद्या विशिष्ट जातीशी अतिघसट झाल्यास इतर जाती दुरावतात, जातींचे राजकीय करण झाले म्हणजे त्या बहिर्मुख होतात. अशा रीतीने राजकारण जातीला तिच्या न राजकीय भूमिकेतून बाहेर काढते अशी मांडणी प्रो. रजनी कोठारी करुन असा निष्कर्ष काढतात की, नव्या राजकीय प्रणालीचे परंपरेत रुपांतर होते अगत्याचे असते. देशातील आधुनिकीकरणासमोर आहे आव्हान आहे ते परंपरा नष्ट करण्याचे नसून आधुनिकाचे पारंपरिकरण कसे करायचे हे आहे.

### जातीय संघटन व राजकारणः

भारतीय राजकीय व्यवस्थेत जात व राजकारण या घटकाचा अभ्यास करतांना जातीय संघटनांची राजकारणातील भूमिका अभ्यासणे एकूण आकलनाच्या दृष्टीने आवश्यक ठरते. साधारणतः प्रत्येक जातीने स्वतःचे स्थान दृढ करण्याचा करण्याचा जो प्रयत्न केला त्यातून राजकीय दृष्ट्या जातीय संघटनांची निर्मिती मोठ्या प्रमाणात घडून आलेली दिसते. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर या जातीय संघटनांची एकूण भूमिका महत्वाची ठरली, भारतीय राजकारणाच्या संदर्भात जातीय संघटनांचा अभ्यास प्रामुख्याने प्रो. रजनी कोठारी रूडाल्फ आणि रूडाल्फ, घनश्याम शहा, हार्डग्रेन या प्रमुख विचारवंतांनी केलेला दिसतो. त्यांनी जातीय संघटनांची भूमिका जातीचे ऐहिकरण राजकीयकरण व लोकशाहीकरण या अंगाने जातीय संघटना, राजकारणाचा प्रामुख्याने अभ्यास मांडलेला दिसतो. जातीय संघटना मुळे जातीय अस्मिता प्राप्त झाली व जातीचे लोकशाहीकरण सुरु झाले. या जातीय संघटना आपल्या सभासदांसाठी विविध प्रकारच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक भूमिका बजावत असतात. ग्रामपातळीतुन अधिक व्यापक पातळीवर जाती त्या क्रियाशील बनवतात. शासकीय निर्णय प्रक्रियेवर दबाव आणून विविध प्रकारच्या शासकीय व सार्वजनिक श्रेत्रातील सवलती व फायदे मिळवण्याचा प्रयत्न करतात. जातीय संघटना राजकारणात सक्रिय होण्या अगोदर त्यांचे स्वरुप साधारणतः सामाजिक स्वरुपाचे होते. जातिअंतर्गत होणारे वाद-तंटे सोडवणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट असे. न्यायपंचायती सारखे साधारण स्वरुप त्यास प्राप्त झालेले होते. मंडल

आयोगाच्या अंमलबजावणीनंतर आलेल्या राजकीय जागृतीतून या जातीय संघटनांना राजकीय स्वरुप प्राप्त झाले.

**जातीय राजकारणाचे प्रमुख अविष्कारः**

भारतीय राजकीय प्रक्रियेत जातीय राजकारणाचे अनेक अविष्कार घडून आले. परंतु त्यातील ज्या प्रमुख जातीयसमूहांनी एकूण भारतीय राजकारणास प्रभावित केले व अद्यापही करत आहेत त्या जातीय राजकारणाच्या अविष्काराचा आढावा पूढील प्रमाणे घेता येईल.

**१) प्रभुत्वशाली जात समूहाचे राजकारणः**

भारतीय राजकीय प्रक्रियांचा अभ्यास करताना जात व राजकारण यांच्या सहसंबंधात डॉ. एम. एन. श्रीनिवास यांना राज्यपातळीवरील राजकारणाचे एक वीण निदर्शनास आली त्यास श्रीनिवास यांनी डोमिनन्ट कास्ट असा शब्द प्रयोग केला यास मराठी भाषेत पारिभाषिक शब्द म्हणून प्रभुत्वशाली जात हा शब्दप्रयोग वापरला जातो. एम. एन. श्रीनिवास यांनी भारतातील जाती संदर्भात लोकसंख्येचे वितरण स्पष्ट करुन विशिष्ट प्रदेशात विशिष्ट जातीसमूह कसा एकवटलेला आहे व या जातीसमूहाने त्या प्रदेशाचे राजकीय जीवन कले व्यापले आहे हे निदर्शनास आणून दिले. महाराष्ट्रातील मराठा-कुणबी, हरियाणातील जाट, गुजरात मधील पाटिदार, कर्नाटकातील लिंगायत, राजस्थानातील गूर्जर, आंध्रप्रदेशातील रेड्डी या जाती हे प्रभूत्वशाली जात या संकल्पनेचे एका पद्धतीने स्पष्टीकरणच आहे. एम. एन. श्रीनिवास यांची प्रभुत्वशाली जात ही संकल्पना प्रा. योगेंद्रसिंह यांनी सोप्या शब्दात स्पष्ट करतांना म्हटले आहे की सामाजिक दर्जा, लोकसंख्या, शैक्षणिक प्रगती व आर्थिक-साधन संपत्तीची मालकी या घटकांवर किंवा यापैकी काही घटकांच्या आधारे ज्यावेळी जात आपले राजकीय प्रभुत्व प्रस्थापित करते तेव्हा त्यास प्रभुत्व शाली जात असे संबोधावे. श्रीनिवास यांची प्रभुत्वशाली जात ही संकल्पना महाराष्ट्राच्या राजकारणाच्या संदर्भात योगेंद्रसिंग यांनी मांडलेल्या चार निकषांच्या आधारे मांडता येईल.

**१) सामाजिक दर्जाः**

एम. एन. श्रीनिवास यांच्या मते जी जात सामाजिक उतरडींत वरच्या स्थानी असते ती जात प्रभुत्वशाली जात या संकल्पनेसाठी पात्र ठरते. या अर्थाने आपण महाराष्ट्रातील सामाजिक रचनेचा विचार केला तर ब्राम्हणां खालोखाल मराठा, जातीस सामाजिक दर्जा प्राप्त झाला आहे. शिवरायांच्या राज्याभिषेकावेळी शिवरायांचा राजस्थानातील शिसोदिया या राजपूत घराण्याशी संबंध सिद्ध करुन मराठा जाती समूहास छत्रियत्वाचा साक्षात्कार झालेला आहे. सामाजिक दर्जाच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या समाजरचनेत मराठा जातीसमूह आपले वरचे स्थान राखून असलेला दिसतो म्हणून तो प्रभूत्वशाली जात या संकल्पनेस पात्र ठरताना दिसतो.

**२) संख्या सामर्थ्यः**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने प्रातिनिधिक शासनव्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर संख्या सामर्थ्य या घटकास अनन्य साधारण महत्व आले. प्रभुत्वशाली जाती प्रभूत्वास ही संख्या सामर्थ्य हा घटक सर्वाधिक सहाय्यभूत ठरलेला दिसतो. आपल्या जातीसमूहांच्या संख्या प्राबल्याची जाणीव प्रभूत्वशाली जात निर्मितीस प्रामुख्याने कारणीभूत होत असलेली आपणास दिसते. यादृष्टीने महाराष्ट्रातील मराठा जात समूहाचा ज्यावेळी आपण संदर्भ घेतो. त्यावेळी महाराष्ट्राच्या एकूण

समाजरचनेत मराठा जातीसमूहाची लोकसंख्या ही ३२% पेक्षा अधिक आहे. संख्या सामर्थ्याच्या दृष्टीने मराठा जातीसमूहाच्या जवळपास ही पोहचू शकेल असा जातीसमूह अस्तित्वात नाही. या संख्या सामर्थ्याची पूरेपूर जाणीव महाराष्ट्रातील मराठा जातीसमूहास असल्याकारणानेच पंचायतराज पातळी पासून राज्यविधिमंडळापर्यंत सर्व राजकीय सत्तास्थानांवर मराठा जाती समूहाचे वर्चस्व प्रस्थापित झालेले आपणास दिसून येते. या अर्थानेही मराराष्ट्राच्या राजकारणासंदर्भात मराठा जाती समूह प्रभूत्वशाली जात या संकल्पनेस पात्र ठरतो.

## ३) शैक्षणिक प्रगती:

शिक्षण हा घटक समाजविकासाच्या प्रक्रियेत सर्वाधिक महत्वाचा घटक म्हणून आधूनिक काळात रुजु झाला आहे. मराठा जातीसमूहाचा सुरवातीच्या काळात शिक्षणाकडे कल कमी होता. मात्र उच्चजाती व निम्नजाती शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या जीवनमानात क्रांतिकारक बदल घडवून आणत आहे. हे मराठा जातीने अनुभवानंतर शिक्षणक्षेत्राकडे सकारात्मक दृष्टीने पहावयास सुरवात केली. राजर्षी शाहु, कर्मवीर भाऊराव पाटिल, बापूसाहेब साखुंखे, पंजाबराव देशमुख आदी शिक्षण महर्षींनी महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी जे प्रयत्न केले त्याचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे मराठा जातीसमूहास मिळाले. मराठा राजकीय धूरीणांनी शैक्षणिक संख्या स्थापण्यात ही आघाडी घेतली. त्यामुळे ब्राम्हण जाती खालोखाल मराठा जातीसमूहाचे शैक्षणिकदृष्ट्या विकासाचे स्थान प्रगतीशीलतेकडे आहे. त्यामुळे शैक्षणिक प्रगती या निकषाच्या आधारे ही मराठा जातीसमूह महाराष्ट्राच्या राजकीय व्यवस्थेत प्रभूत्व राखून आहे असे आपणास दिसते.

## ४) आर्थिक संपन्नता:

आर्थिक संपन्नता हा प्रभूत्वशाली जात या संकल्पनेतील आणखी एक महत्वाचा आधारभूत घटक मानला जातो. कसल्याही व्यक्ती व जातीसमूहाचे आर्थिक स्थान त्याचे राजकीय भवितव्य निश्चित करताना आपणास वास्तवामध्ये दिसते. यादृष्टीने उत्पादन साधनांची मालकी कुठल्या जातीसमूहाकडे आहे हे प्रभुत्वशाली जात या घटकाच्या दृष्टीने महत्वाचे ठरते. महाराष्ट्रातील उत्पादन साधनांवर म्हणजे शेतजमिनीवर सर्वाधिक मालकी ही मराठा जात समूहाचीच आहे. म्हणूनच असे म्हटले जाते की सर्वात अधिक व सर्वात सूपीक जमीन महाराष्ट्रात मराठा जातीसमूह बाळगून आहे. या जमिन मालकीच्या बळावरच ग्रामीण भागातील आपले सत्ताकेंद्र मराठा जातीसमूहाने प्रदीर्घकाळ अबाधित राखले आहे. शेतीच्या बरोबरीने सरकारी संस्था, ग्रामउद्योग, पंचायत राज संस्था, पतसंस्था या क्षेत्रात ही मराठा जातीसमूहाने, आपले वर्चस्व निर्माण केलेले दिसते. अलिकडच्या काळात व्यापसायिक क्षेत्रात मराठा जातीसमूहाने मोठ्या प्रमाणात शिरकाव केलेला दिसतो.

एकंदरीत सामाजिक दर्जा, संख्या सामर्थ्य, शैक्षणिक प्रगती व आर्थिक संपन्नता या प्रभूत्वशाली जातीच्या महत्वाच्या चार ही निकषांवर मराठा जात महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभूत्वशाली जात या निकषास पात्र ठरते. मात्र एम. एन. श्रीनिवास यांच्या मते केवळ प्रभुत्वशाली जात हे विश्लेषण मराठा जातीसमूहाच्या वर्चस्वास अपूरे ठरते. कारण इतर राज्यातील जाती प्रभुत्वाची तूलना महाराष्ट्रातील मराठा जाती प्रभुत्वाशी केली अशता मराठा जाती समूहाच्या प्रभूत्वास दिर्घ सातत्य आहे त्याबरोबरीनेच मराठा जाती समूहास इतर बहूजन जातीसमूहाकडून एक प्रकारे अधिमान्यता प्राप्त झालेले दिसते. त्याबरोबरीनेच महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या जातीसमूहाचे प्रभूत्व कायम राखण्याकरीता आपण आपसातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र आले पाहिजे ही राज्यातील जातीसमूहात क्वचितच आढळणारी बाब मराठा जातीसमूहात आढळते.

त्यामुळे एम. एन. श्रीनिवास यांच्या मते मराठा जातीच्या महाराष्ट्रातील राजकारणाच्या संदर्भातील वर्चस्वप्रभूत्वशाली जात हे विधान अपूरे ठरते त्याऐवजी या प्रभूत्वास धूरीणत्वाची जोड आहे असे म्हणणे अधिक संयुक्त ठरते.

महाराष्ट्रातील राजकारणात मराठा जातीच्या धूरीणत्वाची सुरुवात तशी १९३० च्या दशकातच सुरु झाली होती. ब्राह्मण जातीसमूहाचे सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मक्तेदारी संपूष्टात आणण्यासाठी ब्राम्हणेतर चळवळीने जी पार्श्वभूमी तयार केली त्यातून केशवराव जेथे सारखे मराठा नेतृत्व राष्ट्रीय आंदोलनाच्या मुख्य प्रवाहात स्थापित होऊन त्याने ब्राह्मण जाती वर्चस्वास शह देण्यास सुरुवात केली होती. १९६० ला संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर यशवंतराव चव्हाणांनी बेरजेचे राजकारण व बहूजनवादाजी चौकट या दोन संकल्पनांच्या सहाय्याने मराठा जाती समूहाचे महाराष्ट्राच्या राजकारणातील वर्चस्व अधिक भक्कम केले. १९६० ते १९७० हा कालखंड म्हणूनच महाराष्ट्रातील राजकारणात मराठा जाती समूहाच्या धूरीणात्वाचा सूवर्णकाळ मानला जातो. या सूवर्णकाळास उतरती कळा लागण्यास इंदिरा गांधींचे राजकीय धोरण महत्वाचे कारण ठरले. आपल्या व गांधी घराण्याच्या नेतृत्वास महाराष्ट्रातील मराठा जातीसमूहाकडूनच भविष्यात आव्हान निर्माण होऊ शकते हे इंदिरा गांधी यांच्या चाणाक्ष राजकीय व्यक्तिमत्वाने हेरले व त्यातून महाराष्ट्रातील राजकारणात मराठा जातीसमूह व मराठा नेतृत्व स्थिर स्थावर होणार नाही याची काळजी पूढच्या काळात काँग्रेस पक्ष श्रेष्ठींकडून वाहिली गेली. त्यासाठी विविध योजना आखल्या व कार्यन्वीत केल्या गेला. त्यात प्रामुख्याने मराठेत्तर नेतृत्व पूढे आणणे, निम्न व ओबीसी अल्पसंख्यांक जाती समूहांना प्राधान्य देणे, लोकाधार असणाऱ्या नेतृत्वाचे खच्चीकरण करुन दिल्लीवरुन नेतृत्व लादणे, एक व्यक्ती सतत दिर्घकाळ मुख्यमंत्री राहणार नाही याची काळजी घेणे या व अशा धोरणांमूळे महाराष्ट्रातील मराठा जाती समूहाच्या प्रभूत्वास शह देवु लागला. मराठा जाती समूहाने ब्राह्मणेतर चळवळीत इतर निम्नजातींना सोबत घेवून ब्राम्हण जातीचे वर्चस्व संपुष्टात आणले मात्र नंतरच्या काळात मराठा जात ही इतर निम्नजातीपासून फटकून वागू लागली. मराठा जातीच्या या महाजनवादी प्रवृत्तीला आव्हान देण्यासाठी  म. माधव हे सूत्र पूढे आले. महार, माळी, धनगर व वंजारी या जातीसमूहांनी एकत्र येऊन मराठा जातीसमूहास आव्हान उभे केले. त्यातच ओबीसी राजकारण, दलित समूहांचे राजकारण, शेतकरी संघटनेचे आव्हान व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने मराठा जातीसमूहाचे महाराष्ट्राच्या राजकारणातील धूरीणत्वास मर्यादित केले. असे असले तरी आजही मराराष्ट्राच्या राजकारणाचा विचार मराठा जाती समूहास बाजूला सारुन करता येऊ शकत नाही. ग्रामपातळी पासून राज्य स्तरापर्यंत मराठा जात समूह आणले राजकीय वर्चस्व अबाधित राखुन आहे. मात्र हे वर्चस्व १९६० ते १९७० च्या दशकातील निर्विवाद स्वरुपाचे वर्चस्व नाही एवढे मात्र निश्चित.

### २) निम्न जाती समूहांचे राजकारण:

दलित जाती समूहासाठी निम्न जाती समूह हा शब्द प्रयोग तेथे योजला आहे. जात आणि राजकारण यांच्यातील आंतरसंबंधाचा विचार केवळ उच्चजातीयांच्या किंवा मध्यम जातीतील अभिजनांच्या दृष्टीने करुन चालणार नाही तर निम्न व वंचित जातींच्याही अंगाने तो करावा लागेल. कारण राजकारण जातीय समीकरणांच्या खोड्यात अडकून पडणे निम्न जाती समूहांना परवडणारे नाही. त्यामुळे समकालिन स्थितीत मूलगामी स्वरुपाचे बदल घडून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. भारतीय समाजात संघर्षाचे स्वरुप दुहेरी आहे. राबवणूक करणारे व राबवले जाणारे यांच्यातील संघर्ष हा त्याचा एक पदर आहे तर जातीय दास्य व निम्न मानल्या गेलेल्या जातींची सर्वांगीण वंचितता यांच्या विरुद्धचा लढा हा दुसरा तितकाच महत्वाचा पदर या संघर्षास

आहे. त्यामुळे परंपरेने अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींच्या संदर्भात जातीय राजकारणाच्या मर्यादा स्पष्टपणे पूढे आल्या आहेत. हा जातीसमूह राजकीय दृष्ट्या सापेक्षता बराच संघटित आहे, या जातीसमूहाचा राजकीय सहभाग सार्वत्रिक नियमित व जोमदार आहे. मतदानाची टक्केवारी शासकीय योजनेचा लाभ घेण्यातही हा जातीसमूह अग्रेसर आहे. तरीही एक जातीगट म्हणून त्यांच्या परिस्थितीत लक्षणीय प्रगती मात्र झालेली दिसत नाही. छळ, हिंसाचार, असहिष्णूता व अन्याय यांना तो ग्रामीण पातळीवर मोठ्या प्रमाणात बळी पडताना दिसतो. जमीन सुधारणा कायद्याचे लाभ अद्यापही त्यांना मिळालेले नाहीत. ८०% टक्के पूर्वास्पृश्य आजही भूमीहीन शेतमजूरच आहेत. या एकूण परिस्थितीत जातीच्या पलिकडे जाणाऱ्या राजकारणाची गरज या जातीसमूहास प्रकर्षाने भासते आहे. जाती कधीच क्रांती करु शकत नाहीत अथवा राजकारणाचा कायमचा आधार ही ठरु शकत नाहीत. हे निम्नजाती समूहाच्या राजकारणातून अनुभवास येत आहे. त्यादृष्टीने भारतीय राजकारणात दलित समूहाचा विकास व समकालिन स्वरुप यांचा आढाव घेणे आवश्यक ठरते. त्याची मांडणी पूढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

### १) निम्नजातीसमूहाच्या राजकारणाचा विकासः

निम्नजातीसमूह हे भारतीय समाजरचनेतील अस्पृश्य मानले गेलेले अतिशुद्र जातीसमूह होत. या समूहासाठी भारतीय समाजकारणात वेगवेगळे शब्द वापरण्यात आले आहेत. पारंपारिकदृष्ट्या त्यांना अस्पृश्य म्हणून ओळखले जात होते. ब्रिटिशांनी त्यांच्यासाठी डिस्प्रेड क्लास असा शब्द प्रयोग केला, म. जोतीराव फुले या जातीसमूहास अतिशुद्र हा शब्द वापरत, म. गांधी हरीजन या शब्दासाठी आग्रही होते. भारतीय संविधानात या जातीसमूहासाठी अनुसूचित जाती असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही संविधानिक परिभाषेसाठी आग्रही होते. परंतु व्यवहारात या जाती समूहासाठी दलित हा शब्द मोठ्या प्रमाणात प्रचलित झाला. दलित म्हणजे मोडून पडलेला जातीसमूह असा सर्वसाधारण अर्थ होतो. मात्र भारतीय समाजकारणात दलित या शब्दाचे अनेक सोयीचे अर्थ काढले जात होते परिणामी हा शब्दप्रयोग वापरण्यावर कायद्याने मनाई करण्यात आली आहे.

दलित वा निम्न जाती समूहाच्या राजकारणाचा विचार करतांना स्वातंत्र्यपूर्व काळातील या निम्न जातीसमूहाच्या जागृतीपर्यंत मागोवा घेणे आवश्यक ठरते. ब्रिटीशांनी इंग्रजी शिक्षणाची संधी अस्पृश्यांसाठी खुली केल्यानंतर हजारो वर्ष ज्ञानबंदीत असलेल्या या दलितसमूहांच्या प्रतिभा अशा अनेक अर्थाने फुलुन आल्या. त्यांना आपल्या गुलामीची, मागासलेपणाची जाणीव होऊ लागली. या गुलामीतुन आपण वर यायला हवे व यासाठी आपल्या जातीसमूहाने हजारो वर्ष बाळगलेल्या अनिष्ट बाबींना नाकारावयास हवे या भावनेतुन स्वसुधाराची चळवळ सुरु झाली. त्यांचे नेतृत्व प्रामुख्याने बाबा वलंगकर यांनी केले. दलित राजकारणाच्या विकासाच्या दृष्टीने हा स्वभानाचा कालखंड पहीला टप्पा मानावा लागेल.

दलित राजकारणाचा दुसरा टप्पा हा विद्रोही स्वरुपात व्यक्त झाला. आपल्या गुलामगिरीला हिंदु धर्माची विषमताधिष्ठीत समाज रचना, धर्मग्रंथ कारणीभूत आहेत. त्यामुळे जोपर्यंत त्यात सुधारणा होत नाही किंवा ते आपण नाकारत नाहीत तोपर्यंत आपल्या जाती समूहाचा अभ्यूदय होवु शकणार नाही या जाणीवेतून निम्न जातीसमूह विद्रोही बनला. म. जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज यांचे समाज प्रबोधनाचे व समाज सुधारणांचे क्रांतीकार्य त्यास पूरक ठरले व हा निम्न जातीसमूह आपल्या अधिकारांच्या प्राप्तीसाठी अधिक आक्रमक व अधिक जागृत होऊन आंदोलनाच्या मार्गाने संघर्षासाठी तत्पर व क्रियाशील बनला.

निम्न जातीसमूहाचा तिसरा टप्पा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वापासून सुरु झाला. विद्रोहाबरोबरच निम्न जातीसमूहांनी राजकीय शक्ती बनून पूढे येण्याची गरज बाबासाहेबांनी व्यक्ती केली. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने आपल्या सामाजिक परिवर्तनाच्या उद्दिष्टा पर्यंत पोहचता येईल असा विश्वास बाबासाहेबांनी या निम्न जातीय समूहामध्ये निर्माण करुन सामाजिक लोकशाही प्रस्थापनेचे आंदोलन अधिक तीव्र केले. एका बाजूने महाड चवदार तळे सत्याग्रह, काळाराम मंदीर सत्याग्रह यासारखे सामाजिक आंदोलनाचे मार्ग पत्करुन दुसऱ्या बाजूने शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, मजूर पक्ष, गोलमेज परिषदेतील सहभाग यामाध्यमातून निम्न जातीच्या राजकीय हक्क व अधिकारांसाठी संघर्ष जारी ठेवला. परिणामी निम्नजाती समूह राजकीय दृष्ट्या जागृत झाला. मोक्याच्या व मानांच्या जागा पकडा व राज्यकर्ते जमात बना हा बाबासाहेबांचा यादृष्टीने मूल्यमंत्र होता. हा मुलमंत्र प्रत्यक्षात आणण्यासाठी अस्पृष्यजातीसमूहांबरोबरच इतर मागास जातीसमूहास ही जोडण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्या ह्यातीमध्ये या कार्यास यश मिळु शकले नाही. काँग्रेस पक्षास पर्याय देऊ शकेल असा सर्व जातीसमूहांचा रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष कार्यन्वीत करण्याचे स्वप्न अपूरेच राहिले असे असले तरी या निम्न जातीसमूहास राजकीय दृष्ट्या गतिमान करण्याचे महान कार्य बाबासाहेबांनी पार पाडले व समस्त भारतीय राजकारणास प्रभावित करण्यासाठी हा निम्न जाती समूह कार्यन्वीत झाला.

### २) निम्न जातीसमूहाच्या राजकारणात सुंलगत मांडणीचा अभाव:

समकालिन निम्नजातीसमूहाच्या राजकारणाचा अभ्यास करताना निम्नजातीसमूहाच्या राजकारणात सुसंगतीची वाणवा आढळते असे अभ्यासकांचे अवलोकन आहे. या सुसंगतीच्या अभावाचे एक महत्वाचे कारण म्हणजे या निम्नजाती समूहास चैतन्यदायी व स्थिर संदर्भ देणारी सामाजिक स्थांनाचा विलय झाला आहे. याचे उत्तम उदाहरण मुंबईतील मिल कामगारांच्या विस्थापनेचे देता येईल. हा कामगार वर्ग पुरोगामी विचारांचा वाहक होता मात्र हा वर्गच विस्थापित होऊन असंघटित क्षेत्रात फेकल्या गेल्यामुळे पुरोगामी विचारांची मांडणी करणारा वर्ग सैरभैर झाला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने शोषण आणि वर्चस्वाची प्रक्रिया अधिक अगम्य स्वरुपात पूढे आली. या निनावीपणाच्या प्रभावातून शत्रु अदृष्य झाला आहे. याउलट ग्रामीण भागात मात्र यादृष्टीने स्पष्टता अधिक ठळकपणे पूढे येते. त्यामुळे वर्ग, जात व लिंगभावावर आदारीत शोषणव्यवस्थेची संगतवार मांडणी तेथे शक्य आहे. त्यामुळेच ग्रामीण क्षेत्रात संसदीय व संसदाबाह्य अशा दोन्ही आघाड्यांवर संघर्ष व विरोध प्रत्ययास येतो. बिहार व आंध्रप्रदेशात नक्षलवादी संघटनांनी दलित जातीसमूहाचे केलेले संघटन व तामिळनाडू मध्ये ओबीसी जातीसमूहास निम्नजातीसमूहाने केलेला विरोध याचे उत्तम उदाहरण होय. या संदर्भात डॉ. गोपाळ गुरु म्हणतात, सुसंगत दलित राजकारणाची शक्यता तथा नेतृत्वाच्या अथवा जुन्या नेतृत्वाच्या संघटित अभिव्यक्ती देण्याच्या अभावामुळे स्वायत्त व स्थानिक स्वरुपाच्या राहिल्या आहेत. मुख्य प्रवाहातील दलित नेतृत्व बेगडी मुद्यांवर लक्ष केंद्रित करुन त्याचे राजकीयीकरण करत आहे. तर सैद्धांतिक पातळीवर राजकारणाच्या अस्सलपणाच्या कल्पनेचे स्तवन करण्यात दंग आहेत. ही राजकीय पोकळी बिगर शासकीय संस्थांनी भरुन काढली आहे. या संस्था सुसंगत राजकीय विचार व कृती पासून दलितांना परावृत्त करण्यास जबाबदार आहेत. बिगर शासकीय संस्थांमुळे दलित राजकीय पक्षांनी उपलब्ध केले त्या सक्रिय राजकीय जीवनापासून देशातील जनसामान्य हळुहळु दूर जात आहेत.

## ३) निम्न जातीसमूहाचे अराजकीयीकरण:

निम्नजातीसमूहांचे राजकीय पक्ष राज्य संपादन करण्याच्या दृष्टीने निम्नजातीसमूहास कृती संघटित करण्याची आपली ऐतिहासिक भूमिका हरवुन बसले आहेत. यात विशेष बाब म्हणजे हे राजकीय पक्ष कार्यकर्ते व पक्ष सदस्यांसाठी उपजिविकेचे साधन मात्र बनले आहेत. त्यामुळे निम्न जाती समूहांच्या राजकीय पक्षांकडे प्रस्थापित पक्षांच्या उपव्यवस्था बनुन राहणे अथवा आघाडीच्या राजकारणात हिस्सेदारी मिळविणे एवढेचपर्याय उपलब्ध राहिले आहेत. त्यामुळे मुक्तिदायी राजकारणाची दृष्टी दलित राजकारण हरवून बसले आहे. दलित जातीसमूहाच्या राजकारणाचे अराजकीयकरण स्पष्ट करताना प्रा. गोपाळ गुरू म्हणतात, "दलित पक्षांचे हे अराजकीयीकरण एक प्रकारच्या किफायतशीर बहुलनेतुन स्पष्ट झाले आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी किंवा राज्य पातळीवर आघाडी सरकार या प्रकारच्या बहुलतावादाला सामावून घेत त्यातुन एक गुळगुळीत रुप देऊ पाहतात. मतभेदांची धार बोथट करत स्थिरतेला आव्हान देणारे मतभेद संपवतात, आश्रयाने या बहुलतावादाचा अतिशय प्रभावीपणे वापर करुन देशभरात आपले स्थान अधिक भक्कम करुन निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. सुरुवातीच्या काळात त्यांनी आपल्या टोकदार भगव्या भूमिका काहीशा गुळगुळीत केल्या असल्या तरी आता त्याच भूमिका आपल्या अधिक धारदारपणे प्रत्यक्षात राबवताना दिसतो आहे. कारण या बहुलतवादाच्या मागे भाजपाचे धोरण हे लोकशाहीत्मक सहमती मिळवते हे नव्हते तर राजकीय सत्ता मिळवणे व टिकवणे या व्यवहनीतीचा तो एक भाग होता. त्यामुळे भाजपाचा तथा कथित बहुलतावाद हा वरकरणी केवळ देखावा होता. त्याआधारे सांस्कृतिक केंद्रावर ताबा मिळवून स्वतःची छुपी प्रभुत्ववादी कार्यक्रमपत्रिका भाजपाला राबवायची होती. या बहुलतावादाचा वापर भाजपाने राजकीयदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या आपले स्थान उंचावण्यासाठी परिणामकारकपणे केला."

## ३) नव दलित राजकारणाचे स्वरुप:

दलित राजकारणातील एक प्रवाह अलिकडच्या काळात पूढे येतो आहे. दलित राजकारण हे प्रतिशक्ती वा सत्ता स्वरुपाच्या ऐवजी विरोधक स्वरुपाचे असावे अशी मांडणी करतो आहे. हा प्रवाह दलित जातीसमूहांना जहाल राजकारण व सत्ता या घटकाविषयी तिरस्स्त्र असल्याचे निदर्शनास आणून देताना दिसतो. जात, धर्म, नितीतत्वे, न्याय कुटुंब, साहित्य यासारख्या घटकांकडे नव दलित राजकारण प्रतिष्ठा आणि सत्तेच्या संस्था म्हणून पाहते. या नव दलित राजकारणाची भूमिका व मर्यादा यांचे विश्लेषण करतांना गोपाळ गुरु लिहितात, "दलित एका बाजुने मानवी अभिकरणांना सक्षम न बनवणारी आणि दुसऱ्या बाजुने सत्तेला समग्रतेने आव्हान देण्याची भाषा बोलणारी आंबेडकरांची भूमिका असा दोन्हीं गोष्टी नाकारणारी भूमिका घेऊ शकतील का? संस्थात्मक सत्तेभोवती कोणत्याही प्रकारचे शक्तीचे संघटन टाळणे या स्वरुपातील राजकारणाचे आकलन व्यापक प्रमाणावर राजकीय संरचनेची दोन हात करण्याची शक्यता नाहीसे करते. या राजकीय संरचनांचे स्थानिक सत्ता केंद्राशी प्रतिकात्मक संबंध प्रस्थापित झालेले असतात. मात्र, नव दलित राजकारणाने हा दुवा ओळखण्याचे टाळले आहे. हे आकलन त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या व्यापक आंदोलनात्मक राजकारणाची शक्यता नाकारते." नव दलित राजकारण या विशिष्ट प्रकारच्या आंदोलनात्मक राजकारणाबाबत आंधळे असण्यामुळे सत्ता विखूरलेली नाही तर परस्परसंबंधी असल्याचे मानते, अशा सर्व परस्परावलंबी सत्ता संरचनावर हल्ला चढवण्याची मागणी करते.

## ४) निवडणूकांचे राजकारण व निम्नजातीसमूहः

निवडणूकांचे राजकारण भारतीय राजकीय प्रक्रियेतील एक महत्वाची धारणा म्हणून पूढे आली आहे. राजकीय पक्षांच्या राजकीय आकांक्षाच्या परिपूर्तीचे व अविष्काराचे ते प्रभावी माध्यम बनले आहे. या निवडणूकीच्या राजकारणातुन निम्न जातीसमुह व वंचित समूहांपूढे मोठ्या प्रमाणात आव्हाने निर्माण झालेली दिसतात. एका बाजूने सातत्याने निवडणुकांचे आयोजन होते हे निम्न जातीसमुहाच्या राजकीय निकालासाठी उपयुक्त आहे. अशी कांशीराम व बहुजन समाज पक्षाची भूमिका होती तर दुसऱ्या बाजुने निवडणुकीच्या राजकारणाने निवडणुकांचे लोकशाही व धर्मनिरपेक्ष स्वरुप मोठ्या प्रमाणात प्रश्नांकित करुन वंचित दलित जातीसमूहांच्या राजकीय सहभागावर मर्यादा आणलेल्या दिसतात. त्यामुळे निवडणुकांचे राजकारण हे निम्नजातीसमुहांचे खच्चीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयोगात आणले जात असल्याचे प्रत्ययास येते. लोकशाही संस्कृती व राजकारणाला धर्मनिरपेक्ष संदर्भ देणाऱ्या निवडणुका प्रत्यक्षात मात्र उच्च जाती, प्रसारमाध्यमांच्या सहाय्याने विरोधी निम्नमातीसमुहाची प्रतिमा मलिन करण्यासाठी त्याचा वापर करताना दिसतात. लालुप्रसाद यादव, रामदास आठवले, यांची जनमाणसात निर्माण केलेली प्रतिमा ही सांस्कृतिक दुय्यमत्वाचेच प्रतिक आहे आणि हे सांस्कृतिक दुय्यमत्व निवडणुकीच्या आकडेवारीच्या मोठ्या ढिगाऱ्याखाली दडपले जाते.

## ५) निम्नजाती समुहाच्या राजकीय अस्सलपणाचे मूल्यमापनः

निम्न जातीसमुहाच्या राजकारणात अस्सलपणाची भूमिका अलिकडच्या काळात चर्चाविश्वाचा एक महत्वाचा भाग बनलेली आहे. या संकल्पनेची मांडणी व मर्यादा प्रा. गोपाळ गुरूंनी मांडताना असे लिहीले आहे की, "अस्सलपणा दुसऱ्यांशी असणाऱ्या विरोधी भाषातुन स्वजन मिळवतो. तो राजकीय विषयांना महत्वाचे मानतो. तो या राजकीय विषयांच्या उद्‌गाराला नैसर्गिक मानतो कृत्रिम नाही. पूर्ण अलगतावादाची हमी अस्सलपणा देतो." या दलित राजकारणांच्या अस्सलपणाच्या मर्यादा स्पष्ट करताना प्रा. गोपाल गुरू म्हणतात, "एक यातुन विशिष्ट प्रकारच्याच दलित राजकारणावर भर दिला जात असल्याने मुक्तिदायी राजकारणाची कोती दृष्टी विकसित होते. सामाजिक आणि वैचारिक दृष्ट्या असे राजकारण आंधळे राहते. ज्यासाठी स्थानिक पातळीवर अस्सल गट मागण्या लावुन धरत आहेत. त्याचसाठी सामाजिक/वैचारिक दरवाजे उघडण्याची ऐतिहासिक गरज ते ओळखु शकत नाहीत. अस्सलपणाच्या आग्रहातुन इतर पूरोगामी राजकीय घटकांशी क्रांतिकारी दुवा प्रस्थापित होऊ शकत नाही. याची हानी दलित राजकारणाला दोन पातळ्यांवर सहन करावी लागते. त्यांची पूर्ण सापेक्षतेची चौकट दलितांची राजकीय उर्जा स्थानिक पातळीवरच अडकवून ठेवते. दोन या नव्या प्रकारच्या राजकारणात कोणताही मोठा राजकीय प्रकल्प उभे करण्याचे नियोजन व क्षमता असल्याने विरोधक आरामात असतात."

## ६) निम्न जाती समूहांचे नैतिक धुरीणत्वः

संकुचित निवडणूकीच्या राजकारणात अडकुन पडलेल्या मूल्यांताक राजकारणास नेतृत्व देण्याचे ऐतिहासिक कार्य निम्न जातीसमूह पार पाडतील का ? या प्रश्नाचे उत्तर राजकीय परिस्थितीवर मोठ्या प्रमाणात आधारलेले दिसते. सध्याची राजकीय परिस्थिती सर्व पिडीतांच्या वतीने बोलण्याचा निम्नजाती समूहाचा दावा वैध मानत नाही. अशा प्रकारचा दावा नैतिक धुरीणत्वाच्या वतीने होऊ शकतो. अशा प्रकारच्या धूरीणत्वास प्रस्थापित व समावेशनाच्या राजकारणापासून धोका अधिक असतो. महाराष्ट्रात निम्नजातीसमूहाचे उभे राणारे समाज परिवर्तनाचे राजकारण

प्रबळ जातीसमूह असणाऱ्या मराठा धूरीणत्वाने यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणातुन कसे मोडीत काढले हा अनुभव यादृष्टीने बोलका आहे. महाराष्ट्रातील निम्नजातीसमूहांच्या नेत्यांकडून जे संधी साधु राजकारण केले गेले. त्यामुळे दलित जाती समूहाचा राजकीय अस्सलपणा व स्वायत्ततेस मोठा धक्का बसला. भारतीय जनता पक्षाने तर सध्याच्या काळात निम्नजातीसमूहाचे प्रेरणास्थान असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सांस्कृतिक प्रतिकारावरच आपला दावा अधिक पक्का करण्याची मोहीम हाती घेतली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या प्रातःस्मरणीय प्रार्थनेत बाबासाहेबांना स्थान देऊन बाबासाहेबांच्या प्रतिमेचे भगवेकरण व ब्राह्मणीकरण करण्याची प्रक्रिया वेगवान केली आहे. या संदर्भात दलित जातीसमुहाच्या राजकीय मर्यादांचे विश्लेषण करताना प्रा. गोपाळ गुरू म्हणतात, "नवनव्या दलित पूढाकारांना आपल्या पंखाखाली घेणाऱ्या मुख्य प्रवाहातील राजकारणापासून स्वायत्त राहण्यासाठी प्रयत्न आंबेडकरांनंतर दलित राजकारणाने केलेला नाही. त्यामुळे दलित राजकारणाचा इतिहास म्हणजे अप्रस्तुततेमध्ये होणारे अपरंपारिक! या सातत्याच्या दुय्यमत्वामुळे दलितांचे असे स्वतंत्र राजकारण उभे राहिलेले नाही, ना त्यांना दिर्घकालीन मुक्तिदायी राजकारणातील प्रश्न हाताळता आले आहेत. देशातील दलित राजकारणाची कार्यक्रम पत्रिका वर्चस्वशाली शक्तींनीच ठरवलेली दिसते. आणि दलितांनी नेहमीच विविध पक्षांच्या जाहीरनाम्यात पाहूणे कलाकार म्हणून हजेरी लावलेली दिसते. या सर्व परिस्थितीमुळे निम्न जातीसमूह त्यांना भेडसवणाऱ्या वर्चस्वाखाली संरचनांनाही प्रश्नांकित करु शकत नाही. यातुन मार्ग काढण्यासाठी काही नेते मुक्तीदायी राजकारणाचा ना तर काही नेते स्वयंसेवी संस्थाशी जोडून घेण्याचा पर्याय आंदोलनाना दिसतात."

### ७) संधीसाधु राजकारणाचे दुष्टचक्र:

निम्नजातीसमूह आपल्या राजकीय पक्षांवर कुठल्याही प्रकारचा दबाव टाकत नाही. बिनशर्त बाठींबा असल्याकारणाने या निम्नजातीसमूहास राजकीय पक्ष व नेतृत्व एक प्रकारे गृहीत धरतात. निम्नजातीय सामान्य जनता आपल्या नेत्यांना व सुशिक्षित समूह कर्यकत्यांना पाठींबा व्यक्त करुन राजकारणापासून अलिप्त होते. त्यातुन निम्नजाती समूहाच्या राजकारणात एक दुष्टचक्र जन्मास येताना दिसते आहे. या दुष्टचक्रात हे निम्नजातीसमूहाचे राजकारण अडकलेले आहे. हे दुष्टचक्र हा जातीसमूह का तोडू शकत नाही. याची मिमांसा करताना प्रा. गोपाळ गुरु लिहीतात, "दलित राजकारणाचे सामाजिक आधार वेगवेगळे आहेत. परस्पर विरोधी घटकांमुळे एकात्म असे दलित राजकारण उभे करत येत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे दलित जातीं समूहातुन पूढे आलेला मध्यमवर्ग होय. खरे तर शिक्षणाचे फायदे घेतलेल्या या पहिल्या पिढीने बाबासाहेबांना अपेक्षित समाज परीवर्तनाच्या लढ्याचे नेतृत्व करावयास हवे होते. परंतु आज वर्ग हा या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यातील एक महत्वाचा अडथळा म्हणून पूढे आला आहे. या मध्यमवर्गाचे हे महाजनवादी स्वरुप प्रचलित निम्नजाती समूहांच्या राजकारणाचे तिटकारा करते व आपले कौटुंबिक सदस्य रोजगाराच्या दृष्टीने कसे स्थिर होतील व राजकारणापासून कसे कोसो दूर आहेत हे सांगण्यात धन्यता मानते. दलित वर्गाचे नैतिक पातळीवरील कुपोषण या दुष्टचक्राचे एक महत्वाचे कारण आहे.

### ८) निम्नजातीसमूह नेतृत्वाचे साचलेपण:

निम्नजातीसमूहाच्या राजकारणात नेतृत्वाचे साचलेपण हा घटक या जातीसमूहाच्या प्रभावास मर्यादा पडण्याचे महत्वाचे कारण ठरताना दिसतो आहे. अनेक राज्यांमध्ये सर्वसामान्य जनतेला नको असणारे नेतृत्व ठाण मांडून बसलेले दिसते. नव्याने उभारी घेणाऱ्या नेतृत्वास जाणीवपूर्वक

बाजुला काढले जाते, त्याचे खच्चीकरण केले जाते हा सार्वगिण अनुभव या जातीसमूहाच्या राजकारणात प्रत्ययास येतो आहे. याची कारणमिमांसा करताना गोपाल गुरू लिहीतात, "एक या नेत्यांनी सत्तेत टिकता न आल्यास त्यावेळी उपयोगी ठरु शकतील अशी नवी सत्ताकेंद्रे निर्माण केलेली नाहीत. दुय्यम सत्ता केंद्रामुळे ते वर्चस्वाखाली राजकावरणावर पूर्णतः अवलंबुन असतात व दुसरे म्हणजे दुसऱ्या फळीचे नेते अशा नेत्यांच्या विरोधात बंड करत नाहीत. तसेच नेतेही निवडणूकांच्यावेळी त्यांनी केलेल्या आघाड्यातुन जास्तीत जास्त फायदे उठवणाऱ्या कार्यकत्यांकडे दुर्लक्ष करतात. दलित कार्यकत्यांचे नैतिकदृष्ट्या अस्थिर विरोधाभास पूर्ण राजकीय वर्तन दलित नेत्यांकडून खपवून घेतले जाते." याशिवाय दलित नेतृत्वास साचलेपण येण्यास दलित जाती समूहाची हतबलता, दलित पुरुषांमधील सामाजिक दृष्ट्या असणारे प्रतिभामीत्व व दलित नेतृत्वाने निर्माण केलेला निष्ठावंताचा समूह हे घटक प्रामुख्याने कारणीभूत असलेले प्रत्ययास येतात.

### १) बाबासाहेबांचे वस्तुकरण व स्थिर प्रतिमा:

निम्नजातीसमूहाचे राजकारण हे भावनाशीलतेमध्ये दिर्घकाळ अडकून राहिले. ही निम्नजातीसमूहाच्या एकूण अभ्युदयाच्या प्रक्रिये संदर्भात खरे तर सर्वात घातक बाब आहे. पुतळ्या भोवतीची चळवळ अत्याचार टू अत्याचार व इलेक्शन टु इलेक्शन या जागृतीच्या काही ठराविक सारख्या घटनांमुळे या जातीसमूहांचे वैचारिक भरण व प्रबोधनाची पातळी फारशी उंचावु शकली नाही. या सर्व परिस्थितीतुन हा निम्नजातीसमूह बाहेर येऊ नये यासाठी या जातीसमूहातील धूरीणांनीच काळजी वाहिलेली दिसते. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची एक स्थिर प्रतिमा व वस्तु करणाची प्रक्रिया अतिशय घातक पद्धतीने त्या धुरीणांनी राबवली. बाबासाहेबच या जगातील सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास समर्थ आहेत. त्यामुळ इतर काही वाचण्याची समजून घेण्याची विचारकरण्याची गरज नाही अशी भावना निर्माण करुन इतर मुक्तीदायी लेखन वाचण्याची सर्वसामान्यांची भूक मारली गेली व दुसऱ्या बाजुने बाबासाहेबांच्या विचारांचे मुलगामी आकलन करुन समग्र सकस विचारांचा वारसा उभा करण्याऐवजी बाबासाहेबांच्या एकूण विचारातीत काही टाळ्या मिळवणारी सुटी वाक्य काढण्यात आली व त्यालाच आंबेडकरवाद या नावाने प्रस्तूत केले गेले. त्यामुळे तत्वज्ञानात्मक आधारावर जशी चळवळीची पायाभरणी भक्कम होण्याची गरज होती ती प्रत्यक्षात होऊ शकली नाही. यातून वैयक्तिक हितास सामाजिक हिताची चूल पांघरण्यात आली. एखाद्या व्यक्तीस मंत्रिपद मिळते म्हणजे समस्त समाजास न्याय मिळाल्याची सोयीस्कर प्रतिमा करणे हे या व्युहनीतीचाच एक भाग असल्याचे दिसते. हे सर्व बाबासाहेबांना अपेक्षित मुक्तीदायी, परिवर्तनवादी राजकारणांविरोधी आहे. बाबासाहेबांचे सामाजिक लोकशाहीचे स्वप्न पायदळी तुडवणे आहे ही जाणीव जेवढ्या लवकर या निम्नजातीसमूहास येईल तेवढ्या लवकर हा समूह परिवर्तनाच्या अधिक नजिक जाईल हे निश्चित.

### २) ओबीसी जातीसमूहाचे राजकारण:

भारतीय राजकीय प्रक्रियेत समकालिन संदर्भात सर्वात प्रभावी समाजसमूह म्हणून ओबीसी जातीसमूहाचा संदर्भ घेतला जातो. स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय स्तरापर्यंत ओबीसी जातीसमूहाने भारतीय राजकीय प्रक्रियेस सर्वार्थाने प्रभावीत केलेले दिसते. भारतीय समाजरचनेत ब्राह्मण क्षत्रिया खालोखाल व पूर्वास्पृश्यांपेक्षा वरचे स्थान प्राप्त झाले. त्या या जात समूहाची राजकीय जाणीव दिर्घकाळ निद्रीस्त स्वरुपात होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात अनुसूचित जाती व जमातीं समवेत इतर मागासवर्गीच्या हक्कांनाही

संविधानिक दर्जा देण्याचा प्रयत्न केला परंतु ओबीसी जातीसमूहाची निश्चित ओळख प्रस्थापित झालेली नसल्यामुळे त्यांना ओबीसी जातीसमूहास संविधानिक आरक्षण बहाल करता आले नाही. मात्र भारतीय संविधानाच्या कलम ३५० मध्ये ओबीसी जातीसमूहाच्या विकासासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची तरतूद करण्यात आली. याच तरतुदीचा आधार घेऊन नंतर ओबीसी जातीसमुहाची निश्चित ओळख तयार करण्यासाठी कालेलकर आयोग व पूढे मंडल आयोगाची स्थापना करण्यात आली. दरम्यानच्या काळात भारतीय राजकारण विस्तारत असताना १९६७ पासून या ओबीसी जातीसमूहाने सक्रिय होण्यास सुरवात केली होती. भारतीय क्रांती दल, लोकदल, जनता पक्ष, जनता दल अशा विविध राजकीय पक्षातुन या ओबीसी जातीसमूहांनी आपली राजकीय शक्ती व्यक्त करावयास सुरवात केली. ही प्रतिक्रीया प्रामुख्याने काँग्रेस पक्षातील वरीष्ठ जातींच्या प्रभुत्व विरोधी होती. या दरम्यानच्या काळात वरीष्ठ जातीअंतर्गत आर्थिक स्तरीकरण झपाट्याने स्पष्ट व प्रत्ययकारी होऊ लागले होते. बडे शेतकरी तसेच सहकारातुन समृद्ध झालेले ग्रामीण श्रेष्ठी आणि सामान्य अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या हितसंबंधामधील अंतर्विरोध तीव्र स्वरुपात व्यक्त होत होता. या पार्श्वभूमीवर जातियदृष्यासाठी आपला वापर करुन घेतात अशी भावना ओबीसी जातीसमूहामध्ये बळावली. विकासाची आंदोलने करताना आपणास सोबत घेणाऱ्या वरचढ जाती विकासाचे लाभ वाटताना मात्र आपल्याला कटाक्षाने दूर ठेवतात हे ओबीसी जातीसमूहाच्या अनुभवास येऊन लागले. कुळे म्हणून वाट्यास आलेली परावलंबी अवस्था नष्ट करण्याची प्रबळ रुद्रशक्ती, हरित क्रांतीतून प्राप्त झालेले काहीसे यश, व शेतीक्षेत्रात समाजवादी स्वरुपाचे बदल घडवून आणण्यात राजसत्तेला आलेले संपूर्ण अपयश या सर्वांमुळे ओबीसी जातीसमूहात एक व्यापारभिमूख दृष्टी व भांडवलशाही वृत्ती असलेला अभिजनवर्ग निर्माण झाला होता. या वर्गास जातीच्या भिंती ओलांडून जाणाऱ्या व प्रादेशिक निष्ठांना छेदणाऱ्या समान आर्थिक हितसंबंधाची जाणीव झाली आणि त्याच्या राजकीय आकांक्षाही प्रबळ झाल्या. उत्तर प्रदेशात ऐंशीच्या दशका अखेरीस करणसिंग हे या बदलाचे प्रमुख शिल्पकार ठरले. कर्नाटकमध्ये हे कार्य देवराज, रामकृष्ण हेगडे यांनी तर बिहार मध्ये कर्पूरी ठाकूर यांनी या कार्यास गती दिली. परंतु या नेतृत्वास हे राजकारण फार पूढे नेता आले नाही कारण ओबीसी जातीसमूह म्हणून स्वतंत्र अस्मिता अद्याप निर्माण झाली नव्हती. ती पूढच्या काळात मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर मंडल विरुद्ध कंमडंल राजकारणाने आकारास आली व भारतीय राजकीय प्रक्रियेच्या अवकाशात ओबीसी जातीसमूहाच्या राजकारणाचा झपाट्याने विस्तार झाला.

ओबीसी जातीसमूह स्वातंत्र्योत्तर काळातही दिर्घकाळ सतर्क नव्हता. या समूहात जागृती आणण्याचे महत्वाचे कार्य मंडल आयोगाच्या अंमलबजावणी नंतर झालेल्या राजकारणाने केले. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीस सहज मान्यता मिळाली असती तर कदाचित ओबीसी जातीसमूहात अस्मितेची एवढी घुसळण झाली नसती. ओबीसी च्या अधिकारांविरोधात उच्चजातीसमूहांकडून जे आंदोलन उभे राहिले व देशाची जी मंडल विरुद्ध कंमडल अशी विभागणी झाली त्यातुन खऱ्या अर्थाने ओबीसी ही जातीय अस्मिता समूह स्वरुपात विकसित झाली. ओबीसी जातीसमूहाची ही शक्ती आपल्या राजकीय आकांक्षापूर्तीसाठी वापरण्याकरीता प्रस्थापित राजकीय पक्षांनी सापळे रचले त्याचा यादृष्टीने आढावा घेणे गरजेचे ठरते.

### १) हिंदुत्वाचा सापळा:

ओबीसी जातीसमूहाची संघटीत प्रतिक्रिया ही मूलतः काँग्रेस मधील वरीष्ठ जातीसमूहाच्या वर्चस्वाविरुद्धचीच प्रतिक्रिया होती. त्यामुळे ओबीसी जातीसमूहात आपल्याकडे खेचण्यात भाजपाला फारसे कष्ट पडले नाहीत. ओबीसी जातीसमूहाच्या आकर्षणास भाजपाने हिंदुत्वाची

जोड देवून ओबीसी जातीसमूहांच्या अस्मितेस आपल्या छत्रछायाखाली घेण्यासाठी हिंदुत्वांचा सापळा रचलेला दिसतो. बहुतेक सर्व ओबीसी नेते हे हिंदुत्वाच्या पोटातुन बाहेर पडले आहेत नि पडत आहेत हे वास्तव आजही आपणास स्पष्टपणे दिसते. उमा भारती, कल्याणकारींना, नरेंद्र मोदी, शिवराजसिंह चौहान ही त्याची प्रतिनिधिक उदाहरणे पूरेशी आहेत. महाराष्ट्रात ही गोपीनाथ मुंडे, छगन भूजबळ या ओबीसी नेत्यांचा मुळ पिंड हिंदुत्वाचाच आहे. आज राष्ट्रीय स्तरावर भाजपाला जे मोठे यश प्राप्त झाले आहे व होते आहे याच प्रमुख कारण हिंदुत्व घेऊन लढणारे ओबीसी हेच आहेत. बहुतांशी राज्यामध्ये भाजपाचा आधार ओबीसी जातीसमूहच आहे. भाजपाने या करीता ओबीसी मतदारास सर्वप्रथम आकर्षित केले. तो वळवताना त्यांनी काँग्रेसी परंपरेप्रमाणे नेता वरुन लादला नाही. भाजपाने ओबीसींचा नेता ओबीसी जातीतच जन्माला घालण्याचे धोरण प्रभावीपणे राबवले. ओबीसी जातीतच नेता जन्माला घालायचा, त्यालाच मोठ करायचं, त्याच्याच हातात सत्ता द्यायची व त्याच्या कडूनच आपला सर्व अजेंडा राबवून घ्यायचा हा हिंदुत्वाचा सापळा नरेंद्र मोदींच्या रुपात कसा प्रभावीपणे कार्य करतो आहे यावरुन आपणास त्याची प्रचिती येते. आज भाजपाच्या आशिर्वादाने बहुतांश राज्यात ओबीसी चळवळ उभी राहिलेली आहे. तिचा व्यावहारिक आधार राखीव जागा असला तरी भाषिक आधार मात्र हिंदुत्व आहे.

ओबीसी जातीसमूहाच्या चळवळीचा सर्वाधिक लाभ भाजपास मिळाला. पण नंतर भाजपाच्या हे ही लक्षात आले की ओबीसींना जवळ घेण सोप आहे पण टिकवण अवघड आहे. अशावेळी बाहेर पडणाऱ्या ओबीसी नेतृत्वास बाहेर कुठलाही आधार राहणार नाही याची काळजी त्यांनी हिंदुत्वाच्या सापळ्यातुन साध्य केली. कल्याणसिंग, उमाभरती, गोपीनाथ मुंडे यांचे उदाहरण यादृष्टीने बोलके आहे. अगदी अलिकडचे एकनाथ खडसे यांचेही उदा. महत्वाचे ठरते. हितसंबंधाचा संघर्ष होऊन कल्याणसिंग भाजपातून बाहेर पडले त्यावेळी त्यांनी भाजपावर हिंदुत्ववादाचे, जातीयवादाचे आरोप लावले. मला बाबरी मजिद पाडण्यास कसे बळजबरीने भाग पाडले असे ओरडून ओरडून सांगितले. व एक नवा धर्मनिरपेक्ष पक्ष असा क्रांती पक्ष स्थापन केला. कल्याणसिंगाची क्रांती किती काळ टिकली? वर्ष-दिडवर्ष ही टिकली नाही. तीच गत उमाभारतींची झाली. गोपीनाथ मुंडे, एकनाथ खडसे यांच्यावर पक्षांतर्गत अन्याय झाला तरी त्यांनी बाहेर पडण्याची हिंमतही दाखवली नाही. काहीतरी कारण सांगून बाहेर पडणाऱ्या ओबीसी नेत्यांची गोची अशी झाली की आपण हिंदुत्वाचा पाया वापरुन नेते झालो मात्र हा पाया आपणास स्वतंत्रपणे वापरता येणार नाही व दुसरा स्वतंत्र आधार निर्माण करणे ही आपल्या आवाक्यात नाही तेव्हा हे नेते परत भाजपावाशी होणेच अधिक श्रेयस्कर समजतात हे कल्यासिंग व उमा भारतीच्या अनुभवातुन प्रत्ययास येते.

### २) काँग्रेसचा बहुजनवादी अस्मितेचा सापळा:

स्वातंत्र्यपूर्व व नंतरच्या काळातील काँग्रेसपक्षाचे स्वरूप आपण बघितले तर एक बाब प्रकर्षाने निदर्शनास येते की काँग्रेस पक्षाने स्वतंत्र राजकीय प्रवाह निर्माण होणार नाहीत याची काळजी सातत्याने घेतली. कथित धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली अशा प्रवाहांना स्वतःहून विसर्जित करुन घेतले. भारतीय राजकारणात दिर्घकाळ सत्ता कायम राखण्यात काँग्रेस पक्षास वरीष्ठ व प्रबळ जातीसमूहाचे प्रभुत्व उपयुक्त ठरले होते. या वरीष्ठ प्रबळ जातीसमूहाविरुद्धची एक प्रतिक्रिया म्हणून ओबीसी जातीसमूह अस्मिता आकारास आली होती. या अस्मितेस आपल्या राजकीय सोयीसाठी वापरण्यासाठी काँग्रेस धूरीणांनी बहुमतवादाचे पूरोगामीत्वाचे कार्ड वापरलेले दिसते. काँग्रेस पक्ष हा भारतीय सांस्कृतीचा प्राचीन संमिश्र वारसा घेवून चालणारा पक्ष असून काँग्रेस पक्षातच ओबीसी जातीसमूहास दिर्घकालिन दृष्टीकोनातुन भविष्य आहे अशी मांडणी एका बाजुने

केली जाते व दुसऱ्या बाजुने प्रबळ जात व ओबीसी जातसमूह हे कसे एकाच खोडाची फळे आहेत हे ही बिंबवले जाते. महाराष्ट्रात यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी छत्रपती शिवरायांच्या स्वराज्याचे परिणामकारक उपयोजन ओबीसी अस्मितेस काँग्रेसी संघटनाचे खाली घेण्याकरीता केले होते. शिवरायांचे स्वराज्य जसे सर्व मावळ्यांचे होते त्यात सर्व ओबीसी जाती समूह बंधूत्वाच्या भावनेने वावरत होते हा बंधूभाव बहुजनवादातुन व्यक्त करण्याचा व ओबीसी जातीसमूहांना आकर्षित करण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्ष करतांना दिसतो. मात्र काँग्रेसपक्षाचा इतिहास हा ओबीसी जाती समूहाचे हक्क व अधिकार नाकारणारा राहिला आहे. पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी या काँग्रेसच्या श्रेष्ठ नेत्यांनी मंडल आयोगाच्या दोन्ही आयोगांना जो विरोध केला, त्याची अंमलबजावणी नाकारली हे ऐतिहासिक वास्तव ओबीसी जातीसमूहास काँग्रेस पासून दूर नेते असे अभ्यासकांना वाटते.

## २) वंचित आघाडीचा परिवर्तनवादी सापळा:

ओबीसी जातीसमूहाच्या अभ्युदयासाठी, त्यांच्या न्याय्य हक्क व अधिकारांसाठी ओबीसी जातीसमूहापेक्षा अधिक दलित जातीसमूहाने रस्त्यावरची व संसदीय लढाई अधिक लढलेली आहे हे वास्तव नाकारता येणार नाही. ओबीसी जातीसमूहाची एक स्वतंत्र अस्मिता तयार होवून ती राजकीय दृष्ट्या कार्यप्रवण झाली असली तरी या ओबीसी जातीसमूहाची एकूण दिशा व वाटचाल ही आत्मघात करणारी आहे. त्यांना आपला शत्रु कोण व मित्र कोण याची अद्याप खरी ओळखच झाली नाही. त्यामुळे या नव्याने जागे झालेल्या ओबीसी समूह भानास आपल्या छत्रछायेखाली घेऊन परिस्थितीचे यथार्थ आकलन घडवून आणणे ही आपली ऐतिहासिक जबाबदारी आहे असे मानुन निम्नजातीसमूहातुन पूढे आलेला परिवर्तनवादी विचार प्रवाह ओबीसी अस्मितेस परिवर्तनवादी दिशा देण्याचा प्रयत्न करताना दिसतो. म. जोतीराव फुले, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी विचार व मुल्यांशी सन्मुख होऊन त्यांच्या स्वप्नातील भारतीय समाजाची उभारणी करण्यासाठी ओबीसी जातीसमूहाने पूढाकार घ्यावा व ओबीसी जाती अस्मिता याकामी खर्ची करावी अशी अपेक्षा या परिवर्तनवादी सापळ्यामागे दिसते. प्रकाश आंबेडकरांनी महाराष्ट्राच्या राजकारणात वंचित बहुजन आघाडीचा जो प्रयोग राबवला आहे तो ओबीसी जाती समूहांच्या अस्मितेस यादृष्टीने आकर्षित करण्याचाच एक प्रयोग आहे. उत्तर प्रदेशात हा प्रयोग मायावतींनी सोशल इंजिनियरिंगच्या माध्यमातुन राबवला होता. गुजरात मध्ये तो अल्पसंख्यांक समूहांना जोडीस घेवून राबवला जातो आहे. बिहारमध्ये रामविलास पासवान त्यादृष्टीने काहीकाळ प्रयत्न करत होते परंतु ते भाजपाच्या वळचणीला जावून बसल्यामुळे या प्रयोगाच्या मर्यादा ही स्पष्ट झाल्या. परंतु या परिवर्तनवादी सापळ्याच्या माध्यमातुन ज्या ओबीसी जाती संस्थेने अतिशय अल्प असून त्यांना अद्यापही कुठल्याही प्रकारची राजकीय संधी प्राप्त झाली नाही त्यांना सत्तासन्मुख करण्याचा त्यादृष्टीने विचार करण्यास प्रवृत्त करण्याचा एक मोठा प्रयत्न आहे हे निश्चित.

## ४) ओबीसी अस्मिता:

पार्लमेंटमध्ये जाऊन तेल्यांना काय तेल काढायचं आहे का? की कुणबटांना नांगर हाकायचा आहे? या शब्दात स्वातंत्र्यपूर्व काळात ओबीसी जाती समूहाची हेटाळणी झाली होती. स्वातंत्र्योत्तर काळात ही केवळ स्वतंत्र ओळखीच्या अभावी ओबीसी जातीसमूह आपल्या न्याय हक्कांपासून दिर्घकाळ वंचित राहिला. यामागे त्यांच्या सतर्कतेचा अभाव हे एक कारण होते तसेच त्यांच्या स्वतंत्र अस्मितेचा अभाव हे एक कारण ही होते. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर ओबीसी जातीसमूहात एक स्वतंत्र अस्मिता निर्माण झाली. परंतु ही ओबीसी अस्मिता वेगवेगळ्या

छावण्यांमध्ये विस्तारली गेली. ओबीसी नेते वेगवेगळ्या राजकीय घटकांमध्ये स्थापित झाले. ओबीसी जातीसमूहाचा स्वतंत्र असा प्रभावी राजकीय पक्ष देशपातळीवर अद्यापही अवतरलेला नाही. त्यामुळे या ओबीसी अस्मितेचा स्वतंत्ररीत्या विकास करण्यासाठी व राजकीय तापळीवर ओबीसींचे स्वतंत्र राजकीय संघटन विकसित करण्यासाठी काही गट कार्यरत आहेत. ओबीसी अस्मिता कुठल्याही सापळ्यात न अडकवता कोणत्याही पक्षाच्या दावणीला न बांधता त्यांचे स्वतंत्र राजकीय अवकाश तयार करणे हे या ओबीसी अस्मितेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**ओबीसी राजकारणाच्या मर्यादा:**

ओबीसी जातीसमूह राष्ट्रीय पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत भारतीय राजकीय प्रक्रियेस प्रभावित करत असला तरी ओबीसी जाती समूहाच्या काही मर्यादा निश्चितपणे पूढे आल्या आहेत. त्यातील काही मर्यादा या अंगभूत आहेत तर काही मर्यादा या राजकीय व सामाजिक परिस्थितीच्या प्रभावाने जन्मास घातल्या आहेत. यातील काही प्रमुख मर्यादांची चर्चा पूढील प्रमाणे करता येईल.

**१) ओबीसींमधील अंतर्विरोध:**

मंडल आयोगाने ३७४३ जातींची ओबीसी म्हणून स्थाननिश्चिती केली व ओबीसी जातीसमूहाची अस्मिता आकारास आली. मात्र वास्तवात या ओबीसी जातीसमूहांपैकी केवळ २% जातीच प्रत्यक्ष राजकारणात सहभागी होताना व सत्ता उपभोगताना दिसत आहेत. इतर ९८% ओबीसी जातीसमूहांपर्यंत सत्ता तर सोडाच राजकीय प्रवेशाची संधी ही पोहचली नाही त्यामुळे ओबीसी जाती समूहातील अंतर्विरोध अधिक तीव्र स्वरुपात पूढे येत आहे. या अंतर्विरोधात प्रामुख्याने मागास वर्ग व अतिमागास वर्ग अशी दुफळी निर्माण झालेली दिसते. महाराष्ट्राचा जरी संदर्भ आपण घेतला तर एकट्या महाराष्ट्रात ३५० हून अधिक ओबीसी जाती आहेत यापैकी केवळ धनगर, वंजारी व माळी या जातीसमूहाने राजकीय सत्तेवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. डवरी, गोसावी, कैकाडी, कुरमुडे, वडार, पाथरवट अशा बहुसंख्या जाती या सत्ता व समाजापासून दूर भटक्या अवस्थेत जीवन जगत आहेत. ओबीसींमधील प्रबळ जातींचा त्या सामना करु शकत नाहीत त्यामुळे मागास व अति मागास वर्गास अंतर्विरोध ओबीसी जातीसमूहात मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. जो लवकरच ओबीसी अस्मितेस विग्रहाच्या पातळीपर्यंत घेवून जाऊ शकतो.

**२) राखीव जागांमधील संघर्ष:**

खरे तर राखीव जागांचे एक सूत्र घेऊन ओबीसी जातीसमूह एकत्र आला. एक स्वतंत्र अस्मिता त्यातुन तयार झाली. मात्र आज याच राखीव जागांच्या लाभ मर्यादेने ओबीसी जातीमध्ये संघर्षास सुरवात झालेली दिसते. राजस्थान मध्ये आलीकडेच ओबीसी विरुद्ध ओबीसीचा संघर्ष ताजा आहे. गुर्जर विरुद्ध मीना जातीचा हा संघर्ष या वादाची प्रचिती देतो. राजस्थानमध्ये ११% असणारा व देशभरात पाच कोटीच्या घरात लोकसंख्या असणारा समूह ओबीसी प्रवर्गात मोडतो. या गटात जाट ही एक प्रभावी जात ही आहे. या जातीपुढे गुर्जरांचा निभाव लागत नाही म्हणून त्यांनी आपला समावेश अनुसुचित जमातीत करण्याची मागणी पूढे रेटली आहे. यास मीना जीतीने जोरदार आक्षेप घेतला. महाराष्ट्रातील धनगर आरक्षण, मराठा आरक्षण यावरुन असेच विरोधाचे वातावरण तयार झाले होते. गवळी, वंजारी या तुलनेने प्रगत जातींना भटक्या जमातीत समाविष्ट करुन एकप्रकारे तुलनेने मागास असणाऱ्या वैदू, कोळी, गोसावी, डवरी यासारख्या जातींवर अन्याय झाला आहे. हा ओबीसी जातीमधील राखीव जागांच्या लाभाचा प्रश्न येणाऱ्या काळात अधिकाधिक तीव्र होण्याची शक्यताच अधिक आहे. सशक्त आणि अशक्त एकाच श्रेणीत

आल्यामुळे मोठा मासा छोटा मासा असा न्याय एक प्रकारे ओबीसी जाती समूहात निर्माण झाला आहे.

### ३) व्यापक ऐक्य व ध्येयाचा अभाव:

महाराष्ट्रात ओबीसी जातीसमूहाची लोकसंख्या ही ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे व देशपातळीवर हा आकडा ५७ टक्क्यांपेक्षा निश्चितच अधिक आहे. असा परिस्थितीत ओबीसी जातीसमूहाने एकत्र येणे म्हणजे प्रस्थापित राजकारणाला धक्का बसणे व ओबीसी जातीसमूह राज्यकर्ती जमात बनणे असा सरळ अर्थ निघतो. ओबीसी जातीसमूहाच्या ऐक्याचा विचार करताना काही ठळक बाबी आपल्या निदर्शनास येतात. स्वातंत्र्यपूर्व व नंतरच्या काळात ही काँग्रेस पक्षाने स्वतंत्र प्रवाह जन्मास येऊ दिले नाहीत. काही प्रवाह निर्माण झाले तरी कथित धर्मनिरपेक्षतेच्या आवरणाखाली त्यांना झाकुन प्रतिनिधिक स्वरुपात सत्ता देऊन आपली काँग्रेसी व्यवस्था पुढे रेटली. त्यानंतरच्या काळात भाजपा व शिवसेनेने काँग्रेसमध्ये असणारे परंतु सत्तेपासून सातत्याने दूर राहिलेले ओबीसी फोडून त्यांना सत्ता स्थानी विराजमान केले मात्र त्यांना सत्तेबरोबर संस्कृतीही बहाल केली. दक्षिण भारत वगळता देशभरात ओबीसी नेत्यांनी हिंदुत्वाचा आधारच मोठ्या प्रमाणात घेतलेला दिसतो. त्यामुळे हिंदुत्वाचा अजेंडाच ते पुढे घेऊन जाताना दिसतात. त्यामुळे ओबीसींच्या व्यापक ऐक्याचा विषय त्यांच्या कार्यक्रमपत्रिकेवर कधी आलाच नाही. यापेक्षाही वाईट म्हणजे आपण असे ऐक्य घडवू शकतो, राजकीय सुत्रे बदलु शकतो याविषयी ओबीसी जातीसमूहाच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला नाही. व्यापक ऐक्यासाठी त्याग करण्याची तयारी ठेवली नाही. महाराष्ट्राबाहेर ओबीसी नावाने दोन-तीन डझन पक्ष व संघटना जन्मास आल्या आहेत. महाराष्ट्रात मात्र अद्यापही असा पक्ष निर्माण झालेला दिसत नाही. कारण महाराष्ट्रातील ओबीसी नेतृत्व त्यासाठी किंमत चुकवण्यास तयार दिसत नाही. ओबीसींचे ऐक्य भक्कम करायचे असेल तर ओबीसी नेतृत्वास यापुढील काळात हिंदुत्वांचा अजेंडा सोडून अधिक व्यापक स्तरावर ओबीसी जातीसमूहाच्या सामाजिक आर्थिक, राजकीय स्वप्नांना न्याय देणारी भूमिका घ्यावी लागेल. कारण आम ओबीसींमध्ये केवळ राजकीय सलोखा करुन भागणार नाही तर सामाजिक सलोख्याची ही तेवढीच गरज आहे. यासाठीचे कार्यक्रम मात्र ओबीसी नेतृत्वाकडे नाहीत ही ओबीसी जातीसमूहाच्या नेतृत्वाची मर्यादा आहे.

### जागतिकीकरणाच्या प्रक्रियेन निर्माण केलेले आव्हान:

ओबीसी जातीसमूहाची स्वतंत्र अस्मिता पूढे येण्याची प्रक्रिया आणि भारतातील जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाची प्रक्रिया एकाच वेळी भारतीय राजकीय प्रक्रियेत अवतरल्या. या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जगण्याच्या सर्वच संदर्भांना सर्वकषरीत्या प्रभावित केले आहे. त्याचे नकारात्मक प्रभाव प्रामुख्याने वंचित जातीसमूहांवर सर्वाधिक पडले आहेत. त्यास ओबीसी जातीसमूह ही अपवाद नाही. मात्र ओबीसी जातीसमूह हे प्रभाव समजून घेण्यास कमी पडतो आहे अथवा त्याकडे दूर्लक्ष केले आहे असे दिसते कारण ओबीसी जातीसमूहांत अद्यापही आपले सर्व लक्ष राखीव जागांभोवती केंद्रित केलेले दिसते. राखीव मागास आरक्षण हे एकमेव अभ्युदयाचे साधन मानुन ओबीसी जातीसमूह कार्यरत असलेला दिसतो. वास्तवात मात्र जागतिकीकरणाच्या प्रक्रियेच्या विस्ताराबरोबरच राज्याच्या कार्यक्षेत्राच्या संकोचास चालना मिळाली आहे आणि त्याचा सर्वाधिक प्रभाव राखीव जागा व आरक्षणाच्या धोरणावर पडला आहे. ओबीसींना २७% राखीव जागा प्राप्त झाल्यानंतर त्यांचे शासकीय नोकऱ्यांमधील प्रमाण वाढणे अपेक्षित होते वास्तवात मात्र ते कमी झाल्याचे अलिकडेच निदर्शनास आले आहे. १९९० मध्ये ओबीसींचे सार्वजनिक क्षेत्रातील नोकरीचे प्रमाण १२.७५% एवढे होते ते २७% आरक्षणाचे धोरण अंमलात

आल्यानंतर ५-५ टक्क्यांयेंत खाली अल्याचे निदर्शनास येते. याचे सर्वात महत्वाचे कारण खाजगीकरणाच्या प्रक्रियेने सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण कमी केले आहे. सार्वजनिक व्यवसायात नोकऱ्या निर्माण होण्याची गती मोठ्या प्रमाणात मंदावली आहे. आज सवर्णांसह सर्वांना राखीव जागांच्या तरतुदी केल्या गेल्या तरी वास्तवात नोकऱ्यांचा उपलब्धता नसल्यामुळे हे आरक्षण केवळ कागदावरच शिल्लक राहणार आहे या वस्तुस्थितीची जाण ओबीसी जातीसमूह हरवून बसलेला दिसतो आहे.

### ३) ओबीसी नेतृत्वाच प्रतिगामीत्व:

ओबीसी जातीसमूह खरेतर परिवर्तनाचा क्रांतीचा वाहक बनणे अपेक्षित होता मात्र वास्तवात ओबीसी नेतृत्व प्रतिक्रांतीच्या प्रवृत्तीस साधन बनताना दिसतो आहे. भारतातील क्रांतीवादी चळवळ व प्रतिक्रांतीवादी चळवळ यात ओबीसी जातीसमूह कोणती बाजु घेणार आहे यावरुन या देशाचे भवितव्य घडणार आहे. परंतु आजची ओबीसी जात समुहाचे प्रतिगामीत्व भारतीय लोकशाहीच्या वाढ व विकासाच्या दृष्टीने सुखावह नाही.

### सारांश:

जात हा भारतीय समाजव्यवस्थेचा व राजकीय प्रकरियेचा एक अपरिहार्य घटक आहे. जात संस्थेचा प्रभाव नाही असे एकही क्षेत्र भारतीय समाजजीवनात आपणास पहावयास मिळत नाही. त्यामुळे जातीसंस्थेचे आपण विरोधक जरी असलो तरी सार्वजनिक जीवनात सर्वच क्षेत्रात जातीव्यवस्थेचा प्वभाव आपणास अनुभवावा लागतोच सर्वच राजकीय पक्ष जातीस अरिष्ट मानतात. जातिवीहीत समाजरचनेचा स्वीकार करण्याचेही मत मांडतात मात्र प्रत्यक्षात राजकारणात जातीय गणितांनाच प्राधान्य देतात असे असलो तरी जातीपातीच्या राजकारणाच्या मर्यादाही ठळकपणे पूढे येत आहेत. त्यातील अंतर्विरोध ही अधिक ठळक होत आहेत. जातीय पाठिंब्यातून एका मर्यादेपर्यंत यश राजकीय पक्ष मिळवतात पण तीच त्यांची प्रभावाची कमाल कक्षा ठरते. ती त्यांना ओलांडणे शक्य होत नाही व त्यामुळे जातींना स्वतःच्या ताकदीवर सत्ता टिकवता येत नाही हे प्रत्यक्षास येत आहे. जातीय राजकारणाला आर्थिक प्रश्नांची जोड न मिळाल्याकारणाने जातीय राजकीय पक्षांच्या एकूण धोरणांमध्ये व कार्यपद्धतीत एकारलेपणा व एकाकीपणा आला आहे. कारण ते जातीच्या विराच केवळ नेतृत्वभर्ती पूरताच मर्यादित ठेवतात त्या जातीगटाचे व्यापक पातळीवर राजकीय सामाजीकरण घडवून आणणे त्यांच्या ध्यानी मनी नसते. निवडणूक स्वार्थ्यसाठी केली. जाणारी सर्व जातिवाचक आवाहने संकुचित जाती अस्मिताच गोंजारुन त्यास अधिक प्रखर करण्यासाठी असतात. त्यामुळे समान आर्थिक समस्यांवर-प्रश्नांवर बहुजातीय लढे उभारणे त्यांना अशक्य होउन बसते. त्यातुन क्रीमिलेअर पुढाऱ्यांचे राजकारण तेवढे साकारले हे उत्तरप्रदेश, बिहारच्या अनुभवातुन दिसते. नवजागृत जातीचे राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांनी पूर्वास्पृश्य जातीकडून, त्या जातीसमूहाच्या अनुभवाकडून धडा घेणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे एकमुखी महान नेतृत्व, त्यांचा क्रांतीकारक विचार आणि त्यास मिळालेली कृतीची जोड लक्षणीय संख्याबळ या सारख्या सर्व जमेच्या गोष्टी पूर्वास्पृश्य पूढाऱ्यांना वारसा स्वरुपात अलगद मिळालेल्या असताना या जातीसमूहाचा राजकीय सहभाग हा त्याग ही प्रभावी असताना या जातीसमूहाचे प्रश्न मात्र आजही कायम आहेत. या जातीसमूहाच्या हितासाठी व बचावासाठी केलेल्या कायद्यांचे व धोरणाचे लाभ अद्यापही त्यांच्यापर्यंत पोहचु शकले नाहीत उलट त्यांचा छळ, त्यांच्यावरील अत्याचारे प्रमाण वाढतेच आहे. त्यांच्या सोषणाची कमान उंचावतेच आहे. असे का झाले? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या राजकीय पक्षांनी राजकीय धूरीणांनी संकुचित जातीय राजकारण केले या

एका वाक्यातच देता येऊ शकते. याचे विश्लेषण करतांना भा. ल. भोटे म्हणतात, या देशाच्या ग्रामीण जीवनात जात ही संस्था आर्थिक कृतीचा, राजकीय संघटनेचा आणि सामाजिक संघर्षाचाही पाया आहे. हे खरे असले तरी केवळ जातीला घेऊन क्रांतीकारक राजकारण मात्र करता येत नाही. वरवरच्या पायऱ्यांवरचे राजकारण यशस्वी करायचे असेल तर जातींना जोडणाऱ्या आर्थिक संघर्षाचे राजकारण सातत्य राखून करावे लागते. दलितांच्या पक्षांनी हे कधीच केले नाही. त्यांनी मतदारांच्या फक्त जातिनिष्ठांवरच भस्त ठेवली. ज्या दलित समाजात ८०% शेतमूजर, बांधकाम मजूर व काचपत्रे गोळा करणारे असंघटित कष्टकरी स्त्रीपुरुष आहेत. त्यांच्या पक्षाचे जाहीरनामे मात्र श्रमिकांच्या प्रश्नांची मुळीच दखल घेत नाहीत. नवे आर्थिक धोरण, जंगलविषयक कायदे, नवे शैक्षणिक धोरण वैगेरेंचे दलित समाजावर कोणते परिणाम होणार याची दखल न घेता केवळ भावनिक प्रश्नांवर आवाहने करत राहतात. अन्य जातीय दलितांना जवळ करणे तर दुरच राहिले पण स्वजातीसमूहांतर्गत पोटजातीही मोडण्याचा प्रभावी प्रयत्न ते करत नाहीत. दरवर्षी दीक्षाभूमी व चैत्यभूमीवर जमणारी भाविकांची गर्दी पाहिल्यावर पक्ष बांधणींची गरजच त्यांना भासत नाही. लोक गावकुलाबाहेर खिचपत राहतात आणि नेते राज्यपातळीवरचेच राजकारण करतात. लोकांपासून स्वाभिवकच दुरावतात आणि लोकांच्या संतप्त बंडखोरीला बळी पडतात, जेवढे नेते तेवढे गट पडून युती फुटीच्या लाटा पक्षात येतजातच राहतात. या विश्लेषणातुन जातीय राजकारणात काय करु नये व काय करावे याचा वस्तुपाठ दलित जातीसमूहाच्या राजकारणातुन अनुभरास येतो. गरज आहे नवजागृत जातीचे राजकारण करणाऱ्या धूरीणांनी यापासून धडा घेण्याची.

### भारतातील वर्गरचना व राजकारण:

भारतीय समाजव्यवस्थेचे व्यप्रेदक लक्षण मूलतः जाती व्यवस्था असले तरी वर्गव्यवस्था हे ही भारतीय समाजव्यवस्थेत सनातन काळापासून प्रचलित असलेले दिसतात. तहीरी आधूनिक अर्थाने निर्माण झालेल्या वर्गरचनेवर इंग्रजी राजवटीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आढळतो. ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थापक केल्यानंतर जे बदल प्रशासन व राज्यवस्थेत घडवून आणले त्यातुन भारतीय वर्गचरना आकारास आलेली दिसते. महसूलासंबंधी जमीनदारी व रयतवारी पद्धती अंमलात आणली. जमीनदारी पद्धती शासनासाठी जमिनीचा महसूल वसूल करण्याची जबाबदारी जमीनदारांवर आली. शेतीव्यवसायातील बदलातून भारतीय समाजरचनेत काही वर्ग अस्तित्वात आले तर औद्योगिकीकरण, शहरीकरण, दळणवळणाच्या साधनांमधून शहरी समाजरचनेत ही काही वर्गसमूह अस्तित्वात आले. या वर्गसमूहांचे भारतीय राजकारणातील बदलते स्थान व प्रभाव यांचे अध्ययन ही भारतीय राजकीय प्रक्रियांचे अध्ययन करतांना आवश्यक ठरते.

### वर्ग संकल्पना व्याख्या:

वर्ग ही संकल्पना पूढील व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

### १) मॅकआयन्हर आणि पेज:

सामाजिक वर्ग म्हणजे समुदायाचा असा कोणताही भाग की ज्याला सामाजिक दर्जाच्या आधारे इतरांपेक्षा पृथक दर्शविता येते.

**२) ऑगबर्न व निमकॉफः**

एका विशिष्ट समाजात समान सामाजिक दर्जा असलेल्या व्यक्तीच्या समुदायास वर्ग म्हणतात.

**३) ओरोकिनः**

ज्यांचा व्यावसायिक, आर्थिक आणि राजकीय दर्जा सामान असतो त्या समूहाला वर्ग म्हणतात.

**वर्ग संकल्पनेची वैशिष्ट्येः**

वरील व्याख्येवरुन वर्गसंकल्पनेची प्रमुख वेशिष्ट्ये पूढीलप्रमाणे मांडता येतील.

**१) कुटुंब हा एककः**

वर्गातील एकक म्हणून कुटुंबास आधारभूत मानले जाते. कारण कुटुंबातील सर्व सदस्यांचा दर्जा समाज मानला जातो. साधारणतः कर्त्यापुरुषाचे आर्थिक उत्पन्न व व्यवसायाच्या आधारे कुटुंबाचा दर्जा ठरतो व त्याप्रमाणे त्या कुटुंबाचा विशिष्ट वर्गात अंतर्भाव होतो.

**२) अंतर्विवाही स्वरुपः**

वर्ग ही संकल्पना ंतर्विवाही असतो कारण त्या वर्गातील सदस्यांचा दर्जा समान असतो.

**३) जीवनशैलीची विशिष्टताः**

प्रत्येक वर्गाची जीवनशैली विशिष्ट असते. या जीवन शैलीत मुल्ये, अभिवृत्ती, वर्तन प्रतिमान, भाषा, बोलण्याच्या पद्धती इत्यादी घटकांचा समावेश होतो.

**४) समान सांकेतिक आंतरक्रियाः**

वर्गात समान पातळीवर सांकेतिक आंतरक्रिया असते. या आंतरक्रियेत परस्परांकडे जाणे, तसेच सहभोजनास, समोरंक, संस्कार प्रसंगी आमंत्रित करणे या सारख्या बाबींचा प्रामुख्याने समावेश होतो.

**५) वर्गजाणीवांचे अस्तित्वः**

प्रत्येक वर्गात मूल्ये, अभिवृत्ती व वर्तन प्रतिमानातून सारखेपणा तसेच वर्गजाणीव निर्माण झालेली असते. त्या वर्गाच्ाय जीवनशैलीतून ही वर्ग जाणीव प्रगट होते.

**६) अर्जित दर्जाचे प्राबल्यः**

वर्गात अर्जित दर्जाचे प्राबल्य असते. तसेच त्यात खुलेपणा असतो. व्यक्ती आणि पर्यायाने कुटुंब एका स्तरातुन दुसऱ्या स्तराप्रत जाऊ शकते.

**वर्गाचे प्रकारः**

वर्ग संकल्पनेची आर्थिक आधारानुसार होते. त्याप्रमाणे साधारणतः जागतिक संदर्भात उच्च, मध्यम व निम्न असे तीन वर्ग प्रकार मानले जाते.

कार्लमार्क्सने वर्ग संकल्पनेची दोन भागात वर्गवारी करतांना आहे रे व नाही रे वर्ग अशी विभागणी केली होती. उत्पादन साधनांची मालकी असणारा वर्ग हा आहे रे वर्ग होय. त्यास मार्क्स शोषक वर्ग असे ही म्हणतो. ज्या समूहाकडे उत्पादन साधनांची मालकी नसते त्या वर्गास मार्क्स नाही रे वर्ग असे म्हणतो त्यास शोषित वर्ग असे ही मार्क्स म्हणतो.

मॅक्लवेबरने आर्थिक दृष्टीकोनातुन वर्गाचे विवेचन केले आहे. उत्पादनाच्या साधनावरील मालकीप्रमाणे निवास, शिक्षण, स्वास्थ्य खाध्यान्त इत्यादी घटकांना तो आधारभूत मानतो. कार्ल मार्क्सने आर्थिक घटकास स्वतंत्रकारक मानले आहे तर मॅक्सवेबरने आर्थिककाटकाचा परावलंबी कारक म्हणून विचार केला आहे.

वार्नर यांनी वर्गाचे प्रकार करताना वस्तुनिष्ठ दर्शकामध्ये व्यवसाय, आर्तिक प्राप्ती, निवासाचा प्रकार, निवासाचे क्षेत्र, शिक्षणाचा दर्जा लक्षात घेतला असून उच्च, मध्यम व कनिष्ठ अशा तीन वर्गांच्त्प्रत्येकी उच्च व निम्न वर्ग या सहा वर्गांचा निर्देश केला आहे. तर बेब्लिनने विलासी वर्गाचा सिद्धांत मांडून औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनावर मालकी असणाऱ्यांचा विलासी वर्ग आणि कारखान्यातुन श्रम करणाऱ्यांचा मजून वर्ग असे दोन प्रकार केले आहेत.

**भारतातील वर्गरचना:**

भारतातील वर्गरचनेमध्ये शहरी व ग्रामीण असे समाजस्तराप्रमाणे वेगवेगळे वर्ग अस्तित्वात आलेले दिसतात त्यामुळे त्यांचा आढावा स्वतंत्रपणे घेणे गरजेचे ठरते.

### १) ग्रामीण समाजव्यवस्थेतील वर्गरचना:

भारतीय ग्रामीण समाजव्यवस्थेत प्रामुख्याने पूढील प्रमाणे वर्गरचना कार्यरत असलेली दिसते.

### २) जमिनदार वर्ग:

लॉर्ड कॉर्नवालीस यांनी १७९३ साली जमीनदारी पद्धती सुरु केली. सुरुवातीला या पद्धतीत जमिनीचा महसुल गोळा, करणारे मध्यस्थ नेमणे हा इंग्रज सरकारचा उद्देश होता. परंतु याचा लाभ मध्यस्थांनी उचलला व हे मध्यस्थच पूढे जमिनीचे मालक म्ाहणजे जमीनदार झाले. त्यांची जमिनीवर मालकी प्रस्थापित झाली व संबंध देशभर जमिनदार वर्ग उदयास आला. तो आपल्या हितसंबंधीसाठी संघटितपणे कार्य ही करु लागला. जमीनदारी पद्धतीत स्थायीस अस्थाची असा दोन व्यवस्था होत्या. स्थायी पद्धतीत जमीनदाराने सरकारला घ्यावयाचा शेतसारा कायमचा निश्चित होता. ही पद्धती बंगाल, बिहार, ओरीसा या राज्यांमध्ये होती. या पद्धतीत जमा केलेल्या महसुलाचा निश्चित भाग जमिनदारास मिळत असे. तर अस्थायी पदाधतीमध्ये सरकार शेतसारा ठरवित असे. असा शेतसारा २० ते ४० वर्षासाठी निश्चित केला जात असे. हा कालावधी संपल्यानंतर परत कालमर्यादा निश्चित केली जात असे. म्हणून या पद्धतीस अस्थायी पद्धती असे म्हटले जात असे असे पद्धतीने भारतात जमिनदार वर्ग अस्तित्वात आला. या वर्गाचे अस्तित्व आजही प्रामुख्याने उत्तर भारतात आढळते.

### २) कूळे:

१९५० साली भारत सरकारने जमिनदारी पद्धती कायद्याने बंद केली, व कूळ कायदा पारित केला. जमिनदारांची जमिन कलणाऱ्या कुळांना मालकी हक्काने देण्यात आली. त्यामुळे कुळांना

जमिनीची मालकी मिळाली. त्यामुळे कुळ हा नवीन वर्ग उदयास वर्गजाणीव घेवून पूढे आला. आपल्या हितसंबंधाच्या पूर्ततेसाठी तो कार्यरत झालेला दिसतो.

**३) अल्पभूधारकांचा वर्गः**

कूळकायद्याच्या बरोबरीने कमाल जमीनधारणा कायदा ही भारत सरकारने पारित केला. या कायद्याने बागायती व कोरडवाहू जमिनधारणेवर मर्यादा टाकण्यात आली. यातून अतिरिक्त ठरवण्यात आलेली जमिन भूमिहीनांना देण्यात आली. अनेक भूमिहीन जमिनीचे मालक बनले व अल्पभूधारकांचा वर्ग देशात निर्माण झाला.

**४) शेतमजूरः**

ग्रामीण भागातील लोकसंख्यावाढ, कर्जबाजीरपणा, कारागिरांचे विस्थापन यासारख्या अनेक कारणांमुळे शेतमजूरांची संख्या वाढली. या शेतमजूर वर्गात ही अल्पभूधारक मजूर, भूमिहीन मजूर व वेठबिगार मजूर असे तीन प्रकार दिसून येतात. या शेतमजूर वर्गाची आर्थिक दशा वाईट असून यातील बहुतांशी कुटुंब दारिद्रेरेषेखाली जीवन जगताना दिसतात.

**५) कारागीरः**

ग्रामीण अर्थव्यवस्था कृषिप्रधान असल्याकारणाने शेती व जीवनासाठी लागणाऱ्या वस्तुंची निर्मिती गृहोद्योगातून होत असे. त्या वस्तुंची निर्मिती करणाऱ्या वर्गास कारागीर हे संबोधन वापरले जाते. यास भारतीय समाजव्यवस्थेत अलुतेदार व बलुतेदार हे संबोधन वापरले जाते. लोहार, सुतार, चांभार, कुंभार यांचा प्रामुख्याने यात समावेश होतो. हे कारागीर एकाच मोठ्या गावात असत. परंतु अनेक लहान गावात त्यांचे यजमान असत. बलुतेदारी पद्धतीत यजमान व कारागीर यांचे साचेबद्ध संबंध होते. आधूनिक काळात यंत्राच्या प्रभावाने गारगिरांच्या वर्ग मोडकळीस आला असला तरी आजही ग्रामीण भागात हा वर्ग काही प्रमाणात का होईना अस्तित्वात असलेला दिसतो.

**२) नागरी भागातील वर्गरचनाः**

भारताच्या नागरी भागात ग्रामीण भागापेक्षा वेगळी वर्गरचना आकारास आलेली दिसते. त्याची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

**१) भांडवलदारांचा वर्गः**

भारतातील भांडवलदार वर्गाचा उच्च पारंपरिक सावकरीवर्गातून पूढे आला. १८५० नंतर भारतात प्रामुख्याने भारतीय उद्योजकांचा वर्ग निर्माण झाला. या औद्योगिकरणात टाटा, बिर्ला, डालमिया, बजाज, धापर इत्यादी घराणे पूढे आली. पहिल्या महायुद्धांनंतर हिंदी भांडवलदार वर्गास अधिक संधी उपलब्ध झाली. स्वातंत्र्योत्तर काळात उद्योगविषयक धोरण ठरविण्यात आले. सरकारी क्षेत्रात मोस्त्रीठे उद्योगधंदे व खाजगी छोट्या प्रमाणावरील उद्योगांना प्राधान्य देण्यात आले. उद्योगधंद्याच्या विकासाकरीता विविध सोपी-सवलती देण्यात आल्या. नवीन आर्थिक धोरणाने १९९१ नंतर हा भांडवलदारांचा वर्ग अधिक भक्कम झालेला दिसतो.

### २) मध्यम वर्ग:

मध्यम वर्गात मध्यम व्यापारी, दुकानदार, कारखानदार, डॉक्टर, वकिल, शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती तसेच नोकरशाहीतील द्वितीय श्रेणी कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. औद्योगिकीकरण, शिक्षणाचा प्रसार दळणवळणाच्या सोयी यामुळे खारखानदारी व र्यापार वाढला. प्रशासकीय क्षेत्रात काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नोकरांची आवश्यकता वाढली. यातुन शहरीकरणाची प्रक्रिया वाढली. ग्रामीण भागातुन शहरात आलेल्या बुद्धीजीवी लोकांमुळे बुद्धीजीवी वर्गाचा विस्तार झाला. नोकरीती सुरक्षितता, निश्चित वेतन, दिर्घकालीन अर्तार्जनाची संधी यातुन गवसलेली सुखक पांढरपेशी जीवन, यामुळे मध्यमवर्ग आकर्षणाचे केंद्र ठरला. त्यांची एक जीवनशैली ठरलेली दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात हा मध्यमवर्ग अधिक विस्तारलेला दिसतो.

### ३) लहान व्यापारी व दुकानदारांचा वर्ग:

मध्यम वर्गाशिवाय थोडे निम्न जीवनकाल असणारा लहान व्यापारी व दुकानदारांचा वर्ग निर्माण झालेला दिसतो. औद्योगिकरण व शहरीकरणा समवेत या वर्गाचा उदय झाला आहे. या वर्गातील लोक उत्पादक व व्यापाऱ्यांकडून वस्तु खरेदी करतात व ग्राहकांपर्यंत पोहचवतात. येथे त्यांची भूमिका मध्यस्थाची असते. शहरांच्या विस्तारामुळे अशा वर्गाची आवश्यकता जाणवते. या वर्गातून काही व्यक्ती उद्योजकांच्या गुणांची जोपासना करुन मध्यम वर्गात समाविष्ट होतात तर काही लहान व्यापारी व दुकानदार अयोग्य व्यवहार व निर्णयामुळे श्रमिक वर्गात लादायले जातात. ग्रामीण भागातुन शहराकडे स्थलांतरीत झालेले लोक लहान व्यापार-दुकानदारी करत लागतात. त्यांच्यात उद्योजकांचे थोडे गुण असतात परंतु ते प्रशिक्षित नसतात. हा वर्ग असंघटित व विखुरलेला असतो स्वतःच्या जीवनयापनात सदैव गुंतलेला असल्यामुळे इतर क्षेत्रात त्यांचे भरीव योगदान दिसत नाही.

### ४) श्रमिक वर्ग:

भारतात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून औद्योगिकीकरणाला सुरवात झाली. या औद्योगिकीकरणातून भांडवलदारांच्या वर्गाप्रमाणेच श्रमिकांचा वर्ग उदयास आळा. औद्योगिकीकरणाच्या वाढीबरोबर या वर्गाचीही वाढ झालेली दिसते. सुरुवातीच्या कालखंडात औद्योगिक श्रमिकांचा वर्ग संघटित नव्हता. त्यामुळे त्यांना सुरक्षितता नव्हती. परंतु पूढे आंतरराष्ट्रीय श्रमिक संघाचे घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार श्रमिकांच्या हिताची जोपासना करणारे कायदे पारित करण्यात आले. श्रमिकंघ कामगारांच्या हितांची जोपासना कवण्यासाठी स्थापन झाले. मात्र या श्रमिक संघात सजातीपना नव्हती. व्यवसायाप्रमाणे विभिन्न श्रमिक संघ निर्माण झालेले दिसतात. शिवाय लोकशाही प्रणालीत श्रमिकांना प्राप्त झालेल्या मताधिकार व त्यांची लक्षणीय संख्या लक्षात घेऊन राजकीय पक्षांनी श्रमिक संघावर वर्चस्व स्थापित केले. पर्यायाने श्रमिकांचे पक्षनिहाय श्रमिक संघात विभाजन झालेले दिसते. श्रमिकांमध्ये ताणतणाव संघर्ष प्रत्ययास येऊ लागले. श्रमिकांच्या शक्तीची सुद्धा विभागणी झाली. तरीही श्रमिकांचा वर्ग आपला प्रभाव राखून असलेला दिसतो.

### भारतीय राजकारणातील वर्गीय संबंधाचे बदलते स्वरुप:

भारतीय राजकारणात जात हा घटक प्रामुख्याने आपला प्रभाव राखुन असला तरी वर्गीय जाणीवाही मतदारांमध्ये निवडणूक वर्तन निश्चित करण्यात आपली भूमिका पार पाडताना दिसतात. त्यातील काही प्रमुख बदलत्या प्रवाहांचा आढावा पूढील प्रमाणे घेता येईल.

### १) राजकीय पक्षांशी थेट संबंधः

वर्गीय रचना या राजकीय पक्षांशी आपला थेट संबंध प्रस्थापित करत असल्याचे स्वातंत्र्योत्तर भारतात प्रकर्षाने प्रत्ययास येते. उदा. स्वातंत्र्योत्तर काळात भांडवलदार वर्गाने आपला स्वतंत्र राजकीय पक्ष राजगोपालचारी यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र पक्ष या स्वरुपात कार्यन्वीत केला होता. तर शेतकरी व कामगार वर्गाचे प्रतिनिधित्व करण्याकरीता शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झालेली दिसते. साम्यवादी पक्ष हे कामगार वर्गाचे प्रतिनिधित्व करतात हे तर सर्वश्रुत आहे. विशिष्ट वर्ग विशिष्ट राजकीय पक्षाचे एकगठ्ठा मत बँका म्हणून एक प्रकारे भूमिका पार पाडतात. विशिष्ट वर्गसमूह विशिष्ट राजकीय पक्षास दिर्घकाळ मतदार करतात हे निवडणूक वर्तनातील वेगळेपण भारतीय राजकीय प्रक्रीयेत प्रत्ययास येते. याशिवाय राजकीय पक्षांच्या आघाडीच्या स्वरुपात ही या वर्गसमुहांना सामावून घेतलेले दिसते. उदा. कामगार वर्गाच्या सर्व संघटना या कोणत्याना कोणत्या राजकीय पक्षाशी संलग्नीत वा संबंधित असलेल्या दिसतात.

### २) दबावगटाशी साधर्म्यः

भारतातील वर्गसमूह आपली राजकीय अभिव्यक्ती करताना ज्या तंत्राचा वापर करतात ती तंत्रे दबावगटाशी साधर्म्य राष्ट्रवादी आहेत. उदा. शेतकरी हा वर्ग शासनाकडून आपल्या हितसंबंधाची जपणूक करण्याकरीता ज्या तंत्राचा वापर करतो की तंत्रे या पद्धतीशी साधर्म्य दाखवणारी आहेत.

### ३) वर्गीय भावनांमध्ये ही जातीय भावनांचा शिरकावः

भारतामध्ये मार्क्सवाद यशस्वी न होण्याचे महत्वाचे कारण म्हणून या घटकाकडे पाहिले जाते. भारतातील वर्गीय भावनेने एकवटलेल्या समूहांमध्ये ही जातीय भावना अधिक प्रभावी पद्धतीने कार्यरत असलेल्या दिसतात. त्यामुळे कामगार हा केवळ कामगार हा कारखान्यात राहतो. तो गावी या घरी आल्या नंतर तो जातीय स्वरुप धारण करतो. त्यामुळे भारतातील वर्गीय भावनांचे कवच ठिसूळ आहे असे म्हटले जाते.

### ४) विचारसरणी बांधीलकीचा अभावः

भारतातील वर्गीय समूहांना विचारधारेची बांधिलकी फारशी अस्तित्वात असलेली आढळत नाही. बदलत्या काळाप्रमाणे हे वर्गीय समूह आपले स्वरुप व तत्व बदलताना दिसतात.

### ५) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभावः

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारतीय वर्गसमूह जाणिवेस ही प्रभावित केलेले दिसते. आधूनिक तंत्रज्ञान व संचार क्रांतीने या वर्गजातीवांचे स्वरुप मोठ्या प्रमाणात लवचिक झालेले दिसते.

सारांश, भारतीय राजकारणात वर्ग हा घटक ही महत्वाचा आहे. मानव हा एक समाजवरील व राजकीय प्राणी आहे असे ॲरिस्टॉटलने म्हटले होते. परंतु त्यापूढे जाऊनच कार्लमार्क्सने मानवी स्वभावाचे विश्लेषण करताना व मानवाची व्याख्या करतांना मानव हा वर्गीय प्राणी आहे. मानवी समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे हे मौर्क्सने यासंदर्भात केलेले विश्लेषण त्यामुळेच महत्वाचे ठरते. भारतीय राजकीय प्रक्रियेत या वर्गरचनेस जातीय प्रभावामुळे फारसा प्रभाव पाडता आला नसल्या तरी निवडणूक वर्तनातील एक महत्वाचा घटक म्हणून त्याचे असणारे त्यात कायम आहे.

## महिलांचा राजकीय सहभाग:

भारतीय संविधानाने कोणताही भेदभाव न करता सार्वत्रिक प्रौढ मताधिकार भारतीय नागरिकांना बहाल केला त्यामुळे वयाची २१ वर्षे पुर्ण केलेल्या सर्व स्त्री-पुरुष भारतीय नागरीकांना मतदानाचो व निवडणूक लढविण्याचा, सार्वजनिक पद धारण करण्याचा समान अधिकार प्राप्त झाला. स्वातंत्र्योत्तर भारताने टाकलेले हे सर्वात धाडसी पाऊल मानले जाते. पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत १७ लाखापेक्षा अधिक स्त्री-पुरुषांना मताधिकार मिळाला हि एक जागतिक संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने क्रांतीकारक बाब ठरली. पाश्चात्य देशांमध्ये मताधिकार हा उत्क्रांत होत आला होता. विविध निकषांच्या आधारे पाश्चात्य देशांनी मनाधिकाराचे वितरण केलेले होते. त्यानी स्त्रियांना मताधिकार हा शेवटच्या टप्प्यात प्राप्त झाला होता. अशा पार्श्वभुमीवर भारतीय संविधानाने घेतलेला निर्णय हा क्रांतीकारक मानला गेला. सत्ता संधी व संपत्ती पासुन हजारोवर्षे विन्मुख ठेवण्यात आलेल्या स्त्री समूहास निर्णय प्रक्रियेत व राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची समान संधीचा निर्णयामुळे प्राप्त झाली. परंतु भारतीय समाजाचे पारंपारीक प्रतिमान हे स्त्रियांना अशापद्धतीची उभारी घेण्याच्या दृष्टीने पूरक नव्हते. स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणातील स्त्रियांचा एकूण सहभाग पाहिला तर ही वस्तूस्थिती अधिक स्पष्ट होते. यादृष्टीने स्त्रीवाद, स्त्रीयांची राजकारणातील भूमिका, भारतीय राजकारणातील स्त्री सहभागाचा विकास, स्त्रीयांच्या राजकारणतील समस्या यांची चर्चा व अभ्यास करणे आवश्यक ठरते.

## स्त्रीवाद संकल्पनात्मक मांडणी:

स्त्रीवाद ही एक व्यापक संकल्पना आहे. स्त्रीयांवरील अन्याय, भेदभाव व स्त्रीहक्क यांच्याशी संबंधित विविध सामाजिक सांस्कृतीक, राजकीय, सिद्धांत व तत्वज्ञान यांना एकत्रितपणे स्त्रीवाद असे संबोधले जाते. स्त्रीला तिच्या स्वत्वाची ओळख पटवणारी व तिचे आत्मभान जागे ठेवणारी ही विचारप्रणाली आहे. स्त्रीवादामध्ये मुल्यत्वे स्त्रीला गुलाम करणाऱ्या घटकांचा निषेध अंतर्भूत आहे. स्त्रीच्या दृष्टीकोनातून केलेला वाफवाचा विचार वर्गविरहीत व शोषण रहीत समाजासाठीचा संघर्षही स्त्रीवादास अभिप्रेत आहे. जगामध्ये लैगिंक भेदावर आधारित समाजरचना असल्याकारणाने त्यातून होणारे शोषण हे विषमता निर्माण करते. या वस्तूस्थितीकडे स्त्रीवाद आपल्याला वेधतो.

सारांश, स्त्रीवाद हे पूरूष सत्ताक व्यवस्थेविरूद्द उभारलेले बंड असून ते सर्व क्षेत्रात स्त्रियांच्या समान सहभाग व अधिकाराची मागणी करते.

## भारतातील स्त्री चळवळीचा विकास:

भारतीय राजकारणातील स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग अभ्यासताना भारतीय समाजकारणात स्त्री चळवळीचा अवकाश कला विस्तारीत गेला. याची मांडणी करणे गरजेचे ठरते. त्यातील काही प्रमुख घटक पूढीलप्रमाणे मांडता येतील

### १) समाज सूधारकांचे कार्य:

भारतीय समाज परंपरेत सर्वच धर्मांमध्ये स्त्रीयांना दुय्यम स्थान देण्यात आले होते. सत्ता संधी व संपत्ती या मानवी व्यक्तित्वाच्या आवश्यकेत बाकी आवश्यक असणाऱ्या घटकांना त्यांच्या जीवनात अभाव होता. इंग्रजाचे राज्य प्रस्थापित झाल्यानंतर आधूनिक ज्ञान-विज्ञानाच्या संयोगात आल्यानंतर खऱ्या अर्थाने भारतीय स्त्री जीवनाची अवनती प्रकाशात आली. सुरवातीच्या

काळात ख्रिश्चन मिशनरी वर्गाने स्त्री शिक्षणासाठी पूढाकार घेतला. नंतर भारतीय समाज सूधारकांनी आपल्या समाज सूधारणा चळवळीमध्ये स्त्रीयांच्या प्रश्नांना अग्रक्रम घ्यावयास सुरवात केली. सुरवातीच्या काळात परंपरेच्या नावाखाली निर्माण झालेल्या अमानवी व अघोरी पद्धती नष्ट व्हाव्यात याकरीता समाजिक प्रबोधन व इंग्रज दरबारी या विरोधात कायदे निर्माण करण्याकरीताची सार घालणे अशा दोन पातळ्यांवर हे कार्य सुरु झाले. राजारम मोहन रॉय, म. फूले, सावित्रीबाई फूले, पंडिता रमाबाई, पं. विद्यासागर, न्या. रानडे, महर्षी कर्वे,सुब्रमण्यम भारती, ताराबाई शिंदे यासारख्या विभूतींनी याकामी आपले जीवन समर्पित केले. आर्यसमाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, थिऑसॉफिकल सोसायटी यासारख्या संस्था व संघटनांनीही याकामी आपले अमूल्य योगदान दिले. परिणामी भारतीय स्त्रीवर्गाला शिक्षणाची सार्वजनिक जीवनात वावरण्याची काही प्रमाणात का होईना दारे कीलकीली झाली. व त्यांना बाहेरच्या जगातील आधूनिकतेचा प्रकाश दिसू लागला. स्त्रीयांच्या एकूण विकासाच्या दृष्टीने समाजसुधारकांचे कार्य हे पायाकरणी करणारे कार्य होते असे म्हणता येईल.

### २) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व महात्मा गांधीची भूमिका:

भारतीय स्त्रीयांच्या राजकीय सहभाग वाढण्याच्या दृष्टीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला स्वातंत्र लढा हाही एक पूरक घटक म्हणून महत्वाचा ठरलेला दिसतो. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस सुरवातीच्या काळात उच्चभू व नवाग्रेक्षित पांढरपेशा वर्गापूरतीच सिमित होती. परंतु भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या आंदोलनात जोपर्यंत सर्वसामान्य बहूजन समाज व स्त्रीया सहभागी होत नाहीत तोपर्यंत त्यास खऱ्या अर्थाने राष्ट्रीय चळवळीमध्ये महिलांना सहभागी करून घेण्यासाठी अनेक कार्यक्रमांना सुरुवात केली. गांधीजींनी राबवलेल्या सर्व आंदोलनांमध्ये महिलांचा सहभाग हा वाढता राहिला व त्या खऱ्या अर्थाने राजकीय तत्वांशी सन्मुख झाल्या असे आपण म्हणू शकतो.

### ३) महिला संघटनांचे कार्य:

राष्ट्रीय आंदोलनात महिलांचा सत्ता वृद्धींगत होत गेला त्या प्रमाणात त्यांच्यातील राजकीय आकांक्षाचा ही विकास झाला व त्यातून महिलांच्या अनेक स्वतंत्र संघटना निर्माण व्हावयास सुरवात झाली. ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स १९२७ ही यापैकी एक महत्वाची संघटना ठरली. राष्ट्रीय आंदोलनात महिलांचा ही विकास झाला व त्यातून महिलांच्या अनेक स्वतंत्र संघटना निर्माण व्हावयास सुरवात झाली. ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स १९२७ ही यापैकी एक महत्वाची संघटना ठरली. सुरवतीच्या काळात या संघटनेचे अध्यक्षपद राण्या-महाराण्या भूषवित असत मात्र नंतरच्या काळात स्वातंत्र्य लढ्यात आघाडीवर असणाऱ्या महिलांनी या संघटनेने धूरीणत्व आपल्याकडे घेतले. त्यात प्रामुख्याने सरोजिनी नायडू, कमलादेवी, अरूणा असफआली, अनूसयाबाई काळे, हंसा मेहता इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होता. या संघटनेने संबंध भारतभर आपल्या शाखा स्थापन करावयास सुरवात केली. स्त्रियांमध्ये शिक्षण प्रसार, मालमत्तेचा हक्क, रूढी परंपराच्या जोखडातून मूक्त होण्याविषयीची कामना विकसित करण्यासंदर्भात महत्वाचे योगदान दिलेले दिसते.

महिला संघटनांच्या कार्यामध्ये डाव्या विचारांच्या महिला संघटनांची ही महत्वाची भूमिका मानली जाते. १९४० च्या दरम्यान कोलकत्तामध्ये महिला आत्मरक्षा समिती स्थापन झाली. या समितीने बंगलच्या दुष्काळात फार मोठे काम केले. या संघटनेच्या प्रयत्न व आतहातून भारतात टमनिग चा जन्म झाला. त्यानंतर पंजाब मध्ये स्थापन झालेली वुमेन्स सेल्फ डिफेन्स लीग ही अशाच पद्धतीची कार्य करणारी संघटना होती. फाळणीच्या काळामध्ये या संघटनेने केलेले कार्य अतूलनीय स्वरूपाचे आहे. याच संघटतेने पूढे लोकस्त्री सभा असे नामकरण करून आपल्या

कार्याची व्याप्ती अधिक वाढवली. स्त्रियांवरील कौटुंबिक व सामाजिक अत्याचार उघड करण्यास या चळवळीने प्राधान्य दिले. याशिवाय आंध्रप्रदेशात जमिनदारांच्या अत्याचारापासून स्त्रीयांचे संरक्षण करण्यासाठी स्थापन झालेली आंध्र महिला संधम मद्रास भागात स्थापण झालेली गोल्डन शेक श्रमिक संघ मुंबई मिरज गावातील परळ महिला संघ या संघटना ही महत्वाच्या ठरल्या.

## ४) स्वातंत्र्योत्तर काळातील आंदोलने व संघटना:

स्वातंत्र्योत्तर काळात महिला चळवळीत अखिल भारतीय स्वरूप देण्याची निकड महिलावादी कार्यकर्त्या व नेतृत्वास जाणवू लागली. यातून १९५४ मध्ये डाव्या विचारांच्या संघटनांनी एकत्रित येऊन कोलकत्ता येथे नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन वुमेन ही संघटना स्थापन केली. व या संघटनेने अल्पावधित अखिल भारतीय स्वरुप धारण केले. १९६० च्या दशकात जागतिक स्तरावर स्त्रीवादी चळवळीतील घडामोडींचा प्रभाव भारतीय स्त्रीवादी चळवळीवर पडला. १९४९ साली प्रसिद्ध झालेल्या सिमोन-द-बुऱ्हाच्या दि सेकंड लेक्ल या ग्रंथाचा प्रभाव १९६० च्या दशकात पाश्चात्य समाज जीवनावर पडला. १९४५ ते १९६० हा दुसऱ्या महायुद्धातून पाश्चात्य जग सावरण्याचा कालखंड होता. या अस्वस्थ कालखंडाचा प्रभाव स्त्रीवादी चळवळीवर पडला. १९१५ हे वर्ष संयूक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्याचे जाहीर केले. त्यामूळे संबंध जगभर महिलांचे हक्क, स्त्रीयांचे समानता या विषयाकडे गांभीर्याने पाहू लागले. स्त्रीयांची चळवळ या प्रभावातून सर्व करांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करू लागली. १९७०-१९८० या कालखंडात स्त्री चळवळीच्या विकासात मोठी झेप स्त्रीवादी संघटनांनी घेतलेली दिसते.

## भारतातील स्त्रीयांचा राजकारणातील सहभागाचा विस्तार:

भारतातील राजकारणात स्त्रीयांचा सहभाग हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजतागायत विस्तारत गेला आहे. त्यातील काही प्रमुख घटनांची मांडणी पुढील प्रमाने करता येईल.

१) १९१७ साली भारतीय स्त्रीयांच्या प्रतिनिधिमंडळाने लॉर्ड मॉट्यूंग्यू यांची भेट घेऊन स्त्रीयांसाठी मताधिकाराची मागणी केली.

२) १९२० साली संपत्तीदार स्त्रीयांना मताधिकार बहाल केला. मात्र त्यांना विधिमंडळात प्रवेश नव्हता.

३) १९३० साली वुमेन्स इंडिया असोशिएशन च्या प्रतिनिधींच्या सतत च्या पाठपूराव्याने विधिमंडळ प्रवेश स्त्रीयांना खूला झाला. मुथुलक्ष्मी रेड्डी या पहिल्या प्रतिनिधी म्हणून विधिमंडळावर निवडल्या गेल्या.

४) १९३० साली इंग्लंड येथे आयोजित गोलमेज परिषदेत बेगम जहान आरा शाहनवाझ व राधाबाई लुब्बरायन या स्त्री कार्यकर्त्यांनी स्त्रियांसाठी विधिमंडळामध्ये ५ टक्के आरक्षणाची मागणी केली.

५) १९३५ च्या भारत प्रशासन कायद्याद्वारे स्त्रीयांच्या मताधिकाराचा व विधिमंडळ प्रवेशाचा पाया व्यापक केला गेला. या कायद्यान्वये १९३७ साली घेण्यात आलेल्या प्रांतिक विधिमंडळ निवडणूकांमध्ये ५६ स्त्रीया प्रातिंक विधिमंडळ सदस्य म्हणून निवडून आल्या. तर ३० महिलांची केंद्रिय विधिमंडळावर निवड झाली.

६) १९९२ साली संमिधानात ७२ चा ७३ व्या संविधान दुरुस्तीने पंचायत राज व्यवस्थेत ३३ टक्के आरक्षणाची तरतूद केली. या तरतूदीने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये देशभरात १०

लाखापेक्षा अधिक स्त्रीया राजकारणात प्रविष्ट झाल्या. काही राज्यांनी ही आरक्षणाची तरतूद ५० टक्के पर्यंत केली आहे. राज्यविधिमंडळ व संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक संसदेत दिर्घकाळापासून प्रलंबित आहे.

**जागतिक स्तरावरील महिलांचा राजकीय सहभाग (कनिष्ट सभागृह)**

| अ. क्र. | देशाचे नाव | एकूण जागा | स्त्रियांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | रवान्डा | ८० | ४५ | ५६.३ |
| ०२ | स्वीडन | ३४९ | १६४ | ४७.० |
| ०३ | क्यूबा | ६१४ | २६५ | ४३.२ |
| ०४ | फिनलँड | २०० | ८३ | ४१.५ |
| ०५ | नेदरलँड | १५० | ६२ | ४१.३ |
| ०६ | अर्जेंटिना | २५५ | १०२ | ४०.० |
| ०७ | डेन्मार्क | १७९ | ६८ | ३८.० |
| ०८ | अंगोला | २२० | ८२ | ३७.३ |
| ०९ | कोस्टीरिका | ५७ | २१ | ३६.८ |
| १० | स्पेन | ३५० | १२७ | ३६.३ |
| ११ | न्यूझीलंड | १२२ | ४१ | ३३.६ |
| १२ | नेपाळ | ५९४ | १९७ | ३३.२ |
| १३ | द. अफ्रिका | ४०० | १३२ | ३३.० |
| १४ | स्वित्झर्लंड | २०० | ५७ | २८.५ |

**आधार:-** समकालीन राजकारणांतील महत्वाचे प्रश्न - संपादक भागवत महेश

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की जगातील विकसित म्हणून घेणाऱ्या राष्ट्रांमध्ये महिलांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने मात्र प्रतिकूल चित्र असल्याचे दिसते. भारत महिलांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने १८९ देशांच्या यादीमध्ये १०७ व्या स्थानावर आहे. भारतात केवळ ९.१ टक्के महिलांनाच राजकीय प्रतिनिधित्वाची संधी लोकसभेत प्राप्त झालेली दिसते. पाकिस्तान, इराक सारखी राष्ट्रसूद्धा यादृष्टीने भारतपेक्षा प्रगतशील असलेली दिसतात.

### भारतीय राजकारणातील सहभागात महिलांसमोरील अडथळे/मर्यादा:

भारतीय राजकारणात स्त्रियांचा सहभाग प्रजासत्ताक राज्याची स्थापना होऊन ७० वर्षानंतर ही अतिशय अल्प राहीला आहेय मागील १७ सार्वत्रिक निवडणूकांमध्ये महिलांच्या राजकारणामागील सहभागाच्या मर्यादा सातत्याने पूर्ण झालेल्या दिसतात. त्यातील काही प्रमूख घटकांचा आढावा पूढील मुद्दयांच्या आधारे घेता येईल.

### अ) राजकीय अडथळे:

स्त्रियांच्या राजकीय सहभागात काही राजकीय घटक मर्यादा निर्माण करताना दिसतात. यातील प्रमुख अडथळ्यांची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

### १) राजकारणाचे पुरूषी प्रतिमानः

जगभरात राजकारण व राजकीय जीवन हे पुरुषी मुल्यांवर व जीवन शैलीवर आधारलेले दिसते. राजकारणात स्पर्धा, संघर्ष, हार-जीत यासारख्या मुल्यांना अधिक महत्व व सहकार्य सामंजस्य या बाबीमात्र मागे पडत जातात. हा जागतिक स्तरावरील सार्वत्रिक अनुभव आहे. भारतीय राजकारण ही त्या प्रतिमानास अपवाद असलेले दिसत नाही. त्यामुळे स्त्रियांना राजकारणात सहभागी होण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन मिळत नाही. ज्या स्त्रिया राजकारणात सहभागी होतात. त्या या पुरूषी प्रतिमानाचा स्विकार करूनच पूढे सरसावतात. राजकारण हा तर अलिकडच्या काळात पूर्णवेळ व्यवसाय बनला आहे. त्याकाळी पक्ष संघटनेला पूर्ण वेळ द्यावा लागतो. मात्र कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे स्त्रियांना यासंदर्भात मर्यादा येतात ज्या कोणी स्त्रिया राजकारणत येतात त्यानाही पुरूषी प्रतिमानाच्या प्रभावाखाली बेटी, बहु, बहन, माँ यासरख्या प्रतिमानांचा आचार घ्यावा लागतो हा भारतीय राजकारणातील सार्वत्रिक अनुभव आहे. एकंदरीत राजकारणाचे पुरुषी प्रतिमान भारतात स्त्रियांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने महत्वाचा अडथळा ठरले आहे.

### २) राजकीय पक्षांची भूमिका :

स्त्रियांचा राजकीय सहभाग अल्प राहण्याचे महत्वाचे राजकीय कारण म्हणजे राजकीय पक्षांची दुय्यमी भुमिका होय हेच दिसते. राजकीय पक्ष सार्वजनिक जीवनात, निवडणूकीचत्या राजकारणात, पक्षीय जाहीरनाम्यात महिलांच्या राजकीय सहभागाची मोठी आश्वासने अधोरेखित करतात मात्र वास्तवामध्ये मात्र ते महिलांना राजकीय संधी देण्यासाठी, उमेदवारी देण्यासाठी ही उत्सूक नसतात. स्त्रियांना उमेदवारी देताना ही पक्ष ज्या जागेवर कमजोर आहे अशा ठिकाणांवरून उमेदवारी दिली जाते. स्त्री उमेदवारांच्या पाठीमागे राजकीय पाठबळ पूरेसे उभे करत नाही. पक्षातील निर्णय प्रक्रियेतही स्त्रियांना सहभागी करून घेतले जात नाही. स्त्रियांना उमेदवारी देतानाही पक्षातील वजनदार थराने असणाऱ्या घरातील स्त्रियांनाच उमेदवारी दिली जाते. पक्ष सत्ताधारी बनल्यानंतरही पक्षातील स्त्री उमेदवारांना महत्वाच्या मंत्रिमंडळात सहभागी करून घेतले जात नाही वा प्रभावाच्या जागा दिल्या जात नाहीत. स्त्रियांना स्वतःचा प्रभाव निर्माण करावयाचा असेल वा स्वतंत्र नेतृत्व प्रस्थापित करावयाचे असेल तर ते दोनच परिस्थितीत करता येऊ शकते. एक म्हणजे त्यांना स्वतःचा स्वतंत्र रीजकीय पक्ष स्थापन करावा लागतो. जसे जयललिता, ममता बॅनर्जी, उमा भारती यांनी स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन करून आपले नेतृत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न कलेले दिसतो. दुसरे म्हणजे पक्षातील आपले वडील, पती यांच्या निधनानंतर पक्षातील वापसा या मतांना नेतृत्व निर्माण होते. जसे सोनिया गांधी, इंदिरा गांधी इत्यादी उदाहरणे होत. एकंदरीत, राजकीय पक्षांच्या उदासीन व नकारात्मक प्रवृत्तीमुळे स्त्रियांचे राजकारणातील नेतृत्व अतिशय मर्यादित राहिलेले दिसते.

### ३) निवडणूकांचे राजकारण:

भारतीय राजकीय प्रक्रियेत निवडणूकांचे राजकारणाचे स्वरूप ही महिलांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने प्रतिकूल ठरतांना दिसते आहे. निवडणूकीच्या राजकारणामध्ये चारित्र्य, गुणवत्ता, पात्रता यासारख्या बांबीना प्राधान्य न देता निवडून येण्याची क्षमता हा सर्वाधिक

महत्वाचा निकष नानला जातो आहे. निवडून येण्याच्या क्षमतेमध्ये जात, गून्हेगारी शक्ती पैसा यासांरख्या घटकांना महत्वचे स्थान प्राप्त होताना दिसते आहे. हे निडणूकीचे राजकारणाचे स्वरूप स्त्रियांच्या नैसर्गिक समान वैशिष्ट्यांना प्रतिकूल ठरणारे दिसते त्यामुळे ती एक महिलांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने महत्वाची मर्यादा ठरते.

### ४) निवडणूकविषयक घटनात्मक / कायदेशीर तरतूदी:

अभ्यासकांच्या मते भारतीय संविधानात अंतर्भूत करण्यात आलेली निवडणूक पध्दती व संसदेने वेळोवेळी निवडणूक विषयक पारित केलेले कायदे ही महिलांच्या निवडणूक विषयक सहभागावर मर्यादा आणणारे आहेत. साधारणतः जागतिक संदर्भात असे प्रत्ययास येते की, ज्या देशात साध्या बहूमतावर आधारित निर्वाचन पद्धती आहे त्या देशांमध्ये महिलांच्या राजकीय सहभागाची संधी अल्प ठरते. त्यातूलनेत प्रमाणशीर पद्धतीने स्त्रियांच्या सहभागाची शक्यता वाढते. स्विल्डन, डेन्मार्क, फिनलेंड यासारख्या देशात महिलांना अधिक राजकीय संधी प्राप्त होण्यामागे तेथील निवडणूक पद्धतीला महत्वाचे कारण मानले जाते.

निवडणूक पद्धतीबरोबरच कायदेशीर तरतूदी हा भाग ही महत्वाचा ठरतो. जो स्त्रियांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने निर्णायक भूमिका पार पाडू शकतो. उदा. खांडा या देशामध्ये कनिष्ट सभागृहात ८ जागांपैकी २४ जागा महिलांकरीता राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे साहजिकच खांडामध्ये महिलांचा राजकीय सहभाग वाढण्यास हातभार लागतो. अर्जेटिका मध्ये या संबंधी राजकीय पक्षांना महिलांना ३० टक्के उमेदवारी देणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे तिथेही महिलांचा राजकीय सहभाग वृद्धींगत होताना दिसतो. भारतात ७३ व्या व७४ व्या संविधान दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये ३३ टक्के राखीव जागा दिल्यामुळे महिलांच्या राजकीय सहभागात लक्षणीय बदल झालेला दिसतो.

### ५) भ्रष्टाचार व राजकारणाचे गून्हेगारीकरण:

राजकारणात भ्रष्टचार व गून्हेगारी प्रकृतीचा शिरकाव हा जगातील कोणत्याही देशातील महिलांच्या व लक्ष्य समुहाच्या राजकीय सहभागावर मर्यादा आणतो हे सर्वश्रुत आहे. भरतीय राजकारणात ही मनी, मसल्स, माफिया या तीन मकांरानी आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. त्यामुळे साहजिकच महिलांच्या राजकीय सहभागावर मोठे अडथळे येताना दिसतात.

### ६) प्रशासनाच्या नकारात्मक दृष्टीकोन:

भारतीय प्रशासन व्यवस्थेचे स्वरुप हे पारंपरिकच आहे. त्यामुळे स्त्रियांना मोठ व अधिकाराची पदे मिळणे वा मिळाली तर ती पचने पूरुषसत्ताक मानसिकता असणाऱ्या प्रशासन व्यवस्थेस शक्य होत नाही. राजकारणात प्रतिष्ठ झालेल्या स्त्रियांचा प्रशासनाची अपरिहार्य संबंध येतो. परंतु प्रशासन यंत्रणेकडून राजकारणातील स्त्रीया नेहमीच कुचेष्ठाचा विषय असतात. प्रशासकीय असहकार्यचा अनुभव ही पुरूष राजकारण्यांपेक्षा स्त्रि राजकारण्यांच्या वाट्याला अधिक येतो. या सर्व बाबींचा उबग येऊन महिला राजकारणापासून दूर राहणेच अधिक पसंत करतात.

### २) सामाजिक व आर्थिक मर्यादा:

स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा हाही राजकीय सहभागातील एक महत्वाचा घटक आहे. यामुळे पडणाऱ्या मर्यादांची मांडणी पूढील प्रमाणे करता येईल.

### १) गरीबी व बेरोजगारी:

संयूक्त राष्ट्रसंघाने जागतिक गरीबी संदर्भात जी आकडेवारी प्रसिद्ध केली आहे त्याप्रमाणे जगात १.८ दशलक्ष लोकसंख्या ही दारिद्र्य रेषेखाली जीवन व्यतीत करते. यातील २०% संख्या ही महिलांची आहे. भारतातही दारिद्र्रेषेखाली जीवन व्यतित करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण या रेषेपेक्षा अधिक आहे. यातही महिलांचे प्रमाण ७०% हून अधिक आढळते. रोजगाराच्या दृष्टीने स्त्रीयांना पूरुषांच्या तुलनेत अगदीच नगण्य स्थान प्राप्त झालेले दिसते. एकंदरीत दारिद्र्य व बेरोजगारी यामुळे राजकीय प्रक्रियेकरीता महिलांना आवश्यक उसंत मिळताना दिसत नाही.

### २) दुहेरी जबाबदारीची भूमिका:

पारंपरिक दृष्ट्या स्त्रीयांना चूल व मुल एवढ्यापूरतेच समाजव्यवस्थेने मर्यादित केलेल होते. आधुनिक काळात स्त्रिया आपल्या घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडल्या असल्या तरी कौटुंबिक जबाबदाऱ्यांपासून मात्र त्यांची सुटका झालेली नाही. मुलगी, पत्नी, सून, आई या पारंपरिक जबाबदाऱ्यांचे ओझे आजही त्यांना वागवावे लागते. त्यामुळे स्वाभाविकच दुहेरी जमाबदारीचे ओझे स्त्रियांच्या राजकीय सहभागावर मर्यादा आणतांना दिसते.

### २) निरक्षरता:

स्त्रियांना पारंपरिक समाजव्यवस्थेने ज्ञानबंदी होती. ही ज्ञानबंदी म. फुले व सावित्रीबाई फुलें सारख्या समाजसुधारकांनी उडवून महिलांकरीता ज्ञानाची दारे आधूनिक अर्थाने खऱ्या अर्थानी उघडले. त्यानंतर समाजसुधारकांच्या शिक्षण महर्षींच्या व भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्या शिक्षण घेत्या झाल्या असल्यातरी अद्याप ही स्त्रियांना अद्याप शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवतात. त्यामुळे निरक्षरता हा घटक आवस्यक ज्ञानाची, राजकीय सहभागाची चेतना स्त्रियांमध्ये निर्माण होऊ देत नाही. याअर्थाने निरक्षरता हा घटक ही स्त्रियांच्या राजकीय सहभागावरील एक मर्यादा ठरतो.

### ३) जात व्यवस्था:

भारतीय समाजव्यवस्थेत जात हा अपरिहार्य घटक मानवी जीवनाला प्रभावित करतो. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात पूढे जाताना जात हा घटक आडवा येतो. स्त्रियांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीनेही जात व्यवस्था ही प्रमुख मर्यादा ठरताना दिसतो. कारण जातव्यवस्थेने स्त्रियांनी गौळ स्थान दिलेले आहे. मागासलेल्या जातींना स्त्रीत्वाचे व जातीचे कनिष्ठत्व अशा दुहेरी मर्यादांचा, गौणत्वाचा सामना करावा लागतो.

### ३) मानसिक अडथळे:

राजकीय सहभागाच्या दृष्टीने मानसिक कणखरता व सुदृढता अतिशह महत्वाची मानली जाते. मात्र या दृष्टीकोनातुन बारतीय स्त्रियांमध्ये काही नकारात्मक घटक राजकीय सहभागावर मर्यादा आणताना दिसतात. त्याची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

### १) आत्मविश्वासाचा अभाव:

स्त्रियांना समाजव्यवस्थेत जी वागणूक दिली जाते. समाज रचनेत जो दर्जा व स्थान बहाल करण्यात आले आहे. ते स्त्रियांमध्ये न्युनगंडाची भावना वाढीस लावण्यास महत्वाचे कारण ठरते.

स्त्री ही अधरवेल आहे. मी बालपणी पित्यावर, लक्षणपती पतीवर व म्हातारपणी पूत्रावर अवलंबून असते. त्यामुळे तनि पिता, पती व पूत्राच्या छत्रछायेखालीच रहावे हा संस्कार स्त्रियांवर पालपणापासून होत असल्यामुळे कोणाच्याही आधाराशिवाय राजकारणात उभे राहण्याची वा झेप घेण्याची हिंमत स्त्रियांमध्ये उपजत नाही. त्यामुळे आथ्मविश्वासाचा अभाव ही स्त्रियांच्या राजकारणावरील एक प्रमुख मर्यादा ठरते.

### १) सामाजिक निंदेची भिती:

राजकारणात सक्रिय असणाऱ्या स्त्रियांच्या सामाजिक व्यवहारामध्ये सातत्याने निंदा होते. तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणे ही नित्याची बाब बनलेली असते. राजकीय कार्यक्रमांनिमित्त रात्री अपरात्री दौऱ्यावर असणाऱ्या स्त्रियांच्या चारित्र्यावरच संशय निर्माण केला जातो हा एक प्रकारे मानसिक आघातच असतो. त्यामुळे सामाजिक निंदेच्या दडपणाने वा भीतीने राजकीय प्रक्रियांमध्ये सहभागी होण्यास फारसा उत्सूक दिसत नाहीत.

### २) राजकारणाविषयीची प्रतिमा:

भारतीय राजकीय प्रक्रियेत राजकारणाविषयीची नकारात्मक प्रतिमा हा महिलांच्या राजकारणासंदर्भातीलच नव्हे तर एकूणच भारतीय लोकशाहीच्या विकास व विस्ताराच्या दृष्टीने महत्वाचा अडथळा ठरला आहे. राजकारण हे सभ्य लोकांचे क्षेत्र नव्हे, राजकारण हे बदमाशांचे अड्डा बनले आहे, राजकारण म्हणजे खोटारडेपणा, भ्रष्टाचार, गुंडगिरी याचे क्षेत्र होय. ही राजकारण व राजकारण्यांची प्रतिमा महिलांना राजकारणापासून परावृत्त करण्यात महत्वाची भूमिका बजावताना दिसते. त्यामुळे जगात ज्या देशात राजकीय गुन्हेगारी, भ्रष्टाचार कमी आहे. राजकारणाविषयी सकारात्मक प्रतिमा आहे त्या देशात महिलांचा राजकीय सहभाग हा वाढीव स्वरुपाचा असल्याने आढळते.

सारांश, स्त्रिया या भारतीय राजकीय प्रक्रियेचा एक मह्त्थाराच घटक आहेत. भारतीय संविधानाने स्त्रियांना समान राजकीय अधिकार बहाल केलेले आहेत. परंतु भारतीय समाजव्यवस्थेचे स्वरुप व पारंपरिक समाज जीवनात स्त्रीयांच्या वाट्याला आलेल्या भूमिका यामुळे स्त्रियांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने सकारात्मक घटकांपेक्षा नकारात्मक घटकांची संख्याच अधिक असलेली दिसते. ७३ व्या ७४ व्या संविधान दुरुस्तीने स्त्रियांना मिळालेला राजकीय अवकाश आश्वासक आहे. यातून त्या राष्ट्रीय राजकारणात ही येत्या काळात निश्चितच झेप घेऊ शकतील असा आसावाद बाळगावयास हरकत नाही.

### आदिवासी व भारतीय राजकारण:

भारतीय राजकीय प्रक्रियेत स्वातंत्र्योत्तर काळात जे वंचित समूहांचे राजकारण उदयास आले त्यात आधिवासी समूहांचे राजकारण हाही एक महत्वाचा घटक मानला जातो. भारतीय समाजव्यवस्थेचे पारंपरिक प्रधान वैशिष्ट्ये म्हणून चालूवर्ण्य व जाती व्यवस्था याच घटकांकडे पाहिले जाते. परंतु परंपरागत या चौकटीत न बसणारा व आपले अस्तित्व स्वतंत्रपणे जपणारा एक वेगळा मानवी समाजसमूह भारतीय सामाजिक अवकाशात अस्तित्वात असल्याचे ब्रिटिशांच्या निदर्शनास आले त्यावेळी त्यांनी या समाज समूहास टाईब्ज असा शब्द योजला. याचा अर्थ असा निश्चित होत नाही की इंग्रजांनी आदिवासी जमातींचा शोध लावला. आदिवासी समूह हा भारतातील अतिप्राचीन मानवी समूह आहे. अस्मयुगीन काळापासून भारतात सलग मानवी वस्ती आढळते. आज ज्या जवळपास साडेपाचशे आधिवासी जमाती अधिकृत शासकीय यादीत

समाविष्ट आहेत. त्यांच्यापैकी अनेकानेक जमाती या अतिप्राचीन काळात मानवी समूहांच्या टोळ्यांमधुनच उत्क्रांत झालेल्या आहेत हे स्पष्टपणे जाणवते. एवढेच नव्हे तर पूरातन काळापासून आदिवासी जमातींचा राजकीय प्रक्रियांशी, राज्य या घटकाशी विशिष्ट संबंध प्रस्थापित झालेला होता हे अनुभवास येते. इंग्रजपूर्व काळात भारतात आदिवासींचे काही स्वतंत्र राज्य होती. इंग्रजांशी अधिकारांसाठी संघर्ष करणारा, इंग्रजांविरोधात बंड करणारा भारतीय समूह म्हणून ही आधिवासींनाच प्रथम श्रेय जाते. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींना भारतीय राजकारणात फारशी प्रभावी भूमिका पार पाडण्याची फारशी संधी मिळाली नसली तरी भारतातील आ०दिवासी जमाती राजकीयदृष्ट्या जागृतीच्या दिशेने झपाट्याने मार्गक्रमण करीत आहेत. भारतीय राजकीय प्रक्रियेत एक महत्वाचा समूह म्हणून उदयास येत आहेत. या दृष्टीने आधिवासी समूहांची ओळख, आदिवासी समूहांच्या राजकीय समस्या व राजकारणाचे स्वरुप यांचा अब्यास करणे आवश्यक ठरते.

### आदिवासी संकल्पनात्मक अर्थ:

आदिवासी कोणास म्हणावे या करीता काही विचारवंताच्या या दृष्टीने असणाऱ्या व्याख्यांचा संदर्भ पूढील प्रमाणे घेता येईल.

### १) डॉ. डी एन. मुजुमदारः

समान नाव असणारा एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, विवाह - व्यवसायादि बाबतील समान निषेध नियमांचे पालन करणारा, एकच भाषा बोलणारा, परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याचे दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंबसमूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समूह होय.

### २) गिलिनः

एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या स्थानीय गटांच्या समुच्चायाला आधिवासी असे म्हणतात.

### ३) ई. बी. टायलरः

एका सामाजिक भूप्रदेशात राहणारा व एक बोलीभाषा, सांस्कृतिक एकजिनसीपणा व एकात्मिक सामाजिक संगठन असलेला सामाजिक गट म्हणजे आदिवासी जमात होय. त्यांचे समान पूर्वज, समान देवता व सामान्यतः समान नेतृत्व असते. त्यांच्या गटातील कुटुंबे आर्थिक, सामाजिक, धार्मिक तसेच कौटुंबिक व रक्त संबंधी धाग्यांनी परस्परांशी संलग्न असतात.

आदिवासी कोणास संबोधावे हे या वरील व्याख्यांवरुन स्पष्ट होते. भारतीय संविधानाने याचे उत्तर देताना भारतीय संविधानात अंतर्भूत करण्यात आलेल्या पाचव्या परिशिष्टात समाविष्ट यादीतील वा अनुसुचितील जमातींना आधिवासी हे संबोधन वापरण्याकरीता पात्र मानले आहे.

**भारतातील आदिवासी जमाती (१९८१ च्या जनगणनेनुसार)**

| अ.क्र. | विभाग व एकूण लोकसंख्या | राज्याचे नाव | एकूण जमाती | स्थानिक जमाती |
|---|---|---|---|---|
| ०१ | ईशान्य भारत | आसाम | २३ | ०६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ५.९ दशलक्ष | मेघालय | १४ | - |
| | | नागालँड | ०५ | - |
| | | त्रिपूरा | १२ | ०८ |
| | | अरूणाचल प्रदेश | १९ | ११ |
| | | मणिपूर | २९ | १९ |
| ०२ | मध्य पूर्व भारत<br>१४.८ दशलक्ष | ओरीसा | ६२ | २८ |
| | | बिहार | ३० | - |
| | | प. बंगाल | ३८ | १ (मृ) |
| | | सिक्कीम | ०२ | - |
| | | अंदमान-निकोबार बेट | ०६ | ०६ |
| ०३ | पश्चिम मध्य भारत<br>२६.९ दशलक्ष | मध्यप्रदेश | ४६ | १३ |
| | | महाराष्ट्र | ४७ | ०३ |
| | | गुजरात | २९ | ०९ |
| | | राजस्थान | १२ | ०१(मराशिया) |
| | | दादरा नगर हवेली | ०७ | - |
| | | गोवा, दीव, दमण | ०५ | |
| ०४ | दक्षिण भारत<br>५.८ दशलक्ष | आंध्र प्रदेश | ३३ | १३ |
| | | कर्नाटक | ४९ | १३ |
| | | तमिळनाडू | ३६ | १ (मल्याळी) |
| | | केरळ | ३६ | ०४ |
| | | लक्षद्वीप | ०१ | ०१ |
| ०५ | उत्तर भारत<br>४.३ दशलक्ष | उत्तर प्रदेश | ०५ | ०५ |
| | | हिमाचल प्रदेश | ०८ | ०८ |

## ब्रिटीश काळ व आदिवासी समूहः

आदिवासी जनजीवन हे मुलतः मुख्य समाजप्रवाहापासून दुर डोंग दऱ्यात, जंगलात हजारो वर्षापासून परंपरागत पद्धतीने चालत आले होते. भारतात अनेक आक्रमणे काळाच्या ओघात झाली. त्या आक्रमकांच्या सत्ता स्थापित झाल्या, विसर्जित झाल्या तरी आधिवासी जनजीवन फारसे कधी ढवळून निघाले नाही वा प्रभावित झाले नाही. मात्र इंग्रजांचे आक्रमण हे इतर आक्रमकांपेक्षा अनेक अर्थांनी वेगळे होते. इंग्रजांनी संबंध भारतभर असणाऱ्या संसाधनांवर आपली मालकी प्रस्थापित करण्यीा मोहीम गतिमान केली. तसा त्यांचा प्रथम संघर्ष हा आदिवासी समूहांबरोबरच झाला. कारण जंगल, जमीन व पाणी हे आदिवासी समूहाचे जीवन जगण्याचे महत्वाचे संसाधन होते. त्या संसाधनावरुनच इंग्रज राजवटीने आदिवासींचा अधिकार काढून त्यांना परके व पोरके केले. त्यांच्या हजारो वर्षाच्या धर्म परंपरामध्ये बहुल धर्म असणाऱ्या हिंदु धर्मानेही कधी फारशी ढवळाढवळ केली नव्हती. मात्र इंग्रज राज्यकर्त्यांबरोबर आलेल्या ख्रिश्चन मिशनरी वर्गाने आपले पहिले बस्तान आदिवासी भागांमध्येच बसवले. त्यामुळे इंग्रजी राजवटीचे दुहेरी आक्रमण आदिवासी जनजातींवर झालेले दिसते. त्यामुळे इंग्रजी राजवटीत अगदीच

प्रारंभीच आधिवासी समूह भांबावली. तो इंग्रज सत्तेच्या विरोधात उबा राहिला व त्यातुन सशस्त्र बंड ही या समूहाने पूराकले.

ब्रिटिश काळात आदिवासी समूहांनी इंग्रज सत्ता नाकारण्यासाठी व आपल्यावरील इंग्रजी सत्तेचा अंमल दुर करण्याकरीता अनेक छोटी-मोठी बंड सातत्याने केली. या बंडामध्ये भिल्ल ही आदिवासी जमानत अग्रेसर होती. संथाळ या जमातीचे योगदान ही यादृष्टीने सर्वक्षुत आहे. संथाळ या आदिवासी जमातीमध्ये १८३२ मध्ये गंगा नारायण संथाळ याच्या नेतृत्वाखाली भूमजी मूव्हमेंट या नावाने प्रसिद्ध असलेली आदिवासींच्या अदिकारांसाठी सुस्त झालेली चळवळ १८३२ पासूनच कार्यन्वीत झाली होती. आदिवासी समाजाचे जमीनदार व व्यापारी यांचेकडून जे शोषण होत होते त्याविरोधात उभी राहिलेली ही चळवळ गंगा नारायण कंडू व सिद्धा संथाळ यांनी १८५० पर्यंत सतत कार्यन्वीत ठेवली. भिल्ल जमातीतील उमेद वसावा यांनी १८७३ ते १८८२ या काळात राजपिपला स्टेटच्या पाचडोंगरी जिल्ह्यात उभारलेली चळवळ ही महत्वाची ठरली. १८५७ च्या बंडात तात्या टोपे आदिवासी जमातींनी सर्व प्रकारची मदत केल्याचे दिसते. इंग्रज काळात आदिवासींच्या शोषणा विरोधात १८९७ मध्ये बिरसा भगवान मुंडा यांनी उभी केलेली चळवळ सर्वात महत्वाची मानली जाते. ब्रिटिशांकडून होणाऱ्या शोषणाविरोधात ओरिसातील कोहान विभागत १८१९ साली प्रखर चळवळ उभी राहिली व इंग्रजांना तेथील आदिवासींना विशेष संरक्षण देण्याकरीता नियम पारित करारे लागले. नाना भगत यांनी उदाँव आधिवासी जमातीचे नेतृत्व करत १९१४ पासून ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध अहिंसात्मक लढा उभा केला.

अशा पद्धतीने ब्रिटिश राजसत्तेस विरोध करण्याचे प्रथम क्षेत्र आदिवासी जमातींनाच जाते. आदिवासी जमातींनी जंगल, जमीन, पाणी या आपल्या जीवनाच्या मूलभूत संसाधनावरची मालकी राखण्याकरीता व आफल्या विशिष्ट संस्कृती व समाजजीवनाचे संरक्षण करण्याकरीता सशस्त्र व अहिंसात्मक अशा दोन्ही पद्धतीने लढा उभा केला होता. परंतु आधूनिक अर्थाने ज्यास राजकीय आकांक्षा, राजकीय जागृती असे जे संबोधन वापरले जाते त्यास आधिवासींची ही समज पात्र करु शकत नाही हे ही तितकेच खरे.

**भारतीय स्वातंत्र्य लढा व आदिवासी:**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याची व्याप्ती प्रारंभी अतिशय मर्यादित होती. पांढरपेशा वर्गाने इंग्रज सत्तेकडे भारतीय लोकांच्या मागण्या सनदशीर मार्गाने पोहचवण्याकरीता रितसर भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना ती ही एका इंग्रज सनदी अधिकारी असणाऱ्या सर ॲलन ध्युम मार्गदर्शनाखाली केली होती. काळाच्या ओघात या सभेची उद्दिष्टये विस्तारत गेली. त्याप्रमाणात जन आंदोलनाची व्याप्ती व सामाजिक आधार ही वृद्धींगत होत गेली. १९२० साली म. गांधीकडे स्वातंत्र्य लढ्याची सूत्रे गेल्यानंतर त्यांनी बहुजन, कष्टकरी, दलित, आधिवासी, स्त्रिया या वंचित समूहांना राष्ट्रीय आंदोलनात सहभागी करुन घेण्यासाठी विविध आघाड्यांवर प्रयत्न केले. त्यातुन आदिम जाती सेवक संघाची स्थापना महत्वाची ठरली. या सेवक संघाच्या माध्यमातून आदिवासी समाजामध्ये ही जाणीव जागृती चे कार्य मोठ्या प्रमाणावर पार पाडण्यात आले. श्री ठक्कर बाप्पा हे या चळवळीचे अध्वर्य ठरले. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत तर आदीवासी समाजाचे योगदान वाखाणण्या योग्य होते. जंगल सत्याग्रहात आदिवासी समूह देशभर आघाडीवर होता. विशेषतः महाराष्ट्रात जंगल सत्याग्रहाची उग्रता अधिक होती.

एकंदरीत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी समूहांना सामावून घेण्याकरीता प्रयत्न झाले. आधिवासी समूहांनी या प्रयत्नांना प्रतिसाद ही दिला मात्र तो प्रतिसाद आदिवासी समूह मुख्य प्रवाहात येईल इतपत नव्हता हे निश्चित.

## भारतीय संविधान व आदिवासींचे घटनात्मक संरक्षण:

स्वातंत्र्योत्तर काळात दलित व आदिवासी समूहांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरीता त्यांना विशेष अधिकार देण्याशिवाय पर्याय नाही याची स्पष्ट जाणीव संविधानकारांमध्ये होती. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित व आदिवासी समूहांच्या घटनात्मक संरक्षणाकरीता आग्रही होते. त्यातुनच आदिवासी जनसमूहांना शिक्षण व नोकऱ्यांमधील राखीव जागा लोकसंख्येच्या प्रमाणात राहतील हे निश्चित झाले. भारतीय संसदेत व राज्यविधिमंडळामध्ये राजकीय प्रतिनिधित्व आदिवासी समूहांना मिळावे या करीता राजकीय आरक्षणाची तरदूद संविधानात अंतर्भूत करण्यात आली. राजकीय आरक्षणास सुरवातीच्या काळात १० वर्षांची मुदत असी तरी संसदेने वेलोवेळी कायदे करुन ही मूदत आजतागायत वाढवलेली आहे. यापूढे ही ती वाढवली जाईल. आदिवासींना शोषणापासूनचे संरक्षण मिळावे, कायदेशीर संरक्षण प्राप्त व्हावे याकरीता संविधानात मूलभूत तरतूदी करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे आदिवासी समूहांमध्ये जाणीव जागृतीची प्रक्रिया निर्माण होण्यात निश्चितच मदत होताना दिसते आहे.

## स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी राजकारणाचे अविष्कार:

भारतीय संविधानाने आदिवासींना दिलेले विशेष राजकीय अधिकार, सार्वत्रिक प्रौढ मताधिकार व संसदीय शासनपद्धती चा अंगीकार या सर्वामधुन आदिवासी जमातींनी जो प्रतिसाद दिला व राजकीय पक्ष व संघटना यांनी आदिवासी जनसमूहांना आपल्याकडे आकर्षित करवून घेण्याकरीता जे प्रयोग केले त्यातून स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी राजकारणा संदर्भात काही राजकीय प्रयोग अविष्कृत झालेले दिसतात त्यातील महत्वाच्या घटकांचा आढावा पूढील प्रमाणे घेता येईल.

### १) सुधारणावादी प्रतिमान:

स्वातंत्र्यपूर्व काळापासून डोंगरदऱ्यात जंगलात वास्तव्यास असणाऱ्या, भारतीय समाजाच्या मुख्यप्रवाहापासून कोणी दूर असणाऱ्या आदिवासी जन-जमातींवर ख्रिश्चन मिशनरी वर्गाचा डोळा गेला. धर्म-प्रसाराचे प्रधान उद्दिष्ट ढेवून आदिवासी समूहांना शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधांकरीता सेवाभावाने कार्यकरत ख्रिश्चन मिशनरी वर्गाने आधिवासी भागात आपला प्रभाव निर्माण केला. ख्रिश्चन मिशनरी वर्गाने नकळत आधिवासी जमातींच्या राजकीय आकांक्षा ही जाग्या करण्याचे कार्य केले. स्वातंत्र्योत्तर काळातही ख्रिश्चन मिशनरी वर्गाचे आदिवासी भागातील सेवेचे कार्य अविरत चालुच आहे. यातुन जागृह होत असलेल्या आधिवासी समूह प्रामुख्याने सुधारणावादी वृत्ती स्वीकारतन राजकीय जाणीवाचा, अधिकारांचा वापर आधिवासींच्या भौतिक व सांस्कृतिक, सामाजिक विकासासाठी वापरताना दिसतो. मात्र या प्रतिमानाच्या माध्यमातून आदिवासी समूहांचे होत असलेले धर्मपरिवर्तन हा स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच टिकेचा विषय राहिला आहे. समकालिन संदर्भातकर त्याने अधिक उग्र स्वरुप धारण केलेले दिसते.

### २) पारंपरिक पूनरुज्जीवनाची प्रतिमान:

ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्यास पायबंद घालण्यासाठी व ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्याची सकारात्मक व नकारात्मक प्रतिक्रिया म्हणून एतद्देशीय भारतीय मुलतत्व वादी संघटना व संख्यानी आधिवासी जमातींमध्ये सेवेच्या कार्यास प्रारंभ केला. शिक्षण, आरोग्य रोजगार, शासकीय योजना, हक्क व अधिकारांची अंमलबजावणी असा विविध स्तरांवर या संस्था व संघटना आदिवासी समूहांना सहाय्य-मदत करुन आधिवासी समूहांमध्ये बस्तान बसविण्याचा

प्रयत्न करताना दिसत आहेत. या गटाचा प्रयत्न प्रामुख्याने आदिवासी समूहांना हुंदु धर्मव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याचा आहे. त्यासाठी हे प्रतिमान प्रामुख्याने आदिवासी समूहांच्या सांस्कृतिकीकरणावर प्रामुख्याने भर देताना दिसतात. त्यातुनच आधूनिक हिंदुत्वाची दिक्षा घेण्यात आदिवासी जमाती पूढे सरसावलेल्या दिसतात. धार्मिक दंगलीमध्येही आदिवासी समूहांचा वाढता सहभाग हे या प्रतिमानाचेच दृष्य स्वरुप मानले जाते. त्यामुळे आदिवासी राजकारणाचे या पद्धतीने होणारे राजकीय अविष्करण भारतीय संविधानाच्या आशयाविरोधी जाणारे आहे हे स्पष्टपणे जाणवते.

### ३) क्रांतीवादी प्रवाह:

स्वातंत्र्योत्तर काळात आधिवासी जनसमूहांच्या राजकीय आकांक्षाचे उग्र स्वरुप क्रांतीवादी प्रवाहात सामील होऊन नक्षलरादाच्या स्वरुपात व्यक्त झाले आहे. मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षातील अतिजहार गटाने पक्षातुन बाहेर पडून माओवादी-लेनिनवादी कम्यूनिष्ट पक्षाची स्थापना केली. प. बंगालमध्ये संन्याल आणि मुजुमदार यांच्या नेतृत्वाखाली नक्षलवादी या गावात जो हिंसक उद्रेक या गटाने केला त्यामुळे या विचार प्रवाहास नक्षलवाद हे नामभिदान रुढ झाले. क्रांती बंदुकीच्या नळीतुनच येते या माओच्या तत्वावर या गटाची श्रद्धा आहे. नक्षलरादाचा मुख्य वाहक समूह हा प्रामुख्याने आदिवासीच राहिला आहे. आदिवासी बहुल पट्ट्यामध्ये नक्षलवादाने आपली मुळे घट्ट रोवलेली दिसतात.

एकंदरीत आदिवासी भागातील वाढत्या व धुमसत्या असंतोषाची प्रमुख अभिव्यक्ती ही नक्षलवादाच्या माध्यमातुन होते आहे. परंतु हा ही एक प्रकारे आदिवासी जमातींना वापरुन घेण्याचाच प्रकार मानला जातो. भारतीय संविधानाने प्रस्थापित केलेली लोकशाही स्वातंत्र्योत्तर काळात प्रचलित झालेले मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारुप यांना नाकारत साम्यवादी समाजरचनेचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या माओवादी-लेनिनवादाची चळवळ नक्षलवादी स्वरुपात पायावर उभी राहिलेली आहे. नक्षलवादी गटांना मोडीत काढण्यासाठी पोलिसी कारवाया ही नित्याची बाब झाली आहे. असा परिस्थितीत आदीवासी जनसमूह पोलिस व नक्षलवादी या दोन्हीं शक्तींच्या दमन शक्तीची शिकार होताना दिसतो आहे. त्यामुळे या पद्धतीने जागृत झालेल्या आदिवासी समूहांच्या राजकीय आकांक्षा इकडे आड तिकडे विहीर असा पद्धतीच्या अवस्थेपर्यंत येऊन पोहचल्या आहेत.

### ४) परिवर्तनवादी प्रतिमान:

आदिवासी भागांमध्ये स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून शिक्षण आरोग्य व आदिवासींचे घटनात्मक-कायदेशीर संरक्षण या संदर्भात समर्पित भावाने कार्य चालु आहे. यातुन निर्माण झालेल्या आदिवासींच्या राजकीय जीवा, राजकीय आकांक्षा या परिवर्तनवादी भूमिकेतून प्रशासन व राज्यकर्ते यांच्या प्रस्थापित व्यवस्थे विरुद्ध संघर्ष करताना आढळतात. वेठबिगारी, सावकारांकडून, ठेकेदारांकडून, पोलिस व प्रशासनाकडून होणारे शोषण व दमन या विरोधात संविधानात्मक मार्गाने आंदोलने करण्याचा मार्ग हे प्रतिमान आधिवासी जनसमूहांपूढे ठेवतात. परंतु शहरी भागालगत असणाऱ्या मुख्य प्रवाही समाजांपासून नजिक असणाऱ्या आधिवासी समूहांमध्येच प्रामुख्याने हे प्रतिमान कार्यरत असलेले दिसते. दुर्गम भागात या पद्धतीच्या स्वयंसेवी संस्था कार्यरत असल्यानही त्यांच्यावर यादृष्टीने मर्यादाच अधिक दिसतात. तरीही संवैधानिक व कायदेशीर हक्कांप्रती सलग करण्याचे व आधिवासी समूहांच्या राजकीय आकांक्षा जागृत करण्याचे महत्वपूर्व कार्य या प्रतिमानाच्या माध्यमातून पार पाडले जात असलेले दिसते.

### ५) स्वतंत्र व स्वायत्त राज्यांची मागणी:

आदिवासी समूहांना राजकीय सत्ता स्थान, अधिकाराच्या जागा या स्वतंत्र व स्वायत्त राज्य स्थापनेशिवाय उपलब्ध होऊ शकणार नाहीत. या भावनेतून स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींचे स्वतंत्र व स्वायत्त राज्य निर्माण करणाऱ्या, आधिवासींच्या संरक्षणार्थ कायदेशीर तरतूदी कवण्यास बाध्य करणाऱ्या अनेक चळवली व आंदोलने स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेले दिसतात. स्वतंत्र झारखंडचे आंदोलन हे यापद्धतीचे सर्वात जूने आंदोलन होय. नैसर्गिक दृष्ट्या अतिशय संपन्न असणाऱ्या झारखंड भागात दारिद्र्य व मागासलेपणाचे उच्चांक प्रस्थापित झाले होते. झारखंडच्या नैसर्गिक साधन संपत्तीच्या संसाधनाचा उपयोग बिहारच्या मुख्य प्रवाही समूहांकरीता राज्यकर्ते करतात. हा या चळवळीचा मुख्य आरोप होता. त्यातुनच स्वतंत्र झारखंड राज्याची मागणी करणारे आंदोलन १९४८ पासूनच उभे राहिले होते ते २००० साली यशस्वी झाले. ईशान्य भारतातील आदिवासी समूह आपल्या विकास व सांस्कृतिक रक्षणासाठी स्वतंत्र व स्वायत्त राज्याची मागणी, कायदेशीर संरक्षणाच्या तरतूदीसाठी आग्रही असलेल्या दिसतात. या माध्यमातून आदिवासी समूह खऱ्या अर्थाने त्या-त्या भागात राज्यकर्ती जमात बनु शकेल असे या प्रतिमानाचे पूरस्कर्ते प्रतिपादन करताना दिसतात. मात्र वास्तवात बहुसंख्य आधिवासी समूहांना याचे लाभ मिळताना दिसत नाहीत.

### ६) आमचे गाव-आमचे सरकार:

आमचे गाव-आमचे सरकार हे आधिवासी समूहांच्या नव-जागृतीचे, राजकीय आकांक्षाचे एक अभिनव व्यक्त स्वरुप म्हणून पूढे आले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात वन्यप्राणी-वन्यजीव यांचे संरक्षण करण्याकरीता आग्रहाने अभयारण्यांची स्थापना केली गेली. परंतु या अरण्यांमध्ये राहणाऱ्या आदिवासी जनसमूहांना मात्र त्यांच्या मुळ ठिकाणांवरुन हुसकावुन लावण्याची मोहीम विकास प्रकल्पाच्या नावाखाली जोरदार चालु आहे. आधिवासी समुहांमध्ये आपल्या राहत्या ठिकाणाहून हुसकावून लावण्याची भीती कायम टांगती तलवार म्हणून उभी आहे. याची प्रतिक्रिया म्हणून आदिवासी समूहांनी जाहीर केले की, आमची भूमी, आमचे जंगल आमचे जलस्त्रोत आमचे जीवनादार, आमची पवित्र स्थळे सर्वांचे मिळून बनलेले आमचे निवास क्षेत्र आमच्या पासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. आम्हाला त्यापासून कोणी वंचित वा बेदखल करु शकत नाही.

आदिवासी समूहांच्या या राजकीय आकांक्षांना पंचायतराज व्यवस्थेच्या अंमलबजावणीने अधिक बळ मिळालेले दिसते. त्यामुले आदिवासी समूहांच्या राजकीय आकांक्षांना-जागृतीला नवी दिशा प्राप्त झाली आहे. भारतीय संसदेने ७३ वी व ७४ वी संविधान दुरुस्ती करुन स्थानिक स्वशासनाचा मार्ग अधिक प्रशस्त केला. मात्र हा कायदा आदिवासी भागांना लागू करु नये. आदिवासी समूहांची वेगळी परिस्थिती व परंपरा, सामाजिक संस्था ध्यानात घेऊन त्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव तयार करावा अशी मागणी बहूतांशी आदिवासी संघटनांकडून होत होती. त्याचा आदर ठेवून केंद्र सरकारने ही घटनादुरुस्ती त्वरीत लागू न करता अनुसुचित जमातींच्या क्षेत्राचा विचार कवण्यासाठी खासदार दिलिपसिंग भूरिया यांच्या अध्यक्षतेखाली एक संसदीय समिती स्थापन कवण्यात आळी. आदिवासींच्या पारंपरिक व्यवस्थेचा आधर करीत व त्या पायावर एक पर्यायी रचना सुचविणारा अहवाल सादर केला. या अहवालाच्या शिफारशींवर आधारलेल्या पंचायती संबंधीच्या तरतूदी अनुसुचित जमातींच्या क्षेत्रात लागू करणारा कायदा १९९६ साली लोकसभेने मंजूर केला व २४ डिसेंबर १९९४ रोजी तो अंमलात आला. या कायद्याने संसदीय

लोकशाहीचे धडे आदिवासी जनसमूहास मिळण्याची आसादायी शाश्वतता आहे असे आपण म्हणू शकतो.

**आदिवासी राजकीय सहभागाच्या मार्गतील अडथळे:**

स्वातंत्र्योत्तर भारतात संसदीय शासनपद्धतीची अंमलबजावणी होऊन ही लोकसंख्येच्या ८% च्या जवळपास असणारा जनसमूह राजकीय प्रक्रियेत पूरेशा प्रमाणात सहभागी होऊ शकलेला नाही याची प्रमुख कारणे प्रामुख्याने पूढील प्रमाणे मांडता येतील.

**१) राजकीय परंपराचा अभाव:**

संसदीय लोकशाहीत एखादी व्यक्ती वा समूह कार्यन्वीत होताना समाज व समूहांची राजकीय परंरेची वहिवाट असेल तर तो राजकीय सहभाग सहज शक्य होतो. मात्र आदिवासी जमातीकडे असापद्धतीची कोणतीही पारंपिक वहिवाट आढळत नाही त्यामुले ही एक प्रमुख मर्यादा ठरली.

**२) निरक्षरता / अज्ञान:**

निरक्षरता व राजकीय हक्क व अधिकाराप्रती, कर्तव्याप्रती असणारे अज्ञान हा ही आदिवासी समूहांच्या राजकीय सहभागातील एक महत्वाची मर्यादा आहे.

**३) संघटितपणाचा अभाव:**

आदिवासी समूह हा आपल्या कुळा पूरता वा वाड्यांपूरताच संघटितपणाचा आवाका जाणून आहे. एक समूह वा समाज म्हणून संघटित होण्याच्या वृत्तीचा, ज्ञानाचा त्याच्या ठायी अभाव आहे. त्यामुळे जन-जमातींचे हे सुटेपण राजकीय हभागातील एक प्रमुख मर्यादा ठरते.

**४) लोकसंख्येचे वितरण व भौगोलिक स्थान:**

आदिवासी समूहाची लोकसंख्या ही देशातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास ८% असली तरी लोकसंख्येचे वितरण हे विरळ स्वरुपात देशभर विखुरलेले आ-. त्यामुळे कोणत्याही राजकीय पक्षावर या लोकसंख्येच्या दबाव वा प्रभाव निर्माण होताना दिसत नाही तसेच या जमातीय समूहांमध्ये संघटित होण्याची प्रेरणा उपजत नाही. त्यातच भौगोलिक स्थान हे राजकीय सहभागाच्या संसुजनांच्या साधनांपासून कोसो दूर आहे. त्यामुले राजकीय सहभाग वाढीस मर्यादा पडतात.

**५) राजकीय सामाजीकरणाच्या अभाव:**

राजकीय सहभागाची एक आवश्यक पूर्वपार म्हणून राजकीय सामाजीकरणाच्या घटकाकडे पाहिले जाते. मात्र आदिवासी जन समूहामध्ये राजकीय सामाजीकरणाच्या साधनांची व माध्यमांची वानवा आहे. त्यामुळे राजकीय सहभागाच्या दृष्टीने सकारात्मक मानसिकता तयार होण्यात मर्यादा येते स्वाभाविक ठरते.

**६) मूलभूत गरजांची वानवा:**

राजकारण वा राजकीय सहभाग हा फूरसतीचा विषय आहे. राजकीय सहभागासाठी सवड हा महत्वाचा घटक आवश्यक मानला जातो. मात्र आदिवासी जनसमूहांना आपल्या मूलभूत

गरजांच्या परिपूर्तीतच आपले संबंध जीवन पणाला लावावे लागते. राजकारण, राजकीय सहभाग यासाठी त्यांच्याकडे सवड च नसते त्यामुळे यादृष्टीने आवड निर्माण होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

### ७) प्रशासनाची भूमिकाः

वास्तविक पाहता मुख्य समाज प्रवाहांपासून दूर असणाऱ्या समूहांचे राजकीय सामाजीकरण कवण्याचे कार्य हे प्रशानावर सोपवलेले असते मात्र प्रशासन हे कार्य केवळ कागदावर वा मतदान दिवसाच्या निमित्ताने आयोजित एखाद्या प्रभात फेरी पूरते मर्यादित करताना दिसते. प्रशासनाची आपल्या कार्यापूरती उदासिनता ही आदिवासींच्या राजकीय सहभागातील एक मर्यादाच आहे.

### ८) राजकीय पक्षांची भूमिकाः

राजकायी पक्ष हे लोकमत जिवंत ठेवण्याचे एक माध्यम म्हणून संसदीय शासन पद्धतीत कार्यरत असतात. परंतु भारतातील राजकीय पक्ष असापद्धतीने लोकमत घडविण्याचे, संसदीय शिक्षण देण्याचे कोणतेही कार्य पार पाडताना दिसत नाही. त्यांचे कार्य हे इलेक्शन टू इलेक्शन एवढ्यापूरते सिमित झालेले दिसते. निवडणूका जिंकवणे एवढेच राजकारण त्यांना स्वतःलाच अभिप्रेत असल्यामुळे ते राजकीयदृष्ट्या असाक्षर असणाऱ्या समूहांना साक्षर वा सळग करतील ही अपेक्षा दुरापास्त करते. एकंदरीत राजकीय पक्षांचे असंसदीय राजकारण ही आदिवासी समूहांच्या राजकीय सहभागातील एक मर्यादा ठरते.

सारांश, आधीवासी समूह हा स्वतंत्र भारतातील राजकीय दृष्ट्या एक महत्वाचा समाजघटक आहे. मात्र अद्यापही तो मुख्य राजकीय प्रवाहापासून दूरच आ-. भारतीय संविधान कारांनी या समूहांच्या हक्क व अधिकारांना संवैधानिक दर्जा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न संविधानिक तरतूदींच्या माध्यमातून केलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात त्यास अनेक पूरक कायदेही पारित झाले मात्र अंमलबजावणीच्या पातळीवर सर्वकाही अलबेल राहिले. आदिवासी समूहांचे पारंपरिक मागासलेपण दुर सारण्याऐवजी, त्यांच्यात आधूनिक प्रवाहांशी सन्मुख होणारे आथ्मभान निर्माण कवण्याऐवजी त्यांच्यातील असंतोषाच्या पायावर नक्षलवादासारख्या चळवळी उभ्या राहिलेल्या दिसतात. हे आदिवासी समूहाच्या भवितव्याच्या दृष्टीने चिंतनीय आहे या निष्कर्षाप्रत आपण येतो.

## ३.६ सारांश

सारांश, भारतीय राजकारणात जात, वर्ग, जमात व लिंगभावाचे राजकारण हा समकालिन संदर्भातील निर्णायक घटक आहे. १९८० नंतरचे दशक हे जात-जमातीय रंगानी रंगून गेलेले दिसते. जात व्यवस्थेकडे असणाऱ्या पारंपरिक घटकांचा राजकारणावर अमिट स्वरुपाचा जसा प्रभाव पडला आहे तसाच राजकारणाचा ही जातीव्यवस्थेवर प्रभाव स्पष्टपणे जाणवतो आहे. त्यामुळे जात व राजकारण यातील सहसंबंध केवळ एकेरी स्वरुपाचे नसून ते दुहेरी तारेने जोडले गेले आहेत व त्यातुन भारतीय राजकीय प्रक्रियेवर एक वेगळा असा ठसा उमटला आहे. भारतीय समाजव्यवस्थेत वर्गीय रचनांचा प्राचीन भारतीय समाजजीवनात फारसा प्रभाव पडला नसला तरी १९९० च्या राजकारणात वर्गीय जाणीवांनी ही मोठे योगदान उभे केलेले दिसते. सत्ता, संधी व संपत्तीपासून पारखा ठेवण्यात आलेल्या महिला समूहास स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची समान संधी दिली. मात्र महिलांचा राजकीय सहभाग मात्र समाधानकारक गतीने पूढे येऊ शकला नाही. सामाजिक, मानसिक, आर्थिक व राजकीय

घटकांनी त्यावर अनेक मर्यादा टाकल्या. मात्र ७३ व्या व ७४ व्या संविधान दुरुस्तीने महिलांना पंचायतराज व्यवस्थांमध्ये खुले झालेले राजकीय अवकाश क्रांतीकारी पाऊल ठरले. एकाच वेळी देशातील दहा लाख महिला राजकीय क्षेत्रात पदाधिकारी झाल्या, राजकीय सहभागाचे धडे त्यांनी मिरवावयास सुरुवात केली. देशातील सर्वात मागे राहिलेला समूह म्हणजे आदिवासी जमाती. भारतीय संविधानाने लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय आरक्षण प्रदान केले असले तरी आदिवासी जमातींच्या जीवनाचा अभ्युदय मात्र परिणामकारक रीतीने होऊ शकला नाही. आज आदिवासी समूहांचे राजकारण हे नक्षलवादासारख्या समस्येने ग्रासलेले दिसते. एकंदरीत भारतीय राजकीय प्रक्रियेत जात जमातीय समूह, वर्गीय रचना व लिंगभावाची भावना या घटकांचे अनन्य साधारण महत्व आहे.

## ३.७ आपण काय शिकलो?

प्र.१ भारतातील जात व राजकारण या घटकाचे मुल्यमापन करा.

प्र.२ प्रभूत्वशाली जात समूहाचे राजकारण यावर निबंध लिहा.

प्र.३ ओबीसी जाती समूहाच्या राजकारणाचे विश्लेषण करा.

प्र.४ दलित जातीसमूहाचे राजकारण सविस्तर विशद करा.

प्र.५ भारतातील वर्गीय रचना व राजकारण याचा सहसंबंध मांडा.

प्र.६ भारतातील महिलांच्या राजकीय सहभागाचे परीक्षण करा.

## ३.८ संदर्भ सुची

१. कुलकर्णी बी. वाय, ‘भारतातील शासन व राजकीय प्रक्रिया’ एज्युकेशनल पब्लीशर्स, औरंगाबाद, २०१३

२. बंग के. आर, ‘भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया,’ विद्यायुक्त पब्लीशर्स, औरंगाबाद २०११.

३. भोळे भा. ल. ‘भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण, ’ पिंपळापूरे पब्लिकेशन्स, नागपूर २००३

४. बकाणे छाया, ‘भारतीय राजकीय व्यवस्था आणि राजकीय प्रक्रिया,’ विद्या प्रकाशन, नागपुर २०१३

५. जैन अशोक, ‘भारतीय राजकीय व्यवस्था,’ शेठ पब्लिकेशन्स, मुंबई २००३

६. पाटिल बी. बी. ‘भारतीय शासन व राजकारण,’ फडके प्रकाशन, कोल्हापूर २०१२.

*****

# ४

# राजकारण ओळख - II

**घटक रचना**

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ जमातवादी राजकारण

४.३ धर्मनिरपेक्षता व राजकारण

४.५ भाषा व राजकारण

४.४ प्रादेशिकता व राजकारण

४.६ वांशिक राजकारण

४.७ सारांश

४.८ आपण काय शिकलो ?

४.९ संदर्भ सूची

## ४.१ उद्दिष्ट्ये

भारतीय राजकीय प्रक्रियेत स्वातंत्र्योत्तर काळात दिर्घकाळ ज्या घटकांनी प्रभाव कायम राखलेला दिसतो त्यात स्वायत्त व स्वतंत्र राज्यांची मागणी हा घटक महत्वाचा होय. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणूकी पासून प्रादेशिकतेच्या राजकारणाचे घटक भारतीय राजकीय अवकाशात प्रकाशात आले. भाषिक प्रश्न, भाषावार प्रांतरचना, राष्ट्रीय भाषा व राज्यकारभाराची भाषा असे पेचप्रसंग घेवून ते पूढे आले. तर दुसऱ्या बाजूने राष्ट्रीय राजकारणात जमातवाद व धर्मनिरपेक्षता यातील संघर्ष उभा राहिला. १९८० नंतरचे राजकारण हे प्रामुख्याने जमातवाद व धर्मनिरपेक्ष शक्तींमधील सत्तास्पर्धेचे राजकारण ठरले आहे. १९९० नंतर भारतीय संघराज्य व्यवस्थेच्या स्वरुपात ताण-तणाव ही तीव्र झालेले दिसतात. केंद्र-राज्य बदलल्या संदर्भांनी सर्वच घटकराज्यांमध्ये प्रादेशिकतेच्या बरोबरीने उपप्रादेशिकतेची भावना ही वाढीस लागली व त्यातून भारतीय राजकारणात संकुचित घटक व प्रवृत्तींना उधाण आले. या दृष्टीने या घटकात भारतीय राजकीय प्रक्रियेतील जमातवादी प्रवृत्ती, संस्था व संघटनांचे राजकारण, धर्मनिरपेक्षता विचार व व्यवहार याची मांडणी, प्रादेशिकतेच्या घटकांमध्ये भाषा, प्रदेश या घटकांनी निर्माण केलेले प्रश्न स्वायत्त व स्वतंत्र राज्याच्या मागणी पर्यंत कसे पोहचले याची सविस्तर मांडणी केली आहे. ज्याचा उपयोग निश्चितच आपणास स्वतंत्र व स्वायत्त घटकांच्या राज्यांच्या मागणी मागे असणाऱ्या राजकीय घटकांचे अवलोकन करण्याकरीता होईल.

## ४.२ जमातवाद व राजकारण

भारत एक स्वतंत्र लोकशाही राष्ट्र म्हणून मागील ७० वर्षापासून एक आश्वासक वाटचाल करत आहे. या वाटचालीतून एक संपन्न राष्ट्र म्हणून त्याची जडणघडण होत असताना या राष्ट्रीयत्वास विघटित करणारे काही घटक व शक्ती ही कार्यरत होत गेलेल्या आपणास आढळतात. समकालिन संदर्भामध्ये या विघटनशील घटकांना एक प्रकारचा राजाश्रय प्राप्त होत

असल्यामुळे भारतीय संविधानाने स्वातंत्र्योत्तर काळात भारत राष्ट्राची उभारणी करण्यासाठी दिलेला बहुमोल वारसा संकटात सापडला आहे. भारताचा इतिहास हा खरे तर राष्ट्र या संकल्पनेच्या दृष्टीने अगदीच पारखा होता. 'एकमय लोका' अशा पद्धतीच्या समाजव्यवस्थेचे स्वरुप भारतीय लोकजीवनास क्वचितच लाभले होते. त्यातच भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा विकास व विस्तार ही जातीय व धार्मिक तत्वांवरच आधारलेला राहिला. स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर या विघटनवादी शक्तींना जोर चढला. परिणामी फाळणीची किंमत चूकवून व फाळणीनंतरचा नरसंहार भोगून भारत स्वतंत्र झाला हे सर्व संविधानकर्ते अनुभवत होते. जमातवाद मुलतत्ववाद यासारख्या प्रवृत्ती भविष्यातील भारताच्या राष्ट्र उभारणीतील अडथळा ठरु शकतात हे त्यांच्या दुरदृष्टीने जाणते होते म्हणूनच भारताचा राजकीय पाया हा धर्मनिरपेक्ष असेल याची काळजी संविधानकर्त्यांनी घेतली. भारतीय नागरीकांच्या धार्मिक स्वातंत्र्याची हमी देतानाच भारतीय शासनव्यवस्थेचे स्वरुप मात्र धर्मनिरपेक्ष ठेवण्याची अवघड कसरत संविधानकर्त्यांनी लीलया पेरली. असे असले तरी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकारणात जातीय व जमातवादी प्रवृत्तीनी आपले डोके वर काढलेच. आजतर संपूर्ण भारतीय समाजजीवन व राजकीय जीवन या जमातवादी प्रवृत्तीनी घेरलेले दिसते. त्यामुळे जमातवाद व मुलतत्ववादाची मांडणी, त्याचे स्वरुप अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक जमातवादी शक्तींची व्याप्ती व धर्मनिरपेक्षतेचे तत्व व जमातवादी प्रवृत्तींचा होत असलेला संघर्ष याची मांडणी या प्रकरणात करण्यात आली आहे.

## ४.२ धार्मिक मुलतत्ववाद

मुलतत्ववाद व जमातवाद या दोन संकल्पना भारतीय सार्वजनिक जीवनात बहुतांशी एकाच अर्थाने वापरण्यात गल्लत केली जाते. तालीबान या दोन वेगवेगळ्या प्रवृत्ती व संकल्पना आहेत. मुलतत्ववादाचा संबंध प्रामुख्याने धर्माच्या स्वरुपाशी व धार्मिक रीतीरिवाज पालनाशी असतो तर जमातवाद ही संकल्पना प्रामुख्याने राष्ट्रीयत्वाची कल्पना व सत्ता स्पर्धेस ही प्रभावीत करताना दिसते. मुलतत्ववाद ही संकल्पना जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रचलित आहे. जगभरातील प्रमुख धर्मांशी या संकल्पनेचा संदर्भ जोडला जातो. जमातवादास मात्र खास भारतीय संदर्भ आढलतो. धार्मिक घटकांचा व भावनाचा सत्तास्पर्धेसाठी, राजकीय दृष्टीने त्यावेळी वापर होतो तेव्हा जमातवाद सक्रिय होतो. अर्थात या दोनही प्रवृत्ती वा संकल्पना लोकशाही, धर्मनिरपेक्षता व मानवी मूल्य त्यांना तेवढ्याच घातक आहेत त्या दृष्टीने त्यांचा अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते.

मानवी समाजाच्या इतिहासात अगदी आदिम अवस्थेपासून जैसे थे वादी व परिवर्तनवादी याचे दोन प्रवाह सातत्याने कार्यरत असलेले दिसतात. जैसे थे वादी प्रवाह हा आधीच्या पिढीच्या पूण्याईस चिरतनत्व देण्यासाठी आग्रही असतो. त्यांचा असा आग्रह असतो कि आपल्या अगोदरची पिढी ही समंजस बुद्धीमान व आदर्शांनी भारलेली अशी होती. जीवनाच्या विविध क्षेत्रात त्यांनी जे काही लिहून ठेवलेले आहे ज्या गोष्टी त्यांनी रुढ केलेल्या आहेत त्या शाश्वत स्वरुपाच्या आहेत. आपण त्या मार्गावरुनच गेले पाहिजे. ज्या क्षेत्रात त्यांनी काहीच व्यक्त केलेले नाही त्या संदर्भात केवळ आपण आपल्या मान्यता लागू कराव्या त्या पिढीने आदर्शांचे एक सर्वोच्च टोक गाठले होते त्यांच्या आदर्शांचे आपणाकडून होणारे उल्लंघन ही आपली नैतिक घसरण असते अशी एका बाजूने मुलतत्ववाद मांडणी करतानाच दुसऱ्या बाजूने आजच्या काळात जी अनैतिकता, शोषण अन्याय व इतर ज्या गोष्टी वाढीस लागत आहेत त्यास मागील आदर्शांपासून दूरावते, त्यांचे पालन न करणे हेच एकमेव कारण आहे. यातून बाहेर येण्याचा एकमेव मार्ग म्हणजे परत त्या व्यवस्थेकडे, आदर्शांकडे पूर्णत्वाने जाणे होय असा आग्रह धरला जातो.

मूलतत्ववाद म्हणजे एखाद्या विशिष्ट धर्माने सांगितलेल्या मूलभूत तत्वांच्या अनुषंगाने समाजाची रचना करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या मंडळींची विचारप्रणाली अशी सर्वसाधारण व्याख्या केली जाते. मात्र मूलतत्ववादाचा संदर्भ केवळ धर्माशीच असतो असे नाही. जीवनाच्या व समाजाच्या विविध क्षेत्रात मूलतत्ववादी प्रवृत्ती कार्यरत असलेली आढळून येते. सामाजिक जीवनात मनुस्मृतींच्या नियमांचा आग्रह धरणे हा ही मुलतत्ववादी प्रवृत्तीचाच भाग आहे, साहित्यातही अभिजातपणाच्या नावाखाली सनातन संस्कृतीचे पुनरूज्जीवन करणे हा ही मूतत्ववादी प्रवृत्तीच्या भाग आहे आर्थिक संरचनेत नव्याने येउ पाहणाऱ्या व्यवस्थांना विरोध करणे हाही मुलतत्ववादी प्रवृत्तीचाच एक भाग आहे याचाच अर्थ असा की मुलतत्ववाद हा केवळ धर्म, धर्मश्रद्धा व धर्मग्रंथात सांगितलेल्या समाजव्यवस्थेच्या संदर्भातीलच विचारसरणी नसून ती संपूर्ण मानवी जीवनाला व्यापणारी एक तत्वप्रणाली आहे. मात्र इतर क्षेत्रातील मुलतत्ववादी प्रवृत्तीचा धोका मानवी जीवनासाठी फारसा प्रभावी ठरत नाही. मुलतत्ववादी प्रवृत्ती ज्यावेळी धर्माच्या आधारे विशिष्ट समाजव्यवस्थेच्या निर्मितीचा व आदर्शांचा आग्रह धरते, त्यास सत्तेची व शक्तीची जोड देते त्यावेळी हा मुलतत्ववाद समस्त मानवी जीवनासमोर एक आव्हान निर्माण करतो. त्यादृष्टीने धार्मिक मुलतत्ववादाचा संदर्भ अधिक अभ्यासणे गरजेचे ठरते.

मुलतत्ववाद म्हणजे एखाद्या तत्वज्ञानाची काही मुलभूत तत्वे आग्रहीपणे मांडले व जोपासणे होय असे ढोबळमानाने म्हणता येईल. या दृष्टीने धार्मिक मुलतत्ववाद म्हणजे धर्माचे शुद्ध स्वरुप जोपासणे होय. व्यक्तीगत पातळीवर प्रत्येक सामान्य माणूस हा धार्मिक असतो. तो कुठल्याना कुठल्या देवतेस पूज्यनिय मानुन त्यावर श्रद्धा ठेवतो. आपल्या कुटुंबाचा जो काही धार्मिक वारसा वसला आहे तो प्रत्यक्षात जगण्याचा प्रयत्न करतात, आपल्या धर्मतत्वांना आदर्श ठेवून त्या पद्धतीने आचरण करतात. प्रत्येक धर्मसंस्थापकाने ही माणूस केंद्रबिंदु ठेवून आपल्या धर्माची व धर्मतत्वांची मांडणी केलेली दिसते. परंतु त्याबरोबरच या धर्मसंस्थापकांनी आपल्या सारखी विचार करणारी, ही जीवनमुल्य जगणारी माणसे वाढली पाहिजेत यासाठी धर्म प्रसार करण्याची पद्धतीही रुजवली, त्यातुनच जगभरात त्या त्या धर्माचा प्रसार होत असताना त्या त्या भाषातील पूर्वापार समाजाच्या धारणांचा, नियमनांचा भौगोलिक सामाजिक परिस्थितीचा, कालसापेक्ष तेचा प्रभाव पडलेला दिसतो. त्या धार्मिक तत्वांचे नवे अर्थ कार्यन्वीत झालेले दिसतात. त्यातुन नवे पंथ, नवे तत्व यांची ही त्या धर्मास जोड मिळालेली दिसते. हे नवे अन्वयार्थच धार्मिक मुलतत्ववादास नको असतो. शुद्ध स्वरुपाच्या धर्माची प्रतिष्ठापना करण्यासाठी ते आग्रही असतोतच म्हणजे काय तर ते हजारो वर्षाच्या धर्माच्या त्या विकासाच्या असंख्य प्रवाहातील एका विशिष्ट प्रवाहास शुद्धतेचा शिक्का मारुन त्याची प्रतिष्ठापना करण्याचा आग्रह धरतात. वास्तवात त्यांनी केलेली शुद्धतेची निवड हाही एक नवा अन्वयार्थच असतो परंतु त्याचे भान त्यांना नसते एवढेच.

### मुलतत्ववादाची वैशिष्ट्ये:

मुलतत्ववादाची कार्यपद्धती व प्रभावक्षेत्र अभ्यासण्यासाठी मुलतत्ववादी प्रवृत्तींची मुलभूत स्वरुपाची वैशिष्ट्ये अवलोकन करणे अगत्याचे ठरते. आपल्या धर्माचा एक मूलभूत स्वरुपाचा गाभा असून तो त्रिकालाबाधित व अपरिवर्तनीय आहे. ईश्वरीय अंश त्यात आहे असा समज निर्माण होण्यातुन मुलतत्ववादाचा आरंभबिंदु कार्यन्वीत होत असल्याचे आपणास दिसते. धर्माचा हा मुलभूत गाभा गेवळ अध्यात्मिक व नैतिक मुल्यांपूरता सिमित न राहता धार्मिक आयुष्य म्हणजे नेमके काय याची व्याख्या करावयास पुढे सरसावतो व त्यातून कसे वर्तन करावे व कसे वर्तन करु नये याचे समाज नियम कार्यन्वीत होतात. अर्थात अशा नियमनांचे उल्लंघन म्हणजे ईश्वरी आज्ञांचे उल्लंघन ठरवून त्यास जीवन जगण्याचा अधिकार नाही असे दंडविधान ही पूढे येतेच.

मुलतत्ववादात मानवी जीवनाची सर्वसाधारण विभागणी असते व्यक्तिगत जीवन व सामाजिक जीवन ही विभागणी अस्वाभाविक ठरवून नाकारतो. कारण सर्व मानवी व्यवहार हे ईश्वरी तत्वांच्या नियंत्रणाखाली येतात व तसे ते येणेच योग्य आहे या दृष्टीने मुलतत्ववादाने आपले पाऊल पूढे टाकलेले असते. त्यामुळे धर्मास एकमेव व नैतिक साधन मानतो. मुलतत्ववादाची भूमिका यासंदर्भात स्पष्ट करताना प्रा. सुहास पळशीकर म्हणतात, "मुलतत्ववादाच्या दृष्टीने योग्य अयोग्य ठरवण्याची धर्म हीच एकमेव शक्ती मानली जाते. या भूमिकेत तीन घटक आहेत. पहिला घटक म्हणजे सर्व मानवी व्यवहारांचे ऐक्य कल्पून त्यांच्या संदर्भात एकाच नियामक शक्तीची कल्पना करणे. दुसरा घटक म्हणजे नैतिक नियमनातूनच प्रत्यक्ष भौतिक नियमनांचा उगम होतो असे मानणे णि तिसरा घटक म्हणजे ईश्वरदत्त नैतिक नियमन धर्माच्या रुपाने प्रकट होते असे मानणे."

धार्मिकता व धर्मनिष्ठा ही मूळ धर्माच्या संकल्पनेवरुन ठरवण्यासाठी धर्माच्या मूलभूत गाभ्याची व त्याच्या अपरिवर्तनीय पावित्र्याची कल्पना पूढे रेटीतात. या मुळ तत्वांचा अर्थ लावण्याची जबाबदारी मुलतत्ववादी आपल्याकडेच घेतात. धर्मसंमत असे संकेत प्रस्तुत करतात. या धर्मसंमत संकेताचे पालन म्हणजे धार्मिक जीवन व या धर्मसंमत नियमांचे उल्लंघन म्हणजे पाखंडी व धर्मविरोधी कृत्य मानले जाते. त्यामुळे मुळ धर्माच्या पालनाशी व ते पालन करुन घेण्याशी मुलतत्ववाद स्वतःला जोडून घेतो.

मूलतत्ववादी प्रवृत्तीच्या याच भूमिकेतून त्यांच्यापूढे काही अडचणी निर्माण होतात. या अडचणी त्यांच्या एक प्रकारे मर्यादाच असतात. त्यातील पहिली अडचण म्हणजे धर्म हे इतिहासाच्या एका विशिष्ट टप्यांचे अपत्य असते. त्या ऐतिहासिक काळाचा त्या धर्मावर अमिट असा प्रभाव पडलेला असतोच समाजशास्त्रीय मांडणीनुसार त्या त्या समाजातील व त्या त्या काळातील नैतिक कल्पनांविषयीचे समज व सामाजिक जडणघडणी संदर्भातील प्रश्न हे धर्माच्या उद्यामाने महत्वाचे घटक घटक असतात. परंतु मुलतत्ववादी सामाजिक घटकांना नाकारुन ईश्वरीय घटकांना प्राधान्य देतात. परंतु या ईश्वरीय घटिताना प्राधान्य देताना ते त्या धर्माने तत्कालिन परिस्थितीमध्ये असणाऱ्या व्यवहारांचे, विधिनिषेधांचे जे खंडन व मंडण केले या ऐतिहासिकतेकडे दुर्लक्ष करतात व केवळ नीतीकल्पनां ना विरोधार्थ मानतात. त्यामुळे मुलतत्ववाद हा ऐतिहासिकता व ऐतिहासिक दृष्टीकोन अशी विसंगत करताना दिसतो. या विसंगतीतुनच मुलतत्व वादासमोर दुसरी अडचण निर्माण होताना दिसते. एखादा धर्म जेवढा अधिक काळ टिकेल व विविध प्रदेशांमध्ये विस्तारतो त्याप्रमाणात त्या धार्मिक नीतीतत्वांचे विविध अर्थ अविष्कृत होतात. त्यातूनच त्या धर्मास संमिश्र स्वरुप प्राप्त होत जाते. वेगवेगळ्या समाजात वेगवेगळ्या काळात धर्माचे नवे अन्वयार्थ मांडले जातात. त्यातून या धर्मास एक प्रकारचा ताजेपणा व नवेपणा प्राप्त होतो. प्रवाही व जिवंत स्वरुप प्राप्त होते पण त्याबरोबरच त्या धर्मास लवचिकताही स्वीकारावी लागते. ही लवचिकताच मुलतत्ववादी प्रवृत्तीस नको असते. त्यामुळे व्यवहारात अपरिहार्यपणे पूढे येणारी परिवर्तने व धर्मतत्व यात विसंगती मोठ्या प्रमाणात निर्माण होते. यावर मात करण्यासाठी मुलतत्व वादी शुध्द धर्माची चौकट पूढे करतात. एका विशिष्ट टप्प्यावरील धर्मास शुध्द स्वरुपाचा दर्जा देण्याची अनैतिहासिक कृती मुलतत्व वाद्यांकडून समर्थनीय ठरवली जाते. त्यासाठी तत्वज्ञान, श्रद्धा व संघटन या तीनही मार्गांचा सर्वकष अवलंब केला जातो. तरीही मुलतत्ववादी प्रवृत्तीपूढे आणखी एक अडचण शिल्लक राहतेच नी त्यांनी स्वतःहा सभोवताच्या परिस्थितीशी केलेल्या तडजोडीतून उद्भवते. मुलतत्ववादी प्रवृत्तीना धार्मिकतेची व्याख्या करताना सभोवतालच्या परिस्थितीशी अनुरुप व्यावहारिक तडजोडी स्वीकाराव्या लागतात. या त्यांनीच सांगितलेल्या शुद्ध धर्माच्या संकल्पनेशी विसंगत असतात. असे मानले तरी सामान्य लोकांना शुद्ध धार्मिकतेशी जोडून ठेवण्यासाठी मुलतत्ववादी

प्रवृत्तीकडून मोठ्या प्रमाणात नैतिकबंधने प्रस्तुत करुन त्यांचे पालन हे कोणत्याही परिस्थितीत केले गेलेच पाहिजे हे ठरवले जाते.

### मूलतत्ववादी संघटनः

मूलतत्ववाद जी काही शुद्ध धर्माची संकल्पना मांडतो ती प्रत्यक्षात कार्यन्वीत करण्यासाठी धार्मिक संघटन उभारले जाते. या संघटनेच्या माध्यमातून मूलतत्ववादाचा प्रचार, प्रसार व अंमल या अर्थाने प्रत्यक्षात आणला जातो. धर्माचा अधिकृत अर्थ स्पष्ट करण्याचा तो नाकारणाऱ्यांना ईश्वरी शक्तीच्या वतीने शिक्षा देण्याचा अधिकार या धार्मिक – मूलतत्ववादी संघटना स्वतःकडे घेतात. या कामास धार्मिक कार्याचे स्वरूप दिले जाते. आपण धर्मरक्षक आहोत आणि या कार्यात जी सक्ती करावी लागते, जी हिंसा करावी लागते ती क्षम्य आहे अशी भावना मूलतत्ववादी धूरीणांमध्ये आढळते. अशा पद्धतीच्या सक्तीतूनच खरा व शुद्ध धर्म, नीतीमान समाज अस्तित्वात येऊ शकतो यावर त्यांची श्रद्धा असते. आत्मनिर्णया पेक्षा ते धर्म निर्णयास उच्चस्थान व प्राधान्य देतात. धर्मनिर्णय अमलात आणणारी संघटना म्हणून या संघटनेकडे पाहण्याचा मूलतत्व वाद्यांचा एकूण दृष्टिकोण आपूलकीचा व आत्मतियेचा असतो.

व्यक्तिगत पातळीवर  धार्मिक असणे व सामाजिक पातळीवर संघटितपणे धार्मिक कृती करणे यातील महदअंतर मूलतत्वादाच्या संघटित प्रवृत्तीतून खऱ्या अर्थाने स्पष्ट होताना दिसते. मूलतत्ववाद संघटित रीत्या सार्वजनिक व्यवहार क्षेत्रात वापरत असतो. विचार, संघटन, संघर्ष व सक्ती या पातळ्यांवर मूलतत्ववादी आजही सक्रिय दिसते. त्यामुळे समाजातील वादग्रस्त व वादप्रवण क्षेत्रात मूलतत्वादाचा सहज वावर आढळतो. व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती व समाज, समूह-समूह, धर्म-धर्म अशा सर्व स्तरांमध्ये, संघर्षामध्ये मूलतत्ववाद हस्तक्षेप करतो. मूलतत्ववाद सामाजिक व धार्मिक पातळीवरच न राहता राज्यसंस्थेचे स्वरूप, शासनाचे कार्यक्षेत्र, समाजाचे संघटन व नियमन या संदर्भात आपला हस्तक्षेप वाढवतो.

### मूलतत्ववादास आधूनिकतेचे वावडे :

धार्मिक समूहाची असुरक्षितेची भावना मूलतत्ववादी प्रवृत्तीस प्रामुख्याने कारणीभूत असलेली आढळते. ही असुरक्षिततेची भावना इतर धर्मांच्या वाढत्या वर्चस्वातून ही उद्भवते व दुसऱ्या बाजूने सभोवताली घडणाऱ्या भौतिक बदलांमुळे सुद्धा निर्माण होतांना दिसते. एखाद्या विशिष्ट धर्माला प्राबल्यातून निर्माण झालेली अस्वस्थता व त्यातून पुढे आलेला मूलतत्ववाद हा केवळ त्या विशिष्ट धर्मास लक्ष्य करतो त्यामुळे त्याचा प्रभाव व कार्यक्षेत्र त्या दृष्टिने मर्यादित असते. भौतिक परिस्थितीतील बदलातून आलेली अस्वस्थता व त्यातून निर्माण होणारा मूलतत्ववाद मात्र विश्वासू पाया समोरच एक प्रकारे आव्हान निर्माण करतो. आधूनिकतेतून निर्माण झालेली धर्मसमूहांची अस्वस्थतता, आधूनिकतेने निर्माण केलेल्या भौतिक बदलांबरोबरच जीवन मूल्यांमध्ये केलेल्या परिवर्तनाशी ही निगडीत आहे. त्यामुळे आधूनिकतेचे संकट हे मूलतत्ववादी प्रद्धतीस दुहेरी संकट वाटते. १९८० च्या दशकात जागतिकीकरणाचा जो झंझावात आला त्यानंतर जागतिक साम्राज्यास सर्वकष रीत्या प्रभावित केलेले आहे. धर्मसत्ता तर या जागतिकीकरणाच्या आव्हानासमोर हतबल होतेय की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. या हतबलतेतून मुलतत्ववादी प्रवृत्ती मोठ्या त्वेषाने उफाळून वर आलेल्या दिसतात. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे एका बाजूने आधूनिकते बरोबर आलेल्या भौतिक शक्तीमुळे अनेक समूह हतप्रभ झाले. समाजरचना व राज्यव्यवस्थेत आमूलाग्र स्वरूपाचे बदल झाले. या बदलांचा वेग सामान्य नव्हता तो या समाजसमूहांना भोवळ आणणारा होता. दुसऱ्या बाजूने आधूनिकतेने जन्मास घातलेली

मूल्यव्यस्था बहुतांश समूहांच्या धर्माधिष्ठीत मूल्यव्यवस्थेच्या वैधतेसच प्रश्नांकित करू लागली. यातून एक भौतिक व वैचारिक असुरक्षितता जन्मास आली. या असुरक्षिततेचा फायदा घेऊनच मूलतत्ववादी विचार पुढे आले व लोकप्रिय ही झाले. या अर्थाने मूलतत्ववाद ही आधूनिकतेला प्रतिक्रिया ठरली. सॅम्यूअल हंरिंग्टनचा सांस्कृतिक संघर्षाचा प्रत्यय आधूनिकतेस मूलतत्ववादाने जो प्रतिसाद दिला त्यातून येतांना दिसतो. जगभरातील विविध समूह, धर्म, समाज आधूनिकतेच्या आव्हानास कसे सामोरे गेले याचा इतिहास अभ्यासताना मूलतत्ववादाच्या उदयाच्या कारणांची पार्श्वभूमि दृष्टीपथास पडते.

मूलतत्ववादाचा आधूनिकतेच्या संदर्भात सहसंबंध अभ्यासतांना सर्वच धर्मात मूलतत्ववादी प्रवृत्ती अस्तित्वात असल्याचे निदर्शनास येते. फरक असलाच तर तो आक्रमकतेत व उपाययोजनेत आढळतो. त्याचबरोबर आधूनिकतेचा सामना नेमका कशापद्धतीने करायचा हा मूलतत्ववादी प्रवृत्तींसमोरील एक कळीचा मुद्दा असल्याचे ही जाणवते. मूलतत्ववादी ही आधूनिक समाजवादाचाच एक घटक असला तरी त्याचे आधूनिकतेच्या संकल्पनेशी व मूल्यांशी वैर असल्याचे पदोपदी जाणवते. आधूनिकतेशी असणाऱ्या विसंवादातूनच मूलतत्ववाद मूळ धर्माचा शोध घेण्यावर व धर्माच्या शुद्धतेच्या चौकटीवर सर्वाधिक भर देतांना आढळतो. वसाहतवाद आक्रमक राष्ट्रवाद, भांडवलशाही या सारख्या आधूनिकतेच्या अपत्यांमुळे पिचलेल्या समूहांना मग या मूल्यत्ववादी भूमिकांचे आकर्षण निर्माण होते. आपण मूळ धर्माकडे परतलो तर आधूनिकतेने निर्माण केलेल्या अन्यायी व्यवस्थांना समर्थपणे तोंड देण्याचे सामर्थ्य आपणास मिळेल या श्रद्धाभावाने मूलतत्ववादी प्रवृत्तींकडे वळतात व त्यांना आक्रमक पाठिंबा देताना दिसतात. आधूनिकताही ही व्यवस्था धर्मविरोधी न-नैतिक व इहवादी स्वरूपाची असून आपल्या शुद्ध धर्माच्या चौकटीवरचे ते सर्वात मोठे संकट असून ते परतवून लावण्यासाठी धर्मनिरपेक्ष राष्ट्र-राज्य संकल्पनेस लागू म्हणून प्रस्तुत केले जाते. नागरीकत्व ही व्यक्तींची दुय्यम ओळख असून धर्म हीच त्याची प्रथम आणि अभिजात ओळख आहे. हे त्यावर बिंबवले जाते. धर्मावर राष्ट्राने कुरघोडी करू नये यासाठी एका धर्माच्या जगभरातील सर्व अनुयायांना ऐक्याची हाक दिली जाते. भारतीय मूलतत्ववादाच्या संदर्भातही हा अनुभव प्रत्ययास येतो. भारतातही परकीय वर्चस्वाच्या विरोधात धार्मिक सांस्कृतिक प्रतिसाद दिले जाताना दिसतात.

## मूलतत्ववादाची व्याप्ती :

मूलतत्ववादाच्या व्याप्तीतून मूलतत्ववादी संघटनांची प्रवृत्तीं सर्वकष स्वरूप समजण्यास मदत होते. मूलतत्ववादी संघटना प्राथमिक स्वरूपात धर्मांतर्गत कार्य करतात. आपला मूळ व शुद्ध धर्म काय आहे, तो कसा पालन करावा याचे नियम, तत्व या मूलतत्ववादी संघटना प्रस्तूत करून त्या पद्धतीनेच आपल्या धर्माच्या अनुयायांचे वर्तन असावे यासाठी आग्रही असत; नव्हे त्या पद्धतीनेच त्यांचे वर्तन कसे राहील याची सर्वकष काळजी घेतात. प्रसंगी त्यासाठी हिंसा व दहशतींचाही वापर करतात. धर्माचे स्वरूप जेव्हा अशा पद्धतीने विधिनिषेधांच्या नियमावलीत रूपांतरीत होते तेव्हा तेव्हा त्या धर्मावर समाजातील पुरुष वर्चस्वाचा प्रारंभ होतो व ऐतिहासिक अनुभव आहे. धर्माचे तत्वज्ञानाचे स्वरूप कसेही असले तरी धार्मिकतेच्या नावाखाली येणारे नियमन हे स्त्रियांच्या सार्वजनिक वावरावर नियंत्रण करणारे व स्त्रीस स्वायत्तता नाकारणारेच असते. स्त्री ही रक्षण करण्या योग्य गोष्ट मानली जाते. त्यास प्रतिकात्मक प्रतिष्ठा व मालकी हक्काची बाब म्हणून पाहिले जाते. त्यामुळे धर्म हा संघटित स्वरूपात ज्यावेळी व्यक्त होतो तेंव्हा तो पुरुषसत्तेच्या हातात हात घालूनच वावरतो हे मूलतत्ववादाच्या अविष्कारात ही अनुभवास येते. धार्मिक मूलतत्ववादी संघटना स्त्रियांचे स्वातंत्र्य सर्वाधिक आकूंचित करत असले तरी एकूण समाजातील सर्वच नागरिकांचे वा अनुयायांचे स्वातंत्र्य मर्यादित केले जाते.

मूलतत्ववादी संघटनांची प्रथमाआवृत्ती ही धर्मातंर्गत नियंत्रणाची असली तरी इतर धर्मीयांसमवेतची तेढ फार काळ लांबवली जाऊ शकत नाही. भिन्न धर्मीयांपासून दूर राहण्याचा प्रबळ आग्रह मूलतत्ववादी संघटना बाळगून असतात.

आम्ही तुमच्या धर्मात दखल देणार नाही तुम्ही आमच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करायचा नाही हीच वृत्ती एकापरीने धार्मिक हस्तक्षेपाची नांदी असते. एकमेकांच्या धर्माचा आदर करण्याची गोंडस भाषा वापरून मूलतत्ववादी संघटना इतर धर्मांशी असणाऱ्या देवाण घेवाणीच्या ऋणानुबंधाच्या प्रवृत्तीस कडवा विरोध करताना आढळतात. इतर धर्मांकडून आपण काहीही स्वीकारता कामा नये. आपण आपल्या चिरेबंदी वाडयात राहीले तरच धर्माची शुद्धता अबाधित राहील ही धार्मिक मूलतत्वादी संघटनांची प्रवृत्ती असते. त्यासाठी ते सांस्कृतिक देवाण-घेवाणीतून उभ्या राहिलेल्या व राहू पाहणाऱ्या संकरीत, सूधारणावादी पंचांना कडवा विरोध करतात. धार्मिक मूलतत्ववाद धार्मिक क्षेत्राचा जिना ओलांडण्याचे महत्वाचे आणखी एक कारण म्हणजे धार्मिक मूलतत्वात धर्म सूमह व राज्यसंस्था  यांच्यातील सहज संबंधा मध्ये ही हस्तक्षेप करण्याची आस बाळगून असतो. आपल्या धर्मांचे आपणच खरे प्रवक्ते आहोत. धार्मिक बाबतीत राज्यसंस्थेने कुठलाही हस्तक्षेप करू नये हा आग्रह धार्मिक मूलतत्वाद बाळगून असतो. राज्यसंस्थेने धर्म व धार्मिक व्यवहारांची स्वायत्ता मान्य करून स्वत:वर या दृष्टिने मर्यादा घालून घ्याव्यात ही धार्मिक मूलतत्ववाद्यांची प्रमुख धारणा असते. कारण राज्यसंस्थेकडून मोठ्या प्रमाणात धर्मव्यवस्था अलिकडच्या काळात प्रभावित होतांना दिसते. व राज्यसंस्थेचा हा प्रभाव धार्मिक मूलतत्ववादास मान्य नसतो. ही प्रवृत्ती कुठल्या एखाद्या विशिष्ट धर्माच्या धार्मिक मूलतत्ववादी संघटनांमध्ये आढळत नाही जी सर्वसाधारणतः सर्वस्व धर्मांच्या या धार्मिक मूलतत्व वादी संघटनांमध्ये प्रकर्षाने अनुभवास येते.

### मूलतत्ववादाची सार्वत्रिकता:

मूलतत्ववाद ही केवळ एखाद्या विशिष्ट धर्मापूरती मर्यादित बाब नाही. धार्मिक मूलतत्ववाद ही प्रवृत्ती जगातील सर्वत्र धर्मांमध्ये आपणास आढळते. धर्मा-धर्मात तेढ संघर्ष असतात त्याच प्रमाणे धर्मातंर्गत ही संघर्षाची कारणे असंख्य असतात. या संघर्षाच्या घटकांमधूनच पहिल्यांदा खऱ्या अर्था ने मूलतत्ववादी प्रवृत्ती वर येतात. ज्यावेळी आपण इस्लाम किंवा हिंदू किंवा ख्रिश्चन वा बौद्ध असा शब्द प्रयोग करतो त्यावेळी लौकीक अर्थाने आपल्यापूढे त्या-त्या धर्मांची एक स्थिर प्रतिमा उभी राहते. मुस्लिम केवळ मुस्लिम नसतो. त्यात सुन्नी, शिया, अहमशिया, बोहरा, तुघलकी असा बराच काही असतो. तो केवळ हिंदू नसतो तर तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र, शैव, वैष्णव त्या-त्या जातीचा प्रतिनिधी अश्या काही बरेच प्रतिनिधित्व व्यक्त करत असतो. तेव्हा या धार्मिक व्यवस्थेतील विग्रहाची आपणास जाणीव होते व या विघटित घटकांपैकीच एखादा घटक प्रबळ असून स्वतः व शुद्धतेचा पाईक म्हणून घोषित करतो व तो सांगेल तेवढाच शुद्ध धर्म ठरतो इतर त्याच धर्मातील अनेक वर्षापासून, शतकांपासून वावरणारे घटक पाखंडी म्हणून घोषित होतात. धर्मद्रोही ठरतात.

अलिकडच्या काळात विशेषतः भारतीय समाजात अशी धारणा निर्माण झाली आहे की धार्मिक मूलतत्ववाद हा इस्लाम मध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. इस्लाम धर्माचा कर्मठपणा प्रामुख्याने त्यास जबाबदार आहे अशी धारणा या मागे प्रामुख्याने असते. परंतु वास्तवात अशा पद्धतीच्या धारणांना कोणत्याही पद्धतीचा आधार आढळत नाही. प्रा. सुहास पळशीकर यांचे विश्लेषण करतानां म्हणताता, ''धर्म म्हणजे मानवी समूहांचा श्रेयसाचा शोध असे मानले तर एखादा धर्म जास्त मूलतत्वादी आहे असे म्हणण्यास वाव नसतो. पण धर्म म्हणजे समाजनियमनाचा प्रयत्न

असे म्हटले तर विभिन्न धर्मांमध्ये नियंत्रणाच्या विभिन्न मार्गांचा अवलंब केला जाऊ शकतो. ईश्वरापूढे सर्व समान मानले तर हे नियमन करण्यासाठीचे सार्वत्रिक करक नियम आति विधी-निषेध उभे कले जातात. उदा. इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्मात सर्व समाजासाठी नियम असतात व त्यांचा संकूचित अन्वयार्थ मांडून मूलतत्ववादी भूमिका घेतली जाऊ शकते. त्याउलट हिंदू वर्ण, आश्रम आणि जाती यांच्यात समाज विभागातून मग त्या-त्या विभागांच्या अंतर्गत त्यांचे नियमन केले जात असल्याने सार्वत्रिक नियममनांपेक्षा अशा विभागवार नियमनांचा वरचष्मा जास्त असतो. त्यामुळे वरवर पाहता हिंदु समाजात हिंदु मूलतत्ववादाचा फारसा प्रभाव आढळत नाही पण समाजाच्या विभिन्न हिश्यांमध्ये अंतर्गत कलहात मूलतत्ववादी भूमिका घेतली जाते, जाऊ शकते, याचाच अर्थ मूलतत्ववादी भूमिकेचा उगम आणि परीघ वेगळा असला तरी त्यावरून एखादा धर्म मूलतत्वादास जास्त अनुकूल किंवा कमी अनुकूल आहे असा अर्थ निघत नाही.''

त्यामुळे धार्मिक मूलतत्ववादाच्या चर्चेत एखाद्या धर्माची तळी उचलून धरणे किंवा एखाद्या धर्मास लक्ष्य करणे अशी सरसकट समजूत करून घेणे अथवा तशी समजूत प्रसारीत करण्यासाठी प्रवृत्त करणे चुकीचे आहे. ते विचारी व्यक्तीने कटाक्षाने टाळावे. एकंदरीत धार्मिक मूलतत्वावाद हा एक धर्मांध अन्वयार्थ आहे. हा अन्वयार्थ धर्माचे प्रवाहीपण नाकारून त्याची त्रिकालाबाधित अशी शुद्ध चौकट कल्पितो ती चौकट प्रत्यक्षात यावी समाजासाठी धार्मिक मूलतत्ववादी संघटनांच्या कडव्या स्वरूपाचा, हिंसक मार्गांचा अवलंब करून धर्मातील इतर कोणात्याही क्षेत्रास नाकारतो. धार्मिक मूलतत्ववादाचा आरंभ जरी धार्मिक बाबींमधून होत असला तरी ती एकूण राजकीय विचारधारा म्हणून विकसित होते कारण आधूनिक राज्यसंस्थेच्या मूलभूत कार्यांनाच ती नाकारते.

**धार्मिक जमातवाद :**

भारतीय सार्वजनिक जीवनात मागील चार दशकांपासून धार्मिक जमातवादाच्या प्रभावाने अनेक प्रश्न व समस्यांना जन्म दिला आहे. जमातवाद म्हणजे कम्यूनॅलिझम हा शब्द ब्रिटिश राजवटीत जन्माला आला. ब्रिटिश राज्यकर्ते भारतीय समाजास भिन्न समूदांयानी मिळून बनलेला समूदाय असेच मानत असत. त्यामुळे भारतीय लोकांना ज्यावेळी प्रतिनिधित्व देण्याची वेळ आली तेव्हा हे प्रतिनिधित्व प्रत्येक समूदायास स्वतंत्रपणे देण्याचे धोरण ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अवलंबले व त्या धोरणास ब्रिटिश राज्यकर्त्यांनी 'कम्यूनल ॲवॉर्ड' म्हणजे जात-जमात निवड निवाडा असा शब्द प्रयोग केला. त्यापुढील काळात भारतात हे विशेषण प्रचलित झाले. जात-जमात-वंशिकता या आधारावर होत असलेल्या मागण्या व या मागण्यांना मिळणारा प्रतिसाद यास जमातवाद हे विशेष सर्वमान्य झाले. खरे तर जगातील कुठल्याही देशात अशा पद्धतीचे धार्मिक, वांशिक गटांचे राजकारण असतित्वात असू शकते मात्र त्यास 'एथ्निसिटीचे' म्हणजे वांशिकतेचे राजकारण हा शब्द प्रयोग केला जातो. जमातवादी राजकारण हा खास भारतीय संदर्भ आहे. भारतात कम्यूनल या शब्दास पर्यायी शब्द म्हणून बऱ्याच वेळा जातीवाद, धर्मांधता या सारखे शब्द वापरले जातात मात्र हे शब्द या संकल्पनेचा अर्थ खऱ्या अर्थाने स्पष्ट करू शकता नाहीत उलट त्यामूळे संकल्पानत्मक गोंधळ वाढतो. कारण जातीयवादी व धर्मांधाना या शब्दांचा आथय व अभिव्यक्ती वेगळ्या पद्धतीची असून कम्यूनल संकल्पनेत ती कोणत्याही अर्थाने सम्मीलित नाही. साधारणतः धार्मिक जमातवाद म्हणजे विशिष्ट धर्माच्या सर्व अनुयायांचा मिळून एकच एक समुदाय बनतो असे मानुन अथवा तसा दावा करून त्या समुदायाचे राजकीय ताकदीमध्ये रूपांतर करणे होय. त्यातूनच विशिष्ट धार्मिक समुहाकडे देशाच्या नियमनाची सर्व सूत्रे असावयास हवी हा जमानतवांदाचा आग्रह. त्या धर्माच्या लोकसमुदायाच्या वतीने ती सत्ता आपणांस मिळावी असा

दावा जमातवादी संघटनांकडून केला जातो व यातूनच जमातवादा व्यवहार म्हणजेच जमातवादी राजकारण साकरताना दिसते.

**धार्मिक जमातवादाची वैचारिक तत्वे :**

धार्मिक जमातवाद आपले बस्थान बसवण्यासाठी व सत्ताप्राप्तीची आपली आकांक्षापूर्ती करण्यासाठी आधूनिक राष्ट्र-राज्य संकल्पनेचा आधार घेत राष्ट्रावरची मालकी प्रस्थापित करतात व त्यातून आपल्या धार्मिक समुदायच्या नैसर्गिक सत्तेचा दावा प्रस्तूत करतात. यासंदर्भात जमातवाद्यांची भूमिका अशी असते की धार्मिक समूदाय ही समाजाची काळाची वर्गवारी आहे. म्हणचेच भारतीय समाजात धार्मिक समुदाय ही पायाभूत बाब आहे. या धार्मिक समुदायांपैकी कोणाचा सत्तेवर नैसर्गिक अधिकार पोचतो एवढाच प्रश्न आहे. व त्यासाठी जमातवादी शक्ती धर्माधिष्ठित राज्य संकल्पनेची मांडणी करतात व त्यातूनच बहुसंख्याक धर्म म्हणून हे राष्ट्र हिंदूचे आहे व हिंदुधर्माकडे नियमनाची, सत्तेची सर्व सूत्रे असावीत अशी त्यांची वैचारिक व्यूहरचना प्रामुख्याने पुढे येते. समाजाच्या धर्माच्या सत्तेसाठी पाठपूरावा करणाऱ्या संघटनेला, राजकीय पक्षाला ती प्राप्त होणे कसे न्याय्य व गरजेचे आहे ही भूमिका आपोआपच पूढे सरकते.

जमातवादी शक्ती ही वैचारिक व्यूहरचना करतात त्यांना त्यांचे स्वतःचे असे समाजाचे आकलन कार्यरत दिसते. समाज हा सुद्धा  व्यक्तींचा बनतानाही त्या व्यक्तीस विविध प्रकारच्या अस्मिता असतात. अशा अनेक आत्मओळखींच गाठोड घेऊनच ते समाजात वावरत असतात. आपल्या विविध भूमिका साकारत असते हे जमातवादी प्रवृत्तीस मान्य दिसते मात्र या सर्व आत्मपरिचयाच्या बाबी मध्ये धर्माधिष्ठीत ओळख ही व्यक्तीची अस्सल, चिरस्थायी व अंतिम ओळख असते असे जमातवाद मानतो व त्यामुळे धार्मिक समुदायात विभागणी झालेला समाज हेच समाजाचे वास्तव व खरे स्वरूप असते असा आग्रह तो धरतो त्याच युक्तिवादचा आधार घेत जमातवादी शक्ती राजकीय अवकाशाच्या दिशेने पाऊल टाकतांना असा दावा करतात की सत्ता धार्मिक समुदायात वाटली जायला हवी. म्हणजेच धार्मिक समुदायांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटना, संस्था व राजकीय पक्षांना ती मिळावी. तशी ती मिळाली तरच राज्यसंस्थेचे सार्वजनिक नियमन त्या-त्या धार्मिक समुदायास लागू करण्याचा नैतिक अधिकार राज्यसंस्थेस असेल.

राज्यसंस्था व व्यक्ती यांच्यातील परपस्परसंबंधाचे नियमन धार्मिक समुदायाच्या माध्यमातूनच प्रत्यक्षात यायला हवेत यासाठी जमात वाद अशी भूमिका घेतो की समाजात दूहेरी नियमन व्यवस्था कार्यरत असते. एक सार्वत्रिक नियमन व्यवस्था व दूसरी समुदायिक नियमन व्यवस्था. समुदाय निष्ठ नियमन व्यवस्था ही समुदायांतर्गत नियमनाची जबाबदारी पार पाडत असते. जमातवाद्यांच्या मते राजकीय व्यवस्था समाजाच्या धार्मिक समुदायनिष्ठ वर्गीकरणावर व त्या समुदायांच्या समन्वयावर आधारित असेल. त्यामुळे राजकीय स्पर्धा देखील व्यकतीआधारापर नव्हे तर समुदायाच्या आधारावर घडणे स्वाभाविक असावयास हवे. सत्तेतील वाट्याशिवाय जमातवादी वैचारिक तत्वांमध्ये आणखी भर दिलेला आढळतो. जमातवादाच्या वैचारिक भूमिकेनुसार धार्मिक समूहांचे स्वतंत्र असे हितसंबंध असतात व ते इतर धार्मिक हितसंबंधापासून भिन्न ठरतात. त्यामुळे धर्म हा घटक समाजाची विभागणी करणारा सर्वाधिक विश्वासार्ह घटक आहे. व्यक्ती धर्मा-धर्मात विभागला गेला की त्यांच्या अस्मिता, अपेक्षा यांना एक समान आधार स्वाभाविकरीत्या प्राप्त होतो अशी जमातवादाची वैचारिक तत्वभूमिका दिसते. एकंदरीत राष्ट्रीयत्व सत्तेतील वाटा व हितसंबंधाची धर्मनिहाय विभागणी या परस्परसंलग्न बाबीमधून

जमातवादाची वैचारिक भूमिका व तत्वे साकारतात असे दिसते. जमातवाद अशा पद्धतीने राष्ट्रीयत्वाचे व सार्वजनिक जीवनाचे नियमन करणारे वैचारिक तत्व प्रस्तूत करत असले तरी त्यास मोठ्या मर्यादा आहेत व त्याची मांडणी करतांना प्रा. सुहास पळशीकर म्हणतात, "व्यक्तींचे अनेक गटात विभाजन एवढेच केवळ सार्वजनिक व्यवहारांचे स्वरूप नसते तर एकाच व्यक्तीचे अनेक गटांमध्ये अस्तित्व असणे हे सार्वजनिक व्यवहारांचे स्वरूप असते. या बहूविध ते मध्ये प्रमुख द्वंद कोणते हा मुद्दा वादग्रस्ततेच्या कक्षेत मोडतो. ही वादग्रस्तता आणि मुलभूत तत्वांकडे जमातवाद दुर्लक्ष करतो. त्यामुळे जमातवादाची समाजशास्त्रीय बैठक कमकूवत बनते व केवळ भक्कम भावनिकतेच्या जोरावर जमातवादाला आपली सगळी मांडणी करावी लागते प्रत्यक्षात धर्माचे सार्वजनिक व्यवहारां व्यवहारांवरील नियंत्रण जर संदिग्ध असेल तर धर्म हा घटक ऐक्यभाव साठी पुरेसा असतोच असे नाही. मात्र त्याच्या आधारे इतर समूहांना वेगळे काढून त्यांना दूर सारण्याची, करण्याची प्रक्रिया तेवढी निश्चितपणे घडून येते. त्यामुळे धर्माधिष्ठीत राष्ट्रवाद हा संकूचित बनतो आणि त्यामध्ये आपण या घटकापेक्षा परके हा घटक प्रभावी बनतो. धर्माधिष्ठीत राष्ट्रवादाची ही मर्यादा व धार्मिक जमातवादा मध्येही निर्माण झालेली दिसते. अश्या पद्धतीने धर्माधिष्ठीत राष्ट्रावादाची उभारणी हे जमातवादाचे रचलेले एक घटित आहे हे जाणवते. ते यशस्वी व्हावे यासाठी ज्याप्रमाणात वैचारिक मांडणी केली जाते. त्यापेक्षा अधिक हा विचार लोकप्रिय करण्यासाठी राजकीय प्रयत्न केले जातात. धार्मिक जमातवाद हे प्रत्यक्षात धर्माधिष्ठीत राष्ट्रवादाच्या निर्मितीचेच राजकारण आहे हे स्पष्ट होते.

## धार्मिक जमातवादाची मूलभूत वैशिष्ट्ये :

भारतीय धार्मिक जमातवादाची काही मूलभूत स्वरूपाच्या वैशिष्ट्यांवरून ही संकल्पना अधिक स्पष्ट करता येईल.

### क) धर्माचे राजकीयीकरण :

समान धर्माची बाब एखाद्या समूहाला इतरांपेक्षा वेगळे करण्याची स्वाभाविक कोटी आहे अशी जमातवादाची भावना दिसते. त्या दृष्टिने समाजातील राजकीय स्पर्धा आणि हितसंबंधाची स्पर्धा ही धर्मगटांत कार्यन्वीत असते हे सिद्ध करण्यासाठी जमातवाद प्रयत्नशील असते. जमातवादाचा चिंतनाचा मूलभूत बिंदू धर्म असला तरी धर्माच्या तत्वज्ञानात्मक बाबींमध्ये जमातवादास स्वारस्य नसते. तर धर्म समूहाचे राजकीय शक्तीमध्ये रूपांतर करने यास जमातवादाला अधिक स्वारस्य असते. त्यामुळे जमातवादी असणे आणि धार्मिक असणे यात मूलभूत स्वरूपाचा फरक आहे. जमातवादी व्यक्तींना धार्मिक मानने ही एक प्रकारची गफलत आहे. कारण व्यक्तींच्या श्रद्धांचे, धार्मिक भाव-भावनांचे राजकीय भूमिकेत रूपांतर घडविणाच्या दृष्टिने जमातवाद सातत्याने गढून गेलेला दिसतो.

### ख) धार्मिक अहंकारास अधिक प्राधान्य :

जमातवाद व्यवहारात धार्मिक चर्चा वा धार्मिक तत्वज्ञान यांच्या मांडणीपेक्षा धार्मिक अहंकार निर्माण करण्यास प्राधान्य देतो. सामान्य लोकांमध्ये आपल्या धर्माविषयीची अतिरेकी श्रद्धा निर्माण करून आपल्या धर्म इतर धर्माहून श्रेष्ठ असल्याचा अहंकार निर्माण केला जातो. त्यासाठी इतिहासाचे धार्मिक, जमातवादी दृष्टिकोनातून विवेचन करतात. ऐतिहासिक महापुरुषांचे धर्माधिष्ठीत अन्वयार्थ प्रस्तूत केले जातात. त्यातून व्यक्तींच्या मनात धार्मिक अतिरेकी भाव उत्पन्न होण्यास मदत होते. धार्मिक अहंकार व श्रेष्ठत्वाची भावना निर्माण झाल्याशिवाय

व्यक्तींच्या सर्व हितसंबंधाना धार्मिक रंग देता येत नाही. म्हणून स्वधर्माविषयीचा अहंकार हा जमातवादातील एक महत्वाचा घटक आहे असे दिसते.

**ग) परधर्माविषयी संशयभाव :**

धर्मात सामाजिक विभागणीचा मूलभूत आधार म्हणून प्रस्तूत केल्यानंतर त्यातून धर्मा-धर्मात दरी निर्माण होणे व स्वधर्म व परधर्म हा वाद वृद्धिंगत होणे स्वाभाविक ठरते. धार्मिक राष्ट्रवाद हा एकाच विशिष्ट धर्माच्या राष्ट्रनिर्मितीचा आग्रह धरतात व त्यामुळे इतर धर्म हे आपोआपच राष्ट्रबाह्य ठरतात. त्यामुळे जमातवादी विचारप्रणालीत परधर्माविषयीचा संशय प्राधान्याने दिसतो. परधर्मीय हे राष्ट्रनिष्ठा बाळगू शकत नाहीत, त्यांच्या राष्ट्रनिष्ठा कच्च्या व संशयास्पद असतात हे गृहीतक जमातवादी विचारांमध्ये केंद्रस्थानी असते. अशा पद्धतीने धार्मिक समूहातील अंतर्गत ऐक्य हे  इतर धर्माच्या अस्मितांशी जोडले जाते.

**घ) इतर धर्मीयांची कोंडी करण्याचे तंत्र :**

परधमार्विषयीचा संशय पुढच्या टप्प्यावर इतर धर्मीयांची कोंडी करण्यासाठी तत्पर होतो. वास्तवात जमातवादाच्या प्रभावातून भिन्न धर्मीय सहसंबंध आकूंचन पावतात व एक संशयास्पद वातावरण तयार होते. या संशयाच्या वातावरणाचा फायदा घेऊन जमातवादी प्रवृत्ती अन्य धर्मीय समूहांसंदर्भात बळाचा येथेच्छ वापर करतात व राष्ट्रहीतासाठी ही हिंसा आवश्यक असल्याचे भासवतात.

**त) धार्मिक आत्मभानास प्रथम स्थान :**

व्यक्तीच्या व्यक्तित्वाची असंख्य पैलू असतात. त्यांचा आत्मपरिचयही अनेक पदरी असतो. मात्र जमातवाद या सर्व पैलूंना मागे सारून धार्मिक आत्मभानास तेवढीच मान्यता देतो. जमातवाद धार्मिक अस्मितां समोर व्यक्ती आपल्या इतर अस्तिना दुय्यम मानेल अशा प्रकारचा भावनिक प्रचार जमातवादी विचार प्रणाली करते. आपण कोण आहोत याविषयीचे व्यक्तीचे आत्मभान प्रत्यक्षात बहुविभतापूर्ण असते. परंतु त्यास नाकारून जमातवाद धार्मिक आत्मभानाचे रोपण करतो.  याचा परिणाम व्यक्तीच्या आकलन क्षमतेवर होऊन धार्मिक विविधता हेच समाजांचे प्रमुख कारण म्हणून मान्यता पावते व स्वधर्माची कुरघोडी करण्याचे प्रयत्न समर्थनीय ठरवले जातात. यादृष्टिने जमातवादाचे सर्व सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक प्रश्नांचे आकलन हे धर्माधिष्ठीत राष्ट्रवादाशी सुसंगतच राहते.

**थ) धर्माच्या बंदिस्त स्वरूपास मान्यता :**

जमातवादास धार्मिक तत्वज्ञानाच्या चर्चेत फारसे स्वारस्थ नसते. तरीही जमातवाद धर्माचा राजकारणासाठी वापर करत असताना धमार्विषयीची काही पूर्वग्रह निश्चित करूनच मांडणी करतो. त्यासाठी स्वधर्मांचे मवाळ व उदार स्वभाव प्रस्तुत केले जाते तर परधर्मास मात्र प्रतिगामी स्वरूपात तेवढे अधोरेखित केले जाते. त्यादृष्टिने धर्मसमूह ही बंदिस्त एकसंध अशी बाब आहे हे जमातवाद गृहीत धरतो. त्यासाठी जमातवाद एका बाजूने स्वधर्मांची एक समावेचक अशी बृहद्दधार्मिक ओळख प्रस्थापित करून व्यक्तीनी तीच स्वीकारावी, सांप्रदायिक भेदांना महत्व देऊन नये, अंतिमतः आपण एकच आहोत असा दावा करतो. तर दुसऱ्या बाजूने परधर्माचा विचार करताना परधर्म ही सुद्धा एक बंदिस्त संघटना म्हणूनच घोषित करतो. त्या धर्मात पंथ-उपपंथाचे अस्तित्व असले तरी त्याकडे दुर्लक्ष करून दुसरा धर्म एकसंघ आहे असेच मानले

जाते. या अर्थाने जमातवादी विचारात धर्म ही एक रचित वस्तूस्थिती ठरते. या रचितामूळे दुसऱ्या धर्माचे कथित दोष स्थानीय सर्व उपपंथावर लादून या धर्माचे तत्वज्ञान धोकादायक कसे आहे ते सिद्ध केले जाते

## द)धर्म व संस्कृतीचे एकात्मे :

जमातवाद धर्म आणि संस्कृती यांची गल्लत करतो. धर्म आणि संस्कृतीच्या बाबी वेगळ्या नसून त्या एकत्र आहेत अशी जमातवादाची धारणा असते. यामागील गृहीत मांडणी स्पष्ट करताना सुहास पळशीकर म्हणतात, ''एक म्हणजे त्याच्या धर्माच्या सर्व व्यक्ती एकाच सांस्कृतिक विश्वाचे घटक असतात असे जमातवाद मानतो. त्यामुळे धार्मिक भिन्नता असली की संस्कृती सुद्धा भिन्न असतेच, असणार असा जमातवादाचा विश्वास असतो. उलटपक्षी एका समान संस्कृतीतील सर्व व्यक्ती त्या एकाच धर्माच्या असावयास हव्या असणार असे ही जमातवाद मानतो. या मध्ये धर्मसंकल्पना अतिव्याप्त केली जाते. श्रद्धा आणि पूजा प्रार्थना यापलिकडे जाऊन धर्म म्हणजे जीवन दृष्टि किंवा जीवन पद्धती असा अर्थ केला जातो..... म्हणजे व्यक्तीची धार्मिक ओळख तिच्या श्रद्धांनुसार केली जाते. पण धर्म ही संकल्पना मात्र व्यापक अशी सांस्कृतिक बाब मानली जातो.''

## ध) धर्मांतरांच्या संकल्पनेला विरोध :

जमातवादाच्या दृष्टिने धर्मांतर म्हणजे आपली संस्कृती सोडून परकीय संस्कृती आत्मसात करणे होय. धर्मधिष्ठीत राष्ट्रवादामध्ये तर धर्मांतर हे राष्ट्रांतर मानले जाते. कारण व्यक्तीचे राष्ट्रीत्व एका विशिष्ट धर्माच्या तत्वाच्या मान्यता पावलेले असते. त्या धर्माचा त्याग म्हणजे एका परीने राष्ट्रीयत्वाचा त्याग मानला जातो. त्यामुळे तो धर्म बदलल्याबरोबर त्या व्यक्तीचे राष्ट्रीयत्व आपोआप संपुष्टात येते असे जमातवाद घोषित करतो. सामूहिक धर्मांतर हे समाजस्वास्थ्या पुढे खऱ्या अर्थाने चिंता उत्पन्न करते. कारण सामूहिक धर्मांतरामुळे राष्ट्रांतर्गत लोकसंख्येचा तोल बिघडण्याची भीती जमातवाद्यांना सातत्याने वाटत असते. त्यामुळे जामातवादास धर्मांतराचा मुद्दा हा वैयक्तिक धार्मिक स्वातंत्र्याचा मुद्दा वाटत नाही तो राष्ट्रहितांशी संलग्न मूलभूत बाब वाटते. एकंदरीत जमातवादाचा धर्मांतर विरोध हा आध्यात्मिक कारणांसाठी नसून तो राजकीय हेतूने प्रेरीत असतो.

## प) स्त्री समूदायास गौणत्व :

जमातवाद धर्मास बंदिस्त समूदायाचा दर्जा देण्यासाठी व त्यामाध्यमातून हिसंक कृत्यांना समर्थन प्राप्त करण्यासाठी आज ही प्रयत्नशील असलेला दिसतो. या दोन्ही भूमिकांमधून जमातवांदाची स्त्री विषयक आपली भूमिका निश्चित होतांना दिसते. आपल्या-आपल्या धर्माच्या प्रतिष्ठेपायी आपल्या स्त्रियांचे रक्षण करणे ही जबाबदारी जमातवादी संघटना स्वतःहून आपल्याकडे घेतात. त्यासाठी इतर धर्मीयांशी संघर्ष करण्याची ते तयारी करतात. परंतु त्याबरोबर आपल्या स्त्रियांवर काही निर्बंध असावयास हवे यासाठी ते आग्रही असतात. स्वधर्मीय स्त्रियांची प्रतिमा ही माता, भगिनी, अबला, पतिव्रता अश्या पद्धतीने जमातवाद जन्माला घालतो ही सर्व रूपे पुरुषप्रधान समांज व्यवस्थेतूनच पुढे आलेली असतात. इतर समुदयांपासून उपभोग्य वस्तू या अंगानेच मुख्यतः जमातवाद स्त्रियांचा विचार करतांना दिसतो. यामध्ये स्त्रियांनाही कसे सहभागी करून घेतले जाते याचे विश्लेषण करतांना प्रा. सुहास पळशीकर लिहीतात, ''जेव्हां दोन भिन्नधर्मीय समूहांमध्ये संघर्ष होतो तेव्हा परस्परांच्या स्त्रियांना आक्रमण व अत्याचाराचे लक्ष केले जाते आणि त्याचे अप्रत्यक्ष समर्थन समूहाच्या अवमानाच्या अप्रतिष्ठेच्या आधारे केले जाते. एकूणच

जमातवाद हा लैंगिक विषमता आणि पुरूष वर्चस्वाच्या व्यवस्थांचा स्वीकार करताना दिसतो. स्वधर्मातील स्त्रीचे रक्षण आणि परधर्मातील स्त्रीवर आक्रमण अशी दुहेरी नीती स्वीकारताना जमातवादी व्यवहारात स्त्रियांनाही सामावून घेतले जाते. म्हणजेच जमातवाद हा स्त्री विरोधी असून त्या विचाराचा प्रभाव स्त्रियांवर ही पडलेला असतोच. त्यामुळे स्त्रियांमध्ये धार्मिक आधारावर फूट पडून वेगळेपणा व शत्रुत्वाची भावना निर्माण होते. दंगलीमध्ये स्त्रियांचा वाढणारा सहभाग आणि दंगलखोर पुरुषांना त्यांच्या धर्माच्या स्त्रियांकडून मिळणारे प्रोत्साहन याबाबी १९९० च्या दशकता ठळकपणे पुढे आल्या.'' एकंदरीत जमातवाद स्त्री विरोधी असला तरी स्त्रिया जमातवाद विरोधी भूमिका घेतातच असे प्रत्यक्षात आढळत नाही. उलट स्त्रिया जमातवादाच्या वाहक म्हणूनच वावरताना सार्वत्रिकरीत्या आढळतात.

### फ) विविधतेवर नियंत्रणाचा आग्रह :

धर्मांची एकसंधता हे जमातवादाचे प्रमुख भांडवल आहे. त्यामुळेच जमातवादाकडून नेहमीच आपण व परके अशी विभागणी करूनच समाजाचा विचार केला जातो. विविधतेच्या संदर्भातील सांशकता जमातवादाच्या ठायी कायम स्वरूपी आढळते. त्यासाठी या विविधतेस नियंत्रणात वा काबूत ठेवण्यासाठी जमातवाद आग्रही दिसतो. या विविधतेची व्यवस्था लावण्यासाठी जमातवाद कुठली व्यूहनीती वापरतो याची मांडणी करतांना प्रा. सुहास पळशीकर म्हणतात, ''एक मुख्य राष्ट्रीय प्रवाह, मुख्य संस्कृती असते, इतर प्रवाह हे उपप्रवाह अश्या समस्या मुख्य संस्कृतीचेच अंश असतात अशी एक मांडणी केली जाऊ शकते किंवा विविधता नाकारताना त्या विविधतेच्या मुळाशी एकच तात्विक बैठक आहे. त्या विविधता म्हणजे एकाच वृक्षाच्या शाखा आहेत, त्यांना स्वायत्त अस्तित्व नाही असा दावा केला जाऊ शकतो. तिसरा मार्ग म्हणजे त्या विविधता ऐक्याला घातक आहेत, परक्या आहेत, त्यांचा प्रतिकार केला पाहिजे असे सांगून त्या विविधतांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाऊ शकते. या मार्गात विविधतांची अधिमान्यता नाकारून त्या राष्ट्रविरोधी आहेत. अशी मांडणी केली जाते. चौथा मार्ग म्हणजे समाजातील बहूविधता ही फूट पाडण्याचे कारस्थान म्हणून कोणत्याही परक्यांनी निर्माण केली अशी मांडणी करून मूळ एकात्म समाजाचे चित्र रंगविले जाते.

धार्मिक जमात वाद धार्मिक विविधतेकडे जसा संशयाने पाहतो तसाच तो धर्मातंर्गत असणाऱ्या पंच व संप्रादायांना ही संशयी दृष्टिनेच जोखतो. अस्तित्वात असणारी विविधता ही जमातवादास संपूष्टात आणावयाची असते म्हणूनच सण, उत्सव, पोशाख इत्यादीतील बहूविधता टाळून एकजिनसीपणा आणण्यासाठी जमातवाद सातत्याने प्रयत्नशील असते. त्यासाठी शिस्त, एकनिष्ठ, लष्करी तयारी, कवायती, गणवेश यासारख्या गोष्टींवर जमातवादी संघटना भर देतात. अशा पद्धतीने जमातवाद खुलेपणा व बहूविधता यांच्या विषयी सतत संशयाचे वातावरण निर्माण करून धार्मिक जमातवाद ऐक्याच्या सातत्याने पुरस्कार करतांना दिसतो

### जमातवादाच्या उदयाची कारणे :

भारतीय समाजकारण व राजकारण यात जमातवादाचा उदय कसा व का झाला याची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे अधिक स्पष्ट करता येतील.

### विशिष्ट राज्यकर्त्यांचे धोरण :

भारतातील जमातवादाच्या उदयास ब्रिटिश राज्यकर्त्यांचे 'फोडा व झोडा' हे धोरण कारणीभूत असल्याचे प्रामुख्याने सांगितले जाते. यातील अतिशोयक्तीच्या बाता बाजूला सारल्या तरी ब्रिटिश

राज्यकर्त्यांनी भारतीय समाज समजून घेताना त्याची विभागणी जन्मजात घटकांच्या आधारेच केली. ही वस्तूस्थिती कायम राहते. भारतीय समाजात अनेक चिरफळ्या पडलेल्या आहेत. या वस्तूस्थितीकडे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी धोरण निश्चितीमध्ये नेहमीच प्राधान्य दिले त्यामूळे हिंदू व इतर अशी विभागणी त्यांच्या धोरणांमध्ये कायमस्वरूपी राहिली. राजकीय अधिकारांचा वाटा मिळवण्यासाठी भारतातील सर्वच समाज धूरीनांनी जातीय व धार्मिक घटकांचा आधार घेतला. त्यातून धार्मिक अस्मिता, अधिकाधिक स्पर्धात्मक, महत्वकांक्षी व ताठर होत गेल्या व त्यातून जमातवादास पोषक घटक मिळत गेले असे मानले जाते. धार्मिक राष्ट्रवादाच्या आधारेच भारताची फाळणी होऊन भारतास स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी भारताने प्रचंड स्वरूपाचा धार्मिक हिंसाचार अनुभवला अश्या पद्धतीने जमातवाद व जमातवादी संघर्ष हा स्वतंत्र भारताचा एक ऐतिहासिक वारसा आहे असे मानावे लागेल.

## १. आधुनिकीकरणाची प्रक्रिया :

धार्मिक समूहांचे बंदीस्त जमातींमध्ये रूपांतर कसे घडून येते याचे एक उत्तर आधूनिकता व आधूनिक राज्यसंस्था यांच्या दडपणावर समूहांचे धार्मिक जमातीत रूपांतर होते असे दिले जाते. या दृष्टिने अशी मांडणी केली जाते की आधूनिक मूल्यव्यस्था, त्यातून उभी राहणारी राज्यसंस्था पारंपारिक श्रद्धांवर आघात करतात, पारंपारिक सामूहिकता नाकारतात. आधूनिक प्रशासकीय व्यवस्थेचा एक भाग म्हणून व्यक्तींचे सर्व अस्तित्व प्रशासकीय कोटीत बनविले जाते. तर दुसऱ्या बाजूने राज्यसंस्थेच्या धोरणांमधूनच सामूहिक अस्तित्वांची लवचिकता नाहीशी होण्यास हातभार लागतो. त्यातच राज्यसंख्या बाहेरून आधूनिक मूल्यव्यवस्था समाजावर लादत जाते. हा राज्यसंस्थेचा हस्तक्षेप समूहांच्या सांस्कृतिक जीवनाच्या दृष्टिने उपरा असतो. या सर्व हस्तक्षेपामधून धार्मिक समूह असुरक्षित बनतात. आपआपल्या समूहांच्या सीमरेखा आखल्या जातात. त्या पक्क्या करण्यासाठी धार्मिक समूह कार्यरत होतात. सारांश स्वरूपात असे म्हणता येईल की, जमातवाद हा आधूनिकतेच्या आक्रमणाचा एक परिणाम आहे व राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपाने तो अधिक फोफावतो. मूलतः परंपरांचे विधायक परिष्करण न करता परंपरा व आधुनिकता अशी ठोकळेबाज विभागणी झाल्याने जे विपर्यास जन्माला येतात ते धार्मिक जमातवादाच्या रूपाने व्यक्त होताना दिसतात असे म्हणता येईल.

## २. उच्चजातीसमूहाची मानसिकता :

जमातवादाच्या उदयास उच्चजाती समूहाची मानसिकता प्रामुख्याने जबाबदार आहे असे एक कारण अभ्यासक प्रस्तूत करतात. यात प्रामुख्याने अशी मांडणी दिसते की, उच्चजातींच्या वर्चस्वाला कनिष्ठ जातींकडून आव्हान मिळाले की त्यावर मात करण्यासाठी परधर्मीयांकडून असलेल्या धोक्याची भीती दाखवून कनिष्ठ जातींना जमातवादाच्या प्रभावाखाली आणले जाते. या दृष्टिने जमातवादाचा वापर उच्चजाती समुदाय स्वतःचे वर्चस्व राखण्यासाठी हत्यार म्हणून वापर करतात. हा यूक्तिवाद प्रामुख्याने हिंदुजमातवादाच्या संर्भात केला जात असला तरी तो भारतातील अल्पसंख्याक जमातवादाच्या संदर्भात सुद्धा प्रत्ययास येताना दिसतो. या युक्तिवादास राष्ट्रीय आंदोलनाशी ही जोडले जाते. याची मांडणी करतांना प्रा. सुहास पळशीकर लिहीतात की, ''इंग्रजी राजवटीविरूद्धच्या लढयात आम जनतेला गुंतविण्यासाठी सामान्य स्थितीतल्या कनिष्ठ जातींच्या समूहांना राजकीय दृष्टया जागृत करणे गरजेचे होते. या प्रक्रियेत पारंपारिक जाती आणि वर्गव्यवस्थेला धक्का लागून जातिव्यवस्था काहीशी दुर्बल होण्याचा धोका होता. म्हणून उच्चजातींनी स्वतःकडे नेतृत्व ठेवून धर्माधिष्ठीत राष्ट्रवादाची मांडणी केली. त्यामुळे सामान्य हिंदू व मुस्लिम हे एक न होता एकमेकांच्या विरोधात आपापल्या धर्मनीति

उच्च/प्रतिष्ठित समूहांच्या नियंत्रणात राहिले. राष्ट्रीय चळवळीत परक्या राजवटीच्या विरोधात जी प्रतिके उभी केली गेली ती ही अनेक वेळा धार्मिक परिभाषेतील प्रतीके होती. त्यामुळे आपोआपच येथील राष्ट्रवादाला एक धार्मिक परिभाषा प्राप्त झाली. परकीय म्हणजे परधर्माचे आणि राष्ट्रभक्ती म्हणजे स्वधार्माभिमान अशी समीकरणे व्यापक प्रमाणात रूजली. स्वातंत्र्य चळवळीतील धार्मिक परिभाषेने धर्म व राष्ट्रवादाचा एक महत्वाचा घटक म्हणून प्रस्थापित केला. हा इतिहास जमातवादास अवसर मिळवून देण्यास कारणीभूत ठरला.'' एकंदरीत उच्चजातीवर्गाची मानसिकता व हितसंबंध हे जमातवादाच्या उद्यास एक महत्वाचे कारण झाले असे दिसते.''

### ३. भौतिक हितसंबंधाची स्पर्धा :

काही अभ्यासकांच्या दृष्टिने जमातवादाच्या उद्यास मुख्यतः भौतिक हितसंबंधाची धर्मा-धर्मात असणारी स्पर्धाच कारणीभूत असते मात्र या भौतिक हितसंबंधाना धार्मिक रंग देणे त्यांना अधिक श्रेयस्कर वाटते व त्यातून धार्मिक जमातवाद फोफावते. भौतिक प्रश्नांचा थेट सामना करणे ज्यावेळी अशा धर्मसमूहांच्या आवाक्या बाहेर जाते त्यावेळी धार्मिक अस्मितेचा आधार घेतला जातो व त्यातून जमातवादी राजकारण अधिक सक्रिय होते. शहरी भागात प्रामुख्याने अशा पद्धतीच्या प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात कार्यरत असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. दोन उद्योजकातील स्पर्धा, व्यापारी वर्गातील स्पर्धा हे याचे उत्तम उदाहरण आहे. ही खरे तर व्यावसायिक, आर्थिक स्पर्धा असते. मात्र त्यास संघर्षाचे स्वरूप देवून धार्मिक तेढ निर्माण केली जाते. दंगली घडवून आणून प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करण्याचा प्रयत्न केला जातो हे मिरज सांगली दंगलीमध्ये महाराष्ट्राने अनुभवले यातून या घटकाचा प्रत्यय आपणास येतो.

### ४. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे संदर्भ :

जागतिकिकरणाची प्रक्रिया व जमातवादाचा विस्तार या एकाच कालखंडात भारतीय समाज जीवनावर गारूड निर्माण करताना दिसतात. या अर्थाने जागतिकीकरणाची प्रक्रिया ही जमातवादाच्या फोफावण्याला पूरक अशी एक मांडणी यासंदर्भात केली जाते. या दृष्टीने असे समर्थन मांडले जाते की, जागतिकीकरणातून निर्माण होणारी सांस्कृतिक पोकळी व तीव्र होणारा भौतिक संघर्ष यामधून एक निराधार, भणंग वर्ग समाजात निर्माण होतो. आपल्या निराधार अवस्थेला जबाबदार म्हणून कोणा एका धार्मिक समूहास तो लक्ष्य करतो. या अर्थाने जागतिकीकरणातून जमातवादाला अप्रत्यक्षपणे बळ मिळते. जागतिकीकरणामुळे अस्मितांचे राजकारण फोफावते. हा केवळ भारताचाच अनुभव नसून तो जागतिक संदर्भात येणारा अनुभव आहे. भारतात जागतिकीकरणामुळे परदेशस्थ भारतीयांचा जमातवादास हातभार लागला. त्याच्या देणग्यांवरच जमातवादी शक्ती मोठ्या प्रमाणात विस्तारत गेल्या. परकीय सांस्कृतिक परिसरात या भारतीयांचा सांस्कृतिक व राष्ट्रवादाच्या धारणा अधिक टोकदार बनल्या होत्या त्याचाच वापर भारतीय जमातवादाने करून घेतलेला दिसतो.

### ५. धर्म समूहाचे परस्परावरील आरोप :

जमातवादी विचारांचे अनुयायी प्रामुख्याने यासंदर्भात जमातवादाच्या उद्याची कारणे विशद करतांना आढळतात. बहुसंख्याक धर्माचे जमातवादी हे जमातवादाच्या वारीसाठी प्रामुख्याने अल्पसंख्याक समूहास कारण ठरवतात. तर अल्पसंख्याक जमातवादी बहुसंख्याकाच्या प्रवृतीच त्यास कारणीभूत मानतात. अल्पसंख्याक समूहातील जमातवाद्यांच्या दृष्टीने अल्पसंख्याक समूह हा असुरक्षित आहे त्यातून त्याची समाजात जमातवादी प्रतिक्रिया साकार होते. या दृष्टीने

जमातवादाची कारण मिमांसा करताना क्रिया-प्रतिक्रिया या घटकास अधिक महत्त्व दिले जाते. त्याचबरोबर परधर्मीयांचे भाष्यज्ञान हे कसे जमातवादी प्रवृत्तीस कारणीभूत आहे व आतंकवादास जन्म देते व स्वधर्मीय जमातदाद हाच कसा खरा राष्ट्रवाद आहे हे बिंबवण्यास प्राधान्य दिले जाते.

## ६. जमातवादी संघटना व राजकीय पक्षांची भूमिका :

जमातवाद फोफावण्यास भारतीय जमातवादी संघटना व जमातवादी राजकीय पक्षांची भूमिका महत्वाची आहे हे वास्तव ही नाकारता येत नाही. जमातवादी संघटनेचा प्रचार कार्यविस्तार यातून समाजातील वातावरणाचे जमातीकरण होऊन त्यास संघटित स्वरूप होते तर राजकीय पक्ष त्यास राजकीय पातळीवर कार्यान्वित करताता. याशिवाय सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर होणारा प्रचार प्रसार माध्यमांची जमातवादी भूमिका, राजकीय नेतृत्वाची जमातवादी मनोवृत्ती जमातवादी मुद्दयांवर मिळणारा उठाव व त्यातून घडून येणारी सामूहिक भूमिका इत्यादी घटकांमधून जमातवादाचा विस्तार घडून येताना दिसतो.

## ७. भारतीय जमातवादाचा विस्तार :

भारतीय जमातवादाच्या या विस्तारात प्रामुख्याने तीन प्रतिमाने आढळतात. त्यातील एक परिमान धर्मा-धर्मांतील हिंसात्मक दंगलीचे आहे तर दूसरे प्रतिमान विविध धार्मिक समूहांचे राज्य निर्माण करण्याच्या प्रयत्नाशी निगडीत आहे. धर्माच्या आधारावर सामूहिक आत्मभान निर्माण होणे-करणे हे याचे तिसरे प्रतिमान मानता येईल. जमातवादाचा उदय भारतात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाला तेव्हा पासून आजतागायत जमातवादी व्यवहारातही प्रतिमाने आढळतात. भारतीय जमातवादाचा विकास हा बहूसंख्याक जमातवाद अर्थात हिंदूजमातवाद, अल्पसंख्याक जमातवाद यात प्रामुख्याने मुस्लिम, शिख व ख्रिश्चन जातवाद या संदर्भात अभ्यासता येईल त्याची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

### १. अल्पसंख्याक जमातवादाचा विस्तारः

मुस्लिम, शिख व ख्रिश्चन या अल्पसंख्याक समूहात प्रामुख्याने जमातवादी संघटना व शक्ती कार्यरत असलेल्या दिसतात. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातही अल्पसंख्याक जमातवादी शक्तींनी भारतीय समाजजीवनाला व राजकीय प्रक्रियांना प्रभावित केलेले दिसते. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### १. मुस्लिम जमातवादः

इस्लाम भारतात १९ व्या शतकात प्रथम पोहचला. मुस्लिम आक्रमकां बरोबर इस्लामिक धर्म ही भारतात स्थिर स्थावर झाला. भारतात इस्लामचा विस्तार करण्यात सुन्नी या पारंपारिक इस्लामी सांप्रदाया ऐवजी अधिक उदार असणाऱ्या सुफी पंथीयाचा प्रभाव अधिक आढळतो. महमंद गझाली, महमंद घोरी पासूनच सुफी पंथीय मुस्लीम भारतात दाखल झाले होते. सुफी भारतात आल्यानंतर त्यांनी जो इस्लाम भारतात प्रस्थापित केला तो स्थानिक परंपरा, स्थानिक समाजाचा आधार घेत. त्यामुळे भारतात इस्लाम हा अरबी इस्लाम फार वेगळा आहे. इतिहासाचा स्वतःचा असा एक प्रवाह असतो. ज्याच्यात माणस बदलत जातात. आचार, विचार बदलत जातात, धर्म ही बदलतात. त्यापासून भारतात इस्लामचे वेगळे रसायन तयार झाले ज्याचा एक मोठा आधार इतर धर्मीयांसी समन्वयावर उभारलेला होता. इस्लामिक राजवटीत विविध प्रकारची कला, विविध प्रकारचे औदार्य, परस्परांना समजून घेणे हे त्याकाळात विकसित होत गेला. मुस्लिम

राज्यकर्त्यांनी भारतीय तत्वज्ञानाचा, कलेचा, साहित्याचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर खगोलशास्त्र, ज्योतिष यांचा ही अभ्यास केला. ते अरबी भाषेत भाषांतरीत केले. अशा क्रिया-प्रतिक्रियांच्या स्वरूपात ही समाज समृद्ध होण्याची प्रक्रिया चालू होती त्यातून एका बाजूने नवा इस्लाम तयार होत होता तर दूसऱ्या बाजूने नवहिंदुत्व ही आकारास येत होते. या दृष्टीने जमातवाद प्रवृत्तीच्या दिशेने मुस्लिम समुदायाने कसा प्रतिसाद दिला व तो कसा विकसित होत गेला हे पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**अलीगढ विद्यापीठः**

ब्रिटिश भारतात आल्यानंतर हिंदू व मुस्लिम समुदायाकडून वेगवेगळे प्रतिसाद ब्रिटिश राज्यकर्त्या प्रती निर्माण झाले. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारताची सत्ता ही इस्लामिक राज्यकर्त्यांकडून हस्तगत केली होती. त्यामुळे सुरूवातीच्या काळात ब्रिटिश राज्याविषयी एक प्रकारची चीड व असंतोष मुस्लिम धर्मियांमध्ये स्वाभाविकपणे निर्माण झालेला होता. या काळात प्रभावी असणाऱ्या वहाबी चळवळीने असा सुर लावला की आपण पाक मुसलमान नाहीत म्हणून आपण पराभूत झालो आहोत. त्यामुळे ब्रिटिशांना विरोध करताना परत मुस्लिम राज्याची स्थापना करणे हे पाक मुसलमान करण्यासाठीच वहाबी चळवळीच उद्दिष्ट होत. त्यामुळे ब्रिटिश राज्यकर्त्याच्या सुधारणांना मुस्लिम समुदायाकडून मिळणारा प्रतिसाद अतिशय थंड व नकारात्मक स्वरूपाचाच होता. १८५८ ते १८९८ या वर्षात ३१५५ हिंदु पदवीधर झाले होते तिथे मुस्लिम पदवीधरांशी संख्या केवळ ५७ एवढी अल्प होती यावरून याची प्रचिती येते. पुढील काळात हिंदु धर्मीयांची प्रगती मुस्लिम धूरीणांच्या नजरेत भरू लागली. ब्रिटिश राजवटीत शिरकाव करून इंग्रजी शिक्षणाचे फायदे उचलल्याशिवाय मुस्लिम समाजास पर्याय नाही याची प्रथम जाणीव जर सय्यद अहमद खान यांना झाली. त्यासाठी त्यांना मुस्लिम धर्मीय ब्रिटिश सभेविरूद्ध आहेत ही प्रतिमा पुसून टाकण्याची आवश्यकता होती. त्यांनी प्रयत्नांना सुरूवात केली या प्रयत्नांचाच एक मोठा भाग म्हणजे अलिगढ विद्यापीठची १८८८ साली त्यांनी केलेली स्थापना होय. मुस्लिम समाजाची ब्रिटिश विरोधी प्रतिमा पूसता-पूसता मुस्लिमांच्या हक्क व अधिकारांसाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून झुकत माप मिळाव यासाठी सर सय्यद अहमद खान यांनी मुस्लिम धर्मीयांचा वेगळया हितसंबंधाची व स्वतंत्र अधिकारांची मागणी उचलून धरत व द्विराष्ट सिद्धांत विकसित करण्यात महत्वाची भूमिका बजावली अश्या पद्धतीने मुस्लिम जमातवादाची प्रथम आवृत्ती अलिगड विद्यापीठातून निर्माण झाली व विद्यापीठ प्रथम या काळात मुस्लिम जमातवादाचे केंद्र बनले. मुहम्मद इक्कबाल सारे जहाँ से अच्छा हिदोंस्तां हमारा या आजरामर गीताचे निर्माते. प्रतिभाशाली व्यक्तिमत्त्व म्हणून महमंद इकबाल हिंदू-मुस्लिम एकतेचे एक प्रकारे प्रतिक होते. १९०५ पर्यंत त्यांचा या संमिश्र अस्तित्वाच्या धारणे गाढ विश्वास होता. पुढे ते युरोपच्या दौऱ्यावर गेल्यानंतर व अरबस्तान, रशियन, पर्शिया इत्यादी मुस्लिम देशांना भेटी दिल्यानंतर मात्र त्यांची ही धारना बदलली. हिंदु-मुस्लिम ऐक्याची कल्पना सुंदर आहे. काव्यमय आहे परंतु ती प्रत्यक्षात साकारू शकत नाही. अश्या पद्धतीची त्यांची धारणा इत्यादी संदर्भात त्यांनी भारतात परत आल्यानंतर मांडणी करताना असे विधान केले की, I have my self been of the view that religious difference should disappera from this country. I even now act on this principle in my private life. But I think that preservation of their separate national entities is desirable for both the Hindus & Muslims. The vision of the coomon nationhood of India is a beautiful idea & has a poetic appeal; but apperars incapable of fulilment" महमंद इक्कबाल यांच्या या दार्शनिक स्वरूपाच्या विचारांमधूनच पाकिस्तानच्या कल्पनेची पायाभरणी झाली हे दुदैवी वास्तव आहे.

## तबलीघः

१९२० च्या सुमारास स्वामी श्रद्धानंद यांच्या पुढाकाराने हिंदु धर्मात शुद्धीकरणाची मोहीम मोठया प्रमाणात सुरू झाली. इतर धर्मात गेलेल्यांना परत हिंदु धर्मात घेण्याची ही चळवळ होती. त्याची प्रतिक्रिया म्हणून भारतात तबलीघ चा उद्य झाला. दिल्ली येथे त्याचे प्रमुख केंद्र कार्यरत झाल. मुहम्मद इलीयाव हा तबलीघ चा मुख्य प्रणेता होता. मुस्लिम जमातवादच्या संदर्भात मोहम्मद इक्कबाल यांच्या नंतर तबलीघी मांडणी हा एक महत्वाचा टप्पा होय. तबलिघींच्या संदर्भात योगिंदर सिंवाद या अभ्यासकाने काही निरीक्षण नोंदवली आहेत. त्यात ते म्हणतात की ''शुद्धी चळवळ सुरू झाल्यानंतर मुस्लीम नेतृत्वाने असा विचार केला की मुस्लिम पुन्हा हिंदु धर्मामध्ये का परत जाताहेत? किंबहुना मुस्लिम समाज अधोगतीला का आहे? त्याची कारण काय आहेत? ब्रिटिश व हिंदूच्या पक्षपाती धोरणांची त्यांना जाणीव होती. त्याच महत्वाच म्हणन होत की सामान्य मुसलमानांना आज ज्याला ओबीसी, निम्नवर्गीय म्हणतात त्या मुसलमानांपर्यंत खरा इस्लाम धर्म पोहचला नाही. तिथपर्यंत इस्लाम जायला पाहिजे आणि त्या मानवाला या धर्मामध्ये रस, हित वाटले पाहिजे. अजलक म्हणजे सामान्य व अप्रक म्हणजे उच्चवर्णीय असा जो भेद आहे त्यात अजलक माणसाची आपलक केल पाहिजे. त्याच्या साठी म्हणून इस्लामची कर्मकांडामध्ये समानता हवी. म्हणजे शरीयतची जी समानतेची कल्पना आहे ती त्याच्यापर्यंत पोहचली पाहिजे.'' यादृष्टीने तबलीघींनी समानता आणण्यास सुरूवात केली. त्याचाच एक भाग म्हणून तबलिघी मौलवीनाही सरळ प्रश्न विचारायचे धाडस दाखवतात जे पारंपारिक इस्लामच्या सभ्यतेत बसणारे नाही. ज्यामुळे मौलवींचा तबलीघींना विरोध दिसतो. ही समानता प्रस्थापित करतानाच तबलिघी दुसऱ्या प्रकारचा आग्रह टोकदार करतात की आपला इस्लाम इथल्या स्थानिक परंपरापासून बनला आहे. त्यामुळे आपण आपले स्थानिक संस्कृतीत रूतलेले दोर तोडले पाहिजेत. इस्लामी परंपरेचे आपण परस्परांशी निगडीत व्हाव असा त्यांचा अट्टाहास असतो. समीर मणीयार हे पत्रकार या हजरी ते तबलीघी जमातीचा विचार त्यांच्या स्तंभातून वर्णन करतांना सांगतात की तबलिघीचे या देशातील मुस्लिमांना सांगणे असते की, ''तुम्ही या राष्ट्राचे किंवा या लोकांमधले नाही आहात, तुम्हाला इथे काय होत याच्या बद्दल फारशी चिंता करण्याचे कारण नाही, त्याऐवजी इस्लामी जगात काय होतय हा तुमचा चिंतेंचा प्रमुख मुद्दा असावा. त्यामुळे तबलिघी अफगाणिस्थान मध्ये इराकमध्ये, चेचेन्या मध्ये घडणाऱ्या घटनांनी व्यथित होतील परंतु दिल्लीतील घटनांशी त्यांना काही देने घेणे नसते तबलीघी राजकारणात सहभागी होत नाहीत. त्यांच्या मते आमच जिहादच रूपच वेगळ आहे. आम्ही जिहादसाठी काम करतो त्याचा उपयोग इतरांनी करून घ्यावा. एकंदरीत स्थानिक संस्कृतीपासून एतद्देशीयते पासून तोडणे हा एक फार मोठा भाग तबलीघच्या एकदंर प्रयत्नात आहे. तेच एक प्रकारे व्यापक राजकारण आहे. आपल्या इतिहास आणि समाज यातले धागे तोडून टाकण हा तबलिघीचा जमातवादी कार्यक्रम आहे.

## बॅ. महमंद अली जीनाः

मुस्लीम जमातवादाच्या विस्तारात बॅ. महमंद अली जीना याचा महत्वाचा वाटा आहे.१९२५ सालापर्यंत राष्ट्रीय एकात्मचे व हिंदू-मुस्लिम एकतेचे ते प्रतिक व कट्टर पुरस्कर्ते म्हणून ओळखले जात होते. १९३० नंतर मात्र त्यांनी भारतीय राजकारणात पुन्हा पदार्पण करतांना कट्टर जमातवादी भूमिका घेतली व द्विराष्ट्रवादाची पायाभरणी अधिक भक्कम केली. यासंदर्भात मांडणी करताना त्यांनी हिंदु व मुस्लिमांमधील भेद खोलवर मुळे असलेले व मिटवता न येणारे आहेत हे हिरहीरीने मांडले. बँ. जीनांच्या मते आमची स्वतःची वैशिष्टय पूर्ण संस्कृती सभ्यता भाषा साहित्य व कल, स्थापत्य, नाव व संज्ञा प्रमाण व मूल्यांची जाणीव, कायदे व नैतिक नियम,

प्रथा, देव, इतिहास व परंपरा, दृष्टिकोन व आकांक्षा अशा सर्व अंगानी स्वतंत्र व वेगळे राष्ट्र आहोत. या संदर्भात मांडणी करताना जीना म्हणतात, "The difference between Hindus & Musliums is deep-rooted & ineradicable we are a nation with our own distinetive culture, civilization language & art & archtiecture, names & honeencla twe bsent of value & proportion, legal laws & mored coeles, custome & catidar history & traditions atitudes & ambitions" अश्या पद्धतीने बॅं. जीना, यांनी गांधी संमिश्र व सह असतित्वाच्या आधारावर उभ्या करत पाहणारा भारतीय राष्ट्रीय वादास नाकारून द्विराष्ट्रवादाची व मुस्लिम जमातवादाची आक्रमता अधिक वृद्धीगंत करत नेली व त्याची परिणती भारताच्या फाळणीमध्ये झाली.

**फाळणीच्या वेळी झालेला हिंसाचारः**

धर्माच्या आधारावर भारताची फाळणी झाली त्यावेळी प्रचंड हिसांचाराचा अनुभव हिंदु व मुस्लिम अशा सर्वांनाच समूळ प्रभावित करणारा होता. फाळणीच्या दरम्यान भारताच्या अनेक भागातील मुस्लिमांमध्ये अलगतेची भावना निर्माण करण्यात मुस्लिम लिगला यश आले. फाळणीच्या बरोबरच सीमावर्ती भागामध्ये हिंदु व मुस्लिम मनुष्यहानी व वित्तहानी याच बरोबर फाळणीच्या वेळच्या हिंसाचारापुढे दोन समाजातील परस्पर संशय वाढला. त्याशिवाय मुस्लिम लीगच्या जमातवादी राजकारणातून फाळणी झाल्यामुळे भारतातील जनता मुस्लिम समाजविषयी साशंक बनण्यात हातभार लागला. हिंदु जमातवादी संघटनांनी त्याचा फायदा घेऊन हिंदुमध्ये धार्मिक जमातवादाची पाळेमुळे रोवण्याची संधी साधली. त्यानंतर भारतातील मुसलमानांना काही अडचण असेल तर पाकिस्तान मदत करावयास तयार आहे असे जाहीर विधान केले. त्याबरोबरच भारतीय मुस्लिमांना भारताशी प्रामाणिक राहण्याचा सल्ला ही दिला. या सल्यामध्ये अप्रत्यक्ष आतंकवाद असलेला होता. तुम्ही दुर्देवाने तिथे आहात त्यामुळे तिथे जरा प्रामाणिक रहा. परंतु या काळात मुस्लिम नेतृत्वाने सकारात्मक भूमिका घेऊन बॅं. जीनाचे पाकिस्तान धार्जिणे धोरण धुडकावून लावले. १९४८ साली झाकीर हुसेन व अनेक प्रतिथयश मुस्लीम नेत्यांनी संयूक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांना पत्र लिहून पाकिस्तानला त्या पत्रात लिहीले होते, ''पाकिस्तानला सांगा भारतात हस्तक्षेप करू नका, आमच जीवन खराब करून नका. आम्ही हिंदु भावांसोबत सुखी आहोत. आमच्या समस्या असतील त्या आम्ही सोडवू मुस्लिम म्हणून तुम्ही हस्तक्षेप करायाचा नाही,'' ही एक प्रकारे मुस्लिम जमातवाद्यांना चपराक होती.

**जमातवादाच्या मर्यादित प्रभावाचा काळ :**

भारतात १९४७ नंतर जवळ-जवळ तीन दशकभर जमातवादाचा प्रभाव तसा मर्यादित राहिला. मुस्लिम जमातवादी संघटना फाळणीमुळे बदनाम झालेली असल्याकारणाने त्यांची लोकप्रियता कमी झाली. सर्वसामान्य मुस्लिम समाज मुख्यतः कांग्रेस व काही प्रमाणात समाजवादी व कम्यूनिस्ट या पक्षांच्या मागे राहिला. त्या कालखंडाला धार्मिक दंगली घडल्या तरी जमातवादी चा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला नाही. नेहरू, इंदिरा गांधी यांच्या प्रभावामुळे सामान्य जनता शहरी व ग्रामीण भागातील गरीब समाज मूस्लिम लिग च्या प्रभावापासून दूरच राहिला. तसेच नेहरूंच्या विकासाचे व राष्ट्रबांधनीचे प्रारूप यामुळे पांढरपेश्या वर्गातही जमातवादाला अगदी मर्यादित सहानुभूती मिळू शकली. या कालखंडात फाळणीपूर्वीच्या धर्माधिष्ठित राजकारणाची लोकप्रियता बऱ्याच अंशी ओसरली होती. असे असले तरी फाळणीनंतरही भारत एकधर्मी वा एकजिनसी देश झाला नाही. पाकिस्तानपेक्षा अधिक मुस्लिम भारतातच राहिले. त्याबरोबरच बौद्ध, जैन, शिख, ख्रिश्चन या धर्मीयांचे अस्तित्व मोठे होते. या बहुधर्मिय अस्तित्वामुळे धार्मिक जमातवादाच्या

संदर्भात नव्याने काही प्रश्न निर्माण झाले. या प्रश्नांची मांडणी करतांना सुहास पळशीकर म्हणतात, ''पहिला प्रश्न म्हणजे बहुसंख्य हिंदुच्या संस्कृतीचा प्रभाव इतर धर्मीयानी मान्य करायला हवा की नको? हिंदू संस्कृती हाच भारताच्या राष्ट्रवादाचा आधार व्हावा की नाही हा दुसरा प्रश्न. हिंदु बहुसंख्य असल्यामुळे राजकारण सार्वजनिक जीवन यात त्याचे वर्चस्व असते तर त्यात वावगे काय हा तिसरा प्रश्न मुस्लिमांमुळे फाळणी झाली असे मानणाऱ्यांच्या दृष्टीने भारतातील मुस्लिमांची धर्मनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा यात तणाव असतो. हे खरे आहे पण हा चौथा प्रश्न. अल्पसंख्याकांना खास अधिकार देणे, त्यांना खूष करणे, त्यांचा अनुनय करणे या गोष्टींची गरज काय हा पाचवा प्रश्न. या व अश्या प्रश्नांमधून व त्यांच्या उत्तरांमधून हिंदू, मुस्लिम इ. समूहाचे जमातीकरण होण्याची शक्यता उत्तरोत्तर या काळातही कायम राहिली. मुस्लिम ही वेगळी जमात आहे हा युक्तिवाद मुस्लिम जमातवादी करीत राहिले आणि हिंदू जामतवादीही करत राहिले. त्यासंदर्भातच मुस्लिम जमातवादाचा प्रतिकार करून भारतीय राष्ट्रवाद बळकट करण्यासाठी हिंदूचे जमातीकरण करून हिंदू राष्ट्रवादाचे संवर्धन करावयास हवे ही भूमिका हिंदू जमातवादी घेत राहिले. अशा पद्धतींच्या जमातवादी भूमिका या कालखंडात ही वापरात होत्या फक्त राजकीय घडामोडींना वळन देण्याची क्षमता व शक्ती त्यांच्यात आली नव्हती असे म्हणता येईल.

## मुस्लिम जमातवादाचे अभिजनवादी स्वरूपः

१९६० नंतरच्या काळात भारतात हिंदू आणि मुस्लिम जमातवादी यांनी आपले प्रस्थ अधिक विस्तारण्यास सुरूवात झाली. या काळात मुस्लिम जमातवादाचा चेहरा हा अभिजनवादी होता. सुफीयांमधील उच्च वर्गीय गटाचे वर्चस्व व फूस या जमातवादा मागे होती असे दिसते. दिल्ली येथील प्रसिद्ध इतिहासकार इम्तियाझ यांनी हे दाखवून दिल की सूफिया जमातवादाच नेतृत्व अश्रफ व सय्यद या उच्चवर्णीयांकडेच आहे. बिहारचे अली अकबर यांनी माजावत की जंग, पसेमंजर बिहार का पसामांदा मुसलमान' या पुस्कात जी आकडेवारी दिली आहे ती या संदर्भात महत्वाची आहे. या पुस्तकात ते लिहीतात की, ''मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड चे ११ अधिकारी आहेत त्यापैंकी १० उच्चजातीय आहेत. मिल्ती कौंशिलचे ४८ सदस्य आहेत त्यात उच्चजातीय सदस्य आणि अश्रफ ४४ आहेत. बिहार जाति ओरीवाच्या प्रबंधक मंडळातील २१ पैकी १९ लोक उच्चजातीय आहेत.''या आकडेवारी वरून हे स्पष्ट होते की मुस्लिम नेतृत्व उच्चजातीकडे एकवटलेले होते. मुस्लिम धर्माचे प्रवक्तेपण व सत्ता आपल्याकडे कायम राखण्यासाठी त्यांनी जमातवादी प्रवृत्तींना हवा दिली. त्यासाठी त्यांनी सामान्य मुस्लिमांचे शिक्षणाचे, रोजगाराचे मूलभूत प्रश्न बाजूला केले गेले. व ज्याचा सामान्य मुस्लिमांशी कसलाही संबंध नाही त्या प्रश्नांना मुख्य प्रश्नांचा दर्जा देण्यात आला. मुख्य प्रश्न सोडून देवून लोकांच नेतृत्व आपल्यात हातात राहील त्याच गोष्टी पुढे आणण्याचे जमातवादी धोरण मुस्लिम अभिजनवादी वर्गाने अंमलात आणलेले दिसते.

## पॅन – इस्लामी राजकारणः

साधारण १९८० च्या दशकात मुस्लिम जमातवादाने पॅन-इस्लामी राजकारणाचा आधार घेतलेला दिसतो. कार्ल मार्क्ल ने जशी जगातील कामगारानों एक व्हा अशी हाक दिली होती तशीच जगातील मुस्लिमांनो एक व्हा हे पॅन-इस्लामी राजकारणाचे मध्यवर्ती सूत्र आहे. भारताबद्दल या पॅन-इस्लामिक प्रवृत्तींचा राग आहे. त्यांच म्हणणे असे आहे की, काफिर शक्तींनी, म्हणजे भारत, इस्त्राईल व अमेरिका यांनी इस्लामविरोधात कट उभारला आहे आणि त्यातून इस्त्राजयला वाचवण्यासाठी जगातील सर्व इस्लामी राजवटीनीं एक व्हाव. काश्मिर हे पॅन-इस्लामिक

साम्राज्यामधील एक महत्वाच ठिकाण असेल. लष्कर ए तोएबाचा प्रमुख या संदर्भात म्हणतो की, ''गुजरातच्या मुसलमानांना पाकिस्तानात यायचे असल्यास त्यांनी खुशाल यावे. त्यांचा पाकिस्तानवर हक्क आहे. मुस्लिमांना राष्ट्राच्या सीमा बांधू शकत नाहीत. भारत-पाकिस्तान ही सीमा हिंदुसाठी आहे. मुस्लिमांसाठी नव्हे,'' या पॅन-इस्लामिक राजकारणांच्या नेतृत्वाने अशी कल्पना मांडली आहे की जगातील २२ टक्के म्हणजे १९० कोटी पेक्षा अधिक मूस्लिम लोकसंख्या आहे. मोरोक्को ते इंडोनेशिया अशा मोक्याच्या ठिकाणी मुस्लिम राष्ट्र आहेत. त्यामुळे मुस्लिम राष्ट्रीयत्वाला संपूर्ण जगात पसरवण्यास हरकत नाही. हा पॅन-इस्लामिक राजकारणाचा भाईचारा केवळ जमातवादी राजकारणापर्यंत न थांबता दहशतवादामध्ये परावर्तित होतो व संबंध जगाला दहशतवादी कारवायांनी वेठीस धरतो हा अनुभव प्रत्ययास येतो आहे. भारतातील मुस्लिम जमातवादी ही या पॅन-इस्लामिक राजकारणास बळी पडून संपूर्ण जग हिरवे करण्याच्या स्वप्नात रंगून गेले आहेत हे खेदजनक आहे.

**बांग्लादेश निर्मितीचा बदला :**

मुस्लिम जमातवादी राजकारण करणाऱ्या धूरीणांसाठी बांग्लादेशची निर्मिती ही मोठी चपराक आहे. धर्माच्या नावीखाली भारतापासून वेगळ्या झालेल्या पाकिस्तानाला आपले राष्ट्रीयत्व धर्माच्या नावावर टिकवता आले नाही. उलट संस्कृती व भाषिक अस्मितेच्या माध्यमापासून तिथे बांग्लादेश हे नवे राष्ट्र निर्माण झाले. त्यामुळे धर्माच्या नावावर राष्ट्र अस्तित्वात येत, टिकत या मुस्लिम जमातवादाच्या विश्वासाला त्यामुळे तडा बसला. भारतानेच पाकिस्तानची फाळणी घडवून आणली असा आरोप मुस्लिम जमातवादी करतात व त्याचा बदला म्हणून भारतातही तुकडे पाडण्याची त्यांची मोहीम ते राबवतांना दिसतात. पंजाब मध्ये खलिस्तानवादी जमातवादी प्रवृत्तीस हवा देऊन त्यांनी तसा अयशस्वी प्रयत्न केला. आज ही त्यांची या दृष्टिने व्युहरचना कार्यरत असलेली दिसते.

**सिमीच्या माध्यमातून विद्यार्थी वर्गातील जमातवादाचा अविष्कार:**

सिमी अर्थात 'स्टूडेंट इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया' या विद्यार्थी संघटनेची स्थापना उत्तर प्रदेशात २५ एप्रिल १९७७ रोजी अलिगढ विद्यापीठात झाली व या विद्यार्थी संघटनेची सुरूवात 'जमात-ए-इस्लामी हिंद' (JIH) या विद्यार्थी संघटनेची एक आघाडी म्हणूनच झाली होती. मोहम्मद अहमदुल्लाह सिद्धिकी या अमेरिका स्थित प्राध्यापकास या संघटनेच प्रणेता मानले जाते. सिमी या संघटनेत इस्लामिक राज्य स्थापन करण्याचे आपले ध्येय जाहिर केले आहे. भारतात 'दार-उल-इस्लाम' म्हणजे इस्लामची भूमिका बनवणे हे त्यांचे उद्धिष्ट आहे. भारत सरकारने २००१ साली दहशतवादी संघटना म्हणून सिमीवर बंदी टाकली. २००८ साली विशेष न्यायधिकरणाने ही बंदी हटवली. मात्र ऑगस्ट २००८ रोजी राष्ट्रीय सुरक्षेस ही संघटना बाधा पोहचवू शकते. या कारणाने भारत सरकारने या संघटनेवर बंदी घातली. सिमी या संघटनेची उद्दिष्टय भारतीय संविधान विरोधी आहेत. सिमी संघटनेचे प्रवक्ते म्हणतात, अल्ला आमचा प्रमुख आहे. कुराण आमची घटना आहे. महमंद पैगंबर नेता आहे आणि जिहाद आमचा मार्ग आहे. शहादत इस्लाम आहे आणि निधर्मीवाद व लोकशाही हे आमचे शत्रु आहेत.'' या त्यांच्या घोषणेतून त्यांचा जमातवादी दृष्टिकोण प्रतित होतो. या विद्यार्थी संघटनेने मोठ्या प्रमाणात मुस्लिम युवा शक्तीला आकर्षित करून आपल्या जमातवादी प्रवृत्तीची शिकार बनवले आहे ही चिंता वाढवणारी प्रमुख बाब आहे. कायद्याने ह्या संघटनेवर बंदी असली तरी या संघटनेचे कार्यकर्ते, नावे बदलून इस्लामिक दहशतवादी संघटनांशी सामिल होऊन आपल्या देशविधायक कारवायांना उत्तेजन देत आहेत हे अनेक घटनांमधून सिद्ध होत आहे.

## शिख जमातवादः

अल्पसंख्याकांच्या जमातवादामध्ये शिख समाजाने भारतीय समाज जीवनाला व राष्ट्रीयत्वाला मोठ्या प्रमाणात प्रभावित केले. १९८० ते १९९० या दहा वर्षात या जमातवादाने धार्मिक दहशतवादांचे स्वरूप धारण केले होते. या दहशतवादी स्वरूपाचा वास्तवात शिख धर्म हा भारतीय परंपरंपरेतून उद्यास आलेला एक धर्म होय. गुरूनानक यांनी या धर्माची  स्थापना केली व पुढे दहा गुरूंनी या धर्माचा विकास व विस्तार केला. शेवटचे दहावे गुरू गुरूगोविंद सिंग यांनी शिख धर्मास लढाऊ स्वरूप दिले. शिखधर्माचा संघर्ष प्रामुख्याने इस्लाम राज्यकर्त्यांशी झाला. शिख धर्माची स्थापना मानवतावाद व समतेच्या, बंधूत्वाच्या तत्वावर झालेली असली तर वास्तवात शिख धर्मात ही ब्राम्हणी व्यवस्थेच्या जातीतत्वांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आढळतो हे वास्तव आहे. शिखधर्माचा संघर्ष हा प्रामुख्याने इस्लामी राजवटीशी झाला असला तरी शिख धर्मात जमातवादाचा अविष्कार हा हिंदु धर्माच्या आक्रमणातून व भितीतून प्रामुख्याने निर्माण झालेला दिसतो. आर्य समाजाने पंजाबमध्ये धर्मशुद्धीकरणाची जी चळवळ उभी केली होती त्याचा धोका शीख जमातवादी प्रवृत्तीला मोठ्या प्रमाणात जाणवू लागला. दरम्यानच्या काळात हिंदु धर्मातील बहूसंख्य लोक शिख धर्मात हिंदू धर्माची एक शाखा, पंथ आहेत असे मत प्रदर्शित करू लागले. त्यामुळे शिख धर्माचे वेगळे अस्तित्व राष्ट्रव्यापी व धर्माचा स्वतंत्र दर्जा दाखवण्यासाठी शिख धर्मात जमातवादी प्रवृत्तीची वाढ झपाट्याने झाली. १९०५ साली कप्तान सिंह यांनी हम हिंदू नहीं है हे लिहीलेले पुस्तक या दृष्टिने महत्वपूर्ण ठरले. १९२५ नंतर च्या काळात आर्य समाजानेही शिख कसे हिंदु नाहीत हे दाखवण्यास सुरूवात केली. वास्तविक  पंजाब मध्ये हिंदु-शिख यांच सहजीवन अगदी स्वाभाविक पातळीवर चाल होत. अनेक हिंदु कुटूंबांमध्ये सुद्धा पहिला मुलगा सरदार केला जात असे व इतर लाला किंवा हिंदू रहात असत. आजोबा लाला तर नातू सरदार असे सुंदर दृश्य पंजाबच्या लोकजीवनाचे वास्तव होते. हिंदू-शीख आंतर धर्मीय विवाहास ही पंजाबच्या समाजजीवनात मान्यता होती.

शिख जमातवाद ही एक कृतक समस्या होती. ती शिखांमधील व हिंदू मधील अभिजनवादी प्रवृत्तींनी उचलून धरली. नंतरच्या काळात या जमातवादास शिखांमधील निम्न जातीसमूह बळी पडला व या जमातवादाच्या मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. भारतापासून स्वतंत्र असे खलिस्तान राष्ट्र निर्माण करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. परंतु या जमातवादी प्रवृत्तींत सकारात्मक असे काहीच नव्हते ती केवळ एक निषेधात्मक प्रतिक्रिया होती. संत भिंद्रानवाले व त्यांच्या अनुयायांनी त्यास अतिरेकी स्वरूप दिले.

## ख्रिश्चन जमातवादः

ख्रिश्चन धर्म भारतात साम्राज्यवादाबरोबर आला व त्या आधारावरच भारतभर विकसित झाला. ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्या मध्ये प्रामुख्याने भारतातील अस्पृश्य, निम्नजातीय समूह व आदिम जात जमातींची संख्या लक्षणीय होती. ख्रिश्चन धर्म एकता व बंधूत्वाला प्राधान्य देत असला तरी या धर्मात ही जातीयवादाची पोहचली व आजही ख्रिश्चन धर्म भारतात जातीयवादाच्या समस्येने ग्रासलेला आहे. दुसऱ्या क्रमांकाचा समूह म्हणून ख्रिश्चनांची लोकसंख्या भारतात लक्षणीय आहे. ख्रिश्चन धर्माचा जागतिक स्तरावर प्रामुख्याने इस्लाम धर्माशी व इस्लामिक राज्यांशी संघर्ष होत असल्याचे दिसते. भारतात मात्र ख्रिश्चन धर्मीयांना हिंदु जमातवाद्यांचा सामना प्रामुख्याने करावा लागतो. त्यासाठी प्रमुख कारण होते ते अर्थातच ख्रिश्चन धर्मीयांचे धर्मांतराचे धोरण. आदिवासी दुर्गम भागात ख्रिश्चन मिशनरी सेवाभावाच्या दृष्टिने दाखल होतात व नंतरच्या काळात विविध अमिष देऊन तेथील अज्ञानी आदिवासी समूहांना धर्मांतरासाठी प्रवृत्त करतात असा प्रमुख आरोप

हिंदु जमातवाद्यांकडून केला जातो. ईशान्य भारतातील राज्यांमध्ये प्रामुख्याने ख्रिश्चन मिशनरी वर्ग मोठ्या प्रमाणात कार्यरत असलेला दिसतो. ख्रिश्चन मिशनरी वर्गाचा धर्मांतर करण्यावर बंदी आणणाऱ्या कायद्यावर आक्षेप आहे. धर्मांतर ही आमच्या धर्मांतील बाब आहे. ही ख्रिश्चन जमातवाद्यांची भूमिका भारतीय संविधान विरोधी आहे. ख्रिश्चन धर्मीय जमातवाद्यांची ही भूमिका म्हणजे ''अस्पृश्यता ही आमच्या धर्मातील अंतर्गत बाब आहे ती आम्ही पाळू' अस म्हणण्यासारखी आहे. ती कुठल्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाही. ख्रिश्चन जमातवाद्यांच्या विरोधात ईशान्य भारतात स्थानिक पातळीवर असंतोष आहे. नागालँड मधील नागा पीपल्स मुव्हमेंट फॉर ह्यूमन राइटसचे कार्यकर्तेही म्हणतात, ''आम्हाला या ख्रिश्चन जमातवादापासून दूर जायच आहे.

ख्रिश्चन कौन्सिलच्या ई-मेल संदेशात ओरीसा राज्यात विश्व हिंदु परिपदेकडून होत असलेल्या आदिवासींच्या धर्मातरा संदर्भात चिंता व्यक्त करण्यात आली आहे तर ख्रिश्चन मिशनरी कार्यकर्त्यांकडून होत असलेल्या कार्याचे मात्र गौरवीकरण करण्यात आले आहे. मूलतः आदिवासी हा ना हिंदू होता ना तो ख्रिश्चन होता. त्याची स्वतःची अशी संस्कृती आहे. ती संस्कृती अबाधित राखणे गरजेचे आहे. मात्र ख्रिश्चन जमातवादी या संदर्भात नेहमीच दुटप्पी भूमिका घेतांना दिसतात हे वास्तव आहे. त्याचाही निषेध करायलाच हवा.

**हिंदू जमातवादाचे स्वरूप :**

हिंदु जमातवाद हा भारतीय धार्मिक जमातवादातील बहुसंख्याक धार्मिक जमातवादाचे प्रतिनिधित्व करतो. हिंदू जमातवादाचे स्वरूप पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**इतिहासाचे जमातवादीकरण:**

हिंदू जमातवादाने भारतीय हिंदू धर्मियामध्ये जमातवादी प्रवृत्ती निर्माण करण्यासाठी व आपल्या जमातवादी कृत्यांना न्याय्य ठरवण्यासाठी इतिहासाचा मोठ्या प्रमाणात वापर केलेला दिसतो. त्यामध्ये प्रामुख्याने दोन तंत्राचा वापर हिंदू जमातवादी करताना दिसतात. एका बाजूने इतिहासात हिंदू धर्मावर, हिंदू देव-देवतांवर, स्त्रियांवर परकीय आक्रमकांनी विशेषतः मुस्लिम राज्यकर्त्यांनी कसा अन्याय केला, अत्याचार केले, बलात्कार केले, लूटालूट केली, मूर्तिभंगण केले हे अतिरेकी स्वरूपात धार्मिक द्वेष निर्माण होईल अशा पद्धतीने रंगविले जाते व हिंदू कसा इतिहासात सहिष्णू, दिन होता हे बिंबवंले जाते. यातून हिंदूंनी बाहेर पडून इतिहासातील अन्यायाचा बदला घेण्यासाठी सज्ज झाले पाहिजे हे आवाहन इतिहासाच्या विश्लेषणातून जमातवादी सातत्याने करत असतात. तर दुसऱ्या बाजूने इतिहासातील महापुरुषांचे व आपल्या विरोधी धर्मीयांची स्थिर प्रतिमा निर्माण करण्याचे तंत्र ही ते वापरतात. उदा. छत्रपती शिवरायांची स्थिर प्रतिमा जमातवादी मोठ्या प्रमाणात जमातवाद्याचा प्रचार व प्रसार करतांना वापरतांना दिसतात. त्याशिवाय शिवराय कसे गोब्राह्मण प्रतिपालक होते, मुस्लिमांचे ते कसे शत्रु होते हे वास्तव नसणारा इतिहास शिवरायांच्या नावाने उभा करतात, तर दूसऱ्या बाजूने मुसलमान धर्मीयांची चार-पाच बायका करणारा, अवैध व्यवसाय करणारा, आठवड्यातून एकदाच आंघोळ करणारा, गुंड, दहशतवादी अशी स्थिर प्रतिमा निर्माण करून त्या धर्मीया बद्दल इतर समाजातील लोकांमध्ये द्वेष निर्माण होईल, मुस्लिमांची देशद्रोही म्हणून प्रातिमा निर्माण होईल याची काळजी सातत्याने वाहतात. अशा पद्धतीने इतिहासाचे जमातवादीकरण करून हिंदू जमातवादी आपल्या जमातवादी प्रवृत्तीचे उदात्तीकरण व स्थिरीकरण करण्याचा प्रयत्न करतांना दिसतात.

सामूहिक हिंदू आत्मभान घडवण्याची व्यूहरचना, हिंदू जमातवादी शक्तीनी राजकीय यश मिळवण्याकरिता हिंदू धर्मीयांचे सामूहिक स्वरूपाचे आत्मभान घडवण्याची व्युहरचना मोठ्या

प्रमाणात कार्यन्वित केली. दलित व्होट बँक, मुस्लिम व्होट बँक अशा एक गठ्ठा मतदानाच्या प्रवृत्ती भारतीय राजकारणात प्रचलित झालेल्या होत्या. तशी हिंदु व्होट बँक प्रचलित करण्यासांठी हिंदु जमातवादी शक्तींनी व्युहरचना आखण्यासाठी व त्यासाठी ब्राह्मण-ब्राम्हणेत्तर व इतर जातीय संघर्षाला मागे सारून 'गर्व से कहो हम हिंदू है' व्याख्या, प्रवृत्ती पुढे करण्यात आल्या. समकालिन काळात हिंदु व्होट बँकेचे राजकारण मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय स्तरावर यशस्वी होताना दिसत आहे.

## धर्मांतरास विरोध:

हिंदू जमातवादी धर्मांतराच्या धोरणास हिंदू धर्मावरील अन्याय व अपमान या दोन्ही दृष्टींनी पाहतात. हिंदू धर्म हा सहिष्णू असून तो इतर धर्मीयांचे व संस्कृतीचे स्वागत करण्यात संवर्धन करण्यात नेहमीच सकारात्मक भूमिका घेतो. मात्र हिंदू धर्माच्या या सत प्रवृत्तीचा इतर धर्मिय आक्रमक गैरफायदा घेतात व हिंदु धर्मियांचे मोठ्या प्रमाणात धर्मांतर करून घेतात. त्यामुळे या धर्मांतराच्या प्रयत्नांविरोधी हिंदु जमातवादी अधिक आक्रमक झालेले दिसतात. अलिकडच्या काळात धर्मांतरास विरोध करण्यासाठी ते दोन स्तरावर कार्यरत असलेले दिसतात. बजरंग दल, हिंदु एकता आंदोलन, विश्व हिंदु परिषद यासारख्या आक्रमक हिंदु जमातवादी संघटना धर्मांतर करणाऱ्या अथवा घडवून आणणाऱ्या संघटना व धर्मगुरूं विरोधात आक्रमक धोरण राबवत त्यांचे धर्मांतराचे कार्यक्रम उधळून लावताना दिसतात. धर्मांतराच्या संशयावरून काही ख्रिश्चन धर्मगुरूंचे खून करण्यापर्यंत ही हिंदु जमातवादी कार्यकर्त्यांची मजल गेली आहे. एकंदरीत धर्मांतराच्या संदर्भात इतर धर्मियावर जरब बसवण्याचा, दहशत बसवण्याचा हिंदु जमातवादी प्रयत्न करतांना दिसतात. तर दूसऱ्या बाजूने 'घर वापसी' सारखे कार्यक्रम राबवून इतर धर्मियातील लोकांना ते हिंदु धर्मांत धर्मांतर घडवून आणतात व त्याचे समर्थन करतांना ते पूर्वी हिंदुच कसे होते हे पटवून दिले जाते. 'लव जिहाद' हा सुद्धा हिंदु जमातवाद्यांना हिंदु मुलींचे धर्मांतर करून घेण्याचेच एक षडयंत्र वाटते म्हणून त्यास ही ते तीव्र विरोध करतांना आढळतात.

## धार्मिक स्थळांसंदर्भातील वादः

हिंदु जमातवादी प्रवृत्तीच्या विस्तारात धार्मिक स्थळां संदर्भातील वादांची भूमिका महत्वाची ठरलेली दिसते. १९८० नंरच्या काळात प्रामुख्याने या पद्धतीच्या तंत्राचा वापर हिंदु जमातवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो. अयोध्येतील राम मंदिर प्रश्न व बाबरी मजिद हा वाद हिंदू धर्मीय जमातवाद्यांच्या पथ्यावर पडला. त्यामुळे एक हिंदु समाजाचे आत्मभान निर्माण होण्यास व हिंदुधर्मीयांचे व्होट बँक तयार होण्यास एक प्रकारे हातभार लागला परंतु हिंदू जमातवादी प्रवृत्तींना अशा पद्धतीत धार्मिक स्थळातून निर्माण होणारे व्होट बँकेचे आधार केवळ निवडणूकीच्या राजकारणापूरते मर्यादित न ठेवता त्यास अधिक सर्वकष स्वरूप देण्याचे धोरण आखलेले दिसते. याचे विश्लेषण करतांना प्रा. सुहास पळशीकर म्हणतात, ''केवळ मत देण्यापासून एखादा समूह एकत्र येणे असा व्होट बँकेचा अर्थ आहे. परंतु जमातवादी राजकारण म्हणजे राजकीय पाठिंबा देण्यापलिकडे सांस्कृतिक व सार्वजनिक व्यवहारात कायम स्वरूपात दोन धार्मिक समूहांमध्ये स्पर्धेचे, व द्वेषाचे संबंध असणे या अर्थाने १९८० नंतरचे राजकारण हे केवळ व्होट बँकेचे राजकारण नसून जमातवादाचा सामाजिक आधार घडविण्याचे राजकारण आहे. " आक्रमक हिंदु जमातवाद हे याच्यावरील जमातवादाचे मुख्य वैशिष्टये आहे.

जमातवादाच्या या स्वरूपास प्राप्त झालेल्या पार्श्वभूमीचे वर्णन करतांना प्रा. सुहास पळशीकर पुढे लिहीतात ''१९६० पूर्वी हिंदू जमातवादाचे आकर्षण एका छोट्या पांढरपेशा समूहाला होते. हा

गट मुख्यतः उच्च जातींचा होता. १९८० नंतर हिंदु जमातवादाचा सामाजिक पाया विस्तारून विविध मध्यम व कनिष्ठ जातींचे गट हिंदू जमातवादाकडे आकृष्ट झाले. दूसरे म्हणजे भारतीय राजकारणात मध्यवर्ती स्थान असलेल्या काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागली. त्यातून जी राजकीय पोकळी निर्माण झाली तिचा फायदा जमातवादी राजकारण घेऊ शकले. जमातवादाविषयी सहानुभती नसलेले अनेक गट राजकीय संदर्भात एक पर्याय म्हणून हिंदुत्ववादी पक्षाकडे वळले. तिसरा घटक म्हणजे हिंदु जमातवादाने या काळात भव्य वैचारिक भूमिकेचा स्वीकार केला. उच्च जातींचे वर्चस्व नाकारून बहुजातीय भूमिका घेतली गेली. केवळ हिंदू संघटन न करता हिंदूच्या शक्तीचे राजकीय ताकदीमध्ये रूपांतर करण्यावर भर दिला गेला आणि कर्मठ धार्मिक भूमिका बाजूला ठेऊन आधूनिक आक्रमक राष्ट्रवादाची जोड हिंदू जमातवादाला दिली गेली.''

## धर्माधिष्ठीत राष्ट्रवादाची मांडणीः

हिंदु जमातवादाने राष्ट्रवादाच्या भावनेस आपल्या जमातवादी कार्यक्रमाचा प्रसार करण्यासाठी आपल्या तत्वांना एक प्रकारची अधिमान्यता मिळवून देण्यासाठी परिणाम कारकरीत्या वापरलेले दिसते. भारत हे हिंदुचे आहे व हिंदु धर्मास विशेष दर्जा मिळायला हवा. हिंदुधर्माची जमातवादाची तत्वे आहेत तीच खरी राष्ट्रवादाची मूल्ये आहेत. हे बिंबवण्याचा प्रयत्न हिंदू जमातवाद्यांकडून होताना दिसतो. हिंदु जमातवादाने राष्ट्रीयत्वाची झूल पांघरल्यामुळे त्यांना आपल्या विरोधकांना सहजरीत्या राष्ट्रद्रोही ठरवता येते व त्यांचा आवाज दडपता येतो. हिंदु धर्म, संस्कृती यावर आधारित राष्ट्रवादाची मांडणी करून संमिश्र राष्ट्रवादास नाकारण्यचा कार्यक्रम जोरात चाललेला आढळतो. "अल्पसंख्यांक जमाती" ''आयडेंडिटी प्रॉब्लेम'' ने पछाडल्या जातात. बहूसंख्यांक जमात वर्चस्वाचा नैसर्गिक हक्काचा आग्रह धरते. त्यात पुन्हा आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली की, सत्ता स्पर्धा आणि आर्थिक स्पर्धा यामुळे विषम समूहांच्या धार्मिकतेचे पर्यवसान जमातवादाच्या विकृतीत होते. हितसंबंधांची जपणूक व त्यासाठी सत्तेचे प्रामाण्य टिकविण्यासाठी धार्मिक जातीय किंवा सांस्कृतिक वर्चस्वाची मानसिकता बहूसंख्यांकांच्या अभिजन वर्गात निर्माण होते. धार्मिक श्रेष्ठतेचे प्रतिमाने मांडली जातात धर्म, संस्कृती आणि पक्षपाती इतिहास यांच्या उदात्तीकरणावर आधारित राष्ट्रवादाचे तत्वज्ञान पोसले जाते. बहूसंख्याकांच्या जमातवाद, राष्ट्रवाद म्हणून मांडला जातो." अशा पद्धतीने प्रो. बिपीनचंद्र यांनी बहूसंख्यकाचा जमातवाद राष्ट्रवादात कसा अस्विकृत केला जातो याची मांडणी केली जी भारतीय राजकीय प्रक्रियेच्या संदर्भात, हिंदु जमातवादाच्या संदर्भात प्रत्ययास येते.

## एकिरी सांस्कृतिक अस्तित्वाचा पुरस्कारः

बहुसंख्यांकाच्या धर्म व इतिहास यांच्या आदर्शीकरणातून त्यांच्यात समूह आत्मरतीची प्रवृत्ती निर्माण होतांना दिसते. त्या प्रवृत्तीतून हिंदु जमातवादी आपल्या धर्म व संस्कृतीचे अति गुणगान करतात. एवढेच नव्हे तर आपल्यातील अन्याय्य प्रथा व सामाजिक अत्याचाचे देखील आदर्शीकरण करण्याचे प्रयत्न त्यांच्याकडून होताना दिसतात. अल्पसंख्येचे, वर्णव्यवस्थेचे, जातीव्यवस्थेचे, सतीप्रथेचे, अंधश्रद्धांचे समर्थन धर्म स्वातंत्र्याच्या नावाखाली जोरदार पणे केले जाते. हिंदु जमातवाद्यांची ही प्रवृत्ती एकेरी सांस्कृतिक अस्तित्वाचा ते कट्टर पुरस्कार करतात या वरून सिद्ध होते.

**अपल्पसंख्याकांच्या अनुयायांचा भयगंडः**

हिंदु जमातवादाने आपल्या भूमिकां सामायिक आधार वाढवण्यासाठी प्रामुख्याने अल्पसंख्याक समाजास लक्ष्य करून इतर बहुजन जातींची सहानुभुती व पाठींबा मिळवलेला दिसतो. त्यासाठी एका बाजूने अल्पसंख्यांक समूहांची विकृत स्थिर प्रतिमा निर्माण करत असतांनाच शासनस्तरावरून अल्पसंख्यांकांचे कसे लाड पुरवले जातात हे समाज मनांच्या मनावर सातत्याने बिंबवण्याची व्युहनीती राबवलेली दिसते. त्यासाठी तलाक, चार बायका करण्याचा अधिकार, कलम ३७०, समान नागरी कायद्याचा अभाव याचा आधार घेतला जातो. परंतु वास्तवात या देशात मुस्लिमांचे कोणत्याही अर्थाने लाड पुरवले गेले नाहीत हे वास्तव आहे. त्यांचे लाड पुरवले गेले म्हणजे त्यांना शिष्यवृत्या दिल्या का? आरक्षण ठेवले आहे का? नोकऱ्यांमध्ये त्यांचे प्रमाण मोठे आहे का? त्यांचे जीवनमान उच्च आहे की निम्न या प्रश्नांची उत्तरे आदी नकारात्मक मिळतात.तरीही हिंदू समाजवादी अल्पसंख्याकांचे लाड पुरवले जातात हा प्रचार करण्यात यशस्वी ठरलेले दिसतात. त्यामुळेच त्यांच्या या प्रचाराने शहरी व मध्यमवर्गी तसेच दलित, आदिवासी व निम्न जाती समूहांनी पाठींबा दिलेला दिसतो. त्यामुळेच हिंदू जमातवादाच्या सामायिक पाया अधिक विस्तारलेला दिसतो.

**जमातवादास विरोध का व कसा करावा ?:**

धर्माधिष्ठीत सामूहिक आत्मभान ही व्यक्तीची व समूहाची एकमेव ओळख आहे असा जमातवादाचा दावा आहे. एक धार्मिक समूह स्वाभाविकरीत्या एक राष्ट्र असते असे जमातवादाचे गृहीतक आहे. त्यामुळे राजकीय सत्ता धार्मिक आधारावर विभागली जावी यासाठी ते आग्रही असतात. जमातवादाच्या या भूमिकांचा तसा धार्मिकतेशी थेट संबंध येत नाही. त्यामुळे केवळ धर्म व धार्मिकत्व या बांबीवर लक्ष केंद्रित करून व त्याचे विश्लेषण करून जमातवादास पायबंद घालता येणार नाही. त्यासाठी जमातवादास प्रतिवाद का करावा याचा आधार अधिक स्पष्ट करणे गरजेचे असते. त्यात प्रामुख्याने बहुविधता व लोकशाही यावर आधारीत राष्ट्रवादास जमातवाद उत्पन्न करून व्यक्तीचे धर्माविषयक स्वातंत्र्य तो बाधित व संकूचित करतो, व्यक्तीच्या ह्या खाजगी व सार्वजनिक अस्तित्वास एकांगी व विपर्यास बनवतो व पूर्वग्रह, हिंसा व परद्वेष या अपप्रवृत्तींना फोफावण्यास कारणीभूत ठरतो या कारणांवरून जमातवादा विरूद्धची आघाडी अधिक भक्कम करण्याची गरज आहे.

साधारणतः मागील दोनशे वर्षापासून भारतीय समाजाला अंधार युगातून बाहेर काढण्यासाठी समाजप्रबोधन व राष्ट्र म्हणून उभे करण्यासाठी जे राजकीय जागृतीचे आंदोलन झाले. त्यातून भारतीय समाज व्यक्तिप्रतिष्ठा, विवेक स्वातंत्र्य, शांततामय सहजीवन यासारख्या घटकांप्रती बांधिल झाला. या दोनशे वर्षाच्या संचितास आज जमातवादी शक्ती बाधा पोहचवत आहेत त्यामुळे जमातवादास प्रतिवाद करणे अत्यंत निकडीचे आहे. मात्र हा प्रतिवाद करतांना धर्मनिरपेक्ष पूरोगामी शक्तींच्या काही मर्यादा पुढे येत आहेत त्याचीही चर्चा करणे आवश्यक ठरते. त्यातील पहिली मर्यादा अशी जाणवते की पूरोगामी विचार विश्वात पूर्वापार जमातवादाचा फारसा विचारच झाला नव्हता. जमातवाद पुरोगामी चळवळींच्या धूरीणांचा चिंतनाचा बिंदु फारसा बनलाच नाही. कारण त्यांची विचारविश्व स्वधर्मचिकित्सा, बुद्धीवाद व उदारमतवाद या प्रेरणांना केंद्रिय स्थान होते. या दृष्टीने मुस्लिम सत्यशोधक समाजाचे प्रणेते हमीद दलवाई यांचे उदाहरण बोलके आहे. हमीद दलवाई धर्मचिकित्सा व बुद्धीवादाने एवढे प्रभावित होते की त्यांनी इस्लामची तत्वेच चुकीची आहेत अशी मांडणी केली. त्यामुळे ते इस्लामपासून दुरावले व इस्लामधर्मीय त्यांच्या पासून दुरावले. त्यामुळे मुस्लिम राजकारणास विधायक वळण देण्याची संधी हमीद

दलवाई ना घेता आली नाही हे वास्तव आह. पूरोगामी किंवा हिंदू धर्माच्या संदर्भात सुद्धा हीच चुक मोठ्या प्रमाणात करतांना दिसतात. हिंदू धर्मच चूकीचा आहे अशी भूमिका ह्यांच्याकडून मांडल्या जात परिणामी हिंदु धर्मात हस्तक्षेप करण्यचा अधिकार ते हरवून बसतात. किमान त्याचा अवकाश संकूचित होतो असे प्रत्ययास येते. त्यामुळे जमातवादा चे फावले व ते पूरोगामी विश्वास धार्मिक चर्चांमधून हद्दपार करतात. त्यामुळे सामूहिक धार्मिक आत्मभानाचे आकलन करून घेण्यास पूरागामी विचार विश्वास मर्यादा पडतात असे दिसते.

जमातवादास प्रतिवाद करतांना दूसरी मर्यादा ही उदारमतवादी विचारव्यूहातून पुढे आलेली दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच उदारमतवा विचार व्यूहात धर्माच्या स्वीकारार्हतेचा प्रश्न बाजूला करून भारतीय समाजाची  बहुसंख्याक व अल्पसंख्याक अशी विभागणी कायम केली. याच्या मर्यादा स्पष्ट करतांना प्रा. सुहास पळशीकर म्हणतात, ''इथल्या व्यक्तींना फक्त जातिधर्मबद्ध सामूहिक अस्तित्व आहे या आकलनाच्या आधारे उदारमतवादी विचारसमूहामध्ये बहूसंख्य व अल्पसंख्य अशी मांडणी केलेली ती दोन कारणांसाठी दोषपूर्ण होती. एकतर त्या मांडणीत धार्मिक समूहाचे घटक असणे याला अन्यवर्जक (exclusive) महत्व देऊन धर्माच्या खेरीज दुसऱ्या कोणत्याच आधारावर व्यक्तीचा विचार केलेला नाही. दूसरे कारण म्हणजे या मांडणीत 'हिंदु' नावाच एकच एक धार्मिक समूह मानला आहे. वास्तविक हिंदू समाज हे एक रचित आहे. हिंदू मानलेल्या समूहात श्रद्धा, कर्मकांड, दैवते यांची विभिन्नता आहे. केवळ मुस्लिम व ख्रिश्चन यापासून वेगळे दाखविण्यासाठी एका मोठ्या समूहाला हिंदू मानले गेले. एकदा बहुसंख्य व अल्पसंख्य अशी समाजाची कल्पना केल्यावर उदारमतवादी विचारातून अल्पसंख्य समूहाची भिन्न अस्मिता संस्कृती, धर्मश्रद्धा यांचे रक्षण करण्यासाठी खास वैधानिक तरतुदीचा पाठपुरावा करण्यात येऊ लागला.''

स्वातंत्र्योत्तर काळातही स्वातंत्र्यपूर्व काळात झालेली ही चूक पूरोगामी उदा मतवादी विचारव्यूहाने दुरुस्त करण्याची काळजी घेतली नाही. जमातवादी प्रवृत्तीनी ही उदारमतवाद्यांचे उत्तर जसेचे तसे स्वीकारून त्याच्या गृहीतकांना अधिक बटबटीत स्वरूप दिले. हिंदु व इतर ही उदारमतवादी विचारव्यूहाने भारतीय समाज समूहाची केलेली विभागणी धार्मिक जमातवाद्यांच्या पथ्यावर पडली. आज या मांडणीमध्ये नागरीकांना समाविष्ट करणे गरजेचे आहे. कारण जमातवादा विरूद्धचा लढा हा आपआपल्या धर्मा विरूध्दचा कट आहे हे बिंबवण्यात धार्मिक जमातवादी शक्ती यशस्वी झालेल्या दिसतात. त्यामुळे आपण एका अधिक समृद्ध लोकशाहीवादी राष्ट्रसमाजासाठी कटिबद्ध आहोत आणि जामतवादी हे नकारात्मक अन्यवर्जक व लोकशाही चे विरोधी आहेत अशी वर्गवारी प्रचलित करण्याची गरज आहे.

भारतीय समाजकारण व राजकारणात १९८० नंतर च्या काळात धार्मिक जमातवादी शक्तींचे प्रस्थ वाढले. त्यातून प्रामुख्याने तीन प्रवाह अधिक ठळक स्वरूपात पुढे आले आहेत. त्याची मांडणी करतांना प्रा. सुहास पळशीकर म्हणतात, ''धर्माधिष्ठीत राष्ट्रवाद आणि परद्वेष यांच्याशी बांधिलकी असणाऱ्या शक्ती राजकारणात प्रबळ होऊ लागल्या असून औपचारिक सत्तेवर त्यांचा भाजपाच्या रूपाने वरचष्मा आहे. दूसरा ठळक बदल म्हणजे ज्याला नागरी समाज असे म्हणतात त्या व्यवहारांच्या क्षेत्रात जमातवादाविषयी चे आकर्षण, त्याविषयीची अनुकलता यात वाढ होत आहे. एका मोठया समूहाची मानसिकता, सामाजिक संवेदना आणि विचारदृष्टी या जमातवादी विचाराच्या प्रभावाखाली आल्या असून जमातवादी विचार म्हणजेच अस्सल राष्ट्रवाद आणि बहुसंख्य समाजाचे प्रभुत्व म्हणजेच लोकशाही अशी समीकरणे रूजू लागली आहेत. तिसरा बदल म्हणजे धार्मिक सलोखा क्षीण झाला असून हिंदुत्व मुस्लिम जमातवाद्यांचे परस्पर संबंध देशाच्या अनेक भागात तणावाचे, संशयाचे आणि स्पर्धेचे झाले आहेत. यातून हिंसाचार व दंगली तर घडून

येतातच पण जामतवादी विचारांना दोन्ही समाजात पाठबळ मिळत राहते. या बदलांमुळे राज्य संस्था आणि समाज या दोहोंचे जमातीकरण होण्याची प्रक्रिया घडून येते आहे.'' पुढे जमातवादी शक्तींमध्ये कार्यन्वीत झालेल्या तीन प्रवृत्तींची मांडणी करतांना ते म्हणतात. ''जमातवादी शक्तींमध्ये आपल्याला तीन गट दाखविता येतील. जमातवादाकडे आकर्षित झालेल्या सामान्य अनुयायांचा एक मोठा समूह जमातवादाच्या आधारे राज्यसंस्थेवर ताबा मिळवू पाहणारा जमातवादी राजकारण्यांचा गट आणि जामतवादी विचारसृष्टीवर पूर्ण श्रद्धा असणारा व संपूर्ण समाजात ती विचार सृष्टी प्रभावी बनवू पाहणारा कर्मठ जामतवाद्याचा गट असे हे गट आहेत त्यांच्यापैकी जमातवादी राजकारण्यांना निवडणूकीच्या रिंगणातून हद्दपार करावे लागेल. तर कर्मठ जमातवाद्यांशी वैचारिक व संघटनात्मक पातळीवर चिकाटीने लढा द्यावा लागेल. या लढ्यात अनुयायांच्या गटांना चुचकारून त्यात फूट पाडून लोकशाहीसाठीच्या प्रयत्नांचा विस्तार करणे हा खरा आव्हांनाचा भाग आहे. जमातवादाचे अनुयायी सरसकट जन्मजात जमातवादी नसतात ते त्यांच्या सामाजिक परिस्थितीमध्ये निर्माण झालेल्या घटकांच्या प्रभावाने जमातवादाकडे आकृष्ट होतात.

**सारांश:**

धार्मिक जमातवाद हा स्वातंत्र्य पूर्व काळापासून भारतीय समाज कारण व राजकारण यास प्रभावित करणारा महत्वाचा घटक आहे. भारतीय समाजात लोकशाही, राष्ट्रवाद व आधूनिक मूल्यांची सुरूवात होत असतांनाच जमातवादी प्रवृत्तीही आपली मुळे या समाजमनात रूजवत होती. ब्रिटीश राज्यकर्त्यांचे वसाहतवादी धोरण व धार्मिक व जातीय समूहांनी धारण केलेले सत्ता स्पर्धेचे स्वरूप यामुळे भारत वसाहतवादी गुलामीतून मुक्त होण्याअगोदरच विभाजित झाला. स्वातंत्र्योत्तर काळातया विघटित शक्तींवर भारतीय समाजकारणात व राजकीय प्रक्रियेत आधार मिळणार त्याची काळजी संविधानकारांनी घेतली. मात्र संविधानिक तत्वांची व्यवहारात अमंलबजावणी होतांन जे पेच प्रसंग निर्माण झाले त्याचे अन्वयार्थ धार्मिक जमातवादाला वाढीस पूरक ठरले. परिणामी भारतात अल्पसंख्याक व बहुसंख्याक असा दोन्ही पातळ्यावर धार्मिक जमातवाद फोफावला. या धार्मिक जमातवादाने भारतीय लोकशाही संविधान व राष्ट्रवादास वेगळे परिमाण दिल्यामुळे या भारतीय भविष्याच्या मूलभूत आधारांनाच धोका उत्पन्न झाला आहे. या धार्मिक जमातवादी विचारव्यूहाला व्यापक पातळीवर प्रतिवाद करण्यासाठी प्रा. सुहास पळशीकर यांचे विवेचन या ठिकाणी नमूद करणे अगत्याचे वाटते. ते म्हणतात, ''धार्मिक जामतवादाचा मुकाबला राजकिय व वैचारिक अश्या दोन पातळ्यांवर करावा लागेल. त्यापैकी वैचारिक प्रतिवाद हा लोकशाही व राष्ट्रवाद या विचारभूमीवर व्हायला हवा. धर्म व धर्मनिरपेक्षता हे या चर्चेतील मध्यवर्ती मुद्दे नाहीत. त्या मुद्दयांवर वादाचे दळण दळण्यात जमातवाद्यांचा फायदाच आहे. त्याऐवजी त्यांना लोकशाही व राष्ट्रवाद यांच्याविषयी भूमिका घ्यायला भाग पाडले पाहिजे. जमातवाद्यांची लोकशाहीची संकल्पना संकूचित, बहुसंख्यवादी अशी असून प्रवाही, बहूविध लोकशाही समाज त्यांना मान्य नाही. तसेच त्यांचा राष्ट्रवादही पोकळ आहे. जमातवादी राष्ट्रवाद हा धर्माधिष्ठित असल्यामुळे तो अन्यायावर आणि अन्य समूहांच्या हद्दपारीवर आधारीत आहे. त्यामुळे लोकशाही व राष्ट्रवाद या संकल्पनांचा विकास करूनच जमातवादाचा प्रतिवाद होऊ शकेल. तो करीत असताना लोकशाहीवाद्यांना आपली बहूविधतेविषयीची भूमिका विकसित करावी लागेल. समाजात अनेक गट असतात त्याचप्रमाणे राजकारण असते असे मान्य केले की आस्मितांच्या किंवा आत्मभानाच्या सर्वच राजकारणांचे कठोरपणे मूल्यमापन करावे लागेल. जमातवादा विरूद्धची लढाई ही लोकशाही साठीची अनुकूल सामाजिक लोकशाही घडविण्याची लढाई असेल याचे भान बाळगायला हवे'' हा विचार अधिक स्वीकारशील वाटतो.

## धर्मनिरपेक्षता व राजकारण:

धर्मनिरपेक्षता हा समकालीन भारतीय राजकारणातील एक महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या सकारात्मक प्रतिसादावर भारतीय लोकशाही व संविधानिक प्रक्रियांचे भवितव्य व ऐक्य अवलंबून आहे. भारतीय संविदानाने निर्विवादपणे व स्पष्टपणे पद्धतीने धर्मनिरपेक्ष राज्याचे तत्व स्वीकारले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य असेल व धर्मनिरपेक्षतेच्या सहाय्याने भारताची राष्ट्र म्हणून सामर्थ्यशाली उभारणी होऊ शकेल याबाबत संविधानकारांमध्ये व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील धूरीणांमध्ये स्पष्ट स्वरूपाची एक वाक्यता होती. धर्मनिरपेक्षता ही पाश्चात्य संकल्पना असली तरी भारतीय संस्कृतीत ही अगदी प्राचीन काळात धर्मनिरपेक्षतेचा वारसा स्पष्ट पणे पाहण्यास मिळतो. भारताचे बहुसांस्कृतिक जीवन व प्राचीन वारसा हा धर्मनिरपेक्षतेच्या आधूनिक तत्वांना अधिक समृद्ध बनवेल याबाबत संविधानकारांच्या मनात शंका नव्हती. कारण ख्रिश्चन अथवा इस्लाम धर्म आल्यानंतर भारतात धर्माची विविधता आली हे निरीक्षण अपूऱ्या दृष्टीचे निदर्शक आहे. इस्लाम व ख्रिश्चन धर्माचे भारतात आगमन होण्याअगोदर पासून भारतात हिंदू, बौद्ध, जैन, शिख, लिंगायत अशा विविध धर्माचे व पंथाचे सहअसतित्व व सहजीवन अधिक समृद्ध होते. ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतातील धार्मिक भावना अधिक राजकीय व संकूचित झाल्या. धार्मिक जमातवादातून भारताची फाळणी व त्यातून झालेला नरसंहार या अनुभवातून स्वातंत्र्योत्तर भारताची उभारणी धमर्निरपेक्षतेच्या आधारावर करण्याची निकड संविधान कारांना अधिक तीव्रतेने वाटली. स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारण काही दशके धर्मनिरपेक्षतेचा वारसा जपत होते. परंतु १९८० नंतर च्या काळात मात्र भारतीय राजकारणाने धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांना अधिक प्रश्नांकित केलेले दिसते. समकालिन राजकारणात भारतीय संविधानातील धमर्निरपेक्षतेच्या तत्वांना हरताळ फासण्याचे सर्वोत्तोपरी प्रयत्न सत्ताधारी व विरोध अशा दोन्ही राजकीय धूरीगांकडून होतांना दिसत आहेत. त्यादृष्टीने धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा अर्थ व आशय, पाश्चात्य व भारतीय संदर्भात विकास व विस्तार, भारतीय संविधानातील धर्मनिरपक्षतेचे पेच प्रसंग धर्मनिरपेक्षता व जमातवादाचा सहसंबंध या दृष्टीने या प्रकरणात मांडणी करण्यात आली आहे.

## धर्मनिरपेक्षतेचा अर्थ:

इंग्रजी भाषेतील सेक्यूलर या शब्दासाठी मराठी भाषेत साधारणतः इहशतवाद, निधर्मवाद, सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता हे शब्द योजिले जातात. त्यातल्या त्यात पारिभाषिक दृष्ट्या इहवाद ही संकल्पना अधिक योग्य मानली जाते. सेक्यूलर हा शब्द १८५१ साली जर्मन विचारवंत जॉर्ज जेकब होलीओक यांनी प्रथम वापरलेला दिसतो त्यांनी जे विचार मांडले होते त्या विचारांच्या स्पष्टीकरणासाठी त्यांना नास्तिक हा शब्द अपूरा व नकारात्मक वाटत होता म्हणून त्यांनी सेक्यलर हा शब्द आपल्या विचारांच्या प्रस्तुततेसाठी योजला. त्यांनी धमर्निरपक्षतेची जी संकल्पना मांडली व इतर विचारवंत व शब्दकोषातून या संकल्पनेचे जे विवेचन करण्यात आले आहे ते या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करण्यात उपयुक्त ठरतील. त्यांचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे करता येईल.

### १) होलीओक:

''उच्चतम नैतिक व बौद्धिक विकास साध्य करणे हेच मानवी जीवनाचे कर्तव्य आहे असे मान्य करणारा विचार म्हणजे धर्मनिरपेक्षता होय.

### २) डॉ. सक्सेना:

''धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे असे राज्य की ज्यात राज्य लोकांची जात, वर्ण व धर्म यांचा विचार न करता सर्वांच्या कल्याणासाठी कार्य करीत असेल.''

### ३) ब्रिटिश इन्कसायक्लोपिडीया:

nonspritual (म्हणजे अध्यात्मिक नसणे) या अर्थाने सेक्यूलर या शब्दाचा अर्थ या शब्दकोशात स्पष्ट करण्यात आला आहे.

### ४) ऑक्सफर्ड डिक्शनरी:

या शब्दकोषात सेक्यूलर शब्दाचा अर्थ भौतिक, ऐहिक विचार असा स्पष्ट करण्यात आला असून त्याबरोबरच धर्माशी संबंध नसलेल्या व धर्मविरोधी असलेल्या असाही अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे.

### ५) आशिष नंवी:

धर्माचा संबंध न आणता केवळ लौकिक जीवन व सामाजिक कल्याण याचाच विचार करून नैतिक आदर्श व आचरण निर्धारीत करण्यात यावे या सिद्धांतावर आधारलेली सामाजिक नीतिशास्त्राची प्रणाली म्हणजे धर्मनिरपेक्षता होय.

एकंदरीत धर्मनिरपेक्षतेचे तत्व म्हणजे राज्याचा कोणताही अधिकृत धर्म अपवाद नाही. राज्यातील सर्व व्यक्तींना धार्मिक स्वातंत्र्य असेल. राज्य धार्मिक दृष्ट्या तटस्थ असेल परंतु आवश्यकता असेल तिथे धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करेल अर्थात हा हस्तक्षेप सकारात्मक असेल. या अर्थाने धर्मनिरपेक्षता या तत्वाचा संदर्भ घेतला जातो असे दिसते.

## ४.३ धर्मनिरपेक्ष राज्यसंकल्पनेची प्रतिमाने

राज्य संस्था व धर्म यांचे सहसंबंध हे ऐतिहासिक दृष्ट्या प्राचीन काळापर्यंत आपणास जगात सर्वत्र आढळतात. यूरोप, आशिया, आफ्रीका अशा सर्वच प्रदेशांमध्ये धर्म व राज्यसंख्या यांचे परस्परसंबध आढळतात. काही ठिकाणी धर्मसभा व राज्यसभा एकवटलेली दिसते तर काही ठिकाणी राजसभेशी धर्मसभेची मान्यता अनिवार्य ठरवण्यात आलेली होती. काही प्रदेशात धर्माचा वापर राजसभेत अधिमान्यता मिळवून देण्यासाठी केला जात होता. असे ही प्रत्ययास येते धर्मिनिरपेक्षतेच्या दृष्टिने राष्ट्र-राज्याचा विकास पाश्चात्य संदर्भात प्रामुख्याने पुढील तीन प्रतिमानातमधून झालेला आढळतो.

### १) औपचारिक धर्मास मान्यता:

या पहिल्या प्रतिमानामध्ये राज्यसंस्था एखाद्या विशिष्ट धर्मास आपल्या राज्यसंस्थेचा औपचारिक धर्म म्हणून मान्यता देते. परंतु राज्यात अस्तित्वात असणाऱ्या इतर धर्मांनाही त्यांचे स्वातंत्र्य निर्विवादपणे उपभोगता येईल याची योग्य काळजी राज्य घेते. ब्रिटनचे उदा. यादृष्टीने महत्वाचे आहे. ब्रिटनने ख्रिश्चन धर्मास अधिकृत धर्माचा दर्जा बहाल केलेला असला तरी ब्रिटनमधील सर्वधर्मीय लोक आपले उपासना स्वातंत्र्य निःसंकोच पणे कुठल्याही बंधनाविना व दडपणाविना उपभोगतांना दिसतात.

**२) सर्वधर्मसमभावाचे प्रतिमानः**

या प्रतिमानामध्ये राज्यसंस्था स्वतःचा असा विशिष्ट धर्म म्हणून कुठल्याही धर्मास मान्यता प्रदान करत नाही. परंतु राज्यात अस्तित्वात असणाऱ्या सर्व धर्मांना समान दर्जा बहाल करण्ते. सर्वधर्मीय नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य उपभोगता येते. मात्र राज्यात जेव्हा आवश्यकता वाटेल तेव्हा राज्य धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करण्याचा आपला अधिकार अबाधित राखाते. कुठल्याही धर्मात सुधारणा करण्याची गरज वाटली तर तशी राज्याकडून कृती केली जाते. यूरोप मधील स्वीडन व डेन्मार्क या राज्यांमध्ये हे प्रतिमान प्रचलित आहे.

**३) राज्यसंस्था व धर्मसंस्थेचे विलगीकरणः**

या तिसऱ्या प्रतिमानामध्ये राज्यसंस्था व धर्मसंस्था यांचे कार्य विलगीकरण केले जाते. राज्य व धर्म या संस्था पूर्णतः वेगळ्या मानल्या जातात. राज्य संस्थेच्या कृतीचा आधार कुठल्याही परिस्थितीत धर्म असणार नाही याची काळजी घेतली जाते. जेफरसन यांनी अमेरिकन राज्यघटनेत या तत्वाला प्रतिष्ठा मिळवून दिली. या प्रतिमानाचे अमेरिका हे आदर्श उदाहरण मानले जाते.

## ४.४ प्रबोधनकाळ व धर्मनिरपेक्षता

१४५८ साली कॉन्स्टॅटिनोपलचा पाडाव झाला व त्यानंतरच्या काळात यूरोपमध्ये जी वैचारिक क्रांती घडून आली त्यास यूरोपमधील प्रबोधनकाळ असे म्हटले जाते. प्रबोधन म्हणजे जुन्या आचार विचारांना रूढी-परंपरांना नाकारून नवे जीवन मूल्ये ठरविणे असा सर्वसाधारण अर्थ घेता येईल. १५व्या शतकामध्ये यूरोपमध्ये जी वैचारिक व वैज्ञानिक क्रांती झाली. त्यातून यूरोपच्या समाजजीवनात आमूलाग्र बदल घडून आले. अनेक संकल्पना व मूल्ये निर्माण झाली व ती समाजजीवनाचा आधार बनली. धर्मनिरपेक्षता ही संकल्पना ही त्यापैकी एक महत्वाची कल्पना होय. या प्रबोधन युगातील धर्मनिरपेक्षतेची जडणघडण समजून घेण्यासाठी प्रबोधनयुगाची व धर्मनिरपेक्षता या तत्वाची पार्श्वभूमी पुढील प्रमाणे अधिक स्पष्ट करता येईल –

**१) प्राचीन कालखंडः**

ख्रिश्चन धर्माचा उदय झाल्यानंतर राज्याचा धर्म व जनतेचा धर्म हा विरोध आज प्रकर्षाने पुढे आला. सुरूवातीच्या काळात ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्यांचा राजाकडून छळ होऊ लागला. परंतु ख्रिश्चन धर्माचा प्रचार वेगाने होत राहिला व परिणामी समाजजीवनावर ख्रिश्चन धर्माचा प्रभाव वाढला. त्यातूनच राजनिष्ठा व धर्मनिष्ठा हा संघर्ष उभा राहिला. रोमन बादशहा क्रॉस्टटाईन याने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यानंतर हा संघर्ष मागे पडला व आधूनिकतेची पायाभरणी झाली. प्राचीन ग्रीक व लॅटिन भाषेतील ज्ञान व साहित्याचा परिचय यूरोपियन लोकांन याच काळात होऊ लागला. मानवाचे जग उभारणाऱ्या कृतींना अति त्या कृतीच्या आधारे प्रत्ययास येणाऱ्या निसर्गलाही या युगामध्ये महत्व प्राप्त होऊ लागले. ख्रिश्चन धर्मांचे तत्वज्ञान धर्मनिरपेक्षतेच्या विचारास पूरक झाले. कारण ख्रिश्चन धर्मात अध्यात्मिक आणि भौतिक अशी जीवनाची विभागणी निश्चित करणारी तत्वप्रणाली होती. राजाचे राजाला द्यावे व परमेश्वराचे परमेश्वराला द्यावे हा ख्रिश्चन धर्माचा विचार या दृष्टिने पूरक होता. या कालखंडात अध्यात्मिक जीवनाचे अधिकार पोपकडे व भौतिक जीवनाचे अधिकार राजाकडे अशी विभागणी झाली. याकाळात येशु ख्रिस्तांच्या बरोबरीने ॲरिस्टॉटल, गॅलोन व टॉलेमी यांनी मांडलेले विचार प्रतिष्ठित झाले. त्यास

ही एक प्रकारचे पावित्र्य मिळाले. त्यामुळे त्यांच्या विचारविरोधात मांडलेले विचार हे असत्य व चर्च विरोधी मानले जाऊ लागले. थॉमस ॲक्वीनास यांनी तत्वज्ञान व धर्मशास्त्र हे परस्पर स्वतंत्र विषय आहेत अशी मांडणी करून तत्वज्ञान वस्तूस्थितीकडून ईश्वराकडे जाते तर धर्मशास्त्र ईश्वराकडून वास्तविक व जगाकडे जाते असे मत मांडले. चर्च व चर्च प्रमुख पोप हे ईश्वराचे प्रतिनिधी आहेत म्हणून त्यांची सत्ता ही ऐहिक सत्तेपेक्षा राजाच्या सत्तेपेक्षा श्रेष्ठ आहे हा विचार बळावला.

## २) मध्यमयुगातील कालखंडः

इ.स. १३ व्या शतकापर्यंतचा कालखंड हा मध्ययूगीन कालखंड समजला जातो. या कालखंडात राजा व चर्च यांचे सहजसंबंध कायम स्वरूपी निश्चित केले जावेत. अशी मांडणी प्रामुख्याने केली जाऊ लागली. ग्रीक व रोमन काळातील ख्रिस्ती धर्माच्या उदयापूर्वीच्या संस्कृतीचा पुनर्जन्म आणि ती संस्कृती नव्याने स्वीकारलेल्या संस्कृतीच्या अध्ययनाने स्फूर्ती घेतलेल्या बुद्धीवंत, प्रतिभाशाली, कर्तुत्ववान व वंशपरंपरागत ख्रिश्चन धर्म संस्थेच्या मानसिक बंधनातून मूक्त झालेल्या माणसांचा जन्म झाला. म्हणूनच असे म्हटले जाते की, ''प्राचीन युगातील मानवी कर्तृत्वाकडे आकर्षिलेल्या ज्या नव्या माणसांनी त्या युगाचे अनुकरण करीत जे जीवन घडविण्यास सुरूवात केली ती प्राचीन युगाची प्रतिकृती नव्हती. या प्रबोधन काळाची बीजे मध्ययुगामध्ये तयार होत होती. यातील शतकाच्या अवधीत आधूनिक संस्कृतीचा पाया घातला गेला. ''

इ.स. ४७८ मध्ये नष्ट झालेले रोमन साम्राज्य इ.स. ८०० मध्ये पुनरूज्जीवीत झाले. पोपने हे साम्राज्य निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला म्हणून त्यास पवित्र रोमन साम्राज्य असे नाव मिळाले. पोपने चार्ल्स या राजाचा राज्यभिषेक करून त्यास पवित्र सम्राट बनविले तेव्हापासून राज्याभिषेक करण्याचा अधिकार प्रस्थापित झाला. या दृष्टिने जर्मन सम्राट व पोपने सत्ताधारी बनविल्यानंतर खऱ्या अर्थाने राजाचे स्वरूप नामधारी बनले. पोप व राजा परस्परावलंबी झाले. रोमन साम्राज्यावर धार्मिक सत्ता राबवण्याचा अधिकार पोपकडे होता. त्याप्रमाणे तो राज्यातील बिशप, ॲबट, धर्मगुरू यांच्या नेमणूका करत असे. चर्चच्या ताब्यात असणाऱ्या जमिनीतील उत्पन्नांनवर ही पोपचीच मालकी असे अशा पद्धतीने पोपच्या सत्तेत अमर्याद वाढ होत होती. त्यातूनच रोमन सम्राट व पोप यात संघर्ष निर्माण होऊ लागले त्यातून १०५० मध्ये पोपने एक फतवा काढून पोपच्या निवडणुकीत पवित्र रोमन साम्राज्यास मत देण्याचा अधिकार नाही असे जाहीर केले. सातवा ग्रेगरी पोप यांनी चर्चेचे महत्व वाढवन्यासाठी अधिकाधिक आक्रमक भूमिका घ्यावयास सुरूवात केली. राजकीय बाबतीत ही पोपच सर्वश्रेष्ठ आहे अशी मांडणी सातवा ग्रेगरी यांच्याकडून करण्यात येऊ लागली. जो राज्याभिषेक करू शकतो तो पदच्यूत करू शकतो असा युक्तिवाद सातवा ग्रेगरी यांनी पुढे केला. पुढे राजा चौथा हेन्री यांनी यासंदर्भात थोडे धाडस करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनाही पोप पूढे शरणागती पत्करावी लागली. १२८६ पर्यंत राजे व पोप यांच्यात उघड स्वरूपाचे संघर्ष झाले नाहीत परंतु असंतोष धुमसण्यास सुरूवात मात्र झाली होती. फ्रान्स व इंग्लड मध्ये राष्ट्रीय राजेशाहीस प्रारंभ झाला होता. जर्मनी व इटली येथे ही प्रादेशिक राज्यसंस्था आकारास येत होती. जर्मनी न इटलीचे एकीकरण मात्र झालेले नव्हते अशा परिस्थितीत मार्सिलिओ या विचारवंताने पोप विरूद्ध आवाज उठविला.

मार्सिलिओ राजेशाही या शासनव्यवस्थेला मान्यता देतो परंतु ही राजेशाही लोक नियुक्त असावी असा त्याचा आग्रह होता. मार्सिलिओने धर्मगुरूवरही मानवी ऐहिक कायद्याचे व प्रचलित नियमांचे नियंत्रण हवे असे मत मांडले. मार्सिलिओच्या मते धर्मगुरूही समाजातील अनेक भाषांपैकी एक

काम करतात. ऐहिक जीवनात अध्यात्मिक गुन्हा असा वेगळा माणण्याचे कारण नाही. अध्यात्मिक गुन्ह्याबद्दल देव शिक्षा देईल याबाबतीचा राजा नागरिक अथवा धर्मसंस्था यांनी काही करण्याची आवश्यकता नाही. मात्र ज्या गुन्ह्याचा परिणाम समाजावर होईल त्यासंदर्भात राज्यानेच निर्णय घेणे आवश्यक आहे. धर्माबहिष्कृत करणे याचा सामाजिक परिणाम होतो म्हणून ही बाब धर्म गुरूच्या अखत्यारीत राहता कामा नये. मार्सिलिओ पुढे जाऊन हेही स्पष्ट करतो की, चर्चला स्थावर मालमत्तेची गरज नाही. जनता व राजा चर्चला जी रक्कम व जमीन देतात ते दान असते त्याचे मालक पोप होऊ शकत नाहीत. त्याबरोबरच पोपपासून निम्नस्तरावरील धर्मगुरूं पर्यंत समाजातील इतर वर्गाप्रमाणेच समान दर्जा असावा असा आग्रह मार्सिलिओ करतो. अशा रीतीने मध्ययुगीन कालखंडात धर्म सुधारणा चळवळीची पायाभरणी मासिर्लिओ यांनी केल्याचे दिसते पुढे डांटे या विचारवंताने आदर्श जागतिक साम्राज्याची कल्पना मांडताना सम्राटास सत्ता सरळ परमेश्वराकडून प्राप्त होते. त्यामुळे चर्चच्या वर्चस्वातून तो मुक्त असतो अशी मांडणी केली. तर मॅकीव्हली या विचारवंताने आपल्या 'द डिस्कोर्सेस' व 'द प्रिन्स' या ग्रंथात राज्य व धर्म व राज्य व नीती यांचे विलगीकरण करून राज्यास सर्वश्रेष्ठत्व बहाल केले. ज्यातून खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष राज्याची संकल्पना साकार होण्यास मदत झाली.

### ३) आधूनिक कालखंडः

आधूनिक कालखंडात राष्ट्र राज्य संस्था संघटित होऊ लागली. त्याबरोबच धर्म सभेच्या प्रभावास ही मोठी ओहोटी लागली. धर्म सत्तेस मोठे आव्हान देण्याचे कार्य मार्टिन ल्यूथर किंग, कॉविन झिंगली यांनी प्रामुख्याने केले असले तरी पोपच्या वर्चस्वास सुरंग लावण्याचे कार्य ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्राध्यापक वायक्लिफ यांनी केले. मनुष्यास ईश्वर भक्तीसाठी कोणत्या ही स्वरूपाच्या मध्यस्थाची गरज नाही. व्यक्तीने आपल्या पातळीवर प्रार्थना, उपासना, भक्ती करून ईश्वराशी प्रत्यक्ष संबंध जोडला तरी व्यक्ती मोक्ष मिळवून घेण्यास पात्र ठरू शकतो अशी मांडणी केली. पूर्वी 'बायबल' हा ग्रंथ लॅटिन भाषेत उपलब्ध होता. या ग्रंथाचे पठन करण्यास सर्वसामान्य नागरिकांना बंदी होती. वायक्लिफ ने बायबलचे इंग्रजी भाषत भाषांतर करून त्याच्या प्रती देशभर वितरीत केल्या. त्यामुळे पोपच्या अधिसत्तेस सुरंग लागला.

इ.स. १५१७ च्या दरम्यान पोप दहावा याने रोम मधील चर्चेचे बांधकाम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी गोळा करण्यासाठी पाप मुक्तीच्या पासेस वाटण्याची अनोखी शक्कल काढली. निश्चित एवढी रक्कम सेंट पीटर चर्च च्या बांधकामासाठी दिल्यानंतर पोपच्या सही ने पाप मुक्तीचा पास मिळेल व हा पास ज्या व्यक्तीजवळ असेल त्या व्यक्तीला स्वर्ग प्राप्ती होईल अशी हमी देण्यात आली. ज्यासाठी यूरोपात मोठ्याप्रमाणात पास विक्री साठी पोपने मोहीम हाती घेतली. जर्मनीतील ब्रिटेनबर्ग येथे या साठीचा धार्मिक प्रवचनाचा कार्यक्रम आखलेला होता त्यास मार्टिन ल्यूथर किंग यांनी तीव्र विरोध केला. मार्टिन ल्यूथर हे तत्वज्ञानाचे प्राध्यापक होते. धर्मज्ञान हा विषय ते शिकवीत असत. पापमुक्तीच्या पासच्या कल्पनेला त्यांनी जाहीर विरोध करून आपल्या प्रचारातील ९५ मुद्यांचे पुस्तिका स्वरूपात प्रकाशन करून त्यांनी ब्रिटेनबर्ग येथे वितरण केले. पोपपेक्षा बायबल श्रेष्ठ आहे हा विचार ल्यूथर यांनी मांडून पोपच्या अधिसत्तेस आव्हान दिले. मार्टिन ल्यूथरच्या कार्याची री स्वित्झर्लंडमध्ये स्विंगलीने व फ्रान्समध्ये काल्व्हिन ने केली. अशा पद्धतीने यूरोपात प्रबोधनाच्या यूगाने धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाची पायाभरणी केली व चिकित्सक वृत्तीला सुरूवात केली म्हणूनच कांट हा विचारवंत प्रबोधन कालखंडास चिकित्सेचे यूग असे संबोधतो कांट या संदर्भात म्हणतो की, ''जगातल्या प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करून घ्यायला मान्यता दिली पाहिजे. धर्म आपल्या पावित्र्याच्या जोरावर आणि कायदा आपल्या महत्वाच्या जोरावर कदाचित अशा चिकित्सेपासून निसटू पाहतील. परंतु मग ते स्वतःविषयी संशय निर्माण

करतील आणि संशय खरा ठरेल. ज्या गोष्टी स्वतःचे मोकळेपणाने व खुलेपणाने केलेले परीक्षण सहन करू शकतात. अशा गोष्टीं विषयीचा बुध्दीला मनःपूर्वक आदर वाटतो. त्या आदराला ते पात्र ठरणार नाहीत.''

प्रबोधनाने निर्माण केलेल्या या पार्श्वभूमीवर १७ व्या शतकात 'धर्म-निरपेक्षता' या संकल्पनेस समाजमान्यता मिळाली. लॉक हॉवल, लिबिनिय, स्पिनोझा यांची बुद्धिवादी मांडणी त्यासाठी महत्वाची ठरली.

**भारतीय प्रबोधन व धमर्निरपेक्षता:**

१५ व्या शतकात यूरोपमध्ये प्रबोधन यूंगाचा आरंभ झाला तर भारतात हे प्रबोधनाचे युग अवतरण्यास १९ वे शतक उजडावे लागले. यूरोपमध्ये ग्रीक भाषेतील तत्वज्ञानाने प्रबोधनाच्या युगास प्रारंभ झाला तर भारतात इंग्रजी भाषेतील ज्ञान व विज्ञानाने प्रबोधन युगास चालना दिली. इंग्रजी ज्ञान व विज्ञानाच्या संपर्कात आल्यानंतर नवशिक्षित वर्गास आपल्या भारतीय समाजातील अनेक अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यांचे टाकाऊ स्वरूप लक्षात आले. आधूनिक मूल्यांची सुरूवात केल्याशिवाय भारतीय समाजास भवितव्य नाही याची स्पष्ट जाणीव नवाशिक्षित भारतीयांमध्ये निर्माण झाली. ज्या जाणिवेनेच भारतात प्रबोधन युगास प्रारंभ झाला. सतीप्रथा, बालविवाह, स्त्रीशिक्षणास असणारी बंदी या सारख्या गोष्टींवरून या सुधारणा चळवळीला सुरूवात झाली. नंतरच्या काळात ही चळवळ व्यापक उद्दिष्टांमध्ये परावर्तित झाली. राजा रामोहन रॉय, न्या. रानडे. गोपळ गणेश आगरकर, लोक हितवादी, महात्मा जोतीराव फुले यांच्या विचार व कार्यामध्ये धर्मनिरपेक्ष दृष्टीकोण स्पष्टपणे जाणवतो. नंतरच्या काळामध्ये स्वांतंत्र्यलठ्याच्या आंदोलनातील धूरीणांमध्ये विशेषतः म. गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, सरदार पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या विचारंमध्ये ही धमर्निरपेक्षतेच्या तत्वांना अग्रगण्य स्थान मिळाले होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची मूळ ही धर्मनिरपेक्ष होती. भारतीय स्वातंत्र्य काळात संमिश्र राष्ट्रवाद व द्विराष्ट्रवाद वा धर्माधिष्ठीत राष्ट्रवाद असा संघर्ष प्रदिर्घ काळ चालला. द्विराष्ट्रवादास फाळणीच्या स्वरूपात क्षणिक यश मिळालेले दिसत असले तरी एकूण सामायिक इतिहासात भारतात कायम संमिश्र राष्ट्रवादाच्या विचारांनाच प्राधान्य मिळालेले दिसते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातच स्वतंत्र भारताची उभारणी हे धर्मनिरपेक्ष आधारावरच व्हावयास पाहिजे याची जाणीव सर्वच विचारप्रवाह मध्ये आलेली आपणास दिसते. त्याचे प्रतिबिंब भारतीय संविधानात ही स्पष्टपणे जाणवते.

**भारतीय संविधान व धर्मनिरपेक्षता:**

भारतीय संविधान हे धर्मनिरपक्षतेच्या तत्वाची भारतीय समाजात रूजवात करणारे क्रांतीकारी दस्ताऐवज आहे याबाबत कुठलीही शंका घेण्यास वाव नाही. भारतीय संविधानात धर्मनिरपेक्षता या शब्दाचा अंतर्भाव न करताही भारतीय संविधानाचे स्वरूप व भारतीय राजकीय व्यवस्थेचे प्रारूप हे धर्मनिरपेक्ष असेल याची ग्वाही भारतीय संविधानातून आपणांस दिसते. ९ डिसेंबर १९४६ रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय संविधानास उद्दिष्टाचा ठराव मांडताना धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्थेचे सुतोवाच करतांना म्हटले होते, ''संविधान सभेने भारतात अशी राज्यघटना घ्यावयाची आहे. धर्माच्या व रूढीच्या जाचक बेड्यातून समाजाची सोडवणूक करावयाची आहे. यातूनच या देशामध्ये खऱ्या अर्थाने समाज परीवर्तन घडू शकेल व त्यातून राष्ट्रीय एकात्मतेचे उद्दिष्ट सरकार गाठू शकेल.'' घटना समितीतील सदस्य एम. सी. के. एम. मुन्शी यांनी आपली भूमिका स्पष्ट करतांना म्हटले होते, ''आपली राज्यघटना अल्पसंख्याक व

बहूसंख्याक यांना जोडण्याचे काम करणार आहे. तर अय्यंगार यांनी यासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट करताना ''घटना समिती कोणत्याही जमातवांदाचे संघटन करीत नाही अथवा धर्माच्या आधारावर फुटीरता निर्माण करीत नाही. धर्म, जात, पंथ असा कोणताही भेदभाव राज्यघटना मान्य करणार नाही.'' हे स्पष्ट केले होते. डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार पटेल व मौलाना आझाद यांचे भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या जडणघडणीत महत्वाचे योगदान होते. त्यांच्या सहकार्याने जवाहरलाल नेहरू यांनी १३ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेत ठराव मांडला. कायदा आणि सामाजिक नीतीमत्ता यांना बाधा येणार नाही अशा तऱ्हेने भारताच्या सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक न्याय, संधी आणि दर्जाची समानता, विचार अभिव्यक्ती श्रद्धा, उपासना, पूजा, व्यवसाय कृती यांचे स्वातंत्र्य देऊन त्यांचे संरक्षण करेल येथील नेहरूंचा हा ठराव संविधान सभेने एक मताने पारित केला होता.

भारतीय संविधनात कलम २५ ते २८ दरम्यान भारतीय नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्यासाठी जी हमी दिली आहे. त्यातून भारतीय संविधानाचे स्वरूप अधिक दृढपणे स्पष्ट होते. राज्य घटनेतील कलम २५ प्रमाणे प्रत्येक व्यक्तिला तिच्या इच्छेनुसार कोणताही धर्म स्वीकारण्याचा, आचरणात आणण्याचा व त्याचा प्रचार करण्याचा अधिकार नि:संशय पणे देण्यात आला आहे. तर कलम २५ प्रमाणे प्रत्येक धर्मीयांना धार्मिक संस्था स्थापन करताना त्यांच्यामार्फत धर्मादाय स्वरूपाचे कार्य करण्यास चल व अचल संपत्तीची मालकी पत्करण्याचा व राज्यातील कायद्यानुसार त्या संपत्तीची व्यवस्था पाहण्याचा हक्क राहिल. तर कलम २१ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, एखाद्या विशिष्ट धर्माच्या कार्याकडे जाणाऱ्या विशिष्ट रकमेपर्यंत निधीवर कर देण्यासाठी कोणावरही सक्ती करण्यात येणार नाही. तर कलम २८ नुसार शिक्षणसंस्थामधून धार्मिक शिक्षण देण्यावर बंदी घालण्यात आली आहे. पुढे ४२ व्या घटना दुरुस्ती ने भारतीय संविधानात धर्मनिरपेक्षता या शब्दाचा स्पष्टपणे उल्लेख अंतर्भूत करण्यात आला.

**भारतीय राजकारणातील धर्मनिरपेक्षतेची प्रतिमाने:**

आशिष नंदी यांनी भारतीय राजकारण व धर्मनिरपेक्षता यांच्या सहसंबधाचा अभ्यास करताना काही प्रतिमाने स्पष्ट केली आहेत. ही प्रतिमाने भारतीय राजकारणातील धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप स्पष्ट करण्यास साह्य करतात ती पुढील प्रमाणे आहेत.

**१) व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनातील धर्मनिरपेक्षता:**

आशिष नंदी यांच्या मते भारतीय राजकारणातील हे एक प्रतिमान मानावे लागेल. या प्रतिमानाचा अंगिकार करणारे आपल्या व्यक्तिगत खाजगी जीवनात धर्मनिरपेक्षतेच्या तत्वांना मानतात व सार्वजनिक व्यवहारात व राजकारणात ही धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांना जपतात, प्राधान्य देतात. भारतीय राजकारणातील पं. जवाहरलाल नेहरू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदा. या दृष्टिने अतिशय महत्वाचे आहे. हे दोन्ही नेते आपल्या व्यक्तिगत जीवनात ही कमालीचे धर्मनिरपेक्ष होते व सार्वजनिक जीवनातही त्यांनी धर्मनिरपेक्षतेचे तत्व कसोशीने, उत्कटपणे पाळले.

**२) व्यक्तिगत जीवनात धर्मनिरपेक्ष व सार्वजनिक जीवनात मात्र धर्मवादी:**

आशिष नंदी यांच्या मते भारतीय राजकारण हे दूसरे प्रतिमानही स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रचलित आहे. व्यक्तिगत जीवनात कमालीचे नास्तिक विद्यार्थी व धर्मनिरपेक्ष तत्वांचा आग्रहाने अवलंब करणारे नेतृत्व सार्वजनिक व्यवहारात व राजकीय अवकाशात मात्र धर्मवादाचा कट्टर पूरस्कार

करतांना दिसतात. बॅ. जिना व विनायक दामोदर सावरकर यांचे जीवन व राजकारण यादृष्टिने महत्वाचे आहे. हे दोन्ही नेते व्यक्तिगत जीवनात नास्कितेच्या जवळ जाणारे होते. धर्मनिरपेक्ष जीवन व्यक्तीगत पातळीवर जपत होते. मात्र सार्वजनिक व्यवहारात मात्र त्यांनी धर्माचा कमालीचा वापर करून द्विराष्ट्रवादाचा सिंद्धांत मांडून भारताची फाळणी घडवून आणण्यात महत्वाची भूमिका बजावली.

### ३) व्यक्तिगत जीवनात धार्मिक परंतु सार्वजनिक जीवनात धर्मनिरपेक्षः

आशिष नंदी यांच्या मते भारतीय राजकारणात हे प्रतिमान ही मोठ्या प्रमाणात अवलंबले जाते. काही राजकीय नेते हे व्यक्तिगत जीवनात श्रद्धावान, आपल्या धर्माचे कट्टर पूरस्कर्ते असतात. मात्र सार्वजनिक व्यवहारात मात्र आपल्या श्रद्धा अथवा धर्मनिष्ठा आड येऊन देत नाहीत. इंदिरा गांधी, महात्मा गांधी, मौलाना आझाद यांचे राजकारण व व्यक्तित्व याचे उत्तम उदाहरण होय. यांनी व्यक्तिगत जीवनात आपल्या धर्मनिष्ठा अतिशय उत्कटपणे पाळल्या मात्र सार्वजनिक जीवनात वा राजकारणात धर्मांचा राजकारणासाठी कधीही वापर केला नाही अथवा होऊ दिला नाही.

### ४) व्यक्तिगत जीवनात धर्मवादी व सार्वजनिक जीवनात सशर्तः

आशिष नंदी यांच्या मते भारतीय राजकारणात काही राजकीय नेते मंडळी व्यक्तिगत जीवनात धर्मवादी, जमातवादी प्रवृत्ती बाळगतात मात्र सार्वजनिक जीवनात धर्मवादास काही सशर्त अटींवर मान्यता देतात. यांच्या जमातवादास सॉप्ट जमातवाद वगैरे नामभिधान प्राप्त होतांना दिसते. अटल बिहारी वाजपेयी यांचे राजकारण या प्रतिमानाचे एक उदा. सांगता येईल. अटलबिहारी वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून आजन्म वावरले. त्या दृष्टीने हिंदू धर्मा विषयीची त्यांची धर्माभिमानी वृत्ती स्पष्ट होती. मात्र सार्वजनिक जीवनात, राजकारणात मात्र त्यांनी ही वृत्ती सौम्य केलेली दिसते. या वृत्तीला सशर्त बनवलेले दिसते.

### भारतीय धर्मनिरपेक्षतेचे पेच प्रसंगः

भारतीय धर्मनिरपेक्षता विचाराचे भारतीय राजकारणात व समाजकारणात स्थान डळमळीत होते आहे. हा विचार ही मोठ्या प्रमाणात मांडला जातो आहे. अलिकडच्या काळात हा खूर वाढतो आहे. यामागे प्रमुख दोन कारणे सांगितली जातात. यापैकी एक कारण हे की, ही संकल्पना मूलतः परकीय आहे आणि त्यामुळे ती भारतीय संस्कृती व समाजजीवनास गैरलागू आहे अशी टिका केली जाते. ही टिका करण्यात कडव्या धर्मवादी संघटना जश्या आहेत तसेच काही समाजशास्त्रज्ञ व विचारवंत ही पुढे आहेत हे समजून घेणे गरजेचे ठरते. आशिष नंदी व टि. एन. मादन हे दोघे या दृष्टिने पुढे आढळतात. आशिष नंदी यांनी धर्मनिरपेक्षतेच्या तत्वावर टिका करतांना प्रामुख्याने पाश्चात्य आधूनिकतेवर तर टि. एन. मादन यांनी यूरोपीय प्रभावास लक्ष्य केलेले दिसते. यूरोप मधील ऐतिहासिक संदर्भातून धर्मनिरपेक्षतेचे तत्व उद्यास आले ही वस्तुस्थिती असली तरी भारतात त्याचे अनुकरण आंधळेपणाने केले गेले नाही ही वस्तूस्थिती हे टिकाकार विसरतांना दिसतात. धर्मनिरपेक्षता हे पाश्चात्य तत्व आहे म्हणून ते भारतात स्वीकारले जाणार नाही या मांडणीत भारतीय समाज व परंपरा यांचे एकांगी व अनैनिहासिक आकलन आहे. आशिष नंदी यांनी धर्मनिरपेक्षतेला केलेला विरोध आधूनिकता विरोधी व्यूहातून मांडलेला आहे. परंतु वास्तवात धर्मनिरपेक्षता व धार्मिक जमातवाद यातील वाद हा वस्तूतः आधूनिकतेचा कोणता वारसा स्वीकार वा याविषयीचा वाद आहे हे आशिष नंदी विसरतांना दिसतात. सुहास पळशीकर, आशिष नंदी यांच्या विचारांचा समाचार घेतांना म्हणतात, ''लोकशाही आणि जनविरोधी वर्चस्व

विचार हे दोन्ही आधूनिकतेमधून निष्पन्न होतात. त्यामुळे धर्मनिरपेक्षतेचा विचार आधूनिक आहे या कारनावरून त्याची टवाळी केल्याने अप्रत्यक्षपणे जमातवादी विचारालाच बळकटी प्राप्त होऊ शकते.

धर्मर्निरपेक्षता विषयक वादाची दूसरी पातळी संविधानातील धर्मनिरपेक्ष तत्वांच्या अंमलबजावणीतून पुढे येते. सदोष अंमलबजावणीतून अल्पसंख्याकांचे अनुभव व बहुसंख्यावरील अन्याय या स्वरूपात धर्मनिरपेक्षतेचे तत्व पुढे आले. या दृष्टिने असणारे महत्वाचे प्रश्न पुढील प्रमाणे आहेत.

### १) धार्मिक कृतींची व्यापकताः

भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना आपल्या धर्माचे पालन वा आचरण करण्याचा मूलभूत अधिकार प्रदान केलेला आहे. परंतु या धार्मिक आचरणाची व्याप्ती नेमकी काय? हा वादाचा विषय म्हणून पुढे आलेला दिसतो. भारतीय संविधानाने व्यक्तीच्या या धार्मिक पालनाच्या अधिकारास नियंत्रित करण्याचा प्रयत्न करून त्यातील विधायकता जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्याशी विसंगत कृती धर्म पालन म्हणून करता येणार नाहीत हे संविधान स्पष्ट करते. धार्मिक सुधारणांसाठी भारत सरकारने केलेले नियम वा निर्बंध हेही वैध मानले जातील असे संविधानाने स्पष्ट केले आहे. यावर न्यायालयीन पातळीवर ही अनेक निवाडे प्रभावीत झाले आहेत. एखाद्या समुहाच्या ज्या कृती अत्यावश्यक असतील त्या सर्व कृती धार्मिक कृती या संदरात मोडतात अशी मांडणी न्यायालयांनी केलेली दिसते. परंतु या संदर्भात अत्यावश्यक कृती नेमक्या कोणत्या हे कोण ठरविणार? न्यायालय, सरकार की धर्मसंस्था हा एक वादाचा विषय राहतो. यातून व्यक्तिगत धार्मिक स्वातंत्र्य त्या विशिष्ट धार्मिक चौकटित बंदिस्त होते हा सर्वसाधारण अनुभव प्रत्ययास येतो. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार हा व्यक्तिगत अधिकारा बरोबर समूहाचा ही धार्मिक अधिकार असतो. त्यासाठी व्यक्तीने धार्मिक आचरणची व्याख्या करण्याऐवजी ती धर्म शक्तीद्वारा प्रस्तूत केली जाते. हा अधिकार धार्मिक समूहांच्या संघटित प्रवक्त्यांकडे हस्तांतरित झाला की धर्मा-धर्मातील स्पर्धेच्यां संदर्भात अशा पद्धतीचे दावे-प्रतिदावे लवचिकपणे करताना दिसतात. धर्म, श्रद्धा, धर्म शास्त्र यांच्याबरोबरीने सामूहिक परंपरा यांची साक्ष काढून नवनवे मतभेदाचे मुद्दे पुढे केले जातात. अशा पद्धतीने निर्माण झालेला वाद हे केवळ न्यायालयीन निर्णयातून सुटण्याची शक्यताच राहत नाही. त्यामुळे व्यक्तिगत अधिकार व समूहाचे हक्क यांच्या परस्पर संबंधामधील गुंतागुंतीमुळे धर्मनिरपेक्षतेच्या विचारावर नवनवी दडपणे येतात.

### २) धर्म प्रसारः

भारतीय संविधानाने भारतीय नागरीकांना कलम १९ प्रमाणे जे भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य बहाल केले आहे त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्मतत्वांचे प्रसार करण्याचे मूलभूत स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ही धर्म प्रसाराचा विशेषतः धर्मांतराचा मुद्दा हा महत्वाचा वाद विषय होता. ख्रिस्ती मिशनरी वर्गाच्या धर्मांतराच्या उद्दिष्टामुळे भारतीय समाजातील काही महत्वाच्या समाजसूधारणांचे प्रश्न लांबणीवर पडले. सर्वसामान्यांची त्या कार्या संदर्भात पूर्वग्रह निश्चित झाले याचा एकूणच फटका भारताच्या आधूनिकतेच्या दृष्टिने बसलेला दिसतो. तेव्हापासून धर्मांतराची बाब ही ख्रिश्चन मिशनरी वर्गाशी जोडली गेली आहे. भारतीय संविधान सभेत ही धर्मपरिवर्तना संदर्भात मोठा वाद झालेला दिसतो. मात्र पारशी व अल्पसंख्याक समूहाच्या सदस्यांशी आग्रहाने धर्म प्रसाराच्या हक्कास सविधानिक दर्जा देण्यास भाग पाडले असे दिसते. त्यामुळे धर्मप्रसाराचा अधिकार ही भारतीय अल्पसंख्याकांना मिळालेली मुलभूत सवलत

आहे. या शब्दात यावर टिका केली जाते. धर्मांतरास बंदी करणारे अनेक कायदे राज्य सरकारांनी पारित केलेले दिसतात. ईशान्य भारतात हा प्रश्न अधिक गंभीर बनत आहे. गुजरात, उत्तरप्रदेश या राज्यांमधून 'घर वापसी' चे जे प्रयोग राबवले जात आहेत त्याने हा प्रश्न अधिक गंभीर वळण घेतांना दिसतो आहे. सामुहिक धर्मांतराचा प्रश्न हा संघटित धर्मांनी जन्माला घातलेला प्रश्न आहे. परंतु त्याचे दडपण भारतीय संविधानिक तरतूदींवर पडलेले स्पष्टपणे दिसते.

### ३) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार:

भारतीय संविधानाने अल्पसंख्याक समूहांना संस्कृतीचे जतन करण्याची हमी दिली आहे. कोणत्याही समुदायावर कुठल्याही परिस्थितीत विशिष्ट सांस्कृतिक मूल्ये, विचार अथवा चाली रीती लादल्या जाणार नाहीत याची शाश्वती भारतीय संविधान देते. त्याबरोबर अल्पसंख्याक समूहांना आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी व संवर्धन करण्याकरीता शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व त्याआधारे धार्मिक शिक्षण देण्याचा अधिकार ही प्रदान करते. भारतीय संविधानाने दिलेल्या या विशेष अधिकाराचा गैरफायदा व्यावहारिक पातळीवर अल्पसंख्याक समूहांमधील समाजधूरीण घेतांना दिसतात. अल्पसंख्यांकांच्या संस्कृती जतनाच्या नावाखाली व्यावसायिक शिक्षण चे साम्राज्य निर्माण केले जाते. प्रवेश, नोकरभरती, आरक्षण या सारख्या संविधानिक जबाबदाऱ्यांना सर्रासपणे अवलंबले जाते. यातून व्यक्तीचे हक्क व समूहाचे हक्क यात एक प्रकारचा विसंवाद पूढे येताना दिसतो. अल्पसंख्याक दर्जाचा दावा करून आर्थिक नफा वा लाभ मिळवला जातो वास्तवात यातून अल्पसंख्याक समूहांना समाज पातळीवर यातून काहीही लाभ मिळत नाही मात्र अल्पसंख्याक समूहांना अशा पद्धतींच्या अधिकाराचे कुरण आहे यावरून बहुसंख्याक समाजात अपप्रचार करणे सोपे होते. अल्पसंख्याक समूहांच्या शिक्षण संस्थांना प्रवेश, नोकरभरती, व्यवस्थापन याबाबींविषयी जे विशेष अधिकार प्राप्त होतात व त्याचा ज्या पद्धतीने गैरवापर होतो त्यामुळे अल्पसंख्याकांच्या अनुनयाचा मुद्दा अधिक आकर्षक बनवणे सोपे होते.

### ४) समान नागरी कायदा:

समान नागरी कायदा हा प्रश्न धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात धार्मिक जमातवाद्यांच्या हातातील महत्वाचे शस्त्र बनलेले आहे. विवाह, घटस्फोट, दत्तक व वारसाहक्क यांचे नियमन ज्या कायद्याद्वारे होते त्या कायद्यांसाठी व्यक्तिगत कायदे असे संबोधन वापरले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात देशाच्या वेगवेगळ्या भागात हिंदुधर्मीयांसाठी ही वेगवेगळे कायदे अस्तित्वात होते. त्यांचा आधार प्रामुख्याने हिंदू धर्मशास्त्र व रूढी प्रथा परंपरा होता. संविधानसभेत व्यक्तिगत कायद्यात सूधारणा करण्यासंबंधीचे तत्व मार्गदर्शक तत्वात समाविष्ट करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे पहिले कायदेमंत्री या नात्याने हिंदू व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करणारे बील मांडले. जे हिंदू कोड बील या नावाने परिचित आहे. परंतू सनातनी लोकांच्या रोषामुळे ते त्यावेळी समंत होऊ शकले नाही. पुढे १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर हे बील तीन टप्प्यात पारित झाले. त्यातून हिंदु धर्मातील व्यक्तिगत कायद्यांसंदर्भात क्रांतीकारी बदल घडून आले. स्त्रियांचा वारसा, त्यांना मिळणारा संपत्तीतील वाटा, प्रतिबंध, घटस्फोटाचे सूलभीकरण यामुळे हिंदू धर्माच्या पारंपारिक धारणांना मोठा धक्का बसला. हिंदू धर्मात क्रांतीकारी सुधारणा करण्यास पुढे सरसावलेले सरकार मुस्लिम व्यक्तिगत कायद्यामध्ये बदल करण्यास मात्र पुढे धजावले नाही व त्यामुळे यातून हिंदू व मुस्लिम धार्मिक जमातवाद्यांना बळ मिळत गेले. इस्लाम मधील प्रथेप्रमाणे मुस्लिम पुरूषांना बहुपत्नीत्वाचा अधिकार आहे, एकतर्फी घटस्फोटही

त्यास देता येतो, पोटगी देणे त्यावर बंधनकारक नाही अशा स्त्री विरोधी व आधूनिक मूल्यांना नाकारणाऱ्या प्रथा नष्ट कराव्यात अशा मागण्या मुस्लिम समाजातून पुढे येत असतांनाही मुस्लिम नेत्यांच्या दबावामुळे सरकारने या संदर्भात बोटचेपी भूमिका वारंवार घेतली त्यामुळे सरकार अल्पसंख्याकांचे अनुनय करते आहे या प्रचारास आणखी बळ मिळाले. १९८० नंतर या मुद्याची लोकप्रियता प्रत्ययास आल्यानंतर हिंदू जमातवादी संघटनानी हा मुद्दा अधिक आक्रमकपणे राजकारणात आणला. याच काळात धार्मिक दंगलीमुळे मुस्लिम समुदायात भयगंड निर्माण झाला होता. त्याचा फायदा मुस्लिमसमाजातील पुरुषसत्ताक जमातवादी शक्तींनी घेऊन या कायद्यात सुधारणा म्हणजे इस्लाम खतरे में असा सूर लावला. परिणामी स्त्रियांच्या समान हक्काचे प्रश्न ही धार्मिक जमातवादाचे राजकीय मुद्दे बनले व त्यातील गूंतागूंत अधिकच जटिल होत गेली. एका परीने मुस्लिम कायद्यात सुधारणा करने हा प्रश्न धर्मनिरपेक्षतेच्या चौकटीत सामिल झाला तशा सुधारणा होणे हे धर्मनिरपेक्षतेच्या पराभवासी एका परीने जोडले गेले जे सर्वार्थाने अयोग्य मानावे लागेल.

### धर्मनिरपेक्षतेची तत्वे:

धर्मनिरपेक्षतेची तत्वे यूरोपातील प्रबोधन कालखंडा पासून ते समकालिन संदर्भापर्यंत सातत्याने विकसित होत आली आहेत. धर्मनिरपेक्षतेचा उदय यूरोप खंडात झाला असला तरी ही संकल्पना जगभर पसरावी व त्यातून तिच्या स्वरूपात सातत्याने भर पडावी ह्या दृष्टिने धर्मनिरपेक्षता या संकल्पने अंतर्गत असणाऱ्या प्रमुख तत्वांची मांडणी पुढील क्रमाने करता येईल.

### १) व्यक्तिगत जीवन व सामाजिक व्यवहाराचे वर्गीकरण:

यूरोप खंडात प्रबोधनकाळा नंतर मानवी जीवनाच्या व्यक्तिगत व सामाजिक व्यवहारा संदर्भात असणाऱ्या धारणा मोठ्या प्रमाणात बदलल्या. या धारणांमधील बदल हा क्रांतीकारी स्वरूपाचा होता. या समाजकारणात एका बाजूने व्यक्तिगत जीवनाचे खाजगी व सार्वजनिक असे दोन स्वतंत्र अवकाश असतात. असे मानून दुसऱ्या बाजूने व्यक्तिगत आणि व्यावसायिक या दोन्हीं व्यवहारांचे पवित्र आणि भौतिक वा ऐहिक अशा दोन अवकाशांमध्ये वर्गीकरण करण्यात आले. यूरोपात अशा पद्धतीने मानवी जीवनाच्या कृतींना विभाजीत करण्यामागे तेथील सामाजिक, इतिहास व तत्वज्ञानाची पार्श्वभूमी महत्वाची ठरली असे दिसते. यासंदर्भात प्रा. सुहास पळशीकर म्हणतात, ''व्यक्तिप्रतिष्ठा, निर्णय स्वातंत्र्य व स्वायतत्ता यांच्या सीमारेषा ठरवून व्यक्ती व समाज यांच्या परस्पर संबंधाचे नियमन करणारे सिद्धांत विकसित करण्यासाठी खाजगी व सार्वजनिक ही विभागणी उपयुक्त ठरते. पवित्र आणि भौतिक या विभागणी मागे यूरोपातील ख्रिश्चन धर्मसंस्थेचा इतिहास आहे. संघटित धर्मसंस्था आणि धर्मगुरू यांचे वैयक्तिक जीवनावर व सार्वजनिक व्यवहारांवर असणारे व्यापक नियंत्रण कमी करण्याच्या प्रयत्नातून अशी मांडणी पुढे आली की काही व्यवहार हे धर्माच्या वेषात येतात त्यांचे नियमन धर्मसंस्था व धर्मगुरू यांनी करावे. पण ते व्यवहार भौतिक अथवा ऐहिक स्वरूपाचे आहेत यांचे नियमन करण्याचा अधिकार धर्मसंस्थेला वा धर्मगुरूंना असणार नाही. यातूनच धर्मनिरपेक्षतेची जी पायाभूत संकल्पना आहे तिचा उदय झाला.''

### २) धर्माचा मानवी जीवनावरील सर्वकष प्रभाव नाकारला:

धर्माने मानवी जीवनास सर्वकषरीत्या प्रभावित व नियंत्रीत केलेले होते. धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेने मात्र धर्माला मानवी जीवनावरील प्रभाव हा सर्वंकष स्वरूपाचा राहणार नाही अशा पद्धतीचे मापदंड विकसित केलेले दिसतात. कारण ऐहिक व्यवहारांचे मानदंड विशिष्ट धर्म श्रद्धा,

याच्या पलिकडे असू शकतात म्हणून मानवी व्यवहारांचा एक अवकाश धर्मनिरपेक्षित तत्वांनी नियंत्रित केला जाऊ शकतो हा विचार धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाने अधिक स्पष्ट केला अर्थात धर्म-निरपेक्षतेची ही तत्वे अथवा मापदंड धर्मद्वेषाची नसतील कारण धर्म नाकारणे अथवा धर्मास विरोध करणे हा धर्मनिरपेक्षतेचा उद्देश्य नसून मानवी व्यवहारानां प्रभावित करणाऱ्या व नैतिक अधिष्ठान देणाऱ्या विभिन्न तत्वप्रणालीचे पर्याय मानवी जीवना समोर असावेत हा धर्मनिरपेक्ष तत्वाचा एक अर्थ सांगता येईल.

### ३) सार्वजनिक व्यवहारांच्या नियमनाचा आधार धर्मनिरपेक्षता:

यूरोपीय देशांच्या बाहेर धर्मनिरपेक्षतेचा विचार कार्यन्वीत झाल्यानंतर धर्मनिरपेक्षतेच्या तत्वांचे काही वेगळे अविष्कार व प्रतिमाने निर्माण झालेली आपणास दिसतात. त्यापैकीच एक महत्वाचे तत्व म्हणजे सार्वजनिक व्यवहारांचे नियमन धर्मनिरपेक्ष आधारावर करावे हे होय कारण सार्वजनिक व्यवहारांच्या क्षेत्रात बहूदिध सांप्रदायकि श्रद्धा असलेल्या गटांचा व व्यक्तिंचा वावर असतो. त्यामुळे एखाद्या विशिष्ट धर्माच्या आधारावर अशा पद्धतीने व्यवहार नियंत्रित करणे योग्य ठरणार नाही. धर्माच्याआधारावर समूहाची रचना घडवून केवळ त्यांच्याच सामूहिक हिताचा पाठपुरावा करणे सार्वजनिक हिताच्या विरोधी जाते. त्यासाठी सार्वजनिक व्यवहारांची जडणघडण हीच धर्मनिरपेक्ष व्हावयास हवी असे या तत्वातून प्रतिपादन केले जाते.

### ४) सामूहिक हितसंबंधाचे आधार बहूविध व धर्माच्या व्याप्ती बाह्य असतात:

सामायिक व्यवस्थेची रचना ही बहूविधतापूर्ण असते. कारण धर्म हा एकमेव घटक या रचनेचा आधार नसतो. व्यक्तिगत जीवन व सार्वजनिक व्यवहार यांना धर्मा शिवाय इतर ही अनेक घटक सातत्याने प्रभावित करत असतात. धर्माशिवाय भाषा, संस्कृती, व्यवसाय इत्यादी आधारावरही समूहमन संघटित क्षेत्र असते. साधारणतः संघटनांची व हितसंबंधाचे आचार हे परस्परवर्जक नसतात तर एकमेकांना गुंफलेले असतात. त्यासाठीच सार्वजनिक व्यवहारात संघटित होण्यासाठी धर्मनिरपेक्ष आधारांचे स्थापित्व महत्वाचे मानले जाते. कारण व्यवहारात देशात एकाच धर्मांचे लोक आहेत. एवढ्या एका कारणाने त्यांच्या हितसंबंधात एक वाक्यता येत नाही. त्यामुळेच संघटनांचे व सामूहिक हितसंबंधाचे आधार बहूविध आणि धर्माच्या पलिकडे असतात असे धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्पष्ट करते.

### ५) श्रद्धांची मोकळीक:

समाजात ज्या व्यक्ती वावरत असतात त्याना साधारणतः श्रद्धांची विभिन्नता असते. ज्या देशात बहुधर्मीय अस्तित्व आहे अशा देशांमध्ये नव्हे तर एकाच धर्माचे अस्तित्व असणाऱ्या देशांमध्येही वास्तव आपल्या नजरेस पडते. ख्रिश्चन, इस्लाम, हिंदु, बौद्ध, जैन, सिख अशा सर्वच धर्मामध्ये धर्ममतांच्या अर्थाबद्दल मतभिन्नता आढळते अनेक पंथ व उपपंथ आढळतात. त्याप्रमाणे त्यांच्या धर्म धारणा व श्रद्धा ही बदलताना दिसतात अशा परीस्थितीत प्रत्येक व्यक्तीने आणि समूहाने इतरांचे धर्म, स्वातंत्र्य मान्य करून त्याचा आदर करावयास हवा. एकमेकांबद्दलच्या श्रद्धाबदलांचा हा आदर आणि श्रद्धा बाळगण्याची मोकळीक हे धर्मनिरपेक्षतेचे एक महत्वाचे तत्व होय.

### ६) धर्मनिरपेक्ष राज्य:

राज्यसंस्थेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप हे धमर्निरपेक्षतेचे एक महत्वाचे तत्व मानले जाते. यूरोपमधील धर्म संस्था (पोप) व राज्यसंस्था (राजा) यांच्या वादातून सत्तासंघर्षातून या तत्वाची निर्मिती

झाली असल्याकारणाने या तत्वाची मांडणी धर्मसंस्था व राज्यसंस्था यांची संपूर्ण फारकत अशा काहीशा संकूचित अर्थाने केली जाते. धर्मनिरपेक्ष राज्य याचा एक अर्थ म्हणजे धर्मस्वातंत्र्याची हमी, सत्ता व संपत्ती यांचे वाटप धर्म या घटकावर नसेल याची शाश्वती व राज्य संस्थेचे सार्वजनिक हिताचे निर्णय सर्व धर्माच्या व्यक्तिंना धर्मनिरपेक्षपणे लागू केले जातील हा विश्वास याचाच दुसरा अर्थ असा की, राज्यसंस्था कोणत्या ही एका धर्माविषयी अनाठायी पक्षपात करणार नाही अथवा कोणतीही एक धर्म श्रद्धा हा तिच्या निर्णयांचा आधार असणार नाही. कारण धर्मनिरपेक्षता ही बहूधर्मीय समाजावर शासन करण्याची व्यूहरचना नसून व्यक्तिस्वातंत्र्य बहूविधता व न्याय यावर आधारित शासनाची ती आवश्यक अट आहे ही धर्मनिरपेक्षतेची प्रमुख तत्व मांडणी दिसते.

**जमातवाद व धर्मनिरपेक्षता:**

धार्मिक जमातवाद व धर्मनिरपेक्षता यांचा सहसंबंध भारतीय राजकारणात १९८० नंतर च्या दशकात अधिकच दृढ होताना दिसतो आहे. धर्म व राजकारण यांची फारकत या अर्थाने धर्म निरपेक्षता ही संकल्पना भारतीय राजकारणात रूढ होतांना दिसते. यामागे प्रमुख कारण म्हणजे जमातवादी शक्तींनी १९८० च्या दशकापासून आपल्या विरोधकासाठी सेक्यूलर फोर्सेस असा शब्द प्रयोग करावयास सुरूवात केली. सेक्युलर फोर्सेस असा शब्द प्रयोग करतांना ते त्यांना नकली धर्मनिरपेक्षतावादी म्हणण्यास विसरत नसत व आजही विसरत नाहीत. या सेक्यूलर वादी प्रवाहा मधील कच्चे दूवे त्यांच्या तत्व व व्यवहारातील विसंगती ही धर्मनिरपेक्षतेच्या तत्वातील विसंगती म्हणून पुढे करण्यात धार्मिक जमातवादी शक्ती यशस्वी ठरल्या. त्यामुळे धर्मनिरपेक्षतेची संकल्पना थेट राजकारणात प्रविष्ट झाली.

१९८० नंतरच्या काळात भारतात धर्मनिरपेक्षतेच्या तत्वापूढे मोठ्या प्रमाणात धोक्याची मालिका सुरू झाली. वास्तवात या धोक्याचे स्वरूप दुहेरी आहे. धार्मिक जमातवादापासून केवळ अल्पसंख्यांक समूहांनाच धोका नसतो तर बहूसंख्यांक धर्मातील विविधता व धर्माचा अर्थ लावण्याची स्वायत्तता धोक्यात येते. व धर्मनिरपेक्षतेची एकूण मूल्य संहिता या कारणाने अधिक क्षीण हाते. जमातवादामुळे अशा पद्धतीने धर्मनिरपक्षतेचे तत्व धोक्यात येते हे खरे असले तरी धर्मनिरपेक्षता व जमातवाद यांच्या कार्याचे क्षेत्र अगदी भिन्न आहे ही बाब विसरता कामा नये. धार्मिक समूह हा धार्मिक जमातवादी शक्तींचा मूलभूत आधार असतो. अस्मीतांच्या व प्रतिकांच्या आधारे भावनिक अस्थिरता निर्माण करून व इतिहासांचे विकृतीकरण करून जमातवादी शक्ती आपले बस्थान बसवत असतात. परंतु त्याचा विरोध हा केवळ धर्मनिरपेक्षतेत नसतो तर मूलतः त्याचा रोख लोकशाही व विविधतेवर असतो. प्रत्येक धर्मसंमूहाचे अस्तित्वभान गोठवून टाकण्यावर जमातवादाचा रोख असतो.

या जमातवादी शक्तींच्या आव्हानाचा सामना करण्यासाठी कायदेशीर मार्गाने पुरावे गोळा करून जमातवादी राजकारणास अटकाव करण्याचा एक मार्ग खुला आहे परंतु या मार्गाच्या मर्यादाच अधिक आहे. कारण जमातवादी चलाखीने कायद्यातून पळवाटा शोधतात हा आजतागायतचा अनुभव आहे. तेव्हा धर्मनिरपेक्ष आधारांवर जनसंघटना उभारण्याचा व जमातवादास पर्यायी भूमिका देण्याचा एक मार्ग पूढे येतो. परंतु वास्तवात जमातवाद्यांच्या विस्ताराबरोबर धर्मनिरपेक्षवादी संघाना या अधिकाधिक मजबूत होण्याऐवजी अधिकाधिक दूर्बल होत असलेल्याच आपणास दिसतात. यामागे महत्वाचे कारण म्हणजे धर्मनिरपेक्षतावादी घटकांची सर्व शक्ती धार्मिक राष्ट्रवाद व जमातीकरणातून निर्माण होणाऱ्या समस्यांना प्रत्युत्तर देण्यातच खर्ची पडतांना दिसते. जमातवादाच्या विरोधासाठी धार्मिक जमातवादास पर्याय म्हणून इतर मागास

जाती समूहाचे संघटन बांधले परंतु या जातिसमूहांच्या संघटनांमध्ये जमातवादी शक्तींनी आपले प्रस्थ निर्माण केले आहे असे अनुभवास येते. त्यामुळे केवळ धर्मनिरपेक्ष आधारावर संघटन केल्याने जमातवादाचा प्रवाह रोखता येईल याची शाश्वती मिळत नाही.

धार्मिक जमातवादास रोखण्यासाठी भारतीय राजकीय अवकाशात 'धर्मनिरपेक्षतेच्या झेंड्या खाली एकत्र' येण्याचा एक प्रयोग राबवला गेला. मात्र हा प्रयोग ही वास्तवात उथळ व मृगजळ ठरला. धर्मनिरपेक्षतेचा नेमका कोणता अर्थ लोकांसमोर मांडायचा यासंदर्भातच त्यांचे एकमत नव्हते इतर बाबतील प्रश्नांचे तर बोलावयासच नको. धार्मिक जमातवादास धर्मनिरपेक्ष आघाडीवरून रोखण्यासाठी जी व्यूहरचना आखली जात आहे त्यातून एकूण गोंधळाचीच परिस्थिती समोर येत आहे यामागील कारणांची मांडणी करतांना प्रा. सुहास पळशीकर म्हणतात, ''खरे तर या सर्व गोंधळामागे मुख्य कारण असे आहे की, जमातवादाचे विरोधक हे जमातवादाला धर्मनिरपेक्षता हा पर्याय मानतात. वास्तविक धर्मनिरपेक्षता ही जमातवादाच्या पराभवानंतर विकसित करण्याची गोष्ट आहे. जमातवादामधून जे आव्हान उभे राहते ते केवळ धर्मनिरपेक्षते पुढे नाही तर लोकशाही पुढे आणि समाजाच्या बहूविधतापूर्ण चारित्र्यापूढे असणारे आव्हान आहे. या वास्तवाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे 'जमातवाद वि. धर्मनिरपेक्षता अशी लढाई लढविण्यात आली व त्यामुळे धर्मनिरपेक्षतेचा तिढा आणखी गूंतागुंतीचा झाला.''

**सारांश:**

एकदंरीत 'धर्मनिरपेक्षता' ही पाश्चात्य संकल्पना असून मानवी जीवनाच्या समृद्धीसाठी ती उपयुक्त असल्याकारणाने जगभर विस्तारलेली व विविध स्वरूपात अविष्कृत झालेली एक मूलभूत तत्वप्रणाली आहे. यूरोपखंडात जशी ही संकल्पना प्रबोधन यूगातून स्थिर स्थावर झाली तशीच ती भारतीय समाज जीवनात ही प्रबोधनाच्या माध्यमातूनच प्रविष्ट झाली. स्वातंत्र्यलढ्यातच भारतीय समाजधूरीणांनी व राष्ट्रीय नेतृत्वाची धर्मनिरपेक्ष दृष्टि अधिक स्पष्ट व सजग झाली असल्याकारणाने धर्मनिरपेक्षता हे भारतीय संविधानाचे व्यवच्छेदक लक्षण बनले. या धर्मनिरपेक्षतेच्या तत्वास धार्मिक जमातवादाने मोठे आव्हान आज निर्माण केले असले तरी धर्मनिरपेक्षता हा भारतीय समाजाचा मूलाधार आहे. धर्मनिरपेक्षता हा भारतीय समाजमनाचा स्वभाव आहे. धार्मिक उन्मादास भारतीय समाजाने दिलेला प्रतिसाद हा नेहमीच तात्कालीक स्वरूपाचा राहिला आहे. कारण भारतीय संस्कृतीची मूळ ही बहुसांस्कृतिक सह अस्तित्वातच रूजलेली आहेत. या मूळांना भारतीय संविधानाने अधिक घट्ट केले आहे. त्यामुळे भारतीय समाज धर्मनिरपेक्षतेच्या मूलतत्वांपासून दूरावणार नाही हे निश्चित. त्यासाठी गरज आहे परिवर्तवादी शक्तींनी प्रतिक्रांतीवादी शक्तींची व्युहरचना उध्वस्त करण्याची व भारतीय जनसमुदायास धर्मनिरपेक्ष साद घालण्याची. भारतीय समाज मन या धर्मनिरपेक्ष सादेस नक्कीच प्रतिसाद देईल याची शाश्वती इतिहास देतो.

**प्रादेशिकतचे राजकारण:**

भारतीय संविधानकारांनी जाणीवपूर्वक केंद्रोत्सारी संघराज्य पद्धतीचा स्वीकार करून एकात्म शासनव्यवस्थेकडे झुकणारे संघराज्याचे प्रतिमान प्रत्यक्षात आणले. फाळणीचा अनुभव संविधानकारांना या तरतुदी करण्यासाठी प्रभाव टाकून गेला. त्यानंतर च्या काळात राज्यकर्त्यांनी ऐक्य या एकाच घटकाला कमालीचे महत्त्व आपल्या राजकीय व्यवहारात दिले. राजकीय क्रियावंताबरोबरच राजकीय तत्त्वचिंतकही यास अपवाद नव्हते. भारतीय संघराज्याचे स्वरूप हे राष्ट्रीय एकता व प्रादेशिक स्वायत्तता जोपासण्याचा एक प्रयत्न होता. परंतु या प्रयत्नात प्रादेशिक स्वायत्ततेकडे मोठे दुर्लक्ष झाले होते. परिणामी, स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकीय

व्यवस्थेचे स्वरूप अधिकाधिक केंद्रिकरणाकडे झूकु लागले. यासंदर्भात डॉ. भा.ल. भोळे आपले अवलोकन व्यक्त करतांना म्हणतात,''संविधानच्या तरतुदींपेक्षाही त्यांच्या मुळाशी असलेली तात्त्विक बैठक आणि राष्ट्रीय अभिजनांचा राष्ट्रीय व प्रादेशिक, राजकीय शक्तींकडे पाहण्याचा पूर्वग्रह दूषित दृष्टिकोन अधिकच आक्षेपार्ह होता. राजकीय एकात्मता व राष्ट्रऐक्य फक्त प्रबळ केंद्रसत्ता असल्यानेच साध्य होऊ शकते; संकुचित, प्रादेशिक व केंद्रोत्सरी शक्तींना आवर घालण्याचे व त्यांच्यावर निर्बंध घालण्याचे अनिर्बंध संविधानिक अधिकार केंद्रसत्तेला असले पाहिजेत. अशी ती तात्त्विक बैठक होती. केंद्रशासन हे राष्ट्रैक्याचे, विश्वात्म मूल्यांचे व प्रगतीचे प्रतिक तर राज्यशासन हे स्थानिकतेचे, संकुचिततेचे व प्रतिगामीपणाचे प्रतिक आहे हे त्या भूमिकेमागील गृहीततत्त्व होते; एकात्मतेचे राजकीय कार्य शासकीय संस्थांच्याद्वारे घडून येऊन चालेल असा विश्वास त्यामागे होता. राज्यशासन बलवत्तर होण्याची भीती किंवा प्रदेशवादाच्या आव्हानापुढे इथला राष्ट्रवाद टिकाव धरू शकणार नाही अशी शंका संविधानकारांच्या मनात असावी असे दिसते. त्यामुळेच बलशाही घटकराज्येच बलशाही केंद्रसत्ता निर्माण करू शकतील हा प्रस्तावच त्यांना विचारात घेण्याजोगा वाटला नाही.'' परंतु स्वातंत्र्योत्तर काळात सत्ता व अधिकारांचे विकेंद्रिकरण करणे भाग पडले व त्याप्रमाणात आत्मविष्काराच्या प्रादेशिक व प्रामुख्याने भारतीय संघराज्याच्या एकूण स्वरूप व राजकारणास प्रभावित करण्यात प्रादेशिकतेच्या घटकांचा अभ्यास या प्रकरणात मांडण्यात आला आहे.

**प्रादेशिकता संकल्पनात्मक मांडणी:**

The Foundation of New India या ग्रंथात के. एम. पाण्णीकर म्हणतात, ''प्रादेशिकतेमुळे भारतीय लोकशाही समोर विविध समस्या निर्माण झालेल्या दिसतात. राष्ट्रीय दुर्बलता निर्माण करणारा एक दुर्दैवी घटक म्हणजे प्रादेशिकता. या शब्दात त्यांनी प्रादेशिकतेचे विश्लेषण केले आहे. भारतातील प्रादेशिकतेचा अभ्यास स्वातंत्र्योत्तर राजकारणाच्या परिप्रेक्ष्यातून प्रामुख्याने केला जात असला तरी त्याची मूळ स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिशांच्या वसाहतवादी भूमिकेत आढळतात. ब्रिटिशकाळात भारताचे स्वरूप ब्रिटिश भारत, मोगल, भारत व संस्थानिकाचा भारत अशा किमान तीन भागात विभागलेले होते. ब्रिटिशांनी मोघलांच्या ताब्यातील एक एक प्रदेश जिंकावयास सुरुवात केली तेथपासूनच भारतात प्रादेशिकतेच्या भावनेची सुरुवात झाली असे म्हणता येईल. ब्रिटिश कालखंडात अशा प्रांतिक स्तरावर अनेक समस्या निर्माण झालेल्या होत्या मात्र ब्रिटिशांनी त्याकडे नेहमीच सोयीस्कर दुर्लक्ष केले. परिणामी स्वातंत्र्यपूर्व काळात प्रादेशिक निष्ठांची रुजवात झाली. स्वातंत्र्याच्या व्यापक ध्येयाखाली ही भावना व विविध अविष्कार भारतीय राजकारण व प्रक्रियेत व्यक्त होऊ लागले. भाषिक राजकारणाने व विकासाच्या असमतोलाने त्यास अधिक उग्रता येऊन भारतातून बाहेर पडण्यापर्यंतच्या भावनेपर्यंत या प्रादेशिकतेचा विस्तार झाला व त्यातुन भारतीय संघराज्यासच प्रश्नांकित केले गेले. भारतीय संघराज्याने यातून निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक आजतागायत यशस्वीरित्या केलेली असलीतरी केंद्र व राज्य संबंधाना प्रादेशिकतेच्या घटकांनी अनेकदा आव्हान दिलेले दिसते. यादृष्टीने प्रादेशिकतेच्या घटकाचा अभ्यास करने अत्यावश्यक ठरते. वेबस्टर शब्दकोशात प्रादेशिकतेची व्याख्यात स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, ''राष्ट्रापेक्षा आकाराने लहान अथवा मोठ्या विभागात समान संस्कृती, समान इतिहास अथवा समान हितसंबंधामुळे निर्माण झालेली वेगळेपणाची जाणीव व त्यावरील निष्ठा म्हणजे प्रादेशिकता होय असे विधान करण्यात आले आहे. साधारणतः प्रादेशिकता म्हणजे प्रांतवाद किंवा प्रदेशवाद होय. आपल्या देशांपेक्षा देशाच्या विशिष्ट भागावर प्रेम करणे, देशहितापेक्षा विशिष्ट भागाचे हित पाहणे यालाच प्रादेशिकता म्हणता येईल.

**प्रादेशिकतेची कारणे:**

भारतीय राजकीय व्यवस्थेत प्रादेशिकतेची भावना अनेक स्वरुपात अविष्कृत झाली. त्यातही प्रामुख्याने भाषावार प्रांतरचनेची मागणी, स्वतंत्र व स्वायत्त राज्यांची वाढती मागणी, स्थानियवाद व भूमिपुत्राची संकल्पना, प्रादेशिक असमतोल व फूटीरतावादी चळवळी हे त्याचे प्रभावी अविष्कार नजरेत भरणारे आहेत. त्याचा आढावा यादृष्टीने घेण्यापूर्वी प्रादेशिकतेची संकल्पना अधिक अवलोकन करण्याकरिता प्रादेशिकतेच्या भावनेस कारण ठरणारे घटक थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**१) भौगोलिक विविधता:**

भारत हा एक खंडप्राय देश आहे. युरोपातील अनेक देशांपेक्षा भारतातील घटकराज्यांचा विस्तार व लोकसंख्या अधिक आहे. त्यातही भौगोलिक वेगळेपण हे घटकराज्य निहाय निर्णायक स्वरुपात वेगळेपण जपणारे आहे. या भौगोलिक वेगळेपणामुळे राष्ट्रीय एकात्मतेपेक्षा प्रादेशिकतेच्या भावनेलाच अधिक बळकटी प्राप्त होतांना दिसते. भारतातील प्रत्येक प्रदेश स्वत:स इतरांपासून विभिन्नच नव्हे तर वेगळा समजतो परिणामी प्रादेशिकतेची भावना वृद्धिंगत होण्यास भौगोलिक विविधता हा घटक महत्त्वाचा कारक ठरतो.

**२) सांस्कृतिक धार्मिक विविधता:**

जगातील सर्व प्रमुख धर्म व त्यांचे अनुयायी यांचे भारतात अस्तित्त्व आहे. या धार्मिक विविधतेस सांस्कृतिक वेगळेपणाची ही जोड लाभलेली आहे. जी प्रादेशिकतेच्या भावनेस अधिक हातभार लावणारी आहे. धार्मिक व सांस्कृतिक आधारावर झालेले जनतेचे विभाजन प्रादेशिकतेच्या भावनेस पुढे नेण्यात महत्त्वाचे ठरले आहे. दक्षिण भारत व उत्तर भारत हा वाद मूलतः सांस्कृतिक आहे. खलिस्तान, द्रविडस्थान, ईशान्य भारतातील फुटीरतावादी चळवळी या मूलतः सांस्कृतिक व धार्मिक वेगळेपणाच्या भावनेतून निर्माण झालेल्या प्रादेशिकतेच्या भावनेचाच अविष्कार आहेत.

**३) आर्थिक विकासाचा असमतोल:**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याने जनसामान्यांच्या मनात विकासाच्या स्वप्नांची रुजवात केली होती. स्वातंत्र्योत्तर काळात आपली सर्व प्रकारच्या अभावांपासून मुक्तता होईल, ही आशा जनसामान्यांच्या डोळ्यात स्वातंत्र्यानंतर तरळली होती. परंतु वास्तवात स्वकीय राज्यकर्ते भारतीय जनतेच्या आशा-अपेक्षांची पूर्तता करण्यात ज्या प्रमाणात अपयशी होत गेले त्या प्रमाणात प्रादेशिकतेची भावना ही वाढीस लागली. स्वातंत्र्योत्तर काळात नैसर्गिक घटक संसाधने इत्यादीच्या आधारावर विकासाचा असमतोल मोठ्या प्रमाणात निर्माण झाला. विकसित व मागासलेली राज्य अशी स्पष्ट फाळणी देशभरात स्पष्ट स्वरूपात आकारास आली. गरीब-श्रीमंत यातील दरी अधिकाधिक रुंदावत गेली. आपल्या विकासाच्या प्रश्नांना केंद्रीय शासनाच जबाबदार आहे ही भावना ज्याप्रमाणात बळावत गेली त्या प्रमाणात प्रादेशिकतेचा विचार ही वृद्धिंगत होत गेलेला दिसतो.

**४) राजकीय पक्ष व संघटनांची भूमिका:**

भारतातील प्रादेशिकतेच्या भावनेस उत्तेजन देण्यात राजकीय पक्षांनी महत्त्वाची भूमिका पार पाडलेली दिसते. श्री.डी.सी. गुप्ता आपल्या Indian Government and politics या

ग्रंथात म्हणतात की, ''प्रांतवादाची सुरुवात काँग्रेस पक्षातून झाली आणि हळूहळू सर्वच राजकीय पक्षांना याची लागण झाली.'' केंद्रीय व घटकराज्य सरकारे दुर्बल करण्यासाठी राजकीय पक्षांकडून मोठ्या प्रमाणात प्रादेशिकतेस व स्थानियवादास प्रोत्साहन दिले जाते. केंद्रीय मंत्रिमंडळात कोणत्या प्रांतास किती वाटा आहे इथपासून अंदाजपत्रकात कोणत्या प्रांतास किती स्थान आहे इथपर्यंत प्रादेशिकता ताणली जाते. त्यास राष्ट्रीय पक्षांबरोबर प्रादेशिक पक्षही सारख्याच प्रमाणात हातभार लावतांना दिसतात. यास प्रादेशिक संघटनांची वाढती संख्याही मोठा हातभार लावताना दिसते. एखाद्या छोट्याशा प्रश्नासाठी निर्माण झालेली संघटना लवकरच स्थानीय वादाचा व भूमिपूत्रांचा कैवार घेऊन राजकारणात प्रादेशिकतच्या भावनेचे चलते नाणे म्हणून वापर करते. महाराष्ट्रातील शिवसेना, पंजाबमधील अकाली दल, दक्षिणेतील तेलगूदेशम, द्रमूका-अण्णा द्रमूक, पूर्वेकडील आसाम गण परिषद यांसारखे पक्ष मूलतः प्रादेशिक संघटनांचाच अविष्कार आहे.

### ५) राष्ट्रीय नेतृत्त्वाचा अभावः

नेतृत्त्वब हा घटक राष्ट्रनिर्मितीच्या प्रवासातील एक महत्त्वाचा घटक असतो. इंदिरा गांधीपर्यंतच्या काळात नेतृत्त्वाप्रती राष्ट्रीय सहमती भारतीय जनमानसात आढळत होती. १९९० नंतरच्या काळात मात्र राष्ट्रीय नेतृत्व मागे पडून स्थानीय व प्रादेशिक सामूहिक नेतृत्त्वाने उचल घेतली. हे नेतृत्त्व मूलतः संकुचित घटकांचा आधार घेऊनच जन्माला आलेले असल्यामुळे प्रादेशिकता हे या नेतृत्त्वाचे भांडवल ठरले. नेतृत्त्वाची असमर्थतता प्रादेशिकतेच्या विस्तारास एक महत्त्वाचे कारण ठरलेली दिसते.

### प्रादेशिकतेचे घटकः

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकीय व्यवस्थेवर प्रादेशिकतेच्या ज्या घटकांनी मोठा प्रभाव पाडला आहे. अशा काही प्रमुख घटकांचा आढावा आपणास पुढील प्रमाणे घेता येईल.

### १) भाषिक प्रश्नः

जात, धर्म या घटकांबरोबरच भारतीय राजकारणांला प्रभावित करणारा घटक म्हणून भाषा या घटकाकडे पाहिले जाते. भाषिक विभिन्नता, भाषिक निष्ठा व भाषिक आस्मितांसाठी प्रखर लढा देण्याची तयारी या त्रिस्तरीय दृष्टीकोनातून भारतीय राजकारणावर भाषिक घटकांनी टाकलेला प्रभाव अभ्यासने गरजेचे ठरते. भारतीय संघराज्यातील घटकराज्यांचा आधार भाषा असावा का? राज्यकारभार लोकभाषेतून चालल्याखेरीज लोकशाहीचा आशय सजीव होईल काय? शिक्षणाचे माध्यम कोणते असावे? इंग्रजी भाषा अनिर्वाय असावी काय? न्यायालयीन कामकाजाची भाषा कोणती असावी? सीमावर्ती भागातील भाषिकांची भाषा कोणती असावी? सीमावर्ती भागातील भाषिकांच्या प्रश्नांना काय पर्याय देता येईल? राष्ट्रीय भाषा व राष्ट्राची भाषा हा पेच कसा सोडवता येईल. या व अशा अनेक प्रश्नांनी भारतीय राजकारणाचे मोठे अवकाश व्यापलेले दिसते. त्यामुळेच भाषिक राष्ट्रवादातून निर्माण झालेले असंख्य विवाद हे केवळ भाषेपुरते सिमित न राहता त्यास खास भारतीय समाजजीवनाचे विविधांगी पदर आहेत. या प्रश्नांची उकल करताना डॉ. भा.ल. भोळे म्हणतात, ''समाजाचे भूतकाळाशी असलेले नाते त्या गौरवशाली इतिहासाचा अभिमान, ज्या गृहिताकांवर सामाजिक संबंध उभारले गेले आहेत त्यांची चौकट वसाहतवादाचे भाषा व संस्कृतीवर झालेले परिणाम सामाजिक, आर्थिक विषमतांचे भाषिक संदर्भ आणि कार्यकारणे, भाषेची प्रतिष्ठा व समृद्धी वाढवण्याचे उपाय, भाषेचे राजकारण, जनतेच्या लोकशाही महत्त्वकांक्षा आणि हक्कभान हे सारे आलटून पालटून भाषाविषयक वादातून

आणि संघर्षातून व्यक्त झालेले आस्थाविषय आहेत.'' अशा विविधांगी दृष्टीने भाषिक आंदोलनाचा अभ्यास केला तरच या प्रश्नाचे वास्तविक आकलन करता येऊ शकते.

**भाषिक प्रश्नाचा स्वातंत्र्यपूर्व काळातील भावनिक पदर:**

भाषेचे राजकारण व स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचा घटक म्हणून पुढे आल्या असला तरी याचे भावनिक पदर मात्र स्वातंत्र्यपूर्व काळातच अधिक गडद झालेले दिसतात. वास्तविकतः संप्रेषणाचे माध्यम म्हणून भाषेचा उगम होत असला तरी भाषेचे महत्त्व केवळ तेवढ्यापुरतेच कधीच व कुठेच राहत नसते. हा जगाचा अनुभव आहे. कारण मूलतः भाषा ही त्या त्या समाजाच्या संस्कृतीची वाहक असते. एका समान भाषेमुळे त्या विशिष्ट समुहाला सामूहिक अस्मिता व भान प्राप्त होत असते. त्यामुळेच आपल्या स्वभाषेत वाङ्‌मयीन परंपरांचा अभिमान व्यक्तिच्या अंगी निर्माण होतो. भाषेशी व्यक्ती भावनिकरित्या जोडलेली असते. त्यामुळे केवळ बौद्धिक पातळीवरून या प्रश्नाचे अवलोकन करण्याची कसरत अपुरी ठरते. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या धुरीणांनी ही गफलत मोठ्या प्रमाणात केलेली आपणास दिसून येते. युरोपियन धरतीवर भारत या राष्ट्राची उभारणी करण्यासाठी एक राष्ट्र एक भाषा तत्वाचा मोह त्यांना आवरता आला नाही व त्यातूनच हिंदी ही भारताची राष्ट्रीय भाषा राहील हे धोरण त्यांनी पुढे रेटले. वास्तविक १९२९ साली भारतात भाषिक सर्वेक्षण झाले होते. त्या सर्वेक्षणाप्रमाणे भारतात १७९ भाषा व ५४४ बोलीभाषा अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले होते. इतिहासतही भारत हा कायम बहुभाषिक देश असल्याचेच दाखले मिळतात, असे असताना स्वातंत्र्यपूर्व काळात भाषिक प्रश्नासंदर्भात राष्ट्रीय पुढाऱ्यांनी जो दृष्टीकोन ठेवला व इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांना सोयीस्कर अशी भूमिक राबवली त्यातून भाषिक प्रश्नांचे भावनिक पदर अधिक संवेदनशील होण्यास हातभार लागला असे दिसते.

**भाषा व राज्यघटना:**

भारताची भाषिक रचना ही पाश्चात्य व इतर देशांपेक्षा अनेक अर्थांनी वेगळीच नव्हे तर अद्वितीय आहे. त्यामुळे इतर देशांनी भाषिक प्रश्न सोडवण्यासाठी जे मार्ग अवलंबिले तसे मार्ग भारतात वापरून उपयोगाचे नाही, याची स्पष्ट जाणीव व भान भारतीय संविधानकारांकडे होते. त्यामुळे भाषिक प्रश्नांची उकल करण्यासाठी भारतीय संविधानात त्यांनी मूलभूत स्वरूपाच्या तरतुदी केलेल्या दिसतात. भारतीय संविधानाच्या १७ व्या भागात कलम ३४३ ते ३५१ दरम्यान भाषिक प्रश्नांसंदर्भातील तरतुदी करण्यात आल्या आहेत व राष्ट्रीय प्रमुख भाषांना मान्यता देणारे आठवे परिशिष्ट राज्यघटनेस जोडण्यात आले आहे. या आठव्या परिशिष्टात १. हिंदी, २. आसामी, ३. बंगाली, ४. गुजराती, ५. कन्नड, ६. काश्मिरी, ७. मल्याळम, ८. मराठी, ९. उडिया, १०. पंजाबी, ११. संस्कृत, १२. तामीळ, १३. तेलगू, १४. उर्दू या १४ भाषांना प्रथम प्रमुख भाषांचा दर्जा देण्यात आला होता. यात १९५६ साली १५ सिंधी, १६. कोकणी, १७. मणिपुरी व १८. नेपाळी या भाषांचा ही समावेश करण्यात आला. पुढे २००३ साली शंभराव्या घटनादुरूस्तीने यात आणखी चार भाषांची भर टाकून ही एकूण संख्या २२ पर्यंत नेलेली दिसते. त्या भाषा म्हणजे १९. बोडो, २०. संधाली, २१. मैथिली, २२. डोग्रा.

भारतीय संविधानाच्या कलम ३४३ ने केंद्रशासनाकरिता संघराज्याची अधिकृत भाषा म्हणून देवनागरी हिंदी ही भाषा स्वीकृत केली. त्यानुसार संविधान अंमलात आलेल्या दिवसापासून पंधरा वर्ष म्हणजे १९६५ पर्यंत इंग्रजी भाषेचा राज्यकारभाराची भाषा म्हणून वापर करावा असेही निश्चित करण्यात आले व १९६५ नंतर इंग्रजी भाषेचा वापर एका निश्चित उद्देशाकरिता हिंदीबरोबरच चालू ठेवण्याचा अधिकार संसदेला प्रदान करण्यात आला. त्या तरतूदी ज्या

आधाऱ्या महामहीम राष्ट्रपतींनी आदेश काढून संघ सरकारच्या राज्यकारभारामध्ये हिंदीचा वापर करावयास परवानगी दिलेली आहे. १) जनतेशी करावयाचा पत्रव्यवहार, २) प्रशासकीय व संसदेला सादर करावयाचे अहवाल तसेच सरकारी नियतकालिके, ३) शासकीय ठराव व विधीमंडळाने मंजूर केलेले कायदे ४) ज्या घटक राज्यसरकरांनी हिंदीला अधिकृत भाषा म्हणून मान्यता दिली आहे त्यांचेशी होणारा पत्र व्यवहार, ५) राजदूत व दूतावासातील कर्मचाऱ्यांना पाठविली जाणारी औपचारीक कागदपत्रे.

भारतीय संविधानाच्या कलम ३४४ नुसार भारतीय भाषांच्या विकासासंदर्भात उपाय सुचवणारा व अभ्यास करण्यासाठी एक आयोग गठीत करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना प्रदान करण्यात आला. हा आयोग राष्ट्रपतीस हिंदी भाषेच्या विकासाकरिता आवश्यक शिफारशी करेल त्याचबरोबर इंग्रजी भाषेवर कशाप्रकारे बंधने टाकता येतील. यासंदर्भातही शिफारशी करेल. हा आयोग हिंदी भाषेचा क्रमाक्रमाने राज्यकारभारात अधिक वापर करण्यासाठी व इंग्रजीचा वापर क्रमाक्रमाने कमी करण्याकरिता काय उपाय योजता येतील याची शिफारस राष्ट्रपतीस करील. त्याबरोबरच दक्षिणेकडील राज्यांमध्ये हिंदी भाषेस जनमान्यता मिळविण्यासाठी काय करावे लागेल? दक्षिणेतील राज्यांची हिंदी भाषे संदर्भातील मानसिकता काय आहे याचाही अभ्यास हा आयोग करेल. त्याचबरोबर या कलमाने भाषाविषयक वस्तूस्थितीचा अभ्यास करण्यासाठी संसद एक समिती गठीत करेल. या समितीत एकूण ३० सभासद असतील त्यापैकी २० सभासद हे लोकसभेत तर १० सभासद हे राज्यसभेतून निवडले जावेत असेही नमूद करण्यात आले. ही समिती भाषाविषयक आयोगाने दिलेल्या शिफारशींचा अभ्यास करून त्या शिफारशी राष्ट्रपतींना सादर करेल.

भारतीय संविधानाच्या कलम ३४५ नुसार घटकराज्यांना कार्यालयीन भाषांच्या संदर्भात स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे. या कलमान्वये घटकराज्यांनी परस्परात केंद्राशी संपर्क साधताना कोणती भाषा वापरावी याची मुभा देण्यात आली आहे. मात्र घटकराज्यांनी या संदर्भातील अधिकृत निर्णय घेईपर्यंत इंग्रजी भाषाच केंद्र व राज्याची संपर्क भाषा राहिल असेही स्पष्ट करण्यात आले. कलम ३४६ हे देखील राज्या-राज्यातील कार्यालयीन संपर्क भाषेबद्दल आहे तसेच राज्य व संघ सरकार यांच्या कार्यालयीन संपर्क भाषेसंदर्भातही यात तरतूद आहे. त्याप्रमाणे इंग्रजी ही संपर्क भाषा असेल पण दोन राज्यांनी परस्परांच्या सहमतीने हिंदीस मान्यता दिली तर ती कार्यालयीन संपर्क भाषा असेल असे स्पष्ट करण्यात आले, तर कलम ३४७ अन्वये राष्ट्रपती घटकराज्यांना विशिष्ट भाषा कार्यालयीन कामकाजाकरिता वापरण्याचे निर्देश देऊ शकतात. अर्थात त्या घरकराज्यातील बहुसंख्य लोकांनी राष्ट्रपतींना विशिष्ट भाषेच्या वापरासंबंधी तसे निवेदन दिले तरच राष्ट्रपती विशिष्ट भाषा राज्याने वापरावी असे निर्देश देऊ शकतील असे बंधनही त्यात स्पष्ट करण्यात आले आहे.

भारतीय संविधनाच्या ३४८च्या कलमाने इंग्रजीभाषेसंदर्भात मूलभूत स्वरुपाच्या तरतूदी केलेल्या आहेत. त्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालायाने सर्व कामकाजासाठी इंग्रजी भाषेचाच वापर करेल, उच्च न्यायायलात ही इंग्रजी भाषेचाच वापर होईल, संसदेतील व राज्यविधीमंडळामधील सर्व शासकीय विधेयके ही इंग्रजी भाषेतूनच असतील. राज्यघटनेत दुरुस्ती सुचवणारे विधेयकही इंग्रजी भाषेतच असेल, संसदेने व राज्यविधीमंडळाने संमत केलेले कायदे इंग्रजीत असतील व सर्व प्रकारचे शासकीय आदेश हे इंग्रजी भाषेतून असतील हे या कलमान्वये सुनिश्चित करण्यात आले. भारतीय राज्यघटनेत कलम ३४८ला पूरक कलम ३४९मध्ये तरतूद करतांना नमूद करण्यात आले की कलम ३४८ने भाषेच्या बाबतीत जी व्यवस्था केली आहे त्यात बदल करणारे विधेयक संसदेत पुढील १५ वर्ष राष्ट्रपतींच्या पूर्व परवानगीशिवाय मांडता येणार नाही. राष्ट्रपतींनी ही या

विधेयकास पूर्व परवानगी देतांना आयोगाने केलेल्या शिफारशी व संसद समितीने केलेल्या शिफारशी विचारात घ्याव्यात असे स्पष्ट करण्यात आले आहे. तर कलम ३५०नुसार भारतीय नागरीक संविधानात नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकृत भाषेतून कोणत्याही अधिकाऱ्याला अर्ज करू शकेल असे नमूद करण्यात आले आहे. तर कलम ५५१नुसार अल्पसंख्यांकाच्या भाषेचे रक्षण योग्य पद्धतीने होते किंवा नाही हे पाहण्यासाठी राष्ट्रपतींना विशेष अधिकार बहाल करण्यात आला आहे. त्याचबरोबर भारताची अधिकृत संपर्क भाषा हिंदी व्हावी याकरिता भारत सरकारने हिंदी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी विशेष प्रयत्न करावेत असेही नमूद करण्यात आले आहे.

**भाषा आयोग:**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४४ ला अनुसरून १९५५ साली श्री. बी.जी. खेर यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या भाषा आयोगाची स्थापना करण्यात आली. यात दहा सदस्यांचा समावेश होता. १९५७ साली या आयोगाने आपल्या शिफारशी राष्ट्रपतींना सादर केल्या. यात प्रामुख्याने पुढील शिफारशींचा समावेश होता.

i) स्पर्धात्मक परीक्षेत इंग्रजीबरोबर हिंदीस समान दर्जा असावा.

ii) अखिल भारतीय सेवेसाठी हिंदीचे ज्ञान आवश्यक करण्यात यावे.

iii) आंतरराज्य संपर्क भाषा हिंदी असावी.

iv) प्राथमिक शिक्षण प्रादेशिक भाषेतून असावे परंतु माध्यमिक स्तराव हिंदी अत्यावश्यक भाषा म्हणून शिकवली जावी.

v) राज्यप्रशासनात हिंदीचा अधिकाधिक वापर करावा.

vi) साहित्यभाषा म्हणून माध्यमिक शाळांमधून इंग्रजी भाषा शिकवू नये.

vii) सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे कामकाज इंग्रजी भाषेतून चालू ठेवावे.

viii) हैद्राबादसारख्या ठिकाणी नॅशनल ॲकेडमी ऑफ लँग्वेजेस संस्था स्थापन करून प्रमुख भाषांचा विकास साधावा इत्यादी.

**संयुक्त समितीची स्थापना:**

भारतीय संविधानाच्या ३४४ व्या कलमाने राष्ट्रपतींनी भाषा आयोगाची स्थापना श्री. बी.जी.खेर यांच्या अध्यक्षतेखाली केली होती. या कलमान्वये या समितीचा अहवाल संसदेला सादर करणे बंधनकारक होते. यासाठी संसदेने संयुक्त समिती स्थापना केली. या समितीमध्ये संविधानात्मक तरतुदीप्रमाणे लोकसभेचे २० व राज्यसभेचे १० सभासद निवडले गेले. संयुक्त समितीने भाषा आयोगाच्या अहवालाचा अभ्यास करून पुढील प्रमुख शिफारशी केल्या.

१) १९६५ पर्यंत इंग्रजी भाषा राज्यकारभारासाठी स्वीकारण्यात यावी. हिंदी भाषेस १९६५ पर्यंत दुय्यम स्थान देण्यात यावे. १९६५ नंतर मात्र हिंदी ही प्रमुख भाषा मान्य करून इंग्रजी भाषेला दुय्यमस्थानी ठेवावे.

२) गरज वाटल्यास १९६५ नंतरही कायदा करून इंग्रजी भाषा राज्यकारभाराची भाषा कायम राखता येईल.

३) घटकराज्यांमध्ये शिक्षणाचे माध्यम व राज्यकारभाराची भाषा म्हणून त्या त्या घटकराज्यांनी आपल्या प्रादेशिक भाषेचा स्वीकार करावा. या बदलाची प्रक्रिया घाईने न करता स्वाभाविक व हळुवार असावी.

४) केंद्र शासनाने हिंदी भाषेचा विकास व प्रसार करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

भाषा आयोग व संसदेच्या संयुक्त समितीने दिलेल्या शिफारशींना अहिंदी घटकराज्यांकडून विशेषतः दक्षिणेतील राज्यांनी ता तीव्र विरोध केला. परिणामी पं. जवाहरलाल नेहरूंना यासंदर्भात भूमिका स्पष्ट करावी लागली. यासंदर्भात निवेदन करताना पंतप्रधान पं. नेहरू यांनी असे जाहीर केले की, इंग्रजी भाषा ही पर्यायी भाषा म्हणून आवश्यकता असेपर्यंत चालू ठेवली जाईल हिंदी भाषा केव्हा स्वीकारावी हे अहिंदी भाषिकांच्या संमतीने ठरविले जाईल.

### न्या. सिन्हा आदेशः

१९६० साली भाषिक आयोग व संसदेच्या संयुक्त समितीच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रपतींच्या सहीने एक आदेश काढण्यात आला. या आदेशान्वये न्या. सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली एक स्थायी आयोग स्थापन करण्यात आला. या आदेशाने हिंदि पारिभाषिक शब्दकोश तयार करण्याचे निश्चित करण्यात आले. त्याचबरोबर लोकसेवा आयोगाच्या परिक्षेसाठी हिंदी भाषा प्रमुख भाषा म्हणून स्वीकारण्यात आली. त्याचबरोबर या आदेशाने हेही निश्चित करण्यात आले की संसदेच्या इंग्रजी कायद्यांचे रुपांतर हिंदी भाषेत केले जावे, योग्यवेळ येताच न्यायालयाचे कामकाज हिंदी भाषेतून सुरू केले जावे, असे राष्ट्रपतींच्या सहीने घोषित केले गेल्यामुळे अहिंदी भाषिक राज्यांनी या आदेशास प्रखर विरोध करावयास सुरुवात केली. परिणामी १ ऑगस्ट १९६० रोजी भारतीय गृहमंत्र्यांनी भाषा आयोगाच्या शिफारशींचा स्वीकार केला जाणार नाही, ही सरकारची अधिकृत भूमिका जाहीर केली.

### त्रिभाषा सूत्रः

न्या. सिन्हा आदेश प्रकरणानंतर भाषिक प्रश्नासंदर्भात भारत सरकारने संवेदनशील भूमिका घेत प्रादेशिक स्तरावरील भाषिकांच्या भावनेचा आदर राखला. १९६१ साली राष्ट्रीय एकात्मता परिषदेने जाहीर केलेले त्रिभाषा सूत्र या संदर्भात महत्त्वाचे मानले जाते. या सूत्राप्रमाणे विद्यापीठांचे शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषा असावे, इंग्रजी ही जोड भाषा असावी व कालांतराने हिंदी भाषेसही योग्य स्थान देण्यात यावे असे ठरले. १९६२ साली संमत झालेला अधिकृत भाषा विषयक कायदा ही यादृष्टीने महत्त्वाचा ठरला. या कायद्याने १९६५ नंतरही राज्यकारभारात इंग्रजी भाषा कायम राहील हे स्पष्ट केले. त्याबरोबरच राष्ट्रपतींच्या पूर्व संमतीने उच्च न्यायालयाचे कामकाज हिंदी किंवा प्रादेशिक भाषेतून चालू करता येईल हेही निश्चित करण्यात आले. संविधानात्मक तरतुदीच्या आधारे हिंदी ही केंद्राची अधिकृत भाषा राहील अशी घोषणा तत्कालीन गृहमंत्री गुलजारीलाल नंदा यांनी केली. अधिकृत भाषाविषयक कायदा व गृहमंत्र्याची घोषणा यामुळे अहिंदी भाषिक राज्यांमध्ये उग्र प्रतिक्रिया उमटल्या. मद्रासप्रांतात द्रमुक ने याचा उल्लेख ' हिंदी साम्राज्यवाद' असा केला. मद्रासबरोबर आंध्रप्रदेश, म्हैसूर पाँडेचरी, पं. बंगाल इत्यादी ठिकाणी निदर्शने सुरू झाली. संविधानाच्या १५ व्या भागाची निषेधात्मक होळी करण्यात आली. याची दखल घेऊन तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी जाहीर केले की

(अहिंदी भाषिक राज्यात लोकांची इच्छा असेपर्यंत इंग्रजी ही पर्यायी भाषा राहील. त्यासाठी १९६३च्या भाषाविषयक कायद्यात बदल करण्यात येईल, असे आश्वासित केले.

## कोठारी आयोग (१९६६):

भाषिक प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी व या प्रश्नाची सोडवणूक करण्याकरिता भारत सरकारने नव्याने एका आयोगाची स्थापना केली. श्री. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे त्यास कोठारी आयोग असे संबोधले जाते या आयोगाने आपली योजना पुढील प्रमाणे मांडली होती.

१) प्रादेशिक भाषेव्यतिरिक्त हिंदी किंवा इंग्रजी शिकवली जावी.

२) १० वर्षाच्या आत विद्यापीठ पातळीवर प्रादेशिक भाषेचा वापर केला जावा.

३) राष्ट्रीय पातळीवरील संस्थांनी इंग्रजी भाषेचा वपार करावा.

४) क्रमाने राष्ट्रीय संस्थेत हिंदीचा वापर व्हावा.

कोठारी आयोगाच्या शिफारशींकडेही सरकारने दुर्लक्ष करून आपले पूर्वीचेच धोरण पुढे नेले. १९६७ साली तत्कालीन उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांनी राज्याच्या विधीमंडळात व न्यायदानात प्रादेशिक भाषांचा वापर सुरू करावा असे जाहीर केल्यामुळे परत भाषिक प्रश्न चिघळला. कायद्याची पुस्तके प्रादेशिक भाषेत व हिंदी भाषेत भाषांतरीत करण्यासाठी मोरारजी देसाई आग्रही होते. मात्र श्री. छागला यांनी यास विरोध करून यामुळे एकून न्यायपालिकेच्या कामकाजात गोंधळ निर्माण होण्याची भीती व्यक्त केली. त्यास ॲटरनी जरनल सि.के. दप्तरी यांनीही दुजोरा दिला. १९६७ साली सरकारने घटकराज्यांनी उच्च न्यायालयात प्रादेशिक भाषा वापरासंबंधी विचार केल्यास केंद्र सरकार त्यास विरोध करणार नाही असे जाहीर केले. हिंदी भाषेला दिल्या जात असलेल्या महत्त्वामुळे दक्षिणेतील राज्य प्रामुख्याने अस्वस्थ झाली. त्याबरोबरच इंग्रजी भाषेला कायम राहिलेल्या महत्त्वाने हिंदी भाषिक राज्य ही विरोधात गेली. या पार्श्वभूमिवर तामिळनाडूने अशी मागणी केली की राज्यघटनेत समाविष्ट चौदा भाषांना राष्ट्रीय भाषा म्हणून घोषित करण्यात यावे. इंग्रजी भाषेस संपर्क भाषा म्हणून घोषित करावे. त्याचबरोबर राज्याच्या शाळेतून हिंदी भाषा शिकवण्याची सक्ती करू नये अशी ही त्यांची प्रमुख मागणी होती.

## राष्ट्रीय एकात्मता मंडळ व भाषा:

१९७३ साली राष्ट्रीय एकात्मता मंडळाची स्थापना झाली. भाषा व राष्ट्रीय एकात्मता यांचा समन्वय साधने हा या मंडळाच्या स्थापनेमागील एक प्रधान उद्देश होता. यादृष्टीने या मंडळाने काही उपाययोजना सुचविल्या त्यातील काही प्रमुख उपाय पुढील प्रमाणे होते.

१. अहिंदी राज्यात हिंदीचा प्रचार व प्रसारासाठी केंद्र सरकारने प्रभावी पावले उचलावीत त्याबरोबरच सर्व राज्यात इंग्रजी ही आकलनाची भाषा असावी.

२. त्रिसूत्री भाषा उपाय राबविला जाईल याची दक्षता घ्यावी.

३. भाषिकदृष्ट्या जे समूह अल्पसंख्याक आहेत त्यांना कमी किंमतीत पाठ्यपुस्तके उपलब्ध करून द्यावीत.

## भाषिक प्रश्न व केंद्रीय नेतृत्त्वः

भाषिक प्रश्नाची गुंतागुंत करण्यात व रोखण्यात स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच राष्ट्रीय नेतृत्त्वाची भूमिका महत्त्वाची ठरलेली दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यातच हिंदी या भाषेस राष्ट्रीय भाषेचा दर्जा दिला जावा यासाठी राष्ट्रीय नेतृत्त्वाची प्रत्यक्ष सहमती होती. म.गांधीपासून पं. नेहरू, सरदार पटेल या धुरीणांनी हिंदी भाषेचा राष्ट्रीय स्तरावरील अधिकृत वावर गृहीतच धरला होता. स्वातंत्र्योत्तर काळात संविधान सभेत मात्र दक्षिणेतील राज्य व अहिंदी भाषिक प्रतिनिधींना या भूमिकेस तीव्र विरोध केला. त्यामुळे हिंदी भाषेस तातडीने राष्ट्रीय भाषेचा दर्जा देण्याची घाई केंद्रीय नेतृत्त्वाला करता आली नाही. राष्ट्रीय एकात्मता भारतीय संघराज्याचे अखंडतत्व अबाधित राखण्यासाठी कंद्रीय नेतृत्त्व हिंदी भाषेचा आग्रह धरून होते. पं. जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, लालबहादूर शास्त्री यांची भूमिका आतापर्यंतच्या विवेचनात ओघाने आली आहे. त्यांची ही भूमिका हिंदी धार्जिणी होती परंतु भारतीय समाजमनाची दुफळी होता कामा नये याकरिता त्यांनी आपल्या विचारांना व्यावहारीक मुरड घातली जी स्तुत्य आहे. त्यामुळेच भारत परत एका नव्या फाळणीपासून वाचला असे म्हटले तर वावगे ठरू नये. पाकिस्तानी नेतृत्त्वानेही व्यावहारिकता न दाखवल्यानेच धर्माच्या नावावर भारतातपासून विभक्त झालेले पाकिस्तान हे प्रखर धार्मिक राष्ट्रभाषेच्या आधारावर दुभंगले व बांग्लादेश या बंगाली भाषिक समूहाच नव राष्ट्र जागतिक नकाशावर अवतरले, नेहरू-शास्त्रींच्या नंतर इंदिरा गांधींनी अगदी आणीबाणीच्या काळातही हिंदी भाषा अहिंदी भाषिकांवर थोपवली जाणार नाही असे आश्वासन दिले. १९८० सालच्या सार्वजनिक निवडणूकीतही आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात याचा त्यांनी पुनरुच्चार केला. १९७७ साली आणीबाणीच्या दाहक अनुभवातून जनता पक्षाचे सरकार केंद्रात सत्तेवर आले. जनतापक्षाचे मूलतः स्वरूप हे उत्तर भारतीय पक्ष असेच होते. जनता पक्षातील बहुतांश घटक पक्षांनी स्थापनेपासूनच हिंदी भाषेचा आग्रह धरलेला होता. त्यामुळे हिंदी भाषेचे आपल्यावर आक्रमण होते की काय अशी भीती  दक्षिणात्य भाषिकांमध्ये निर्माण झाली होती. परंतु पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी राजकीय शहाणपण दाखवत हिंदी भाषिक अहिंदी भाषिकांवर थोपवली जाणार नाही असे आश्वासित केले. परंतु हिंदी भाषा संपर्क भाषा म्हणून प्रस्थापित करण्यासाठी जनमानस तयार करण्याची आवश्यकता ही त्यांनी वेळोवेळी प्रतिपादन केली. इंदिरा गांधीच्या नंतर सत्तेवर आलेल्या राजीव गांधीनी सप्टेंबर १९८६मध्ये शासकीय अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी हिंदीतून करावी असे परिपत्रक काढले परंतु त्यास अहिंदी भाषिक राज्यातून तीव्र विरोध झाला. गृहमंत्री बुटाशिंग यांनी हे परीपत्रक मागे घेऊन हे चिघळणारे आंदोलन थांबवले. त्यानंतरच्या काळात व्ही.पी. सिंग, चंद्रशेखर यासारखे केंद्रीय नेतृत्त्व ही परंपरागत भूमिकाच पुढे नेते झाले. पी.व्ही. नरसिंहराव, एच.डी. देवेगौंडा, इंद्रकुमार गुजराल, अटलबिहारी वाजपेयी, मनमोहन सिंग ते नरेंद्र मोदीं पर्यंत एखाद दुसरा अपवाद वगळता हिंदी भाषेचा प्रश्न फारसा हातळलेला दिसत नाही. अटलबिहारी वाजपेयींच्या काळात हिंदी भाषेचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न झाला मात्र दक्षिणेतील राज्यांनी  त्यास तीव्र आरोप घेतला. तामिळनाडूचे तत्कालीन मुख्यमंत्री करूणानिधी यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया देतांना म्हटले होते, ''इंग्रजीची ढाल दूर केली तर हिंदी तलवार आपली खांडोळी करेल. या प्रतिक्रियेतून त्यांच्या विरोधाची धार लक्षात येते. एकंदरीत भाषेचा प्रश्न आता भाषेचा राहिला नसून त्यात सत्ता व राजकारण दडलेले असल्याकारणाने हिंदी राष्ट्रीय भाषा करण्याच्या यासंदर्भात  एकतर्फी निर्णय घेण्याचा विचारही केंद्रीय नेतृत्त्व करू शकत नाही हे निश्चित.

**भाषिक अल्पसंख्याक:**

भाषावावर प्रांतरचना हे स्वातंत्र्योत्तर काळातील हे एक महत्त्वाचे आंदोलन होते. एक भाषा एक राज्य हे गृहीत तत्त्व या भूमिकेला होते. त्याप्रमाणे तेलगू भाषिकांचे आंध्रप्रदेश हे राज्य भाषिक तत्त्वावर निर्माण झालेले पहिले घटकराज्य ठरले. अर्थात यामागे फार मोठा लढा व श्रीरामालल्लू सारख्या ज्येष्ठ गांधीवादी नेतृत्त्वाचे बलिदान होते. त्यानंतरच्या काळात भारताच्या राजकीय नकाशा भाषिक आधारावरच मोठ्या प्रमाणात आकाराला आला. असे असले तरीही भाषावार प्रांतरचनेच्या संदर्भात एक महत्त्वाची समस्या अशी होती की, भारतात विशुद्ध भाषिक राज्य म्हणजे जिथे एकच एक भाषा बोलली जाते असे एकही राज्य अस्तित्वात नाही. प्रत्येक राज्यात भाषिक अल्पसंख्याक वास्तव्य करून होते व आजही आहेत. दळणवळणाच्या साधनांच्या सोयीमुळे हे भाषिक अल्पसंख्याक देशभर अधिकच विखुरलेले आढळतात. केरळ या राज्यात भाषिक अल्पसंख्याकांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ०५ टक्के आहे तर आसाम प्रांतात हे सर्वाधिक म्हणजे ४४ टक्के आहे. सरासरी प्रत्येक घटकराज्यात अन्य भाषिक अल्पसंख्याकांचे प्रमाण हे १८ टक्केच्या जवळपास आढळते.

भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचे व त्या भाषेचे संरक्षण व्हावे याकरिता भारतीय राज्यघटनेत काही मूलभूत तरतूदी करण्यात आल्या आहेत. भारतीय राज्यघटनेच्या ३४७व्या कलमात यादृष्टीने असे नमूद करण्यात आले आहे की, जर एखाद्या राज्यातील लक्षणीय संख्याबळ असलेल्या एखाद्या अन्य भाषिक गटाने त्याच्या भाषेच्या वापरास राज्यास मान्यता द्यावी अशी मागणी राष्ट्रपतीस केली आणि राष्ट्रपतींना ही मागणी योग्य वाटली तर राष्ट्रपती त्या राज्यात सर्वत्र वा विशिष्ट भागात विशिष्ट प्रयोजनार्थ त्या भाषेला अधिकृत मान्यता मिळावी असे निर्देशित करू शकतो. त्याचबरोबर भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५०ने या संदर्भात पूरक तरतूद करतांना असे नमूद केले आहे की, 'शासनाकडे करावयाची तक्रार-गाऱ्हाणी देशात वा प्रदेशात प्रचलित असलेल्या कोणत्याही भाषेत करण्याची मुभा आहे. या कलमास १९५६ च्या सातव्या घटना दुरुस्ती कायद्याने अधिक बळकटी दिली आहे. या सातव्या विशोधनाने भाषिक अल्पसंख्याक समाजातील मुलांना मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण मिळण्याच्या पर्याप्त सोयी प्रत्येक राज्यशासनाने व राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाने देण्याचे अधिकार राष्ट्रपतींना प्रदान करण्यात आले आहेत. कलम ३५०(२९)नुसार भाषिक अल्पसंख्यांक समाजासाठी संविधानात जी विशेष संरक्षणे दिली आहेत त्यांच्याशी संबंधित सर्व बाबींचे अन्वेषण करून ठराविक कालावधीनंतर राष्ट्रपतींकडे त्यासंदर्भातील अहवाल पाठविण्याची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

अशा सर्व प्रकारच्या तरतुदी या भाषिक अल्पसंख्याकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यास पुरेशा वाटत असल्या तरी भाषिक आंदोलनातील उग्रता त्यांच्या मनात कायम असुरक्षिततेची भावना निर्माण करून गेली आहे हे मात्र निश्चित. ही असुरक्षितता त्या-त्या प्रातांमध्ये भाषिक अल्पसंख्याक समूह आजही अनुभवतात असे दिसते. भाषिक संक्रमणामुळे भाषिक अल्पसंख्यांक समूहांमध्ये न्यूनगंड व भयगंड एकाचवेळी जोपासला जातो. प्रादेशिक भाषा ज्या समुहाची आहे त्यांच्या स्पर्धेत आपण मागे पडणार, आपल्या मुलांना अधिक भाषा शिकाव्या लागणार मात्र आपली स्वतःची भाषा शिकावयास त्यास अवकाश मिळणार नाही याची तीव्र जाणीव त्यांना पोखरते. शिक्षण व नोकरीच्या संधीत ते बहुसंख्याक भाषिक समुहाच्या कोसो दूर मागे पडतात. कर्नाटकातील बेळगावमधील मराठी भाषिकांचा प्रश्न याचे ज्वलंत उदाहरण आहे. यावरील भाषिक अल्पसंख्याकांचा विचार समान तत्वाने राष्ट्रपातळीवर धोरण आखून करण्याची गरज आहे.

**राष्ट्रभाषा हिंदीचे स्वरूपः**

देवनागरी लिपीतील खरी बोली हिंदी ही भारताची राष्ट्रीय भाषा राहील अशी ग्वाही भारतीय संविधानाच्या ३४३ व्या कलमाने दिलेली असली व त्यास १५ वर्षाची कालमर्यादा ही निश्चित केलेली असली तरी आज ७० वर्षानंतरही हिंदी ही राष्ट्रभाषा राज्यकारभाराची व संपर्काची एकमेव अधिकृत भाषा म्हणून अधिकृत होऊ शकलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा होण्याकरिता हिंदी भाषेचा विकास योग्य पद्धतीने होणे व गैरहिंदी भाषिक समूहांनि तिचा स्वेच्छेने स्वीकार करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु हिंदी भाषेचे स्वघोषित कैवारी ज्या हिंदी भाषेचा आग्रह धरतात ती हिंदी भाषा राष्ट्रभाषा कधीच होऊ शकत नाही हे जवळपास निश्चित झालेले सत्य आहे. हा आग्रह राष्ट्रीय एकात्मतेपेक्षाही राष्ट्रविघटनास अधिक पुरक ठरेल ही वस्तुस्थिती आहे आणि ती मान्य करण्यातच शहाणपण आहे, असे असले तरी सर्वसामान्य लोक जी हिंदी भाषा बोलतात ती भारताची राष्ट्रभाषा होऊ शकते. या दृष्टीने डॉ. भा.ल. भोळे यांचे विवेचन महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात, ''भाषेच्या विकासाची गती काहीशी वाढवता येते पण अल्पमुदतीत एखादी भाषा विकसित करणे किंवा एका भाषेकडून दुसऱ्या भाषेकडे संक्रमण करणे अशक्य असते. भाषिक प्रश्नांचे गुंतागुंतीचे स्वरूप त्याला प्राप्त झालेला राजकीय आधार व भडकलेल्या भावना विचारात घेता न्याय्य व वस्तुनिष्ठ भाषाविषयक धोरणाची आवश्यकता असते. असे धोरण की ज्याद्वारे हिंदीच्या वापरास चालना मिळावी, संपर्क भाषा म्हणून इंग्रजीचे अध्यापन सुधारावे व प्रत्येक प्रादेशिक भाषेचा विकास व्हावा.''

**भाषा व प्रादेशिकताः**

राष्ट्रीय भाषेचा प्रश्न प्रादेशिकतेच्या भावनेस हातभार लावणारा ठरला यात दुमत असल्याचे काही कारण नाही. अर्थात यामागे त्या-त्या राज्यातील नेतृत्त्वाची राजकीय आकांक्षा हा घटक सर्वाधिक क्रियाशील होता हे निश्चित. या राजकीय आकांक्षेतूनच जनसमुहाच्या मनात हिंदी राष्ट्रीय भाषेविषयीचा भयगंड निर्माण करण्यात हे नेतृत्त्व यशस्वी झाले व त्यातून प्रदेश स्तरावर त्यांनी सत्तेच संस्थान निर्माण केले. हे सत्ता स्थान अबाधित राखण्याकरिता त्यांनी आपला हिंदी विरोध कायम राखला. गणराज्याच्या स्थापनेनंतर ७० वर्षे पूर्ण होऊन देखील हा प्रश्न सुटण्याची कोणतीही चिन्ह नाहीत. हिंदी विरोध काहिसा सौम्य झाला असला तरी हिंदी स्वीकाराची मानसिकता मात्र अद्यापही तयार झालेली नाही. केंद्रीय स्तरावरून हिंदी भाषा संपर्क भाषा करण्यासाठीचे प्रयत्न जवळपास मंदावलेले दिसतात. भाषिक तत्त्वावर प्रांतपुर्नरचनेचा अट्टाहास धरणाऱ्यांनाही या पुर्नरचनेतील दोष अनुभवास यावयास लागली आहेत. त्यातूनच नव्या राज्यांची मागणी विविध आधारांवर सातत्याने पुढे येत आहे. असे असले तरी आजही भारतभर भाषेचे आधारावर प्रादेशिकतेचे राजकारण तेजीत आहे. १९६०च्या दशकापासून तामिळनाडूमध्ये भाषिक राजकारण करणारे द्रमूक व अण्णाद्रमूक हे पक्ष आलटूनपालटून सत्तेत आहेत. त्याबरोबरच सिंमाध्र, तेलंगना, केरळ, त्रिपुरा, प.बंगाल, महाराष्ट्र, आसाम, हरियाणा, पंजाब, कर्नाटक, ईशान्य भारतातील राज्य यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रादेशिकतेच्या घटकांचे राजकारण करणारे प्रादेशिक राजककीय पक्ष सत्ता स्थानी आहेत, असे असले तरी या राजकीय शक्तींच्या भाषिक भूमिका पूर्वी एवढ्या ताठर स्वरूपाच्या राहिल्या नाहीत हे प्रत्ययास येते. आज अभिजनवर्गाची खास भाषा म्हणून इंग्रजीला प्रतिष्ठा आहे. सर्वात मोठ्या प्रमाणावर अगदी मतभेद गृहीत धरूनही सर्वाधिक बोलली जाणारी भाषा हिंदीच आहे. त्याचबरोबर राज्यांराज्यांची राजभाषा म्हणून तेथील प्रादेशिक भाषा झपाट्याने विकास पावत आहे.

एकंदरीत वरील विवेचनातून आपणास हे जाणवते की, बहुभाषिक राष्ट्रात प्रामुख्याने जेव्हा कोणत्याही एका भाषेला इतर भाषांपेक्षा गुणात्मक वा प्रमाणात्मकदृष्ट्या वरचढ करणे अशक्य असते तेव्हा एकाच भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून आग्रह धरल्यास भाषिक संघर्ष अटळ होतात. यातून मार्ग काढण्याकरिता सोय विवेक कार्यक्षमता यासारख्या तांत्रिक निकषांवरच थांबून चालत नाही तर त्याबरोबरीने अनेक राजकीय संदर्भही हाताळावे लागतात. त्यामुळेच कोणत्याही एका भाषेचा एकांगी कैवार घेण्यापेक्षा बहुलतावादी सहिष्णूताच भारतासारख्या देशाची राष्ट्रभाषेची समस्या राष्ट्रीय एकात्मतेला बाधा न येता सोडवू शकते. आज भारतातील कोणताही राजकीय पक्ष भाषेच्या संदर्भात एकांगी भूमिका घेत नाही ही यादृष्टीने स्वागतार्ह बाब मानावी लागेल.

## २) प्रांतपुनर्रचनाः

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकीय व्यवस्थेत राष्ट्रभाषेच्या प्रश्नपेक्षाही प्रांत पुनर्रचनेच्या प्रश्नाने दीर्घकाळ भारतीय राजकारणाचे अवकाश व्यापलेले आहे. ब्रिटिशांनी एतद्देशीय राजांकडून जसे प्रांत जिंकले तसे ते आपल्या साम्राज्यास जोडले. राज्यकारभारास सोयीस्कर भागच तेवढा त्यामध्ये पाहिला गेला परंतु ब्रिटिशकाळातील प्रांतरचनेमागे कोणताही धोरणात्मक व शास्त्रीय आधार नव्हता. स्वातंत्र्योत्तर काळात भाषिक आधारावर प्रांतपुनर्रचना व्हावी यासाठी दीर्घ व उग्र आंदोलन झाले. त्यातून भाषिक आधारावर प्रांतपुनर्रचना झालीही. मात्र त्यातून प्रश्न सुटण्याऐवजी ते वेगळ्या स्वरुपात पुढे आले. त्यामुळे आजही प्रांतपुनर्रचनेचा आग्रह वेगवेगळ्या निकषांवर धरला जातो. छोटी राज्य, स्वायत्त राज्य, सांस्कृतिक आधार असे अनेक नवे प्रवाह यात प्रभावी ठरतांना दिसतात. यादृष्टीने यासंदर्भातील काही प्रमुख घटकांचा आढावा आपणास पुढीलप्रमाणे घेता येईल.

### ब्रिटिश कालखंडातील राज्य यंत्रणेचे स्वरूपः

भारतीय राजकीय व्यवस्थेच्या आजच्या स्वरुपाचा विचार करतांना व राज्यपुनर्रचना तसेच नव्याने राज्यांच्या राजकारणात निर्माण झालेल्या प्रवाहांचे अवलोकन करताना ब्रिटिश कालखंडातील भारतीय राजकीय व्यवस्थेचे स्वरूप अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे. ब्रिटिश कालखंडात भारतात ६०० पेक्षा अधिक संस्थानिकांचं अस्तित्व नजरेत भरण्याइतपत प्रभावी होतं. ब्रिटीश कालखंडातच भारतात लोकशाही करणाची व राष्ट्रवादाची प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र त्याचे दोन भाग स्पष्टपणे दिसत होते. एक ब्रिटीश भारत होता याचे शासन ब्रिटिश राजाच्या वतीने प्रतिनिधी म्हणून गव्हर्नर जनरल करत होता तर दुसरा भाग हा भारतीय भारताचा होता ज्याचे प्रशासन लहान मोठे संस्थानिक राजे करत होते. त्यांना अंतर्गत प्रशासनाने पुरेशी स्वायत्तता होती.

ब्रिटीश कालखंडाचा विचार करतांना ब्रिटिश राज्यकर्त्यांचे संस्थानिकांसंदर्भात धोरण सातत्याने बदलले दिसते. त्याचे तीन भाग स्पष्टपणे दिसतात. एक १७९७ ते १८१३ च्या प्रारंभिच्या काळात ब्रिटीश राज्यकर्त्यांचे धोरण अहस्तक्षेप व तटस्थतेला प्राधान्य देणारे होते. दुसऱ्या टप्यात १८१३ ते १८५७ या कालखंडाचा समावेश करता येईल. या कालखंडातील ब्रिटिश राज्यकर्त्यांचे धोरण अधिनस्थ अलिप्तता (Subordinate Isolution) जोपासणारे होते. त्यानंतरच्या काळात ब्रिटिशांनी संस्थानिकाशी अंतर्गत स्वायत्तता देत सहकार्याने धोरण जोपासले.

**नरेंद्र मंडळ:**

ब्रिटिश सरकारने १९२१ साली नरेंद्र मंडळाची स्थापना केली. या नरेंद्र मंडळात एकूण १२० प्रतिनिधी होते. त्यापैकी १०८ प्रतिनिधी हे आपआपल्या संस्थानांचे स्वतंत्र प्रतिनिधी होते. १२७ संस्थानांना मिळून उर्वरित १२ प्रतिनिधी देण्यात आले. तर इतर ३२० संस्थानांना प्रतिनिधीत्व देण्यात आले नाही. नरेंद्र मंडळाची वर्षातून एक बैठक व्हॉईसरॉय यांच्या अध्यक्षतेखाली होईल असे निश्चित करण्यात आले. याशिवाय संस्थानिकांच्या प्रश्नांसंदर्भात दिल्ली येथे वर्षातून दोन ते तीन बैठका आयोजित केल्या जात असत. परंतु या नरेंद्र मंडळात देशातील महत्त्वाच्या संस्थांनानी कधीही भाग घेतला नाही परिणामी राज्याच्या एकीकरणाच्या दृष्टीने नरेंद्र मंडळ कोणतीही भरीव कामगिरी पार पाडू शकले नाही. लॉर्ड कॅनिंगने ही हे स्पष्ट केले होते की भारतातील ब्रिटिशांची सत्ता सर्वोच्च असून कोणत्याही संस्थानाला ब्रिटिश सरकारशी बरोबरीच्या नात्याने व्यवहार करता येणार नाही. त्यामुळे देशी संस्थानांचा राजनैतिक व संविधानिक दर्जा हा ब्रिटिश शासनाच्या सत्तेपेक्षा दुय्यमच होता. त्यामुळे नरेंद्र मंडळ यादृष्टीने कोणतेही भरीव कार्य करू शकले नाही. ते केवळ एक चर्चा करणारे, सल्ला देणारे व विचारविनिमय करणारे मंडळ ठरले.

**संघराज्य योजना:**

ब्रिटिश कालखंडात राज्यांच्या एकीकरणाच्या दृष्टीने १८५८ पासून अनेक कायदे करण्यात आले असले तरी १९९५ च्या कायद्याने तयार केलेली संघराज्याची योजना यादृष्टीने सर्वाधिक महत्त्वाची मानावी लागेल. नरेंद्र मंडळाच्या अपयशानंतर ही योजना अधिक महत्त्वाची ठरली. १९३० च्या पहिल्या गोलमेज परिषदेत अनेक संस्थानिकांनी संघराज्याच्या कल्पनेला पाठिंबा देत संघराज्यात सामील होण्याचे आश्वासन दिले होते. या योजनेत त्यामुळेच ब्रिटिशांच्या ताब्यातील संस्थाने व प्रांत सामील होतील असे गृहीत धरण्यात आले होते. त्यामुळे या दोहोंना समान दर्जा बहाल करणे आवश्यक होते मात्र १९३५ च्या कायद्याने बिटिशाच्या ताब्यात असलेले प्रांत व संस्थाने यांच्या दर्जात मोठी तफावत ठेवली. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

**१) संघराज्यात सामील होण्यासंदर्भात**

संभाव्य संघराज्यात सामील होण्यासंदर्भात ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रातांना सक्ती करण्यात आली मात्र संस्थानिकांना स्वनिर्णयाचा अधिकार बहाल करण्यात आला.

**२) प्रतिनिधित्वाच्या संदर्भातील भेद :**

लोकसंख्या व भूप्रदेश या बाबी विचारात न घेता संघराज्याच्या कायदेमंडळात संस्थानिकांना ब्रिटिश प्रांताच्या तुलनेत अधिक प्रतिनिधीत्व दिले गेले. उदा. हाऊस ऑफ असेंब्लीमध्ये संस्थानांना १२५ तर ब्रिटिश प्रातांना २५० जागा देण्यात आल्या होत्या. तर कौन्सिल ऑफ स्टेटसमध्ये संस्थानांना १०४ तर ब्रिटिश प्रातांना १५६ जागा दिल्या गेल्या.

**३) प्रतिनिधित्वाच्या पद्धती :**

या योजनेने केंद्रीय कायदेमंडळावर प्रतिनिधीत्व देतांनाही पक्षपाती दृष्टिकोन ठेवला होता हे निदर्शनास येते. त्याबरोरबरच या योजनेने प्रतिनिधी पाठविण्याच्या पद्धतीतही भेद ठेवला होता. ब्रिटिश प्रांतातून पाठवावयाचे प्रतिनिधी जन-निर्वाचित तर संस्थांनातून पाठवावयाचे प्रतिनिधींची नियुक्ती संस्थानिकांनी करावयाची होती.

### ४) नियंत्रणासंदर्भातील फरक :

या योजनेने ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रातांच्या संदर्भात संघसरकारचे नियंत्रण सर्व स्तरावर एकसमान ठेवण्यात आले होते तर संस्थानांच्या संदर्भात मात्र संस्थानपरत्वे भिन्नता ठेवण्यात आली होती. संघराज्यात सामील होताना त्या-त्या संदर्भात ज्या बाबींवर मान्यता दिली असेल तेवढ्यापुरतेच संघसरकारचे नियंत्रण असेल असे निश्चित करण्यात आले होते.

या सर्व दोषांमुळे ही संघराज्याची योजना स्वीकारार्ह नव्हती. ही संघराज्य योजना प्रत्यक्षात अंमलात आली नाही त्यामुळे राज्याच्या एकीकरणाची प्रक्रिया ही पूर्ण झाली नाही.

### भारतीय स्वातंत्र्य कायदा :

४ जुलै १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा संमत झाला. हा कायदा घटकराज्यांच्या एकीकरणाच्या प्रवासातील तिसरा टप्पा मानला जातो. तत्पूर्वी १२ मे १९४६ रोजी कॅबिनेटे मिशनने जाहीर केले होते की, ''कोणत्याही परिस्थितीत संस्थानांच्या संदर्भात विद्यमान भारत सरकारकडे असलेले सर्वश्रेष्ठत्व नव्याने निर्माण होणाऱ्या भारत सरकारकडे सोपविले जाणार नाही. ब्रिटिश सरकारने आपला दुष्ट हेतू १९४७ च्या स्वतंत्रता कायद्यातील कलम ७(१) मध्ये दाखवून देतांना नमूद केले आहे की, ''On an appointed date th suzerainty of his maiesty over the Indian Native state lapses and with it all treaties and agreements in force at the date of passins of this act between his majesty and the furlers of Indian state.''त्यामुळे स्वातंत्र्याच्या वेळी भारत-पाकिस्तान यापैकी कोणत्या राष्ट्रात सामील व्हायचे की स्वतंत्रच राहायचे याची मुभा संस्थानिकांना मिळाली. त्यामुळे आपले स्वातंत्र्य घोषित करण्याची नामी संधी म्हणूनच संस्थानिकांनी या कायद्याकडे पाहिले. एकंदरीत १९४७चा भारतीय स्वातंत्र्याचा कायदा घटकराज्यांच्या एकीकरणाच्या दृष्टीने अतिशय घातक ठरला.

### काँग्रेसची भूमिका :

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्त्व व प्रथम सरकारचे नेतृत्त्व या दोन्ही भूमिकेतून भारतीय घटकराज्यांच्या एकीकरणाच्या आव्हानाचा सामना काँग्रेसला करावा लागला. यादृष्टीने काँग्रेसची व त्यांनी स्थापन केलेल्या सरकारची यासंदर्भातील भूमिका जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. १९१८च्या नागपूर अधिवेशनातच काँग्रेसने यादृष्टीने आपला दृष्टिकोन स्पष्ट करून भारताचे २१ प्रांत कल्पिले होते. संस्थानांचा समावेश ही नजिकच्या प्रातांमध्ये करण्यात आला होता. त्यानंतर काँग्रेसची राज्यनिहाय कमिटी गठीत करतांना त्यांनी प्रांतरचना गृहीत धरलेली दिसते. यादृष्टीने १९३६ चे हरिपुरा अधिवेशन महत्वाचे मानावे लागेल. या अधिवेशनात काँग्रेसने एक ठराव संमत करून जाहीर केले की, ''काँग्रेस पक्ष भारताप्रमाणेच भारतीय संस्थांनाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्याचे समर्थन करते. तसेच संस्थाने भारताचे अभिन्न अंग आहेत व त्यांना अलग केले जाऊ शकत नाही. पूर्ण स्वराज्य अथवा पूर्ण स्वातंत्र्याचा अर्थ काँग्रेसचे ध्येय भारतीय संस्थानांसहित संपूर्ण भारताशी संबंधित आहे. पारतंत्र्यात भारताने ज्या एकता व अखंडतेसाठी प्रयत्न केले त्यास स्वातंत्र्यानंतरही कायम ठेवले जाईल. काँग्रेसला असाच संघ स्वीकार्य आहे की ज्यात भारतीय संस्थानांनी स्वतंत्र घटकाचे स्वरूपात कार्य करावे व शेष भारताप्रमाणेच समान लोकशाही स्वातंत्र्याचा उपयोग करावा.'' याच प्रस्तावात काँग्रेसने हेही स्पष्ट केले होते की, ''अखिल भारतीय काँग्रेसने समिती भारतातील कोणत्याही संस्थानांच्या स्वातंत्र्याच्या घोषणेला व शेष भारतापासून अलग राहण्याच्या मागणीला मान्यता

देणार नाही. ही मागणी भारतीय इतिहास व भारतीय जनतेचे भविष्यातील ध्येय यांची अवहेलना मानली जाईल.''

काँग्रेसने यापुढील काळात ब्रिटीश राज्यकर्त्यांचा सर्वोच्च अधिसत्तेचा सिद्धांत नाकारून सर्वोच्च अधिसत्तेच्या नावाखाली ब्रिटिश राज्यकर्ते निर्माण करत असलेली पृथकता फेटाळून लावली. यासंदर्भात पं. जवाहरलाल नेहरू यांनी भूमिका स्पष्ट करतांना जाहीर केले की, ''भारतीय संस्थांनाची मागणी कदापी स्वीकारली जाऊ शकत नाही. भौगोलिक, ऐतिहासिक व सुरक्षात्मक तसेच अन्य कारणांमुळे सर्वोच्च सत्ता भारत सरकारचीच राहील. अशा परिस्थितीत संस्थांनासमोर केवळ दोनच पर्याय उपलब्ध आहेत ते म्हणजे त्यांनी भारतात सामील व्हावे व समान व स्वायत्त भागीदार व्हावे अथवा भारतीय संघाची सर्वोच्च सत्ता स्वीकारावी. त्यांच्यासमोर तिसरा कोणताही मार्ग नाही.'' यापुढे बोलतांना पं. नेहरू म्हणाले हो, ''मी सांगू इच्छितो व अन्य देशांनी समजून घ्यावे की आम्ही भारतीय संस्थानांच्या स्वातंत्र्याला मान्यता देणार नाही व एखाद्या परकीय शक्तीने अशा स्वातंत्र्याला मान्यता दिल्यास ती शत्रूत्वपूर्ण कृती मानली जाईल.''

काँग्रेसच्या या भूमिकेला अनुसरून अंतरीम सरकारने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्त्वाखाली ५ जुलै १९४७ रोजी राज्य मंत्रालय स्थापन केले. या मंत्रालयाच्या सचिवपदी श्री.व्ही.पी. मेनन यांची नियुक्ती करण्यात आली. संस्थांनासाठी सामीलनाम्याच्या पत्राचा मसुदा तयार करण्यात आला. त्यात संरक्षण, विदेशनीती व दळणवळण हे विषय अपवाद करून संस्थांनिकांच्या स्वायत्ततेचा सन्मान ठेवण्यात आला होता. पुढे १५ जुलै १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या अध्यक्षतेखाली नरेंद्र मंडळाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत कराराचा मसुदा तयार करण्यासाठी एक उपसमिती गठीत करण्याच व यासमितीने भारत सरकारच्या सल्ल्याने पूर्वमान्य करार व सामीलनाम्याची रूपरेषा तयार करण्याचे निश्चित झाले. या उपसमितीने तयार केलेल्या सामील नाम्यावर १५ ऑगस्ट १९४७ रोजी काश्मीर, जुनागढ व हैद्राबाद वगळता इतर सर्व संस्थानिकांनी स्वाक्षरी केली. या सर्व प्रक्रियेत सरदार पटेल यांची भूमिका अतिशय महत्त्वाची होती. लॉर्ड माऊंटबॅटन यांनी याकामी सरदार पटेलांची मुक्तकंठाने प्रशंसा केली. माइकल ब्रेचर यांनी या एकीकरणाच्या प्रक्रियेस 'महान रक्तहीन क्रांती' असे संबोधन वापरले.

**स्वातंत्र्योत्तर कालखंड :**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी काश्मिर, जुनागढ व हैद्राबाद या संस्थांनानी सामील नाम्यावर स्वाक्षरी न केल्याने व स्वतंत्र राहण्याचा निर्णय जाहीर केल्याने स्वतंत्र भारत सरकार समोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. परंतु संस्थानातील प्रजेचा रेटा व आंदोलन तसेच सरदार पटेल यांनी घेतलेली कठोर भूमिका या माध्यमातून या संस्थानांवर लष्करी कारवाई करून ही संस्थाने भारतीय संघराज्यास जोडण्यात आली. १ नोव्हेंबर १९४७ ला हैद्राबाद संस्थान, ९ नोव्हेंबरला जुनागढ संस्थान भारतात सामील करण्यात आले. काश्मीरवर टोळ्यांच्या आडून पाकिस्तानने आक्रमण केल्यामुळे व काश्मीरचा काही भाग पाकिस्तानने आपल्या ताब्यात घेतल्यामुळे १९४८मध्ये भारत-पाक पहिल्या युद्धाची ठिणगी पडली. काश्मीर संस्थानचे राजे हरिसिंग यांनी भारतात सामील होषण्याच्या सामीलनाम्यावर स्वाक्षरी केली. पुढे हा प्रश्न भारताने युनोत मांडला मात्र अद्यापही पाकिस्तानने ताब्यात घेतलेला काश्मीर आझाद काश्मीर या नावाने पाकिस्तानच्याच ताब्यात आहे.

**संस्थानांचे विलीनीकरण व लोकशाहीकरण :**

संस्थानाचे विलिनीकरण भारतीय संघराज्याची तातडीची गरज होती, परंतु ही या प्रश्नाची कायम सोडवणूक नसून ती तात्पुरती व्यवस्था आहे याची स्पष्ट जाणीव स्वतंत्र भारताच्या नेतृत्त्वास होती. त्यामुळे या संस्थानांचे लोकशाहीकरण करण्याची प्रक्रिया गतिमान करणे त्यांना आवश्यक वाटत होते त्यादृष्टीने भारत सरकारने पुढील पावले उचलली जी भारतीय संघराज्याचे संकलीकरण व लोकशाहीकरण करण्यात महत्त्वाची ठरली.

**१) लहान संस्थानांचे नजीकच्या राज्यात विलीनीकरण :**

जी संस्थाने आकाराने व लोकसंख्येने लहान आहेत अशी संस्थाने नजीकच्या प्रांतास जोडण्यास भारत सरकारने सुरुवातीस प्राधान्य दिले. त्याप्रमाणे ज्यांची लोकसंख्या ७० लाख व एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ५६ हजार चौ. मैल होते अशा ३९ संस्थानांचे विलीनीकरण करून त्यांचा समावेश ओरीसा व मध्यप्रदेश या प्रातांमध्ये करण्यात आला. मार्च १९४८ मध्ये दक्षिणेतील १७ संस्थानांचे मुंबई प्रांतात विलीनीकरण करण्यात आले तर जून १९४८ मध्ये गुजरातमधील २८९ संस्थाने १ मे १९४९ मध्ये बडोदा संस्थान मुंबई प्रांतात विलीन करण्यात आले. १९४८-४९ या कालावधीत पंजाब परिसरातील संस्थाने पंजाब प्रातांत सामील करण्यात आली. कुचबिहार हे संस्थान प.बंगाल मध्ये सामील झाले तर आसाममध्ये ग्वांसी पहाडीचा व टिहरी गढवाल चा समावेश करण्यात आला. उत्तरप्रदेशातही रामपुरसारख्या छोट्या संस्थांनाना सामील करण्यात आले.

**२) संयुक्त संस्थानांची निर्मिती :**

संयुक्त संस्थानांची निर्मिती करताना भौगोलिक, भाषिक, सामाजिक व सांस्कृतिक संबंधाच्या तत्त्वास प्राधान्य देण्यात आलेर. यातील काही प्रमुख संस्थानांची निर्मिती याची साक्ष देते. सौराष्ट्र संयुक्त संस्थानाची निर्मिती १५ फेब्रुवारी १९४८ रोजी करण्यात आली. यात एकून २२२ संस्थाने सामील करण्यात आली असली तरी नवानगर व भावनगर ही यातली प्रमुख संस्थाने होति. १८मार्च १९४८ रोजी 'मत्स' हे संयुक्त संस्थान तयार करून यात अलवार व भरतपूर या संस्थांनाबरोबर अन्य छोट्या संस्थानांचा समावेश करण्यात आला. २८ मार्च १९४८ रोजी मध्य भारताची निर्मिती करण्यात आली. त्यात मुख्यत्वे इंदूर, ग्वाल्हेर व मालवा या संस्थानांचा समावेश होतो. पेफ्सू (PEPSU - The Patiyala and East Panjab States Union) हे राज्य २० ऑगस्ट १९४८ रोजी निर्माण करण्यात आले यात पतियाला, नाभा व आगरतळा सहीत सात संस्थानांचा समावेश करण्यात आला होता. तर राजस्थान राज्याची निर्मिती ही तीन टप्प्यांमध्ये करण्यात आली. प्रथम टप्प्यात मेवाड व राजपुतान्यातील संस्थानांचे त्यात सामिलीकरण करून राजस्थान हे राज्य स्थापन करण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात जयपूर, बिकानेर, जोधपूर व जईस्लामपूर या संस्थानांचे राजस्थान राज्यात सामिलीकरण करण्यात आले. १५ मे १९४९ रोजी मत्स व राजस्थान यांचे एकत्रीकरण करण्यात आले. श्रावणकोर-कोचीन हे संस्थान १ जुलै १९४९ रोजी अस्तित्वात आले.

**३) केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती:**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संस्थानांचे सामिलीकरण करताना भारत सरकारने काही संस्थानांचे केंद्रशासित प्रदेशात रुपांतरण केले. हिमाचल प्रदेश, विंध्य प्रदेश, बिलासपूर, भोपाळ, त्रिपुरा व मणिपूर यांचा यात प्रामुख्याने समावेश करता येईल. पूर्व पंजाबातील १० लाख

लोकसंख्या व १० हजार ६०० चौ. मैल भूप्रदेश असणाऱ्या २१ संस्थांनाचा मिळून हिमाचल प्रदेश हा केंद्रशासित प्रदेश १५ एप्रिल १९४९ रोजी अस्तित्वात आला. बुंदेलखंड व बघेलखंडातील ३५ संस्थानांचे मिळून विंध्यप्रदेश हे राज्य निर्माण करून १ जानेवारी १९५० रोजी त्यास केंद्रशासित घोषित केले. बिलासपूर संस्थानचा कारभार केंद्राने १२ ऑक्टोबर १९४८ रोजी आपल्या हाती घेतला तर १ जून १९४९ रोजी भोपाळ व १५ ऑक्टोबर १९४९ रोजी त्रिपुरा यांना केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेश म्हणून जाहीर केले.

**४) मोठ्या संस्थानांचे संघराज्यात सामिलीकरण:**

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी काही संस्थानांचे स्वरूप लोकसंख्या व भौगोलिक विस्तार अशा दोन्ही दृष्टीने विशाल होते. अशा संस्थानांचे भारत सरकारने सरळ भारतीय संघराज्यात सामिलीकरण करून घेतले. हैद्राबाद, म्हैसूर, जम्मू व काश्मिर यांचे उत्तम उदाहरण होय.

**एकीकरण व लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभाव:**

स्वातंत्र्योत्तर काळात स्वतंत्र भारत सरकारने अगदी प्रारंभीचा संस्थानांच्या एकीकरण व लोकशाहीकरणाची प्रक्रिया वरील चार मार्गांनी घडवून आणली. त्याचा स्वतंत्र भारताच्या राष्ट्र उभारणीच्या दृष्टिने फार मोठा प्रभाव राहिला. त्याची संक्षिप्त मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल.

१) देशातील संस्थानांची संख्या ६०० पेक्षा अधिक होती. ती कमी होऊन १६पर्यंत सिमीत झाली.

२) संस्थानातील नागरीक व इतर भारतातील नागरीक यांचा दर्जा समान झाला तो पुढे एकेरी नागरीकत्वाच्या दृष्टीने उपयुक्त ठरला.

३) संस्थानाची जनतेस देशाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागाची संधी उपलब्ध झाली.

४) या एकीकरणाच्या प्रक्रियेने संविधानकारांचे काम सोपे झाले व या प्रांतांची परिशिष्टात वर्गवारी करणे सोयीचे झाले.

**भारतीय राज्यघटनेतील पहिले परिशिष्ट:**

भारतीय राज्यघटना अंमलात आली त्या दिवशी अस्तित्वात असलेली राज्य

| **'अ' वर्ग** | **'ब' वर्ग** | **'क' वर्ग** | **'ड' वर्ग** |
|---|---|---|---|
| १) आसाम | १) हैद्राबाद | १) अजमेर | अंदमान निकोबार |
| २) बिहार | २) जम्मू-काश्मीर | २) भोपाळ | |
| ३) मुंबई | ३) मध्य भारत | ३) बिलासपूर | |
| ४) मध्यप्रदेश | ४) म्हैसूर | ४) कुचबिहार | |
| ५) मद्रास | ५) पेप्सू | ५) कुर्ग | |
| ६) ओरिसा | ६) राजस्थान | ६) दिल्ली | |
| ७) पंजाब | ७) सौराष्ट्र | ७) हिमाचल प्रदेश | |
| ८) उ. प्रदेश | ८) त्रावणकोर कोचीन | ८) कच्छ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९) प. बंगाल | ९) विंध्य प्रदेश | ९) मणिपूर | |
| | | १०) त्रिपुरा | |

अशा पद्धतीने भारतीय संविधानकारांनी राज्यघटनेतील पहिले परिशिष्ट तयार करताना घटकराज्यांची जी यादी तयार केली त्यात जुन्या ब्रिटिश प्रातांना 'अ' वर्ग देण्यात आला. देशी संस्थाने व त्यांची संयुक्त संस्थाने यांना राजप्रमुखाच्या नेतृत्त्वात 'ब' वर्ग देण्यात आला. केंद्रशासित प्रदेशांना 'क' वर्ग देण्यात आला.

**संविधान व राज्यांचा संघ :**

भारतीय संविधानकारांनी अमेरिकन-संविधानाच्या प्रभावातून स्वतंत्र भारतासाठी संघराज्यात्मक व्यवस्थेचा स्वीकार केला. मात्र संघराज्यात्म व्यवस्थेकरिता प्रचलित असलेला Federation हा शब्द वापरण्याऐवजी संविधानकारांनी त्यासाठी Union of State हा शब्दप्रयोग योजला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या शब्दयोजनेमागील कारणमीमांसा अतिशय स्पष्ट शब्दांत मांडताना त्याचीदोन भूमिकेतून मांडणी केली आहे. एक म्हणजे या शब्दयोजनेने हे स्पष्ट व्हावयास हवे की भारत संघराज्य करारातून निर्माण झालेले नाही. आजपर्यंत जगात अस्तित्वात आलेली बहुतांश संघराज्य ही दोन किंवा अनेक स्वतंत्र राज्यांच्या एकीकरणातून निर्माण झालेली आहेत. उदा. अमेरिकेचे संघराज्य हे प्रारंभी १५ राज्यांच्या एकीकरणातून निर्माण झाले होते. त्यानंतर इतर काही राज्य त्यात स्वच्छेने सामील होत ती संख्या ५० पर्यंत पोहचली. यालाच संघराज्याच्या परिभाषेत एकीकरण व केंद्राकृषी प्रवृत्ती (Centripetal Tendency) म्हटले जाते. मात्र भारतीय संघराज्य निर्माण होतांना त्यात समाविष्ट करावयाचे घटकराज्य स्वतंत्र राज्याच्या दर्जाचे नव्हते. त्याचबरोबर या शब्दयोजनेतून हेही स्पष्ट होते की भारतीय संघराज्यातून बाहेर पडण्याचा अधिकार कोणत्याही घटकराज्यास नाही. त्यामुळे भारतीय संघराज्याचे एकात्म स्वरूप अधिक स्पष्ट होते.

भारतीय संविधानातील पहिल्या कलमात भारत हा एक राज्यांचा संघ (Union of States) असा उल्लेख करण्यात आला असून त्यास पूरक अशा तरतूदी पुढे दुसऱ्या व तिसऱ्या कलमात करण्यात आल्या आहेत. भारतीय राज्यघटनेच्या दुसऱ्या कलमाने भारतीय संसदेला कायदा करून आपल्याला योग्य वाटतील अशा अटींवर आपल्या संघात नवीन राज्य समाविष्ट करण्यासंदर्भात वा त्या स्थापना करण्याबाबत अधिकार देण्यात आला आहे. तर तिसऱ्या कलमाने संसद कायदा करून एखाद्या राज्यातील प्रदेश विभक्त करून अथवा दोन किंवा अधिक राज्ये किंवा राज्यांचे विभाजन एकत्र करून अथवा राज्याच्या विभागाला एखादा प्रदेश जोडून नवीन राज्य बनविण्याचा कोणत्याही राज्याचे क्षेत्र वाढविण्याचा कोणत्याही राज्याचे क्षेत्र कमी करण्याचा, कोणत्याही राज्याच्या सीमा बदलण्याचा व कोणत्याही राज्याचे नाव बदलण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. १९५५ साली संमत झालेल्या ५ व्या घटना दुरूस्तीने यात भर टाकण्यात आली आहे. या घटना दुरूस्तीनुसार ''वरील उद्दिष्टांपैकी कोणाशीही संबंधीत विधेयक संसदेत राष्ट्रपताच्या शिफारशीशिवाय मांडता येत नाही. तसेच विधेयकाशी संबंधित राज्याचे विशिष्ट मुदतीत मत व्यक्त होईपर्यंत विधेयक मांडता येत नाही.''

एकंदरीत भारतीय संविधानकारांनी संघराज्यात्मक शासनव्यवस्थेचे एकात्म स्वरूप स्पष्ट करत घटकराज्यांची रचना करण्याची जबाबदारी संसदेवर सोपवली. भारतीय संविधानाने संघराज्याची निर्मिती करत केंद्र व घटक राज्य यात अधिकारांची विभागणी ही केली. परंतु स्वायत्त

अधिकारांच्या आधारे स्थायी स्वरूपात राज्यनिर्मिती संविधानकारांनी केली नाही हे वास्तव आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस भाषिक आधारावर राज्यांची रचना करण्यास अनुकूल होती मात्र स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या फाळणी व तत्सम अनुभवातून त्यांची पद प्रति असणारी बांधिलकी क्षीण झाली व त्यातूनच स्वतंत्र भारतातील भाषावार प्रांतरचनेचा प्रदीर्घ लढा आकाराला आला. ज्याने भारतीय राजकारणाला प्रादेशिकतेच्या रंगात न्हाऊ घातले असे म्हणता येईल.

**भाषावर प्रांतपुनर्रचना :**

स्वातंत्र्योत्तर काळात भाषावार प्रांतपुनर्रचना करण्यास चालढकल केली जात आहे हे सामान्य जनतेच्या लक्षात आल्यानंतर जनआंदोलनाचा रेटा वाढला त्यातूनच या आंदोलनास प्रसिसाद म्हणून भारतीय राज्यकर्त्यांकडून जो प्रतिसाद मिळाला त्याची मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) दार कमिशन :**

स्वातंत्र्योत्तर काळात भाषावार प्रांतरचनेबाबत घटना समितीस सल्ला देण्याकरिता १९४८मध्ये अलहाबाद उच्च न्यायायलयाचे न्या. एस.के. दार यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची स्थापना करण्यात आली. १० डिसेंबर १९४८ रोजी या आयोगाने आपला अहवाल सादर केला. या समितीने आपल्या अहवालात भाषिक प्रांतरचनेला तीव्र शब्दात विरोध केला. या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते की, ''भाषावार राज्यरचना संकुचित राष्ट्रावादाला प्रोत्साहन देणारी ठरेल आणि त्यामुळे राष्ट्रीय एकतेला धोका निर्माण होईल. तसेच या भाषिक राज्यात अन्य भाषिक अल्पसंख्याकांचा प्रश्न निर्माण होईल.'' या आयोगाने आपल्या शिफारशींमध्ये राज्यपुनर्रचना करतांना भाषा या घटकाऐवजी प्रशासकीय सोय, भौगोलिकस्थान, इतिहास, सांस्कृतिक वारसा व अस्मिता आर्थिक घटक या बाबींना अधिक प्राधान्य दिले. मात्र या आयोगाच्या शिफारशीविरोधात देशभर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या व भाषावार प्रांतरचनेच्या आंदोलनास खऱ्या अर्थाने गती प्राप्त झाली.

**जे.व्ही.पी. समिती :**

दार कमिशनने दिलेल्या नकारात्मक अहवालामुळे देशभर भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांनी आंदोलनास सुरुवात केली. या जनमताची दखल घेऊन काँग्रेस जयपुरच्या अधिवेशनात या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभी सितारामच्या यांची समिती नेमली. या समितीस जे.व्ही.पी. समिती या नावाने ओळखली जाते. या समितीने आपला अहवाल १ एप्रिल १९४९ रोजी सादर केला. या समितीने ही दार आयोगाच्या शिफारशींचा पुनरुच्चार केला. सरदार पटेलांनी तर भाषिक पुनर्रचनेस Assossination of nationalism (राष्ट्रवादाचा खून) या शब्दात व्यक्त केले होते. या दरम्यान काँग्रेसच्या सर्वच वरीष्ठ नेत्यांचा भाषिक पुनर्रचनेस विरोध होता. गोविंद वल्लभपंत यांनी भाषिक आधारावर पुनर्रचनेस विरोध करतांना त्यास Decemt Burial (सुंदर थडगे) असा शब्द वापरला तर सी. राजगोपालचारी यांनी किमान पुढील २५ वर्ष तरी अशा पद्धतींची राज्यपुनर्रचना करू नये अशी विनंती जवाहरलाल नेहरूंकडे केली होती. पुढे ७ मार्च १९७०च्या स्वराज्याच्या लेखात यासंदर्भातील आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करतांना ते म्हणतात,

" Every major error lead to chain of difficulties the greatest mistake after the attainment of independece, a mistake that theratens to under our worthy amitions was reorganisation of states on the basis

of language. The establisment of such states, he asserted had created a vested political intrest in discord & division."

काँग्रेसमधील सर्व नेते भाषिक पुनर्रचनेस प्रतिकूल असले तरी जनमताचा रेटा मोठा होता. मद्रास राज्यात तेलगू भाषिकांच्या आंदोलनाने अधिकच उग्र स्वरूप धारण केले होते, श्रीरामाल्लू या वरिष्ठ काँग्रेस नेत्यांचा उपोषणादरम्यान मृत्यू झाला त्यामुळे या आंदोलनास हिंसक वळण लागले. या परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेऊन न्या. वांछू कमिशन परिस्थितीचे अवलोकन करण्यासाठी नियुक्त करण्यात आले व शेवटी ऑक्टोबर १९५३ रोजी भाषेवर आधारीत तेलगू भाषिकांचे आंध्रप्रदेश हे देशातील पहिले राज्य निर्माण झाले. या राज्याच्या निर्मितीने भाषावार प्रांतरचनेच्या आंदोलनास अधिकच बळ मिळाले.

**राज्यपुनर्रचना आयोग:**

भाषावार प्रांतरचनेच्या आंदोलनाची व्यापकता व तीव्रता लक्षात घेऊन प. जवाहरलाल नेहरूंनी आपल्या मूळ भूमिकेत बदल करून २२ डिसेंबर १९५३ रोजी संसदेत निवेदन करून राज्यपुनर्रचना आयोगाची स्थापना करत असल्याचे जाहीर केले. या त्रिसदस्यीय आयोगाचे अध्यक्ष म्हणून न्या. फाजल अली यांची नियुक्ती करण्यात आली तर पं. हृदयनाथ कुंझरू व के. एम. पण्णीकर यांची सदस्य म्हणून नेमणूक झाली. २९ डिसेंबर १९५३ रोजि हा आयोग अस्तित्वात आला व ३० सप्टेंबर १९५५ रोजी आयोगाने आपला अहवाल सादर केला.

या आयोगाने राष्ट्रीय एकात्मता व प्रादेशिक भावना यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. या आयोगाने एका भाषेचे एक राज्य या तत्वास सरसकट मान्यता नाकारतांनाच 'भाषिक सलगतेच्या तत्त्वास प्राधान्य दिले. राज्यपुर्नरचना करतांना भाषिक सलगतेबरोबरीनेच राष्ट्रीय एकता, प्रशासकीय सोयी, आर्थिक स्थिती, वित्तीय व्यवहार्यता, आर्थिक विकास व अल्पसंख्याकांचे संरक्षण यांना आधारभूत मानले. राज्यपुनर्रचना आयोगाने घटकराज्यांचे अ,ब,क,ड हे वर्गीकरण रद्द करण्यात यावे आणि १६ घटकराज्ये व ३ केंद्रशासित प्रदेश असे नवे प्रकार केले जावेत ही मुख्य शिफारस भारत सरकारला केली. भारत सरकारने या आयोगाच्या शिफारशींवर संसदेत सविस्तर चर्चा करून आवश्यक त्या सुचनांचा स्वीकार करत ११ ऑगस्ट १९५६ रोजी संसदेने राज्यपुनर्रचना विधेयकाला मंजुरी दिली. ३१ ऑगस्ट १९५६ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळून त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. त्यानुसार १ नोव्हेंबर १९५६ रोजी पुढील घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी संविधानात काही दुरुस्त्या ही करण्यात आल्या.

भारतीय राज्यघटनेत दुरुस्ती करून ब्रिटिश व देशीराज्ये यात जी अ क ड वर्गवारी होती ती नष्ट करण्यात आलि व सर्व राज्यांना समान दर्जा प्राप्त झाला. राज्यांची संख्या १४ पर्यंत कमी करून ६ केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती करण्यात आली. भारताची विभागणी एकूण पाच विभागात करण्यात आली. या प्रत्येक झोनला एक 'झोनल कौन्सिल' नेमण्यात आले. या दुरुस्तीने राज्यप्रमुखाचे पद विसर्जित करण्यात आले. या कायद्याने अस्तित्वात आलेले कायदे पुढील तक्त्याच्या सहाय्याने स्पष्ट करता येतील.

**राज्यपुनर्रचनेनंतरची राज्ये व केंद्रशासित प्रदेश**

| **घटकराज्य** | **केंद्रशासित प्रदेश** |
|---|---|
| १) आंध्रप्रदेश | १) दिल्ली |

| | |
|---|---|
| २) आसाम | २) हिमाचल प्रदेश |
| ३) बिहार | ३) मणिपूर |
| ४) मुंबई | ४) त्रिपुरा |
| ५) जम्मू व काश्मिर | ५) अंदमान निकोबार दिवी |
| ६) केरळ | ६) लक्षद्वीप मिनिकॉच |
| ७) मध्यप्रदेश | |
| ८) मद्रास | |
| ९) म्हैसूर | |
| १०) ओरीसा | |
| ११) पंजाब | |
| १२) राजस्थान | |
| १३) उ. प्रदेश | |
| १४) प. बंगाल | |

**राज्यपुनर्रचनेनंतरच्या काळातील नवीन राज्यांची निर्मिती:**

राज्यपुनर्रचना ही जनआंदोलनाच्या रेट्यातून आकाराला होती. भाषावार प्रांतरचना हे आधारभूत तत्व यामागे होते. त्यामुळे प्रादेशिक असमतोल अस्मितांची भिन्नता व उपसांस्कृतिक भावना यासारख्या भावनांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाले. केंद्रीय नेतृत्त्वाचे राजकारणही यामागे होते. या सर्वाचा परिपाक म्हणून राज्यपुनर्रचनेच्या नंतरही स्वतंत्र राज्यांची मागणी सातत्याने भारतीय राजकारणात कायम राहिलेली दिसते. याचा प्रारंभ महाद्विभाषिक राज्याच्या विभाजनातून प्रामुख्याने झाला. मराठी भाषिकांची मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी भारत सरकारला मान्य करावी लागली व १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. गुजरात हे राज्य ही याबरोबरीने नव्याने निर्माण करण्यात आले. त्यानंतर ही राज्यनिर्मितीचा ओघ थांबलेला नाही. राज्यांच्या निर्मितीचा आढावा संक्षिप्त स्वरुपात पुढील तक्त्याच्या सहाय्याने घेता येईल.

**राज्यनिर्मितीचे वर्ष व नावाचा अर्थ:**

| अ.क्र | राज्य/केंद्र शासित प्रदेश | पूर्णराज्य दर्जा प्राप्तीचे वर्ष | राज्याचा नावाचा अर्थ |
|---|---|---|---|
| १. | अरुणाचल प्रदेश | २० फेब्रुवारी १९८७ | उषःकालीन प्रकाश देणाऱ्या पर्वताचा प्रदेश |
| २. | आसाम | राज्यपुनर्रचना १९५६ आधारे | पहाडी व घाटी यामुळे जमीन समतल नाही. अर्थात अ-सम = जो समान नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | आंध्रप्रदेश | १ ऑक्टोबर १९५०ला निर्मिती १ नोव्हें.१९५६ला अस्तित्वात आले. | आंध्र : तेलगू भाषिकांच्या संदर्भात वापरला जातो. |
| ४. | ओरीसा | १९ ऑगस्ट १९४९ | उडिया लोकांची भूमी |
| ५. | उत्तर प्रदेश | २६ जानेवारी १९५० | उत्तरेला आहे. उत्तरी क्षेत्रातील बौद्धीक नेतृत्त्व करणारा प्रदेश |
| ६. | कर्नाटक | १ नोव्हेंबर १९७३ पूर्वी ते म्हैसूर | सुरूनाडू शब्दांतून शब्दाची उत्पत्ती ज्याचा अर्थ भव्य उच्चभूमी असा होता. कर्नाटक |
| ७. | केरळ | १ नोव्हेंबर १९५६ | केरळ म्हणजे नारळांचे वृक्षांची भूमी केरळ चेरलम पासून केरळम शब्द बनला. चेर म्हणजे मिळणे वा जोडणे. त्यानुसार अशी भूमी जी समुद्रातून प्राप्त होऊन जोडली गेली म्हणून केरळ. |
| ८. | गुजरात | १ मे १९६० | गुर्जरांचे राष्ट्र |
| ९. | गोवा | ३० मे १९८७ | महाभारतातील उत्पत्तीप्रमाणे गाय चारणाऱ्यांचे राष्ट्र असा होतो. समुद्राचा बाजूचे शहर - गोअ-वेल्हा = गोवा. |
| १०. | तामिळनाडू | १४ जानेवारी १९६९ | तामिळ भाषिक प्रदेश |
| ११. | त्रिपुरा | २१ जानेवारी १९७२ | त्रिपुर नावाच्या शासकाने बसविलेला प्रदेश तसेच अत्याचारी शासक त्रिपुरासूर व त्रिपुरारी म्हणजे शिवांचे मंदीर अनेक असल्यामुळे त्रिपुरा हे नाव पडले. |
| १२. | नागालँड | १९६१ मध्ये राज्यदर्जा प्राप्त. १डिसें.१९६३ला कायदेशीर योजना | नागांची भूमी या अर्थाने. |
| १३. | पंजाब | १ नोव्हेंबर१९५६ | पंज- पाच, आब- पाणी या दोन फारशी शब्दांपासून पंजाब शब्द बनला. त्याचा अर्थ पाच नद्यांचा प्रदेश असा होतो. |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | प. बंगाल | राज्यपुनर्रचना कायदा १९५६ | बंग शब्दापासून बंगाल शब्द बनला आहे. |
| १५ | बिहार | १९३६ मध्येच वेगळे राज्य झाले. १९५६ या कायद्याने पुनर्रचना झाली. | 'विहार' शब्दापासून बिहार हा शब्द बनला. येथे अनेक बुद्ध विहार आहेत म्हणून हे नाव पडले. |
| १६. | मणिपूर | २१ जानेवारी १९७२ | मण्यांचे नगर म्हणून मणिपूर. |
| १७. | महाराष्ट्र | १ मे १९६० | महान असे राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र, तसेच महारांचे राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र अशीही एक उत्पत्ती म.फुले सांगतात. |
| १८. | मिझोराम | २० फेब्रुवारी १९८७ | मिजो म्हणजे पहाडातील रहिवासी. पहाडातील निवासीचा प्रदेश म्हणून मिझोराम हे नाव. |
| १९. | मध्यप्रदेश | १ नोव्हेंबर १९५६ | मध्य भारतातील प्रदेश म्हणून मध्यप्रदेश हे नाव. |
| २०. | मेघालय | २ एप्रिल १९७०ला स्वायत्त प्रदेश | मेघ म्हणजे ढग, लय म्हणजे घर व म्हणजे ढगांचे घर म्हणून मेघालय हे पूर्णराज्याचा दर्जा मिळाला, नाव पडले. |
| २१. | राजस्थान | १ नोव्हेंबर १९५६ | राज स्थान म्हणजे सर्व स्थानात श्रेष्ठ म्हणून राजस्थान नाव झाले. |
| २२. | सिक्कीम | २६ एप्रिल १९७५ | सिब्बु भाषेत सिक्कीमचा अर्थ होतो. नवा महाल नैसर्गिक सौंदर्यामुळे यास स्वर्ग म्हणतात. |
| २३. | हरियाणा | १ नोव्हेंबर १९६६ | हिरवेगार क्षेत्र म्हणून हरियाणा म्हणतात. |
| २४. | हिमाचल प्रदेश | २५ जानेवारी १९७१ | हिम म्हणजे बर्फ. अचल म्हणजे पहाड. बर्फाने मुक्त पहाडी प्रदेश म्हणून हिमाचल प्रदेश |
| २५. | छत्तीसगड | १ नोव्हेंबर २००० | ३६ किल्ले आहेत म्हणून छत्तीसगढ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६. | उत्तरांचल/उत्तराखंड | १ नोव्हेंबर २००० | उत्तर म्हणजे उत्तर दिशा. अंचल व खंड म्हणजे प्रदेश म्हणून उत्तर म्हणजे उत्तराखंडक्षेत्र |
| २७. | झारखंड | १५ नोव्हेंबर २००० | झार असल्यामुळे झारखंड हे नाव पडले म्हणजे झाडांची विपुलता |
| २८. | तेलंगना | ०२ जून २०१४ | या भूप्रदेशात प्राचीन काळी तेलिंगाण, तेलिंगा, त्रिलिंग या नावाने संबोधले जात असे. त्यावरून तेलंगणा हे नामकरण झाले. |

**भारतातील केंद्रशासित प्रदेशः**

| अ.क्र. | नाव | स्थापना | अर्थ |
|---|---|---|---|
| ०१. | दिल्ली | | दिल्ली हा शब्द दहलीज या शब्दापासून आला आहे अशी एक अख्यायिका आहे. ज्याचा अर्थ चौकट असा होतो. सिंधू-गंगा नदीच्या भूमीचे हा प्रदेश प्रवेशद्वार आहे. काही इतिहासकार यास 'टिल्लू' या प्राचिन राजाच्या नावाशी जोडतात. |
| २. | अंदमान निकोबार | १ नोव्हेंबर १९५६ | अंदमान हा शब्द मलय भाषेतील हांदुमन शब्दापासून झालेला असून हनुमान या देवतेसाठी तो वापरला जातो. निकोबार शब्द ही याच भाषेतील असून त्याचा अर्थ नाग लोकांची भूमी असा होतो. |
| ३. | चंदीगड | १ नोव्हेंबर १९६६ | चंडिका देवीच्या मंदिरावरून चंदिगड हे नामकरण झाले आहे. |
| ४. | दादरानगर हवेली | २६ जानेवारी २०२० | – |
| ५. | लक्षद्विप | १ नोव्हेंबर १९५६ | बेटांचा प्रदेश म्हणून लक्षद्विप |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | पाँडेचरी/पुदुचेरी | १ नोव्हेंबर १९५९ पुद्दचेरी | हे नाव तमीळ भाषेतील असून त्याचा अर्थ 'नवेगाव' असा होतो. |
| ७. | जम्मू व काश्मीर | ३१ ऑक्टोबर २०१९ | केशर भूमी म्हणजे काश्मीर |
| ८. | लडाख | ३१ ऑक्टो. २०१९ | — |

### ३) लहान राज्यांची मागणी:

प्रादेशिकतेच्या समस्येने राज्यांना ग्रासलेले असतानाच लहान राज्यांच्या मागणीच्या माध्यमातून उपप्रादेशिकतेच्या समस्येने ही आपले डोके वर काढले आहे. विशेषतः २०००च्या दशकानंतर या मागणीच्या पूर्ततेसाठी तीव्र स्वरुपाची आंदोलने सुरू झाली. २००४ साली या आंदोलनाच्या रेट्यातूनच उत्तराखंड, झारखंड व छत्तीसगढ या राज्यांची निर्मिती करण्यात आली. लहान राज्यांच्या आंदोलनास मिळालेल्या या यशाने देशभरात विविध राज्यांमध्ये चालू असलेल्या लहान राज्यांच्या समर्थकांना अधिकच बळ मिळाले. राष्ट्रीय पक्षांनी ही राजकीय सोयीने त्यास हवा दिली त्यातच २०१४ साली तेलंगना हे नवे राज्य निर्माण झाले. त्यामुळे देशभर नव्या राज्यांची मागणी जोर धरू लागली. आसाममध्ये बोडोलँड, महाराष्ट्रात महाविदर्भ, प.बंगालमधील गोरखालँड, मध्यप्रदेशात 'स्वतंत्र विंध्य' प्रदेश, उत्तर प्रदेशातील हरित प्रदेश, बुंदेलखंड, ओरीसामधून 'स्वतंत्र कोमल राज्य' यासारख्या नव्या राज्यांची मागणी तीव्र झाली आहे. ज्यातून भारतीय राजकीय प्रक्रिया मोठ्या प्रमाणात प्रभावित होताना दिसत आहे. या दृष्टीने या संकल्पनेची मागणी करणे आवश्यक ठरते.

### लहान राज्याच्या मागणीमागील प्रमुख कारणे:

स्वातंत्र्योत्तर काळात भाषिक तत्त्वावर प्रांत पुनर्रचना करून व त्यानंतरही जनमताचा आदर करून या पुनर्रचनेत सातत्याने भर टाकून ही देशातील स्वतंत्र राज्यनिर्मितीची आंदोलने व मागणी मात्र शांत होतांना दिसत नाहीत. यामागे असणाऱ्या प्रमुख घटकांची मांडणी प्रामुख्याने पुढीलप्रमाणे करता येईल.

### १) प्रादेशिक असमतोल:

अखिल भारतीय पातळीवर जशी विकसित व मागासलेले राज्य अशी वर्गवारी स्पष्ट स्वरूपात प्रत्ययास येते. त्याप्रमाणेच घटकराज्य पातळीवर ही विकासाची विषमता प्रखरपणे प्रत्ययास येते. अखिल भारतीय पातळीवर विकसित म्हणून ओळखल्या जात असलेल्या घटकराज्यातील ही काही भाग हा विकासाच्या प्रक्रियेत कायम मागे राहिलेला दिसतो. यातून या भागातील जनतेच्या मनात आपल्यावर राज्यकर्त्यांकडून जाणीवपूर्वक अन्याय केला जात असल्याची भावना बळावते. उदा. महाराष्ट्र हे घटकराज्य अखिल भारतीय पातळीवर विकसित राज्य म्हणून नावाजले जाते. मात्र महाराष्ट्रातील विकास मुंबई-नाशिक-पुणे-ठाणे या औद्योगिक पट्ट्यात व प. महाराष्ट्राच्या चार जिल्ह्यात केंद्रीत झालेला आहे हे वास्तव आहे. मराठवाडा व विदर्भातील काही जिल्हे हे बिहार राज्यातील परिस्थितीपेक्षा ही दयनीय स्थितीमध्ये आहेत. त्यामुळे विदर्भ राज्याच्या मागणीचे आंदोलन हे प्रामुख्याने या प्रादेशिक असमतोलातूनच अधिक बळ घेताना दिसते. उत्तरप्रदेशातील उत्तराखंडचे आंदोलन ही याचेच एक उदा. आहे. २४ ऑक्टोबर १९७७ मध्ये पर्वतीय जिल्ह्यांच्या 'उत्तराखंड' राज्याची मागणी करण्यात आली. कारण पर्वतीय प्रदेशाच्या

विकासाकडे उत्तर प्रदेश सरकार हेतूपूर्वक दुर्लक्ष करते. वसाहतीप्रमाणे दुय्यम दर्जाची वागणूक देते अशी तेथील जनतेची भावना झालेली होती. घर-घर करेंगे नारा प्रचंड लेकर रहेंगे उत्तराखंड' ही घोषणा त्यामुळेच लोकप्रिय झाली.

## २) जातीय-जमातवादी भावनाः

नवीन छोट्या राज्यांच्या मागणीमागे जातीय-जमातवादी भावनाही मोठ्या प्रमाणात क्रियाशील असल्याचे स्पष्टपणे दिसते. आर्थिक आधारावर राज्यपुनर्रचना झाल्यानंतर ही या सांस्कृतिक जातीय अस्तिमांनी स्वतंत्र राज्यामध्ये एकवटल्याची प्रबळ इच्छाशक्ती कायम राखली. उत्तराखंड, छत्तीसगढ व झारखंड या नव्या छोट्या राज्यांची निर्मिती मूलतः या जमातवादी सांस्कृतिक अस्मितांना दिलेला प्रतिसादच होता. उत्तराखंड हे संपूर्ण राज्य सवर्ण जाती समुहाचे आहे तर झारखंड व छत्तीसगढ ही राज्य आदिवासी जमातीबहूल राज्य आहेत. गोरखालँड, बोडोलँड ही राज्यांची मागणी ही आपण जर पाहिली तर ही विशिष्ट जमातीची छोटी राज्य निर्माण करण्याची मागणी आहे हे स्पष्टपणे जाणवते. जम्मू-काश्मीर व लडाख या राज्याची विभागणी तर सरळ धर्माच्या नावावर झालेली आपणांस स्पष्टपणे दिसते आहे. या जात-जमातवादी भावनेतून ही मोठ्या राज्यातून विभक्त होण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली दिसते. लहान राज्यांमध्ये आपले सांस्कृतिक वेगळेपण व सुरक्षितता जोपासता येईल अशी आशा यामागे दाखविली जाते.

## ३) राज्यांची विषमतापूर्ण रचनाः

भाषावार प्रांतरचनेचे राज्यांची केलेली निर्मिती ही कमालीची विषमता निर्माण करणारी ठरली असे अभ्यासकांना वाटते. या रचनेच्या विषमतेतूनच लहान राज्यांची मागणी स्वाभाविकपणे पुढे झाली आहे असे जाणकारांना वाटते. क्षेत्रफळ आणि लोकसंख्या यांचा जरी विचार केला तरी याची प्रचिती आपणांस येते. आज उत्तर प्रदेशाची लोकसंख्या उत्तराखंड हे राज्य बाहेर पडूनही १७ कोटीपेक्षा अधिक आहे. याउलट सिक्कीम सारख्या राज्याची लोकसंख्या केवळ सहा लाखाच्या घरात आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार केला तर मध्यप्रदेशातून छत्तीसगढ बाजून होऊनही मध्यप्रदेश राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३लक्ष ८० चौ. कि.मी. पेक्षा अधिक आहे. याउलट गोवा राज्याचे क्षेत्रफळ केवळ ३ हजार ७०० चौ.कि.मी. आहे. म्हणजे एकीकडे उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान सारखी अवाढव्य राज्य तर दुसऱ्या बाजूला गोवा, सिक्कीम सारखी ठिपक्यासारखी वाटावीत अशी राज्य ही राज्यपुनर्रचना दोषपूर्ण व विषमतामूलंक आहे हे दाखवून देते.

## ४) दबावातून निर्माण झालेली राज्यपुनर्रचना सदोषः

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश राज्यकर्त्यांनी केलेली प्रांत रचना ही कोणत्याही घटकाच्या आधार वा शास्त्रीयतेच्या कसोट्या सांभाळून केलेली नव्हती तर ती रचना केवळ प्रशासकीय सोयीसाठी व जसा प्रदेश काबीज झाली तशी ती साम्राज्याचा भाग जोडत गेल्यासारखी होती हे वास्तव्य होते. स्वातंत्र्योत्तर काळात स्वतंत्र भारत सरकारने या प्रांताची केवळ वर्गवारी करून तीच प्रांतरचना पुढे रेटण्याचा प्रयत्न केला. त्यास राष्ट्रीय एकात्मतेची झूल पांघरण्यात आली. परंतु भाषिक प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांनी तीव्र आंदोलनातून राज्यकर्त्यांवरील दडपण प्रचंड वाढवले व या दडपणाखाली राज्यकर्त्यांनी १९५६ साली राज्यपुनर्रचना प्रत्यक्षात आणली. यानंतरच्या काळातही निर्माण झालेल्या सर्व घटकराज्यांच्या निर्मितीचा इतिहास बघितला तर आंदोलनाशिवाय व जनतेने निर्माण केलेल्या प्रचंड दडपणाशिवाय कोणतेही घटकराज्य निर्माण

झालेले दिसते नाही. प्रत्येक घटकराज्यातील आंदोलनाचे उपद्रव मूल्य जेवढे अधिक व तीव्र असेल तेवढे लवकर नवे राज्य निर्माण होतांना दिसते. त्यामुळेच तेलंगणा राज्याची मागणी तेथील जनतेच्या हिंसक आंदोलनाने प्रत्यक्षात आणली. त्या तुलनेत महाविदर्भ राज्याची मागणी अधिक न्याय्य व व्यवहार्य असतानांही डावलली जाते. कारण विदर्भातील जनता ही केवळ संवैधानिक व शांततामय मार्गानेच आंदोलन करते. परंतु अशा दडपणातून निर्माण झालेली राज्यरचना ही कायम सदोषच राहणार हे निश्चित. त्यामुळे नवीन लहान राज्यांची मागणी लांबत जाते.

### ५) राजकीय पक्षांचे हितसंबंध:

१९९० नंतरचे भारतीय राजकारण हे प्रामुख्याने आघाडीचे राजकारण आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व तत्सम सर्वच राष्ट्रीय पक्ष कमकुवत होत गेले व प्रादेशिक स्तरावरील राजकीय पक्षांना अधिक अवकाश प्राप्त झाला. त्यांनी प्रादेशिक राजकारणाबरोरबरच अखिल भारतीय स्तरावरील राजकारणास ही प्रभावीत करावयास सुरुवात केली. म्हणूनच उपहासाने असे म्हटले जाते की, 'पूर्वी पंतप्रधान राज्याचा मुख्यमंत्री ठरवत असे. आता मात्र राज्याचे मुख्यमंत्री पंतप्रधान ठरवतात. पूर्वी दिल्लीवरून राज्याचे राजकारण खेळले जायचे आज राज्य दिल्लीतील राजकारणाची दिशा निश्चित करतात.'' त्यामुळे केंद्रिय सत्तेचे कट्टर समर्थक असणारे काँग्रेस, भाजपासारखे दोन्ही प्रमुख राष्ट्रीय पक्ष छोट्या नव्या राज्यांचे जोरदार समर्थक बनले. नव्या राज्यांच्या निर्मितीमुळे सत्ताधारी होणे सोपे होते. त्यामुळे राजकीय पक्षांचे हितसंबंधच या लहान राज्यांच्या निर्मितीमागे अधिक क्रियाशील आहेत हे स्पष्टपणे दिसते.

### ६) प्रशासकीय कारण:

नवीन लहान राज्यांच्या मागे नकारात्मक भावनाच अधिक असल्यातरी त्यामागे सकारात्मक भाव ही क्रियान्वीत आहेत हे नाकारता येणार नाही. नव्या लहान राज्यांच्या निर्मितीमुळे विकासाला वेग येतो. प्रशासन व्यवस्था चांगली राहते. कायदा व सुव्यवस्थेवर नियंत्रण राहते. जनतेच्या आशा-आकांक्षा व भावनांचे प्रतिबिंब सरकारमध्ये पडते. सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाला दिशा प्राप्त होते. अशी मुद्दे या नव्या राज्याच्या मागणीमागे पुढे केले जातात. हरियाणा व गोवा राज्याचे उदाहरण यादृष्टीने आदर्श मानले जाते.

## लहान राज्य निर्मितीसंदर्भातील नेते व विचारवंतांची भूमिका:

राज्यपुनर्रचना हा स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच एक कळीचा प्रश्न राहिला. भारतीय संविधानाने संघराज्यात्मक शासनव्यवस्थेचे प्रतिमान स्वीकारले असले तरी संघराज्याची निर्मिती करतांना आवश्यक राज्यरचनेची जबाबदारी स्वतः न स्वीकारता ती संसदेवर सोपवली. राज्यपुर्नरचना आयोगाची निर्मिती १९५६ साली झाल्यानंतर या आयोगात ज्या साक्ष प्राप्त झाल्या व त्यानंतरच्या काळातही नवीन राज्यनिर्मितीच्या प्रश्नसंदर्भात ज्या प्रतिक्रिया राजकीय नेतृत्त्व व विचारवंताकडून आल्या त्यातून या प्रश्नासंदर्भातील त्यांची भूमिका स्पष्ट होतांना दिसते. नवीन लहान राज्याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयप्रकाश नारायण व पी.एन. रामास्वामी यांची भूमिका प्रतिनिधीक स्वरूपात अभ्यासणे गरजेचे ठरते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लहान राज्य निर्मिती विषयक भूमिका समकालीन काळातही तेवढीच औचित्यपूर्ण वाटते. त्यामुळे त्यांच्या भूमिकेचे अवलोकन करणे आवश्यक ठरते. १९५३

साली राज्यपुर्नरचना आयोगाची स्थापना होण्यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४८मध्ये भाषावार प्रांतरचना आयोगास एक प्रतिवेदन सादर केले होते. Maharashtra is a Linguistic province या नावाने ते प्रसिद्ध आहे. या प्रतिवेदनात त्यांनी भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व उचलून धरले असले तरी त्यांनी 'एक भाषा एक राज्य' या तत्वाऐवजी 'एक राज्य एक भाषा' या सूत्राचे समर्थन केले होते. 'एक भाषा एक राज्य' या सूत्राप्रमाणे एक विशिष्ट भाषा बोलणाऱ्या लोकांचे एकच एक असे संपूर्ण राज्य असावे ते आकाराने व संख्येने कितीही मोठे असले तरी चालेल या विचारास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रखर विरोध होता. डॉ. आंबेडकरांच्या मते एकच भाषा बोलणारे लोक जर फार मोठ्या प्रमाणावर असतील तर त्या भाषेच्या आधारावर एकापेक्षा अधिक राज्यांची निर्मिती केली पाहिजे. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राचा लढा चालू असतांना त्यांनी आपल्या भूमिकेचे प्रतिपादन करतांना मराठी भाषिकांचे एकच विशालकाय राज्य निर्माण व्हावे यास त्यांनी विरोध दर्शविला होता. त्याऐवजी मराठी भाषिकांच्या चार छोट्या राज्यांची कल्पना त्यांनी मांडली होती. त्याप्रमाणे महाराष्ट्र नगर राज्य- मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र व पूर्व महाराष्ट्र अशी चार राज्यांमध्ये विभागणी त्यांनी केली होती.

आपल्या भूमिकेचे समर्थन करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राचीन इतिहासाचे संदर्भ प्रस्तुत करतांना म्हणतात, 'अगदी प्राचीन काळापासून महाराष्ट्राचे तीन स्वतंत्र भाग होते. सम्राट अशोक ज्यांनी भारताच्या सर्व भागात बौद्ध धम्माचा प्रचार करण्यासाठी प्रचारक पाठवले तेव्हा 'महावश' या ग्रंथात 'त्रयी महाराष्ट्र' असा शब्दप्रयोग आठवतो. जो तीन महाराष्ट्राचे निदर्शक आहे. पाली साहित्यात पदोपदी 'त्रयी महाराष्ट्र' हा शब्दप्रयोग आठवतो याचाही दाखला डॉ. आंबेडकर देतात. एकंदरीत प्राचीन काळापासून तीन महाराष्ट्र अस्तित्वात होते त्यात आजच्या काळात मुंबईची भर टाकून चार मराठी भाषिक राज्ये निर्माण करावीत अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धारणा होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लहान राज्यांची कल्पना मांडताना केवळ महाराष्ट्रापुरता विचार केला नव्हता तर संपूर्ण देशाच्या राज्यपुनर्रचनेचा संदर्भ त्यांनी घेतला होता. प्रशासकीय दृष्ट्या व लोकशाही व्यवस्थेच्या जोपासण्याकरिता संपूर्ण देशभरात सर्वच राज्यांचा आकार हा आटोपशीर असावा अशी त्यांची भूमिका होती. महाराष्ट्राच्या बरोबरीनेच उत्तर प्रदेश, बिहार व मध्यप्रदेश या मोठ्या राज्यांचे विभाजन करून लहान राज्यांची योजना मांडली होती. या लहान-लहान राज्यांच्या सीमा ही त्यांनी निर्धारीत करून दिल्या होत्या. त्याप्रमाणे उत्तर प्रदेशाचे पश्चिम उत्तर प्रदेश, मध्य उत्तर प्रदेश व पूर्व उत्तर प्रदेश अशा तीन घटकराज्यांत विभाजन करावे असे त्यांना वाटत होते. मीरज, कानपूर व अलाहाबाद ही राजधानी ठिकाणे ही त्यांनी क्रमशः निश्चित केली होती. बिहारचे विभाजन करतांना उत्तर बिहार व दक्षिण बिहार अशा दोन राज्यात विभाजन करावे असे त्यांनी सुचवले तर मध्यप्रदेशाचे विभाजन ही उत्तर मध्यप्रदेश व दक्षिण मध्यप्रदेश अशा दोन राज्यात करणे त्यांना संयुक्तिक वाटत होते.

महाराष्ट्राचे चार राज्यात विभाजन करण्यासंबंधीची योजना कशी योग्य आहे याची कारणमीमांसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील तर्कांच्या आधारे केली होती.

१) विशालकाय स्वरुपामुळे शासनाच्या राज्यकारभाराच्या क्षमतेवर मर्यादा पडतील व त्यांतून जनतेच्या समस्या सोडवण्यात शासनास अडथळा होईल. परिणामी राज्याप्रती सामान्य जनतेच्या मनात असंतोष निर्माण होऊन नवीन आंदोलनांना प्रोत्साहन मिळेल.

२) मराठी भाषिकांचे चार राज्य झाल्यास मराठी भाषिक राज्य अधिक शक्तिशाली बनतील. एकाऐवजी चार मुख्यमंत्री मराठी भाषिकांचे प्रतिनिधित्व करत असतील तर केंद्र सरकारवर निश्चितच अधिक प्रभाव टाकतील असा तर्क यामागे डॉ. आंबेडकर देतात.

३) मराठी भाषिकांचे एकच राज्य निर्माण झाले तर एका विशिष्ट जातीसमूहाचे राजकारणातील प्राबल्य वाढेल व त्या जातीसमूहाच्या हातीच सत्तेचे केंद्रीकरण होईल अशी भीती डॉ. आंबेडकरांना वाटत होती. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठी जातीसमुहाचे जे प्रभुत्व निर्माण झाले ते डॉ. आंबेडकरांची भीती रास्त होती याची साक्ष देते.

४) महाराष्ट्र राज्याची विभाग निहाय विकासांची स्थिती भिन्न आहे. प्रदेशनिहाय आर्थिक विषमतेची स्थिती चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर मोठ्या राज्यात मागासलेल्या प्रदेशाकडे दुर्लक्ष होण्याचीच शक्यता अधिक असते. म्हणून मराठवाडा, विदर्भ, कोकणसारख्या मागास राहिलेल्या प्रदेशांना विकासाची स्वतंत्रपणे संधी देण्यासाठी स्वतंत्र राज्याचा दर्जा देणे डॉ. आंबेडकरांना आवश्यक वाटत होते.

५) मुंबई, पुणे व पश्चिम महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या विकसित आहे. विशालकाय महाराष्ट्र राज्यामुळे हे औद्योगिकीकरणाचे केंद्रीकरण अधिक बळकट होईल व उद्योगदृष्ट्या मागास असलेल्या विदर्भ व मराठवाडा सारख्या प्रदेशांची काळजी घेतली जाईल याचि खात्री देता येत नाही. म्हणून त्यांच्या स्वतंत्र राज्याचा विचारच अधिक व्यवहार्य आहे. असे डॉ. आंबेडकरांना वाटते.

६) डॉ. आंबेडकरांच्या मते महाराष्ट्राचे तीन विभाग हे ऐतिहासिक सत्य आहे, परंपरा, जीवन, सामाजिक परिस्थिती व आर्थिक स्थिती या सर्वातून हे वेगळेपण आजही स्पष्टपणे दिसते. त्याचा आदर ठेवून छोटी राज्य निर्माण करणेच संयुक्तिक ठरते.

७) प. महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा व विदर्भ शैक्षणिक दृष्ट्या खूप मागे आहेत. मराठवाडा हा दीर्घकाळ निझाम राजवटीत असल्यामुळे या दृष्टीने तो मागे राहिला तर विदर्भ हा मध्य प्रांताचा भाग राहिल्याने तोही दुर्लक्षित होता. अशा परिस्थितीत या प्रदेशांना महाराष्ट्राच्या दावणीला बांधले तर मागच्याच अनुभवाची पुनरावृत्ती होऊ शकते. त्यासाठी डॉ. आंबेडकर त्यांच्या स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या बाजूने होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते "एक भाषा एक राज्य हा राज्य निर्मितीचा नियम असंबंध तर्कशून्य असा आहे. त्यामुळेच ते लहान लहान राज्यांचा स्वीकार करत एक राज्य एक भाषा या सूत्राचा स्वीकार करतात. त्यांच्या मते, " लोकशाही योग्य पद्धतीने कार्यन्वित करायची असेल तर प्रजेची विभागणी करून भौगोलिक सीमा अशा पद्धतीने निर्धारीत कराव्यात की ज्यामुळे एका प्रदेशातील राज्य एक स्वतंत्र असा एकात्म समूह मानून ओळखता येईल. पण केवळ भाषा हा एकात्मते चा निकष योग्य नाही. ही भाषा प्रजेचा एकात्म समूह निर्माण करीत नाही. एकात्मता ही इतर असंख्य घटकांवर अवलंबून असते आहे आणि राज्यांची निर्मिती करताना या इतर घटकांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

**जयप्रकाश नारायण:**

लहान राज्यांच्या समर्थकांमध्ये लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी १९७७ मध्ये शासन व जनता यातील अंतर कमी करण्याच्या दृष्टीने लहान राज्यांच्या निर्मितीचा सल्ला राज्यकर्त्यांना दिला होता. आपल्या विचारांच्या समर्थनार्थ तर्क देताना ते म्हणतात, "लहान राज्यांची निर्मिती

केली तर मुख्यमंत्री व मंत्रीपदाचा राज्याच्या जनतेशी संपर्क सहजपणे घडू शकेल. लहान राज्याच्या निमित्ताने शासन सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन जनतेचा आवाज सरकारपर्यंत त्वरित पोचू शकेल जे विशालकाय यांच्या संदर्भात आज शक्य ठरत नाही." नाही परंतु लोकनायक जयप्रकाश यांच्या प्रयत्न व आशीर्वादाने सत्तेत आलेल्या जनता पक्षाच्या सरकारने त्यांची ही इच्छा फारशी गांभीर्याने घेतली नाही.

या दृष्टीने उत्तर प्रदेशात आ. हुकूम सिंह परिहार यांनी एका निवेदनाद्वारे उत्तर प्रदेशच्या विभाजनाची मागणी केली होती. काही आमदारांच्या स्वाक्षरीने त्यांनी आपले निवेदन राष्ट्रपतींनाही सादर केले होते. या निवेदनात त्यांनी उत्तर प्रदेश भौगोलिक व लोकसंख्येच्या दृष्टीने विशाल काय राज्य असून प्रशासकीय व लोकशाही व्यवस्था आता रुजण्याच्या दृष्टीने यशस्वी होऊ शकत नाही हे निदर्शनास आणून दिले. त्यासाठी उत्तर प्रदेशाचे चार राज्यात विभाजन करावे असा त्यानी आग्रह धरला. गृहमंत्री असताना चौधरी चरण सिंग यांनीही या पद्धतीने उत्तर प्रदेशाचे विभाजन करण्याची मागणी लावून धरली होती.

**पी.एन. रामास्वामी:**

पी. एन. रामास्वामी यांनी भारतीय संघराज्यात पुनर्रचना करण्यासाठी पुन्हा नव्याने राज्य पुनर्रचना आयोग गठित करण्याचा आग्रह धरलेला दिसतो. विकासाची प्रक्रिया गतिमान करण्याकरिता देशातील मोठ्या दहा राज्यांचे विभाजन करून त्यातून २७ नवीन लहान राज्य निर्माण करणे गरजेचे आहे. त्यांच्या मते दहा राज्यांचे सत्तावीस लहान राज्यात परिवर्तन करण्याचा एक मोठा फायदा म्हणजे केंद्र सरकार वरील विकास कामाचे ओझे कमी होईल. त्याचबरोबर राज्यांना विकास कार्यात स्वायत्तता बहाल होऊन सत्तेच्या विकेंद्रीकरणातून जनतेचा विकास कार्यातील सहभाग वृद्धिंगत होईल. पी एन रामास्वामी यांनी पुढील तक्त्याच्या आधारे आपली योजना स्पष्ट केली आहे.

**तक्ता - पी एन रामास्वामी, योजना**

| अ. क्र. | राज्य | वर्तमान लोकसंख्या | प्रस्तावित राज्यांची संख्या | प्रस्तावित राज्यांचे लोकसंख्येचे प्रमाण (कोटी) |
|---|---|---|---|---|
| ०१ | आंध्र प्रदेश | ७.६० | ०३ | २.६० |
| ०२ | गुजरात | ५.१० | ०२ | २.१६ |
| ०३ | मध्य प्रदेश | ५.०० | ०२ | २.५० |
| ०४ | राजस्थान | ५.७० | ०२ | २.९० |
| ०५ | उत्तर प्रदेश | १६.६० | ०५ | ३.५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६ | बिहार | ८.३० | ०३ | २.८० |
| ०७ | कर्नाटक | ५.२० | ०२ | २.६० |
| ०८ | महाराष्ट्र | ९.७० | ०३ | ३.२० |
| ०९ | तामिळनाडू | ६.२० | ०२ | ३.१० |
| १० | प. बंगाल | ८.०० | ०३ | २.७० |

आधारः- भारतातील राज्यांचे राजकारण डॉ. मोहन दिवान

## ४.६ वांशिक राजकारण

शीतयुद्धाच्या समाप्तीपासून वंशिक चळवळी आणि आणि वंशिक संघर्ष हे प्रमुख राजकीय संघर्ष म्हणून पुढे आलेले दिसतात. १९९० नंतरच्या काळात जातीय वंशिक समस्यांवरील संशोधन हे सामाजिक विज्ञान संशोधनाचे मुख्य क्षेत्र बनलेले आहे. वशिकतेची व्याख्या एक प्रकारे सामूहिक जाणीव म्हणून केली जाते. जी सामान्यतः मतभेद, भाषा, धर्म आणि इतिहासाच्या संदर्भाने असते. वंशिकता हा राष्ट्रकल्पनेचा गाभा मानला जातो. मात्र आधुनिक काळात बहूवांशिक, बहुभाषिक, बहु धार्मिक लोक समूहांचे राष्ट्र राज्यही अस्तित्वात आहेत. अशा बहुवांशिक राष्ट्र राज्यांमध्ये वंशिक राजकारण हे राजकीय पक्षांसाठी आपल्या राजकीय महत्त्वकांक्षांना साध्य करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून पुढे आलेले दिसते.

जेम्स मनोहर यांनी त्यांच्या इथनिक पॉलिटिक्स इन इंडिया या ग्रंथात भारतातील वांशिकतेचे स्पष्टीकरण करण्यासाठी धर्म, भाषा, वंश आणि जात या चार चार घटकांची मांडणी केलेली दिसते. प्रा. एस डी मुनी यांनी यासंदर्भात असे म्हटले आहे की, वंशिकता हे प्रादेशिक अखंडतेला आव्हान नाही कारण भारतीयांची ओळख कायमस्वरूपी नसते त्यांची ओळख तरल आहे. अतुल कोहली यांनी यांनी लोकशाही जातीय आव्हाने स्वीकारू शकते? या लेखात असे निरीक्षण नोंदविले आहे की, पारंपरिक समाजातील लोकशाही वांशिक धर्तीवर लोकांना एकत्र करण्याचा प्रयत्न करतात. सरकारीया आयोगाने या संदर्भात असे मत नोंदवले होते की, वंशिक चळवळी या निव्वळ वांशिक चळवळी नसतात तर त्यामागे राजकीय व आर्थिक आकांक्षा मोठ्या प्रमाणात असतात चार्ल्स टेलर वांशिक हालचालींकडे उपेक्षित समुदायांचे प्रतिपादन म्हणून पाहतो तर निरा चांदके यांच्या मते, लोकसंख्येचे एक संधीकरण करण्याचे राज्याचे प्रयत्न वांशिक मॅपिंग सारख्या कृतींमुळे लोकांना वांशिक. ओळखीची जाणीव होते. प्रोफेसर एस. डी मुनी वांशिकता हे लोकांची निवड नसून राजकीय पक्षांची पसंती आहे असे मत नोंदवतात तर प्रादिप शंकर गुप्ता यांच्या मते वंशिकता ही लोकप्रिय आवड नसून भारतातील उच्चभ्रू लोकांची पसंती आहे. भारतातील वंशिक राजकारण प्रामुख्याने राज्यांमध्ये ईशान्य राज्यांमध्ये आढळते ईशान्य भारतात अरुणाचल प्रदेश आसाम मणिपूर मेघालय मिझोराम नागालँड सिक्कीम व त्रिपुरा या आठ राज्यांचा समावेश होतो. हा प्रदेश विविध वंशिक आणि सांस्कृतिक गटांचे घर आहे याशिवाय जमिनीचा वापर आणि भाषा ओळख निर्मिती लोकसंख्या बदल आणि अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांक संबंध याबाबतीत ही संघर्ष निरंतर चालू असलेला दिसतो अलीकडील मणिपूर संघर्ष

हे याचे ज्वलंत उदाहरण होय ईशान्य प्रदेशातील विविध वंशिक गटांनी जातीय निष्ठेवर आधारित त्यांची ओळख सांगावयास स्वातंत्र्योत्तर काळाच्या प्रारंभ पासूनच सुरुवात केलेली दिसते सांस्कृतिक भाषिक किंवा धार्मिक असो, स्वायत्तता, जमीन, भारतीय संघाच्या आत किंवा बाहेर वेगळे राज्य किंवा एस.सी एस.टी दर्जाची मागणी आणि त्यांचे बंडखोर गटामध्ये रूपांतरित होण्याचे मर्यादित यश किंवा अपयशाने केवळ संपूर्ण समाजच बदलला नाही ईशान्य भारत हा राष्ट्र राज्या विरोधात युद्धाची पोषक भूमी बनलेला दिसतो आहे त्यातूनच तेथील विविध वंशिक गटांमध्ये तीव्र संघर्ष उफाळून येताना दिसत आहेत. वर्चस्व असलेल्या राज्याच्या राजकारणाद्वारे हस्तक्षेप न करण्याच्या संस्कृतीच्या धर्मनिरपेक्ष राजकीय धोरणात जेव्हा ते वंशिक सांस्कृतिक किंवा भाषिक धर्तीवर स्थापन केलेल्या वास्तविकतेद्वारे स्पर्धात्मक गरजा आणि स्वारस्यामध्ये परिभाषित केले जाते व बंदिस्त केले जाते तेव्हा मतभेदाचे निराकरण अत्यंत तर्क संगततेवर आधारित असू शकत नाही. कारण जेव्हा सांस्कृतिक व्यक्तिमत्वावर जास्त जोर दिला जातो तेव्हा ते अकार्यक्षम असेल.

ईशान्य भारतातील राज्य बंडखोरी चळवळींची भूमी बनत असल्याचे दिसते त्यामुळे प्रादेशिक केंद्रित वंशिक सांस्कृतिक अल्पसंख्यांक गटांमधून बंडखोर गटांचा बहर होण्याआधी राज्याने संरक्षण आणि सुशासन यंत्रणेसाठी तयार केलेल्या फ्रेमवर्क कडे पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे आदिवासी समुदायांसाठी स्वशासन आणि स्वायत्तता या संकल्पनेची संकल्पना या चौकटीत चांगली मांडण्यात आली असली तरी गैर आदिवासी बहुल राज्याच्या बाबतीत ही चौकट वर्चस्वाच्या राजकारणात गुंतलेली असल्याचे वास्तव दर्शविते.

## ४.७ सारांश

एकंदरीत जमातवाद, धर्मनिरपेक्षता, भाषिक प्रश्न व स्वायत्त आणि स्वतंत्र राज्यांची मागणी या भारतीय राजकीय प्रक्रियेतील घटकांची परस्परावलंबी अशी एक साखळी तयार झालेली दिसते. ती बऱ्याच अभद्र युती च्या स्वरूपात पुढे येऊन भारतीय लोकशाहीच्या अवकाशास अधिकाधिक संकुचित करते. यातील बहुतांश घटकांची मुळे व पार्श्वभूमी ब्रिटिश वसाहतवादाच्या काळातच तयार झाली. काही घटकांचे सनातनत्व हे भारतीय प्राचीन वारशांपर्यंत मागे जाते. जमातवादी राजकारणाची पार्श्वभूमी भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या बरोबरीने भारतीय समाज जीवनात पुढे आली. ब्रिटिश वसाहतवादी राज्यकर्त्यांचे धोरण व काही स्वार्थी जमातवादी नेत्यांच्या धोरणांमधून ही विषवल्ली भारतीय समाजमनात पाझरत गेली व संमिश्र राष्ट्रवादास मागे सारून द्विराष्ट्रवाद भारताच्या फाळणी तून सरस ठरला. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधान कारांनी जाणीवपूर्वक धर्मनिरपेक्ष राज्य पद्धतीची मांडणी संविधानाच्या स्वरूपात अंतर्भूत केली मात्र तरीही भारतीय राजकारणात जमातवाद हा छुप्या स्वरूपात विकसित होत गेला व १९८०च्या दशकात तो अधिक उग्र पद्धतीने पुढे आला. दुसऱ्या बाजूने प्रादेशिकतेच्या घटकानी स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या दशकातच राष्ट्रीय भाषा प्रश्न व भाषावार प्रांतरचनेच्या स्वरूपात आपले डोके वर काढले होते. २००० साल येता येता ते स्वायत्त व स्वतंत्र राज्यांच्या मागण्यांपर्यंत उग्र स्वरूप धारण कर्ते झाले आहे. या सर्व घटकांनी भारतीय राजकारण व्यापले इथपर्यंत ठीक आहे, परंतु यातून एकूण भारतीय संविधाना समोरच प्रश्नचिन्ह उभे राहिले, भारतीय लोकशाहीच धोक्यात आली तर मात्र भारतीय समाज जीवन या आधुनिक युगातही कोसो दूर मागे मध्य युगात जाऊन पोहोचेल. हे होऊ नये यासाठी "आम्ही भारताचे लोक" ही संविधान कारांची संकल्पना भारतीय जनमाणसात सजीव होण्याची अत्यंत आवश्यकता आहे या निष्कर्षाप्रत आपण येतो.

## ४.८ आपण काय शिकलो?

प्र.१ भारतातील जमातवादी राजकारणाचे परीक्षण करा?

प्र.२ भारतातील धर्मनिरपेक्षतेच्या विचारांचा आढावा घ्या.

प्र.३ भारतातील जमातवादी व धर्मनिरपेक्ष राजकारणाची परस्पर संघर्षाच्या स्वरूपात मांडणी करा.

प्र.४ भारतातील भाषिक प्रश्नांवर निबंध लिहा.

प्र.५ भारतातील प्रादेशिकतेच्या घटकांची मांडणी करा.

प्र.६ भारतातील स्वायत्त व स्वतंत्र राज्यांच्या मागणीचे टिकात्मक परिक्षण करा.

प्र.७ भारतातील पूर्वोत्तर राज्यांचे राजकारण यावर टीप लिहा.

## ४.९ संदर्भसूची


१) बंग के. आर., 'भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११.

२) भोळे भा. ल., 'भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण', पिंपळापुरे पब्लिकेशन्स, नागपूर, २००३.

३) बकाने छाया, 'भारतीय राजकीय व्यवस्था आणि राजकीय प्रक्रिया', विद्या प्रकाशन, नागपूर

४) जैन अशोक, 'भारतीय राजकीय व्यवस्था', शेठ पब्लिकेशन्स, मुंबई, २००३.

५) कुलकर्णी बी. वाय., 'भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया', एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१३.

६) Introduction to the constitution of India, D. D. Basu, 19th Edition 2001.

7) Indian Administration Problems & Attitudes S.K. Khanna ed - 1999

8) Landmarks in Indian Constitutional and National Development, G.N. Singh

९) देशमुख स्नेहलता ( अनु) "लोकशाही जाणीव व जोखीम." मुंबई.


*****